Under the leadership of Limaye, V. P., & Wadekar, R. D. at Vaidik Sanshodhan Mandal of Tilak Maharashtra Vidyapith Poona, the book 'Eighteen Principal Upanishads Vol. 1. Upnishadic text with parallels from extent Vedic literature, exegetical and grammatical notes' was published. Dr. Vartak explained the scientific way and personal meditation experiences.

**Discussion:**

This is the beauty of contemporary literature that the expectations of the current listeners or readers are equally addressed as like the rules of the science which he or she is going to learn. As like Gurudev Ranade relate *Prana-Rayi* with Aristotelian matter-form doctrine. Bhide *Shastri* promote 'the *Sansad,'* the discussing place as meaning of *Upanishad* with reference to Late Rajaram Shastri Bhagawat.

Contemporary literature balances between the core paradox of the Vedas and the *Upanishads*. Gurudev Ranade states in constructive survey of Upanishadik philosophy that, "for knowledge though *Upanishads* stands against the *Brahmanical* philosophy, they rarely exhibit this halting attitude towards ritualism."[12]

Contemporary literature led us to different neutral opinions at one place with references and with the inclining thoughts of the writer too. Gurudev states all four theories of sleep, before declaring the *Prana* as the ultimate substratum or final absorbent. He states it along with opinions of Eastern, Max Muller, Dussen, and Descartes of 'The

sole or resting artisan while sleep goes at *Puritat* arteries, pericardium, surrounding body, pineal gland' [13], exemplify with kite like theories.

Contemporary literature provides a universal timeline. Like Gurudev states *Yam-Niyam* were added later and the Yoga references were present in *Upanishads* prior to Bhagavad-Gita. Physiological studies dominated with the Yoga and full-fledged medicine system, the Ayurveda thereafter.

It's natural to have difference or distance in the time span of thought generation and being available the written text on it. Bhide Shastri states it may vary from 24 to 400 years naturally. This also applies to the difference or distance of time in the text and philosophical repercussions on it and its documented version too. At the beginning of preface in the book Principle Upanishads S. Radhakrishnan says, 'Problem of human still exists doesn't mean Upanishad is failed in its teachings'. So knowing, learning, and walking on this path is the goal, we can conclude.Russell states that, 'philosophers from Egypt and Greek and tradition interpret the role of Middle-East in the making of modern world philosophy and culture'[14] Similarly while explaining the references of *Vedik* scriptures, *Motilal Shastri* depicts that the vast arena of *Aryan* concepts of *Lokas* and *Vedik* symbols/deities spread unto the middle east.

**Conclusion**:

It seems from time to time that nature repeats itself in circular fashion. From current tilting of the globe towards ancient knowledge doesn't seems to be the first attempt. Attempts to make *Upanishads* as Central place of intellectual psyche was the dream of these contemporary writer too. Not only due to the post war situation or the freedom fight struggle, but also due to the inherent expectations of *Upanishads* were present in making these people to think themselves as a global citizen.

If we had a look in the book 'The History of Western Philosophy' by Russell and simultaneously go through the *Vidnyan-Bhashya* of Motilal *Shastri* on *Atharvavediy Upanishad*; we found that the concepts and terminologies as mirror images across the globe. It needs to be noted that, despite being these two text from totally unrelated environments they are leading us almost to the same facts.

We can deduct from the whole history of *Upanishads* since inception that, the mere study, or reading without following by heart won't benefit the expectations from these powerful scriptures. Since the philosophy is neither interested in actual field work of a visionary Shri. Pandurang Shastri Athavale, nor in the mere discussions of words and traditions; but is interested in the afterthoughts, learning, the stream of thoughts behind accepting-refuting of the actions following the understanding these thoughts. So the critical evaluation of these contemporary literature is the need of time to shape the better future and nurture the good practices in the field of philosophy too.

**Bibliography:**


1. Dasgupta, S. (1957). A History of Indian Philosophy Volume 1 (fourth reprint). Syndics of Cambridge University Press, London Office: Bentaly House, N.W.I. (P.65, 38, 39)
2. Moholkar, V. R. (1852). Upanishadratnakar-1 with Prashnopanishad Manthachali Tika. Shankar Amrit Joshi, Bharat Dharma Mandal, Pune. (P. 8, 20)
3. Swami, N. (1852). Prashnopanishad Satyanarayanacha Khara Arth (K. B. Tarkar, Ed.). Mumbai: 50 Kasara Chawl, Mumbadevi. (Mantra 3/37, P.26)
4. Radhakrishnan, S. (1963). The Principal Upanishads (Second Ed). London George Allen and Alwen Ltd., Ruskin House, 40 Museum Street. SBN-04-294047-8 (P.43 of introduction)
5. Alike 4. (P.22)
6. Ranade, R. D. (1926). A constructive survey of Upanishadic philosophy. Pune: Oriental Book Agency. (P.64)
7. Chattopadhyaya, D. (1959). Lokayata: A study in ancient Indian materialism (Philosophy). New Delhi: People's Publishing House. (P. 99)
8. Alike 6. (P.190)
9. Teerth Paramhans, S. V. (2022). 13 Prashnopanishad Hindi Vyakha Samhita with Shankara Bhashya and Anandgiri Tika (1st Ed.). Ludhiana, Punjab: Sri Gurudev Ashram. (Mantra 2/2, 3/8)
10. Bhide, S. (1929). *Upanishatprakash*, Part 1 (First Edition). Pune: Sadashivshastri Bhide, Founder, Gita Mandal. (P. 70)
11. Alike 2.
12. &13) Alike 6. (page 7, & 120)
13. Russell, B. (1945). The History of Western Philosophy. George Allen & Unwin. (P. 35, 278)
14. Shastri, P. M. (1965). Atharvavediya Prashnopanishad Hindi Vigyan Bhashya (1st ed.). Jaipur: Rajasthan Patrika Limited.(P.19)
15. Radhakrishnan, S. (1923). Indian Philosophy Volume 1. George Allen and Alwen Ltd., Ruskin House, 40 museum street, W.C. McMillon company New York
16. Bhagvat, D. N. (1955). Early Buddhist jurisprudence. Oriental Books.
17. Bhanu, C. G. (1912). Prashnopanishad (with Shankar Bhashya). Damodar Savalaram and Associates, Thakurdwar-Mumbai. (P. 229)

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# श्रीगुलाबराव महाराजांचे प्रमुख नीतिसूत्राबद्दलचे विचार

**डॉ. सुनिलदत्त एस. गवरे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
शिवळे महाविद्यालय, शिवळे
**Corresponding Author: डॉ. सुनिलदत्त एस. गवरे**
**DOI-10.5281/zenodo.14546470**

**प्रस्तावना :**

नीतीमूल्ये अनेक प्रकारची असली तरी त्याचे ध्येय मात्र एकच असते. ती म्हणजे समाजात सद्‌गुण तयार करणे ही महत्त्वाची भूमिका कुटुंबाची असते. कुटुंब असे संस्कार करीत असताना काही जीवन मूल्ये जपत असते. ती परंपरेने चालत आलेली असतात. या मूल्यांना अभिप्रेत असते ते म्हणजे कल्याण; परंतु या मार्गापासून कुटुंब हटले की मात्र मनुष्याचे आयुष्य पतंगासारखे होते. जीवनाच्या वाटचालीत जशी चांगली मूल्ये रूजतात, त्याप्रमाणे अधोगतीस नेणारी मूल्ये ही जन्म घेतात. अशी मूल्ये जीवनाचा अध:पात करतात. नैतिकदृष्ट्या जीवनच कलंकीत करतात. अशा मूल्यांपासून माणूस दूर जातो. कारण त्यांचा संबंध संस्कृती, परंपरा, भाषा, अस्मिता, इतिहास, राष्ट्रभावना या सगळ्यासोबत असतो. त्याचप्रकारे समाजाच्या विकासासाठी सुद्धा नैतिक मूल्यांची गरज असते.

प्रत्येक मनुष्य समाजात जन्मतो आणि त्यातच तो स्वत:चे जीवन जगत असतो. या वातावरणातच नैतिक ध्येयाचे, मूल्यांचे ज्ञान तो मिळवीत असतो. मनुष्याचे आचार विचार विनिमयामुळे योग्य परिवर्तनही घडत असते. समाजामध्ये इतर व्यक्तीच्या संबंधाने प्रत्येक व्यक्तीचा विकास होत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वस्तुनिष्ठ होत असतो. नैतिक सिद्धांताना अशा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.

**प्रमुख नीतिसूत्रे :**

नैतिक आचरणासंबंधी सूत्ररूपाने श्रीगुलाबराच महाराज असे म्हणतात की,[१]

1. नीती ही सार्वत्रिक, जागतिक स्वरूपाची असते. ती धर्म, वंश, भाषा, देश, संस्कृती यांवर अवलंबून ठेवावयाची नसते.
2. नीती जगातील सर्वच स्त्री पुरूषांना सर्व काळात एकसारखीच असते.
3. शुद्ध नीतीच्या बाबतीत सापेक्षतेला वाव नसतो.
4. शुद्ध नैतिक आचरण हे जगातील सर्व माणसांना समान असून ते देश, धर्म, भाषा, संस्कृती इत्यादी भेदांवर अवलंबून असता कामा नये.
5. नैतिक कर्तव्यांचे पालन बंधनकारकच असते व असावयास पाहिजे.
6. नैतिक कर्तव्यांचे पालन वैकल्पिक असता कामा नये.
7. नैतिक सदाचरण प्रत्येक व्यक्तीने करण्यावरच त्या त्या समाजाची धारणा, त्यांचे अस्तित्व, स्वास्थ्य, सुरक्षितता, सौख्य, सातत्य आणि गुणवत्ता अवलंबून असते.
8. कोणीही व्यक्ती स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर असू शकत नाही. प्रत्येक स्त्रीपुरूष समाजाच्या स्वास्थ्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने अंतर्बाह्य अवलंबून असल्यामुळे समाजाच्या सुरक्षिततेच्या अभावी कोणतीही व्यक्ती सुरक्षित, समाधानी व सुखी राहू शकत नाही.
9. नीतीच्या बाबतीत मतभेदांना वाव नसतो. भारतीय व भारतीयेत्तर असा फरक नीतीत करता येणार नाही. कारण खरी नीती संपूर्ण मानवजातीच्या धारणेसाठी अत्यावश्यक व अपरिहार्य असते.
10. नैतिक कर्तव्याच्या बाबतीत व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली कोणाही व्यक्तीला अपवाद म्हणून वगळता येणार नाही; नीतीच्या क्षेत्रात सुटी नसतेच.
11. धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कलात्मक, आर्थिक बाबतीत भलेही मतभेद असू शकतात व चालू शकतात, परंतु शुद्ध नैतिक सदाचरणाच्या बाबतीत मतभेद आणि व्यक्तीने आपल्या लहरीप्रमाणे वागणे यांना मुळीच स्थान असता कामा नये.
12. प्राचीन काळी व मध्ययुगात धर्माचे प्रामाण्य, ईश्वराची भीती किंवा कृपा, पापपुण्यावरील श्रद्धा यांचे नैतिक सदाचरणाला पाठबळ व शासन निरर्थक व निष्प्रभ बनले आहे.
13. म्हणून नीतीला विवेकबुद्धीचा आधार व पाठबळ देण्याचा आधुनिक काळात प्रयत्न केला जात आहे. पण तोही प्रभावी ठरत नाही. कारण बौद्धिक दृष्टिकोनात अनेकता, विविधता व परस्पर-विरोध येऊन सर्वांना मान्य होणारी एकवाक्यता घडून येत नाही.
14. कायद्याने, सत्तीने, बलाने लोकांना नीतीमान बनविता येत नाही.
15. नैतिक सदाचरण प्रत्येक व्यक्तीने स्वत: होऊन, स्वच्छेने, मनापासून व प्रामाणिकपणे करावयाचे असते, आणि तसे झाले तरच समाजात खरी नीतिमत्ता येऊ शकते.
16. त्यासाठी 'कर्तव्याकरिता कर्तव्य' याच भावनेने प्रत्येक व्यक्तीने नैतिक कर्तव्याचे पालन करणे आवश्यक आहे.
17. कर्तव्य पालनाच्या बाबतीत सैलपणा, ढिलाई, टाळाटाळ क्षम्य मानता उपयोगी नाही.
18. हिंदू संस्कृतीतील कर्मसिद्धांत आता वादग्रस्त बनल्यामुळे विचारपूर्वकपणे प्रत्येक व्यक्तीने नैतिक सदाचरण करण्यावर तिच्यावरील जबाबदारी वाढली आहे.
19. नीतीमुळे समाजजीवनाची सुरक्षितता, शांतता, व्यवस्था व प्रगती धोक्यात येते, म्हणून प्रत्येक व्यक्तीने अनैतिक आचरण हेतुपूर्वकपणे करता कामा नये.
20. नैतिक सदाचरणाचा आत्मशुद्धीशी संबंध असला पाहिजे. नैतिक सदाचरण व्यावहारिक नफ्यासाठी किंवा फायद्यासाठी करणे गैर आहे.
21. नैतिक कर्तव्य प्रत्येक व्यक्तीने स्वेच्छेने व व्रत म्हणून करण्याची मानसिक सवय तयार व्हावयास पाहिजे.
22. प्रार्थनासमाज, ब्राह्मसमाज, आर्यसमाज यांच्यासारखा कर्तव्यसमाज बनावयास पाहिजे.

23. नैतिक सदाचरणाच्या बाबतीत तत्त्वज्ञानात्मक, धार्मिक, राजकीय इत्यादीसारखे मतभेद आड येता कामा नयेत.
24. नैतिक सदाचरण करण्यास धार्मिक पावित्र्य प्रदान करावयास पाहिजे, आणि अनैतिक आचरणाला पापरूप समजावयास पाहिजे. इतर अनेक बाबतीत मतभेद व श्रद्धाभेद असले तरी नैतिक सदाचरणाच्या बाबतीत सार्वत्रिक एकवाक्यताच राहिली पाहिजे.

एकविसाव्या शतकात नैतिक मूल्य व्यवस्थेचे अध्ययन सामाजिक हिताकरीता अत्यंत अनिवार्य आणि महत्त्वपूर्ण आहे कारण या शतकाचे अवलोकन केल्यास असे दृष्टिक्षेपास येते की समस्त नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला आहे आणि जर नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला तर संपूर्ण समाज व्यवस्था कोसळून जाईल सामाजिक व्यवस्थेचा अनिवार्य घटक 'मनुष्य' नाममात्र ठरेल. म्हणून देशाच्या आणि समाजाच्या हिताकरीता नैतिक मूल्य व्यवस्थेचे अध्ययन होणे आज अनिवार्य आहे.

परंतु एकविसाव्या शतकात नैतिक मूल्यांकडे अवधान पुरविले तर आपल्याला असे दिसून येते की बदलत्या परिस्थितीनुसार आपली नैतिक मूल्ये सुद्धा परिवर्तीत होत चाललेली आहेत. एवढेच नाही तर त्यांचे पतन होताना दिसून येत आहे. खरेतर समाज दिवसेंदिवस विकसित होत असला तरी दुसरीकडे या समाजातील मूल्यांचे पतन होताना दिसून येत आहे. आज विज्ञानाने अधिक प्रगती केलेली असून मनुष्य म्हणून व्यक्तीचे अधःपतन होताना दिसत आहे. त्यामुळे वैद्यकीय, तांत्रिक, पर्यावरणीय, व्यावसायिक, प्रशासन, शिक्षण इत्यादी नीतिशास्त्र या सारख्या विषयांच्या अध्ययनाची गरज निर्माण झाली आहे. या देशातील राष्ट्रपदी एक महिला जाऊ शकते तर त्याच देशात स्त्रीयांची स्थिती वाईट होत चालली आहे. उदाहरण द्यायचे झाले तर पंजाबमधील एका गावात पती स्वतःच्या पत्नीला एच.आय. व्ही वायरस ने संक्रमित इंजेक्सन देवून तिचे संपूर्ण जीवन उद्ध्वस्त करताना दिसून येते. तसेच बलात्कार, भृणहत्या, हुंड्याकरिता स्त्रीयांना त्रास देणे यासारख्या घटना अधिक प्रखरतेने वाढताना दिसून येत आहेत. या संदर्भात दिल्लीतील घटना विसरता येत नाही. समाजात वाढणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रशासन तर जबाबदार आहेच, याच बरोबर समाजसुद्धा जबाबदार आहे. याचे मुख्य कारण म्हणजे नैतिक मूल्यांचे दिवसेंदिवस होत असलेली घसरण होय, ऱ्हास होय.

आज तरूण पिढीमध्ये नैतिक मूल्यांची कमतरता दिसून येत आहे. जी नैतिक मूल्ये आपले पूर्वज स्विकारीत होते, आई-वडिलांमध्ये ही दिसून येते ते आजच्या पिढीमध्ये दृष्टीस येत नाहीत. आज नैतिक पुस्तकांचा अर्थच बदललेला आहे. त्यांचे स्थान मोबाईल, टि.व्ही, व्हिडीओ गेम, संगणक, टॅबलेट यांनी घेतलेले दिसून येते. एखाद्या मुलाला गणपतीची प्रतिमा दाखविली आणि विचारले की हे कोण आहेत तर तो Elephant God या सारखी उत्तरे मिळताना दिसतात.

आज घराघरात जगभरातील कॉमिक्स मिळतील, कॅम्प्युटर गेम्सच्या सी. डी. मिळतात, गाण्यांच्या कॅसेट्स मिळतात. परंतु भगतसिंग, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, डॉ. आंबेडकर इत्यादी यांच्या प्रेरणादायी गोष्टी सांगणारी पुस्तके स्कूलबॅग मधून गायब झाली आहेत. ही पुस्तके प्राप्त करावीत असा प्रयत्न आपण करीत नाही फक्त त्यांच्या जन्म दिवसी किंवा मृत्यू दिवसी आपण त्यांची आठवण करीत असतो.

या बदलत्या परिस्थिती करीता आपण जेवढे जबाबदार आहोत तेवढेच प्रशासन सुद्धा जबाबदार आहे या करीता आपल्याला स्वतः विचार करावयास पाहिजे. कारण मूल्यव्यवस्था ढासळली तर समाज आणि मनुष्य नाममात्र ठरेल. एकविसाव्या शतकात मनुष्याने जरी प्रत्येक क्षेत्रात प्रगती केलेली असली तरी मानुसकीच्या क्षेत्रात मात्र तो अपयशी होताना दिसून येत आहे. कारण तो पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण करताना दिसत आहे. त्याने अंगीकारलेल्या जीवनशैलीमध्ये नैतिक मूल्यांना कुठेही स्थान नसल्याचे दिसून येत आहे.

हे सर्व थांबवायचे असेल तर शाळा, महाविद्यालयात नैतिक मूल्यांची शिकवण देणे अनिवार्य करायला पाहिजे. असा प्रयत्न जरी सुरू असला तरी तो कागदोपत्री असल्याचे दिसून येते. हे सर्व कागदोपत्री न रहाता प्रत्येक शाळेत, महाविद्यालयात ही योजना प्रशासनाने राबविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीने इतर व्यक्तीशी माणुसकीच्या नात्याने व्यवहार करावयास पाहिजेत.

मानवी जीवनावर भौतिकवादी संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. याच भौतिकवादी संस्कृतीमुळे मानवी जीवनात एकांगीपणा निर्माण झालेला आहे. अर्थात मी म्हणजेच सर्व काही माणून मानवाची संवेदनशीलता नष्ट होत आहे. तेव्हा मानवी जीवनाला अर्थपूर्ण किंवा परिपूर्ण बनावायचे असेल तर भौतिकवादाप्रमाणे सामाजिक व नैतिक मूल्यांची गरज आहे. आपण सर्वांना ही गोष्ट माहीत आहे की आदी प्राचीन काळापासून ते आजपर्यंत आमच्या प्रज्ञावंत व प्रतिभावंत व्यक्तीने बौद्धिक परिश्रम करून मूल्यांची निर्मिती केली आहे. त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मानवी जीवनावर मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या मूल्यांमुळे व्यक्तीवर व समाज जीवनावर नियंत्रण करणे शक्य होते. या मूल्यांच्या आधाराने मानवी जीवनाची रचना झाली आणि त्याप्रमाणे कार्य झाले तर मानवी जीवन विकासाकडे झेप घेऊ शकते एवढेच नव्हे तर त्या नैतिक मूल्यांचा उपयोग घेण्यायोग्य वातावरण समाजात निर्माण झाले तर व्यक्तीला देखील सुख-समाधान व आनंद प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही त्यामुळे व्यक्ती व समाज या दोन्हीच्या हितासाठी नीती अथवा नैतिक मूल्यांची मानवी जीवनात आवश्यकता आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने नैतिक मूल्यांची जोपासना करणे व त्याविषयी आदर बाळगणे व त्याविषयी आचरण करणे महत्त्वाचे आहे.

व्यक्ती जितकी अधिकाधिक स्वतःपुरतेच जीवन जगते तितक्या प्रमाणात तिचे जीवन सार्थक होत नाही. उलट व्यक्ती जितकी अधिकाधिक इतरांचा विचार करेल तितक्या प्रमाणात तिचे जीवन सार्थक ठरते किंबहुना इतरांचा विचार करण्यातच खऱ्या अर्थाने ती व्यक्ती जगत असते. समाजाचे हित प्रत्येकाने साधलेच पाहिजे. कारण समाजातील नैतिक मूल्यांमुळेच व्यक्तीची जडणघडण होत असते.

मनुष्याचे जीवन साधे सरळ आहे. मनुष्यात साठलेला भ्रमच त्याच्या पतनाला कारणीभूत ठरतो. जर हा नाश होऊ द्यायचा नसेल तर बालपणापासून जीवनात नीतीमूल्य अंगीकारायला पाहिजेत. नैतिक मूल्य जपण्यासाठी आपल्याला मनुष्याचे वर्तनाचे अधिष्ठान, आदर्श जीवन पद्धतीचे उच्च दर्जाच्या आचार विचारांची आवश्यकता आहे. कारण त्यावरच समाज, मानव, राष्ट्र यांची नैतिकता अवलंबून आहे. त्यामुळे मनुष्याने समाजाचे हित समोर ठेवून कार्य करावे. म्हणजेच मनुष्याच्या जीवनाची सार्थकता होईल व नीतिमूल्यांच्या माध्यमातून माणूस व समाज सुसंस्कृत होईल व समाजामधील अनीती थांबेल. ही अनीती नीतिमूल्यांना घातक ठरते त्यामुळे ती थाबविणे गरजेचे आहे.

आजच्या समाजामध्ये मनुष्याचे वर्तन खूप बदलेले दिसते. अविश्वास, लोभ, अनादर यामुळे नीतीनुसार वर्तन करणे कठीण झाले आहे. आजच्या वैज्ञानिक युगाकडे तठस्थ नजरेने पाहता मनुष्याचे वर्तन पैशामुळे बिघडले आहे असे माझे मत आहे. 'पैसा झाला खोटा' असे आपण लहानपणी सहज म्हणत होतो. परंतु त्याचा अर्थ आज समाजाकडे पाहता लक्षात येतो. खोटे बोलण्याची वृत्ती, अनादर तसेच स्वार्थीपणा यामुळे कुटुंब व्यवस्थेमध्ये सुद्धा ऱ्हास दिसत आहे.

'अर्थो हि जीवनस्य मूलम्।' असे म्हणून पैशाला अनन्य महत्त्व दिले जात आहे. माता-पिता, गुरू, मित्र यांचा आदर हा आज काही अंशी कालबाह्य झाला आहे वाटत आहे. तसेच सज्जन कोण?

वाईट कोण? मित्र कोणास म्हणावे? कोणावर विश्वास ठेवावा? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. याविषयी नीतिशास्त्राने मात्र योग्य मार्गदर्शन केलेले आहे.

सज्जन व्यक्ती आपणास संकटातून बाहेर काढण्यास समर्थ असतात. 'सन्त एवसतां नित्यंमापाध्दुरणक्षमाः।' चिखलात फसलेल्या हत्तीला बाहेर काढण्यास हत्तीच समर्थ असतात. तसेच सज्जनच आपला उद्धार करतात. योग्य मार्ग दाखवितात. समाजामध्ये व्यवहार करताना माता पिता आणि गुरू यांना सर्वोच्च स्थान व मनामध्ये आदर देण्याचे नीतिशास्त्र शिकविते. उपनिषदामध्ये 'मातृदेवोभव। पितृदेवोभ। आचार्यदेवोभव ।' असे सांगितले आहे. यांची सेवा करणाऱ्यालाच सुखसमृद्धी आणि मोक्षादि पुरूषार्थ प्राप्त होतो. समाजातील प्रत्येक स्त्री मातेसमान मानण्याची शिकवण नीतीच देत असते. 'मातृवत् परदारेषु आत्मवत् सर्वभुतेषु।' समाजामध्ये जन्मतः कोणीही आपला शत्रू किंवा मित्र नसतो हे स्पष्ट करताना 'नास्ति शत्रुः प्रकृत्यैव न च मित्रं कदाचन।' असे म्हटले आहे. सुख देणारा असेल तर त्याला आपण मित्र म्हणतो आणि दुःख देणाऱ्याला आपण शत्रू मानतो. मित्र हे मनुष्याचे प्रेमाची भावना व्यक्त करण्याचे ठिकाण आहे. अर्थात 'प्रितिविस्नमभाजनम्।' आहे. गुरूसोबतही आपले वर्तन सुद्धा विनयपुर्वक आणि आदरयुक्त असणे आवश्यक आहे. गुरूसमोर कधीही उच्च स्वरात बोलू नये. असे नीती सांगते. आज गुरू-शिष्याचे नातेच हरवत चालले आहे. विनयाचे महत्त्व व्यक्त करताना ''गुरूणां सन्निधौ तिष्ठेत् सदैव विनयान्वितः।'' असे म्हटले आहे.

आपली मैत्री पैशावर आधारीत राहू नये कारण पैशामुळे विवाद होतात. 'विवादो धनसम्बन्धो।' पैशापुरती मैत्री करणारा दुर्जन असतो. अशा व्यक्तीची सेवा करणे म्हणजे स्वतःची अवहेलना करण्यासारखे आहे. शिवाय अनेक दुष्ट व्यक्ती बोलताना आपण गप्प राहणे हे हिताचे आहे. 'परस्परं संवदतां खलानां मौन विधेयं सततं सुधिभि।' असे म्हटले आहे. आज लवकर पैसा कमविण्याचा मार्ग शोधला जात आहे. कारण पैशाचा लोभ वाढलेला आहे असे दिसून येते. लोभाचा प्रभाव सांगताना 'लोभात्क्रोधो प्रभवति लोभात्कामः प्रजायते।' अर्थात लोभामधून क्रोध निर्माण होतो. क्रोधाने बुद्धीचा नाश होतो आणि बुद्धिचा नाश झाला की विनाश होतो. यावर संयम राखला पाहिजे.

समाजामध्ये वाणीला अत्यंत महत्त्व आहे. जो गोड वाणीने बोलतो, त्यालाच प्रतिष्ठा मिळते. म्हणून आपल्या करणी व कथणी मध्ये कोणताही फरक असू नये असे मला वाटते. तसेच 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले।' याप्रमाणे आपले बोलणे इतरांना हितावह असले पाहिजे. हितकारक वाक्य बोलण्याने सर्वजन प्रसन्न होतात. 'प्रियवाक्यप्रदानेन सर्वे तुष्यन्ति मानवः।' म्हणून त्यासारखेच मधुरच बोलले पाहिजे. आपले वागणे, बोलणे, पहाणे हे सर्वच गोड असले पाहिजे. तरच समाज व जग जिंकता येते असे नीतिशास्त्र सांगताना म्हणते 'हसितं मधुरं लसितं मधुरं, मधुराधिपतेरखिलं मधुरम्।'.

आजचा मनुष्य हा व्यवहारप्रधान बनला आहे आणि व्यवहार हा अर्थप्रधान बनला आहे. त्यामुळे मानवी व्यवहार आणि अर्थनीती यांची सांगड घालणे योग्य आहे. ते पाहताना असे लक्षात येते की, पैसा हा जीवनाचे मूळ बनत चालले आहे. म्हणून मनुष्याने पैसा अवश्य कमवावा परंतु याचा मार्ग योग्य असला पाहिजे. तो व्यक्त करताना, 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । विवेक विचारे वेच करि।' असे तुकाराम महाराज म्हणतात. मनुष्याने कष्टाने द्रव्य मिळवावे आणि त्याचा विवेकपूर्वक सत्कार्याकरिता खर्च करावा. मानवाने जर पैसा, द्रव्य कमविले नाही तर त्याची समाजामध्ये पत किंवा प्रतिष्ठा राहत नाही कुटुंबामध्ये सुद्धा त्याचा आदर केला जात नाही.

''मातानिन्दति नभिनिन्दति पिता भ्राता न संभाषते ।
तस्माद्रव्यमुपार्जयस्व सुमते द्रव्येन सर्वे वशः।।' ६४

चाणक्यनीती

अर्थात आई आपली निंदा करते, वडील योग्य आधार देत नाहीत, भाऊ बोलत नाही, पत्नी व मुले प्रेम करत नाहीत, नोकर ही जवळ येत नाही, मित्रसुद्धा पैसा मागेल म्हणून हितावह बोलत नाहीत. म्हणून द्रव्य प्रयत्नाने मिळवावे, कष्टाने मिळवावे कारण पैशामुळे सर्वजण वश होत असतात.

संपूर्ण विश्वाचा आदर्श असलेला आपला प्राचीन समाज आणि आजचा अनेक समस्यांनी ग्रासलेला समाज यांना पाहता हे केवळ काळाचा बदल आहे असे मानता येत नाही. आजचा मानवी समाज ज्या अनेक समस्यांना सामोरे जात आहे त्याचे एकमेव कारण म्हणजे नैतिक मूल्यांचा अभाव होय. आजच्या समाजाला नैतिकमूल्ये व त्यांचे महत्त्व पुन्हा एकदा पटवून देण्याची वेळ आलेली आहे. अन्याय, अत्याचार, हिंसा, अशांतता यांनी थैमान घातलेल्या या समाजाला वर काढण्यासाठी 'शठं प्रति शाठ्यम्।' अशी तत्त्वे समजणे महत्त्वाचे आहे. समोरच्या व्यक्तीला ओळखून मनुष्याने वागले पाहिजे. 'सहसा सरलं न भव्यम्।' नेहमी सरळ राहणे किंवा वाईट राहणे योग्य नसते. आपला शत्रू श्रेष्ठ असेल तर विनयपूर्वक त्याला जिंकावे आणि समान असेल तरच पराक्रमाने पराभव करावा. नेहमी आपण 'अक्रोधेन जयेत्क्रोधं सत्येनचानृतम्।' असे वागावे अर्थात अहिंसेने क्रोधी मनुष्याला जिंकावे आणि सत्यानेच असत्यावर मात करावी कारण नेहमी सत्याचाच विजय होतो हे आपणास माहीत आहे. म्हणूनच आपल्या भारताचे ब्रीदवाक्य सुद्धा 'सत्यमेव जयते नानृतम्।' याच नीतितत्त्वावर आधारीत आहे. ही नीतीमूल्ये समाजाला नवीन दिशा देण्याचे कार्य करतात.

'असतो मा सद्गमयः। तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्मामृतं गमयः।'

अर्थात अंधाराकडून प्रकाशाकडे, असत्याकडून सत्याकडे, मृत्यूकडून अमरतेकडे समाजाला नेण्यासाठी नीतीतत्त्व दीपकाचे कार्य करते. आजचा समाज बुद्धिवादी आहे. योग्य बुद्धीचा वापर करण्याचे काम आपल्या नीतीचेच आहे. ज्याची बुद्धी श्रेष्ठ तोच समाजात बलवान आहे. धनुष्यातून निघालेला बाण एखाद्याला मारेल किंवा मारणार नाही परंतु बुद्धीच्या माध्यमातून केलेली योजना संपूर्ण राष्ट्राचा नाश किंवा उदय करू शकते. 'बुद्धिर्मतोत्सृष्टा। हन्याद्राष्टं सराजकम्।' आजचा समाज गतिशील आहे. या गतिमान जीवनामध्ये मनुष्याचे शरीराकडे दुर्लक्ष होऊ नये याची काळजी सुद्धा घेणे आवश्यक आहे. 'शरिरमाद्यम् खलु धर्मार्थ साधनम्।' अर्थात शरीर सर्व पुरूषार्थ प्राप्त करण्याचे साधन आहे. त्याची निगा राखली पाहिजे. आपण व्यायामाने योग्य शरीर प्राप्त केले पाहिजे आणि योग्य शक्ती प्राप्त झाल्यानंतर ती परोपकारासाठी वापरली पाहिजे.

आजच्या समाजामध्ये लोकसंख्येचा व दारिद्र्याचा भस्मासुर वाढला आहे. दोन पत्नी आणि अनेक मुले जेथे असतील तेथे दारिद्र्य व रोग नक्कीच राहतील याची संभावना अधिक असते. म्हणून लोकसंख्येला आळा घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे तसेच स्त्रीपुरूष समानता आणण्यास प्रयत्न केला जातो तो योग्यच आहे. पूर्वीसुद्धा नीतीमध्ये स्त्रीचे योग्य असे वर्णन केलेले आढळते. स्त्रीला समान दर्जा देऊन तिचे महत्त्व अबाधित ठेवलेले दिसते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।' अर्थात जेथे नारीचा सन्मान असेल तेथे स्वर्ग निर्माण होऊ शकतो. म्हणून प्रत्येक कुटुंबामध्ये, समाजामध्ये स्त्रीचा सन्मान झाला पाहिजे, समान वागणूक दिली पाहिजे ही शिकवण नीतीचीच आहे हे आपण विसरता कामा नये.

अनेक गोष्टींच्या आधारे मनुष्याने समाजात जीवन जगताना नीतीचा आधार घेतला पाहिजे. विकसनशिल असलेल्या भारत देशाला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी नीतीतत्त्वाचा अवलंब करणे अनिवार्य आहे आणि त्यासाठी मानवी समाजामध्ये नीतीतत्त्वाची उपयोगिता रूजणे आवश्यक आहे. जेणेकरून मानवी समाज धार्मिक, आर्थिक, सामाजिक या सर्वांगाने परिपूर्ण होईल आणि हेच मानवी जीवनाचे

ध्येय असावे व ते बनवित असताना ज्ञान व कर्म यांचा सुरेख मेळ बसवून कार्य केले पाहिजे.

आजची परिस्थिती काय आहे? पाश्चात्य समाजात अनेक भिन्न पण आंतरिकतः सुसंगत असलेल्या अनेक नैतिक परंपरा आहेत. अशा एखाद्या परंपरेशी तादात्म्य पावण्याचा निर्णय एखादी व्यक्ती घेऊ शकेल. त्या परंपरेला आधारभूत असलेल्या नैतिक संकल्पनांचा व्यूह ती स्वीकारील. तिने असे केले तर केवळ आवडीनिवडीच्या भाषेहून वेगळी आणि अर्थपूर्ण अशी मूल्यवाचक भाषा तिला लाभेल, तिच्यात अध्यावत असलेल्या निकषांवर आधारलेल्या सुसंगत जीवनसरणीत ती आपल्या जीवनाचे साफल्य शोधेल. हे निकष तिने स्वीकारलेले असले तरी तिने निर्माण केलेले नसतील, तिच्यावर ते बंधनकारक असतील. तरीही हे निकष तिने निर्मिलेले नसले तरी तिने निवडल्यामुळे ते तिचे निकष ठरतात. एखाद्या वेगळ्या परंपरेशी तादात्म्य पावण्याचे स्वातंत्र्य त्या व्यक्तीला असते.

नीतिशास्त्राचे कार्य हे द्विविध आल्यामुळे मनुष्याला आपले आत्मज्ञान सहज साध्य करता येते. मिळालेल्या आत्मज्ञानामुळे त्याचे समाजात सम्यक स्थान, त्याचे इतरांविषयीचे व स्वतः विषयीचे कर्तव्य याचेही आकलन त्याला होत असते. मनुष्याचा दृष्टिकोन हा व्यापक होतो. मानवाने ज्या कृत्रिम मर्यादा जसे- जातिभेद, वर्णभेद या त्यांनी स्वतः निर्माण केल्या त्या नष्ट होण्यास मदत होते. त्याच्या या व्यापक दृष्टिकोनातून सद्गुणांच्या अर्थातही व्यापकता निर्माण होते. या कारणांमुळेच सद्गुणांना सार्वत्रिकता येवून मानवी स्वभावात नैतिक जाणीव ही अधिकाधिक जाणवू लागते. या नैतिक जाणीवेमुळे मनुष्य हा अधिकाधिक शांत व सौम्य बनतो, तसेच तो सहनशील आणि इतरांविषयी सहानुभूती बाळगू लागतो. या सहनशीलतेमुळे व सहानुभूतीमुळे तो राग, सूडाची भावना कठोरता यापासून दूर जातो. मनुष्यत्व हे त्याच्या संयमी आचरणात दिसू लागते. अशा प्रकारच्या नैतिक आचरणाचे मानवी जीवनात अतिशय महत्व आहे. नैतिक आचरणाने मनुष्य हा सदाचारी बनतो. त्याच्या या सदाचारी जीवनापासून निवृत होण्याचा किंवा त्यापासून विश्रांती घेण्याचा निश्चय करू शकत नाही. सद्गुणांपासून सुट्या नसतात. आपण जीवन कसे जगतो याला महत्व आहे. आपण जीवन किती वर्षे जगलो याला महत्व नाही म्हणून या मानवी देहाचा जितका चांगला उपयोग करता येईल तितका उपयोग नैतिक आचरणात करावा. कारण माणसाचे आयुष्य हे क्षणाक्षणाला कमी होत आहे व म्हणून स्वस्थ बसू नका, पण शेवटी कसे जगायचे हे ज्याचे त्यानेच ठरवायचे असते.

'संशयी विद्वानापेक्षा निष्ठावान भक्तच संसारसागर तरून जातो. संसारी लोकांपुढे धर्मस्थापकाचेही काही चालत नाही' ऐहिक सुखाच्या अपेक्षामुळे आजकाल कोणाचाही धर्मावर, नीतीवर विश्वास नसतो असे श्रीगुलाबराव महाराजांचे मत दिसून येते. आपली फसवणूक होऊ नये असे वाटत असल्यास विषयासक्ती सर्वथा सोडायला हवी असे ते सांगतात. श्रीमहाराजांनी पाश्चात्य नीतिशास्त्राविषयी आपले विचार व्यक्त केले आहेत. पाश्चात्य नीतिशास्त्र विचार केल्यास नीती कशाला म्हणावे हेच अद्याप ठरले नाही. परमेश्वर हा अतिशय नीतीचा पुतळा आहे अशी पाश्चात्यांची समजूत आहे. मात्र त्यांच्या मते त्यांच्या शास्त्रांचे आलोचन केल्यास चारच कल्पना समोर येतात. आप्तवचन, सदसद्विवेक बुद्धी, बहुपयोगिता आणि उत्क्रांती आणि यापैकी कोणतीही कल्पना घेऊन परमेश्वर नीतीचा पुतळा आहे हे त्यांच्या मते सिद्ध करणे कठीण. सदाचाराचा उपदेश, कुटुंब विषयक, सेवकासंबंधी पथ्ये, अतिथी, दान, स्त्री आणि पुरूष, स्त्रीयांना उपदेश, स्त्रीयांप्रमाणे पुरूषासाठी चातुर्य शिक्षण, व सामान्य नीतिविवेचन या सर्वांविषयी श्रीमहाराजांनी त्यांचे विचार मांडले आहेत. हे विचार आजच्या समाजासाठी उपयुक्त आहेत. या सर्वांचा अभ्यास होणे अवश्यक आहे. त्यांचे विचार समाजात प्रसारित करणे आजच्या काळाची गरज आहे असे मला वाटत आहे.

**सारांश :**

धर्माचे नियम पालन केले असता मनुष्याचा सत्वगुण वाढतो आणि त्या सत्वगुणामुळे धर्म पालन करणारा सर्व समाज सत्वसंपन्न होतो. त्यामुळे समाजातील अंतर्गत व्यवस्था कलहाशिवाय टिकून राहते. सर्वांनी धर्माचरण केले तर लौकिक सुख आणि पारलौकिक सुख समाजाला मिळू शकते आणि व्यवहारातही समाधान, स्थैर्य इत्यादी प्राप्त होते.

सत्वबुद्धी करणारा आचार धर्म म्हणून योगशास्त्रात आणि व्यवहारात दोन्ही ठिकाणी आचरणीय आहे. नीती आणि धर्म योगशास्त्राच्या यमरूपी प्राथमिक अंगात समाविष्ट असल्यामुळे साधकाने नीतीच्या सर्व अंगांचा अभ्यास एकदम केला पाहिजे. नाहीतर एकच गुण वाढून दुसऱ्या अंगात अनीतीचा जोर वाढू शकतो. पण साधक आणि सर्वसाधारण सामान्य माणूस हे दोन्ही एक नाहीत. काही ठिकाणी सामान्य माणसाला साधक होण्यासाठी नैतिक-धार्मिक आचार-विचार सांगितलेले आहेत. साधकाची पात्रता प्राप्त करण्यासाठी नैतिक-धार्मिक आचार-विचारांचे नियम असतात. साधकाला साधनामार्गच्युत न होता साध्यप्राप्त्यर्थ नैतिक-धार्मिक आचार-विचारांचे नियम असतात.उदा. जसे कर्णाने औदार्यात खूप प्रगती केली पण इतरत्र त्याची अनीती सुटली नाही. युधिष्ठिराचे ठिकाणी सत्यवचन हा गुण वाढला पण भीरूता इत्यादी काही दोष राहिले. म्हणून व्यक्तीने नीतीच्या सर्व अंगांचा अभ्यास साकल्याने करावयास हवा, श्रीगुलाबराव महाराज यांना असे म्हणावयाचे असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :-**


1. संपादक, डॉ. ग. ना. जोशी मराठी तत्त्वज्ञान भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, खंड १२ पृ. २७६-२७७, - महाकोश मंडळ, पुणे, १९९४.
2. संदर्भ ४२ ते ६२ : श्रीगुलाबरावमहाराजकृत समग्रग्रंथावली व्यवहारधर्मबोध, संपा. व. के. सी. नारायण पैकाजी पंडित, प्रकाशक : शंकर जयराम सोमवंशी, सोलापूर, प्रकाशन वर्ष १९३५ यामध्ये सुद्धा हे संदर्भ आहेत.
3. दीक्षित श्रीनिवास, नीतिमीमांसा, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९८२
4. साळुंके सुनिल, नीतिशास्त्र, मैत्री प्रकाशन, लातूर २००३
5. लेले गंगाधर वामन, प्रस्थानभेद-पूर्वमीमांसा, प्रज्ञापाठशाळा मंडळ वाई, १९१४
6. टिळक बाळ गंगाधर, श्रीमद्‌गवतीरहस्य, केसरी मुद्रणालय, पुणे, १९६८, पृ ६६
7. जोशी ग. ना - संपादक, भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास खंड ७, श्रीपाद ऑफसेट, पुणे, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, १९९४.
8. त्रिपाठी ब्रह्मनन्द, कालीदास ग्रंथावली, चौखम्बा सुरभारती, प्रकाशन वाराणसी,

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.5 No.43** **Nov-Dec 2024**

# वै. शं. वा. दांडेकरांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व

**प्रा. सुमित एस. गवरे**
श्रीमती जानकीबाई रामा साळवी
कॉलेज, कळवाण
**Corresponding Author: प्रा. सुमित एस. गवरे**
**DOI-10.5281/zenodo.14546487**

**सारांश :**

महाराष्ट्रीच्या सांस्कृतीक जीवनात वारकरी परंपरा ही महत्त्वाची आहे. वारकरी परंपरेने मराठी समाजाची जीवनमूल्ये जोपसली; मराठी माणसाला सातत्याने नैतिकतेचे भान दिले; कुटुंबाला देवत्व दिले. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकाराम गाथा या वारकऱ्यांच्या प्रस्थानत्रयीतून महाराष्ट्रीय समाजाला जीवनाची दिशा मिळत गेली, प्रपंचात पुरूषार्थसंपन्न कसे जगावे, ते शिकवले गेले, आपण आपले काम चोखपणे करणे ही सर्वात्मक परमेश्वराची पूजा मानली गेली. अशा या वारकरी परंपरेला वै. ह. भ. प. सोनोपंत ऊर्फ शंकर वामन दांडेकरांनी नवे परिणाम दिले. त्यामुळे वारकऱ्यांचे आणि अवघ्या महाराष्ट्राचे ते आवडते व्यक्तिमत्त्व ठरले आणि जनमानसामध्ये साक्षर आणि निरक्षर वारकऱ्यांमध्ये ते मामासाहेब या नावाने ओळखले जाऊ लागले. या संबोधनात एक कौटुंबिक जिव्हाळा आणि मातेकडील वात्सल्याचा ओलावाही असल्याने प्रस्तुत निबंधात त्यांचा उल्लेख 'मामासाहेब' असा केलेला आहे.

**प्रस्तावना :**

मामासाहेब दांडेकर हे सत्वशील वृत्तीचे साधुपुरूष होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक असाधारण सरलता होती. त्यामुळे त्यांच्या चरित्राचा शोधही तितक्याच सरलतेने व पारंपारिक रीतीने घेणे क्रमप्राप्तच ठरते. येथे मामासाहेबांचे चरित्र व कर्तृत्व सरळपणे निवेदित केलेले आहे.

दांडेकर घराणे मूळ रत्नागिरी जवळच्या वायंगणी या गावाचे आहे. सोळाव्या शतकाच्या अखेरीस बाळाजी त्रिंबक दांडेकर हे वायंगणीहून ठाणे जिल्ह्यातील पालघर जवळच्या केळवे या गावी राहायला आले. हे गाव 'केळवे–माहीम' म्हणून ओळखले जायचे. त्यापुढे केळवे–माहीम सोडून ते पालघरला स्थायिक झाले.

मामासाहेबांचा जन्म दि. २० एप्रिल १८९६ रोजी कळव्यास झाला. मामासाहेब वयाच्या चौथ्या वर्षापासून पूजा–अर्चा करत व त्याचा परिणाम त्यांच्या वृत्तीवर झाला. त्यांच्या वयाच्या नवव्या वर्षी त्यांची मुंज झाली. संध्या, वैश्वदेव, गणपती–अथर्वशीर्ष, पुरूषसूक्त इ. पारंपारिक वाङ्‌मय त्यांना पाठ झाले. मामासाहेबांचे प्राथमिक शिक्षण केळवे माहीम येथे झाले. त्यानंतर मामासाहेब पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात जाऊ लागले. मोडक, गोखले, गोडबोले असे स्वार्थत्यागी व ध्येयवादी शिक्षक त्यांना लाभले. त्यांचा वर्गात नेहमी पहिला नंबर असे. त्यांनी माधवरावांकडून घरीच इंग्रजी व संस्कृत शिक्षण घेतले.

उच्च शिक्षणासाठी ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये दाखल झाले. त्यावेळी प्राचार्य रँ. र. पु. परांजपे यांनी त्यांना अभ्यासात विशेष प्रोत्साहन दिले. प्रो. पटवर्धन, प्रो. दातार, प्रो. जोशी, प्रो. नाईक, प्रो. रा. द. रानडे या साधुतुल्य व विद्वान जवळून व जिव्हाळ्याचा प्रोसरांशी संबंध आला. गुरूदेव रानडे यांच्या शब्दस्पर्शाने मामासाहेबांचे अंत:करण पुलकित झाले. गुरूदेवांसारखा थोर व योग्य मार्गदर्शक ऐन मोक्याच्या वेळीच मामायाहेबांना लाभला.

मामासाहेब १९१७ साली बी.ए.ची परीक्षा उच्च क्षितीय श्रेणीत पास झाले आणि त्यांना मुंबई विद्यापीठाची तत्त्वज्ञान विषयाची 'प्रल्हाद सीताराम' स्कॉलरशिप मिळाली. पण या स्कॉलरशिपची अट अशी होती की पुढील दोन वर्षात तत्त्वज्ञान विषय घेऊनच एम.ए.च्या परीक्षेस बसले पाहिजे. एम.ए. साठी त्यांनी 'शंकराचार्य' घेण्याचे ठरविले पण गुरूदेव रानडे यांनी त्यांना 'प्लेटो' हा विषय अभ्यासाठी घ्यावा असे सांगितले व त्यांनी गुरूची आज्ञा मान्य केली.

स्वानंदनिवास ह.भ.प. जोग महाराज हे मामासाहेबांचे पारमार्थिक गुरू होते. त्याचा वाङ्यात ते राहत होते. त्याचा फायदा अभ्यासाच्या बाबतीत मामासाहेबांना झालाच, पण त्यापेक्षा ही मोठा लाभ म्हणजे मामासाहेबांना कीर्तन–प्रवचनांच्या श्रवणाची आवड निर्माण झाली आणि त्यांची सत्प्रवृत्ती वाढीस लागली. मामासाहेबांचा व विष्णुबोवांचा साक्षात संबंध १९१० ते १९२० या दशकभराच्या काळात आला. वारकरी संप्रदायात येऊन त्या संप्रदायासाठी काम करण्याची प्रेरणा त्यांना बोवांमुळे मिळाली. बोवांच्यामुळे मामासाहेबांना सात्विक जीवन गवसले; मुख्य म्हणजे ज्ञानेश्वरीच्या नव्या दृष्टीचा लाभ झाला. त्या दोघांच्याही साधनेत बाह्य साधनांचे अवडंबर नव्हते. प्रदर्शन नव्हते. त्यांची नामसाधना सहज वृत्तीत मुरली होती.

वरकरी शिक्षण संस्था म्हणजे जोगमहाराजांचे स्मारकच होय. वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानदेवांनी रचलेला असल्याने, वैयक्तिक सदाचरण, पडतील ते कष्ट सोसूनही वारीचा नियम टाळू न देणे, अनुशासन पाळणे आदी गुणांनी समृद्ध असणाऱ्या वारकरी समूहावर उत्तम संस्कार होण्याची गरज निर्माण झालेली होती. या गरजेपोटी महाराजांना संस्थेची कल्पना सुचली. आळंदीला अनेक साधक येत, माधुकरी मागून अजानवृक्षाखाली ज्ञानेश्वरीची परायणे करत. त्यांस योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता होती. साधकांमध्ये परस्पर संवाद नव्हता. साधकांच्या उन्नतीच्या दृष्टीने अशा परस्पर संवादाचीही आवश्यकता होती. या सर्व गोष्टी घडाव्यात, सर्वांनी एकत्र येऊन ज्ञानेश्वरीचा अभ्यास करावा, प्रवचनांवर चर्चा कराव्यात, या विचारातून पू. नारायणस्वामी व पांडुरंगशास्त्री शर्मा यांनी बोवांच्या वारकरी शिक्षण संस्थेच्या कल्पनेला सहयोग दिला आणि २४ माचे १९१७ रोजी वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना झाली. ह. भ. प. जोगमहाराज त्या संस्थेचे अध्यक्ष झाले. पुढे मामासाहेबही या संस्थ्रेचे अध्यक्ष झाले होते. पहिल्या दिवशीचा ज्ञानेश्वरीचा वर्ग मामासाहेबांनी घेतला. ही संस्था धार्मिक व व्यावहारिक शिक्षणाची सांगड घालणारी वारकरी संप्रदायातील एकमेव संस्था होती. गुरू आज्ञेप्रमाणे कित्येक वर्षे मामासाहेब तीन महिने तेथेच राहून संस्थेतील मुलांना इंग्रजी व संस्कृत शिकवत. संस्थेतील विद्यार्थी जेव्हा पंढरीच्या वारीला जात तेव्हा मामासाहेब स्वत:च्या आचरणाने विद्यार्थ्यांवर सेवा, शिस्त व अभ्यास यांचे संस्कार घडवत. समाजाशी कशी वागणूक ठेवावी याचे धडे देत.

१९१६ साली न्यू पूना कॉलेजची स्थापना झाली. या कॉलेज मध्ये प्राचार्य आपटे यांनी मामासाहेबांना गुरूदेव रानडे

यांच्यामार्फत बोलावणे पाठविले. ३ मार्च १९२० रोजी त्यांनी दोन अटीवंर शिक्षण प्रसारक मंडळीचे आजीव सभासदत्व स्वीकारले. त्या अटी म्हणजे एक– पंढरीचे वारकरी असल्यामुळे वारीला जाण्यासाठी कॉलेजने त्यांची रजा मंजूर करावी व दोन– त्यांना ज्यावेळी निवृत व्हायचे असेल तेव्हा त्यांना निवृत करावे. स्वातंत्र्य चळवळीत कीर्तनाद्वारे बोवांनी स्वदेशाभिमान लोकांपर्यत पोहोचविला, तेच कार्य मामासाहेबांनी केले. निरूपणात मुद्देसूद मांडणी आली पाहिजे, आत्मकथन मुळीच येता कामा नये हा महाराजांचा संकेत जोग महाराजांच्या मृत्यूनंतरही त्यांनी आजन्म पाळला. याचाच परिणाम त्यांच्या वर्गातील शिकविण्यावरही दिसून आला. १९२० साली. प्रा. ना. सी. फडके व प्रा. द. रा. घारपुरे यांनी कॉलेज सोडले, त्यामुळे या बिकट प्रसंगी अध्यापनाच्या भार मामासाहेब व प्रा ना. ग. नारळकर यांच्यावर पडला; पण ती कठीण जबाबदारी पार पाडून त्यांनी कॉलेज सावरले.

१९४० साली मुंबईचे रूइया कॉलेज स्थापन झाले. त्यावेळी उपप्राचार्य म्हणून ते काम पाहू लागले. नोकरीची वीस वर्षे पूर्ण झाल्यामुळे त्यांना कॉलेजातून आपण निवृत व्हावे असे वाटत होते व त्यांना आळंदीची ओढ वाटू लागली होती. पण असा देवमाणूस तसाच विद्यार्थीप्रिय प्राध्यापक सोडण्यास कॉलेजमधील सहकारी तयार होईनात. अशातच रूइयाचे प्राचार्य भागवत यांचे अचानक निधन झाले. त्यामुळे मामासाहेबांना प्राचार्यपद स्वीकारावे लागले. त्यानंतर १९४५ साली मामासाहेब स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य झाले.

ममासाहेबांनी शिक्षण प्रसारक मंडळीत असताना नानाविध जबाबदारीची कामे पार पाडली. १९३४ साली नूतन मराठी शाळेचे 'सुपरिंटेंडेंट' म्हणून त्यांनी काम केले. त्यावेळी त्यांना लहान मुलांच्या मनावर संस्कार करण्याची संधी मिळाली. स. प. कॉलेजच्या मासिकाचे संपादकत्व काही काळ त्यांच्याकडे होते. त्यामुळे जागतिक युद्ध, राजकीय, सामाजिक चळवळी, शैक्षणिक घटनांवर त्यांनी आपले विचार या मासिकाच्या अग्रलेखातून मांडले. गरजू विद्यार्थ्यांना संस्थेकडून नियमानुसार मदत करता आली नाही तर ते स्वत:च्या खिशातून पैसे देत. हॉस्टेलचे रेक्टर असताना विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घेत, त्यांच्या सुखदु:खात वाटेकरी होत. १९४८ साली म. गांधींची हत्या झाली तेव्हा कडक कर्फ्यू लागू होता. त्यावेळी हॉस्टेलसाठी धन्य, दूध, भाज्या आणण्याचे बिकट काम त्यांनी केले.

तत्त्वज्ञान हा विषय जरी कठीण असला तरी चर्चेतून तो सोपा करता येतो. विषय चांगला समजला म्हणजे त्याची नित्याची जीवनाशी त्याची सांगड घालता येते. तत्त्वज्ञान विषय हा अनुभवायचा असतो, नुसते वाचून त्याचे फळ मिळत नाही; म्हणून तत्त्वज्ञान विषयाचा सांगोपांग अभ्यास व्हावा याकरिता १९२१ साली मामासाहेबांनी 'तत्त्वज्ञान मंडळा'ची स्थापना केली. पाश्चात्य पद्धतीने शिक्षण घेतलेल्या किंवा परीक्षेपूरताच तत्त्वज्ञान विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना तत्त्वज्ञान प्रतिपादक ग्रंथांची ओळख व्हावी हा त्या संस्थेचा हेतू होता. त्यांच्या या उपक्रमामुळे सुशिक्षितांना स्फूर्ती मिळाली. या मंडळाने विद्वानांची व्याख्याने, निबंधवाचन किंवा अभ्यास, सहली आयोजित केल्या. कठोपनिषद, ज्ञानदेव आणि त्यांचे तत्त्वज्ञान इ. विषयांवर मामासाहेबांनी निबंध वाचले.

विद्यार्थ्यांना व शिक्षकांनाही आपल्या धर्माविषयी, संत व त्यांच्या वाङ्‌मयाविषयी गोडी लागावी आणि त्यांच्यामध्ये अस्तिक बुद्धी निर्माण व्हावी यासाठी ते जोग महाराजांच्या पुण्यतिथीला आवर्जून त्यांना आळंदीला बोलावीत. हेतू एवढाच की, यामधून एखादा ज्ञानेश्वरी किंवा गाथ्याकडे वळले तर समारंभाचे सार्थक होईल. अशावेळी कॉलेज विद्यार्थी–विद्यार्थीनींचा घोळका आळंदीला आलेला पाहून पुष्कळांना त्याचें गूढ वाटे.

१९५१ नंतर मामासाहेबांनी आपले प्रवचन–किर्तनाचे कार्यक्रम वाढवले. दर महिन्याच्या शुद्ध एकादशीस पुणे येथील निवडुंगे विठ्ठल मंदिर व वद्य एकादशीस आळंदी अगर इतर मुक्कामाच्या ठिकाणी कीर्तन–प्रवचन होत असे. १३ जानेवारी १९६७ या स. प. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या मुख्य दिवशी भारताचे भूतपूर्व अर्थमंत्री डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या हस्ते मामासाहेबांनी कौशिक व्याख्यानमालेत दिलेल्या चार व्याख्यानांचे 'ज्ञानदेव व प्लेटो' हे पुस्तक प्रकाशित झाले.

नेवाश्याच्या शंकराच्या मंदिरात जेथे ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी सांगितली ती जागा हिंदु–मुसलमान वादात पडली होती. दादासाहेब करंदीकर हे सुप्रसिद्ध वकील यांनी हे मंदिर हिंदुच्या ताब्यात मिळवून दिले. हे मंदिर गावाबाहेर होते. मंदिरात बरीच मोकळी जागा व ज्या खांबाशेजारी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी सांगितली तो खांब एवढेच होते. ह. भ. प. बन्सीबुवा तांबे सारख्यांनी यांच्या त्या मंदिराचा खांबाचा जीर्णोद्धार करावा असे वाटले. मामासाहेबांनी मन–मन–धन खर्चले. नगर जिल्ह्यात या देवळाच्या मदतीसाठी कीर्तन–प्रवचने केली आणि श्री. स. के. नेऊरगावकरांच्या देखरेखीखाली हे मंदिर बांधून पूर्ण केले. नेवाश्याप्रमाणे निवृत्तिनाथांचे समाधिस्थान म्हणून त्र्यंबकेश्वर हेही त्यांचे आवडते स्थान होते. सासवड येथे सोपानदेवांच्या मंदिराच्या कळस उभारणीच्या कामासाठी बरीच मदत मिळवून देण्याचे काम मामासाहेबांनी केले.

मामासाहेब स. प. कॉलेजचे प्राचार्य असताना पुणे विद्यापीठाची स्थापना झाली. निवडणुकीचा अवलंब न करता पुण्यातील सर्व कॉलेजच्या प्राचार्यांनी पुणे विद्यापीठाचे आरंभकालीन कार्य सुरळीतपणे चालू करून देण्याची एक सर्वसंमत योजना आखली. त्यात मामासाहेबांचा प्रमुख भाग होता. या विद्यापीठाच्या बहि:शाल व्याख्यानमालेत त्यांनी अनेक व्याख्याने दिली. या विद्यापीठाच्या निरनिराळ्या समित्या, कोर्ट, सिंडिकेट यांवर सभासद आणि डीन अशा जागांवर मामासाहेबांनी बहुमोल कामही केले.

मामासाहेब मधून मधून अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषदेला जात. १९५१ साली तत्त्वज्ञान परिषद पुण्यात झाली. त्यातील 'एथिक्स अँड सोशल फिलॉसॉफी' या शाखेच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना मिळाला. त्यावेळी त्यांनी 'Doctrine of Appearance in Bradley and Shankar' हा अभ्यासपूर्ण निबंध वाचला. या निबंधामुळे त्यांची भारतीय तत्त्वज्ञानाइतकीच पाश्चात्य तत्त्वज्ञानावरही पकड होती हे सर्वांच्या लक्षात आले.

१९४३ साली सरकारने पालखी यात्रेला बंदी घातली होती. त्यावेळी सर्व राजकीय पुढारी तुरूंगात होते व कायदे कौन्सिलही बरखास्त झाले होते. राज्यकारभार चालविण्यासाठी तीन युरोपियन आय. सी. एस. मंडळींचे एक राज्यकारभार मंडळ होते. मामासाहेबांनी सरदार जगन्नाथ महाराज पंडित, प्रा. धनंजयराज गाडगीळ यांच्यामार्फत वारकऱ्यांचे म्हणणे या मंडळापुढे मांडले व तीन दिवसांपुरती पालखी नेण्याची परवानगी सरकारकडून मिळवली.

जुलै १९६१ मध्ये पानशेत धरण फुटल्यामुळे संभाजीपूल ते दगडीपूल येथील अनेक मंदिरे उदध्वस्त झाली होती. मशिदींचेही नुकसान झाले होते. रावसाहेब किराड यांच्या अध्यक्षतेखाली जीर्णेद्धार समिती स्थापन केली होती. तिला मामासाहेबांचे मार्गदर्शन झाले. शिवाय त्यांनी पूरग्रस्तांना कपडे, भांडी व पैसेही मिळवून दिले. पुराच्या दिवशी पूरग्रस्तांची चौकशी करून त्यांना धीरही दिला.

येरवड्याच्या तुरूंगात कैद्यांना नीतीची शिकवण देण्यासाठी तुरूंगाधिकारी मेजर डाईल यांनी त्यांना विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी कैद्यांना तुरूंगातून सुटल्यानंतर सभ्य गृहस्थ म्हणून कसे वागता येईल, याची शिकवण दिली. त्यांनी नशाबंदी मंडळाला साहाय्य केले.

इंडिया फौंडेशन ही संस्था भारतात व भारताबाहेरील देशात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पाठवत असे. ज्ञानग्रहणाबरोबर परदेशातील भारतीय सांस्कृतिक, शैक्षणिक संबंध सुधारण्याचे व वाढविण्याचे बहुमोल कार्य ही संस्था करीत असते. या संस्थेच्या सुरूवातीपासून मामासाहेब तिचे सभासद होते. त्या संस्थेला बरीच देणगीही त्यांनी मिळवून दिली. मात्र पक्षनिष्ठ राजकारणापासून ते कायमचे दूरच राहिले.

मामासाहेबांचे प्रकाशित साहित्य आपणास पुढीलप्रमाणे दिसून येते.

१. अध्यात्मशास्त्राची मूलतत्त्वे : प्रसाद प्रकाशन
२. अभंग : य. गो. जोशी प्रकाशन
३. अभंग संकीर्तन – भाग १ ते ४ : प्रसाद प्रकाशन, य. गो. जोशी प्रकाशन
४. ईश्वरवाद : प्रसाद प्रकाशन, य. गो. जोशी प्रकाशन
५. श्रीसंत चोखामेळा महाराज यांचे चरित्र व अभंग गाथा : मंदाकिनी स. कदम प्रकाशन
६. तीन प्रवचने : प्रसाद प्रकाशन
७. तुकाराम गाथा : वारकरी प्रकाशन संस्था
८. दैनिक स्वाध्याय : अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन
९. धुंडामहाराज देगलूरकर श्रीज्ञानेश्वरी सेवा गौरव ग्रंथ : ज्ञानेश्वरी सुवर्ण महोत्सव समिती पंढरपूर प्रकाशन
१०. भारतातील थोर स्त्रिया
११. वारकरी जीवन
१२. वारकरी पंथाचा इतिहास : कॉन्टिनेन्टल प्रकाशन
१३. वारकरी भजन संग्रह
१४. विष्णुबुवा जोग महाराजांचे चरित्र
१५. श्रीमद्भगवद्गीता : महाराष्ट्र सरकारचे प्रकाशन
१६. सटीप ज्ञानेश्वरी : प्रसाद प्रकाशन
१७. सार्थ ज्ञानेश्वरी : सानंद प्रकाशन, वारकरी प्रकाशन
१८. साक्षात्कारपथावर तुकाराम अर्थात तुकारामांचे आध्यात्मिक चरित्र
१९. सोनोपंत दांडेकर यांची प्रवचने (संकलन : सुरेश गरसोळे)
२०. सौंदर्याचे व्याकरण : चिंतामणी साहित्य सहयोग प्रकाशन
२१. श्री ज्ञानदेव चरित्र, ग्रंथ आणि तत्त्वज्ञान
२२. ज्ञानदेव आणि प्लेटो
२३. श्री ज्ञानदेवांचे जीवनविषयक तत्त्वज्ञन : नागपूर प्रकाशन
२४. ज्ञानेश्वरी अध्याय सातवा : व्हीनस प्रकाशन
२५. ज्ञानेश्वरी अध्याय बारावा : व्हीनस प्रकाशन
२६. ज्ञानेश्वीतील कठीण शब्दांचा कोश : य. गो. जोशी प्रकाशन
२७. सार्थ ज्ञानेश्वरी प्रस्तावना : कॉन्टिनेन्टल प्रकाशन
२८. ज्ञानेश्वरी सेवा गौरव ग्रंथ : ब. गि. घाटे प्रकाशन
२९. ईश्वरवाद (वादविवेचनमाला)

सन्मान आणि पुरस्कार :

- पालघर येथील एका महाविद्यालयाला सोनोपंत दांडेकरांचे नाव दिले आहे.
- सोनोपंत दांडेकर यांच्या नावाचा पुरस्कार एखाद्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथाला दिला जातो.

मामासाहेबांचा वरील सर्व लेखनप्रपंच पाहता एक गोष्ट सहज लक्षात येते, ती म्हणजे त्यांच्या एकूण एक लेखनाच्या केंद्रस्थानी ईश्वरीय विचार आहे. या केंद्रापासून ते जराही ढळलेले नाहीत. याचा अर्थ इतकाच की ते श्रीमद्भगवद्गीताच जगत होते. त्यांनी आपली मनबुद्धी व कर्मे एकट्या ईश्वराना अपर्ण केलेली होती.

अशा या थोर मामासाहेबांच्या सेवकार्यानंतर दि. ९ जुलै १९६८ मध्ये त्यांचे निधन झाले. सोनोपंतांची स्मृती निरंतर राहावी म्हणून १९७० मध्ये सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळाची स्थापना करून पालघर येथे ग्रामस्थांनी महाविद्यालय सुरू केले. असे होते मामासाहेब दांडेकर.

अखेरीस मामासाहेबांबद्दल असे म्हणता येईल की,

उदयति यदि भानु: पश्चिमे दिग्विआगे।
प्रचलति यदि मेरू: शीततां याति वाह्नि:।
विकसित यदि पद्मं पर्वताग्रे शिलायां।
न भवति पुनरूभक्तं भाषितं सज्जनानाम्। (विक्रमचरितम् २४९)

**प्रा. सुमित एस. गवरे**

**संदर्भ :**


1. शं. वा दांडेकर, श्री जोगमहाराज चरित्र, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी, शके
2. १८८९
3. स. कृ. देवधर, प्रसाद (दांडेकर विशेषांक) १९६८
4. स. के. नेऊरगावकर, ह.भ.प. सोनापंत दांडेकर यांचे चरित्र, प्रकाशक अरूण
5. नेऊरगावकर, पुणे
6. शं. वा. दांडेकर, पूर्वोक्त
7. शं. वा दांडेकर, अध्यात्मशास्त्राची मूलतत्त्वे, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७२
8. शं. वा. दांडेकर, 'प्रस्तावना' ईश्वरवाद, प्रसाद प्रकाशन, १९६२

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# साने गुरुजींचे सामाजिक तत्त्वज्ञान: एक उहापोह

**डॉ. रिना अविनाश पितळे/पुराडकर,**
सहयोगी प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग, रामनिरंजन झुनझुनवाला महविद्यालय, घाटकोपर, मुंबई.
**Corresponding Author: डॉ. रिना अविनाश पितळे/पुराडकर**
**Email : rinapuradkar@rjcollege.edu.in**
**DOI-10.5281/zenodo.14546515**

**गोषवारा**

साने गुरुजी हे नाव ऐकल्यावर महाराष्ट्रातल्या प्रत्येकाच्या मनात त्यांच्या शाळेतील प्रार्थनेचे स्वर घुमू लागताच, 'खरा तो एकची धर्म' सारखी प्रार्थना, 'आता उठवू सारे रान', 'बलसागर भारत होवो' सारखी स्फुर्तीगीतं चालीसकट मनामध्ये घुमणार नाहीत असा मराठी माणूस विरळाच म्हणावा लागेल. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात क्रांतीकार्य करणारे, लहान मुलांसाठी, अखिल विश्वासाठी लेखन करणारे, सतत विचारमग्न राहाणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व होत. गुरूजी म्हटलं की, मुलांच्या मनाची काळजी घेणारे, त्यांच्या नैतिक भावनांचे कौशल्याने संवर्धन करणारे, मुलांच्या घराशी मायेने संबध ठेवणारे असे समजले जातात. गुरीजी या शब्दात जो आपलेपणा आहे, गुरु शब्दाला माऊली शब्द जोड जोडण्याची ची प्रथा आहे आणि हे वरील सारे गुण साने गुरुजीमध्ये आढळतात म्हणूनच त्यांना प्रेमाने गुरूजी म्हणत. ते शाळेला जीवन मानत. गुरुजींचे लेखन पुस्तकी ज्ञान देणारे नव्हते तर समाजसुधारणा, अज्ञान नाहीसे करणारे आहे. लोकांमध्ये स्वाभिमान जागृत करुन ब्रिटिशापासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी धेयवादी, आदर्शप्रेमी नागरिक घडविणारे होते. त्यांच्या वाङ्मयातून प्रामाणिकपणा, त्यागी वृती झळकते. त्यांच्या लेखनात आदर्शवादाच्या छठा दिसतात. सत्य, प्रेम, उदारता, नैतिकता, सद्वर्तन, संयम. ज्ञान, विवेक, सहानुभूती इत्यादी मुल्ये डोकावतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादिचाही पुरस्कार त्यानी केलेला दिसतो. स्वदेशी, खादी, अस्पृशता निवारण, हिन्दू मुस्लिम ऐक्य, स्वावलंबन, अन्यायाचा प्रतिकार यांचा प्रचार त्यानी त्यांच्या भाषणाद्वारे जनजागृती साठी केला. त्यांच्या मनावर गांधीजींचे संस्कार खोलवर रुजले होते. त्यांच्या लिखाणात समाज कसा विकसित आणिं सुसंकृत होईल ह्याची तळमळ जाणवते. त्यांच्या ह्या महान कार्याचा उहापोह ह्या निबंधात करणार आहोत.

**Keywords:** सत्य, समता, बंधुता, राष्ट्रीय, ऐक्य, प्रेम, भारतीय संस्कृती, नैतिकता.

**साने गुरुजींचे सामाजिक तत्त्वज्ञान: एक उहापोह**

साने गुरुजी हे नाव ऐकल्यावर महाराष्ट्रातल्या प्रत्येकाच्या मनात त्यांच्या शाळेतील प्रार्थनेचे स्वर घुमू लागताच, 'खरा तो एकची धर्म' सारखी प्रार्थना, 'आता उठवू सारे रान', 'बलसागर भारत होवो' सारखी स्फुर्तीगीतं चालीसकट मनामध्ये घुमणार नाहीत असा मराठी माणूस विरळाच म्हणावा लागेल. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात क्रांतीकार्य करणारे, लहान मुलांसाठी, अखिल विश्वासाठी लेखन करणारे, सतत विचारमग्न राहाणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व होत. गुरूजी म्हटलं की, मुलांच्या मनाची काळजी घेणारे, त्यांच्या नैतिक भावनांचे कौशल्याने संवर्धन करणारे, मुलांच्या घराशी मायेने संबध ठेवणारे असे समजले जातात. गुरीजी या शब्दात जो आपलेपणा आहे, गुरु शब्दाला माऊली शब्द जोड जोडण्याची ची प्रथा आहे आणि हे वरील सारे गुण साने गुरुजीमध्ये आढळतात म्हणूनच त्यांना प्रेमाने गुरूजी म्हणत. ते शाळेला जीवन मानत. गुरुजींचे लेखन पुस्तकी ज्ञान देणारे नव्हते तर समाजसुधारणा, अज्ञान नाहीसे करणारे आहे. लोकांमध्ये स्वाभिमान जागृत करुन ब्रिटिशापासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी धेयवादी, आदर्शप्रेमी नागरिक घडविणारे होते. त्यांच्या वाङ्मयातून प्रामाणिकपणा, त्यागी वृती झळकते. त्यांच्या लेखनात आदर्शवादाच्या छठा दिसतात. सत्य, प्रेम, उदारता, नैतिकता, सद्वर्तन, संयम. ज्ञान, विवेक, सहानुभूती इत्यादी मुल्ये डोकावतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादिचाही पुरस्कार त्यानी केलेला दिसतो. स्वदेशी, खादी, अस्पृशता निवारण, हिन्दू मुस्लिम ऐक्य, स्वावलंबन, अन्यायाचा प्रतिकार यांचा प्रचार त्यानी त्यांच्या भाषणाद्वारे जनजागृती साठी केला. त्यांच्या मनावर गांधीजींचे संस्कार खोलवर रुजले होते. त्यांच्या लिखाणात समाज कसा विकसित आणिं सुसंकृत होईल ह्याची तळमळ जाणवते.

साने गुरूजी अध्यापक, स्वातंत्र्यसैनिक, साहित्यिक, पत्रकार, समाजसेवक, लोकशाही समाजवादाचे भाष्यकार आणि आंतर-भारती चळवळीचे प्रवर्तक होते. तिरुचिरा-पल्लीच्या तुरुंगात असताना त्यांनी *विश्वभारती*च्या धर्तीवर 'आंतर-

भारती' ही संस्था स्थापन करण्याचा संकल्प केला. भारतात 'आंतरभारती'चे केंद्र असावे त्याच्या शाखा निरनिराळ्या राज्यांत असाव्यात त्यांच्या माध्यमातून विविध राज्यांतील भाषा, चालीरीती, परंपरा, कला, कारागिरी, लोकसाहित्य, नृत्ये ह्यांचा अभ्यास व्हावा आणि अशा तऱ्हेने राष्ट्रीय एकात्मता साधावी, अशी त्यांची कल्पना होती.

त्यांचा जन्म कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी २४ डिसेंबर, इ.स.१८९९ रोजी पांडुरंग सदाशिव सानेचा जन्म झाला. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव होता. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच साने गुरुजींचा जीवनविकास झाला. पुणे येथे. बी. ए. ची पदवी घेऊन (१९२२) मुंबई विद्यापीठाची इंग्रजी विषयाची एम. ए. ची पदवी (१९२४) संपादन केली. कार्लाईल, टॉलस्टॉय, रबिन्द्रनाथ टागोर महात्मा गांधी, रामकृष्ण परमहंस हे त्यांचे आदर्श होते. त्यांच्या मनावर गांधीजींचे संस्कार खोलवर रुजले होते.डॉ. अँनी बेझंट, सरोजिनी नायडू, चितरंजन दास ह्यांच्या विचारांचा प्रभाव होता. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील संतांचे साहित्य वाचले, ते आत्मसात केले त्यामुळे भक्ति हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलू होता. अमळनेर (जि.जळगांव) येथील तत्त्वज्ञान मंदिरात अधिछात्र (फेलो) पुढे तिथल्याच 'प्रताप हायस्कूल' मध्ये शिक्षक व वसतिगृहप्रमुख म्हणून काम केले. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली.अंमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला. इ.स. 1928 साली त्यांनी 'विद्यार्थी' हे मासिक सुरू केले.

१९४८ साली त्यांनी *साधना* हे साप्ताहिक पुण्यात सुरू केले .समाजवादी विचारप्रणालीच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक बंधुभाव वाढीला लागावा व समतेची प्रस्थापना व्हावी, हा त्यामागील हेतू होता. *विद्यार्थी* (मासिक), काँग्रेस (साप्ताहिक), *कर्तव्य* (सायंदैनिक) अशी अन्य नियतकालिकेही त्यांनी चालवली. गुरुजींनी मुलांसाठी केलेल्या अन्य लेखनात गोड गोष्टी (भाग १ ते १०, १९४१-४५ ), चिमण्या गोष्टी (१९४९) ही पुस्तके विशेष उल्लेखनीय आहेत. मुलांसाठी पश्चिमी साहित्यातील टॉमस हार्डी, मारी कोरेली (१८५५-१९२४), व्हिक्टर ह्यूगो ह्यांच्या उत्कृष्ट कादंबऱ्यांच्या कथा त्यांनी मराठीत आणल्या. धडपडणारी मुले (दोन खंड, १९३७), आस्तिक (१९४०), क्रांती (१९४०), सती (१९४०), रामाचा शेला (१९४४) ह्या त्यांच्या सामाजिक कादंबऱ्या आहेत. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, लेख, निबंध, चरित्रे, कवि ता यांमधून त्यांच्यातील संवेदनशील साहित्यिकही आपल्याला दिसतो. मानवतावाद, सामाजिक सुधारणा व देशभक्ती ही मूल्ये त्यांच्या साहित्यात ठायी ठायी आढळतात.

त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच केलेले आहे. युवकांच्या आणि किसानांच्या संघटना बांधण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. पुणे येथे १९४७ साली भरलेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. साने गुरुजींनी कादंबरी, कथा, बालसाहित्य, कविता, निबंध, चरित्र इ. साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले. त्यात बालांसाठी आणि कुमारांसाठी केलेले लेखन ठळकपणे नजरेत भरते. 'करी मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' हे त्यांचे जीवनाचे सार होते आणि त्यांच्या लेखनामागची भूमिका देखील होती; तथापि मनोरंजनाबरोबरच मुलांवर उत्तम नैतिक संस्कार व्हावेत, हेही त्यांचे उद्दिष्ट होते.

१९३५ साली लिहिलेले '*श्यामची आई*' हे त्यांचे आत्मकथनपर पुस्तक विशेष उल्लेखनीय होय, 'श्यामची आई' ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली सर्वार्थाने, ती गांधीवादी मुल्ये प्रदान करणारी अजरामर ठरलेली कलाकृती ठरली. 'मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र' म्हणून वर्णिल्या गेलेल्या ह्या पुस्तकावरून आचार्य अत्रे यांनी १९५४ साली काढलेल्या *श्यामची आई* ह्या चित्रपटाला उत्कृष्ट चित्रपट-निर्मितीचा स्वतंत्र भारतातील पहिला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. मातृहृदयी गुरुजींनी आई वडिलांच्या प्रेमावर 'मोलकरीण' नावाची अप्रतिम कादंबरी लिहिली ज्यावर पुढे जाऊन मराठी चित्रपट निघाला व गाजाला देखील.

शिक्षणाविषयी चर्चा करत असताना नाशिक कारागृहात असताना त्यांनी लिहिलेले 'धडपडणारी मुले' हे पुस्तक वाचायला मिळाले. ते संघर्ष, कठोर परिश्रम, कधीही वृत्ती सोडू नका असे विद्यार्थाना सांगत, थोडे खोलात गेल्यावर जाणवते की बहुधा ही वृत्ती सर्व विद्यार्थ्यांनी विकसित केली पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारण्याची वृत्ती अंगीकारली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याने ही जिज्ञासू वृत्ती विकसित केली पाहिजे. ज्या क्षणी चौकशी करण थांबते, प्रश्न विचारण थांबते तेथे शिकणे थांबते. त्यांच्या मते आपण आपल्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला शिकवले पाहिजे. आजकालचे विद्यार्थी निष्क्रीयरित्या ज्ञानार्जन करत आहेत. आज शिक्षक ज्ञानी माणसं घडवत आहेत पण शहाणी माणसं नाही. ते एक चांगले कथाकार होते आपल्या मुलांना कथा सांगणाऱ्या आईप्रमाणे ते कथा सांगुन मुलाना शिकवायचे. त्यांच्या मतानुसार प्रत्येक शिक्षकाने गोष्टीतून शिकवले पाहिजे व मुलांवर संस्कायोग्यर करायला हवेत. मुलांना नुसती शिस्तलवने गरजेचे नसून त्याच्यावर प्रेम करणे आवश्यक आहे. साने गुरुजींच्या तीन महान शिकवणुकी म्हणजे १) कथां किवा गोष्टी द्वारे शिकवणे, २) मुलांवर प्रेम करणे आणि ३) जिज्ञासू मन विकसित करण्याची गरज आहे,

या गोष्टी आपण आपल्या शिकवन्यत आत्मसाद करायला हव्यात, म्हणूनच शिक्षक म्हणून मला वाटते की साने गुरुजींकडून आपल्याला खूप काही शिकण्यासारखे आहे. समाजातील जातीभेद, अस्पृश्यता यासारख्या अनिष्ट रूढी आणि परंपरांना साने गुरुजीनी नेहमी विरोध केला.

१९३२ साली आचार्य विनोबा भावे-रचित गीता प्रवचने सुद्धा विनोबा भावे यांनी धुळे येथील तुरुंगवासात सांगितली व साने गुरुजींनी लिहिली. याच धुळयातील तुरुंगात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दल सुमारे १५ महिन्यांचा तुरुंगवास भोगला. तसेच पुढे बंगलोर येथील तुरुंगात असताना

त्यांनी तिरुवल्लिवर नावाच्या कवीच्या 'कुरल' नावाच्या तमिळ महाकाव्याचे मराठीत भाषांतर केले. १९४० साली नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे बिटिश सरकारविरुद्ध परखड भाषण केल्याबद्दल पुन्हा एकदा धुळे येथील तुरुंगात त्यांची रवानगी झाली. दरम्यानच्या काळात साक्षरतेचे वर्ग चालविणे, खादी विकणे, काँग्रेससाठी निधी जमविणे, देशाच्या स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतलेल्यांच्या तसेच देशासाठी बलिदान केलेल्यांच्या कुटुंबियांना साहाय्य करणे इ. कार्यांत त्यांनी स्वतःला झोकून दिले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव इतका होता की, त्यांनी १९३०–३२ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील सहभागामुळे धुळे, नाशिक आणि तिरुचिरापल्ली येथे तुरुंगवास भोगला.त्यांनी 'काँग्रेस' नावाचे साप्ताहिक काढले. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न केले. १९३६च्या जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशन यशस्वी होण्यासाठी त्यांनी खूप काम केले. इ.स. १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार केला. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधींच्या विचारसरणीस अनुसरून त्यांनी 'मैला वाहणे' व ग्राम स्वच्छतेची इतर कामे केली. साने गुरुजी यांनी राष्ट्र सेवा दलाची स्थापना केली.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ह्यांचे निर्मूलन झाले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. १९४६ मध्ये पंढरपूरचे विठ्ठलमंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हावे, म्हणून त्यांनी प्राणांतिक उपोषण केले आणि त्यांच्या मंदिरप्रवेशाचा मार्ग मोकळा करून दिला. 'एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले,' असे त्या वेळी म्हणले गेले.

त्यांनी भारतीय व पाश्चात्त्य आणि प्राचीन व अर्वाचीन काळातील कोणते व किती साहित्य मराठीत आणले, यावर नजर टाकली तरी आपण अचंबित होतो. त्या सर्वांमधील समान सूत्र उदात्त ध्येयवादाचे दर्शन घडवून, आदर्श माणूस घडवणे हेच दिसून येते. नंतर फ्रेंच भाषेतील 'Les Misérables' या कादंबरीचे 'दुःखी' या नावाने मराठीत अनुवादन केले. डॉ. हेन्री थॉमस या जगप्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञाच्या 'The story of human race' या पुस्तकाचे मराठीत 'मानवजातीचा इतिहास' असे भाषांतर केले. साने गुरुजींचे

भारतीय संस्कृतीवर निरतिशय प्रेम होते. त्यानी भारतीय संस्कृती हा ग्रंथ लिहिला.

सानेगुरुजींचा 'भारतीय संस्कृती' हा ग्रंथ अतिशय मोलाचा आहे. नव्हे, आजच्या कोणत्याही मूळ ग्रंथ वाचनाशी कर्तव्यच नसलेल्या व त्यामुळे केवळ पूर्णपणे पूर्वग्रहग्रस्त, द्वेषाधारित आणि आम्ही म्हणून तीच संस्कृती भारतीय, बाकी सारे 'अराष्ट्रीय' ठरविणाऱ्या अविवेकी आणि अविचारी युगात तर हे दुर्मीळ झालेले पुस्तक आता नव्याने उपलब्ध करून घेऊन प्रत्येकाने जवळ बाळगण्याची गरज निर्माण झाली आहे. भारतीय संस्कृती' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती २०१२ साली प्रकाशित झाली असली, तरी त्याचीही माहिती नसल्याने हा अनुपलब्ध ग्रंथ ठाऊक करून देणे नितांत गरजेचे आहे. महात्मा गांधी यांचे 'हिंद स्वराज' हे पुस्तक जेवढे मोलाचे, तेवढेच मोलाचे सानेगुरुजी यांचे 'भारतीय संस्कृती' हे पुस्तकही आहे. सानेगुरुजींचे प्रस्तावनेतील पहिलेच वाक्य या पुस्तकाचे चरित्र, चारित्र्य, स्वरूप आणि प्रयोजन स्पष्ट करते. 'एका सामान्य माणसाने सामान्य जनांकरिता लिहिलेले हे पुस्तक आहे.' या पहिल्याच वाक्यात या पुस्तकाची खरी महत्ता साठलेली आहे. सानेगुरुजींनीच पुढे म्हटल्याप्रमाणे, 'या पुस्तकात पांडित्य नाही, विद्वत्ता नाही, शेकडो ग्रंथातील आधार व संदर्भवचने वगैरे येथे काही एक नाही. येथे प्राच्यविद्या विशारदत्व नाही, गहन, गंभीर गूढ आहे असे काही एक नाही.' सामान्यातिसामान्य माणसाला गीतेचे भारतीय सार-तत्त्वज्ञान समजावून सांगण्याचा पुढे असाच प्रयत्न राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून केला. संस्कृती ही तशीही सामान्यांचीच जडण-घडण असते व ती सामान्यांच्याच आवाक्यात व आकलनात असली पाहिजे, त्यांच्यावर वर्चस्व गाजवण्यासाठी केवळ काही मूठभरांच्या सोयीसाठी जड, गहन, गंभीर, गूढ करून त्यांचे हातचे ती खेळणे व्हायला नको हा जो सानेगुरुजींचा संस्कृतीकडे बघण्याचा अतीव महत्त्वाचा दृष्टिकोन आहे, तोच खरा या ग्रंथनिर्मितीचा पाया व प्रेरणा आहे.

सानेगुरुजींच्या शब्दात सांगायचे तर, 'भारतीय संस्कृतीच्या आत्म्याची येथे भेट आहे. तिच्या अंतरंगाचे येथे दर्शन आहे. भारतीय संस्कृतीच्या गाभाऱ्यात प्रवेश आहे.' सानेगुरुजींच्या शब्दात सांगायचे तर, 'भारतीय संस्कृतीच्या

आत्म्याची येथे भेट आहे. तिच्या अंतरंगाचे येथे दर्शन आहे. भारतीय संस्कृतीच्या गाभाऱ्यात प्रवेश आहे.' या ग्रंथाद्वारे सानेगुरुजींनी ती सारी सांस्कृतिक वर्ज्य-अवर्ज्यता ही भारतीय संस्कृतीचा भागच कशी नाही याकडे बघण्याची एक नवी, आधुनिक सांस्कृतिक दृष्टीच प्रदान केली. हा ग्रंथ खरे तर त्यांनी संस्कृतीच्या अनेक अंग, उपागांवर, घटकांवर, विषयांवर वेळोवेळी दिलेल्या व्याख्यानांचे सुसूत्र असे सार आहे. त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे, भारतीय संस्कृतीच्या अनेक छटा येथे दाखवणे शक्य नव्हते, ते अर्धस्फूट दर्शन आहे. मात्र सामान्यांच्या आवाक्यात व आकलनात येईल असे भारतीय संस्कृतीवरचे एवढे अप्रतिम व महत्त्वाचे स्फुटलेखन, चिंतन व त्याद्वारे आत्मोन्नती आणि समाजोन्नती साधण्याचा प्रयत्न करणारे हे पुस्तक अर्थातच एक दुर्मीळ सांस्कृतिक ठेवा ठरते आहे. ही संस्कृती हृदय आणि बुद्धी दोहोंची पूजा करणारी कशी आहे, उदार भावना व निर्मळ ज्ञान यांचा संयोग साधून जीवन सुंदर करण्याचे ध्येय भारतीय संस्कृती कशी बाळगते, ज्ञान-विज्ञानाला हृदयाची जोड देऊन जीवनात माधुर्य कसे पसरवते याचे सुरेख वर्णन सानेगुरुजी या पुस्तकात करतात. सहानुभूती, विशालता, सत्याचे प्रयोग, ज्ञानाचा मागोवा घेण्याची पुरोगामी वृत्ती, जगात जे जे काही सुंदर, शीव व सत्य दिसेल ते घेऊन वाढणारी अशी ही भारतीय संस्कृती आहे, हे त्यांचे मुख्य विवेचन आहे.

ती संग्राहक आहे, संकुचितपणाचे वावडे असणारी आहे हे त्यांचे विवेचन आजच्या द्वेष पसरवण्यासाठी कार्यरत, संकुचित, तथाकथित नवसांस्कृतिक जाणिवा बाळगणाऱ्यांच्या गळी उतरवले जाण्याची नितांत गरज असल्याने कधी नव्हे तेवढे या दुर्मीळ ग्रंथाचे महत्त्व आज वाढले आहे. त्याग, संयम, वैराग्य, सेवा, प्रेम, ज्ञान, विवेक या गोष्टी भारतीय संस्कृती म्हटल्यावर आठवतात, ज्या आज जाणीवपूर्वक विस्मृतीत टाकल्या जात आहेत; त्यामुळेच आज ह्या संस्कृतीला भारतीय म्हणवून घेण्याऐवजी विशिष्टच धर्माचे टिळे लावूनच बघितले जाते, ती अधिकाधिक अभारतीयच करणे चालले आहे. अशावेळी आपल्याला या ग्रंथातून, भेदातून अभेदाकडे, चिखलातून कमळाकडे, विरोधातून विकासाकडे, विकारातून विवेकाकडे, गोंधळातून व्यवस्थेकडे, आरडाओरडीतून संगीताकडे नेणारा मेळ घालणाऱ्या भारतीयतेची दीक्षा देणारा हा दुर्मीळ ग्रंथ प्रत्येकाने जवळ बाळगण्याची गरज आहे. तसेच भारतीय संस्कृतीतील अनेक महापुरुषांची चरित्रे लिहिली.

त्यांनी 'द डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या जवाहरलाल नेहरूंच्या ग्रंथाचा अनुवादही केला. टागोर आणि गांधी यांचे काही लेखन तर त्यांनी मराठीत आणलेच; त्यांनी विल ड्युरांटच्या 'द स्टोरी ऑफ फिलॉसॉफी' या ग्रंथाचा अनुवाद केला आहे. 'पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाची कहाणी' या नावाने तो अनुवाद प्रसिद्ध आहे. गुरुजींनी 'इस्लामी संस्कृती' हे छोटेखानी पुस्तकही लिहिले आहे. मराठी लोकांना इस्लामी संस्कृती कळली पाहिजे, तिचे दालन खुले करून दिले पाहिजे, ही त्या लेखनामागची प्रबळ प्रेरणा होती, हे तर निश्चित! असाच प्रकार 'चिनी संस्कृती'बद्दलही सांगता येईल. चिनी संस्कृतीची ओळख करून देणारे पुस्तक गुरुजींनी अखेरच्या काळात लिहिले होते, ते प्रकाशित करायचे राहून गेले आणि त्या हस्तलिखिताच्या दोन डायऱ्या आता इतक्या अस्पष्ट झाल्या आहेत की, त्या प्रसिद्ध करणे शक्य नाही म्हणून वडघरच्या साने गुरुजी स्मृतिसंग्रहालयात ठेवल्या आहेत. साने गुरुजींचे साहित्य महाराष्ट्राच्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचले आहे. किंबहुना, मागील पन्नास-साठ वर्षांतील बालकुमार व युवकांच्या अनेक पिढ्या त्या लेखनाचे संस्कार घेऊनच मोठ्या झाल्या आहेत.

या संदर्भात, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे म्हणतात 'साने गुरुजी हे मला थोर कादंबरीकार वाटतात, ते समजून घेतले पाहिजे आणि तर्कशुद्ध पद्धतीने राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक विषयांवर लेखन करणारे नरहर कुरुंदकर साने गुरुजींच्या साहित्याचा गौरव करतात. भालचंद्र नेमाडे हे त्यांच्या देशवादाच्या मांडणीसाठी ओळखले जातात आणि कुरुंदकर स्वत:ला मार्क्सवादी होते म्हणजे मार्क्सवाद व देशवाद अशा दोन टोकांच्या विचारसरणीच्या भाष्यकारांना गुरुजींच्या साहित्याचे अनन्यसाधारणत्व मान्य आहे, हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे.

साने गुरुजींचा गहन प्रभाव भारताच्या तात्विक, साहित्यिक आणि सामाजिक परिदृश्यांना आकार देतात. पुण्यात असताना, साने गुरुजी लोकमान्य टिळकांच्या विचारसरणीच्या प्रभावाखाली आले, ज्यामुळे त्यांचा राष्ट्रवादी उत्साह आणखी वाढला. महान लेखक, केशवसुत यांच्यासह तत्कालीन अनेक आघाडीच्या व्यक्तींसोबतच्या त्यांच्या सहवासामुळे त्यांचा सामाजिक-राजकीय आणि सांस्कृतिक दृष्टीकोन तयार होण्यास मदत झाली.हा काळ एक उत्कट शिक्षक, एक प्रेरणादायी लेखक आणि एक समर्पित स्वातंत्र्यसैनिक म्हणून त्यांच्या जीवनभराच्या प्रवासाची सुरुवात ठरला. साने गुरुजींनी मराठीत ७३ हून अधिक आणि इंग्रजीत ८ पुस्तके लिहिली, ज्यात कथा, निबंध, चरित्रे आणि तात्विक प्रवचनांसह विविध शैलींचा समावेश आहे. त्यांचे लेखन हे त्यांच्या राष्ट्रावरील त्यांचे प्रेम, खोलवर रुजलेल्या तात्विक श्रद्धा आणि सामाजिक न्यायाची तळमळ यांचे सुंदर मिश्रण आहे.

**गुरुजींनी लिहिलेली 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' ही कविता :-**

'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे
जगी जे हीन अतिपतित, जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे
जयांनाना कोणी जगती सदा ते अंतरी रडती
तया जाऊन सुखवावे, जगाला प्रेम अर्पावे
समस्तां धीर तो द्यावा, सुखाचा शब्द बोलावा
अनाथा साह्य ते द्यावे, जगाला प्रेम अर्पावे
सदा जे आर्त अतिविकल, जयांना गांजती सकल
तया जाऊन हसवावे, जगाला प्रेम अर्पावे
कुणाना व्यर्थ शिणवावे, कुणाना व्यर्थ हिणवावे
समस्तां बंधु मानावे, जगाला प्रेम अर्पावे
प्रभूची लेकरे सारी तयाला सर्वही प्यारी
कुणाना तुच्छ लेखावे, जगाला प्रेम अर्पावे
असे जे आपणापाशी असे, जे वित्त वा विद्या
सदा ते देतची जावे, जगाला प्रेम अर्पावे
भरावा मोद विश्वात असावे सौख्य जगतात
सदा हे ध्येय पूजावे, जगाला प्रेम अर्पावे
असे हे सार धर्माचे असे हे सार सत्याचे
परार्थी प्राणही द्यावे, जगाला प्रेम अर्पावे
जयाला धर्म तो प्यारा, जयाला देव तो प्यारा
त्याने प्रेममय व्हावे, जगाला प्रेम अर्पावे[1]

ही कविता भारतीय संस्कृतीची द्योतक आहे. त्यांच्या मते, 'प्रेमाचे नाते सर्वात थोर आहे, कारण, सूर्याच्या किरणांनी ज्याप्रमाणे बर्फाच्या राशी वितळतात, त्याप्रमाणे अहंकाराच्या राशी प्रेमाच्या ओलाव्याने वितळतात.' त्यांनी आपल्या प्रेमळ व्यक्तित्वाने पुढील पिढीतील एस.एम. जोशी, ग.प्र. प्रधान, दादा गुजर, ना.ग. गोरे, प्रकाशभाई मोहाडीकर, प्रा. प्र.द. पुराणिक, मधु दंडवते, यदुनाथ थत्ते, रा.ग. जाधव,राजा मंगळवेढेकर, वा.रा. सोनार, शांतीलाल पटणी, सी.न. वाणी, इत्यादी अनेक थोर व्यक्तित्व घडवल्या.

'पत्री' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून साने गुरुजीच्या देशभक्तिपर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील '*बलसागर भारत होवो*'सारख्या कवितांचा नागरिकांवरील वाढता प्रभाव लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या. त्यातील ही एक कविता:

बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो||ध्रु||
हे कंकण करि बांधियले, जनसेवे जीवन दिधले
राष्ट्रार्थ प्राण हे उरले, मी सिद्ध मरायाला हो
वैभवी देश चढवीन, सर्वस्व त्यास अर्पीन
तिमीर घोर संहारीन, या बंधु सहाय्याला हो
हातांत हात घेऊन, हृदयास हृदय जोडून
ऐक्याचा मंत्र जपून, या कार्य करायाला हो
करि दिव्य पताका घेऊ, प्रिय भारतगीते गाऊ
विश्वास पराक्रम दावू, ही माय निजपदा लाहो
या उठा करू हो शर्थ, संपादु दिव्य पुरुषार्थ
हे जीवन ना तरि व्यर्थ, भाग्यसूर्य तळपत राहो
ही माय थोर होईल, वैभवे दिव्य शोभेल
जगतास शांति देईल, तो सोन्याचा दिन येवो||[2]

हि कविता एक प्रेरणादायी आहे जी देशबांधवांना राष्ट्रप्रेम, बंधुभाव, एकता आणि पराक्रमाची भावना जागृत करते. ते देशाला शक्तिशाली आणि समृद्ध राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहत आहे. मानवतावादी संस्कृतिनिष्ठ माणूस व समाज घडवण्याचे त्यांचे व्रत होते आणि या व्रताची प्रेरणा जशी आधुनिक प्रबोधन युगाच्या विचारपरंपरेत होती तशीच ती उदात्त, सहिष्णू, विवेकी अशा भारतीय संस्कृतीतही होती. नव्हे, तो काळच भारतीय संस्कृतितेतील उदारमतवादाची आधुनिक उदारमतवादाशी सांगड घालत नवभारत निर्मिणाऱ्या विचारवंतांचाच होता. या संस्कार प्रकल्पात जे जे ग्रंथ पायाभूत महत्त्वाचे ठरले त्यात आजच्या पिढीसमोर आवर्जून आणला पाहिजेत.

त्यांचे लिखाण समाजातील विविध समस्या, जसे की अस्पृश्यता, ग्रामीण जीवनातील अडचणी, आणि शैक्षणिक समस्या उघड करतात. साने गुरुजींनी हरिजन उन्नती, अस्पृश्यता निर्मूलन, शिक्षण आणि ग्रामीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले. त्यांच्या विचारांचा तरुण पिढीवर सकारात्मक प्रभाव पडला. त्यांच्या विचारांमुळे तरुणांना समाजसेवा, देशभक्ती, आणि नैतिक मूल्ये यांची प्रेरणा मिळाली. त्यानी कथा नैतिक मूल्ये, संस्कार, आणि मानवतेचा संदेश देतात. साने गुरुजींच्या विचारांची आजच्या काळातील तरुण पिढीला आवश्यकता आहे कारण त्यांच्या विचारांमुळे समाजात एक नवीन जागरुकता निर्माण होऊ शकते आणि त्यामुळ समाजातील एकता, मानवता, आणि समता यांना बल मिळू शकते. त्यामुळे समाजात एक नविन जागरूकता निर्माण होऊ शकते. साने गुरुजींचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी

[1] https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner/91592593e-91593593f92493e-935-91793e923940/917940924-91693093e-92494b-90f91591a940-92793094d92e

[2] https://www.aathavanitli-gani.com/Song/Balsagar_Bharat_Hovo

असून उज्जवल भविष्यासाठी त्यांचे विचार प्रत्येकाला उपुक्त ठरतील. आजची तरुणपिढी स्पर्धात्मक युगात इतकी गुरफटून गेली आहे की, त्याना काय योग्य आणि काय अयोग्य यातला फरक समजत नाही. प्रत्येक गोष्ट साध्य करण्यासाठी, सर्वगुणसंपन्न होण्याचा अट्ठाहस आज लोकांमध्ये पहायला मिळतो. ज्यामुळे जेव्हा अपयश पदरात पड़ते, तेव्हा नैराश्य, तणाव या देखील ओघाने येतातच. इतकेच नव्हे तर झटपट पैसे कमावण्याच्या नादात आजच्या पिढीला सामाजिक मुल्ये आणि परंपरेचा विसर पडत चालला आहे. ह्या गोष्टींचा दुष्परिणाम त्यांच्या व्यक्तिमात्वावर होताना दिसतो. म्हणूनच आजच्या धावपळीच्या आणि भौतिकवादाच्या युगात युवानीं साने गुरुजींच्या नैतिक आणि प्रेरणादायी विचारांची कास धरणे अत्यंत गरजेचे आहे. ज्यामुळे समाजाचा व त्या अनुषंगाने देशाचा विकास होईल.

**संदर्भ:**

१. साने गुरूजी, *भारतीय संस्कृती*, रिया पब्लिकेशन, कोल्हापुर, २०११.
२. Durant Wil, 'The Story of Philosophy', अनुवाद साने गुरूजी, 'पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाची कहाणी', मधुश्री पब्लिकेशन, पुणे, ऑक्टोबर२०२३, ISBN: 978-93-91629-04-5.
३. https://mpcollegepimpri.edu.in/zel_admin//uploads/research_pdf/20230412120605.pdf
४. https://www.shaleyshikshan.in/2023/12/pandurang-sadashiv-sane-guruji.html
५. https://kartavyasadhana.in/view-article/majhya-jivanache-shilpkar-g-p-pradhan-part-3
६. http://ir.unishivaji.ac.in:8080/jspui/bitstream/123456789/3177/5/05_Chapter%202.pdf

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपणारे तत्वचिंतक: डॉ. नागोराव कुंभार

**प्रा. डॉ. बाजीराव माणिकराव पाटील**
विद्या वर्धिनी सभेचे, डॉ.एम.वाय.वैद्य कला,
प्रा.पी.डी.दलाल वाणिज्य आणि डॉ.डी.एस.शाह.विज्ञान महाविद्यालय, धुळे
**Corresponding Author: प्रा. डॉ. बाजीराव माणिकराव पाटील**
**Email:** bajiraopatil151@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.14546531**

**सारांश:-**

महात्मा गांधी, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा जपत व आचरणात आणत एक आदर्श जीवन जगणारे मानवी जीवनासाठी आदर्श मूल्य सांगणारे व आपल्या जीवनामध्ये ती मूल्य जगणारे उत्तुंग व्यक्तिमत्व महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य तथा तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक, विचारशलाका त्रैमासिकाचे संपादक, अनेक ग्रंथाचे लेखक प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांचे व्यक्तिमत्व व कार्य अत्यंत व्यापक आहे. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजातील दोन महान विचारवंत आहेत, ज्यांनी समाजसुधारणा, सत्य, अहिंसा, समता, आणि सामाजिक न्याय यांसारख्या तत्त्वांच्या माध्यमातून भारताला नवी दिशा दिली. डॉ. नागोराव कुंभार हे या दोन्ही विचारवंतांच्या तत्त्वांचा वारसा जपत समाजाला दिशा देणारे आदर्श तत्त्वचिंतक आहेत. त्यांच्या विचारधारेत गांधीजींची अहिंसा, सत्याग्रह, स्वावलंबन,स्वराज्य यांचा प्रभाव तसेच आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक समतेच्या विचारांचा समन्वय दिसून येतो.

गांधीजींच्या अहिंसा, सत्य, आणि ग्रामस्वराज्य यांचा प्रभाव आणि आंबेडकरांच्या सामाजिक न्याय व समतेच्या विचारांचा समन्वय कसा घडवला गेला, हे समजण्यास मदत होते. जातीयतेच्या समस्या सोडवण्यासाठी गांधीवादी मूल्य विचार आणि आंबेडकरवादी सामाजिक न्याय यांचा वापर करण्याच्या मार्गदर्शनासाठी संशोधन उपयुक्त ठरते. ग्रामीण व शहरी समाजात सलोखा निर्माण करण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा आधुनिक संदर्भात अभ्यास होतो. डॉ. कुंभार यांच्या कार्याचा अभ्यास त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांसाठी कसा जतन करता येईल, याबाबत दिशा दाखवतो. संशोधनाद्वारे गांधी-आंबेडकर विचारांचा उपयोग वर्तमान काळातील आव्हानांवर उत्तर शोधण्यासाठी करता येतो.

**मुख्य शब्द:-** अहिंसा, सत्याग्रह, स्वावलंबन, ग्रामस्वराज्य, नैतिक मूल्ये, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक सलोखा, सामाजिक समता, न्याय, बंधुता, संविधान, जातीय भेदभाव निर्मूलन, सामाजिक न्याय.

**संशोधनाचे उद्दिष्टे:**

- डॉ. नागोराव कुंभार यांच्या कार्याची नैतिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
- डॉ. कुंभार यांच्या विचारांतील सार्वकालिकता आणि सामाजिक स्तरावर त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.
- संशोधनाच्या माध्यमातून डॉ. कुंभार यांच्या कार्याचा उपयोग शिक्षण,सामाजिक न्याय, आणि मानवी जीवनाच्या विकासाच्या क्षेत्रात प्रेरणादायी आहेत. हे सिद्ध करणे.

तत्त्वज्ञान हा विषय तसा भाकरीचा प्रश्न सोडवनारा विषय नाही परंतु तो मानवी जीवनाला दिशा देणारा, माणसाला विवेकवादी बनवणारा विषय आहे. जीवन जगत असताना माणसाने कसे वागले पाहिजे? कसे जगले पाहिजे? किंवा जगण्या, वागण्याला वळण लावणारा विषय म्हणजे तत्त्वज्ञान. आपण आपले जीवन कसे जगले पाहिजे या प्रश्नातूनच खरे तर तत्त्वज्ञानाचा उदय झाला. मी कोण? म्हणजे स्वतःला स्वतःची ओळख होणे म्हणजेच स्वतःच्या तत्त्वज्ञानाचा आरंभ होणे होय. सर्वच तत्ववेत्यांनी हे आवर्जून सांगितलेले आहे आणि तोच विचार पुढे डॉ. नागोराव कुंभार सरांनी पुढे लावून धरलेला आहे.
ते अध्ययन आणि अध्यापनावर निष्ठा ठेवणारे शिक्षक आहेत. आपल्या विषयावर त्यांची अपार श्रद्धा आणि विश्वास आहे. त्यांच्या मते तत्त्वज्ञानच मानवी जीवनाला योग्य आकार देऊ शकते.

डॉ. नागोराव कुंभार यांचा जन्म एका सर्वसाधारण गरीब कुटुंबामध्ये झाला, अत्यंत हलाखीची परिस्थिती असताना सुद्धा या गरिबीलाच त्यांनी प्रेरणा समजून अनेक समस्यांवर यशस्वी मात करत आज यशाच्या अतिउच्च शिखरावर ते आहेत. कमवा व शिका योजनेमध्ये भाग घेऊन त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केलं म्हणून प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये सुद्धा येणारी बिकट परिस्थिती असेल,

गरिबी असेल तर त्यावर कशी मात केली पाहिजे, निर्माण होणाऱ्या समस्या कशा पद्धतीने सोडवल्या पाहिजेत हे आपणास सरांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीवरून समजून येते. खर तर गरीब विध्यार्थ्यांसाठी त्यांची जीवन जगण्याची पद्धती हा एक आदर्शाच आहे. महात्मा गांधींच्या विचारावर चालणारे सर त्यांनी आम्हाला गांधी अगदी तळमळीने शिकवला आणि स्वतः गांधी जगला सुद्धा त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांच्या मनावर सरांच्या या गांधी वर्तनाचा परिणाम निश्चितपणे झालेला आहे.

विद्यार्थी शिक्षकाचे अनुकरण करतात आणि अनेक विद्यार्थ्यांनी डॉ. कुंभार सरांच्या विनम्र व विवेकशील स्वभावाचं अनुकरण आपल्या जीवनामध्ये करत करत या अनुकरणाची रुजवण समाजामध्ये करण्याचा प्रयत्न करतात, हा प्रभाव कुंभार सरांच्या विचाराचा आहे. ते नेहमी अडल्या-नडल्यांना, गोर-गरीब विद्यार्थ्यांना तन्मयतेने व तळमळीने मदत करत असतात. कुठल्याही परिस्थितीमध्ये एखाद्या विद्यार्थ्यांना आर्थिक असो, घरगुती असो, शैक्षणिक असो किंवा अन्य प्रकारची अडचण तर ती सोडवण्याचा नेहमीचा, प्रयत्न असतो अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी आर्थिक मदत करून शिक्षणाच्या प्रवाहामध्ये टिकऊन ठेवलं, आज त्यांचे अनेक विद्यार्थी महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये उच्च पदस्थ पदावरती काम करताना दिसतात. गरजू विद्यार्थ्यांना आज सुद्धा त्यांचा हात पुढे आलेलाच दिसतो कारण शिक्षण घेत असताना त्यांनी अनेक प्रकारच्या अडीअडचनिंचा, समस्यांचा सामना केलेला आहे, त्यामुळे त्या परिस्थितीची जाण ठेवून गरीब गरजू विद्यार्थ्यांना माणुसकी हाच धर्म समजून मदत करत असतात. विद्यार्थ्यांना किंवा समाजातील लोकांना मदत करत असताना डॉ. कुंभारांनी कुठल्याही प्रकारच्या जाती-धर्माचा किंवा कसल्याही प्रकारचा भेदभाव केलेला नाही. आपल्या पगाराचा जास्तीत जास्त भाग ते गरजू विद्यार्थ्यावरती आजही खर्च करतात. सरांचा स्वभाव अतिशय विनयशील, नम्र, सहनशीलता, संयम, निर्भय व निस्पृह वृत्तीने

भरलेला आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांची कोणतीही अडचण असेल तर ती अडचण सरांकडे गेल्यास, अगदी कसलाही विचार न करता ती अगदी पटकन सुटायची. यातूनच सरांच्या जगण्या-वागण्याची मूल्य दिसून येतात. सरांनी मानवी हक्क अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, छात्र भारती, भटके विमुक्त, मागासवर्गीय यांच्या विकासासाठीच्या लढ्यात सतत सक्रिय मार्गदर्शकाची भूमिका बजावली आहे. संविधानातील मूल्यावर विश्वास ठेवून त्या मूल्यांची शिकवण सरांनी विद्यार्थ्यांबरोबरच समाजाला दिली आणि ती मूल्य आपल्या जीवनामध्ये, आपल्या जगण्यामध्ये यावीत यासाठी कसोसिने, अविरतपणे प्रयत्न केले व करत आहेत.

डॉ. नागोराव कुंभार यांनी गांधीजींच्या तत्त्वांचा प्रचार आणि प्रसार त्यांच्या कार्यातून केला. गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या तत्त्वांचा त्यांच्या कार्यात ठसा दिसतो. त्यांनी समाजातील तणाव आणि वाद मिटवण्यासाठी संवाद व समन्वयाच्या तत्त्वांचा अवलंब केला. गांधीजींच्या शैक्षणिक तत्त्वांच्या आधारे त्यांनी शिक्षण व्यवस्थेत नैतिकता, श्रमप्रतिष्ठा, आणि स्वावलंबनावर सुद्धा भर दिला.

डॉ. कुंभार हे आंबेडकरांच्या सामाजिक समतेच्या विचारांचे अनुयायी आहेत.

आंबेडकरांनी मांडलेल्या 'समतेच्या समाजाची' कल्पना त्यांनी ग्रामीण भागात प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्न केले. समाजातील दुर्बल आणि मागासवर्गीय घटकांसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. आंबेडकरांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनावर आधारित, डॉ. कुंभार यांनी शिक्षण हा प्रत्येकाच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाचा घटक असल्यावर भर दिला.

आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानातील समता, बंधुता, आणि न्याय यांसारख्या तत्त्वांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले.

डॉ. नागोराव कुंभार यांनी गांधीजींच्या आणि आंबेडकरांच्या विचारांचा समन्वय साधून समाज सुधारणे हे आपले ध्येय मानले. त्यांनी समाजा-समाजातील सामाजिक दरी मिटवण्यासाठी गांधीविचार आणि आंबेडकरवादी तत्त्वांचा उपयोग केला. त्यांनी अशा शिक्षणव्यवस्थेचा पुरस्कार केला, जी विद्यार्थीवर्गामध्ये नीतिमत्ता आणि सामाजिक बांधिलकी जोपासली जाईल. त्यांनी गांधीजींच्या ग्रामस्वराज्य तत्त्वाचा उपयोग ग्रामीण विकासासाठी केला. ग्राम स्वराज, महात्मा गांधींनी तयार केलेली आणि नंतर विनोबांनी विकसित केलेली एक विशेष संकल्पना जी प्रत्येक गावाचे स्वयं-कार्यक्षम स्वायत्त संस्थामध्ये रूपांतर करण्यास प्रोत्साहन देते जिथे सन्मानाणे जीवन जगण्यासाठी सर्व व्यवस्था आणि सुविधा उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे आंबेडकरांच्या समतेच्या तत्त्वांचा अवलंब करून त्यांनी समाजात जातीय सलोखा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. कुंभार हे गांधीजी आणि आंबेडकरांच्या विचारांचा समन्वय साधणारे खऱ्या अर्थाने आधुनिक तत्त्वचिंतक आहेत. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक आणि नैतिक मूल्यांवर आधारित कार्य करून गांधी-आंबेडकर विचारांची प्रासंगिकता सिद्ध केली आहे.

डॉ. नागोराव कुंभार हे गेली ३८ वर्षे सातत्य व गुणवत्ता टिकवून विचारशलाका या नियतकालिकाचे संपादन करीत आहेत. गांधी, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आदी मूल्ये आणि तत्वांचा तसेच भारतीय संविधान यांच्या प्रचार व प्रसाराचे कार्य प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी लातूरसारख्या शहरात राहून अत्यंत व्रतस्थवृत्तीने करत आहेत.

महात्मा गांधीजींचे सामाजिक तत्त्वज्ञान, महात्मा गांधीजींची सत्याग्रहाची संकल्पना, भ्रष्टाचार : स्वरूप व

संदर्भ, डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, महाराष्ट्रातील ध्येयवादी तत्वचिंतक, सामाजिक कार्याच्या दिशा, विचारतरंग, तरुण मनाच्या वाटा आणि वळणे आदी ग्रंथाचे लेखन आणि तसेच त्यांनी चिंतन एका कुलगुरूचे, शिक्षण विचार, महाराष्ट्रातील समाजचिंतन, सर्वस्पर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण आदी ५० ग्रंथांचे संपादन डॉ. नागोराव कुंभार यांनी केले आहे.

**निष्कर्ष:**

डॉ. नागोराव कुंभार यांनी गांधीजींच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपत समाजाच्या उन्नतीसाठी बहुमूल्य कार्य केले आहे. त्यांच्या विचारधारेतून समाजातील समता, न्याय आणि अहिंसा यांचे महत्त्व अधोरेखित होते. गांधी-आंबेडकर तत्त्वांचा समन्वय साधून त्यांनी आजच्या काळातील अनेक समस्या सोडवण्यासाठी आदर्श उभा केला आहे. डॉ. नागोराव कुंभार यांचे कार्य हे गांधी विचारधारेचा आदर्श आहे. त्यांनी शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या तत्त्वचिंतनामुळे आणि त्यांच्या कार्यामुळे गांधीजी आणि आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जिवंत राहतो. त्यांच्या कार्यातून आजच्या सामाजिक समस्या सोडवण्यासाठी प्रेरणा मिळते. शिक्षण आणि समता यांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा ते निरंतर प्रयत्न करत आहेत.

डॉ. कुंभार यांच्या कार्यातून मिळणाऱ्या प्रेरणा आजच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय परिस्थितीत सुद्धा उपयोगी ठरतात. त्यांच्या कार्यातून मिळणारी प्रेरणा समाजातील वंचित घटकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे त्यांच्या तत्त्वचिंतनातून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक नेतृत्व कसे घडवायचे, याचे उदाहरण मिळते. डॉ. नागोराव कुंभार यांच्यावर संशोधन करणे हे केवळ त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन करणे नसून, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचे आधुनिक संदर्भात विश्लेषण करण्याचा प्रयत्न आहे. हे संशोधन समाजाच्या विविध स्तरांवर सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रेरणा देईल आणि भारतीय विचारधारेतील एक महत्त्वाचे योगदान ठरेल.

**संदर्भ:**

1. कुंभार नागोराव यांचे लेखन आणि व्याख्याने.
2. जाधव उमाकांत, बेलंबे गणेश- (संपादकीय)- प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार गौरव समिती,लातूर स्मरणिका.
3. कुंभार नागोराव - तरुण मनाच्या वाटा आणि वळणे
4. कुंभार नागोराव - (संपादकीय)- सामाजिक कार्याच्या दिशा आणि आरक्षण का व कसे?
5. कुंभार नागोराव - (संपादकीय)- न्याय म्हाणजे काय?
6. कुंभार नागोराव -(संपादकीय)- ग्रामीण विकास समस्या व उपाय.
7. कुंभार नागोराव - (संपादकीय)- समता स्वरूप व समस्या.
8. कुंभार नागोराव - (संपादकीय विचारशलाका)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक (जुलै - डिसें.९१)
9. कुंभार नागोराव - (संपादकीय विचारशलाका)- महात्मा गांधी विशेषांक (जुलै - डिसें. ९५)
10. विठ्ठल पी.,कुंभार नागोराव - (संपादकीय)- सर्वदर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत तुकाराम: एक समकालीन संत

**डॉ. रेखा शेरकर**
विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे
**Corresponding Author: डॉ. रेखा शेरकर**
**DOI-10.5281/zenodo.14546548**

**प्रस्तावना:**

संत तुकाराम हे इ.स.च्या सतराव्या शतकातील एक वारकरी संत – कवी होते. त्यांचा जन्म देहू या गावात वसंत पंचमीला-माघ शुद्ध पंचमीला झाला. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकारामांना वारकरी 'जगद्‌गुरू' म्हणून ओळखतात. वारकरी संप्रदायातल्या प्रवचन व कीर्तनाच्या शेवटी – 'पुंडलीक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्‌गुरू तुकाराम महाराज की जय' असा जयघोष करतात. जगद्‌गुरू तुकाराम लोककवी होते. 'जे का रंजले गांजले! त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा! देव तेथेची जाणावा!' अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना सांगून ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवला. वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. सतराव्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाचे मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. तुकाराम महाराज वास्तववादी निर्भीड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकपणावर रोखठोक शब्दांमध्ये प्रहार करणारे संत होते. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये या काळात अनागोंदी निर्माण झालेली होती. अशा काळात संत तुकारामांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनांतून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले.

तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. वेदान्त तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. 'अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच' एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठांत आहेत.

भागवत धर्माचा कळस होण्याचे महद्‌भाग्य त्यांना लाभले. महाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने ते स्थिरावले आहेत. त्यांच्या अभंगांत परतत्त्वाचा स्पर्श आहे. मंत्रांचे पावित्र्य शब्दकळेत पाझरते. त्यांची प्रत्यक्षानुभूती त्यांच्या भावकाव्यात आहे. त्यांच्या काव्यातील गोडवा व भाषेची रसाळता अतुलनीय आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगलेखनाबरोबरच गवळणीही रचल्या आहेत.

संत तुकारामांच्या अभंगाचा अनेकांनी अनेक अंगानी अभ्यास करून त्यांचे सौंदर्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांची गाथा ही अखंड ज्ञानाचा स्रोत म्हणून जनसामान्यांच्या मुखांमध्ये कायम आहे. गाथा बुडवली म्हणणाऱ्यांना जनसामान्यांच्या तोंडून मुखोद्गत अभंग ऐकून गाथा जिवंत असल्याचा प्रत्यक्ष अनुभव झाला. इंद्रायणी नदीच्या काठावर लाखोंचा जनसमुदाय गाथेतील अभंग म्हणू लागले यावेळी तुकाराम महाराजांना जाणीव झाली की आपले अभंग, आपली गाथा बुडालेली नाही. तर ती जनसामान्यांच्या मुखांमध्ये अखंड जिवंत आहे. आपल्या कार्याची ही खरी यथोचित पावती आहे. खऱ्या अर्थाने संत तुकाराम हे या काळातील लोक संत होते. बहुजन समाजाला जागृत करून देवधर्म यासंबंधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी ठरले.

देव धर्मातील अनागोंदी त्याचप्रमाणे भोळ्या समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले आहेत लौकिक अर्थाने संत तुकाराम हे आठव्या पिढीतील नायक होते. वि.का. राजवाडे यांनी संत चळवळीवर काही प्रमाणात टीका केलेली आहे. संत चळवळीच्या संदर्भामध्ये ते लिहितात, "संतांच्या संत चळवळीने महाराष्ट्र तीन शतके अपंग होऊन राहिला मात्र याला अपवाद संत रामदास हे होय" ज्ञानदेवांनी रचलेल्या भक्ती चळवळीला खऱ्या अर्थाने कळसास नेण्याचे काम हे संत तुकारामांनी केलेला आहे.

**Keywords:** सत्य, समता, बंधुता, राष्ट्रीय, ऐक्य, प्रेम, भारतीय संस्कृती, नैतिकता.

**संशोधन पत्राची समस्या:**

"संत तुकाराम महाराष्ट्रीय समाजातील सामाजिक प्रबोधनाचे अध्वर्यु असावेत काय?"

**संशोधन पत्राची उद्दिष्ट्ये:**

•संत तुकाराम सांप्रतकालीन महाराष्ट्रीय समाज प्रबोधक होते.

•संत तुकाराम तत्कालीन व समकालीन सामाजिक समस्यांचे जाणकार होते.

•संत तुकाराम राष्ट्र धर्माचे अध्वर्यु होते.

**संत तुकाराम महाराजांचे सामाजिक कार्य:**

संत तुकाराम हे इ.स.च्या सतराव्या शतकातील एक वारकरी संत - कवी होते. त्यांचा जन्म देहु या गावात वसंत पंचमीला-माघ शुद्ध पंचमीला झाला. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकारामांना वारकरी 'जगद्गुरू' म्हणून ओळखतात. वारकरी संप्रदायातल्या प्रवचन व कीर्तनाच्या शेवटी - 'पुंडलीक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय' असा जयघोष करतात. जगद्गुरू तुकाराम लोककवी होते. 'जे का रंजले गांजले! त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा! देव तेथेची जाणावा!' अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना सांगून ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवला. वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. सतराव्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाचे मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. तुकाराम महाराज वास्तववादी निर्भीड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकपणावर रोखठोक शब्दांमध्ये प्रहार करणारे संत होते. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये या काळात अनागोंदी निर्माण झालेली होती. अशा काळात संत तुकारामांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनांतून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले.

तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. वेदान्त तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. 'अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच' एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठांत आहेत.

भागवत धर्माचा कळस होण्याचे महद्भाग्य त्यांना लाभले. महाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने ते स्थिरावले आहेत. त्यांच्या अभंगांत परतत्त्वाचा स्पर्श आहे. मंत्रांचे पावित्र्य शब्दकळेत पाझरते. त्यांची प्रत्यक्षानुभूती त्यांच्या भावकाव्यात आहे. त्यांच्या काव्यातील गोडवा व भाषेची रसाळता अतुलनीय आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगलेखनाबरोबरच गवळणीही रचल्या आहेत.

संत तुकारामांच्या अभंगाचा अनेकांनी अनेक अंगानी अभ्यास करून त्यांचे सौंदर्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांची गाथा ही अखंड ज्ञानाचा स्रोत म्हणून जनसामान्यांच्या मुखांमध्ये कायम आहे. गाथा बुडवली म्हणणाऱ्यांना जनसामान्यांच्या तोंडून मुखोद्गत अभंग ऐकून गाथा जिवंत असल्याचा प्रत्यक्ष अनुभव झाला. इंद्रायणी नदीच्या काठावर लाखोंचा जनसमुदाय गाथेतील अभंग म्हणू लागले यावेळी तुकाराम महाराजांना जाणीव झाली की आपले अभंग, आपली गाथा बुडालेली नाही. तर ती जनसामान्यांच्या मुखांमध्ये अखंड जिवंत आहे. आपल्या कार्याची ही खरी यथोचित पावती आहे. खऱ्या अर्थाने संत तुकाराम हे या काळातील लोक संत होते. बहुजन समाजाला जागृत करून देवधर्म यासंबंधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी ठरले. देव धर्मातील अनागोंदी त्याचप्रमाणे भोळ्या समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले आहेत लौकिक अर्थाने संत तुकाराम हे आठव्या पिढीतील नायक होते. ज्ञानदेवांनी रचलेल्या भक्ती चळवळीला खऱ्या अर्थाने कळसास नेण्याचे काम हे संत तुकारामांनी केलेले आहे.

संत तुकाराम गाथा म्हणजे हिंदूची गीता आहे. महाराष्ट्राच्या पावन भूमीत गेली चारशे वर्ष मुक्तीची ज्ञानगंगा या गाथेच्या रूपाने वाहत आहे. ज्ञानोबा, तुकाराम म्हणजे महाराष्ट्राची संस्कृतिक विद्यापीठे आहेत. त्यांचे साहित्य म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचा आधारवड आहे. अभंग आणि ओवी हे तळागाळातील समाजात ठाण मांडून बसलेले आहेत. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जीवनाची बाग बहरली. ती ज्ञानोबा-तुकारामांच्या या अभंगाची भाषा सरळ आणि सोपी आहे. मुखामध्ये रुळणाऱ्या, कानामध्ये गुंज घालणारे शब्द आहेत.

महाराष्ट्रातील देवगिरीच्या यादवांचा अस्त झाल्यानंतर महाराष्ट्रात सर्वत्र अंदाधुंदीचा कारभार सुरू झाला. बहुजन समाजाचे आर्थिक, धार्मिक शोषण सुरू झाले. गुलामगिरीचे जू हिंदूंच्या मानेवर लटकत होते. धर्मसत्ता प्रबळ झालेली होती. हिंदू धर्माला कर्मकांडाची जळमटे चिकटलेली होती. परकीय सत्ता बळकट झाली होती. समाजातील सत्त्व आणि स्वाभिमान हरवलेला होता. आदिलशाही, निजामशाही, मुघलशाहीचा विळखा समाजावर घट्ट झाला होता. महाराष्ट्रातील मराठा सरदार वतनांसाठी आपसांमध्ये लढत होते. स्वकीय कोण आणि परकीय कोण याची ओळख उरलेली नव्हती. हिंदू धर्मातील सनातनी लोकांनी चातुर्वर्ण्याची चौकट बळकट केली होती.

त्यामुळे समाजात एकता अस्तित्वात नव्हती. अशा या काळामध्ये एक दिव्य ज्योत उदयाला आली. ती म्हणजे धर्म क्रांतीचा पहिला संत - ज्ञानेश्वर - या काळामध्ये पुढे आले. मराठी भाषेतील आध्यात्मिक क्रांतीची पहिली ज्ञान-ज्योत त्यांनी प्रज्वलित केली. तत्कालीन सनातनी धर्म-मार्तंडांनी ज्ञानेश्वरांचा अतोनात छळ केला. परंतु ज्ञानेश्वरांनी धर्मशास्त्रानुसार त्यांना सडेतोड उत्तर दिली. सात शतकांहून अधिक वर्षे ही ज्ञानज्योत तेवत राहिली यातच तिचे थोरपण आहे.

ज्ञानेश्वरानंतर जनार्दन स्वामी, एकनाथ महाराज, नामदेव आणि त्यानंतर संत तुकाराम यांनी भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली. भागवत धर्माचा कळस म्हणजे संत तुकाराम,त्यांनी बहुजन समाजामध्ये पसरलेली धर्म कर्मकांडाची जळमटे आपल्या कीर्तनातून पुसून टाकली. अभंगवाणी महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये वसली. अभंगवाणीतून सत्यधर्माची शिकवण जगाला संत तुकाराम यांनी दिली. सामाजिक परिवर्तनाची वादळ सर्वत्र पसरले. या वादळाला थोपविण्यासाठी सनातनी धर्ममार्तंडांनी कल्लोळ केला, कटकारस्थाने रचली अशा अनेक संकटातून नव्हे तर अग्निदिव्यातून जात असताना अभंग सतत गर्जत राहिला. जाती-धर्माची उतरंड त्यांनी मोडून काढली. गुलामगिरीची चौकट मोडली. बहुजन समाजामध्ये स्वाभिमान निर्माण केला.

**संत तुकाराम राष्ट्र धर्माची शिकवण देणारे संत:**

संत तुकाराम हे अभंग वाणी कीर्तनाच्या माध्यमातून राष्ट्र धर्माची शिकवण देणारे या काळातील महत्त्वाचे संत ठरले. संत तुकाराम यांनी बहुजन समाजाला जागृत करून देव आणि धर्म यासंबंधी ठोस मते पटवून देण्याचा प्रयत्न केला. देवभोळेपणा धर्मातील चुकीच्या समजुती त्यांनी प्रयत्नपूर्वक दूर सारण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन धर्ममार्तंडांनी त्यांना खूप विरोध केला. नंतर ते विरोधक नमले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही मार्गदर्शनपर ठरलेले आहे. त्यांची वंशावळ पाहिली तर त्यांच्या घराण्यात वारकरी संप्रदायाची परंपरा अखंड दिसते.त्यांच्या घराण्यातील मूळ पुरुष विश्वंभर त्यांची पत्नी रमाबाई हरी आणि मुकुंद अशी त्यांची दोन मुले ही दोन मुले लढाईत मारली गेली. तत्कालीन रूढीप्रमाणे मुकुंदाची पत्नी सती गेली. हरीची पत्नी गरोदर असल्याने सती गेली नाही. हरीला विठोबा नावाचा मुलगा झाला. विठोबाचा दाजी व दाजीचा शंकर, शंकरचा कान्होबा, कान्होबाचा बोल्होबा आणि बोल्होबाचा संत तुकाराम असा हा वंश आहे. संत तुकारामांचे उपनाव मोरे असे होते. वंशपरंपरेने घरी वाण्याच्या दुकानाचा व्यवसाय होता. सावकारी होती. पुण्यापासून पंधरा ते वीस किलोमीटर अंतरावर इंद्रायणी नदीकाठी देहू गाव वसले आहे. संत तुकाराम यांचे मूळ पुरुष विश्वंभर यांनी गावांमध्ये विठोबाचे देऊळ बांधलेले होते. घराण्यात वारकरी संप्रदाय अखंड चालत आलेला होता. असा उल्लेख महिपतीकृत संत तुकाराम चरित्रात सापडतो. संत तुकाराम यांच्या घराण्यात आठ पिढ्या सावकारी होती, ते महाजन होते. घरात श्रीमंती नांदत होती. कोणत्याही गोष्टीची कमी नव्हती घरी नोकर-चाकर यांची मांदियाळी होती, असे असूनसुद्धा संत तुकाराम या गोष्टींपासून विरक्तच राहिले. संसार असूनसुद्धा त्यांनी आयुष्य परमार्थासाठी वाहिले.

**सारांश:**

संत तुकारामांनी महाराष्ट्र समाजातील देव धर्मातील अनागोंदी त्याचप्रमाणे भोळ्या समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा प्रयत्न केला. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1. मराठी वाङ्मयाचा इतिहास - प्रा. रा. ना. घोटाळे, मंगेश प्रकाशन, नागपूर द्वितीय आवृत्ती १९९०
2. ग्रामगीता - संत तुकडोजी महाराज, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,मुंबई, पुनमूद्रण २०००.
3. मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती- वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती २०२४.
4. अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- स्नेहवर्धन प्रकाशन, आवृत्ती २ री
5. तुकारामाची अभंग गाथा- सरकारी प्रकाशन
6. सकाळ संत गाथा

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.5 No.43** **Nov-Dec 2024**

# पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची सहकार क्रांती आणि महाराष्ट्रातील सामाजिक व आर्थिक परिवर्तन

**डॉ. मनोज उत्तमराव पाटील**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर
ता. राहता, जि. अहमदनगर- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नीत
**Corresponding Author: डॉ. मनोज उत्तमराव पाटील**
**DOI-10.5281/zenodo.14546558**

**प्रस्तावना :-**

पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी ग्रामीण भागात होत असलेले शेतकऱ्याचे शोषण थांबविण्यासाठी व शेतकऱ्यांची सावकार व सरकार यांच्या जाचातून मुक्तता करण्यासाठी सहकारी चळवळीच्या माध्यमातून आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरु केला यासाठी भागभांडवल जमा केले. कारखाना सुरु झाल्यावर शेतकऱ्याला नफा मिळू लागला तसेच ऊसाला चांगला भावही मिळू लागला. यामुळे शेतकऱ्याच्या जीवनात परिवर्तन घडून आले. पद्मश्रींनी याचबरोबर विविध शैक्षणिक, आर्थिक संस्था सुरु केल्या. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी कमवा शिका योजना सुरु केली. यामुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार घडवून आला. याचबरोबर वैद्यकिय सुविधा ही उपलब्ध करुन दिल्या. यामुळे ग्रामीण भागात समाज परिवर्तन घडून आले. यामुळे समाजातील इतर नेत्यांना प्रोत्साहन मिळाले कामूळे ग्रामीण भागात सहकारी चळवळीची वाढ होऊन समाज परिवर्तन घडून आले.

**गृहितके :-**

१) ग्रामीण भागातील परिवर्तनाचा आधार सहकार चळवळ आहे.
२) सहकार चळवळीमुळे ग्रामीण विकास घडून आला.
३) पद्मश्री विखे पाटील यांच्या कार्यापासून इतर नेत्यांनी प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने सुरु केले.

**उद्दीष्टये :-**

१) पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे कार्य प्रेरणादायी आहे हे स्पष्ट करणे.
२) सहकार चळवळीमुळे ग्रामीण समाजजीवनात परिवर्तन झाले.

**संशोधन पध्दती :-**

सदर शोधनिबंध मुलगामी व विश्लेषणात्मक संशोधन पध्दत्तीतील असुन संशोधनासाठी दुय्यम साधन ग्रंथांचा वापर केला आहे. दुय्यम साधनग्रंथ हे प्राथमिक साधनांचा वापर करुनच लिहीलेले असतात.

**विश्लेषणः-**

जगामध्ये भांडवलशाही समाजरचनेला पर्याय म्हणून अनेक विचार मांडले गेले. समाजवाद, साम्यवाद आणि सहकारवाद समाजवाद व साम्यवाद यापेक्षा लोकशाही व्यवस्थेत समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी व जनतेचे व्यक्तीस्वातंत्र्य सुरक्षीत ठेवण्यासाठी सहकारवाद अधिक उपयुक्त आहे. सहकारवादाचा उगम हा समाजवादी विचारातुनच उगम झाला आहे. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर बेवीफ, सेंटसायमन, रॉबर्ट ओवेन, चार्लस फेरीयर, लुई ब्लॅक, अशा विचारवंतांनी जे समाजवादी विचार मांडले त्याच समाजवादी विचारातुन सहकारवाद निर्माण झाला. इंग्लडमध्ये लोकशाही व्यवस्थेत दुर्बल समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी रॉबर्ट ओवेन यांनी १८४४ मंध्ये लोकशाही व्यवस्थेत समाजवादाचा प्रयोग केला. या प्रयोगात उत्पादनाच्या साधनांची मालकी हो राष्ट्राची नसून तो दुर्बल अशा समाजाची होती. सर्वांनी एकत्र येऊन उद्योग सुरु केला व त्यातुन त्या दुर्बल वर्गाचा विकास पडून आला. लोकशाही व्यवस्थेतील समाजवादी प्रयोगाला 'सहकार' या नावाने ओळखले गेले. म्हणून रॉबर्ट ओवेन हा सहकाराचा जनक ठरतो. भारतामध्ये इग्रंजानी भारतीय जनतेचे प्रचंड शोषण केले. यामुळे ग्रामोद्योग, कुटीरोद्योग यांचा -हास झाला. तसेच जमीन महसुलाच्या वाढीव आकारणामुळे शेतकरी वर्गाला जमीन कसणे अशक्य झाले. यावेळी अनेक शेतकरी जमिनी सोडून पळून जाऊ लागले. म्हणून सरकारने रॉयल कमिशन नेमले. यावेळी शेतकऱ्यांना तगाईच्या कर्जाची आवश्यकता आहे. त्यासाठी त्यांना कर्ज उपलब्ध करुन द्यावे असा अहवाल दिला. यावेळी मद्रास सरकारने ग्रामीण कर्ज निवारणासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या यासाठी फ्रेडरिक निकोलसला अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला पाठविले. तो भारतात परतल्यानंतर त्याने सहकारी बँका मार्फत शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन द्यावे असा अहवाल दिला.

१९०४ मध्ये सार्वजनिक संस्थाचा कायदा पास झाला आणि जिल्हा सहकारी चळवळीची सुरुवात झाली.

१९८२ मध्ये न्यायमूर्ति रानड्यांनी पुरंदर तालुक्यात सहकारी बँक सुरु केली होती. १८८४ च्या कायद्याने शेतक-याला तगाईचे कर्ज देण्याचे मान्य करण्यात आले. आणि यानंतर शेतकी सहकारी पतपेढ्यांची सुरुवात झाली. शेतकऱ्यांना तगाईचे कर्ज देण्याचे सोय झाली. परंतु शेतकऱ्यांच्या अनेक गरजा आहेत. त्यामुळे प्रत्येक गरजेसाठी एक संस्था स्थापन करणे अशक्य आहे. म्हणून ग्रामीण भागात विविध कार्यकारी सहकारी संस्थाची सुरुवात झाली. यामार्फत शेतकऱ्यांच्या विविध गरजा भागविणे व शेतकऱ्यांना लागणारा माल कमी दराने खरेदी करुन त्यांना पुरविणे तसेच शेतकऱ्याचा माल खरेदी करुन तो शहरातील नोकरदार व मध्यमवर्गीयांना योग्य दराने उपलब्ध करुन देणे या प्रकारचे कार्य विविध कार्यकारी सोसायटी व खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून सुरु झाले. शेतकऱ्यांना दिर्घ मुदतीचे कर्ज दिले जावे त्यांच्या इतर काही मोठ्या गरजाही पूर्ण करता याव्या यासाठी जमीनीच्या तारणावर कर्ज देणाऱ्या बँकांची सुरुवात झाली. जिल्हा सहकारी बँका स्थापन झाल्या. प्रत्येक प्रांतामध्ये राज्य मध्यवती सहकारी बँक सुरु केलो. या बँकेच्या मार्फत जिल्हा सहकारी बैंकांना ९१% दराने कर्ज उपलब्ध करल दिले तर जिल्हा सहकारी बँकांनी ते १० ते १०.२५% ने पतपेढ्या व तालुक्यातील भूविकास बँकाना कर्ज उपलब्ध करुन दिले. यामुळे शेतक-यांना त्यांच्या गरजा भागविण्यासाठी मदत झाली. विमा, रेल्वे, विणकर, मच्छिमार या क्षेत्रात सहकारी चळवळोचो सुरुवात झाली. ग्रामीण भागामध्ये उमरखेडा, लोणी, मुल्हेर, अशा ठिकाणी विविध कार्यकारी सोसायट्या सुरु झाल्या. लोणी येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या स्थापनेमध्ये पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी पुढाकार घेतला. शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी विविध औजारांची गरज होती. म्हणून सोसायटीच्या मार्फत लोखंडी अवजारे तयार करण्याचे काम केले तसेच शेतकऱ्यांना जमीनीची मशागत करता यावी म्हणून भाड्याने ट्रॅक्टर उपलब्ध करुन दिला."

१९०४ पासून सुरु झालेली सहकारी चळवळ ग्रामीण भागापर्यंत जाऊन पोहचली तरीही समाज व्यवस्थेत शेतक-यांचे शोषण सुरु होते. शेतकऱ्यांनी पिकविलेला माल व्यापारी वर्ग कमी किंमती घेत. शेतकरी शेतमाल पिकवितो परंतु त्याची किमत ठरविण्याचा अधिकार त्याला नव्हता. यामुळे शेतकरी वर्ग कर्जबाजारी होवु लागला होता. अहमदनगर जिल्ह्यातोल अकोले तालुक्यात ब्रिटीशांनी धरण बांधले. १९३२ मध्ये धरणात पाणी अडविले जावू लागले ते पाणी शेतीला उपलब्ध करुन दिले जावू लागले यामुळे शेतकरी वर्ग उसाच्या शेतीकडे वळला. प्रवरा नदीच्या काठी असलेल्या खेड्यामध्ये उसाचे पिक घेतले जाव लागले. या काळात अहमदनगर जिल्ह्यात बेलापूर चांगदेवनगर, हरेगाव, साकरवाडी असे ६ साखर कारखाने निर्माण झाले होते ते सर्व खाजगी मालकीचे होते. शेतक-यांच्या उसाला फारसा भाव न मिळाल्यामुळे शेतकरी वर्ग गूऱ्हाळ चालवून गुळ उत्पादन करु लागला होता. परंतु व्यापारी गुळाला योग्य भाव देत नव्हते. लोणीचा एक शेतकरी गूळ विकण्यासाठी बेलापूरला गेला त्यावेळी व्यापाऱ्यांनी त्याचा गुळ अतिशय कमी किमतीला मागीतला मिळालेल्या रकमेतून तो शेतकरी सावकाराचे कर्जही फेडू शकत नव्हता या सर्व घटनांचा परिणाम पद्मश्री विखे पाटलांवर झाला. झरेकाठी येयील एक घटना एक शेतकरी कर्ज फेड न करु शकल्याने सावकाराने त्यास मारहाण केली व त्याची शेती व गुरेढोरे जप्त करण्याची धमकी दिली. या घटनेचाही पद्मश्री विखे पाटलांवर परिणाम झाला. शेतकरी वर्गाची या परिस्थितीतुन सुटका झाली पाहिजे असे त्यांना वाटत होते.

अहमदनगर जिल्ह्यामध्ये यापुर्वी खाजगी साखर कारखाने सुरु झाले होते. परंतु त्यातून शेतकऱ्याच्या ऊसाला चांगला भाव मिळत नव्हता म्हणून शेतक-याच्या मालकीचा सहकारी साखर कारखाना सुरु करण्याची कल्पना त्यांच्या मनात घोळू लागली. यावेळी त्यांनी बेलापूरला बोडींग मध्ये व गावोगावी शेतकऱ्यांच्या बैठका घेवून त्यांना हा विचार बोलून दाखविला. काही शेतकऱ्यांनी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली तर काहींनी खिल्ली उडविली परंतु विखे पाटील आपल्या कल्पनेशी ठाम होते. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांकडून भाग मांडवाल जमा करायला सुरु केले. अनेक शेतकऱ्यांनी त्यांना सहकार्य करत शेअर्स जमा केले. १९४८ मध्ये कारखान्याची परवानगी मिळविली. याकामी धनंजयराव गाडगीळ व वैकुंठभाई मेहता यांची मदत झाली. १९५१ मध्ये कारखाना सुरु झाला. कारखाना सुरु झाल्यानंतर शेतकऱ्याला नफा मिळू लागला. योग्य दराने ऊसाला भावही मिळू लागला. यामुळे ग्रामीण समाजाच्या आर्थिक जीवनात परिवर्तन झाले. प्रवरा कालव्यामुळे प्रवरा नदी काठची शेती बागायती झाली, लोणीत बाजारही भरविला जाऊ लागला, व्यवसाय व दुकाने वाढीस लागले.

शेतकऱ्याच्या जिवनात आर्थिक बदल घडून आला तरी अजून समाज अंधश्रध्दाच्या जोखडात अडकलेला होता. जो पर्यंत आधुनिक शिक्षण मिळत नाही तो पर्यंत समाज परिवर्तन होणार नाही. म्हणून लोणीला प्रवरा इंग्लिश मिडीयम स्कूल सुरु केले. इंग्रजीतून शिक्षण देण्यासाठी केरळ मधून शिक्षकांना आणले त्यांच्या राहाण्याची सोय केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील बहुजन वर्गाला शिक्षण मिळावे म्हणून रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. लोणीला प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांची भेट घेतली. रयत शिक्षण संस्थेची शाळा लोणी येथे सुरु झाली. उच्च शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून १९७१ ला पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय स्थापन केले यानंतर जनतेचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे म्हणून लोणीला प्रवरा मेडीकल ट्रस्ट स्थापन केले व या माध्यमातून लोकांच्या जीवनात परिवर्तन घडविले. पद्मश्री विखे पाटील यांच्या नंतर पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी हे कार्य पुढे चालविले व शैक्षणक संस्थेच्या विविध शाखा निर्माण केल्या. लोणीच्या आजुबाजूच्या खेड्यामध्येही प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या

अनेक शाखा सुरु केल्या. आजही विखे कुटूंबियांचे कार्य निरंतर सुरु आहे."

लोणी गावातील समाज परिवर्तन हे महाराष्ट्राला मार्गदर्शक ठरले. भारताचे पंतप्रधान पंडीत जवाहारलाल नेहरु यांनी लोणीला भेट दिली आणी या कार्याची मुक्त कंठाने स्तुती केली. पद्मश्रींनी आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरु केला. यामुळे याभागात ग्रामीण जिवनात परिवर्तन घडले हे पाहून समाजातील अनेक लोकांना प्रेरणा मिळाली यानंतर महाराष्ट्रात क्रमाक्रमाने कोपरगाव, कोळपेवाडी, गणेशनगर, संगमनेर, श्रीगोंदा, राहुरी, इंदापुर, बारामती अशा विविध ठिकाणी कारखाने सुरु झाले. याचबरोबर विविध शैक्षणिक संख्या उदयास आल्या. यामुळे ग्रामीण समाज जीवनात परिवर्तन घडून आले. ही प्रेरणा मात्र पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या कार्यापासून मिळाली.

ग्रामीण समाज जीवनात परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर ग्रामीण भागामध्ये शेतीवर आधारीत उद्योगधंदे सुरु व्हावेत असे विचार आंबेडकरांनी मांडले होते. ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारीत अशी आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकांना ग्रामीण भागातच रोजगार मिळाला पाहिजे. तसेच कुटुंबातील सर्वच लोकांचा भार शेतीवर पडू नये म्हणून शेती उत्पादनावर आधारीत अशा उद्योगधंद्याची ग्रामीण भागात वाढ होणे आवश्यक आहे. वरील सर्व विवेचानावरुन असे दिसुन येते की. सहकाराचा उदय समाजवादातून झाला. सहकरी चळवळ साखर उद्योगधंद्यामध्ये आली यामुळे मोठे समाजपरिवर्तन घडून आले. साखर उद्योगावरोवरच पशुपालन करणा-या शेतक्-यांच्या दुधाला योग्य भाव मिळावा म्हणून सहकारी दूध उत्पादक संघ स्थापन झाले. शैक्षणिक व आरोग्य संस्थाची उभारणी झालो. यामुळे ग्रामीण समाजाची आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकिय प्रगती झाली. बेरोजगारीचे निवारण झाले. या समाजपरिवर्तनाची प्रेरणा पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील होते.

सद्यस्थिती पाहाता असे दिसुन येते की, ग्रामीण भागातुन सहकारी उद्योग काढून टाकले तर ग्रामीण भागात कोणताही विकास होणार नाही

**निष्कर्ष :-**

1. ग्रामीण समाज परिवर्तनाची प्रेरणा पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्यापासून मिळाली.
2. सहकारवाद हा स्वतः चा विकास स्वतः घडवून आणण्याचा एक प्रभावी मार्ग आहे.
3. ग्रामीण भागाचा विकास सहकारी चळवळीमुळे घडून आला.

**संदर्भसूची:-**


1. गपुर शेख, आधुनिक जगाचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, पृष्ठ क्र. ११९ ते १२३
2. वसंत जाधव, महाराष्ट्राच्या परिवर्तनाचा इतिहास, डायमंड पबिनकेशन, पुणे पान क्र. २४९
3. कित्ता ------------------- पृष्ठ 238-243
4. कित्ता ------------------- पृष्ठ 240
5. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर प्रवरा खोरे स्थापत्य कला दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन पृष्ठ क्र. 21 -23
6. राजेंद्र वडमारे, महामेरु, मिरा बुक्स अॅण्ड पब्लिकेशन, पृष्ठ क्र.६३ ते २७६
7. कित्ता ------------------- पृष्ठ 276 ते 278
8. त्रिलोचक हजारे, आंबेडकरांचे आर्थिक विचार, सुगावा प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र.५ ते २

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भातील नैतिकता: संत तत्त्वज्ञानाचा आधार

**प्रा.डॉ.अमन बगाडे**
तत्वज्ञान विभाग प्रमुख,न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर (स्वायत्त)
**Corresponding Author: प्रा.डॉ.अमन बगाडे**
**Email:** Bagade.aman21@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.14546576**

**परिचय**

नीतिशास्त्र ही पाश्चात्य तत्त्वज्ञानातील तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे. भारतीय दृष्टीकोनातून नीतिशास्त्र हे तत्त्वज्ञानाशी समरस आहे. तत्त्वज्ञान ही केवळ बौद्धिक चौकशी नसून जीवनाचा मार्ग आहे. भारतीय विचारवंतांचे ध्येय अंतिम वास्तवाची प्राप्ती हे आहे. भारतीय विचारवंत जीवनाचा सिंथेटिक दृष्टिकोन घेतात. त्यांच्यासाठी तात्विक समस्यांमध्ये कोणतेही वॉटरटाइट कंपार्टमेंट नाहीत. या विश्वात प्रचलित असलेल्या नैतिक व्यवस्थेवर भारतीयांचा दृढ विश्वास आहे. सार्वभौमिक नैतिक व्यवस्थेसाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे. या विश्वात प्रत्येक व्यक्तीची भूमिका आहे. प्रत्येक भूमिकेत विशिष्ट कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या असतात. भारतीय दृष्टिकोनातून, व्यक्तीचे कर्तव्य केवळ मानवी समाजापुरते मर्यादित नाही. ते संपूर्ण संवेदनात्मक निर्मितीपर्यंत विस्तारलेले आहे. "तुमच्या शेजाऱ्यावर स्वतःसारखे प्रेम करा आणि प्रत्येक जीव हा तुमचा शेजारी आहे" असे भारतीय तत्वज्ञान मानते. भारतातील नैतिक तत्त्वज्ञान खऱ्या अर्थाने चांगले आणि शिस्तबद्ध जीवन जगण्याची कला सांगत आहे. भारतीय दृष्टीकोनातून नीतिशास्त्र हे संत तत्त्वज्ञानाशी समरस आहे.

जगताचे आद्यतत्व किंवा स्वरूप चिद्रूप आहे अथवा जड नाही असे मानणारा तत्त्वज्ञान सिद्धांत म्हणजे चिद्वाद. अर्थात या व्याख्येच्या मर्यादा पण लक्षात घ्यावयास पाहिजेत. चिद्वाद हा सत्ताशास्त्रीय जडवादाच्या आणि ज्ञानशास्त्रीय ज्ञाननिरपेक्ष वास्तववादाच्या विरोधी असा सिद्धांत आहे. आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञानाविषयी सत्तावाद आणि वस्तुचैतन्यवाद (विषयसापेक्ष चिद्वाद) या दोन स्वरूपात आढळतो. सब्जेक्टिव्ह आणि ऑब्जेक्टिव्ह हे इंग्रजी शब्द या संदर्भात रूढ असले तरी त्यामुळे बुद्धि विपर्यय होऊ शकतो एवढे मात्र लक्षात ठेवले पाहिजे. व्यवहारिक परिभाषेत आयडियालिझम हा ध्येयवाद या अर्थीही रूढ आहे. हा अर्थ व्यक्ति-समाज संदर्भात महत्वाचा असला तरी तो लक्षित अर्थ होय हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. तत्त्वज्ञानाच्या इतिहासात मात्र ईश्वरवाद आणि चिद्वाद यांचा एकत्र समावेश केला गेला नाही आणि याचे कारण उघड आहे. ईश्वरवादी जड जगताला असत्य मानतील असे नाही. ईश्वराने ते निर्माण केले आहे असे ते मानतील. या दृष्टिने पाहता आपणास विरोध विकासवादी जडवादी म्हणविणारे मार्क्सवादी पण खरोखर जडवादी आहेत का? असा प्रश्न उपस्थित करता येईल.

आज तत्त्वाज्ञानात वास्तववाद आणि चिद्वाद किंवा जडवाद आणि चैतन्यवाद असे वर्गीकरण करणे कठीण आहे. चिद्वादाचे अनेक प्रकारे विवेचन केले असले तरी प्लेटोच्या मनात एक प्रकारचा चिद्वाद नसेलच असे नाही. सामान्य आणि सामान्य सत्तावादासंबंधी विचार प्लेटोच्या ग्रंथात अनेक ठिकाणी आढळतो. पाश्चात्य तत्त्वज्ञानात चिद्वाद या विचार प्रणालीशी कितीतरी विचारवंतांची नावे निगडीत होऊ शकतात. तथापि, ज्या विचारवंतानी चिद्वादाच्या मूलभूत मांडणीत सहभाग दर्शविला आहे, अशा तत्त्वचिंतकाची नोंद घेण महत्वाचे मानले आहे.

**संदर्भ आणि टीपा :**

1) कामत श्री. पा. (प्र. संपा.), मराठी विश्वचरित्र कोश, खंड-२, पृ. ९५२-९५३
2) जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र.संपा.), मराठी विश्वकोश, खंड-५, पृ. ... महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७६. (रेगे मे. पुं.)
3) रेगे मे. पुं. (प्र. संपा.), मराठी विश्वकोश, खंड-१५, पृ. ४१८-४१९, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७८.
4) कामत श्री. पा. (प्र. संपा.), मराठी विश्वकोश, खंड-५, पृ. ९७९-९८०
5) रेगे मे. पुं. (प्र. संपा.), मराठी विश्वकोश, खंड-१५, पृ. ४१८-४१९, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९७८. (रेगे मे. पुं.)

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# भारतीय तत्त्वज्ञान क्षेत्रात गुरुदेव रामचंद्र दत्तात्रय रानडे यांचे योगदान

**अमोल मु. देवस्थळी**
तत्वज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ मुंबई
**Corresponding Author: अमोल मु. देवस्थळी**
**DOI-10.5281/zenodo.14546641**

**विषयाचा प्रारंभ:**

माझ्या पत्नीने (सौ. गौरीने) प. पू. विष्णूमहाराज पारनेरकर यांची उपासना इ.स. २००७ मध्ये आणि मी इ.स. २००८ मध्ये घेतली. आणि तेव्हापासून त्यांनी दिलेली उपासना श्रद्धेने, निष्ठेने, नेटाने आणि सातत्याने काही अपवादात्मक दिवस वगळता आम्ही उभयता करीत आलेलो आहोत. या उपासनेमुळे आपण आपले विचार अधिक स्पष्टपणे आणि अधिक आत्मविश्वासपूर्वक दुसऱ्यांच्या समोर मांडू शकतो असा माझा स्वतःचा अनुभव आहे आणि त्यामुळेच प. पू. विष्णु महाराज पारनेरकर यांना साष्टांग दंडवत आणि समस्त पारनेरकर परिवार यांच्याबद्दल मी सुरुवातीलाच एक विशेष कृतज्ञताभाव व्यक्त करतो.

**विषयाची ओळख किंवा परिचय:**

प. पू. विष्णू महाराज यांच्या वडिलांचे नाव **रामचंद्र महाराज** असे आहे. ते स्वतः पूर्णवाद तत्वज्ञानाचे प्रणेते आहेत आणि आज मी ज्या तत्त्ववेत्याबद्दल शोधनिबंध लिहीत आहे त्यांचे नाव **रामचंद्र** असेच आहे हा एक योगायोगच म्हणायला हवा. प्राध्यापक रा. द. रानडे हे माझे आजोबा कै. विनायक नारायण देवस्थळी यांचे समकालीन होत. तसेच माझ्या आजोबांवर ज्या मंडळींचा विशेष प्रभाव होता त्यामधील ते एक होत. असे म्हणायचे कारण की यांच्या पुस्तक संग्रहामध्ये प्राध्यापक रा. द. रानडे यांची बरीच पुस्तके आहेत उदाहरणार्थ (१) चरित्र आणि तत्वज्ञान (२) परमार्थ सोपान (3) The Bhagwad Gita as a Philosophy of God's Realization (4) Path Way to God (5) History of Indian Philosophy इत्यादी आणि आणि ही सर्व पुस्तके त्यांनी वाचलेली आहेत त्यामुळेच मी प्राध्यापक रानडे यांच्या विषयी लिहिण्याचा निर्णय घेतला.

गुरुदेव रामचंद्र दत्तात्रय रानडे यांचे नाव ऐकताच आपल्या डोळ्यासमोर एक मोठी तत्त्वज्ञानी व्यक्ती उभी राहते. आणि म्हणून **"तत्वज्ञान क्षेत्रात गुरुदेव रामचंद्र दत्तात्रय रानडे यांचे योगदान"** या मध्यवर्ती संकल्पनेवर मी शोधनिबंध लिहीत आहे. त्यांचे कार्य मोठे अलौकिक, विलक्षण किंवा असामान्य आहे. असे म्हणायचे कारण म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाची विशालता आणि सखोलता ही फार मोठी आणि व्यापक स्वरूपाची असली तरी अशा या व्यापक विषयाला अभ्यासक्रमामध्ये साचेबद्ध करण्याच्या दृष्टीने सर्वात प्रथम मुहूर्तमेढ ही त्यांनी केली किंवा त्यांनी पाया घातला. तसेच त्यांचा काळ हा जुलमी ब्रिटिश राजवटीचा. अशा वेळेस पारतंत्र्याच्या खाईत बुडालेल्या राष्ट्राची छबी ही एक गरीब, अगतिक, असाहाय्य अशी निर्माण झाली होती बदलण्याच्या दृष्टीने भारतीयांची गौरवशाली प्रतिभा संपन्न अशी छबी ब्रिटिशांच्या समोर उभी करण्यासाठी सुरुवातीच्या काळातच संपूर्ण भगवद्गीतेचे इंग्लिश मध्ये भाषांतर केले. अशा या व्यक्तीविषयी चार ओळी लिहिण्याचा माझ्या अल्पमतीनुसार केलेला एक प्रामाणिक प्रयत्न.

या शोधनिबंधाचे तीन प्रमुख भाग आहेत पहिल्या भागात भारतीय तत्त्वज्ञानाचे आजचे महत्व मांडलेले आहे आणि दुसऱ्या भागात आपण गुरुदेव रा. द. रानडे यांचे संक्षिप्त चरित्र पाहू तर त्यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल थोडी चर्चा आपण तिसऱ्या भागात करू.

**भारतीय तत्त्वज्ञानाचे आजचे महत्व:**

उपरोक्त शीर्षकाखालीच संतसाहित्य सर्वेक्षण तसेच तत्त्वज्ञान आणि संतांचे विचार या दोन्ही शीर्षकांची

मोठ्या समर्पकरित्या गुंफण केलेली आहे असे आपल्याला आढळून येईल. भारतीय तत्वज्ञान आणि भगवद्गीता यांचा एक अन्योन्य संबंध आहे. पण त्याही आधीच्या कालावधीबद्दल बोलायचे झाले तर तत्त्वज्ञानाचा उगम हा वेदांपासून झालेला आहे हे सर्वश्रुत आहे. उपनिषदे म्हणजे वेदांचे सार आणि भगवद्गीता ही उपनिषदांच्या आधारे लिहिली आहे असेही आपण सर्वजण जाणतो; आणि कदाचित म्हणूनच The Bhagwad Gita as a Philosophy of God's Realization किंवा आत्मसाक्षात्कारासाठी भगवद्गीता या पुस्तकातील पहिल्या भागातील पहिले प्रकरणाचे शीर्षक प्राध्यापक रानडे यांनी भगवद्गीतेचा उपनिषदांशी संबंध असे ठेवले असावे. आणि म्हणूनच भारतीय तत्वज्ञान आणि भगवद्गीता यांचा एक अन्योन्य संबंध आहे असे आपण म्हणतो. भगवद्गीता ही कालातीत आहे. ही भगवद्गीता ज्याकाळी ती लिहिली गेली तेव्हा तर ती उपयुक्त होतीच पण त्याचबरोबर संत नामदेव महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या काळात सुद्धा तिचे महत्त्व कमी झाले नाही. तुकाराम महाराजांची गाथा किंवा समर्थ रामदास स्वामी यांचा दासबोध याच ग्रंथावर आधारित आहे. त्यामुळे जरूर जर कसली असलीच तर काळाबरोबर तिचे पुनर्बोधन किंवा पुनर्मांडणी करणे आवश्यक आहे ह्याची. आणि याच विचारांशी सुसंगत असे भगवद्गीतेने कालानुरूप अनेक जन्म घेतले असे आपण पाहतो.

महामुनी व्यासांनी भगवद्गीता ही एकदाच लिहिली. पण ही भगवद्गीता संस्कृत मध्ये असल्यामुळे आणि अनेक विविध कारणांमुळे आपला बहुजन समाज हा संस्कृत पासून वंचित राहिल्यामुळे भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचू शकले नाही. आणि केवळ याच कारणासाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी सातशे श्लोकांच्या भगवद्गीतेचे तत्वज्ञान बहुजन समाजाच्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या आणि बहुजन समाज दैनंदिन जीवनात अनुभवत असलेल्या साध्या सोप्या उदाहरणांचे दाखले देत नऊ हजार तेहेतीस ओव्यांमधून मांडले. ज्ञानदेवांच्या स्वयं प्रज्ञाने आणि विविध अंगी चिंतनाने ज्ञानेश्वरी नटलेली आहे.

आपले रोजचे धकाधकीचे आणि संपूर्णपणे व्यग्रतेचे जीवन आणि त्यापुढे नऊ हजार ओव्या यांचे प्रमाण नेहमीच व्यस्त राहील असे आहे. त्यामुळे अशा कार्याची सुरुवात होणे अवघड होऊन बसले आहे. पुन्हा त्यातच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची मराठी ही तेराव्या शतकातली पुन्हा समजायला कठीण आणि म्हणूनच श्री. य. गो. जोशी यांनी गद्य स्वरूपात असलेली सुबोध ज्ञानेश्वरीची रचना केली. आपली अशिक्षित माता हा केंद्रबिंदू मानून श्री विनोबा भावे यांनी गीताईची रचना केली. तात्पर्य भगवद्गीतेने सुद्धा कालानुरूप अनेक जन्म घेतले.

महाराष्ट्रातील आपली संत परंपरा आपल्याला काय सांगते? संत नामदेव महाराज, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली, एकनाथ महाराज, जगद्गुरु तुकाराम महाराज किंवा समर्थ रामदास स्वामी या सर्व व्यक्ती म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून आपल्या धर्मावर चालून आलेल्या अंधश्रद्धांचे निर्मूलन करण्यासाठी, समाजात वाढत चालणाऱ्या कर्मठपणा किंवा अवडंबर माजवणाऱ्या घातक शक्तींपासून समाजाला वाचवून; सारी जाती बंधने निखळून टाकून एकसंध समाजाची निर्मिती करून धर्माची पुनर्स्थापना करणारी चालती बोलती भगवद्गीताच आहे.

यानंतर ब्रिटिशांचे साम्राज्य आले ब्रिटिशांनी भारतामध्ये अधिकाधिक काळ सत्ता राबवण्याच्या दृष्टीने Divide & Rule हे धोरण अवलंबिले. स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक वीरांनी हिरीरीने भाग घेतला आणि या सर्वांच्या प्रयत्नांची परिमिती भारताला स्वातंत्र्य मिळण्यात झाली. परंतु दुर्दैवाने त्यानंतर सुद्धा आपल्या कडून राजकीय पातळीवर मनामध्ये संतांची शिकवण रुजवण्याऐवजी ब्रिटिशांचे धोरण कळत नकळत राबवले गेले. आणि म्हणूनच आजच्या विघटित समाजाला योग्य दिशा दाखवून पुन्हा एकसंध समाजाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने भगवद्गीते मधील मूल्ये फार उपयोगी पडू शकतात किंवा भगवद्गीता फार मोठी कामगिरी करू शकते असा मला विश्वास वाटतो.

जणू काही याच ऐतिहासिक गोष्टीची पुनरावृत्ती म्हणजे आजच्या काळात आजच्या भारतीय पंतप्रधानांनी त्यांच्या अलीकडच्या अमेरिकेच्या भेटीमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांना भगवद्गीतेची ही एक प्रत भेट म्हणून दिली. आणि म्हणूनच हा आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय तत्वज्ञानाचा संक्रमणाचा काळ असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**संक्षिप्त चरित्र:**

प्रा. रा. द. रानडे हे आधुनिक काळातील एक विद्वान आणि सुसंस्कृत **संत** होते. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील जमखंडी या गावांमध्ये ०६ जून १८८६ रोजी झाला. शिक्षणाचे पहिले धडे यांनी आपली थोरली बहीण भागू आक्का यांच्याकडून घेतले आणि त्यामुळेच त्यांना थेट मराठी दुसऱ्या इयत्तेत प्रवेश मिळाला. त्यांच्या हुशारीमुळे त्यांना श्रीमंत बाळासाहेब कुरुंदवाडकर यांच्याकडून महिना पाच रुपये याप्रमाणे पहिली तीन वर्ष शिष्यवृत्ती मिळाली. इ. स. १८९५ मध्ये त्यांनी प्राथमिक शिक्षण संपवून माध्यमिक वर्गात प्रवेश केला. अपवादात्मक असे सुरुवातीचे वर्ष सोडल्यास त्यानंतर त्यांना कधीही अपयश पदरी आलेच नाही. १९०२ मध्ये मॅट्रिक च्या परीक्षेत संस्कृत विषयासाठी ठेवलेली जगन्नाथ शंकर शेठ ही शिष्यवृत्ती त्यांनी मिळवली. महिना २५ रुपये याप्रमाणे ही शिष्यवृत्ती त्यांना सतत चार वर्षे मिळत राहिली की जेणेकरून त्यांचे पुढील शिक्षण अतिशय सुकर झाले आणि परमार्थिक गुरुवरील श्रद्धा अधिक दृढ झाली. शाळेत असतानाच १९०१ मध्ये त्यांनी श्री भाऊसाहेब उमदीकर यांच्याकडून परमार्थाची दीक्षा घेतली होती आणि त्याप्रमाणे ते थोडेफार नामस्मरणही करीत असत. पुढे १९०३ साली त्यांनी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तेव्हा ते कॉलेज एखाद्या गुरुकुलाप्रमाणे होते गुरुकुलात गुरु शिष्यांनी एकमेकांच्या सहवासात राहून ज्ञानोपासना करावी अशा वातावरणात त्यांचे शिक्षण झाले. संस्कृत आणि तत्त्वज्ञान हे त्यांचे दोन आवडीचे विषय असले तरी गणित विषय घेऊन ते बी. ए. झाले. एम. ए. करीत असताना १९०९ साली त्यांची प्रकृती अचानक ढासळली. युरोपियन डॉक्टर्सनी या आजाराचे निदान मेंदूचा क्षय असे केले. आणि त्यातून हे जगत नाहीत असे स्पष्टपणे सांगितले परंतु त्यांनी सुप्रसिद्ध वैद्य श्री बाळशास्त्री लागवणकर यांना दाखवल्यानंतर त्यांनी मात्र या रोगातून ते बरे होतील असे आत्मविश्वासपूर्वक सांगितले. सर्व लौकिक आकांक्षा भंग पावलेल्या आणि भविष्यकाळात सर्वत्र अंधार पसरलेला अशी रामभाऊंची तेव्हाची मनस्थिती होती. प्रकृतीमान तर अशा अवस्थेत येऊन पोहोचले होते की साधे वाचन करणे ही अशक्य व्हावे मग साधनेची गोष्ट तर दूरच राहो पण अशाही स्थितीत त्यांची निष्ठा कायम होती इतकेच नव्हे तर या प्रसंगाने ती आणखीनच वाढली. होईल तितके नामस्मरण करून अंतर बाह्य जग आणि मन यात रात्रंदिवस चालू असणाऱ्या या युद्धाचे तोंड देऊ लागले. अशा कठीण प्रसंगात त्यांच्या आईने त्यांना मायेची पाखर घातलीच पण त्याचबरोबर परमार्थाची वाटचाल करण्यासाठी प्रेरणा दिली. देव संसारात दुःख देतो आणि त्या दुःखाच्या पाठोपाठ साधकाचा परमार्थही वाढवतो असे ते म्हणत असत.

अशा एका वेळेस त्याला एक दृष्टांत झाला आणि त्यात संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या ग्रंथाचा अभ्यास करण्याची सूचना त्यांना मिळाली त्यातील अभिप्राय ओळखून ते संत वाङ्मयाच्या ताबडतोब अभ्यासास लागले.

इ. स. १९१५ मध्ये त्यांनी बंगलोर येथे संस्कृत अकॅडमी या संस्थेच्या स्थापनेच्या प्रसंगी बडोद्याचे अधिपती श्री सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली **उपनिषदातील तत्त्वज्ञान** या विषयावर काही व्याख्याने दिली आणि ती ग्रंथरूपाने प्रसिद्ध व्हावी अशी इच्छा खुद्द श्री सयाजीराव यांनी व्यक्त केली होती.

पुढे १९२४ मध्ये रामभाऊंनी **अध्यात्म विद्यापीठ** या संस्थेची स्थापना केली. ही संस्था स्थापन करण्याचा त्यांचा मुख्य उद्देश असा होता की ही संस्था, ते स्वतः आणि इतर मंडळी यांच्या पारमार्थिक प्रगतीला सहाय्यभूत ठरावी. या संस्थेद्वारा सर्व धर्म मतांच्या आणि तत्वप्रणालींच्या अभ्यासाची सोय करावी आणि शक्यतर नाना मते, नाना पंथ यांचा ईशप्राप्तीच्या एका तत्वज्ञानात समन्वय घडून आणावा. ईश्वरविषयक सर्व प्रश्नांचे तात्विक दृष्ट्या संशोधन करण्याची ज्यांना आस्था आहे अशा सर्वांना एकत्र आणणे हाही दुसरा उद्देश त्यांचा होता. भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन हे या संस्थेच्या सल्लागार मंडळावर असलेल्या अनेक मान्यवरांपैकी एक होते.

या संस्थेकडे असलेल्या अनेक योजनांपैकी एक योजना म्हणजे **भारतीय तत्त्वज्ञानाचा एक विस्तृत ज्ञानकोशसदृश इतिहास** प्रसिद्ध करणे. संकल्पित खंडांच्या नियोजित लेखकांपैकी फक्त दोघांचे दोन खंडांचे लेखनच पूर्ण झाले एक खंड डॉक्टर नागराज शर्मा यांचा होता आणि दुसरा खंड स्वतः प्राध्यापक रानडे यांचा होता. त्यांनी आपले ईश्वर विषयक अध्ययन संशोधन आणि लेखन अगदी जीविताच्या शेवटच्या क्षणापर्यंत चालू ठेवले.

प्राध्यापक रानडे यांनी पुढल्या वर्षी म्हणजे इसवी सन १९२५ निंबाळला मध्ये जागा घेऊन तेथे घर बांधण्याचा प्रकल्प पूर्ण केला १९२७ च्या अखेरीस पर्यंत त्यांचा मुक्काम निंबाळला होता या कालावधीत त्यांच्याकडून एक महत्त्वपूर्ण कार्य संपन्न झाले आणि ते म्हणजे **उपनिषदांवरील ग्रंथाची पूर्णता** हे होय. त्यांचा हा ग्रंथ प्रकाशित होताच देशोदेशीच्या विद्वानांकडून त्यांच्यावर अभिनंदनचा आणि स्तुतीचा अक्षरशः वर्षाव झाला आणि अल्पावधीतच ते जागतिक कीर्तीचे तत्वज्ञ होऊन बसले. त्यावेळचे अलाहाबाद विद्यापीठाचे कुलगुरू आणि प्रसिद्ध संस्कृततज्ञ गंगानाथ झा यांना हा ग्रंथ इतका आवडला की आपल्या विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून प्रा. रानडे यांची नेमणूक केली.

याचा परिणाम असा झाला की तत्त्वज्ञान विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. ते परतत्वशास्त्र, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, धर्मशास्त्र असे तत्त्वज्ञानाचे निरनिराळे भाग आलटून पालटून शिकवित असत. १९४६ साली ते सेवानिवृत्त होत असताना एक सन्माननीय प्राध्यापक म्हणून विद्यापीठाने त्यांच्या विषयीचा आपला आदरभाव व्यक्त केला. अलाहाबाद विद्यापीठाने १९४७ मध्ये त्यांना डी. लिट. ही पदवी अत्यंत सन्मानपूर्वक देऊन रामभाऊंच्या विद्वत्तेचा यथार्थ गौरव केला आणि आपली गुणग्राहकता सिद्ध केली. बहुतांश लोकांनी यावेळेस अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की या पदवीने खरोखरीच कोणी कोणाचा गौरव केला? या म्हणण्याचा अर्थ असा की ही पदवी रानडे यांना मिळाली आणि या कारणामुळे या पदवीचाच गौरव झाला.

१९२४ मध्ये रामभाऊंनी स्थापन केलेल्या **अध्यात्म विद्यापीठ** या संस्थेचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण करण्यासाठी २६ ऑक्टोबर १९४७ रोजी **अध्यात्मविद्यामंदिर** या नावाची नवी संस्था स्थापन केली. या संस्थेला राजेसाहेब सांगली यांचा उदार आश्रय मिळाल्यामुळे संशोधन प्रकाशन व्याख्याने परिषदा इत्यादी साधनांच्या द्वारा अद्यात्मक विद्येच्या प्रसाराचे कार्य अधिक चांगल्या रीतीने होऊ लागले. या संस्थेचे मुख्य केंद्र निंबाळ येथे होते आणि सांगली आणि अलाहाबाद या दोन ठिकाणी त्याच्या शाखा होत्या. निंबाळ आणि सांगली येथे मराठीतून तर अलाहाबाद येथे हिंदीतून ते व्याख्याने देऊ लागले. उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील सुशिक्षित मंडळींमध्ये अध्यात्म विषयक एक नवे औत्सुक्य निर्माण झाले. प्राध्यापक रानडे यांनी दिलेल्या अनेक व्याख्यानांपैकी दोन व्याख्याने प्रत्यक्ष राष्ट्रपती भवनामध्ये डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यानंतर लवकरच हिंदी भाषेतील संतांवर परमार्थ सोपान किंवा Path Way to God हे त्यांचे दोन ग्रंथ अध्यात्मविद्यामंदिराने प्रसिद्ध केले या प्रकाशन सोहळयामध्ये भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद स्वतः जातीने उपस्थित होते. नंतर आपण यावर बोलूच.

तीन जुलै १९५६ रोजी गुरुदेवांना ७० वर्षे पूर्ण होत असलेल्या प्रसंगाचे औचित्य साधून विशेष प्रयत्नपूर्वक त्यांच्याकडून पूर्व परवानगी घेत त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या जन्मगावी म्हणजेच जमखंडी येथे त्यांचा अमृत महोत्सव सोहळा साजरा केला. आणि पुढच्याच वर्षी म्हणजे इ. स. 1957 मध्ये 6 जून या दिवशी निंबाळ येथे या व्यक्तीने आपला देह ठेवला. गुरु आणि देव हे एक झाले. ज्योती मध्ये ज्योत गुप्त झाली. ज्याप्रमाणे टिळक हे **लोकमान्य** या नावाने अमर झाले त्याचप्रमाणे प्राध्यापक रानडे हे **गुरुदेव** या नावाने अमर झाले. ही पदवी नसून तो अधिकारच होता आणि हा अधिकार त्यांनी स्वतःच्या अखंड तपश्चर्येने प्राप्त करून घेतला होता.

**गुरुदेव रा. द. रानडे यांचे तत्त्वज्ञान:**

**या दुसऱ्या भागात आपण त्यांच्या खालील ग्रंथांचे सिंहावलोकन करूया.**

- The Bhagwad Gita as a Philosophy of God's Realization
- परमार्थ सोपान किंवा Path Way to God in English
- भारतीय तत्त्वज्ञानाचा एक विस्तृत ज्ञानकोशसदृश इतिहास अर्थातच
- The History of Indian Philosophy – Published in eight volumes

**The Bhagwad Gita as a Philosophy of God's Realization:**

या शोधनिबंधाच्या दुसऱ्या भागात आपण उपरोक्त ग्रंथाच्या पहिल्या भागातील पहिल्या प्रकरणाचे नाव भगवद्गीता आणि उपनिषदे यांचा संबंध असे आहे हे आधीच पाहिले आहे. या व्यतिरिक्त पहिल्या भागात सांख्ययोग आणि "भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्रे" यांचा संबंध याचा समावेश आहे. प्राध्यापक रानडे यांच्या आधीच्या काळातील तत्त्ववेत्ते म्हणजे शंकराचार्य, रामानुज, माधव आणि वल्लभ यांनी वैदिक अंगाने भगवद्गीतेचा लावलेला

अन्वयार्थ दुसऱ्या विभागातील पहिल्या प्रकरणात आहे तर याच विभागातील दुसऱ्या प्रकरणात ज्ञानेश्वर माऊलींनी लावलेला भगवद्गीतेचा अन्वयार्थ वर्णन केलेला आहे.

उपरोक्त ग्रंथाचा तिसरा भाग अधिक विस्तृत असून या भागात एकंदर नऊ प्रकरणे आहेत. भांडारकरांचा भक्तीमार्ग या विभागात आलेला आहेच पण त्याबरोबर हिंदू धर्माच्या बाहेरील म्हणजे ख्रिश्चन धर्म आणि बौद्ध धर्म सुद्धा वर्णन केलेला आहे. तसेच अनेक पुरोगामी किंवा आधुनिक तत्ववेत्यांचे भगवद्गीते विषयीचे विचार येथे साकल्याने किंवा एकत्रितपणे एकेका प्रकरणात मांडलेले आपल्याला आढळतात. उदाहरणार्थ लोकमान्य टिळक महात्मा गांधी आणि महायोगी श्री अरविंद.

चौथ्या विभागातील काही प्रमुख प्रकरणांचा उल्लेख करायचा झाल्यास कर्म आणि त्यातील बंधने, नैतिकता आणि सौंदर्य, परमेश्वर प्राप्तीतील अडचणी, उपासना पद्धती, आत्मसाक्षात्कार किंवा आत्मानुभूती यांचा समावेश करता येईल. शेवटच्या विभागात सारांश वर्णन केलेला आहे.

भाव तेथे देव असे आपण म्हणतो. अनेक तत्त्ववेत्यांनी आपापल्याला भावेल, आवडेल, रुचेल, पटेल त्या त्या उपासना पद्धतींचा अवलंब करून परमेश्वर प्राप्तीसाठी विशेष प्रयत्न केले. खरे पाहता त्यामधील प्रत्येकाला आलेला अनुभव हा त्यांच्या त्यांच्या परीने खरोखरच योग्य आहे आणि श्रेष्ठ आहे आणि अशा पार्श्वभूमीवर एक सकारात्मक आणि एकत्रितपणे सर्व विचार आणि सर्व मते या पुस्तकात मांडलेली आपल्याला आढळतात आणि मला असे वाटते की प्राध्यापक रानडे यांचे लेखन शैलीचे हे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

या शोधनिबंधाच्या संक्षिप्त चरित्र या भागामध्ये प्राध्यापक रानडे यांनी तत्वज्ञान विद्यापीठाची स्थापना ज्या उद्देशाने केली आणि त्या उद्देशाबरहुकूम आपली वाटचाल सुद्धा केली. ही वस्तुस्थिती हे पुस्तक वाचल्यावर वाचकांच्या नक्कीच लक्षात येईल असा मला विश्वास वाटतो.

**परमार्थ सोपान किंवा Path Way to God in English**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या संक्षिप्त चरित्र या भागामध्ये आपण हिंदी भाषेतील संतांवर परमार्थ सोपान किंवा Path Way to God हे त्यांचे दोन ग्रंथ अध्यात्मविद्यामंदिराने प्रसिद्ध केले. या पुस्तकाबद्दल आता आपण अधिक माहिती जाणून घेऊया.

या पुस्तकाचे नाव परमार्थ सोपान किंवा परमार्थाची वाटचाल असे आहे सोपान या शब्दाचा अर्थ म्हणजे पायरी. परमेश्वराच्या अनुभूतीसाठी कोणकोणत्या पायऱ्या साधकाला एका नंतर एक अशा क्रमाक्रमाने चढत जायच्या आहेत याचे वर्णन या पुस्तकात केलेले आहे या पायऱ्या खालील प्रमाणे आहेत.

या ग्रंथाचे पाडा आणि दोहा असे दोन भाग आहेत. अध्यात्मिक हिंदी साहित्याचे हे दोन प्रमुख प्रकार आहेत त्यापैकी संत कबीरांनी ज्या रचना केल्या त्या दोहा या स्वरूपात त्यांनी जनतेपुढे हे आपण जाणतोच. या दोन्ही अध्यात्मिक हिंदी साहित्याचे पुढील प्रकरणांमध्ये सामायिकपणे विभागणी केलेली आहे ती प्रकरणे खालील प्रमाणे आहेत.

- अध्यात्मिक आयुष्याचे फायदे
- नैतिक तयारीची आवश्यकता
- संत आणि परमेश्वर यांचे नाते
- यात्रेची सुरुवात
- अत्यंत उच्च कोटीतील अध्यात्मिक अनुभव

**The History of Indian Philosophy – Published in eight volumes**

या पुस्तकाचे एकंदर आठ खंड आहेत आणि ते अतिशय विस्तृत स्वरूपात लिहिले गेले आहे असा प्रचंड आवाका असणाऱ्या या ग्रंथाच्या कक्षा प्रस्तुत शोधनिबंधांच्या पलीकडे आहेत त्यामुळे आता आपण येथेच पूर्णविराम घेऊया.

**संदर्भ ग्रंथ:**

१. प्रा. रा. द. रानडे - चरित्र आणि तत्वज्ञान, शं. गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन पुणे
२. The Bhagwad Gita as a Philosophy of God's Realization, Prof. R. D. Ranade, Aryabhushan Press
३. **परमार्थ सोपान, प्रा. रा. द. रानडे, अध्यात्मविद्यामंदिर**
४. The Bhagwad Gita as a Philosophy of God's Realization, Prof. R. D. Ranade, Aryabhushan Press
५. The History of Indian Philosophy – Published in eight volumes, Prof. R. D. Ranade and S. K. Belvalkar, Aryabhushan Press

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# नीतिमान समाज रचना - संत एकनाथ

**डॉ. माधव नरहरी कांबळे[1], रत्नाकर ज्ञानोबा केंद्रे[2]**
[1]संशोधन मार्गदर्शक, संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट.
[2]संशोधक विद्यार्थी, संशोधन केंद्र, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.
**Corresponding Author: डॉ. माधव नरहरी कांबळे**
**DOI-10.5281/zenodo.14546655**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीने अनेक थोर संत घडवले, ज्यांनी केवळ या प्रदेशालाच नव्हे, तर संपूर्ण देशालाच मानवतेचा उज्ज्वल आदर्श दिला. जर आपल्या देशात संत अवतीर्ण झाले नसते, तर माणूस खऱ्या अर्थाने "माणूस" म्हणून वागला असता का? हा प्रश्न पडतो. महाराष्ट्र आजही इतर राज्यांच्या तुलनेत सदाचाराने समृद्ध आहे, आणि यामागील मुख्य कारण म्हणजे येथे जन्माला आलेले संत आणि त्यांचे जीवनमूल्ये. संत म्हणजे केवळ अध्यात्मिक मार्गदर्शक नव्हे, तर समाज उन्नतीसाठी कार्य करणारे परिवर्तनकारी विचारवंत. त्यांच्या अस्तित्वानेच महाराष्ट्रात मानवता, बंधुता, दया, नीती, करुणा, सौजन्य, आणि परोपकार यांसारख्या मूल्यांचे बीज रुजले आहे. संतांचे कार्य मानवी जीवनाला उन्नती देणारे आहे. त्यांनी केवळ तत्त्वज्ञानाची चर्चा करून थांबणारे साहित्य निर्माण केले नाही, तर जे तत्त्वज्ञान सांगितले, त्याचा स्वतःच्या जीवनातून प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यांची वाणी आणि आचरण यातील एकात्मता त्यांच्या विचारांना जिवंत ठेवते. त्यांच्या उपदेशाने अज्ञानाचा अंधःकार दूर झाला आणि सदाचाराचा दीप समाजात प्रज्वलित झाला.

**परिचय:**

महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव यांसारखे अनेक थोर संत जन्माला आले. त्यांनी भक्तीचे स्वरूप व्यापक केले आणि धर्म, जात, पंथ यांच्या सीमा पार करून मानवता केंद्रस्थानी ठेवली.
संतांनी आपले विचार केवळ उच्चभ्रू वर्गासाठी मर्यादित न ठेवता, सामान्य जनतेपर्यंत पोहोचवले. त्यांची भाषा ही सहज, प्रवाही आणि सामान्यांच्या हृदयाला भिडणारी होती. त्यामुळे त्यांच्या अभंग, ओव्या, भारुडे, गवळणी यांसारख्या साहित्य प्रकारांनी समाजाला नवा दृष्टिकोन दिला.

आजही संत विचारांचे महत्त्व कमी झालेले नाही. त्यांनी दिलेला संदेश हा केवळ अध्यात्मापुरता मर्यादित नसून, समाजघडणीसाठीही उपयुक्त आहे. त्यांच्या शिकवणीने शांती, अहिंसा, समता आणि न्याय यांना महत्त्व दिले आहे. संत हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचे अमूल्य रत्न आहेत. त्यांनी समाजाला दिशा दिली, अज्ञानाच्या अंधःकारातून बाहेर काढले, आणि सदाचाराच्या मार्गावर चालण्यासाठी प्रेरणा दिली. या संतांनी निर्माण केलेली महाराष्ट्राची परंपरा आजही तितकीच प्रासंगिक आणि प्रेरणादायी आहे. विविध कालखंडांतील संतांनी आपल्या व्यक्तिगत उन्नतीपेक्षा समाजाच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी अध्यात्माच्या आधाराने भक्तिविचार रुजवले आणि जात-धर्म, पंथ यामध्ये विभागल्या गेलेल्या समाजाला एकसंघ ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यामुळे संतांचे कार्य नेहमीच युगप्रवर्तक ठरले आहे.

संत एकनाथ हे अशा थोर संतांच्या मांदियाळीत एक महत्त्वपूर्ण स्थान मिळवणारे संत होते. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने समाजाला संघटित केले, परकीय आक्रमणांमुळे भयभीत झालेल्या जनतेला धैर्य दिले, आणि आचारधर्माच्या आधारे सामाजिक वीण अधिक घट्ट केली. संत एकनाथांनी सामान्य माणसाच्या जगण्याला केवळ आधारच नाही, तर नवीन दिशा दिली. अन्न, वस्त्र, निवारा यामुळे जीवन जगणे शक्य होते, परंतु जगण्याचा खरा अर्थ काय, हे शिकविणारे विधायक विचार समाजाला त्यांनी दिले. त्यांच्या या विचारांनी मरगळलेल्या मनाला उभारी दिली, नवआशावाद जागवला, आणि भक्तीची दृष्टी विकसित

केली. नाथांना सामान्य माणसाबद्दल अपार तळमळ होती. ते समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या विचारांपर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध होते. संस्कृत भाषेच्या प्रचुरतेत अडकलेल्या भक्तिसंप्रदायाला त्यांनी दैनंदिन भाषेत मांडले, ज्यामुळे सामान्य लोकांपर्यंत भक्तिविचार सहज पोहोचले.

संत एकनाथांची आपल्या साहित्याच्या माध्यमातून भक्तिविचारांचा अमृतकुंभ सर्वांसाठी खुला केला. त्यांच्या विचारांनी अंधारलेल्या समाजाला प्रकाशाची वाट दाखवली. त्यांनी लिहिलेले ग्रंथ जसे एकनाथी भागवत, अभंग गाथा, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण, आणि हरीपाठ हे केवळ भक्तिसाहित्य नव्हे, तर समाज सुधारण्याचा मूलमंत्र ठरले. त्यांच्या भारुडांमधून समाजातील उपहास आणि सत्य परिस्थिती अधोरेखित होत असे, तर अभंग आणि गवळणींमधून भक्तीचा गोडवा अनुभवायला मिळत असे. त्यांच्या साहित्याचा हेतू फक्त तत्त्वज्ञान सांगणे नव्हता, तर ते तत्त्वज्ञान प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारावे, हा होता.

संत एकनाथांनी भक्तीची वैष्णव परंपरा जोपासली आणि परंपरेला आधुनिक काळाच्या प्रश्नांना सामोरे जाण्याची ताकद दिली. त्यांनी कर्मकांडांचा विरोध करत खऱ्या भक्तीला प्राधान्य दिले आणि सामान्य जनतेला धर्माचे खरे स्वरूप समजावून दिले. त्यांची शिकवण आजही काळाच्या कसोटीवर टिकून आहे. त्यांच्या विचारांनी आणि साहित्याने समाजाला चिरंतन प्रेरणा दिली आहे. संत एकनाथांच्या विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे मानवतेची सेवा आणि समतेचा प्रचार, ज्यामुळे ते प्रत्येक पिढीसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. नाथांचे जीवन आणि कार्य हे "प्रथम आचरण, नंतर उपदेश" या तत्वाचा सर्वोत्तम आदर्श आहे. त्यांच्या विचारांनी महाराष्ट्रातील वारकरी परंपरेला आणि समाजाला नवी ऊर्जा दिली आणि आजही ती ऊर्जा शाश्वत आहे.

संत एकनाथ हे संत परंपरेतील एक तेजस्वी रत्न होते, ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू लाभलेले होते. संत, लेखक, विचारवंत, समाजसुधारक आणि भक्तिविचारांनी समाजाला एकसंघ ठेवणारे प्रबोधनकार म्हणून ते विशेष ओळखले जातात. त्यांच्या विचारसरणीतून प्रबोधनाचा जन्म झाला आणि त्या प्रबोधनातून कृतीचा मार्ग साकार झाला. या कृतीशीलतेमुळेच समाजात परिवर्तन घडून आले आणि या परिवर्तनात नव्या युगाच्या आश्वासकतेचे बीज होते.

दैनंदिन संघर्षांमध्ये अडकलेल्या सामान्य माणसाला नाथांच्या साहित्याने नवचैतन्य प्राप्त करून दिले. त्यांच्या विचारांनी आत्मभान जागृत केले आणि भक्ती चळवळीशी समाजाला कायमचे जोडले. कथनी आणि करणी यामधील समन्वय नाथांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते. ते नेहमी म्हणत की, क्रूरता आणि द्वेषामुळे भक्तीला पूर्णत्व येत नाही; उलट, अहंकाराचा पगडा वाढतो. म्हणून त्यांनी अहंकाराचा त्याग करण्याचे महत्त्व पटवून दिले.

संत एकनाथांनी भक्तीत समता आणि न्याय याला अग्रस्थानी ठेवले. शांतीचा मार्ग स्वीकारताना त्यांनी बेगडी भक्तीचा आणि ढोंगीपणाचा तीव्र निषेध केला. धर्माच्या नावावर सामान्य माणसाला फसवणाऱ्या ढोंगी टोळक्यांवर त्यांनी कठोर टीका केली. मात्र, ते इथेच थांबले नाहीत. त्यांनी या ढोंगाला पर्यायी विचार आणि कृतीद्वारे सकारात्मक दिशा दिली.

स्वकीयांच्या रोषाला तोंड देत, त्यांनी आपले विचार आणि आचरण यांच्याशी प्रामाणिक राहण्याची शिकवण दिली. त्यांच्या चरित्रातील असंख्य घटना त्यांच्या प्रामाणिकतेचे आणि कृतिशीलतेचे प्रमाण आहेत.

काळाच्या ओघात विचारसरणी बदलत असली, तरी संतांच्या विचारांची मौलिकता आणि उपयोगिता अबाधित राहिली आहे. अलीकडील काळात "संत विचार आजही प्रासंगिक आहेत का?" असा प्रश्न विचारला जातो. परंतु, शेवटी जीवनाचे अंतिम ध्येय काय? याचा विचार करताना संतविचारांच्या अनुयायित्वाची ताकद स्पष्ट होते.

संत एकनाथांनी ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या भक्तीच्या पायवाटेला मुख्य मार्गाचा स्वरूप दिले. त्यांनी आपल्या विचारांना आणि आचरणाला एका धाग्यात बांधून ठेवले आणि यामुळेच ते संपूर्ण वारकरी संप्रदायाचे गुरू ठरले.

संत एकनाथ यांनी त्याग, समर्पण, आणि प्रामाणिकता ही त्यांच्या विचारसरणीची मुळे होती. "आधी केले मग सांगितले," या तत्वानुसार जगणारे नाथ संपूर्ण मानवजातीसाठी एक आदर्श होते. त्यांच्या विचारांमुळे भक्तीला न्याय, समता, आणि मानवतेची जोड मिळाली, ज्यामुळे त्यांच्या विचारांचे चिरंतनत्व सिद्ध झाले. नाथांच्या शिकवणीने आणि कृतींनी महाराष्ट्राला केवळ संतांचा वारसा दिला नाही, तर मानवतेचे आणि भक्तीचे एक अद्वितीय दर्शन घडवले. अशा संतांच्या कार्यामुळेच समाज अधिक संपन्न, सदाचारी, आणि प्रेरणादायी ठरला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे:**

1.महाराष्ट्रातील संत परंपरेचा शोध घेऊन, संतांनी दिलेल्या जीवनमूल्यांचा आणि विचारांचा आढावा घेणे.

2.संतांच्या शिकवणीमुळे समाजात घडलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बदलांचा अभ्यास करणे.

3. संतांनी रचलेल्या अभंग, ओव्या, भारुडे आणि ग्रंथांचे सखोल विश्लेषण करून त्यातील संदेशाचे महत्त्व स्पष्ट करणे.

4. संतांनी मांडलेल्या विचारांचा आणि शिकवणीचा आजच्या आधुनिक काळाशी असलेला संबंध आणि उपयोगिता तपासणे.

5. संत एकनाथ यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कार्याचा अभ्यास करून, त्यांनी घडवलेल्या परिवर्तनाचा उलगडा करणे.

**गृहीतके:-**

1)समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, व जातीभेद दूर करून भागवत संप्रदायाचे कार्य अधिक व्यापक करण्याचे यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

2) संत एकनाथांचे नीतिमान समाज निर्मितीची कार्य व समाज सुधारणेतील योगदान वर्तमान परिस्थितीत संपूर्ण मानव जातीसाठी व समाजासाठी उपयोगी आहे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सामाजिक शास्त्रातील विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलन सदर संकल्पनेचे तथ्य संकलन दुय्यम स्त्रोताचा आधार घेऊन संत एकनाथ यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा व इतरांनी त्यांच्यावर लिहिलेल्या ग्रंथ तसेच संत साहित्य संतांच्या तत्त्वज्ञानाची मांडणी प्रस्तुत शोधनिबंधात केलेली आहे.

**संत एकनाथांचे सामाजिक कार्य :**

संत एकनाथ हे महाराष्ट्रातील एक अत्यंत प्रभावशाली संत होते. त्यांनी समाजातील अनेक रूढी, अंधश्रद्धा, जातीभेद, व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांची शिकवण आजही समाजासाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यांनी 'संसारात राहून परमार्थ करता येतो'हे सिद्ध करून दाखवले. त्यांचा जीवनदर्शन हे संततेचे आणि भक्तिरंगाचे एक उत्तम उदाहरण बनले.

संत एकनाथांनी आळंदी येथे जाऊन ज्ञानेश्वरांच्या समाधीचे जीर्णोद्धार केले. ज्ञानेश्वरीच्या अप्रसिद्ध आवृत्तीचे अस्तित्व संत एकनाथांनी जतन केले आणि त्या माध्यमातून ज्ञानेश्वरीच्या वेगळ्या रूपाचे महत्त्व दाखवले. ज्ञानेश्वरीच्या महत्त्वाला प्रगल्भ रूपात त्यांनी समाजामध्ये पोचवले. त्यांच्या कार्यामुळे ज्ञानेश्वरीला नवीन आयाम प्राप्त झाला आणि भागवत संप्रदायाचे कार्य अधिक व्यापक प्रमाणात पसरले. जातिभेदाच्या विरोधात संत एकनाथांनी आयुष्यभर कंबर कसली. त्या काळात महाराष्ट्रात ब्राह्मण-हरिजन यांच्यातील भेदभाव फार कठोर होता. संत एकनाथ हे या भेदभावाच्या विरोधात ठाम उभे राहिले. त्यांनी आपल्या वचनांमध्ये आणि कार्यात हरिजन्ससाठी स्थान दिले. जातिवादाच्या पंढरीला झुकवण्याचे काम एकनाथांनी केले. त्यांचे कार्य फकऱ्या समाजाला आस्थेने स्वीकारणारे आणि धार्मिक विषमता संपवणारे होते.

संत एकनाथांचा संदेश 'भक्ती आणि साधना' यावर आधारित होता. त्यांनी दाखवले की एखादा सामान्य गृहस्थ देखील भक्तीच्या माध्यमातून आध्यात्मिक विकास साधू शकतो. त्यांनी भक्तिरंगाच्या साहाय्याने समाजातील सर्व लोकांना एकत्र आणले. त्यांनी असा विश्वास दिला की प्रत्येक व्यक्तीला त्याच्या भक्तीतून परमोच्च साध्य प्राप्त करता येईल. एकनाथांनी हे सिद्ध केले की प्रत्येकाचं जीवन परिपूर्ण बनवण्यासाठी धार्मिकता आणि कर्माची महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्यांच्या जीवनप्रवृत्तीत भौतिक साधने देखील आध्यात्मिक साधने म्हणून घेता येतात.

संत एकनाथांनी त्यांचे साहित्य जनतेला प्रबोधन करणारे बनवले. त्यांनी विविध काव्यरचनांमध्ये, विशेषतः 'भावार्थ रामायण' आणि 'एकनाथी भागवत' मध्ये, समाजाची मानसिकता बदलण्यासाठी उपदेश दिला. त्यांचा साहित्यातून आणि काव्याद्वारे दिलेला संदेश लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवला. एकनाथ महाराजांनी

आपली कविता लोकांच्या मनावर प्रभावीपणे ठेवल्यामुळे त्यांच्या साहित्याचे महत्त्व वाढले. त्यांच्या कार्यामुळे त्यांनी समाजातील दुर्दशा, आर्थिक आणि राजकीय पडझड, आणि धार्मिक अधोगतीवर प्रहार केला. त्यांचा विचार आणि लेखन आजही समाजाच्या प्रगतीसाठी प्रेरणा देत आहे. त्यांनी समाजातील अनेक अन्याय आणि अत्याचारांवर प्रकाश टाकला, विशेषतः स्त्रियांवरील अन्यायाबद्दल त्यांच्या 'रोडगा' या भारुडात भाष्य केले. त्यात त्यांनी त्या काळातील स्त्रियांच्या स्थानाचा आणि त्यांच्या अवस्थेचा सुंदर पाठ दिला.

संत एकनाथांच्या कार्याचा एक महत्वाचा पैलू म्हणजे त्यांनी धार्मिकतेला एक चांगले दृषटिकोन दिला. त्यांनी दिखाव्यापासून दूर राहून कर्मठतेला विरोध केला. त्यांनी आपल्या जीवनातून दाखवले की भक्तिरंगाने, प्रेमाने आणि समानतेच्या दृषटिकोनातून धर्माचे पालन करणे आवश्यक आहे. त्यांची वाणी आणि लेखणी त्याच प्रमाणे रसाळ आणि ओघवती होती. एकनाथ महाराजांनी दाखवले की जर एखाद्याला वास्तविक आध्यात्मिक समृद्धी हवी असेल, तर त्याने त्याच्या कर्मांमध्ये शुद्धता, साधेपण आणि

मनुष्यतेचा आदर ठेवला पाहिजे. त्यांचे कार्य आजही समाजासाठी एक आदर्श ठरले आहे.

संत एकनाथांनी महाराष्ट्रात वासुदेव संस्थान नावाची चळवळ सुरू केली. या चळवळीत वासुदेव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तींनी लोकांच्या घरांमध्ये भेटी दिल्या आणि भजन संमेलनांद्वारे धार्मिक संदेश दिला. त्यांनी आचारांची शुद्धता ठेवून कर्मठतेच्या विरोधात आवाज उठवला. प्रेम, सौजन्य आणि शांती हे त्यांचे मुख्य गुण होते. ते भूतदया मानत होते आणि समाजातील अज्ञान व कर्मकांड दूर करण्यासाठी सोप्या भाषेत भारुडं आणि गौळणी लिहून लोकांना उपदेश दिला. संत एकनाथांनी अंधश्रद्धा आणि समाजातील स्त्रियांवरील अन्यायावर लक्ष वेधले. त्यांच्या 'रोडगा' या भारुडात त्यांनी स्त्रियांच्या दुखाचा शब्दांतून प्रतिविम्ब केला. त्या काळात स्त्रियांना नकाराचा अधिकार नव्हता, आणि लहान वयातच त्यांचे लग्न लावून दिले जात होते. संत एकनाथांनी हे सर्व व्यक्त करत, महिलांच्या भावना आणि विचारांना शब्द दिले.

त्यांच्या कविता प्रत्येकाला दयाळूपणाने वागण्याची, माणुसकी राखण्याची आणि सर्वांमध्ये समानतेचा आदर्श ठेवण्याची शिकवण देतात.

एकनाथ महाराज म्हणायचे की, "तुम्हाला भेटणारा प्रत्येक आत्मा तुमचा देव आहे." त्यांच्या शिकवणीचा सारांश असा होता की, "विचार, वचन आणि आचार" यामध्ये शुद्धता असायला हवी. त्यांच्या कार्यांमुळे लोकांमध्ये आशा निर्माण झाली आणि ते त्यांच्या जीवनात बदल घडवू शकले.

**संत नाथांचा उपदेश आणि कार्य :-**

समाजाच्या सुसंस्कृततेसाठी अनमोल ठरले. त्यांचा प्रमुख संदेश होता की, "अनुताप" (पश्चात्ताप) झाल्याशिवाय देवाचे नाव घेतले जात नाही. त्यांनी माणसाला दाखवले की, जेथे अर्थ आहे तेथे परमार्थ नाही. हरीनामच एकमात्र शाश्वत आहे आणि शूद्रांनाही देवाचे नाम घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. नाथांचा उपदेश होता की जे देवाला शरण जातात, त्यांना मृत्यूची भीती नाही. भक्ती हा सर्व मार्गांचा मूळ आहे, तर वैराग्य हे त्याचे घर आहे, आणि संतांची भेट होणे हे परमभाग्य आहे.

नाथांची शिकवण होती की सर्व धर्म, पंथ, जाती आणि उपजाती समान आहेत. त्यांनी सर्व मानवजातीकडे सहिष्णूतेने पाहण्याचा संदेश दिला. त्यांचे गुरू जनार्दन स्वामी दत्तभक्त होते, त्यामुळे नाथांचे भक्तिपंथी विचार आणि दत्तभक्तीमध्ये मोठे योगदान होते. एका प्रसंगात, नाथांनी एक हरिजन स्त्रीचे मूल रणरणत्या उन्हात घामाने थयथय नाचताना पाहिले आणि ते त्याला कडेवर घेत शांत केले. त्यांच्या कार्यप्रमाणेच त्यांचा आचार होता - प्रेम, करुणा आणि साहाय्य. नाथांना स्वप्नात एक दृष्टांत झाला होता, ज्यामध्ये आळंदी येथील ज्ञानेश्वरांच्या समाधीभोवती अजानवृक्षाच्या मुळांचा विळखा पडला होता. त्यांनी तेथून तो विळखा काढून ज्ञानेश्वरीची शुद्ध आवृत्ती तयार केली. त्यांच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी श्रीमद्भागवतातील अकराव्या स्कंधावर प्राकृत भाषेत "एकनाथी भागवत" हे ग्रंथ लिहिले, ज्याने व्यापक लोकप्रियता मिळवली.

नाथांनी काशी, रामेश्वर, पैठण, पंढरपूर या तीर्थक्षेत्रांमध्ये तीर्थयात्रा केल्या. रामेश्वरमध्ये त्यांनी गाढवाला गंगाजल पाजून त्याला तहानेपासून मुक्त केले. त्यांचा आदर्श असे सांगतो की, प्रत्येक प्राणिमात्रामध्ये परमेश्वर वास करतो, आणि त्या सर्वांची सेवा करणे हे धर्माचे पालन आहे. नाथांची कीर्तने आणि अभंग लोकांमध्ये अत्यंत लोकप्रिय होती. पंढरपूरसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये त्यांची वाणी गूंजत होती. त्यांचे भारुड, अभंग आणि आरत्या समाजातील विविध घटकांना एकत्र आणत होत्या. त्यांचे कार्य, विचार आणि लेखन सर्वांच्या हितासाठी होते. नाथांचा मुख्य संदेश होता की, संसारात राहूनही परमार्थ साधता येतो, आणि सर्वांना समभावाने पाहायला हवे. नाथांच्या कार्याचा परिपाक १५९९ मध्ये झाला, जेव्हा ते गोदावरी नदीत आत्मसमर्पण करीत फाल्गुन वद्य षष्ठीला निर्वाणाला गेले. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही हजारो लोकांवर आहे, आणि त्यांच्या कार्याची आठवण घेण्यासाठी लोक प्रत्येक फाल्गुन वद्य षष्ठीला पैठण येथे जातात. नाथांनी सर्व समाजाला अध्यात्मिक ज्ञान दिले, मानवी समानतेचे महत्त्व सांगितले आणि जीवनात करुणा, प्रेम आणि सेवा कशी महत्वाची आहे हे दर्शवले. त्यांच्या शिकवणीने समाजाला एक नवीन दृष्टिकोन दिला, जो आजही प्रासंगिक आणि प्रेरणादायक आहे.

**संत एकनाथांचे कार्य: समाज सुधारणा आणि धार्मिक योगदान:-**

संत एकनाथ हे महाराष्ट्रातील महान संत आणि समाज सुधारक होते. त्यांचे जीवन आणि कार्य आजही समाजाला मार्गदर्शन करत आहेत. एकनाथ महाराजांनी आळंदी येथे ज्ञानेश्वरांच्या समाधीचे जीर्णोद्धार करून, ज्ञानेश्वरी ग्रंथाची शुद्ध आवृत्ती तयार केली आणि

ज्ञानेश्वरीच्या प्रचार-प्रसाराचे कार्य अधिक व्यापकपणे चालू ठेवले. हे कार्य त्यांचे एक महत्त्वाचे योगदान होते. एकनाथ महाराज महाराष्ट्रातील अस्पृश्यतेच्या विरोधातील सुरुवातीच्या सुधारकांपैकी एक होते. ते मध्ययुगाच्या उत्तरार्धात कार्यरत होते, ज्या काळात ब्राह्मण समाजाने अस्पृश्य लोकांना वाईट वागणूक दिली होती. संत एकनाथ यांनी या सामाजिक भेदभावाला विरोध केला आणि अस्पृश्यांना समान अधिकार दिले. ते प्रत्येक व्यक्तीला समानतेचे महत्व शिकवून जातिभेदाच्या विरोधात आवाज उठवत होते.

संत एकनाथ महाराजांनी समाजातील अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा आणि जातीभेद दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. ते भागवत संप्रदायाचे प्रचारक होते आणि या संप्रदायाच्या माध्यमातून समाजात सुधारणा आणण्यासाठी प्रयत्नशील होते. एकनाथ महाराजांनी समाजाला धडा दिला की, "संसारात राहूनही परमार्थ साधता येतो." त्यांनी आपल्या जीवनातून हे सिद्ध करून दाखवले की, साधे जीवन जगताही आध्यात्मिक उन्नती साधता येते. त्यांच्या जीवनातील एक प्रसंग, जो त्यांच्या सहिष्णुतेचे आणि दयाळूपणाचे उदाहरण आहे, तो रणरणत्या उन्हात एका हरिजन स्त्रीच्या मुलाचा होणारा दु:खद अनुभव आहे. त्या मुलाचे पाय चटक्याने भाजले होते, त्याला पाहून एकनाथ महाराजांनी त्याला कडेवर घेत शांत केले. त्यांच्या कार्यात आणि विचारात दया, प्रेम आणि समजूतदारपणा सर्वात महत्त्वाचे होते

एकनाथ महाराजांच्या कार्यामुळे समाजातील स्त्रियांची स्थिती बदलली. त्या काळात स्त्रियांना नकाराचे स्वातंत्र्य नव्हते. घरातील मंडळी लहान वयातच त्यांचे लग्न लावून देत. संत एकनाथ यांनी 'रोडगा' या भारुडाच्या माध्यमातून स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचारांबद्दल समाजात जागरूकता निर्माण केली. त्यांची काव्ये स्त्रियांच्या संघर्षाचे आवाज बनली. संत एकनाथ महाराजांची वाणी जितकी रसाळ होती, त्यांची लेखणीही तितकीच ओघवती होती. 'रुक्मिणी स्वयंवर' या ग्रंथात कृष्णभक्ती आणि आत्मबोधाचे सुंदर वर्णन केले आहे. त्यांची लेखणी आणि काव्ये लोकांना धर्म आणि समाजाच्या विचारांनी प्रेरित करत होती. त्यांचे कार्य आजही संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. एकनाथ महाराजांनी दाखवले की, संसारात राहूनही परमार्थ साधता येतो. त्यांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीला समभावाने पाहण्याची शिकवण दिली. त्यांच्या जीवनाचा आणि कार्याचा संदेश आजही आपल्याला मार्गदर्शन करत आहे, आणि समाजातील सुधारणेसाठी आवश्यक आहे.

**सारांश-:**

* संत एकनाथांनी आळंदीत जाऊन ज्ञानेश्वरांच्या समाधीची जीर्णोद्धार केले.ज्ञानदेवांनी सुरू केलेले भागवत संप्रदायाचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात पुढे चालू ठेवले.

* संत एकनाथ हे महाराष्ट्रातील अस्पृश्यतेच्या सुरुवातीच्या सुधारकांपैकी एक होते, ते मध्ययुगाच्या उत्तरार्धात कार्यरत होते. ज्या काळात ब्राह्मणांनी अस्पृश्य लोकांची सावली आणि आवाज टाळला, त्यांनी अस्पृश्यांकडे जाहीरपणे शिष्टाचार दाखवला आणि वारंवार त्यांच्याकडे दुर्लक्ष केले.

*समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, व जातीभेद दूर करून भागवत संप्रदायाचे कार्य अधिक व्यापक करण्याचे यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

* एक प्रसंग असं घडला रणरणत्या उन्हात एका हरिजन स्त्रीचे मूल कुणाच्या चटकांनी पाय पडल्याने तडतय नाचत होते ना त्यांनी एक क्षणाचाही विचार न करता त्याला कडेवर घेऊन शांत केली त्यांच्या विचाराप्रमाणेच त्यांचा आचार सुद्धा होता.

*संत एकनाथांचे नीतिमान समाज निर्मितीची कार्य व समाज सुधारणेतील योगदान वर्तमान परिस्थितीत संपूर्ण मानव जातीसाठी व समाजासाठी उपयोगी आहे.

* संत एकनाथ महाराजांच्या जीवनातील लोकांना दाखवून दिले की एक साधने ही अध्यात्मिक साधने देखील असू शकतात आणि लोकांच्या आकांक्षा वाढवल्याने त्यांच्यात भागवत धर्म मजबूत पात्र निर्माण केले.

* नाथांनी बहुजन समाजाला अध्यात्माचे ज्ञान व्हावे म्हणून प्राकृत भाषेत विपुल लिखाण केले, सर्वांमध्ये समभाव दाखविला मानवनिर्मित कृतीम भेदांना त्यांनी छेद दिला आणि मुख्य म्हणजे संसारात राहूनही परमार्थ साधता येतो हे स्व-अनुभवाने दाखवून दिले.

* त्या काळात समाजातील स्त्रियांवर होत असलेले अन्याय, अत्याचार याविषयी 'रोडगा' या भारुडातुन त्यांनी स्त्रियांच्या मनाची स्थिती व्यक्त केली आहे. स्त्रीला नकाराचे स्वातंत्र्य नव्हते लहान वयातच घरातील मंडळी तिचे लग्न लावून देत असत, फक्त संसार करायच्या पलीकडे तिने विचारच करायचा नाही असा तो काळ होता, त्या काळात स्त्रियांना जणू नाथांच्या भारुडानं बोलकं केलं होतं.

* नाथांची वाणी जेवढी रसाळ तेवढीच त्यांची लेखणीही ओघवती होती, कृष्णभक्ती आणि आत्मबोधाचे वर्णन

असलेला 'रुक्मिणी स्वयंवर' हा ग्रंथ ही त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देतो.

**संदर्भसूची:-**


1. 'संतसाहित्य'आकलन आणि अध्यापन- संपादक मंडळ- प्रा. वसंत आबाजी डहाके, डॉ. सदानंद मोरे,डॉ. कल्याण काळे, डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ.सुमन बेलवलकर,डॉ.स्नेहा जोशी, प्रा.रमेश कोकाटे,श्री दत्तात्रय नरहर कुलकर्णी.
2. संत एकनाथ (विनायक मुरकुटे)
3. संतश्रेष्ठ एकनाथ (दीपक भागवत)
4. संत एकनाथांचा धर्मविचार (डॉ. सुरेखा आडगावकर)
5. संत एकनाथ- विकिपीडिया

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत गाडगे महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची राष्ट्रभक्ती

**जगन्नाथ विठ्ठलराव कदम[1], प्रा.डॉ. उपाडे जी.एम.[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, एम.ए.(तत्वज्ञान)सेट, महात्मा बसवेश्वर महाविद्यलय, लातूर.
[2]मार्गदर्शक, एम.ए.सेट, पीएच.डी. बी.रघुनाथ महाविद्यालय, परभणी
**Corresponding Author:** जगन्नाथ विठ्ठलराव कदम
**Email :**jvk488@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.14546684**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र सदाचार संपन्न राज्य म्हणून ओळखले जाते. कारण महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत गाडगे महाराज, संत सोपानदेव, संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत विसोबा खेचर, संत सोयरबाई, संत मुक्ताई, संत बहिणाबाई इत्यादी संतांनी इथल्या समाजातील व्यक्तीवर मानवता, बंधुता, समता, दया, सौजन्य, परोपकार या मूल्याचे संस्कार केले आहेत म्हणून आजही महाराष्ट्र भूमी पुरोगामी विचाराची म्हणून ओळखली जाते. यापैकी यापैकी संत गाडगे महाराज आणि संत तुकडोजी महाराज यांची राष्ट्रभक्ती महान असून त्यांचे राष्ट्राच्या पायाभरणीत मोलाचे योगदान आहे.

पारतंत्र्याबरोबरच अज्ञान, अंधश्रध्दा, अनारोग्य आणि बुरसटलेल्या विचारांच्या दरीतून बाहेर काढून धार्मिक, सामाजिक आणि राजकीय गुलामगिरीतून मुक्त करण्याचे काम संत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केले. देश हाच देव ही भावना ठेवून त्यांनी राष्ट्रीयतेला लावलेला हा मोलाचा हातभार आहे.

**उद्दीष्ट्ये :-**

1) संत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करणे.

2) संत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे राष्ट्रभक्तीपर कार्य अभ्यासणे.

**गृहीतके :-**

1) संत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी भारताच्या राजकीय आणि सामाजिक पायाभरणीत मोलाची भर घातली.

2) संत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केला.

**1) संत गाडगे महाराज व संत तुकडोजी महाराज यांची राष्ट्रभक्ती :-**

अमरावती जिल्ह्यातील शेणगाव या एका लहानशा खेडेगावी गाडगे महाराजांचा जन्म वडिल झिंगराजी जाणोरकर तर माता सखुबाई यांच्या पोटी दिनांक 23 फेब्रुवारी 1876 बुधवार रोजी झाला. त्यांचे लहानपणीचे नाव 'डेबू' होते. अमरावती जवळील यावली हे गाव राष्ट्रसंतांची जन्मभूमी होय. त्यांच्या वडीलांचे नाव नामदेव तर आई मंजुळादेवी यांच्या पोटी 30 एप्रिल 1909 रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे लहानपणीचे नाव 'माणिकदेव असे ठेवण्यात आले. दोघांच्या वयात तेहतीस वर्षांचे अंतर. गाडगे महाराजांच्या कार्याने तुकडोजी महाराज प्रेरीत झाले होते. गाडगे महाराजांची समर्पण वृत्ती पाहुण तुकडोजी महाराजांसारखे अनेकजण त्याकाळी तयार झाले. आपल्या देशाबद्दल गाडगे महाराजांना अतिशय प्रेम होते. स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी प्रत्यक्षपणे कुठे भाग घेतलेला नसला तरी त्यांनी अनेक लोकांना देश सेवेसाठी आपल्या कीर्तनातून प्रोत्साहित केले हे मात्र निश्चितपणे म्हणता येते.

गाडगे महाराज कीर्तनातुन नेहमी सांगायचे, देवाने हा देह आपल्याला नुसत खाण्यासाठी नाही दिला तर या जन्मात येवून गोरगरीबावर उपकार करण्यासाठी दिला. मला काही या समाजाचे देणे आहे. या देशाचे देणे आहे. ही भावना लोकांच्या मनात निर्माण करून लोकांना जागे करण्याचे काम गाडगे महाराजांनी केले. ग्रामस्वच्छतेचा, श्रमप्रतिष्ठेचा मंत्र देवून येथील लोकांना राष्ट्राच्या विकासाला हातभार लावण्याचे कार्य त्यांनी निष्ठेने लोकांकडून करून घेतले. लोकांना नवा आचारधर्म शिकविला. कारण त्यांना

माहित होते गाव सुधारले तर पर्यायाने राष्ट्राचा विकास होणार आहे. साऱ्या देशाला अंधश्रध्देच्या, अनारोग्याच्या, अज्ञानाच्या आणि बुरसटलेल्या विचारांच्या दरीतून बाहेर काढून धार्मिक आणि राजकिय दोन्ही स्वातंत्र्य मिळवून देणे हे महाराजांचे ध्येय होते. हे ध्येय साध्य करण्यासाठी त्याग, सेवा, समर्पण हे व्रत अंगीकारून येथील लोकांना हा आचारधर्म शिकविला.

गाडगे महाराजांना स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्यायावर आधारीत बलशाली भारत उभा करायचा होता. यासाठी त्यांनी अनेक सहकारी व अनुयायी यांना चेतना देण्याचे काम केले. गाडगे महाराजांची समर्पण वृत्ती व कार्य पाहून तुकडोजी महाराजही प्रेरीत झाले होते. दोघांचेही ध्येय सशक्त आणि समृध्द भारत देश घडविणे हेच होते. गाडगे महाराज व तुकडोजी महाराज दोघेही विदर्भातील. गाडगे महाराजांनी खराट्याच्या माध्यमातुन तर तुकडोजी महाराजांनी खंजीरीच्या माध्यमातुन देशवासीयांना राष्ट्रविकासाचे धडे देवून एकाने कीर्तनाच्या तर दुसऱ्याने भजनाच्या माध्यामातुन स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले होते. 'देश स्वतंत्र झाला तरच देश सुखसमृध्दिकडे झेपावेल. अर्थातच देश हाच देव ही भावना दोघांच्याही मनात होती.

राष्ट्रसंतांनी “प्यारा हिंदुस्तान है । गोपालो की शान है । वीरो का मैदान इसमे भक्तो के भगवान है ॥ अशी पथसंचलन गीते गात देशातल्या तरूणाईत चैतन्य निर्माण केले. “झाड झडूले शस्त्र बनेंगे । भक्त बनेगी सेना । पत्थर सारे बम बनेंगे । नाव लगेगी किनारे । किंवा “चेत रहा है भारत दु:खसे, आग बुझाना मुश्किल है । उठा तिरंगा बढाये छाती, अब बहलाना मुश्किल है” । अशी भजने गात संपूर्ण भारतभर स्वराज्याची आकांक्षा वृध्दिंगत करू लागले. गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा मागोवा घेतला तर दोघेही राष्ट्रचेतना, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभक्ती जनमानसात निर्माण करणारे फिरते विद्यापीठच होते. भारतीय ग्रामीण समाजातील माणूस सुशिक्षित, स्वयंपुर्ण, सुरक्षित, सुजाण आणि सुसंस्कृत व्हावा यासाठी दोन्ही संतांनी अहोरात्र कष्ट घेतले.

गाडगे महाराजांचे अतिशय जवळचे सहकारी शेलारमामा तेरा महिने कारागृहात होते. हे शेलारमामा गाडगे महाराजांच्या तालमीत तयार झालेले राष्ट्रीय कीर्तनकार होते. तसेच मीराबाई शिरकर, यशवंतराव गोंदवलेकर, विश्वनाथराव वाघ, बबनराव कळसकर, जीजाबा पाटील, नारायणराव माळी, रामदास आमटे, गो. नी. दांडेकर, बबनराव कळसकर, लक्ष्मन पाटील कोंडेगावकर, शंकरराव वंजारी, ओंकारराव जोशी, गयाबाई मनमाडकर अशा अनेक अनुयायांनी स्वातंत्र्य संग्रामात, राष्ट्रीय दिंडीत सक्रीय सहभाग घेतला. असे अनेक लोक स्वदेशाच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या कामाला लागले होते. परंतु संतवृत्तीमुळे प्रसिद्धीपासून दूर राहिल्यामुळे त्यांची नावे इतिहासाला अजूनही अज्ञातच आहेत.

कीर्तनात नेहमी महाराज राम राम सीताराम, रघुपति राघव राजाराम।' 'जय गोविंद राधे गोविंद, जय गोविंद राधे गोविंद।' "गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला” ही भजने त्याकाळात म्हणत असत. 1942 च्या ऑगष्ट क्रांतीच्या काळात महाराजांनी नवीनच भजन शोधून काढले. 'जयहिंद जयहिंद। मुखाने बोला गोविंद।' जयहिंदचा पुकार त्यांनी केला. भारतमातेच्या नावाचा जयजयकार ते करू लागले. एखाद्या कीर्तनकाराने त्याकाळी 'भारत माता की जय' म्हणणे आणि लोकांकडून म्हणवून घेणे हे सोपे काम नव्हते. महाराज आपल्या कीर्तनातून स्वदेश, स्वधर्म आणि स्वराज्य याचा संदेश देवून मानवीमूल्याची जोपासना करण्याचा आग्रह करीत. त्या काळात आधी सामाजिक गुलामगिरीतून मुक्त व्हायचे मग राजकीय गुलामगिरीतून हा एक विचारप्रवाह होता व आधी राजकीय गुलामगिरीतून मुक्त व्हायचे, मग सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होवू असा दुसरा विचार प्रवाह होता. गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या दोन्ही विचारांचा समन्वय आपल्यापरीने साधण्याचा प्रयत्न करीत होते असे त्यांच्या जीवनचरित्रावरून दिसून येते. हा त्यांनी राष्ट्रीयतेला लावलेला मोलाचा हातभार आहे.

**2) पिंड संताचा तरी कार्य समाजनेत्याचे होते :-**

या भारतात बंधुभाव नित्य वसु दे । दे वरची असा दे।
हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे । मतभेद नसू दे ।
हा जातिभेद विसरूनी एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समुळ नष्ट हो जगातुनी ।
खळ-निंदकामनीही सत्य न्याय वसू दे ।
दे वरची असा दे ।

वरील रचना राष्ट्रसंतांची असुन आजही आपल्याला बंधुभाव आणि समतेची शिकवण देते हे विसरूण चालणार नाही. संत गाडगे महाराज यांची कृतीच बोलकी होती. महात्मा गांधी यांच्याशी महाराजांची भेट 1935 साली झाली होती. महात्माजींना महाराजांच्या सामाजिक व सांस्कृतीक कार्याविषयी चांगली माहितीसुद्धा होती. गाडगे महाराज आपल्या कीर्तनातून महात्मा गांधीच्या नावाचा जयजयकार लोकांना करायला लावायचे. भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाचा जयजयकार करायला लावायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा

जयजयकार करून घेत. नामदार बाळासाहेब खेर यांच्याशी महाराजांचे संबंध होते. समाजधुरीणांशी संबंध म्हणजे स्वातंत्र्य संग्रामाशी संबंध असे समीकरणच होते.

गाडगे महाराजांनी व त्यांच्या अनुयायांनी ग्रामसफाई, सुतकताई, साक्षरताप्रसार, हिंसाबंदी, अस्पृश्यता निवारण यांचा प्रचार केला. अनेक जण जेलमधे गेले. भूमिगत झाले. या सर्वांमागे महाराजांची प्रेरणा व प्रोत्साहन होते. ते कीर्तनात सांगत, 'ब्रिटिश सरकारने आपल्यावर मोठे अरीष्ठ आणले. तर गांधीजींनी आपल्या सहकाऱ्यांसह सत्याग्रह केला. अनेक देशभक्त स्वातंत्र्यासांठी लढले. त्यांनी 'चलेजाव' ची चळवळ उभारली. म्हणून देश स्वतंत्र झाला. अशा गांधीजींना देव म्हणा. त्यांना नमस्कार करा.

स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेण्यासाठीं दादरचे विठोबा, बांदऱ्याचे राम असे कोणी देव आले होते कां? देवाने स्वातंत्र्य मिळवून दिले की माणसाने ? माणसांनी एकत्रितपणे लढा देवून स्वातंत्र्य मिळवून दिले. तर त्या माणसांनाच देव म्हणा. देशासाठी, जनतेसाठी काहीतरी काम करून मरावे. तरच कीर्ती होईल. लोक तुम्हास ओळखतील, तुमची आठवण ठेवतील. नाहीतर आपण मेलो तरी कोणाला कळणार नाही. राष्ट्रभक्ती हे मोठे मुल्य आहे. कबीरांचा दाखला देत, "मुरतसे 'कीरत बडी, बिन पंख उड जाय। मुरत तो जाती रही, कीरत कबहू ना जाय।" जोपर्यंन्त पृथ्वीवर सुर्यचंद्र आहेत तोपर्यंत म. गांधींचे लोक स्मरण करतील. कारण त्यांनी राष्ट्रासाठी महान कार्य केले आहे.

**सारांश :-**

गाडगे महाराज कृतिशील संत होते. सेवा आणि समर्पणातुन लोकांच्या सुखाचा मार्ग त्यांनी प्रशस्त केला. त्यांच्या विचाराला आचाराची, शब्दाला कर्तृत्वाची आणि उपदेशाला तळमळीची जोड होती. या तळमळीतुनच त्यांनी प्रत्यक्ष स्वातंत्र्य लढयात सहभाग घेतला नसला तरी येथील लोकांच्या मनातील विचारांना सकारात्मकतेची दिशा दिली. अनेक अनुयायी आणि सहकार्यांच्या कार्यात त्यांनी तन,मन,धनाने सहकार्य केले. कारण सर्वांचे ध्येय समाजविकासातुन राष्ट्रविकास हेच होते. हाच आदर्श संत तुकडोजी महाराजांनी घेवून त्यांचा वसा आणि वारसा चालवून 'ग्रामगीता' सारखा पवित्र ग्रंथ आपल्याला दिला. त्यांचे काव्य आणि भजने आजही आपल्याला प्रेरणा देणारे आहेत. त्यांच्या काव्यात राष्ट्रभक्ती ओतप्रोत भरलेली आपल्याला पहायला मिळते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. ठाकरे के.सी.'श्री संतगाडगे बाबा',सुधीर प्रकाशन, वर्धा. जानेवारी २००६ .
2. भगत रा. तु. 'श्री गाडगेमहाराज गौरव ग्रंथ' चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर 1985.
3. कडवे रघुनाथ "वैराग्यमुर्ती गाडगेबाबा" अमोल प्रकाशन, नागपुर.
4. दांडेकर गो.नी. 'श्री गाडगेमहाराज' मृण्मयी प्रकाशन,पुणे.मार्च २०२०.
5. भगत रा. तु. 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ' चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर 2009.
6. केचे मधुकर "श्री गाडग महाराज" साकेत प्रकाशन प्रा.लि.पुणे.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत गाडगेबाबा यांच्या विचारातील ईश्वर

**दिवे वैशाली माधवराव**
संशोधक विद्यार्थी, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर
**Corresponding Author: दिवे वैशाली माधवराव**
**DOI-10.5281/zenodo.14546704**

**प्रस्तावना :**

आपल्या महाराष्ट्रातील ही भूमी वीरांची, कलावंतांची, व संत महंतांची कर्मभूमी आहे. याच भूमीत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा इत्यादी संतांचा अवतार कार्यामुळे संत मालिका सुरू झाली. या मालिकेचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला. नामदेवांनी त्याचा भारतभर विस्तार केला. नाथांनी त्यावर इमारत बांधली व तुकाराम यांनी त्यावर कळस चढविला. उरलेले कार्य संत गाडगेबाबांनी सिद्धीस नेले म्हणूनच संत गाडगेबाबा हे या मालिकेतील शिरोमणी समजले पाहिजेत. संत गाडगेबाबांनी तसे नवीन काही केले नाही मागील संतांनी जो मार्ग दाखविला त्यावर चालण्याचे तेवढे काम केले.

संत गाडगे महाराज यांचा जन्म 23 फेब्रुवारी 1876 रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते.

**उद्दिष्टे :**

संत गाडगे महाराजांच्या मतानुसार ईश्वर

**गृहीतक :**

समाजसेवेतून ईश्वरसेवेचा संदेश संत गाडगेबाबांनी दिला.

**संत गाडगे महाराजांचा दहा कलमी कार्यक्रम :**

समाजातील अज्ञान अंधश्रद्धा भोळया समजुती अनिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपले कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका व्यसनाच्या आहारी जाऊ नका, देवधर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातीभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांचे मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरु माणिक मी कोणाचा गुरु नाही मला कोणी शिष्य नाही असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या गोळया लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा प्रामुख्याने वैदर्भीय बोलीचा उपयोग करत असत. त्यांनी दहा कलमी कार्यक्रम समाजापुढे ठेवला.

१. भुकेलेल्यांना अन्न द्या.
2. तहानलेल्यांना पाणी द्या.
3. वस्त्र नसणाऱ्यांना कपडे द्या.
4. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करा.
5. ज्यांना घर नाही त्यांना निवारा आसरा द्या.
6. बेरोजगारांना काम धंदा रोजगार द्या.
7. अंध, अपंग रुग्णांना औषधे द्या.
8. मुक्या प्राण्यांना अभय द्या.
9. गरीब तरुण-तरुणींचे लग्न करून द्या.
10. दुखी व निराशांना हिम्मत द्या.

गाडगेबाबांनी दिलेली दशसूत्री म्हणजे मानव मुक्तीचा जाहीरनामाच होय. दशसूत्रातील प्रत्येक सूत्र हे माणुसकीचा गहिवर होय. गाडगेबाबांच्या दशसूत्रातील सेवेपेक्षा जगातील कुठलाही देव मोठा नाही. म्हणूनच म्हणावेसे वाटते की ख्रिस्तांची करुणा बुद्धांची अहिंसा श्रीकृष्णाचा कर्मवाद यांचे विलक्षण मिश्रण होते.

**माणसात देव शोधावा :**

अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे गाडगेबाबा होते. तिर्थी धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. देवळात जाऊ नका, मूर्ती पूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी पुराने, मंत्रतंत्र, देव देवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका अशी

शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यातील पैशातून रंजल्या गांजल्या अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालय, आश्रम शाळा व विद्यालय सुरू केली. दीनदुबळे अपंग अनाथ हेच त्यांचे देव या देवातच गाडगेबाबा अधिक रमत असत.

**किर्तनाच्या मार्गाचा अवलंब :**

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगाचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. देव भोळ्या माणसापासून ते शहरीनास्तिकापर्यंत कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपले कीर्तनात गुंतवून ठेवत असत. त्यांनी नाशिक देहू आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालय बांधली. अनेक नद्यानकाठी घाट बांधले. अतिशय गरीब अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली. कुष्ठरोग्यांची सेवा केली. महाराष्ट्रातील संत परंपरा बाबत ज्ञानदेव रवीला पाया तुका झालासे कळस असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी विसाव्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ असे याचा अर्थ उद्गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत.

समाजातील अंधश्रद्धेवर गाडगेबाबांनी कडाडून प्रहार केला. माणसाच्या मनावर हजारो वर्षापासून बसलेले हे अंधश्रद्धेचे भूत त्यांनी उठवायचे होते त्यासाठी बाबांनी सत्यनारायणाच्या कथेचा हिमतीने उपहास केला. भोंदू बाबांची खेडी उडवली, धर्मांधता, ढोंग, अंगात येणे, करणी कवटाळ, जंतर-मंतर या सर्व गोष्टी खोट्या मानाव्या देवापुढील मुख्य प्राण्यांचे बळीला विरोध केला बोकुड कापल्याने दगडाचा देव प्रसन्न होतो ही खुळी अंधश्रद्धा घालून लावली आणि बळी हा प्रकार बंद केला. दगडाचा देव आणि पाण्याचे तीर्थ केवळ पैसे कमविण्याची साधन आहे म्हणून तीर्थी धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी अशा खऱ्या देवाचे आश्रयस्थान दाखविले. बाबांनी समाजाला कर्मकांड, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, देवधर्म, सोवळे ओवळे, समाधी, साक्षात्कार, लोभ मोह या सगळयातून मुक्त होण्याचा मूलमंत्र कीर्तनातून दिला.

गाडगेबाबा निरक्षर होते परंतु अक्षर याजेचे आनंदयात्री होते. सागर प्रमाणे अफाट पसरलेल्या बहुजन समाजाचे आजच्या दुःखाचे मूळ अज्ञानात आहे हे त्यांनी नेमके हेरले होते. म्हणून शिक्षणावर अधिक भर दिला. समाजातील शेवटचा माणूस शिकला पाहिजे ही त्यांची तळमळ बाबांना होती. ऐपत नसेल तर घरातील भांडी विका पण मुलांना शिकवा ही त्यांच्या हृदयाची आर्त हाक होती.

श्रीमंतांनी गरिबांना शिक्षणासाठी मदत करावी ही अपेक्षा बाबांनी केली. शिक्षणातून ज्ञानी माणूस शहाणा माणूस निर्माण करण्यावर बाबांचा भर होता. सेवा हे शिक्षणाचे अंतिम ध्येय असले पाहिजे. शिक्षण आणि माणूस हा माणूस होतो जगात माणूस इथून तिथून एकच आहे. माणसात भेद निर्माण करणाऱ्या जाती धर्म पंथ असे ते माणिक नसत. माणसाची खरी प्रतिष्ठा त्याच्या ज्ञानावर व त्यांनी केलेल्या जनहिताच्या कामावर अवलंबून असते जातीवर नसते म्हणून समाजातील जातीभेद मोडून समाज शुद्ध पायावर उभा राहण्यासाठी बाबा आपल्या कीर्तनातून सांगत असत. यासाठी प्रत्येकाने शिक्षण रुपी अमृताच्या पानपोई वर गेले पाहिजे. माणुसकीयुक्त माणूस बनवणे हा बाबांचा ध्यास होता. बुडती हे जन न देखावे डोळा या तळमळीतून समाजातील उपेक्षित अंध अपंग गरीब माणसात ईश्वर शोधणाऱ्या बाबांनी जी च्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. ठीक ठिकाणी अन्नछत्र सुरू केले. गरीब मुलं मुलींसाठी आश्रम शाळा काढून माणसाचे उन्नयन करण्याचा प्रयत्न केले.

अशाप्रकारे नवा समाज निर्माण करण्याचे स्वप्न पाहणारे आणि यासाठी कृती करणारे दगडातील नवे तर माणसातील देव शोधणारे स्वच्छतेचे मूलमंत्रण देणारे अंध अपंग गोरगरीब यांची सेवा करणारे आणि इतरांना करायला लावणारे मुख्य प्राण्यांच्या गोळीला विरोध करणारे शिक्षण हे माणसाचा तिसरा डोळा आहे म्हणून संबोधणारे खरा ईश्वर कोण हे पटवून देणारे यासाठी माणूस जोडून नव्या चैतन्य राष्ट्राची बांधणी करणारे संत गाडगेबाबा 20 डिसेंबर 1956 रोजी ब्रह्मलीन झाले.

सांप्रतकाळातील भीषण समाजवास्तव बदलविण्यासाठी बाबांनी दिलेल्या विचारांचा आणि कृतीचा ठेवा प्रत्येक माणसाने जोपासला पाहिजे. स्वार्थ त्या गुण लोक सेवा करणे आणि इतरांना आपल्यासारखी बनविणे ही बाबांची अपूर्ण इच्छा पूर्ण करायची असेल तर त्यांच्या विचारांची आणि कृतीची धग थंड होऊ देता कामा नये.

**संदर्भ ग्रंथ**:

१) श्री गाडगे महाराज गौरव ग्रंथ - प्राचार्य रा. तु. भगत

२) श्री संत गाडगेबाबा - प्रबोधनकार के. सी. ठाकरे

३) श्री गाडगे महाराज - गोपाल नीलकंठ दांडेकर

४) श्री संत गाडगे महाराज - मधुकर केचे

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# समर्थ रामदासांची सिद्धान्तविषयक संकल्पना

**डॉ. सचिन देशपांडे**
संस्थापक सचिव, फॉउंडेशन फॉर अँशियंट इंडियन फिलॉसॉफी अँड मेडिसिन, पुणे
**Corresponding Author:** **डॉ. सचिन देशपांडे**
**Email:** drsachindeshpande@yahoo.com
**DOI-10.5281/zenodo.14546717**

**सारांश:**

समर्थ रामदास हे सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समकालीन संत आणि तत्त्वज्ञ महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांनी देशभरामध्ये मठांची स्थापना केली. त्यांचे मुख्य वास्तव्य चाफळ, सज्जनगड आणि शिवथरघळ या ठिकाणी होते. ही सर्व ठिकाणे दक्षिण पश्चिम महाराष्ट्रात आहेत. यांपैकी शिवथरघळ या ठिकाणी वास्तव्यास असताना त्यांनी दासबोध या ग्रंथाची रचना केली. दासबोध हा साहित्याचा तसेच ग्रंथनिर्मितीचा उत्तम नमुना म्हणावा लागेल. या ग्रंथात विविध असे वीस दशक आणि आणि प्रत्येक दशकमध्ये दहा समास असून त्याची रचना वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. सिद्धान्त या विषयावर पूर्णपणे वाहिलेले दशक व समास असून सिद्धान्तशास्त्राची मीमांसा त्यामध्ये केलेली आढळते. सदर लेखामध्ये समर्थ रामदास यांच्या सिद्धान्तविषयक तत्त्वज्ञानाचा उहापोह केलेला आहे.

**दासबोधाची पार्श्वभूमी:**

संत रामदास यांना समर्थ रामदास असेही संबोधले जाते. याचे कारण म्हणजे त्यांची असलेली परकोटिचि हनुमान भक्ति व केलेली बलाची उपासना होय. जाम्ब या नाशिकजवळ स्थित अशा गावी त्यांच्या घरात रामोपासनेची दीर्घ परम्परा होती. अगदी लहान वयातच त्यांना अध्यात्म आणि भक्तिमार्गाविषयी रुची निर्माण झाली. त्यातूनच त्यांनी संन्यास आणि भक्तिमार्गास वाहून घेण्याचा निर्णय घेतला आणि पूर्ण बहात्तर वर्षे या माध्यमातून मोठी सेवा केली. देशभर परिक्रमा आणि तप आणि उग्र अनुष्ठान केल्यानंतर त्यांचे मुख्य राहणे सुरुवातीस चाफळ, शिवथरघळ व शेवटची काही वर्षे सज्जनगड येथे होते. यापैकी मुख्यत्वेकरून शिवथरघळ येथे असताना त्यांनी दासबोध या महान ग्रंथाची रचना केली. सदर ग्रंथामध्ये तत्वज्ञान, नीति, अध्यात्म या विषयांस वाहिलेले वीस दशक आणि प्रत्येक दशकात दहा असे एकूण दोनशे समास आहेत. ग्रंथाची रचना अत्यन्त वैशिष्ट्यपूर्ण अशीच आहे. भाषासौष्ठव काव्यप्रतिभा आणि अत्यन्त उच्च दर्जाचे तत्वज्ञान यांचा उत्कृष्ठ असा वाङ्मयीन मिलाफ दासबोधामध्ये आढळतो. मेरुस्वामी यांनी म्हटल्याप्रमाणे,

कृपासिंधु उचंबळला | परमार्थरूप ग्रंथ केला ||
जो कल्प कोटी आला | उपेगासि ||
श्रवण करिता दासबोध |तात्काळ उपतिष्टे प्रबोध |
तुटे संसार सम्बन्ध | मननमात्रे ||
दासबोधीं समर्थ निवास |ग्रंथीं वरदान निजध्यास |
निजध्यासें चि प्रत्ययास |येत ग्रंथस्वरूपे ||

समर्थ साधन वर्णन करताना म्हणतात;

साधन अभ्यास आणि सद्‌गुरु |सच्छिष्य आणि सच्छास्त्र विचारु |
सत्कर्म सद्भावना पारु |पाववी भवाचा ||
सदुपासना सत्कर्म |सत्क्रिया आणि स्वधर्म |
सत्संग आणि नित्यनेम |निरन्तर ||
ऐसे हे अवघेचि मिळे |तरीच विमळ ज्ञान निवळे |
नाही तरी पाषांड संचरे बळे | समुदायीं ||

साधन, अभ्यास, सद्गुरु, सच्छिष्य सच्छास्त्र विचार, सत्कर्म, सद्वासना, सदुपासना, स्वधर्म, सत्संग आणि नित्यनेम ही अकरा जीवनमूल्ये आहेत. शाश्वत आणि विमळ ज्ञानासाठी तसेच उत्तम समाजनिर्मितीसाठी ही मूल्ये आवश्यक आहेत. दासबोध हा ग्रंथ म्हणजे तत्त्वज्ञानाच्या सर्व शाखा म्हणजे सद्वस्तूशास्त्र, तर्क, ज्ञानमीमांसा, नीतिशास्त्र यांचे एक

अभ्यासपूर्ण आणि दीर्घ परिशीलनच होय. समर्थ रामदास यांचा प्राचीन भारतीय तत्वज्ञान, दर्शने, उपनिषदे या सर्वांचा गाढा अभ्यास आणि व्यासंग तर होताच पण याचबरोबर उग्र तपश्चर्या आणि संन्यासधर्म यामुळे अध्यात्माची एक महान अशी उंची दासबोधामध्ये निर्माण होते. त्यामुळे कितीही वेळा दासबोध पठण केला तरी नवनवीन सत्ये गंभीरपणे अभ्यासणाऱ्या अभ्यासकास अनुभवास येतात. समर्थांना जगास जे सांगावयाचे होते ते त्यांनी दासबोधाच्या माध्यमातून सांगितले. समर्थ ग्रंथा च्या शेवटी म्हणतात;

भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेची वचने । तो हा दासबोध ।।
वीस दशक दासबोध| श्रवणद्वारें घेतां शोध ।
मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो।।
वीस दशक। दोनीसें समास।साधकें पाहावें
सावकास। विवरतां विशेषाविशेष।कळों लागे।।

दासबोध हा जरी अध्यात्मज्ञानाचा ग्रंथ असला तरी माणसास रोजच्या जीवनात मार्गक्रमण करत असताना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. ज्ञान, तर्क आणि नीती यांच्याद्वारे आयुष्य कसे अर्थपूर्ण, सुंदर बनवावे याचा परिपाठच या ग्रंथात आढळतो. अध्यात्ममार्गावर जात असताना प्रपंचाकडेही दुर्लक्ष होऊ नये यांकडे समर्थ विशेष लक्ष वेधतात. पण मनातून शंका काढून टाकून श्रद्धेने जर मार्ग स्वीकारला तर अध्यात्ममार्गावर साधकाची प्रगती होऊ शकते. दासबोध याचे सर्वार्थाने आपणास मार्गदर्शन करतो.

**दासबोधातील सिद्धांतनिरूपण:**

सिद्धांतनिरूपण हा समास दासबोधामध्ये दोन ठिकाणी आढळतो. एक म्हणजे अकराव्या भीमदशक या दशकाच्या सुरुवातीला आणि दुसरे म्हणजे आत्मदशक या पंधराव्या दशकाच्या शेवटी. तत्वज्ञानामध्ये सिद्धांत या शब्दास अनन्यसाधारण महत्व आहे. खरे तर विज्ञानामध्येही या शब्दास अनन्यसाधारण महत्व आहे. न्यायदर्शनामध्ये सिद्धांत हा विशेषत्वाने उल्लेख केलेला आढळतो. पण हा अभ्यासताना आधीच्या दहा दशकां मध्ये काय वर्णन आहे हे अत्यंत महत्वाचे ठरते. कारण कोणताही ग्रंथ अभ्यासताना क्रमशः अभ्यासणे आवश्यक असते. त्याशिवाय पुढील भूमिका व्यवस्थित समजत नाही. या दोन्हीं समासामध्ये सिद्धांतनिरूपण दिलेले आहे पण थोडा फरक आहे आणि बरीचशी साम्यस्थळेही आहेत. यातील महत्वाचे साम्य म्हणजे आत्मा, अद्वैत आणि चंचळ निश्चळ यांचा तात्विक उहापोह.

हा तात्विक उहापोह अत्यंत गहन असा आहे. भीमदशकातील समासामध्ये प्रथमतः सृष्टी उत्पत्ती आणि संहारण क्रम वर्णन केलेला आढळतो. समर्थ म्हणतात, आकाशापासून वायू होतो, वायूपासून अग्नी आणि पाणी तयार होते, त्यानंतर पुढे पाण्यापासून पृथ्वी तयार होते. या पृथ्वीमध्ये अनेक प्रकारची बीजे निर्माण होतात, त्यातून वनस्पती आणि प्राणी निर्माण होतात. विश्व हे कल्पनास्वरूप आहे. कल्पना, अष्टधा प्रकृति (पाच महाभूते व तीन गुण), मूळमायायांतून मूर्त सृष्टीची निर्मिती झाली व ती फोफावली, जडत्वास आली व दृश्य आकार धारण केला. पण याच्या मागे जे आहे ते मूळ ब्रह्म होय. हा विश्वनिर्मिती प्रवास अमूर्त ते मूर्त असा आहे.

हा वर्णन केलेला क्रम वैशिष्ट्यपूर्ण आहे. आकाश ते वायु ते तेज-पाणी ते पृथ्वी अशी विकसनाची प्रक्रिया आहे. विश्वनिर्मितिच्या सुरुवातीस एक पोकळी होती आणि आधुनिक भौतिकशास्त्रानुसारही या पोकळीतूनच ऊर्जा आणि वस्तुमान यांच्या परस्परसंबन्धाने मूर्त स्वरूपातील गोष्टी तयार झाल्या. लक्षावधी वर्षांच्या कालखण्डामध्ये जीवनिर्मिति झाली ही उत्क्रान्त होत गेली; एकपेशीय, बहुपेशीय असे जीव तयार होत गेले. यांतूनच पुढे अत्यन्त प्रगत असा मनुष्य निर्माण झाला. हे सर्व नियन्त्रित करणारी एक जैविक-गणितीय शक्ति सृष्टि नियन्त्रणाचे काम करत असल्याशिवाय शिस्तबद्ध रीतीने होणारी उत्क्रान्तिही होणे शक्य नाही. म्हणजेच तार्किक दृष्ट्या व कार्यकारण सिद्धांतानुसारही निर्मितिमागे एक नियन्त्रक शक्ति असणे आवश्यक आहे. या शक्तिस ब्रह्म असे संबोधले आहे. निश्चळ आणि चञ्चळ अशी दोन स्वरूपे किंवा तत्त्वे आहेत.

निश्चळामधें चञ्चळ | ते चि कल्पना केवळ | अष्टधा
प्रकृतीचें मूळ | कल्याणरूप ||
मुळीं कल्पनारूप जाली | पुढें तेचि फ़ापावली |
केवळ जडत्वास आली |सृष्टी रूपें ||

हा निश्चळ आणि चंचळ यांचा क्रमविकास पुढे मूर्त स्वरूपाच्या विश्वातील गोष्टींसाठी कारणीभूत आहे. हे सगळे फोपावले जडत्वास आले असेही म्हटले आहे. म्हणजेच हा

प्रवास विस्तार आणि वस्तुमान प्राप्त होणे असा म्हटला पाहिजे. विस्तार आणि वस्तुमान हे नूतन भौतिकशास्त्राने सिद्ध केले आहे. बोहर, आइनस्टाइन, न्यूटन यांचे सिद्धान्त या प्रक्रियांना सूचितच करतात. निश्चळ स्वरूपात असणारे तत्त्व चलीभूत होण्यासाठी एक शक्ति आवश्यक असते. शक्ति-ऊर्जा आणि वस्तुमान यांचा परस्परसंबंध आहे. ही चलीभूतता सजीव आणि निर्जीव (जैविक व्याख्या) या दोन्हीसाठी आवश्यक आहे. सुरुवातीस वायु आप पृथ्वी तत्वाचे मूर्त वस्तुमानस्वरूप जड विश्व आणि पुढील स्तरावर क्रमविकासाने निर्माण होणारे जैविक तत्त्व म्हणजेच जीवसृष्टी अशी निर्माण झाली आहे. यामध्ये पंच महाभूते आणि त्रिगुण (सत्त्व, रज आणि तम ) यांस विशेष महत्व आहे. जीवसृष्टीही पुढे विस्तारीत होऊन वनस्पती व प्राणी यांच्या विविध जाति प्रजाति निर्माण झाल्या. जैविक आणि अजैविक सृष्टीची निर्मिती ही अशा प्रकारे होते यावर समर्थांनी भर या समासात दिला आहे.

पुढे समर्थांनी सृष्टी संहार प्रक्रिया अन्दाजे कशी होऊ शकते याचेही वर्णन केले आहे.

तेथे जीवशिव पिंडब्रह्मांड | आटोन गेले थोतांड |
माये अविद्येचें बंड | वितळोन गेले ||

पुढे परमात्मा स्वरूप वर्णन करताना समर्थ म्हणतात;

राव रंक ब्रह्मादिक | सकळांमधें वर्ते येक |नाना
शरीरें चाळक | इन्द्रियें द्वारें ||
त्यास परमात्मा बोलती |सकळ कर्ता ऐसें जाणती |
परि तो नासेल प्रचिती | विवेकें पाहावी ||

हा सर्व प्राणिमात्रांमध्ये उपस्थित असणारा परमात्मा एकच आहे व तो सर्व प्राणि मात्रांचे व्यवहार चालवितो. हे व्यवहार तो इन्द्रियां मार्फत चालवितो. यांस समर्थ जगज्जोती असेही म्हणतात.

अनेक प्राणि निर्माण होती | परी येकचि कळा
वर्तती | तयें नाव जगज्जोती | जानतीकळा ||

ही जगज्जोति सर्व प्राणिमात्रामध्ये परमात्मस्वरूपात राहत असते. इंद्रियगम्यता हे प्राणिमात्रांचे प्रधा न लक्षण आहे आणि हे जीवज्जोतीद्वारे होत असते.. आत्मा, अंतरात्मा, विश्वात्मा, चैतन्य, सर्वात्मा, सूक्ष्मात्मा, जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा, द्रष्टा, साक्षी, सत्तारूप ही परमात्म्याची आणखी नावे आहेत. जगदज्योती चंचळ स्वरूप असते. निश्चळ हे त्यापलीकडे असते. जगज्जोती विकारात्मक असते. निश्चळ निर्विकार आहे. निश्चळ आणि चंचळ यांचा विवेक करणे अध्यात्ममार्गासाठी अत्यंत आवश्यक आहे. आरंभ, मध्य आणि अखेर या तिन्ही अवस्थांमध्ये जे विकाररहित आहे, ते परब्रह्म होय.

आद्य मध्य अवसान । जे वस्तु समसमान ।
निर्विकारी निर्गुण निरंजन । निःसंग निःप्रपंच ।।

समर्थांची ही भूमिका सृष्टीव्युत्पत्तीवर प्रकाश टाकते. सुप्त स्वरूपात असणाऱ्या ऊर्जास्रोतांसाठी एका प्रक्रियकाची आवश्यकता असते, ज्यामुळे नवनिर्मिती शक्य होते. गुणांच्या अधीन राहिले तर निर्गुणाचे ज्ञान होऊ शकत नाही. इंद्रियजन्य ज्ञानास सीमा असते, परब्रह्माचे ज्ञान इंद्रियाद्वारे होऊ शकत नाही. समर्थांनी येथे विज्ञानाचेही तत्त्वज्ञान सांगितले आहे. इंद्रियावर विसंबून राहिले तर खरी ज्ञानप्राप्ति होऊ शकत नाही हे अत्यंत महत्वाचे तत्व आहे. भारतीय ज्ञानमीमांसा ही पाश्चात्य ज्ञानमीमांसेपेक्षा त्यामुळेच वेगळी ठरते.

**शाश्वताचा शोध:**

असे आणखी सिद्धांतनिरुपण समर्थांनी पंधराव्या दशकाच्या दहाव्या समासात वर्णन केले आहे. अंतरात्म्याचा शोध, निश्चळाची धारणा आणि अद्वैताचा अनुभव या सर्वांचे वर्णन या समासात आढळते. या भासमान विश्वामध्ये सत्याचा आणि शाश्वताचा शोध साधकाने करावा. यासाठी आवश्यक आहे विवेक ! विवेकाच्या मार्गाने निश्चळाची धारणा करावी. अज्ञान ते ज्ञान, वृत्ती ते निवृत्ति, चंचळ ते निश्चळ असा हा साधकाचा प्रवास विवेकाच्या मार्गाने साधकाने करावा असे समर्थ सांगतात. शब्द, कल्पना, मन, बुध्दि या सर्वांच्या पलीकडे जाऊन शाश्वताचा शोध घ्यावा लागतो. तार्किक बुध्दि प्रत्येक वेळी उपयुक्त नसते. शाश्वताच्या शोधासाठी इंद्रियगम्यतेच्याही पलीकडे जावे लागते. तर्क, कार्यकारण दरवेळी उपयोगी येईलच असे नसते.

उत्तम जाणीवेचा जिनस । समजोन पाहे सावकास
। निराभास ते आकाश ।भास मिथ्या ।।
उदक पसरे वायो पसरे । आत्मा अत्यंतचि पसरे
।तत्त्वें तत्त्व अवघेंचि पसरे।अंतर्यामी ।।
चळतें आणि चळेना तें ।अंतरीं अवघेंच कळतें ।विवरणेंचि
निवळतें । प्राणीमात्रासी ।।

निरंतर मनन आणि चिंतन करून साधक निवृत्तिपदाला पोचतो. शुद्ध जाणीवेने निरंतर व सावकाश समजून घेतले तर अंतर्यामी गोष्टी स्पष्ट होऊ लागतात. व्यापक अनुभव हे क्रमशः येऊ लागतात. ही जाणीव भ्रमनाशनाची प्रक्रिया आहे. मिथ्यत्व हे भासमान विश्वामध्ये आहे. ही भासामानात ज्ञानाने नाहीशी करावी लागते. देव - भक्त, उपासना -उपास्य यातील एकत्व जेव्हा कळते तेव्हा द्वैत नष्ट होते. चंचळ काय व निश्चळ काय तेही समजते. परब्रह्म निश्चळाशी तादात्म्य घडते. ही अद्वैत अनुभवाची अवस्था असते. "जॊ शाश्वत शोधीत जातो तो निर्विकारी एकरस होऊन ज्ञानी बनतो त्याचा देह प्रारब्धाने वावरतो. त्याच्या वासना दग्धबीज होतात."

देहाभिमानात मनुष्य अडकून पडला की तो फक्त देह आणि तद्नुषंगाने येणाऱ्या वासना यांच्यातच लिप्त होऊन राहतो. अशा व्यक्तीस निश्चळ काय आहे हे समजणे शक्य नाही. विवेकी आणि विचारवंत व्यक्ती किंवा साधकास हे समजू शकते. पण हे सोपेही नाही. निरंतर मनन चिंतन निदिध्यास यामार्गे निश्चळा शी तादात्म्य पावता येते. ज्ञान प्राप्त झाले की मनात ब्रह्म विचार स्थिर होऊन जातो व कोणतेही भय उरत नाही.

**सिद्धांतविवेचन:**

वरील वर्णन केल्याप्रमाणे दोनही सिद्धांत निरूपण अध्यायामध्ये सिद्धांताविषयी निरूपण खोलवर केलेले आढळते. भीमदशकातील समासात सृष्टी उत्पत्ती आणि परमात्मा याचे विवेचन आढळते, तर आत्मदशकातील समासात अंतर्ज्ञानाचा प्रवास साधकाने कसा करावा याचे वर्णन आहे. तत्त्वज्ञान आणि अध्यात्म या दोनही अंगाने हे विवेचन केलेले आहे. उत्पत्ति, उत्क्रांति यांची मूलभूत तत्त्वे; तसेच जाणीव प्रक्रियेतील अध्यात्माची मूलभूत तत्त्वे असे हे सुंदर विवेचन आहे. त्यामुळेच यास सिद्धांतनिरुपण असे संबोधले आहे. कॉस्मॉलॉजिकल लॉ, मेटाफिजिकल लॉ आणि स्पिरिच्युअल लॉ याचे हे सुंदर उदाहरण म्हणता येईल.

**संदर्भ:**

1. समर्थ रामदास कृत सार्थ श्रीमत दासबोध: संपादन व अनुवादन: प्रा. के. वि. बेलसरे, प्रकाशक: समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड, १९७५, पंचविसावी आवृत्ति २०१३.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.5 No.43** **Nov-Dec 2024**

# कृष्णनीती आणि कृष्णमूर्ती

**डॉ. शर्मिला जयंत वीरकर**
तत्त्वज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ
**Corresponding Author: डॉ. शर्मिला जयंत वीरकर**
**Email:** sharmila.virkar@philosophy.mu.ac.in**I**
**DOI- 10.5281/zenodo.14546547**

**सारांश:**

म.त.प.च्या चाळिसाव्या अधिवेशनाची मध्यवर्ती संकल्पना आहे "महाराष्ट्रातील समकालीन तत्त्वचिंतन".महाराष्ट्रात सुरुवातीपासून ज्ञानेश्वरांसारख्या संतांनी गीतेतील नीतीचा अवलंब व पुरस्कार केला. त्यानंतर गीताविचार सातत्याने नवनव्या संदर्भात मांडला गेला. विसाव्या शतकात लोकमान्य टिळक, सदाशिवशास्त्री भिडे, ज.स.करंदीकर, का.वा.लेले, गुरुदेव रानडे, पांडुरंगशास्त्री आठवले, पं.सातवळेकरगुरुजी, आचार्य विनोबा भावे व एकविसाव्या शतकात राजीव साने इत्यादींनी आपापल्या दृष्टीने गीतेतील पार्थासाठीची कृष्णनीती स्पष्ट केली. जिद्दू कृष्णमूर्तींनी गीताच नव्हे तर एकूण एक धर्मग्रंथ,परंपरा, सांस्कृतिक संचित, असा कोणताही आधार न घेता स्वतंत्र वाट काढली.महाराष्ट्रात त्यांचा प्रभाव फारसा दिसत नसला, तरी त्यांची "जीवनभाष्ये" विमलाबाईंनी मराठीत आणली. त्यांचे पती प्रा. पु. य. देशपांडे ह्यांनी कृष्णमूर्तींचे म्हणणे समजून घेतले आणि अंधानुकरण न करता आपली वाट निवडून परंपरेचा नवा अर्थ लावला. मानवोपनिषद, खरा पातंजलयोग ह्यांसारखे ग्रंथ लिहिले. बुद्ध आणि ज्ञानेश्वर जसे दिसले, तसे चितारले, शब्दबद्ध केले. दुःखापासून मुक्ती मिळविण्याचा मार्ग कोणता असतो, हा महाराष्ट्रातील समकालीन तत्त्वचिंतनातील एक प्रमुख प्रश्न होय. म्हणून, ह्या संदर्भात, कृष्णनीती आणि कृष्णमूर्ती ह्यांचा एकत्रित विचार मांडत आहे.

**प्रस्तावना:**

सुरुवातीला एक मुद्दा स्पष्ट करणे आवश्यक आहे.'कृष्णनीती' म्हणताना मला येथे अभिप्रेत असणारी नीती म्हणजे अर्जुनासारख्या असंख्य जिवांना परब्रह्मापर्यंत घेऊन जाणारी श्रीमद्भगवद्गीतेत सांगितलेली नीती.आपणां सर्वांना माहीत आहे की मोक्षप्राप्तीसाठी गीतेत प्रामुख्याने ज्ञान, भक्ती व कर्म हे मार्ग सांगितलेले आहेत. केवळ ज्ञानाने मोक्ष मिळविणारे थोडे असतात; सरसकट सर्वांना ज्ञानमार्ग झेपणारा नसतो. ज्यांच्यात नित्य-अनित्यवास्तुविवेक असतो, वैराग्य असते, शमादमासारखे सद्गुण असतात आणि मुख्य म्हणजे मोक्ष मिळविण्याची दुर्दम्य इच्छा (मुमुक्षुत्व) असते, त्यांसच हा मार्ग उपलब्ध असतो. भक्तिमार्ग मात्र सर्वांस खुला असतो. ईश्वरापुढे नतमस्तक होणे सर्वांस शक्य असते. भक्तीमुळे अंतःकरण शुद्ध होते आणि चित्तशुद्धीमुळे पुढील आध्यात्मिक प्रवास सुकर होतो. कर्म सहज साधते. कर्ममार्ग हा सर्वसामान्यांसाठी सर्वोत्कृष्ट असल्याने लोकमान्य टिळकांनीही आपल्या गीतारहस्यात "कर्मयोगो विशिष्यते"[i] हा गीतेचा उपदेश अधोरेखित केला आहे.ज्ञान, कर्म आणि भक्ती ह्या मार्गांचा विचार येथे दुसऱ्या भागात मांडला आहे तर तिसऱ्या भागात कृष्णमूर्तींना अशा प्रकारची कृष्णाचीच नव्हे तर कोणाचीही नीती मान्य नाही. नीती, धर्म, शिक्षण, इत्यादी रूढ, पारंपारिक, साचेबद्ध संकल्पना माणसास जखडून टाकतात, बांधतात, बंधनकारक असतात.त्यांना कृष्णमूर्तींनी नवीन अर्थ दिला.तो आपल्याला आज योग्य वाटतो का, हा प्रश्न आहे.

माझ्या मते, कृष्णनीतीत, गीतेनुसार, ज्या तीन मार्गांचा अवलंब केला जातो, त्यात "सर्वभूतहितेरता:"[ii] व "लोकसंग्रह" [iii]समाविष्ट असलेली कृष्णनीतीतील ''ब्राह्मी स्थिती''[iv] जरी वरकरणी कृष्णमूर्तींच्या "निवडरहित जागरुकते"सारखी (Choiceless Awareness) वाटली, तरी त्यात लोकसंग्रहाची विश्वकल्याणाची, ग्वाही आहे, कल्याणाचे आश्वासन आहे; कृष्णमूर्ती असे कोणतेही आश्वासन, दिलासा देत नाहीत. केलेले काहीही फुकट जात नाही; अगदी लहान कर्मही फार मोठया भयापासून सुटका करून आपल्याला तारते, असे गीतेत निःसंदिग्ध शब्दात म्हटले आहे[v]. हे कृष्णमूर्तींचे म्हणणे नव्हे.

मात्र, कृष्णनीती व कृष्णमूर्ती ह्या दोन्ही वाटा आज आपल्याला उपलब्ध असतात. कंटाळवाण्या, रटाळ

आयुष्याचा वीट येत असेल आणि त्यातून बाहेर पडून सृजनशील, नावीन्यपूर्ण वाटेचा ध्यास असेल, तर कृष्णमूर्तीही आहेत, हे नवीन पिढ्यांपर्यंत पोहोचावे, म्हणून कृष्णनीती व कृष्णमूर्ती. "ज्ञानयोगेन सांख्यानां, कर्मयोगेन योगिनाम्" असे म्हणत भगवान श्रीकृष्ण ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग सुचवितात. वेगवेगळ्या प्रकारे लहान मुलाची समजूत घालावी, तशी विविध कारणे देत कर्म मार्गाचे प्रतिपादन करतात आणि कर्म निष्काम, निरहंकार, अनासक्त असावे, असा उपदेशही करतात. ह्याच मार्गाने जनकादिंनी संसिद्धी मिळविली, ह्याची आठवण करून देतात आणि ज्ञानोत्तर कर्माचे प्रतिपादन करतात आणि काहीही मिळवायचे नसूनही ते स्वतः कसे कार्यरत आहेत, हे सांगतात. कर्माची गती गहन असते आणि जाणत्यांनाही संभ्रमात टाकते. सर्व कर्मांची परिणती ज्ञानात होते. ज्ञाननौका सर्वांना तारक ठरते. ज्ञानाग्नीत सर्व कर्मे जळून खाक होतात. संशयात्मा टिकत नाही; श्रद्धावानाला ज्ञान लाभते, इंद्रियनिग्रह साधतो व शांती मिळते. निर्द्वंद्व, योगयुक्त स्थितीत सर्वांकडे समत्वाने पाहिले जाते. ज्ञानाइतके पवित्र काहीही नसते. भक्ती पवित्र असते. मुख्य म्हणजे दुर्बळही भक्तीच्या मार्गाने जातात आणि उत्तम गती प्राप्त करतात. परमेश्वरास पत्र, पुष्प, फल, तोय अर्पण करावे, त्याचे सर्वोच्च स्थान जाणावे; त्याचे चराचरातील अंतर्यामीत्व, अतीतत्व, सर्वश्रेष्ठत्व, सार्वभौमत्व दिव्य चक्षूंनी जाणून त्यास अनन्यभावे शरण जाणे म्हणजे भक्तिमार्ग. अव्यक्त उपासनेत क्लेश अधिक; सगुण भक्ती सोपी; परमेश्वर सर्व सृष्टीचे मूळ कारण; तो क्षेत्रज्ञ, तो त्रिगुणातीत. त्याचाशी आपले असणारे नाते जाणले की दुःखमुक्ती. अशी ही कृष्णनीती.

जन्मल्यापासून सतत आपल्यावर विविध संस्कार होत असतात. ज्या अनुभवांना आपण सामोरे जातो, जे सांस्कृतिक संचित आपल्यापर्यंत येते, जो तात्त्विक वारसा, ज्या परंपरा आपण जपतो, त्या सर्वांवर काट मारायची शिकवण कृष्णमूर्ती आपणांस देतात. भूतकाळ आपल्यावर स्वार झालेला असतो आणि त्यावेळी आलेल्या अनुभवातून आपण घडत जातो, शिकत जातो. 'अनुभव हा फार मोठा गुरु असतो', 'ग्रंथ हेच गुरु' ह्यांसारखे सुविचार आपण उद्धृत करतो; त्यांवर विश्वास ठेवतो. मात्र ह्या अशा संस्कारांमुळे, भूतकाळामुळे, भूतकाळाच्या वर्चस्वामुळे, जुन्या समजुती, पूर्वग्रह मनात घट्ट रुजल्याने आपण साचेबद्ध जीवन जगतो; ठराविक चाकोरीला सरावतो.त्यातच स्वतःला सुरक्षित मानतो आणि तशा जीवनाला सौख्यकारक, शांत, परिपूर्ण, आदर्श मानतो.मात्र कालांतराने त्याची सवय होते आणि ती चाकोरी, नित्यक्रम कंटाळवाणा वाटतो. त्यातून फारसे काही निष्पन्न होत नाही. काय कुठे चुकते, हे समजेनासे होते. मनःशांतीसाठी मग आपण वेगवेगळे उपाय करू लागतो.वेगवेगळी व्रते, नवस, पंथ, संप्रदाय धुंडाळू लागतो.त्यास कृष्णमूर्ती 'विंडो-शॉपिंग' म्हणतात. म्हणजे वेगवेगळ्या तत्त्वांचा परिचय आपल्याला तोंडदेखला होतो. मग त्यात उतरून त्यांचा सखोल अभ्यास कृष्णमूर्तींना अभिप्रेत आहे का, तर त्याचेही उत्तर नकारात्मक द्यावे लागेल.कारण कोणताही वाद, सिद्धांत, तत्त्वप्रणाली, तत्त्वचिंतन बंधनकारक असते.आपण ते तत्त्व समजून घेताना जणू त्याच्या कब्जात जातो आणि आपले स्वातंत्र्य लुप्त होते.म्हणून कोणत्याही विशिष्ट तत्त्वाचा अंगीकार न करता नित्यनूतन सृष्टीला सातत्याने लक्षपूर्वक सामोरे जाणे त्यांनी सुचविले आहे.लक्षपूर्वक म्हणजे अवधानाने.सृष्टीत सतत बदल होत असतात. परमेश्वर, आत्मा, परमात्मा, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, अशा कोणत्याही चौकटींमध्ये न अडकता आपल्या अवतीभवती घडून येत असलेले नैसर्गिक बदल टिपणे, त्यामुळे होणारा आल्हाद अनुभवणे, माणसांमाणसांमधील गुणवैशिष्ट्ये टिपणे,बदलांचे निरीक्षण करणे, स्वतःमधील बदलांचे अवलोकन करणे, वास्तव जसे आहे तसे जाणणे, स्वीकारणे कृष्णमूर्तींना अभिप्रेत आहे.जगात हिंसा, कलह, संघर्ष आहे, त्यावरील उतारा कृष्णमूर्ती ऐकताना, वाचताना मिळतो.त्यामुळे एका अर्थी दुःखनिवृत्ती होते.

आपण एखाद्या देशाचे नागरिक असतो; संस्थेचे सभासद असतो, संस्थापक असतो. मग आपण त्या देशाशी, संस्थेशी इतके एकरूप होतो की आपले स्वतंत्र अस्तित्व विसरतो आणि स्वातंत्र्य गमावतो. ह्यास कृष्णमूर्ती 'आयडेंटिफिकेशन' म्हणतात. आयडेंटिफिकेशन'प्रमाणे 'कंडिशनिंग'विषयीही कृष्णमूर्ती आपणास सावधगिरीचा इशारा देताना दिसतात. अंगवळणी पडल्याने काही कृती आपल्याकडून सराईतपणे होतात पण त्यामुळे तोचतोचपणा येतो आणि मग कंटाळाही. आपल्याकडून कळत -नकळत तुलना केली जाते.स्पर्धात्मक जगात अशी तुलना केल्यामुळे संघर्ष निर्माण होतात; कलह, दुही वाढते. कोणत्याही नातेसंबंधांविषयी कृष्णमूर्तींचे म्हणणे आहे की आपण प्रत्येकाची एक प्रतिमा उभी करतो; तसेच इतरांची आपल्याबाबतची एक प्रतिमा तयार झालेली असते आणि परस्परांमध्ये संवाद घडून येण्याऐवजी प्रतिमाच एकमेकांच्या संपर्कात येतात. मग त्याची परिणती विसंवादात किंवा संवादाच्या अभावात होते. त्यावर उतारा म्हणजे उत्स्फूर्त अशी स्वाभाविक प्रतिक्रिया. त्यात कृष्णमूर्तींच्या मते, चूक-बरोबर, योग्य-अयोग्य, भले-बुरे असे काहीही नसते. असतो तो जिवंतपणा, सच्चेपणा,

प्रामाणिकपणा. असे हे प्रामाणिक, पूर्वग्रहविरहित, संस्कारयुक्त जीवन सर्जनशील असते. 'प्रेम', 'धर्म', 'सत्य' हे असे साधे, सोपे, सरळ असते. "सत्य ही एक पंथाविहीन भूमी आहे", हे त्यांचे वाक्य सुपरिचित आहे. अमुक एक विशिष्ट आदर्श नसतात. तेथे आज्ञार्थ नसतो आणि विध्यर्थही नसतो. फक्त वास्तव म्हणजे जी समोर आहे ती वस्तुस्थिती असते.फक्त वस्तुस्थिती असते. जी समोर आहे ती स्थिती म्हणजे वस्तुस्थिती.ती प्रत्येक क्षणी बदलते. म्हणून जे काही समज असतात, ते योग्य की अयोग्य, अपसमज, गैरसमज की योग्य समज ह्याची शहानिशा न करता, विश्लेषण न करता, समर्थन न देता पुढे जात राहण्याचा संदेश कृष्णमूर्ती ऐकताना, वाचताना मिळत राहतो. म्हणून कृष्णनीतीच्या वाटा निराळ्या आणि कृष्णमूर्तींची निराळी. परंतु ह्या सर्व वाटा समान मनोवस्थेस पोहोचवितात का व तीच मुक्ती का, हा कळीचा प्रश्न आहे.

कृष्णमूर्ती 'रिलिजिअस लाइफ' म्हणतात, परंतु ज्याला आपण रूढार्थाने धार्मिक जीवन म्हणतो, तसे धार्मिक जीवन त्यांस अभिप्रेत नाही. व्रतवैकल्ये, विशिष्ट देवतेची षोडशोपचारे पूजा, तीर्थयात्रा, उपासतापास अशी कर्मकांडे त्यांस मुळीच मान्य नाहीत. धर्मात जे पावित्र्य अभिप्रेत असते, मांगल्य असते, ते त्यांच्या मते अनुभवणे, म्हणजे धार्मिक जीवन. भव्योदात्त अशा वास्तवाचे दर्शन म्हणजे धार्मिक जीवन. त्यासाठी अमुक एक स्थान पवित्र व अमुक एक अपवित्र, अमुक एक झाड पवित्र व इतर अपवित्र हे शुभ अशुभसूचक संदेश त्यांना मान्य नाहीत. शुभ, पवित्र, मंगल वास्तव कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही वेळी जाणवते.तसा प्रत्यय येतो."दुर्वा हव्याच .."असा हेका नाही आणि काहीही नसले तरी "अक्षतां समर्पयामि" म्हणणेही नाही. जेव्हा मांगल्याचा प्रत्यय येतो, तो क्षण धार्मिकतेचा. धार्मिकतेप्रमाणे सौंदर्याचा साक्षात्कार केव्हाही अनपेक्षितरीत्या होतो. अगदी किडामुंग्यांचे निरीक्षण करत असताना सौंदर्य दिसू शकते. हा प्राणी सुंदर आणि हा कुरूप अशा चाकोऱ्या त्यांना मान्य नाहीत. सौंदर्याचा प्रत्यय केव्हाही, कोठेही येऊ शकतो. म्हणजे ज्या वास्तवाचे आपण सातत्याने निरीक्षण करतो, तेच सौंदर्य.'सत्यं, शिवं, सुंदरम्' असे अनोखे विवरण कृष्णमूर्तींनी केलेले आढळते.हे विवरण कृष्णनीतीहून निराळे आहे.

कृष्णनीतीतील सत्य, शिव व सुंदर परब्रह्म 'कूटस्थ-नित्य[vi]' आहे; "बिभर्त्यव्यय ईश्वर"[vii]आहे तर कृष्णमूर्तींच्या मते, वास्तव नवनवोन्मेषशालिनी असून त्यापाठीमागे, त्यापलीकडे असे काहीही नसते.जे दिसते, तेच तेवढे असते, हे जेव्हा समजते, तेव्हा जगणे खूप सोपे होते.

नकोसे ओझे टाकून दिलेले असते.गतकाळाचे ओझे, गतजन्मासारख्या संकल्पनांचे ओझे, संस्कारांचे ओझे, पूर्वग्रहांचे ओझे, संकेतांचे ओझे त्यांना अभिप्रेत आहे तर कृष्णनीतीतील कर्तृत्वाहंकाराचे व अपेक्षांचे ओझे टाकून देण्याचा संदेश "कर्मण्येवाधिकारS स्ते"[viii]सारख्या श्लोकांमधून व्यक्त होतो. यांपैकी कोणता संदेश कोणाला जेव्हा स्वीकारावासा वाटेल, तेव्हा स्वीकारून पुढे जाता येते. पुढे जाणे महत्त्वाचे असते. तात्त्विक साक्षरतेच्या वाटेवरील हे महत्त्वाचे टप्पे किंवा वळणे होत. त्यातील साम्यभेद स्पष्ट करत ह्या दोन पर्यायांचे सूचन येथे केले आहे. मग आज ही उठाठेव कशाला, असा प्रश्न उपस्थित होतो.

त्याचे उत्तर म्हणजे, वास्तव एकदेशीय, एकारलेले नसते; एकात्म असते. विविध पैलू अवश्य असतात, पण अंतिमतः ऐक्य असते. आपल्याला जीवनातील व्यामिश्रता, जटिलता कळते. मग त्राण, बळ कमी होते.त्यावर उपाय म्हणून अर्जुनासारख्या धर्मसंमूढतेमुळे गर्भगळीत झालेल्याला कृष्णनीती तीन मार्ग सांगते-ज्ञान, भक्ती व कर्म.कृष्णमूर्तींना ते मान्य नाहीत. त्यांच्या मते, पूर्वग्रहविरहित, स्वच्छ, निकोप दृष्टीने वास्तवाला, वस्तुस्थितीला सामोरे गेल्यास व्यामिश्र जीवन साधे, सोपे, सरळ होते. बदल दृष्टीतील आहे. आपले जीवन गुंतागुंतीचे असले तरी शाश्वत, चिरंतन असे काहीही नसते. वास्तव कायम नसते, बदलत राहते. हे समजले की मूल्यमापनातील फोलपणा कळतो आणि मूल्यमापन, चांगल्या-वाईटाचे निर्धारण गळून पडते आणि पुढील वाटचाल वेगळी होते. आग्रह, अट्टाहास उरत नाही. जिवंतपणा, उत्स्फूर्तपणा, स्वाभाविकता, सर्जनशीलता ही मूल्ये अनुभवातून कळतात.

"व्यक्ती तितक्या प्रकृती" हे तत्त्व लक्षात घेतले की सर्व मार्गांचे मूल्य कळते. शिवाय, सुसंगतीत रमणारे मानवी मन असंगतीने खंतावते आणि विसंगतीने विद्ध होते, विदीर्ण होते.ह्या मानवी मनोवस्थांच्या पलीकडे नेणारे मार्ग माहीत करून घ्यावयाचे तर गीतेतील कृष्णनीती तर आहेच व कृष्णमूर्तीही आहेत. सर्व प्रकारच्या संगती, सुसंगती, असंगती, विसंगती सामावून घेणारे अधिष्ठान कृष्णनीतीत आढळते. कृष्णमूर्ती असे कोणतेही अधिष्ठान. परमनिधान, परमतत्त्व मान्य करत नाहीत. प्रकृतिवैचित्र्यामुळे कोणाला कोणता मार्ग कधी आवडेल, हे सांगता येत नाही आणि जरी AI ला ते जमले म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने मार्ग निर्धारित केले गेले, तरी उपलब्ध मार्गांचा पुनरुच्चार महत्त्वाचा असतो.

1. संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।
2. तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ (V-2)
3. संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।
4. ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः।। (XII-.4)
5. कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः।
6. लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि।। (3.20)
7. एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति।
8. स्थित्वाऽस्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ।।
   (I2.72)
9. नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते |
10. स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ (II-40)
11. ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते।
12. सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम्।। (12.3)
13. उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः।
14. यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः।। (15.17)
15. II-47

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत विचार आणि आजचे समाज वास्तव

**दिपाली विजय शिंदे[1] डॉ. प्रज्ञा लामतुरे[2]**
[1]पीएच.डी.संशोधक विद्यार्थी, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे महाराष्ट्र, भारत.
[2]संशोधन मार्गदर्शक व मराठी विभाग प्रमुख,
कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे.
**Corresponding Author: दिपाली विजय शिंदे**
**Email** – deepaligite2015@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14546557**

**सारांश:**

बाराव्या शतकापासून ते आठव्या शतकापर्यंतचा कालखंड हा मध्ययुगीन कालखंड म्हणून ओळखला जातो. या ६०० वर्षांच्या काळातील संत आणि संतांचे विचार समाजासाठी खूप मौल्यवान आहेत. सामाजिक जागृती व भक्तीची शक्ती आणि त्यातून साधले गेलेले मानवहित अशी त्रिमार्गी परिक्रमा म्हणजे 'महाराष्ट्रातील संत परंपरा' होय. सदर संशोधन पर लेखात संत म्हणजे काय? संत विचारांचे मर्म काय? आजचे समाज वास्तव काय? आणि समाज सुधारण्यासाठी संत विचारांची आवश्यकता इत्यादीचा शोध घेणे महत्त्वाचे वाटते. संतांनी त्यांचे विचार अभिव्यक्त करण्यासाठी साहित्य निर्माण केले. साहित्याच्या विविध प्रकारांतून समाजाला वास्तव जीवनाला सामोरे जाण्यासाठी प्रेरणा देणारे मार्गदर्शक विचार मांडले. संतांनी मानवतावाद, समानता आणि नैतिक मूल्यांचा प्रसार करत समाजात एकता आणि बंधुत्वाचे बीज पेरले. आजच्या समाज वास्तवात या विचारांची आवश्यकता अधिक तीव्रतेने जाणवते. कारण आपण जातीयवाद, धार्मिक असहिष्णुता आणि नैतिक अधःपतन यासारख्या समस्यांना सामोरे जात आहोत. या शोधनिबंधात संत विचारांचे महत्व याचे आकलन करून ते आजच्या समाजात कसे लागू होऊ शकतात, हे या लेखातून स्पष्ट होते.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राची ओळख 'संतांची भूमी' अशी केली जाते. संतपुरुष, पुण्यपुरुष, साधूपुरुष, चरित्रपुरुष, नरश्रेष्ठ, भगवतभक्त, पुण्यात्मा, धर्मात्मा, महात्मा, सदाचरणी, नीतीसंपन्न साक्षात्कारी, सत्योपासक, निर्गुनोपासक, निरअहंकारी, आत्मोन्नतीदर्शक हे १६ अर्थ संत संकल्पनेचे पहावयास मिळतात संतांच्या व्याख्येच्या संदर्भात निर्मल कुमार फडकुले म्हणतात, "लौकिक जीवनातून निवृत्त झालेला आणि परलौकिकात रमलेला विरक्त लोकविन्मुख माणूस म्हणजे **संत** होय, तर माझ्या मते संत म्हणजे "सामाजिक संबंधात बिघडलेली समाज स्थिती सुधारण्यासाठी संघर्ष करणारी तत्त्वज्ञानी व्यक्ती म्हणजे **संत** होय. प्राचीन काळापासून अनेक मोठे आक्रमणे सहन करत आजही भारतीय संस्कृती टिकून आहे. त्यामागे संतांच्या कार्याचा खूप मोठा वाटा आहे. समाजाच्या विकासाला मारक असणाऱ्या अनेक रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यावर टीका करत समाजमन निर्मळ करण्याचे काम संतांनी केले. संतांनी समाज मनातील कुंठितता आणि अवडंबर दूर करण्यासाठी आंतरिक तळमळीने मांडलेले विचार म्हणजे **संत साहित्य** होय. या संत साहित्याचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक योगदान खूप विशाल व व्यापक आहे.

मानवाचा समावेश प्राण्यांमध्ये होत असला तरी मानवी तर प्राण्यांपेक्षा मानव हा समूह करून राहणारा प्राणी आहे, किंबहुना समूह करून राहण्याची नैसर्गिक प्रवृत्ती मानवाच्या अंगी असल्याचे लक्षात घेऊनच "मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे." असे ॲरिस्टॉटल सांगतो. समूह करून रहात असताना परस्परांशी संबंध प्रस्थापित करण्याची मानवी जीवनाला नितांत गरज असते. कारण मानवी गरजांची पूर्ती विकास व कार्यक्षमता साधण्यासाठी परस्परांमध्ये संबंध प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक असते. समाज हा व्यापक समूह असतो जो परस्पर संबंधातूनच समूहातील प्रत्येकात सामाजिकता निर्माण करत असतो सामाजिकतेतूनच व्यक्तीचा सामाजिक व्यवहार चालत असतो या व्यवहारातूनच त्याची सांस्कृतिकता घडत जाते. हेच सांस्कृतिकता समूहातील प्रत्येकास वर्षांनी प्राप्त होत जाते त्यातून विविध प्रथा चालीरीती परंपरा श्रद्धा अंधश्रद्धा रोड होत जाऊन त्या सर्वांचा प्रभाव समाजावर पडत असतो. जीवनातील वास्तव आणि जीवनाच्या जडणघडणीत विचारांचा फार मोठा वाटा असतो. साहित्य हे समाजाचा आरसा आहे असे मानले जाते. साहित्य व समाज यांचा पुरस्कार संबंध असतो. सहित्यसंदर्भात समाजसापेक्ष सर्जनशील अविष्कार म्हणजे साहित्य, अशी व्याख्या प्रा. रा.ग.जाधव करतात. समाजाला तात्विक अधिष्ठान संत विचारांनी अर्थात साहित्याने प्राप्त करून दिले. कारण

साहित्यातील शब्द हे प्रवाही आणि लोक माणसाशी असलेल्या जिव्हाळयाशी निगडी असतात ते स्थळ काळ परिस्थितीचे उल्लंघन करून अक्षर रुपात येतात "आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने शब्दांचीच शस्त्रे हे श्री तुकाराम महाराजांचे म्हणणे याचेच द्योतक आहे.

संतांनी मानवतेला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला, त्यासाठी आधी केले मग सांगितले" व "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले, तोचि साधू ओळखावा | देव तेथेची जाणावा ||" याप्रमाणे आचरण व कृती यातून संतांनी समाजापुढे आदर्श ठेवला. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकडोजी, संत मीराबई, संत रामदास आणि इतर संतांनी प्रेम, दया, समता, आणि सामाजिक न्याय यांची शिकवण दिली. त्यांच्या विचारांमध्ये धर्म, जात, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीवर आधारित भेदभावाला स्थान नव्हते. उदाहरणार्थ, संत कबीर म्हणतात, "जात-पात पूछे नहिं कोई, हरि को भजे सो हरि का होई". संत तुकाराम म्हणतात, "आत्मा परस्पर जडोनी पाहावा, आपुलिया ठावा अनुभवावा".

संतांनी समाजात आध्यात्मिक आणि नैतिक उन्नतीसाठी जे विचार मांडले ते सर्वसमावेशक होते, ते आजही अनुकरणीय आहेत संतांनी त्यांचे विचार व तत्वज्ञान ओवी, अभंग, श्लोक, भारुड, आख्यान काव्य, स्फुट अभंग रचना, गवळणी इत्यादी प्रकारचे साहित्य निर्माण केले आणि समाज प्रबोधनासाठी भजन, कीर्तन, प्रवचन, भारुड, विरण्या, गवळणी या माध्यमातून आमुलाग्र परिवर्तन घडविण्याचे कार्य केले. निवृत्ती ज्ञानदेव नामदेव पासून ते एकनाथ दासोपंत तुकाराम रामदासादी रचनाकारांनी त्यांच्या रचना मराठीतूनच केल्या हेही ऐतिहासिक दृष्टीने मोलाचे कार्य आहे. संत ज्ञानदेव आणि संत नामदेव एकाच काळातील संत होते, त्यांनी त्यांच्या समकालीन आणि उत्तरकालीन संतांनाही विचारांची व साहित्यरचनेची प्रेरणा दिली. तसेच साहित्य रचनेचे विविध प्रकार योजून अभिव्यक्तीची वेगवेगळी क्षितिजे उघडून दिली. संतांनी मानवतेच्या उद्धारासाठी समाजाच्या विविध समस्यांना आपल्या विचारांमधून वाच्यता दिली. काही महत्त्वाचे संत विचार खालीलप्रमाणे आहेत:

१. समतेचा विचार: संतांनी जात, धर्म, लिंग यांच्या पलीकडे जाऊन समतेचा प्रचार केला. "विचार न करो जात और पात, संत तो माने मानव की बात" – संत कबीर. एक एका सहाय्य करू| अवघे धरू सुपंथ|' अशा तऱ्हेचा बंधुभाव संत मंडळात आढळतो. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहून गीतेतील समृद्ध ज्ञान सर्वसामान्यांसाठी केले. समाज कल्याण हाच विचार त्यामागे होता. जीवनातील अनेक समस्यांचे उत्तर गीतेतून अर्थात ज्ञानेश्वरीतून मिळते.
२. मानवता आणि प्रेम: संतांनी मानवतेला सर्वोच्च मानले. त्यांनी सांगितले की सर्व जीवामध्ये ईश्वराचे अस्तित्व आहे. "विठ्ठल नामाचा गजर करावा, तया ठायी तुज पांडुरंग दिसावा" – संत नामदेव. मिराबाई, तुकडोजी महाराज यांनीही प्रेम आणि सहिष्णुतेला प्राधान्य दिले. संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता या ग्रंथातून नवयुगधर्म - प्रेमधर्म लोकांना सांगितला. त्यायोगे ग्रामे सुधारावीत व राष्ट्राची उन्नती व्हावी हा व्यापक विचार समाज हितासाठी होता.
३. आत्मज्ञान: संत ज्ञानेश्वरांनी आत्मज्ञान आणि आध्यात्मिक उन्नतीवर भर दिला. "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले" – संत ज्ञानेश्वर, संत एकनाथांनी दुर्गुणाचा त्याग करून आपण सदगुणांचे संवर्धन कसे करावे हे भागवत या ग्रंथात सांगितले आहे.
४. सर्वधर्मसमभाव: सर्व धर्म हे एका सत्याकडे नेणारे मार्ग असल्याचे संतांनी सांगितले. "अल्ला, राम, कृष्ण एक हे देवा, तुझ्याच रुपांच्या छटा" संत कबीर आणि रविदास यांनी विविध धर्मातील समानतेवर भर दिला. महाराष्ट्रातील सर्व संतांचे विचार हे सर्व धर्म समभाव या तत्त्वाशी समरूप आहेत.
५. कर्मप्रधानता: संतांनी निष्काम कर्म आणि समाजसेवेचे महत्त्व सांगितलेले आहे. संतांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि धार्मिक ढोंग यावर टीका केली. त्यांनी देवाच्या भक्तीचा खरा अर्थ कर्म आणि नैतिकतेत असल्याचे सांगितले. रामदास स्वामींनी कर्म साधना ज्ञान तत्त्वज्ञान विज्ञान राजकारण या महत्त्वाच्या गोष्टी लोकांना पटवून दिल्या दासबोध हा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. समाजाला राजकारणाचा व्यवहाराच्या दृष्टिकोन पटवून दिला. शिवाजी महाराज राजधर्म व क्षत्रिय धर्म याची सांगड घालून समाजात जीवनाच्या दृष्टिकोनातून उत्तम पुरुष घडविला.

**आजचे समाज वास्तव:**

आजचा समाज विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती विकसित झाला आहे मात्र सामाजिक आणि नैतिक पातळीवर अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

१. जातीयतेचे वाद: संतांनी समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले, परंतु आज जातीयता समाजाचे मोठे संकट बनली आहे. आधुनिक समाजात जातीय भेदभाव अजूनही खोलवर रुजलेला आहे. संतांनी सांगितलेला समतेचा संदेश विसरला गेला आहे.

२. नैतिक अधःपतन: संतांनी नैतिकता आणि सद्गुणांची शिकवण दिली. मात्र, आजच्या समाजात लोभ, भ्रष्टाचार आणि स्वार्थ यांचा प्रभाव वाढला आहे. भौतिकवादीची म्हणजे स्पर्धात्मक वातावरणामुळे नैतिकता आणि मानवी मूल्यांचा अभाव दिसतो.

३. धार्मिक द्वेष: संतांनी सर्वधर्मसमभावाचा विचार दिला, पण आज धर्माच्या नावाखाली दंगली आणि द्वेष पसरत आहेत. ते संत विचारांशी पूर्णतः विसंगत आहेत.

४. पर्यावरणाचा ऱ्हास :संतांनी निसर्गाशी समरस होण्याची शिकवण दिली, परंतु आजच्या समाजात निसर्गाचा अनियंत्रित उपभोग केला जात आहे.

५. स्त्रियांचे स्थान: संतांनी स्त्रियांना समानतेचा अधिकार दिला होता परंतु आजही स्त्रियांना भेदभाव आणि अन्याय सहन करावा लागतो.

६. अंधश्रद्धा: शिक्षण आणि प्रगती असूनही, समाजात अनेक ठिकाणी अंधश्रद्धा आणि अज्ञान टिकून आहे.

**संत विचारांचे समाजासाठी उपयोजन:** संत विचार आजच्या समाजात मार्गदर्शक ठरू शकतात.

१. शिक्षण क्षेत्रात संत विचारांचा समावेश केला पाहिजे. संत तुकाराम म्हणतात, "आपुले मरण पाहिले म्या डोळा, उरलिया रे कुळा सांगू नका". या विचारांवर आधारित समाजाने भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समानतेचा स्वीकार केला पाहिजे. त्यामुळे संत साहित्याचा अभ्यास मुलांमध्ये नैतिकता, समता, आणि मानवतेचे मूल्य जागवू शकतो.

२. धार्मिक आणि सांस्कृतिक एकात्मता या विचारांचा प्रचार करून समाजातील धार्मिक संघर्ष कमी करता येईल. तसेच धार्मिक सलोखा साधता येईल. संत विचारांचा प्रचार करून समाजातील धार्मिक संघर्ष कमी करता येईल.

३. संत विचार सामाजिक सुधारणांसाठी प्रेरणा देतात. आत्मविकासासाठी संतांनी आत्मपरीक्षण महत्त्वाचे मानले. संत ज्ञानेश्वर म्हणतात, "स्वतःचा अनुभव पाहावा, आपले ठायी पाहावे".

४. स्त्री सक्षमीकरण ता हेतूने संतांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी दिलेला संदेश समाजातील लैंगिक विषमता दूर करण्यासाठी प्रेरक ठरतो.

५. नैतिकता आणि सद्भावना ही जीवनमूल्ये स्वीकारली तर जीवन सुकर होईल.

६. पर्यावरण संवर्धन करण्यासाठी संत तुकाराम म्हणतात, "झाडे लावावी लागलीच राही, विठोबा देव पाहे सजीव". संतांच्या विचारांनुसार पर्यावरणाचा सांभाळ आवश्यक आहे.

७. संतांनी सांगितलेली शांती व सहिष्णुता आजच्या समाजात धार्मिक व सांस्कृतिक एकोप्यासाठी प्रेरणा देऊ शकते.

**निष्कर्ष :**

संत विचार हे भारतीय समाजासाठी दीपस्तंभासारखे आहेत. संत विचार ही आपल्या समाजाची महान संपत्ती आहे. त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे. जितकी तेव्हा होती. मात्र समाजाने संत विचारांचे आचरण प्रत्यक्ष जीवनात उतरवले नाही. म्हणून आजचे वास्तव संतांच्या शिकवणीशी विसंगत आहे. त्यांची शिकवण आजच्या समाजातील अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपयोगी ठरेल. मात्र, आजचा समाज संत विचारांच्या मूळ गाभ्यापासून दूर गेला आहे. जर समाजाने संतांच्या शिकवणीचा अवलंब केला, तर अनेक समस्यांचे निराकरण करता येईल. समाज सुधारेल आणि मानवतेचे मूल्य पुन्हा प्रस्थापित होईल. "संत विचारही केवळ वाचण्यासाठी नाही तर आचरण्यासाठी आहेत."

उपसंहार:

संत विचार हे भारतीय संस्कृतीचे अढळ स्थान आहे. संत विचार हे कालातीत आहेत. ते केवळ आध्यात्मिक शांततेचे साधन नसून, समाजातील असमानता, भेदभाव, आणि अन्याय यासारखे आजच्या समाजातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतात. जातीयवाद, हिंसा, आणि नैतिकतेचा अभाव अशा समस्यांवर उपाय म्हणून संतांचे तत्त्वज्ञान वापरणे गरजेचे आहे. संत विचार आणि आजचे समाजवास्तव यामधील दरी मिटवण्यासाठी संत साहित्याचा प्रचार आणि प्रसार होणे महत्त्वाचे आहे आजच्या समाजाला संत विचारांवर आधारित जीवनमूल्ये स्वीकारून एकता, सहिष्णुता, आणि नैतिकतेचा आदर्श निर्माण करावा लागेल. जातीयता, धार्मिक असहिष्णुता, आणि नैतिकतेचा अभाव यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी संतांचे तत्त्वज्ञान प्रभावी ठरू शकते. "सर्व मानव एकसमान आहेत" हा संतांचा विचार आत्मसात केला तर समाज अधिक प्रगत आणि न्याय्य होईल. , तसेच "संतांची शिकवण केवळ ग्रंथात नाही, ती आचरणात आणली, तरच समाज घडेल."

**संदर्भ ग्रंथ:**


1. मराठी वाङ्मयाचा इतिहास - प्रा. रा. ना. घोटाळे, मंगेश प्रकाशन, नागपूर द्वितीय आवृत्ती १९९०
2. ग्रामगीता - संत तुकडोजी महाराज, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, मुंबई, पुनमूद्रण २०००.
3. मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती- वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती २०२४.
4. अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- स्नेहवर्धन प्रकाशन, आवृत्ती २ री
5. तुकारामाची अभंग गाथा- सरकारी प्रकाशन
6. सकाळ संत गाथा

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# समकालीन तत्त्वचिंतक डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक तत्वज्ञान : एक दृष्टिकोन

**प्रा. डॉ. भारत वालोंद्रे**
तत्वज्ञान विभाग प्रमुख, नबीरा महाविद्यालय, काटोल, नागपूर
**Corresponding Author: प्रा. डॉ. भारत वालोंद्रे**
**DOI- 10.5281/zenodo.14546565**

**सारांश**

डॉ. आंबेडकरांचा जन्म मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. महु हे सैनिक प्रशिक्षणाचे ब्रिटिशांचे केंद्र होते. यात त्यांचे वडील रामजी आंबेडकर हे तिथेच मिलटरी शाळेत मेजर या पदावर रुजू होते. ते मुख्यध्यापक पदावर देखील कार्यरत होते. त्यांचा रुबाब मेजर असल्याने अत्यंत कडक होता. ते नियमाचे अत्यंत कठोरतेने पालन करीत असत. या त्यांच्या स्वभावाचा प्रभाव त्यांच्या कुटुंबियावर देखील पडलेला होता. संपूर्ण कुटुंब शिस्तीत वागायचे अर्थात डॉ. आंबेडकरांचे बालपणातील जीवन अत्यंत शिस्तीत पार पाडलेले होते. त्यांच्या कुटुंबियावर संत कबीराच्या विचारांचा प्रभाव होता.डॉ. आंबेडकरांना बालपणीच कबिरांचे दोहे मुखपाठ होते. त्यांच्या घरचे वातावरण अत्यंत सुसंस्कृत होते. याचा परिणाम त्यांच्या भावी आयुष्यात पडलेल्याचे नाकारता येत नाही.

डॉ. आंबेडकरांच्या जन्माविषयी असे भाकित केल्या गेले. त्यांच्याच कुटुंबातील रामजी आंबेडकरांचा एक धाकटा भाऊ वैराग्य पत्करून संन्याशी बनलेला होता. तो विस वर्षानंतर घरी परतला. त्यांनी डॉ. आंबेडकरांविषयी अशी भविष्यवाणी केली की, आपल्या कर्तृत्वाने हा मुलगा इतिहासात आपला वेगळा ठसा उमटवेल. आणि आपल्या घराण्याचे नाव अजरामर करेल[१]. तसेच घडलेही परंतु डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, जरी आमच्या घराण्यातील साधू पुरुषाने अशी भविष्यवाणी केली असली तरी अशा गोष्टींवर माझा विश्वास नाही. कारण ह्या गोष्टी निराधार असतात. डॉ. आंबेडकर स्वत: विनोदाचा भाग म्हणून एका भाषणात असे म्हणाले की, मी मुळ नक्षत्रावर जन्मास आलो. ज्योतिषाने सांगितले की, हा मुलगा आईच्या मुळावर आला आहे. त्यामुळे त्याची आई मरणार आणि माझ्या जन्माच्या सातव्या दिवशीच आईचे निधन झाले[२] हे जरी सत्य असले तरी हया गोष्टी अपवादात्मक आहेत. असे स्वत: डॉ. आंबेडकर म्हणाले.

**प्रस्तावना:**

डॉ. आंबेडकरांनी तीन गुरु मानलेत बुध्द, कबीर आणि फुले यांच्या विचारांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडलेला होता, काठमांडू येथे जागतिक परिषदेत बोलतांना ते असे म्हणतात की, ज्या देशात गौतम बुद्धाचा जन्म झाला. त्याच देशात त्याचा धर्माचा लोप व्हावा. असे विचित्र घटना का? घडावी. याची त्यांच्या मनात जाणून घेण्याची उत्कंठा निर्माण झाली. जेव्हा त्यांनी मॅट्रीक परीक्षा १९०७ ला उत्तीर्ण केली तेव्हा त्यांचे गुरु अर्जुन कृष्णाजी केळूसकर यांनी त्यांच्या सत्कारात 'बुद्ध चरित्र' हा ग्रंथ भेट दिला. तेव्हा पासून तथागत बुद्धाचा विचाराचा प्रभाव त्यांच्या मनावर खोलवर पडलेला होता. भारतात नवा समाज निर्माण झाला पाहिजे. हा समाज समता, स्वातंत्र्य बंधुता व न्याय या तत्वावर आधारलेल असला पाहिजे. म्हणून ते मानवता शिकविणारा बुद्धाचा धम्म आकर्षित करणारा ठरला. न्यायिक तत्वावर त्यांनी महाडचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदीर सत्याग्रह, पुणे करार करार यासाठी त्यांनी सत्यासाठी आग्रह धरून आंदोलने केलीत . तसेच संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरू असतांना आणि घटनेचा मसुदा तयार करीत असतांना भारतातील जातीय विषमता अथवा भेदाभेद नष्ट करण्यासाठी संविधानात तशा तरतुदी केल्यात.

डॉ. आंबेडकर स्वत: असे एका भाषणात म्हणाले, की, माझे सामाजिक तत्वज्ञान स्वातंत्य, समता, बंधुता व न्याय या चार आधारीत आहे. ते ३ ऑक्टोंबर १९५४ च्या भाषणात म्हणतात, कि, प्रत्येक मनुष्यास जीवनाचे तत्वज्ञान असले पाहिजे. प्रत्येक मनुष्यास विचार आहे. त्याचा उपयोग त्याने सत्य शोधण्यासाठी केला पाहिजे, त्याने पंचज्ञानेंद्विय्यारे सत्य जाणून केला पाहिजे. त्याला त्याच्या स्वत:च्या अस्तित्वाबद्दल साक्ष पटविता आली पाहिजे. त्याने अंध व स्वार्थ वृत्ती बाळगली तर सर्व समाजाचा घात होईल. त्यांच्यामते डोळे मिटून चिंतन करने हे भोळे भाबडे पणाचे अथवा स्वार्थीपणाचे लक्षण आहे. समाजाचे हित साधायचे असेल तर संवेदना बोथट करून चालणार नाही. क्रांती ही संवेदनशिलतेतुच घडत असते. असा मानवतावादी संदेश त्यांनी दिला. डॉ. आंबेडकर भारतातील लोकशाहीच्या संदर्भात असे, वक्तव्य करतात, रक्ताचा एकही थेंब न सांडता लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आनणारा शासनाचा एक प्रकार आणि पद्धती म्हणजेच लोकशाही होय[३] हेच तत्त्व त्यांनी आपल्या आंदोलनात अमलात आणले. त्यांची सर्व आंदोलने बुद्धाचा शांती आणि अहिंसा या तत्तवाला धरून होती. तरुणांनी स्वत:च्या बुध्दिवर विश्वास ठेवून तीचा उपयोग करावा. स्वत:च्या विवेक बुद्धिला शरण जावे. ज्ञानापेक्षा अधिक पुजनिय असे काहीही नाही निसर्गाने कोणालाही दास म्हणून जन्माला घातले नाही. तुम्ही तुमच्या भाग्याचे स्वत:च शिल्पकार आहात असा उपदेश देतांना दिसतात. ते पुढे म्हणतात मरणोत्तर मोक्ष प्राप्ती करिता तळमळणारी वृत्ती ही आजच्या परिस्थितीत आत्मघातकी आहे. व्यक्तीपुजेच्या भावनेला नष्ट केले नाही तर ती भावना आपला सर्व नाश करून टाकेल.[४]

डॉ. आंबेडकर म्हणतात, विभूतिपुजेविरुद्ध बुद्धाने बंड केले. त्यांनी बौध्द धम्म पूर्नजीवित करून असे प्रतिपादित केले की, बौद्ध धर्म हा नीतीवर अधिष्ठीत आहे. बौद्ध धर्मात देवाची जागा नीतीने घेतली. त्यांनी बौद्ध धम्मांप्रती प्रभावित होऊन १४ ऑक्टोबर १९५६ ला बौद्ध धर्माचा स्वीकार केला. सांख्य

तत्वज्ञानाप्रमाणे बुद्धानेही दु:खाचा उगम कसा होतो. त्याचा निरोध करणे कसे शक्य आहे. या गोष्टीच्या शोधार्थ बुद्धाने शाश्वतवाद तसेच उच्देवाद या दोन्ही सिद्धांताला नाकारून त्यांनी मध्यम मार्गाची शिकवण दिली. कारण उच्छेदवाद प्राणिमात्राच्या समूळ नाशाची शिकवण देत नाही. असे अरिष्ठ भिक्षुला सांगतात. दु:खाचा समुळ नाश कसा करायचा हीच शिकवण मी आता पर्यंत देत आलो आहे[५]. असे तथागत बुध्द प्रतिपादन करतांना दिसतात.

डॉ. आंबेडकर कर्माच्या नियमाचा अर्थ लावतांना असे म्हणतात, स्वत:च्या कर्माचे फळ आपल्या अपत्यांना कर्माचे फळ भोगावे लागेल. त्यांच्यामते संपूर्ण जगाचा व्यवहार कर्मावरच चालतो. परंतु असे कर्माचे परिणाम याच जन्मात भोगावे लाग तात. आपल्या कर्माच्या क्रियेतून निर्माण होणारी कर्मविपाक कर्माचे फळ होय. जसे कर्म केले तसे ईथेच भोगावे लागेल अशी ताकिद त्यांनी दिली. भारतीय कर्म सिद्धांतानुसार जे काही सुख–दु:खात्मक अनुभव येतात. ते सर्व पूर्व कर्माचे फलित असते. असा कर्मसिध्दांत तथागत बुध्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांनीही नाकारलेला आहे.

पुनर्जन्माविषयी ते असे म्हणतात, पुनर्जन्म या प्रश्नाला दोन विभागात विभागले. पहिले पुनर्जन्म कशाचा होतो आणि दुसरे पुनर्जन्म कोणाचा होतो. याविषयी बुद्धाचा दृष्टिकोन विचारात घेणे आवश्यक आहे. शरीर अस्तित्वासाठी चार तत्व कारणीभूत असतात. ती म्हणजे पृथ्वी, जल, तेज व वायू या चार तत्वांमुळेच शरीराची निर्मिती होते. जेव्हा शरीराचा अंत होतो. तेव्हा चारही तत्व आधीपासून असेलेल्या तत्वात विलिन होतात. हे चारही तत्व आकाशात तरंगत असणार-या विभिन्न तत्वात समाविष्ट होऊन नवीन जीव जन्माला येतो. यात बाहेरून कोणत्याच आत्म्याचा प्रवेश होत नाही. हे चारही त्याच मृत शरीराचे राहतील हे आवश्यक नाही. ते भिन्न–भिन्न मृत शरीराचेही राहू शकतात. हेच खरे पुनर्जन्माचे रूप आहे. ज्यावर बुद्धाने विश्वास केला.[६]

डॉ. आंबेडकर मृणतात, बौद्ध तत्वज्ञानात पुनर्जन्म मानण्यात येतो. परंतु कर्म सिद्धांताप्रमाणे आत्म्याचा पुनर्जन्माशी कोणताही संबंध नसतो. बौद्ध तत्वज्ञानातील पुनर्जन्माचा सिध्दांत म्हणजे पुन: निर्मित निसर्गाची पुनरावृत्ती असते. पित्याच्या आकारासारखा चेहरा असणारा पुत्र जन्मास येतो म्हणून काही संपूर्णपणे पिताच असतो असे नव्हे. एका आंब्यापासून दुसरा आंबा निर्माण होणे म्हणजे पहिल्या आंब्यातले गुण दुसऱ्या आंब्यात येणे होय.[७] ही आंब्याची पुनरावृत्तीच म्हणावी लागेल. बुद्धाच्यामते मानवी शरीर चार घटकांचे बनलेले आहे जेव्हा मनुष्याचे शरीर मरते तेव्हा या चार घटकाचे काय? होते. तेही शरीराबरोबर मरण पावतात का? असा प्रश्न बुद्धाला केला असता यावर बुद्ध असे म्हणतात की, नाही. ते घटक त्यासारख्याच घटकात विलिन होतात. आणि हे चारही घटक एकत्र आले की, पुनर्जन्म होतो. हाच बुध्धाला अभिप्रेत असलेला पुनर्जन्म होव.[८]

निर्वाणाविषयी डॉ. आंबेडकर म्हणतात, निर्वाण म्हणजे व्यक्तीचे **पुर्णपणे** विझने नव्हे. वासनांचा परिपूर्ण नाश झाला पाहिजे असे बुध्द म्हणत नाही फक्त वासनेच्या आगीत आणखी इंधन घालू नका जन्म, जरामरण हे सर्व दु:खमय आहे. या बुद्ध वचनात अतिशोक्ती असल्याचे डॉ. आंबेडकर सांगतात. या विपरीत गरिबी ही दु:खमय आहे. या बुद्ध मताजते महत्वाचे स्थान देतात, आणि बुद्धाचे दु:खाची संकल्पना भौतिक असावाच्या दावा करतात. कारण भगवान बुद्धाने श्कार्यकारण मताला या विज्ञाननिक नियमाला मानले. या नियमात आत्मताच, ईश्वर तत्व, पुनर्जन्म, कर्माचा दैवी दृष्टिकोन या नियमात बसत नाही, दैववादी दृष्टीकोना ऐवजी त्यांनी वैज्ञानिक अथवा शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारला.

डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण सूत्ताचा उल्लेख करतांना म्हणतात की, बुध्दाचा शिष्य आनंद याने मरणाच्या अंतिम क्षणी असे विचारलेत की, भगवंत अशा कितीतरी गोष्टी राहिलेल्या आहेत. ज्याविषयी आमचे समाधान झालेले नाही. तेव्हा बुध्द म्हणतात. आता तुमचे प्रश्न तुम्हाला स्वत:लाच सोडविता येतील . जी गोष्ट तुमच्या विचारशक्तीला, तर्कशक्तीला पटत असेल तर ती हमखासपणे स्विकारावे. जर ती पटत नसेल तर ती खुशाल टाकून दया. हिच माझी शिकवण आहे. [१०] अशा प्रकारे बुद्धाने व्याको स्वातंत्र्याला अधिक महत्व दिल्याचे आढळते. ते डिसेंबर १९५४ च्या इंगुणच्या भाषणात ते असे म्हणतात. हिंदुस्थानात वैदिक संस्कृतीने भारतात आपले वर्चस्व बऱ्यच वर्षापासून अबाधित चालू ठेवलेले आहे. हे वर्चस्व समजून घेणे गरजेचे आहे. बौद्धिक कसोट्यच्याद्वारे बुधवचने ची तपासून पाहावी लागेल. असा सावधगिरीचा इशारा देतांना दिसतात.बौद्ध धर्मानी सुप्रसिद्ध ग्रंथ मिलिंद प्रश्न या ग्रंथाची छाप त्यांच्यावर पडलेली दिसून येते. या ग्रंथात तात्विक तसेच नैतिक प्रश्नांची चर्चा ग्रीक राजा मिलिंद व भिक्षू नागसेन यांच्या झालेले आढळते. प्रा. पी. नरमू यांच्या इसेन्स मॉफ बुद्धिज्सम या ग्रंथाची प्रस्तावना लिहितांना म्हणतात की, मी बुद्ध जीवनाच्या अध्ययनात गढलो आहे नागपूर येथील १४ आक्टोबर १९५६ चा धमादीक्षा समारंभ हा बौद्ध धम्माच्या चिंतनाचा परिपाक होय. त्यांनी त्याप्रसंगी बावीस प्रतिज्ञांना त्याला त्यांनी जुलाबाचे औषध म्हटले आहे.[११]

बौद्ध वाङ्‌मयात अनेक घोटाळे निर्माण झालेले दिसतात. जातक कथात जे वर्णन आढळते ते बुद्धीच्या कक्षेत न बसणारे आहेत.कारण बौद्ध धर्मात काही धर्मातील लोग दीक्षित झालेत त्यांनी बुद्ध वचने जसेच्या तसे पाठ न करता आपल्या पदरच्या काही बाबी सांगून त्या वाचनाचा व्यवसाय सुरु केला. त्यामुळे बुद्धाचा उपदेश अनेक वेळा वस्तूस्थितीला सोडून असल्याचे डॉ. आंबेडकर म्हणतात सध्यास्थितीत बौद्ध धर्म अहिंसा समता, स्वतंत्र, बंधुता व न्याय अशी शिकवण देत असल्याने ह्या धर्माचा संपूर्ण जग स्वीकार करू लागला बौद्ध धर्माला पुनर्जीवित करून डॉ. आंबेडकरानी महत्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे शेवटच्या क्षणी 'भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म' हा महत्व पूर्ण ग्रंथ लिहून एक नवी दिशा दिली.

दुसरे असे कि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक तत्वज्ञान चार तत्वावर आधारित आहे. हे तत्व म्हणजे समता, स्वतंत्र, बंधुता व न्याय ही होत समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी मराठवाडा परिसरात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली ही स्थापना करित असतांना त्यांनी दर्जेदार प्राध्यापकांची निवड केली होती. त्यात प्रा.मे.पु.रेगे यांची तत्वज्ञान विषयाकरिता नियुक्ती केली होती. प्रा.मे. पु. रेगे नी तर्कशास्त्रावर बरेच लेखन केले आहे त्यांची गाजलेली पुस्तके म्हणजे आकारिक तर्कशास्त्र, हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन, इहवाद आणि सर्वधर्म समभाव, मर्मभेद, विवेक आणि न्याय आधुनिक

महाराष्ट्रातील प्रभोधन पर्व, विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा, स्वतंत्र आणि न्याय इत्यादी प्रसिद्ध ग्रंथ आहे. अर्थात डॉ.आंबेडकर आणि प्रा.मे.पु. रेगे निकटचा संबंध आलेला होता. एकदा नागपूर विध्यापिठात त्यांचे व्याख्या असतांना प्रत्यक्ष त्यांचे नीतिशास्त्र वरील भाष्य ऐकण्याचा माझा योगायोग आलेला.होता. प्रा. मे.पु. रेगे यांच्या तत्वज्ञानात भरीव असे योगदान राहिलेले आहे.

**निष्कर्ष :**

जे बुद्धीशी विसंगत आहे आणि तर्काशी सुसंगत नाही ती बुद्ध वचने नव्हेत.

१ बुद्धीला आणि तर्काला धरून आहेत ती बुद्ध वचने मानायला हरकत नाही.

२ जे मनुष्याच्या कल्याणाला पोषक नाही.ती बुद्धाच्या नावावर खापविल्या गेलेली वचने होत

३ बुद्धाचा मार्ग तर्कधिष्ठित आणि विज्ञाननिष्ठ सत्याप्रत घेऊन जाणारा मार्ग आहे.

४ बुद्ध प्रणित चार आर्य सत्य व अष्टांग मार्ग हीच जीवनाचे नैतिक मूल्य आहे.

५ कर्मकांड, पुनर्जन्म, आत्मा, परमात्मा हे तत्व कार्य–कारण भावाच्या कक्षेत बसत नाही अशा प्रकारे डॉ. आंबेडकरानी बौद्धिक तर्क दिलेले आहे.

**संदर्भ :**


1. कीर धनंजय (१९८९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन, प्रा. लि. मुंबई.–३४ पृ.१२
2. तत्रैव–पृ. १३
3. खांडेकर ताराचंद (१९८०) साक्षी पब्लिकेशन नागपूर–१७ पृ. ९४
4. महाराष्ट्र शासन ग्रंथ निर्मिती मंडळ (२००५ ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे भाग –१.२ खंड – १८, पृ.३७४
5. मोरे एम.एस. (१९९०) भगवान बुद्धाचा मध्यम मार्ग, पृ.४ †
6. जाटव डी. आर (२००३) डॉ. आंबेडकर का धर्मदर्शन , साहित्या सदन जयपूर ०५
7. तत्रैव – पृ – १२१
8. महाराष्ट्र शासन ग्रंथ निर्मिती मंडळ (२०१८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे भाग –१ खंड – १८ पृ.२४६

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत मन्मथ स्वामींच्या साहित्यात परमपुरुषाची लक्षणे

**प्रा. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर**
मातोश्री शांताबाई गोटे आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, वाशिम
**Corresponding Author: प्रा. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर**
**DOI- 10.5281/zenodo.14546592**

**जीवन परिचय :**

मन्मथ स्वामी हे एक वीरशैव परंपरेतील संत आहेत. त्यांचा जन्म बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी इ.स. 1560 च्या सुमारास झाला. नेकनूर हे त्यांचे आजोळ होते. त्यांचे मूळ गाव उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब हे होय. त्यांच्या वडिलांचे नाव शिवलिंग स्वामी आणि आईचे नाव पार्वतीबाई होते. हे दोघेही पती-पत्नी वीरशैव धर्म परंपरेतील शिवभक्त होते. यांच्या आचार आणि विचाराचा संस्कार कळत नकळत मन्मथ स्वामी यांच्यावर झाला. मन्मथ स्वामी हे तीक्ष्ण बुद्धीचे होते. साधारणतः वयाच्या आठव्या वर्षानंतर मन्मथ स्वामी यांना दीक्षा देऊन मानूर मठाच्या सानिध्यात ठेवण्यात आले. त्या मठात असलेले आचार्य हे त्यांचे गुरु होते. त्या मठातच राहून मन्मथ स्वामी यांनी वेद, श्रुती, अगम, पुराण, गीता आणि विविध दर्शन आदींचा अभ्यास केला. त्यांनी या संस्कृत साहित्यासह कन्नड साहित्याचाही अभ्यास केला. ते एक चिकित्सक अभ्यासक होते. त्यांनी केलेल्या अभ्यासावर अनेक वर्ष चिंतन केले. विशेष म्हणजे त्यांनी आपले हे सर्व चिंतन साहित्य रूपाने मांडण्याचा संकल्प केला होता. त्या अनुषंगानेच ते कळंब या गावापासून काही अंतरावर असलेल्या हडोंगरी येथील कड्यामध्ये असलेल्या एका गुफेमध्ये राहावयास गेले. त्याच ठिकाणी राहून त्यांनी विपुल अशी ग्रंथसंपदा रचली.

**मन्मथ स्वामी यांची ग्रंथ संपदा :**

मन्मथ स्वामी यांनी आपल्या हयातीत गुरुगीता, ज्ञानबोध, स्वयंप्रकाश, अनुभवानंद, शिवगीता आदी महत्त्वपूर्ण ग्रंथांची रचना केली. याशिवाय श्रीपरमरहस्य सारख्या ग्रंथावर टीका लिहिली. तसेच त्यांनी इतर अनेक ओव्यांची सुद्धा रचना केली आहे. त्यांच्या त्या आव्यां संग्रह आज त्यांची गाथा म्हणून ओळखली जाते. या सर्व ग्रंथांपैकी त्यांच्या ज्ञानबोध, स्वयंप्रकाश, श्रीपरमरहस्य आणि इतर काही ओव्यांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, मन्मथ स्वामी हे मुळात एक तत्त्वज्ञ सुद्धा आहेत. त्यांनी या सर्व साहित्यातून विविध विषयांवर केलेले भाष्य हे तत्त्विक स्वरूपाचे आहे. वेदांत दर्शनाच्या अनुषंगाने त्यांचा स्वयंप्रकाश हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी ब्रह्म, जीवात्मा, ब्रह्म पुरुष, तत्त्वमासी अशा अनेक संकल्पनांचे विश्लेषण केले आहे. त्यांची दृष्टांत देण्याची पद्धत, एखाद्या विषयाचे केलेले विश्लेषण हे अत्यंत मार्मिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या ओव्यातून हे स्पष्टपणे जाणवते की, ते सत्यनिष्ठ आणि परखड विचार मांडणारे मध्ययुगीन तत्त्वज्ञ होते.

मन्मथ स्वामी यांनी आपल्या साहित्यातून, मूळ तत्त्व काय आहे ? त्याचे स्वरूप कसे आहे ? त्या मूळ तत्त्वाला जाणून घेणाऱ्या जीवाचे स्वरूप कसे आहे ? जीवाचा आणि मूळ तत्त्वाचा संबंध काय आहे ? जीव मूळ तत्त्व स्वरूपी होऊ शकतो का ? त्यासाठी त्या जीवाने काय करावे ? जीवाचे अंतिम ध्येय काय आहे ? इतकेच नव्हे तर संसारिक जीवन जगत असताना मनुष्याने कशाप्रकारे व्यवहार करावा ? कशा प्रकारे आपले आचरण ठेवावे ? इत्यादी प्रश्नांना अनुसरून चर्चा केलेली आहे. एकंदर मन्मथ स्वामी यांचे विचार हे आध्यात्मिक आणि संसारिक दोन्ही प्रकारचे आहेत; हेच त्यांच्या विचाराचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

मन्मथ स्वामी यांनी आपल्या स्वयंप्रकाश या ग्रंथामध्ये परम पुरुषाच्या लक्षणांची चर्चा केली आहे. स्वयंप्रकाश हा संवाद ग्रंथ आहे. प्रामुख्याने हा संवाद मन्मथ स्वामी आणि त्यांचे अनुयायी किंवा श्रोते यांच्यातील असू शकतो. स्वयंप्रकाश या ग्रंथामध्ये एकूण सात प्रकरणे आहेत.

त्यापैकी सातव्या प्रकरणांमध्ये ब्रह्मपुरुषाच्या लक्षणाची चर्चा झाली आहे. त्या ठिकाणी शिष्य मन्मथ स्वामींना निवेदन करतो की, **"जो पुरुष परब्रह्म झाला ॥ देहनसीत दृप होउनि ठेला ॥ कोण चिन्ह ओळखिजे तयाला ॥ ते लक्षण निरोपावे स्वामी" ॥1॥** म्हणजे जो पुरुष परब्रम्ह झाला म्हणून सांगितला जातो त्याला ओळखण्याची चिन्हे कोणती आहेत ? शिष्याच्या या प्रश्नाला अनुसरून मन्मथ स्वामी जे विवेचन करतात त्यातूनच ब्रह्मपुरुषाचे लक्षणे स्पष्ट होतात.

मन्मथ स्वामी यांनी परब्रह्मस्वरूप पुरुषाचा वेगवेगळया नावांनी उल्लेख केला आहे. त्यापैकी एक निर्विकल्प पुरुष असेही आहे. अशा या निर्विकल्प पुरुषाची अनेक लक्षणे मन्मथ स्वामी यांनी अधोरेखित केली आहेत. त्यातील काही लक्षण पुढील प्रमाणे:

**निर्मोही अहंकार शून्य:**

निर्विकल्प पुरुष सहज कोणाशीही सहमत होत नाही. आपल्या श्रेष्ठत्वाचे गुणगान एकने किंवा त्यामुळे आपले पूजन होणे यासारख्या बाबींमुळे तो घाबरणारा असतो. म्हणजेच आपल्या पूजेचा भोग घेण्याची इच्छा किंवा आपली कीर्ती ऐकण्याची इच्छा अशा या पुरुषाला मुळीच स्पर्श नसते. अशा पुरुषाच्या ठिकाणी बृहस्पती सारखे जाणपण अर्थात ज्ञान असते, मात्र त्यामुळे त्याच्यात कोणत्याही प्रकारचा गर्व निर्माण झालेला नसतो.

**बोलणे अमृता सारखे :**

निर्विकल्प पुरुष बोलण्याच्या बाबतीत अत्यंत सजग असतो. असा हा पुरुष बोलण्याचा छंद बाळगत नाही. मात्र जेव्हा केव्हा तो बोलतो तेव्हा अगदी मोजून तोलून तो बोलत असतो. मात्र जेव्हा ज्ञानाविषयीची चर्चा घडवून येते तेव्हा ब्रह्मांडाला फोडण्याची क्षमता त्याच्या बोलण्यातून दिसून येते. ज्ञान विषयक चर्चेत वा बोलण्यात तो कुठल्याही प्रकारची अडकाटी करीत नाही. विशेष म्हणजे आपले बोलणे कोणाला खुपणार नाही किंवा कोणालाही उपसविणारे ठरणार नाही याची दक्षता तो घेत असतो. म्हणून त्याचे ते बोलणे अमृताहुन गोड वाटू लागते. परिणामी श्रोता वारंवार त्याच्या बोलण्याप्रती तन्मय होऊन जातो.

**निःसंग :**

निर्विकल्प पुरुष हा कुणाचीही संगत धरत नाही. त्याला कोणाकडून काही आसही नाही. तो आपल्यातच आनंदी राहतो. म्हणून त्याला कुठल्याही प्रकारचे चातुर्य दाखवण्याची आवश्यकता पडत नाही किंवा कोणाकडून थोर पण मिळविण्याची ही गरज नाही. तो कोणाशीही प्रेम धरीत नाही कारण तो स्वतः आपल्याशीच प्रेम करतो. तो आपली अवकाळा कोणालाही दिसू देत नाही. आणि कोणी त्याचा आदर केला तर तो त्याच्यासोबत क्षणभरही राहत नाही. कारण मुळात त्याला कुणाच्याही संगतीची आवश्यकता नसते. तो निःसंग आहे.

**एकांत प्रिय:**

निर्विकल्प पुरुष हा एकांत प्रिय असतो. कुठल्याही विशिष्ट जनसमुदायात न राहता, सर्वत्र वास करणारा असतो. मात्र असे असले तरीही तो गजबजलेल्या ठिकाणापासून लांब राहणे अर्थात एकांतात राहणे पसंत करतो. अशा या पुरुषाच्या संदर्भात मन्मथ स्वामी म्हणतात, "ऐसी लक्षणे यावया, नवसी गुरुराया । नित्य एकांता जावया, आळस न करी ॥" म्हणजेच एकांतात राहणे हे जणू या निर्विकल्प पुरुषाचा छंद असल्याचे मानावे लागेल. परंतु या ठिकाणी एक प्रश्न उपस्थित होतो की जो मुळात निर्मोही, अहंकार शून्य, निःसंग, निरास आहे त्याला एकांत काय आणि लोकांत काय ? त्याला हे दोन्ही सारखेच असायला पाहिजे ! यासंदर्भात मन्मथ स्वामी म्हणतात, निर्विकल्प पुरुष सर्व जनसमुदायांकडे ब्रह्मभावनेने पाहतो. तो सर्व जनाशी प्रेमाने राहतो. मात्र जनांमध्ये (लोकांमध्ये) ब्रह्म स्थिती किंबहुना प्रेम हे स्थिर राहत नाही. लोकांमध्ये सदैव कचकच सुरू असते. असे हे लोक संसार दुःखामध्ये तळमळत असतात. विशेष म्हणजे लोकांमध्ये वेगवेगळया मताचे लोक असतात. परिणामी या लोकसमुदायामध्ये सदैव द्वैताचा अनुभव येत असतो. तेव्हा संसार आणि संसारातील द्वैत टाळण्याकरिता निर्विकल्प पुरूषासारखे संत एकांताचा मार्ग निवडतात. कारण एकांत हाच स्व-सुखाचा अनुभव करून देणारा असतो.

**अदंभी :**

निर्विकल्प पुरुषाचे वर्तन हे साधे आणि सरळ असते. तो अभ्यासू आणि कर्तुत्ववान असतो. परंतु आपण अभ्यासू असल्याचा आव आणीत तो मिरवत नाही. किंवा आपण जे जे काही करून ठेवले आहे ते कोणालाही सांगत बसत नाही. कारण त्याला दांभिकपणा आणि केलेली गोष्ट अवसान आणून सांगणे आवडत नाही.

**विकार मुक्त :**

हिंसा, दंड, क्रोध, काम, लोभ, असत्य हे सर्व विकार आहेत. निर्विकल्प पुरुष अशा या सर्व विकारांपासून

मुक्त असतो. त्याच्या या विकार मुक्त स्वभावाचे वर्णन मन्मथ स्वामी, **"आत्माराम सर्वदेही । म्हणोनि हिंसा न करी कांही ॥ दयेची मूर्ती पाही । तो पुरुष गा" ॥32॥** या शब्दात करतात. तो कोणालाही शब्दाने दुखवत नाही. तो हिंसेला प्रवृत्त होत नाही आणि कोणाला परावर्तही करत नाही. याही पुढे जाऊन मन्मथ स्वामी म्हणतात की, अशा या पुरुषाच्या समोर जर एखाद्याने काही अपराध केला असेल तरीही त्याला क्रोध येत नाही. त्याच्यासमोर कितीही सुंदर स्त्री आली तरीही तो काम प्रवृत्तीला बळी पडत नाही. तो सर्व भुतांमध्ये परमात्मा पाहणारा असतो. आपल्यात आणि तरात भेद मानत नाही. मन्मथ स्वामी म्हणतात त्याप्रमाणे, **"अवघा आपणचि असे ॥ म्हणोनि लोभ कोणाचा नसे"॥42॥** असा ह्या निर्विकल्प पुरुषाचा स्वभाव असतो.

**दयेचा सागर :**

निर्विकल्प पुरुषाचा दया हा मूळ स्वभाव आहे. स्वतःच्या जीवाला कितीही त्रास झाला तरीही तो इतरांप्रति मात्र दयाच दाखवीत असतो. म्हणूनच मन्मथ स्वामी म्हणतात, **"जीव दडपैल तरही ॥ म्हणोनि चाले दयेची पावुली ॥ पान न तोडी मा घावटी घाली ॥ हे केवी घडे" ॥34॥** या ठिकाणी जी व्यक्ती एखाद्या वृक्षाचे पान तोडत नाही ती हिंसा कशी काय करेल ? या आशयाचा प्रश्न उपस्थित करून एका अर्थाने मन्मथ स्वामी दयाभाव हा विषय केवळ मनुष्य व इतर जीवाप्रती जोपासण्याचा असतो असे नाही, तर तो वृक्ष इत्यादी विषयाच्या संदर्भात देखील जोपासला पाहिजे असे ते या ठिकाणी सुचवितात.

ज्याच्याजवळ दया असते त्याच्याजवळ क्षमा सुद्धा असते. म्हणजेच कुणी जर काही अपराध केला किंवा कोणी एखाद्याने आपले काही नुकसान केले तरीही क्षमा करण्याचा जो स्वभाव असतो तो हा निर्विकल्प स्वभावाचा पुरुष कधीही सोडत नाही. यासंदर्भात मनमत स्वामी म्हणतात जर कोणी एखाद्याची भूमी म्हणजे जमीन खणली आणि त्यात थंकुने किंवा मळमूत्र भरणे यासारखे अयोग्य कर्म केले, पिकाची नुकसान केली तरीही क्षमा करण्याचा आपला तो स्वभाव हा पुरुष सोडत नाही. किंवा कोणी त्याच्याबद्दल वैरभाव ठेवले तरीही त्याला क्रोध येत नाही. म्हणूनच अशा या लक्षणाने युक्त असलेल्या पुरुषाला मन्मथ स्वामी, **"ऐसि क्षमा देखसी बरवी ॥ तो परमपुरुष जाणिजे" ॥44॥** या शब्दात परम पुरुष मानतात.

अशा या महत्वपूर्ण गुणांशिवाय निर्वीकल्प किंवा परमस्वरूपी पुरुषाचे अनेक लक्षणे मन्मथ स्वामी यांनी आपल्या स्वयंप्रकाश ग्रंथाच्या अध्याय सात मध्ये सविस्तर वर्णन व विश्लेषण केलेले आहे. त्यात आपल्याला समस्थिती, गुरु सेवा, ज्ञानप्रिय, धैर्यवान, सत्यवादी, मनमिळावू, निरअभिमान यासारख्या इतर काही लक्षणांचा उल्लेख करता येईल. विशेष म्हणजे मन्मथ स्वामी अशा या लक्षणांनी युक्त होण्याचा सल्ला प्रत्येक व्यक्तीला देऊन स्वतः परमपुरुष अर्थात ब्रह्मपुरुष बनण्याचा उपदेश करतात. ते म्हणतात, **"जे जे निरोपिली लक्षणे । जाणोनि तुपा तैसेचि होणे ॥ मग गर्भवासा येणे ॥ न घडे सर्वथा" ॥76॥** अर्थात जो परमपुरुष बनतो तो पुन्हा पुन्हा जन्माला येत नाही म्हणजेच तो सर्व कर्म बंधनातून मुक्त आणि मोक्षाचा अधिकारी बनतो.

**संदर्भ ग्रंथ :**

रत्नत्रय (गुरुगिता, स्वयंप्रकाश आणि अनुभवानंद), मूळ लेखक मन्मथ स्वामी, संपादक, डॉ. शिवलिंग शिवाचार्य, संस्कृती प्रकाशन, अहमदपूर, 1973

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# अध्यात्म आणि विज्ञान: प्रा. मे. पुं. रेगे यांचा दृष्टीकोन

**डॉ. सुनील ब. भोईटे**
चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर
**Corresponding Author: डॉ. सुनील ब. भोईटे**
**DOI- 10.5281/zenodo.14546615**

**Abstract:**

विज्ञान आणि अध्यात्म हे दोन भिन्न, पण एकमेकांशी जोडलेले आयाम आहेत, ज्यांचा प्रा. मे. पुं. रेगे यांनी आपल्या विचारांमध्ये सखोलपणे अभ्यास केला आहे. विज्ञानाच्या मर्यादा आणि अध्यात्माच्या व्यापकतेबाबत त्यांनी अनेक मते मांडली आहेत. चालू विज्ञान आणि सर्वंकष विज्ञान यातील फरक त्यांनी सुस्पष्टपणे मांडला आहे. विज्ञान आपल्या बौद्धिक विकासात कशाप्रकारे योगदान देते, पण तरीही विश्वाच्या सर्वंकष स्वरूपाचा शोध घेण्यात अपूर्ण राहते, असे रेगे यांनी मांडले आहे. या संशोधनामध्ये प्रा. रेगे यांच्या विज्ञान व अध्यात्म या विषयावरील विचारांची सखोल चर्चा करण्यात येणार आहे.

**Keywords:** विज्ञान, अध्यात्म, सर्वंकष विज्ञान, प्रा. मे. पुं. रेगे, वैज्ञानिक उपपत्ती, आत्मा, ईश्वर, विश्व, दर्शन, सत्य, आधुनिक समाज

**Inroduction:**

मेघश्याम पुंडलिक रेगे उर्फ मे. पुं. रेगे हे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध तत्त्वज्ञ, विचारवंत आणि मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष होते. ते 'मेपुं' या नावाने परिचित होते. त्यांचा तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, सौंदर्यशास्त्र, नीतिशास्त्र, धर्म, भाषा व साहित्य अशा विविध विषयांवर गाढा अभ्यास होता. त्यांच्या विचारांवर प्लेटो, रसेल, कांट, व्हिट्गेन्स्टाइन या पाश्चात्त्य तत्त्वज्ञांचा प्रभाव होता. रेगे यांनी तर्कतीर्थांच्या नावाने 'सर्वधर्म अध्ययन केंद्र' प्रकल्प सुरु केला, यामध्ये त्यांनी महाराष्ट्रभरातील विचारवंतांना चर्चेसाठी आमंत्रित केले. त्यांच्या मते, समता, स्वातंत्र्य आणि करुणा या मूल्यांच्या आधारे समाजसुधारणा शक्य आहे. त्यांनी विविध धार्मिक परंपरांचा अभ्यास करत, भारतीय संस्कृतीवर त्यांचा प्रभाव शोधला आणि पाश्चात्त्य व भारतीय तत्त्वज्ञानाचे तौलनिक विश्लेषण केले.

रेगे बुद्धिप्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ आणि विवेकवादी विचारांचे प्रवर्तक होते. त्यांच्या प्रमुख पुस्तकांमध्ये 'आकारिक तर्कशास्त्र', 'पाश्चात्त्य नीतिशास्त्राचा इतिहास', 'तत्त्वज्ञानातील समस्या', 'हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन' यांचा समावेश आहे. त्यांच्या लेखनात वैज्ञानिक आणि विवेकवादी दृष्टिकोनातून श्रद्धा आणि धर्माचे विश्लेषण होते. आयुष्याच्या उत्तरार्धात, त्यांनी आध्यात्मिक व धर्मसुधारणावादी विचारप्रणालीकडे वळले. 'मी आस्तिक आहे का?', 'परंपरागत श्रद्धा', 'देवाशी भांडण', 'विज्ञानाचे तत्त्वज्ञान' हे त्यांचे लेख चर्चेत आले. रेगे यांनी प्राचीन भारतीय आध्यात्मिक वारसा आणि आधुनिक पाश्चात्त्य विचारांचा समन्वय साधून आधुनिक भारताच्या संदर्भात विचार मांडले.

**प्रस्तावना:**

विज्ञान आणि अध्यात्म हे विषय एकमेकांपासून कितीही वेगळे वाटले तरी त्यांच्यात एक सुसंवाद आहे. प्रा. मे. पुं. रेगे हे विज्ञान आणि अध्यात्म यांच्यातील सुसंवादाची चर्चा करतात. ते विज्ञानाच्या मर्यादा, त्यातील अपूर्णता, आणि अध्यात्माचे व्यापक स्वरूप यावर भाष्य करतात. प्रा. रेगे यांच्या मते, विज्ञान ही एक सुव्यवस्थित ज्ञान प्रणाली असली तरी ते संपूर्ण आणि सर्वंकष ज्ञान देऊ शकत नाही. येथे आपण प्रा. रेगे यांचे विज्ञान व अध्यात्म याविषयीचे विचार समजून घेण्याचा प्रयत्न करू.

**विज्ञानाची विभागणी:**

विज्ञानाच्या विचार करताना प्रा. रेगे हे 'चालू विज्ञान' आणि 'सर्वंकष विज्ञान' अशी विभागणी करतात. चालू विज्ञान हे केवळ विशिष्ट स्वरूपाचे सत्य शोधण्यासाठी कार्य करते. ते मानवी जीवनाला उपयुक्त असले तरी ते अपूर्ण आणि मर्यादित असते. चालू विज्ञान नेहमी बदलत राहते, त्यामुळे त्यातील शोध हे तात्पुरते आणि विकसित होणारे असतात. याउलट, सर्वंकष विज्ञान म्हणजे एक अशी उपपत्ती जी कधीतरी सर्व जगाचा, विश्वाचा आणि मानवी स्वरूपाचा संपूर्ण उलगडा करेल, अशी कल्पना आहे. पण हे शक्य होईल का, याबद्दल रेगे साशंक आहेत. त्यांचा असा विश्वास आहे की, वैज्ञानिक उपपत्ती कितीही प्रगत झाली तरी ती सर्वंकष होऊ शकत नाही.

**विज्ञानाचे स्वरूप:**

विज्ञान हे सध्याच्या काळातील एक नवीन, सुव्यवस्थित ज्ञान आहे. वैज्ञानिक पद्धतीतून विचारांची स्थापना होते, जेणेकरून तर्क आणि त्यावर आधारित सिद्धांतांची प्रतिष्ठा होते. रेगे यांच्या मते, वैज्ञानिक उपपत्ती तात्पुरत्या स्वरूपाच्या असतात. तात्पुरतेपण म्हणजेच सतत बदलणारे असणे. एखादा सिद्धांत कितीही प्रतिष्ठित असला तरी त्यात बदल होण्याची शक्यता असते. शंकराचार्यांचा दाखला देत रेगे म्हणतात, "खरे-खुरे वास्तव जे यथार्थ ज्ञान देते, ते स्थिर असते. जे ज्ञान अस्थिर आहे, ते यथार्थ नाही." अशा प्रकारे वैज्ञानिक ज्ञान हे यथार्थ असले तरी स्थिर नसते, म्हणूनच ते तात्पुरते असते.

**सर्वंकष विज्ञानाची मर्यादा:**

रेगे यांच्या मते, विज्ञानाचा उद्देश सर्व जगाचा, सर्वकष स्वरूपाचा शोध घेणे आहे. पण विज्ञानाच्या मर्यादा लक्षात घेता, हे पूर्ण होणे शक्य नाही. वैज्ञानिक उपपत्ती जरी अस्तित्वाच्या अनेक अंगांचा उलगडा करीत असली, तरीही काही घटक तिच्या कक्षेबाहेर राहतात. उदाहरणार्थ, आंबा पिकण्याच्या घटनेचे सर्व भौतिक आणि रासायनिक गुणधर्म उपपत्तीत वर्णन केले जाऊ शकतात, पण आंब्याचा स्वाद, सुगंध आणि चव यांचा अनुभव उपपत्तीने व्यक्त केला जात नाही. याचप्रमाणे, वैज्ञानिक उपपत्तीतून जाणीव, इच्छा, दु:ख, सुख यांसारख्या मानवी अनुभवांचे स्पष्टीकरण देणे कठीण आहे.

**अध्यात्म आणि विज्ञान यांच्यातील परस्परसंबंध:**

विज्ञानाच्या मर्यादा समजून घेतल्यावर रेगे अध्यात्माची चर्चा करतात. वैज्ञानिक दृष्टिकोनातून जर विश्वाचे संपूर्ण ज्ञान मिळवता येत नसेल, तर अध्यात्माकडे वळावे लागते. अध्यात्म हे जीवनाचे अंतिम सत्य शोधण्याचा प्रयत्न करते. विज्ञानाच्या पलीकडे जाऊन विश्वाचा, आत्म्याचा आणि ईश्वराचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. आत्मा, ईश्वर आणि विश्वाच्या निर्मितीविषयी विज्ञान काहीही सांगू शकत नाही. हे सगळे विज्ञानाच्या आवाक्याबाहेरचे आहे. म्हणूनच, विज्ञानाची मर्यादा लक्षात घेतल्यावर अध्यात्माला जीवनात स्थान मिळते.

**वैज्ञानिक आणि धार्मिक दृष्टिकोन:**

रेगे यांनी विज्ञान आणि धर्म या दोन दृष्टिकोनांचा अभ्यास केला आहे. त्यांच्यानुसार, ख्रिस्ती धर्माचे दर्शनशास्त्र विज्ञानाशी सुसंगत करता येते. वैज्ञानिक पद्धतीने ख्रिस्ती धर्मातील अनेक संकल्पना तपासून घेतल्या जाऊ शकतात, पण ईश्वराने जग निर्माण केले ही संकल्पना विज्ञानाच्या पलीकडे आहे. विज्ञानाच्या पद्धतीने ती तपासता येत नाही, पण विज्ञानाशी विसंगतही नाही. मार्क्सवादी दर्शन, स्पेन्सरचे उत्क्रांतिवादी दर्शन हे दृष्टिकोन वैज्ञानिक आहेत, पण त्यांची मांडणी देखील विज्ञानाच्या पलीकडे जाते. या प्रकारे, विज्ञानाचे आणि धार्मिक, तात्त्विक दृष्टिकोनाचे एक वेगळे परिमाण आहे.

**ऐहिक निष्ठा आणि आधुनिकता:**

प्रा. रेगे ऐहिक निष्ठा आणि आधुनिकतेच्या प्रश्नावर सखोल चर्चा करतात. त्यांच्यानुसार, ऐहिक निष्ठा ही विज्ञानावर आधारलेली असते. आधुनिकता म्हणजे प्रगतीचा नवा विचार आणि जीवनाचा नवीन दृष्टिकोन स्वीकारणे. अध्यात्मिक मूल्ये आणि ऐहिक मूल्ये यांच्यात सुसंवाद साधण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. प्रगतीच्या नावाखाली केवळ वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे योग्य नाही. विज्ञानाची मर्यादा लक्षात घेऊन अध्यात्माचा समावेश करणे आवश्यक आहे.

**जीवनाचा अध्यात्मिक दृष्टिकोन:**

अध्यात्मिक दृष्टिकोन म्हणजे सत्याचा शोध आणि त्या मूल्याच्या अनुरोधाने जीवन उभारणे. अध्यात्मिक मूल्ये फक्त वैयक्तिक सुखावर आधारित नसून समाज आणि विश्वाच्या व्यापकतेवर आधारित असतात. असे मूल्य जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात महत्त्वाचे आहेत. प्रा. रेगे यांनी अध्यात्मिक दृष्टिकोनाची सुस्पष्ट व्याख्या करून दिली आहे. जीवनाच्या विविध अंगांचा विचार करून त्याचा जीवनात कसा वापर करावा हे ते सांगतात. वैज्ञानिक ज्ञानामुळे मानवी जीवन समृद्ध होते, पण अध्यात्मामुळे त्याला दिशा मिळते.

**सारांश:**

प्रा. मे. पुं. रेगे यांनी विज्ञान आणि अध्यात्म या विषयावर केलेली मांडणी विचारशील आहे. त्यांनी विज्ञानाच्या मर्यादा आणि अध्यात्माच्या व्यापकतेवर जोर दिला आहे. विज्ञानामुळे मानवी जीवनाला ज्ञानाची नवीन दृष्टी मिळते, पण त्याला मर्यादा आहेत. अध्यात्म या मर्यादा ओलांडून जीवनाचे अंतिम सत्य शोधते. विज्ञान आणि अध्यात्म या दोन्हींचे महत्त्व मानवजातीसाठी अपरिहार्य आहे. त्यामुळे, विज्ञान आणि अध्यात्म या दोन्हींचा समन्वय साधणे, ही आजच्या काळाची गरज आहे. अशा प्रकारे, अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय साधल्याने मानवी जीवन अधिक सुसंवादी आणि अर्थपूर्ण होईल.

**संदर्भग्रंथ:**

१. सुनीती देव, प्रा. मे. पू. रेगे यांचे तत्वज्ञान, २०००
२. प्रा. मे. पू. रेगे, इहवाद आणि सर्वधर्मसमभाव, १९९६
३. प्रा. मे. पू. रेगे, हिंदू धार्मिक परंपरा आणि समाजपरिवर्तन, २००२
४. संपा. दे. द. वाडेकर, मराठी तत्वज्ञान महाकोश, खंड २
५. डॉ. बी. आर. जोशी, सा. संकल्पना सिद्धांत कोश तत्वज्ञान, २००७

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# रवींद्रनाथ टागोर - ईश्वरविषयक दृष्टीकोन

**प्रा. डॉ. नामा ए.व्ही.**
तत्त्वज्ञान विभाग, डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापुर
**Corresponding Author: प्रा. डॉ. नामा ए.व्ही.**
**DOI- 10.5281/zenodo.14546642**

**प्रस्तावना:**

रवींद्रनाथ टागोर हे 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेले एक बंगाली लेखक व कवी होते. त्यांचे वडील देवेंद्रनाथ टागोर हे राजा राम मोहन रॉय यांच्या ब्राह्मो समाजाचे रॉयच्या नंतर प्रमुख झाले. त्यामुळे अर्थातच रवींद्रनाथ टागोर लहानपणापासून ब्राह्मो समाजाच्या संस्कारात वाढले. त्यांच्या विचारसरणीवर त्यामुळे अर्थातच ब्राह्मो समाजाचा धार्मिक व सामाजिक प्रभाव दिसून येतो. आपले तत्त्वज्ञान मांडणारा कोणताही तात्विक ग्रंथ जरी त्यांनी लिहिलेला नसला तरी त्यांचे 'गीतांजली' सारखे काव्य, त्यांनी लिहिलेली विविध नाटके, कथा, वेगवेगळया प्रसंगातून दिलेली भाषणे व लेखसंग्रह या सर्वांमधून त्यांच्या तात्विक विचारसरणीचे स्वरूप ढोबळ मानाने समजून येते. ईश्वर आणि मानव या दोघांचे स्वरूप व त्यांच्यातील संबंध, भारतीय तत्त्वज्ञानात असलेला मायावाद यासारख्या तात्विक प्रश्नांवर त्यांनी विचार व्यक्त केलेले आहेतच, परंतु त्याचबरोबर कला आणि मानवी जीवन यांच्यातील परस्पर संबंध, साहित्य कला आणि तत्त्वज्ञान या तीन्हींशी संबंधित असणाऱ्या मुद्द्यांपैकी त्यांनी आपले विचार व्यक्त केलेली आहेत. त्या विचारांची थोडक्यात रूपरेषा समजून घेतल्यास त्यांचा तात्विक दृष्टिकोन सर्वसामान्यपणे कसा होता, याची आपल्याला कल्पना येईल.

**ईश्वर आणि मानव यांचे स्वरूप व त्यांच्यातील परस्पर संबंध यासंबंधीचे टागोरांचे विचार:**

टागोरांचे तत्त्वज्ञान बंगालमध्ये प्रचलित असलेला वैष्णव संप्रदाय यावर आधारलेले होते. टागोरांचे तत्त्वज्ञान चैतन्यवादी होते, असे ढोबळमानाने म्हणता येईल. त्यांचा हा चैतन्यवाद उपनिषदावर आधारलेला होता. उपनिषदापासून प्रेरणा घेऊन टागोर म्हणतात की, या सर्व सृष्टीच्या बुडाशी एक जाणीवस्वरूप किंवा ज्ञानस्वरूप तत्त्व आहे, ते सत्, चित् व आनंद स्वरूप आहे. ब्रह्म, परमात्मा, ईश्वर ही त्याच तत्त्वाची नावे आहेत. थोडक्यात टागोर ब्रह्मवादी किंवा चैतन्यवादी विचारवंत आहेत असे म्हणता येईल. परंतु टागोरांच्या तत्त्वज्ञानाला आपण वर म्हटल्याप्रमाणे उपनिषदांबरोबरच वैष्णव संप्रदाय आणि मध्ययुगात विकसित झालेले संत साहित्य यांचाही आधार होता. वैष्णव संप्रदाय आणि संत साहित्य यांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी परब्रह्म किंवा परमेश्वर हा सगुण, साकार मानलेला होता. या परंपरेला अनुसरून टागोर सुद्धा परमेश्वराचा सगुण साकार स्वरूपात स्वीकार करतात. याबाबतीत त्यांना शंकराचार्यांची अद्वैत परंपरा मान्य नाही. शंकराचार्य आपले अद्वैताचे तत्त्वज्ञान उपनिषदांच्या पायावरच उभे करतात, तेही चैतन्यवादी किंवा ब्रह्मवादी आहेत. परंतु त्यांच्या मते चैतन्य किंवा ब्रह्म हे मुळात निर्गुण व निराकार आहे, त्याच्या ठिकाणी ऐश्वर्य सुचक असे सर्वज्ञता, सर्वशक्तिमानता यासारखे गुण व मानवाशी संबंध असल्याचे सूचक असे प्रेममयता, भक्तानुग्रहता यासारखे कोणतेच गुण नसतात.

ब्रह्माचा जग आणि जगातील जीव यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसतो. जगात अवतीर्ण होणे, भक्तांना दर्शन देणे, भक्तांचे कार्य करणे अशा कोणत्याच प्रकारच्या क्रिया ब्रह्म करीत नसते. थोडक्यात शंकराचार्यांना अभिप्रेत असलेले ब्रह्म म्हणजे ईश्वर नव्हे. असे गुण रहित, संबंधरहित, क्रियारहित, आकार रहित ब्रम्ह हे अर्थातच भक्तीचा विषय होत नाही. म्हणजेच अशा ब्रह्माची भक्ती करता येत नाही. कारण भक्ती करू शकणाऱ्या मानवाशी,

त्याच्या जीवनाशी, त्याच्या संसाराशी हे ब्रह्म कोणत्याही प्रकारे संबंधित नसते. ज्याप्रमाणे सूर्याच्या प्रकाशामध्येच सर्व जगाचे व्यवहार होत असतात, परंतु सूर्याला मात्र त्याची काहीच जाणीव नसते, त्याप्रमाणेच ब्रह्माच्या ज्ञान प्रकाशामध्येच सर्व जगाचे व्यवहार होत असतात, परंतु ब्रम्हाला मात्र त्याची जाणीव नसते. असे ब्रह्म सर्व विश्वाचा आधार आहे, असे शंकराचार्य आणि त्यांचे अनुयायी समजतात. परंतु टागोरांना मात्र परमतत्त्वाच्या संबंधातील किंवा ईश्वराच्या संबंधातील ही विचारसरणी मान्य नाही. शंकराचार्यांची वरील निर्गुण ब्रह्माची कल्पना ते खोटीआहे असे म्हणत नाहीत. परंतु असा निर्गुण निराकार परमात्मा आपल्याला रुचत नाही असे ते म्हणतात. शंकराचार्यांचे निर्गुण निराकार ब्रह्म कोरडे किंवा शुष्क आहे. ते स्वतः भक्तांवर प्रेम करू शकत नाही आणि भक्तांचे प्रेम अनुभवू शकतही नाही. प्रेम करणे आणि करून घेणे हे दोन्ही व्यवहार निर्गुण निराकार ब्रह्माच्या संदर्भात संभवत नाही, असे टागोर म्हणतात. परंतु खरे धार्मिक किंवा आध्यात्मिक जीवन जगणे याचा अर्थच मुळी सर्वोच्च अशा ईश्वरी तत्त्वावर प्रेम करणे आणि त्याचा प्रतिसाद अनुभवणे हाच असल्याने निर्गुण निराकार ब्रह्माची कल्पना अध्यात्मिक जीवन जगण्याच्या दृष्टीने उपयोगी नाही, असे टागोरांना वाटते. म्हणूनच शंकराचार्यांच्या निर्गुण ब्रह्मवादाचा आदर करूनही टागोर स्वतः निर्गुणवादी झाले नाहीत. या संबंधात त्यांनी आपले वैचारिक नाते वैष्णव परंपरेशी असल्याचे म्हटलेले आहे. फार प्राचीन काळापासून भारतामध्ये प्रचलित असलेली वैष्णव परंपरा असे सांगते की, ब्रह्म किंवा परमेश्वर हा नुसता निर्गुण नसून तो सगुणही आहे आणि साकारही आहे. परमेश्वर सर्वज्ञ, सर्वशक्तीमान, सर्वव्यापी, सर्वसुखस्वरूप, परमस्वतंत्र असा तर आहेच, परंतु त्याचबरोबर तो भक्तांवर प्रेम करणारा आहे आणि भक्तांच्या प्रेमाला प्रतिसाद देणार आहे. म्हणूनच तो भक्तांचाही अवतार घेतो म्हणजेच देह धारण करतो, ही त्याची क्रीडा किंवा लिला असते, असे वैष्णव परंपरेमध्ये समजण्यात आलेले आहे. यालाच सगुण साकार ईश्वराची कल्पना असे म्हणतात. टागोरांना ईश्वराची ही कल्पना किंवा हे स्वरूप अधिक प्रिय होते.

टागोर म्हणतात की, जो ईश्वर मानवाशी संबंधित आहे तोच मला प्रिय आहे. मानवातील उदात्त भावनांना प्रतिसाद देणारा ईश्वरच आपल्याला परिपूर्ण आध्यात्मिक समाधान देतो असे ते म्हणतात. विश्व प्रक्रियेच्या पलीकडे असणारा आणि मानवी अस्तित्वाची जाणीवही नसणारा असाही ईश्वर किंवा ब्रह्म असू शकेल, परंतु अशा ईश्वराचे टागोरांना आकर्षण वाटत नाही. नुसत्याच कापडाला पाहत बसण्यापेक्षा त्या कापडावर जसे आपल्याला रंगवलेले चित्र आवडते, ही गोष्ट खरी की चित्राला कापडाचाच आधार असतो, कापडा खेरीज चित्र उभे राहून शकणारच नाही, हे जरी खरे असले तरी कलेची जाण आणि आवड असणाऱ्या माणसाला ज्याप्रमाणे त्या कापडापेक्षाही त्या कापडावर चित्र उमटवणाऱ्या कलाकाराचेच महत्त्व अधिक वाटते, त्याप्रमाणेच हे सर्व विश्व म्हणजे एक कलात्मक कृती आहे, असे समजणाऱ्या टागोरासारख्या कलावंताला ही विश्वरूपी कलाकृती प्रगट करणाऱ्या कलावंत ईश्वरामध्येच विशेष रस वाटतो. वेदांती लोकांचे ब्रह्म हे चित्राला आधारभूत होणाऱ्या कापडासारखे आहे व म्हणूनच आपल्याला त्या ब्रह्मापेक्षाही त्या ब्रह्माचेच विश्वाला निर्माण करणारी सगुण साकार कलावंत रूप अधिक आवडते असे टागोर म्हणतात.

टागोरांना परमतत्त्वाचे किंवा ईश्वराचे सगुणरूप आवडते याचे दुसरेही एक कारण संभवते, ते असे की सगुण ईश्वर आपल्या भक्तांना आपल्यासारखेच दिव्य बनवतो. अज्ञान, वासना आणि त्याने निर्मिलेला दुःखमय संसार यापासून तो आपल्या भक्तांची सुटका करतो. परंतु तो आपल्या भक्तांचे अस्तित्व स्वतःच्या अस्तित्वामध्ये संपवून टाकत नाही. याउलट अद्वैत वेदांतातील निर्गुण निराकार ब्रम्ह हे जीवाच्या अस्तित्वाला आपल्यामध्ये समाप्त करून टाकते. मिठाची बाहुली समुद्रामध्ये बुडाली असता जशी समाप्त होते, तसाच निर्गुण ब्रह्मामध्ये जीवाचे मर्यादित अस्तित्व विलीन होते. टागोरांना ही स्थिती आवडत नाही. ते म्हणतात की, ज्या अवस्थेमध्ये ईश्वराचे महत्त्व, त्याचे ऐश्वर्य, त्याचे माधुर्य आणि विश्वाच्या पातळीवर त्याची चाललेली क्रीडा आपण अनुभवू शकत नाही, ती स्थिती आपल्याला नको, म्हणूनच ते वैष्णव पंथातील सगुण ईश्वराच्या कल्पनेला अधिक पसंत करतात. सगुण ईश्वराशी जवळीक साधून भक्त दिव्य होतो, परंतु आपले व्यक्तित्व गमावून बसत नाही, तर परमेश्वराप्रमाणेच तो दिव्य व्यक्तिमत्त्वाचा होऊन विश्वामध्ये चाललेले परमेश्वरी लिला तो अनुभवू लागतो. 'गीतांजली' या त्यांच्या प्रसिद्ध काव्यात टागोर म्हणतात की, ईश्वर हा संगीतकार आहे, तर विश्व त्याचे संगीत आहे, तर भक्त हा रसिक आहे. या रसिक भक्ताने ईश्वररुपी संगीतकाराशी जवळीक साधून त्याने गायलेल्या विश्व संगीतातील आनंद लुटावा, यातच जीवनाची सफलता आहे असे टागोर म्हणतात.

वरील विवेचनावरून टागोरांचा दृष्टिकोन स्पष्ट होईल.

अ)टागोर वेदांतातील निर्गुण ब्रह्माची कल्पना अमान्य करत नाहीत, तसेच आपले व्यक्तित्व गमावून बसुन त्या निर्गुण ब्रह्माशी एकरूप होण्याचा आदर्शही ते अमान्य करत नाहीत. फक्त इतकेच सुचवतात की, व्यक्तीशः एक कलावंत म्हणून किंवा कवी म्हणून त्यांना तो आदर्श रुचत नाही.

ब)विश्वातीत ब्रह्मापेक्षा विश्वाला निर्माण करणारा परमात्मा आणि मानवी भक्तांचा भगवान हे परमेश्वराचे रूप त्यांना अधिक आवडते. मानवाने सुद्धा परमेश्वरी साक्षात्कारात आपले व्यक्तिमत्व गमावून बसू नये असे त्यांना वाटते. त्यांच्या दृष्टीने आदर्श मानव म्हणजे परमेश्वरात हरपलेला जीव नव्हे, तर परमेश्वराशी जवळीक साधलेले दिव्य व्यक्तिमत्व म्हणजेच आदर्श मानव होय. या विवेचनावरून ईश्वर, मानव आणि त्यांच्यातील परस्पर संबंध याबाबतीतल्या टागोरांच्या कल्पना स्पष्ट होता.

**संदर्भ:**

1. The Oxford handbook of Indian Philosophy, Jonardon Ganeri (ed.),New York, NY: Oxford University Press (2017
2. Bharat, Bhartiya, and Bhartiyta: A Philosophical Exploration": “Unveiling the Essence of Indian Culture, Identity, and Philosophy., Ranjeet Kumar - 2024 – Lucknow.
3. Indian Philosophy: A Reader.Jonardon Ganeri (ed.) - 2019 - New York, NY: Routledge.
4. A study of time in Indian philosophy., Anindita N. Balslev - 2019 - New Delhi: D.K. Printworld.
5. Bhaktiyoga.Aswini Kumar Dutt - 1911 - Calcutta,: Phanindra Nath Pal, The Oriental works. Edited by Gunada Charan Sen.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# तत्त्वज्ञ आणि संत यांतील संबंध

**प्रिती नंदकिशोर धूर्वे**
संशोधक विद्यार्थी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर
**Corresponding Author: प्रिती नंदकिशोर धूर्वे**
**DOI- 10.5281/zenodo.14546664**

**सारांश:**

भारतीय संस्कृती अमाप विविधतेने नटलेली आहे. तिचे तत्त्वज्ञान जितके उत्तुंग व उदात्त आहे तितकीच तिची धमभावना प्रचंड झेप घेणारी आहे. आधुनिक काळात तत्त्वज्ञान, धम, नीती यांच्यात सूक्ष्म फरक केले जात असून त्यांच्यातील एकात्मता नाकारली जात आहे; पण खरे म्हणजे ही सव एकच अखंड, अभंग व एकसंध जीवन जगण्याची बाहय अंगे आहेत. तत्त्वज्ञानाशिवाय धम नसतो, धमाशिवाय नीती नसते आणि नीतीशिवाय समाजजीवन व कोणताही मानवी व्यवहार नसतो. तत्त्वज्ञान तर सवामध्ये सूक्ष्म व अदृश्यपणे ओतप्रोत भरून राहिलेले असते. प्रत्येक कृतीचा, श्रद्धेचा, आचाराचा, भावनेचा जो वैचा रक पाया, आधार किंवा अधिष्ठान असते, ते कोणत्या तरी रूपातील 'तत्त्वज्ञान' असते. तत्त्वज्ञानाशिवाय मग ते चांगले असो की वाईट असो- जगात काहीच असू शकत नाही. वाळूवर जशी मजबूत इमारत उभारता येत नाही तसे तत्त्वज्ञानच जर भक्कम नसले तर समाजजीवन भुसभुशीत, ठिसूळ, अव्यविस्थत व क्षणजीवी ठरल्याशिवाय राहत नाही.

तत्त्वज्ञानाची वाहती धारा कधी थांबत नाही. प्रत्येक काळाला कोणती ना कोणती तत्त्वज्ञानरूपी दृष्टी आवश्यक असतेच. ती जीवनाला दिशा देते व वळण लावते. तसेच भारतीय तत्त्वज्ञानातही होत गेले. भारतीय तत्त्वज्ञानात अत्यंत खोलवर रुजलेल्या व सवा च्या मनात दृढमूल झालेल्या अनेक तात्त्विक संकल्पना त्यांना बाध येणार नाही अशा रीतीने पण वेगळया पद्धतीने मांडण्याचे काय त्यानंतरच्या काळात भारतातील संतांनी केले. भारतात संतांचीची परंपरा खूप मोठी व प्रभावी आहे. संतांनी सवसामान्य लोकांना समजेल, पटेल व रुचेल अशा पद्धतीने प्राचीन तत्त्वज्ञानातील प्रमुख संकल्पनांची मांडणी केली व तीही पद्यरूपात. संत हे आध्यात्मिक अनुभूती असणारे कवीही होते. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानातील मूळ संकल्पना व सिद्धान्त आपल्या साध्या व लोकांना प रचित असलेल्या त्यांच्या प्राकृत व प्रांतीय भाषांतून म्हणजे लोकभाषांतून मांडले. त्यांनी केलेली विचारांची मांडणी तक बद्ध, वादविवादांनी युक्त अशी नसून त्यांना जे प्रत्यक्ष प्रतीत झाले, जे साक्षात् अनुभव आले, त्यांचीच अभिव्यक्ती आपल्याला.

प रचित व उपलब्ध असलेल्या भाषांतून केली. त्यामुळे संतांचे विचार सवसामान्य, गरीब, अशिक्षित अज्ञानी लोकांपयत जाऊन पोहोचले; त्यांना कळले, पटले, आवडले व त्यांच्या जीवनाला त्यामुळे विशिष्ट प्रकारच्या ज्ञानाचा प्रकाश मिळाला; मनाला शांती, विलासा व समाधान यांचा लाभ होत गेला, व पाथिव जीवन जगण्यासाठी लागणारे बळ, धीर, उत्साह व मानसिक स्वास्थ्य प्राप्त झाले.

**संत म्हणजे काय?**

संत' या शब्दाची व्युत्पत्ती 'सत्' म्हणजे सत्य किंवा सत्ता या शब्दापासून करण्यात येते व त्याचा अथ ज्याला सत्य कळले आहे किंवा ज्याला अंतिम सत्तेचा साक्षात् अनुभव आलेला आहे किंवा आध्यात्मिक ज्ञान किंवा बोधि किंवा गूढ आत्म-साक्षात्कार झालेला आहे, असा मनुष्य. जे अशा तऱ्हेच्या अनुभवासाठी उत्कटतेने प्रयत्न करतात अशाही व्यक्तींना 'संत' हा शब्द वापरतात. तसेच जो आध्यात्मिक व नीतिशुद्ध जीवन जगतो अशा सत्पुरुषाला उद्देशूनही संत शब्दाचा उपयोग केला जातो. पवित्र जीवन जगणाऱ्या धामिक वृत्तीच्या माणसांसाठीही हा शब्द वापरण्यात येतो. ऐतिहासिक व परंपरेच्या दृष्टीने भक्तिगीतांची रचना करणाऱ्यांना व भक्तिसंप्रदायांना मानणाऱ्या व्यक्तींचेही वण न 'संत' या शब्दाने केले जाते. महाराष्ट्रात संप्रदाय न मानणाऱ्या वैष्णव

संतकवींना 'संत' मानले जाते, आणि उत्तर भारतात १५ व्या शतकानंतर सव गुणांच्या अतीत असणाऱ्या म्हणजे निगु ण अशा परमेश्वराची जे भक्ती करतात त्यांनाही संत समजतात.

संतांनी पूव संस्कृत भाषेत लिहिलेले गंभीर व उच्च तत्त्वज्ञान त्याच भाषेत अडकून पडले होते व त्याची सवसामान्य लोकांना ओळख होत नव्हती. त्यातील तत्त्वज्ञान ही फक्त काही विद्वान संस्कृतज्ञ पंडितांची

मक्तेदारी बनली होती. बहुजनसमाज त्यामुळे अज्ञानी राहून अंधश्रद्धाळू व नादान राहिला होता. त्याला त्याच्या साध्या व सोप्या भाषेत जीवनाचे उच्च व उदात्त तत्त्वज्ञान ज्ञात करून देण्याचे अत्यंत महत्त्वाचे काय जुन्या रूढींना विरोध करून संतांनी केले. संतांनी उदात्त स्वरूपाचे अध्यात्मज्ञान गरीब, अज्ञानी माणसांच्या झोपड्यांपय त सुगम व सुबोध भाषेत नेऊन पोहोचविले. लोकांच्या बोलीभाषेत त्याची मांडणी केली, आणि भगवंताला गावागावांतून झोपड्यांपय त नेऊन पोहोचविले, आणि सव सामान्य माणसांच्या जीवनात दिव्यत्वाचा प्रकाश, बल व आनंद नेऊन पोहोचविला. संत हे प्रत्यक्ष आध्यात्मिक साक्षात्कार झाल्याने आपले विचार स्वतःच्या जिवंत अनुभवांच्या आधाराने उत्स्फूत पणे मांडत असत.

**तत्त्वज्ञ आणि संत:**

तत्त्वज्ञ हे बुद्धिप्रधान रीतीने विचार करणारे, ईश्वर जीव-जगत् यांच्या स्वरूपांची व संबंधांची तक बद्ध रीतीने मांडणी करणारे, गद्यात टीका व भाष्ये लिहिणारे असे आचाय होत. टीकाकारांची व भाष्यकारांची लेखनपद्धती ही गद्यरूप होती व ते युक्तिवादांचे खंडन युक्तिवादांच्या साहाय्याने करीत असत. त्यांच्या मनात भिक्तभाव असला तरी तात्त्विक विचारांची मांडणी करताना ते भावनांना मध्ये येऊ न देता दूर ठेवीत असत. स्वतः शंकराचाया ची स्तोत्रे भिक्तभावाने ओथंबलेली, ओसंडून वाहणारी आहेत; त्यांत भक्ताला ईश्वराविषयी वाटणारी आत भावना,

जिव्हाळा, तळमळ ओतप्रोत भरलेली आहे. तसेच इतरही आचाया च्या लेखनात आहे. पण भाष्ये, टीका, वृत्ती लिहिताना मात्र ते तक संगत व तक शुद्ध राहतात व विचारांवर भावनांचा पगडा बसू देत नाहीत.

याउलट, संत हे साक्षात्कारी पुरुष होते. संतांचे Mystics गूढवादी गूढानुभवी असे वण न करण्यात येते. "Mysticism in India, Mysticism in Maharashtra या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथात प्रा. रा. द. रानडे यांनी संतांचेच वण न करून त्यांचे तात्त्विक विचार व अनुभव सांगितलेले आहेत. संत हे निखळ पारमार्थिक अनुभवांचेच कथन करणारे होते. संतांना मूळ वेदांचे व शास्त्र ग्रंथांचे पद्धतशीर शिक्षण मिळालेले नव्हते. त्यांतील काही तर जवळजवळ अशिक्षित, निरक्षरच होते. त्यांना ब्रह्म, जग, माया, आत्मा, बंध, मोक्ष, कम, पुनज न्म, पाप, पुण्य, स्वग , नरक, नीती यांविषयी जे ज्ञान मिळालेले होते ते ऐकीव होते. पण ते सव ज्ञान त्यांनी आपल्या अनुभवात पडताळून पाहिले होते, व प्रत्यक्ष अनुभवात त्यांना जे भावले, गवसले, आकळले, त्याची त्यांनी आपल्या मोडक्या तोडक्या भाषेत मांडणी करून स्वतः कीतन, संकीत न, भजन, प्रवचन करून सव सामान्य, अशिक्षित, निरक्षर बांधवांपय त प रणामकारक रीतीने मुख्यतः गाण्यातून, संगीताच्या माध्यमातून पोहोचविले. त्यांच्या कीतनात नुसतेच विचार पोहोचविण्याचे सामथ्य नव्हते, तर लोकांच्या भावनांना वळण व दिशा लावून त्यांचे उदात्तीकरण करण्याचेही सामथ्य होते.

संतांच्या रचना गद्यरूप नसून पद्यरूप आहेत. संतांनी ताकि क युक्तिवाद करण्याच्या, खंडन-मंडन करण्याच्या पद्धतीचा अवलंब न करता प्रासादिक काव्यरचना करून लोकांच्या हृदयाला, भावनांनाच हात घातला. मध्ययुगात किंबहुना ११ व्या शतकापासून आजतागायत संतांची एक प्रदीघ मालिकाच तयार झाली. संतांनी ओव्या, अभंग, श्लोक, दोहे, चौपाया अशा विविध रूपांची भिक्तगीते रचिली, ती गायिली व गाता गाता ते नाचले. भिक्तभावाने ओसंडणारी गीते गाता गाता ते बेभान होऊन नाचू लागत व स्वतःचे भान विसरून पूण पणे रंगून जात. ईश्वरचिंतनात, देवाचे नाम घेण्यात ते इतके रंगून जात की त्यांना स्वतःचा पूणपणे विसरही पडत असे. संत हे ईशप्रेमाने रंगलेले, उन्मत्त झालेले, धुंद झालेले (God-intoxicated) असे महापुरुष होते. ते स्वतःच्या सव वैयिक्तक भावांच्या पलीकडे गेलेले असे, म्हणजे विश्वात्मक झालेले,

सिद्धपुरूष होत. त्यांच्यापाशी लोकांना आकषि त करून घेण्याची व भारून टाकण्याची असामान्य शक्ती असे. संतांनी आपल्या जीवनाने व आचरणाने सव सामान्याकाण्याची जणू वेडे केले होते. त्यांच्या विचारांची व भावनांची असाधारण मोहिनी सव तनांना पडलेली होती. त्यांच्या कवनांनी लोकांना नुसते रंजविलेच नाही तर लोक कांब आआंत रक रूपांतरण घडवून आणले. अत्यंत गहन

विचार, तत्त्वज्ञानातील अवघड करायो त्यांनी इतक्या साध्या व थोड्या शब्दांत मांडल्या की त्यांची वचने सहजच लोकांच्या स्मरणात खोल रुजली, त्यांच्या िजभेवर सहज नाचू लागली, व त्यांचे नित्य स्मरण होत राहिल्याने लोकांचे विचार व मनोवृत्ती यांच्यात अभूतपूव प रवतन घडून आले.

ईशप्रेमाने ओथंबलेली भिक्तगीते गाता गाता भक्तांच्या डोळयातून करुणेच्या व प्रेमाच्या अश्रूच्या धारा वाहू लागतात, त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहतात, तहान- भूक, थकवा यांचा त्यांना विसर पडतो, व त्यांचा अहंभाव जणू विरघळून जातो. त्यांना अनंतत्वाचा अनुभव येतो. अहंमुळे निमा ण झालेले त्यांचे सव संकुचित माव गळून पडतात, आपपर भावाचे द्वैत नष्ट होते, सवत्र त्यांना एकत्वाचा अनुभव येऊन सव विश्व आनंदाने भरल्याचा असाधारण अनुभव येतो, आणि या भावात रममाण झाले असताना संतांच्या तोंडून उत्स्फूत पणे अनेक कवने बाहेर पडतात. अशी शेकडो नव्हे, हजारो कवने संतांनी रचली आहेत, आणि त्यांत प्रतीतीचे उद्गार साकार झाले आहेत. त्यांच्या भिक्तगीतांत कृत्रिमता, औपचा रकता, बौद्धिक विलास वगैरे काहीही नाही. त्या भक्तांच्या रचना थेट हृदयातून उगम पावल्या आहेत. त्यात भावनांचा ओलावा, खळबळ, खळखळाट सहज रीतीने व्यक्त झालेला आहे. त्यात जीवात्म्याला ईश्वराशी वाटणारी जवळीक, आपुलकी, आस्था, नितांत व अगाध प्रेम व्यक्त झालेले आहे. त्या रचना करताना, त्यांत काव्यांच्या वृत्तांची रचना करताना स्वरांचा, मात्रांचा, गणांचा मोजून मापून उपयोग केलेला नाही, जसे त्या त्या क्षणात स्फुरले तसे तसे ते व्यक्त केले गेले. त्यात काव्यरचनेच्या कौशल्याची बौद्धिक कसरत नाही. सरळ अंत:करणातून धाव घेऊन बाहेर आलेले हे भक्तीचे उद्गार ऐकणाऱ्यांच्या हृदयाचा ठाव घेतात व त्यांच्या भावना उचंबळवून टाकतात, थरारून सोडतात व त्यांचे प्रचंड मंथन करून त्यांना घुसळून काढून उदात्ततेकडे खेचून नेतात.

साक्षात्कारी संतांच्या जीवनात व अनुभवात विचार व भावना, बुद्धी आणि हृदय यांच्यात वेगळेपणा न राहता ती एकजीव होऊन जातात, व त्यांना अंतिम सत्तेचे जे आकलन होते ते अंतज्ञा नाने (Intuition) होते. प्रभेदनावर आधारलेली बुद्धी त्यांच्या ठिकाणी एकत्वाचा व अभेदाचा अनुभव घेते. त्यांची भावना शुद्ध झाल्याने ती संकुचित, स्वाथ , सीमित राहत नाही. त्या भावनेचे रूपांतर प्रेमात होते व जे प्रेम वैयिक्तक, शारी रक, भौतिक आसक्तीचे न राहता विश्वाशी एकरूपता साधण्यात त्याचा परमोत्कष गाठला जातो,

संतांना त्यांच्या तपस्येमुळे अद्भुत, अलौकिक शक्ती प्राप्त होतात व ते असामान्य चमत्कार करून दाखवितात असा लोकांचा व भक्तांचा विश्वास असतो. योगसाधना करणाऱ्यांना काही लहान-मोठ्या सिद्धी प्राप्त होतात हे खरे आहे. असाध्य दुखणी बरी करणे, मनःशांती मिळवून देणे, मनातील काही इच्छा पूण करून देणे अशासारख्या गोष्टी संतांकडून केल्या जातात हेही खरे आहे. पण असे चमत्कार करून दाखविणे व आपले असामान्यत्व प्रदर्शि त करणे हे संतपणाचे खरे रहस्य व लक्षण नाही. खरे म्हणजे संत कोणत्याही भौतिक उपलब्धीसाठी जगत नसतात, तर ईशप्रेमात त्यांना जो आनंद व धन्यता लाभते त्यासाठी ते आध्याित्मक जीवन जगतात. खरे म्हणजे व्यक्तीचे आध्याित्मक जीवन 'स्वान्तः सुखाय' जगले जात असते, आणि त्यामुळे त्यांच्या हाताला निह ेतुकपणे यश मिळते व ते ज्याला हात लावतात ते काम यशस्वी होते, पण खरा संत अशा भौतिक उपलब्धीसाठी आपली आध्याित्मक साधना करीत नसतो. अलीकडे मात्र समाजसेवेच्या नावाखाली साधुसंतांकडून त्यांनी भौतिक कामे करून व चमत्कार करून समाजोपयोगी गोष्टी करून दाखवाव्या अशी अपेक्षा केली जाते. साक्षात्कारी संतांच्या अनुभवाला गूढवाद (Mysticism) म्हणतात. खरे म्हणजे जगातील सव संतांचे अनुभव जरी भिन्न रीतींनी व्यक्त होत असले तरी त्या सवा मध्ये सादृश्य असते. ते सारखेच म्हणजे साव देशिक (Universal) असतात. सव धमा त असे संत होऊन गेलेले आहेत व पुढेही होत राहतील. अशा साक्षात्कारी संतांची लक्षणे एवेलिन अंडरहिलने

असा हा ईश्वर-साक्षात्काराचा अनुभव प्रत्येक व्यक्तीस स्वतःला आपापल्या वैयिक्तक पद्धतीने येत असतो व तिचा स्वतःचा, एकटीचा, इतरांशी वाटून न घेता येण्यासारखा, अत्यंत उत्कट व अवणनीय, शब्दातीत,

अनिव चनीय असतो. असा अनुभव घेणे हे प्रत्येक जीवाचे स्वतःचे अदम्य साहस असते, व हे साहसपूण उत्क्रमण किंवा आरोहण प्रत्येक जीवाने एकट्याने, केवळ स्वतःच्या बळावर करावयाचे असते. जशी प्रेयसी प्रियकराला भेटण्यासाठी जाताना कोणत्याही अडचणींची, संकटांची,

आपत्तींची, अंधाराची, वादळाची, कशाचीच तमा बाळगत नाही, तसा संत एकटा वाटचाल करीत असतो. साक्षात्कारी संताचे एक अत्यंत महत्त्वाचे लक्षण असे असते की तो स्वतःला ईश्वराला आपला अहंभाव पूणपणे नैवेद्य म्हणून देऊन टाकतो आणि 'तेन व्यक्तेन भुञ्जीथाः ।' या ईशोपनिषदाच्या वचनाचा खराखुरा अनुभव घेत असतो. 'ते त्यागून आनंद उपभोगा' याचा येथे अथ प्रत्येक भक्ताने आपला 'अहं' किंवा 'अहंभाव' ईश्वराच्या चरणी अप ण करावा, त्याच्यावरून ओवाळून टाकावे. ज्याला ईश्वरमय व्हावयाचे असते त्याला मिळवायचे असे वेगळे काहीच राहत नाही. ईश्वरत्व म्हणजे अनंतत्व, विराटत्व. त्यात सव काही येते; त्याच्या बाहेर असे काहीच राहत नाही. जे जे म्हणून काही असते ते सारे ईश्वराचेच असते. म्हणून त्याला काहीच नको असते व मिळवायचे नसते, व कशाचीच इच्छा न वाटण्यात त्याला परमोच्च समाधान व आनंद वाटत असतो. विरोधाभासात्मक भाषा वापरायची असल्यास त्याला काही नको असते, म्हणून त्याला सव काही मिळत असते; स्वतःचे छोटेसे जीवन ओवाळून टाकण्यात किंवा देऊन टाकण्यात त्याला पूण त्व लाभत असते. जशा दोन तलवारी एका म्यानात एकावेळी राहू शकत नाहीत तसे, अहंकार व परमात्मा हे दोघे एकाच व्यक्तीत एकाच वेळी सुखाने नांदू शकत नाहीत. राधाकृष्णन् यांनी यासंबंधी उच्चारलेले वाक्य फारच बोलके आहे. त्यांनी म्हटले आहे, "Mysticism is self-emptying for the divine content to fill in." गूढानुभव म्हणजे ईश्वराने भरून राहावे यासाठी व्यक्तीने स्वतःला रकामे (अहंविहीन) करणे होय. अशा रीतीने ईश्वर-साक्षात्कार करणे म्हणजे अपूणतेतून पूणात जाऊन अवगाहन करणे, सीमोल्लंघन करून असीम महासागरात डुंबणे, विश्वाकारतेत विलीन होणे, व असे करण्याने व्यष्टीने समिष्टरूप होणे होय, आणि हे ध्येय व असा प्रयत्न ईश्वरभक्त संत सदैव करण्यात गढलेले असतात.

**संदभ ग्रंथ:-**


1. समकालिन भारतीय दशन - बसंत कुमार लाल
2. महाराष्ट्र संत - प्रा. डॉ. ग. ना जोशी (खंड 6)
3. अ रहंत पिब्लकेशन्स
4. प्राचीन मराठी वाडमयाचे स्वरूप - ह. श्री. शेनोिटकल
5. Link - https://en.m.wikipedia.org

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# श्रेष्ठ कवयित्री - संत जनाबाई

**सोनाली सुरेश पेकम**
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातुर,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
**Corresponding Author: सोनाली सुरेश पेकम**
**DOI- 10.5281/zenodo.14546701**

**सारांश:**

संत कवयित्रींच्या वैभवशाली परंपरेत जिला मानाचे स्थान आहे ती संत कवयित्री म्हणजे 'संत जनाबाई' होय संत जनाबाई स्वकष्टाने संत पदवीला पोचली. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांना वारकरी संप्रदायाचे कळस होण्याचा मान मिळाला, त्याच प्रमाणे लोकप्रियतेच्या बाबतीत संत कवयित्रींच्या नामावलीत कळसाचा मान संत जनाबाई यांना द्यावा लागेल. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मांदियाळीत संत जनाबाईला मानाचे स्थान दिले जाते. लावण्याचा पुतळा असलेल्या विठ्ठलाच्या दरबारात जनीला मान आहे. भक्तराज नामदेवांच्या भक्तीच्या प्रवासात जनीची साक्षीदाराची भूमिका आहे. वारकऱ्यांच्या मनात जनीला मानाचे स्थान आहे.

'नामयाचि दासी जनी' ही जनाबाईची श्रध्देने घेतलेली नाममुद्रा ही नाममुद्रा तिने मोठ्या आनंदाने, अभिमानाने आयुष्यभर मिरविली. तिच्या भक्तिमार्गात नामदेव तिचे आदर्श आहेत. नामयाच्या दासीपणात तिच्या जीवनाचं रहस्य आहे. नामयाची दासी ही तिला आवडणारी, प्रिय असलेली स्वत:ची खरीखुरी ओळख आहे.

**संत जनाबाईचा जन्म -**

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील गोदावरी नदीकाठी वसलेले 'गंगाखेड' हे संत जनाबाईचे जन्मगाव आहे. संत जनाबाईच्या वडिलांचे नाव 'दमा' आणि आईचे नाव 'कुरूंडबाई' असे होते. संत नामदेवाचे वडिल दामाशेटी आणि जनाबाईचे वडिल दमा हे दोघेही पंढरीचे निष्ठावान वारकरी होते. त्या दोघांमध्ये कौटुंबिक जिव्हाळ्याचा संबंध होता.

जनाबाई पाच वर्षाची असताना तिच्या आईचे निधन होते आईच्या निधनानंतर तिचे वडिल दमा हे जनाबाई यांना दामाशेटीकडे सांभाळण्यास देतात व त्यानंतर वर्षभरात जनाबाईच्या वडिलांचे निधन होते. जनाबाईंना नामदेवाचे परिवार हेच आश्रयस्थान असते.

नामदेव यांच्या परिवारातील आपले सदस्यत्व व्यक्त करणारा जनाबाईचा एक अभंग प्रसिद्ध आहे.

नामदेवाचे घरी । चौदाजण स्मरती हरी ।। चौघे पुत्र चौघी सुना । नित्य स्मरती नारायणा ।। आणिक मायबाप पाही । नामदेव राजाबाई ।। आऊबाई लेकी निंबाबाई बहिणी । पंधरावी ती दासी जनी ।।

संत नामदेवांच्या कुटुंबातील १४ जणांचा नामनिर्देश करून जनाबाई स्वत:स 'पंधरावी' म्हणून घेते. एका मोठ्या भक्त भाविक परिवाराची मी घटक आहे. याचा जनाबाईला अभिमान आहे. विशेषत: विठ्ठलाचा परमभक्त संत नामदेवांचा लाभ हे ती आपले परमभाग्य समजते. पंढरी सारख्या भूवैकुंठ क्षेत्री राहण्याचा योग, भगवान विठ्ठलाची प्राप्ती आणि संत नामदेव-ज्ञानदेवादी संतांचा संग या गोष्टी तिला आपला जन्म, वंश धन्य झाल्याचा आनंद समाधान देतात.

**जनाबाई अभंगसृष्टीची वैशिष्ट्ये -**

संत जनाबाईंची अभंगसृष्टी म्हणजे तिच्या लौकिक अलौकिक जीवनानुभवाचा संगम आहे. संत जनाबाईच्या अभंगावर गुरु संत नामदेव आणि संतसंगाती संत ज्ञानदेव या दोघांचे संस्कार दिसून येतात जनाबाईनी आपल्या दैनंदिन कष्टातच देव अनुभवला आहे. त्या वेगळी देव पुजा, धार्मिक आधार, व्रतवैकल्ये त्यांनी केलेली नाहीत. हाताने काम आणि तोंडाने हरिनाम, हा त्यांचा सहजसोपा परमार्थ आहे. संत जनाबाईच्या अभंगाचे वैशिष्ट्य सांगताना डॉ. सुहासिनी इर्लेकर म्हणतात - "जनाबाई आपल्या मन: प्रकृतीशी एकनिष्ठ आहे आणि आपल्या आधात्म ज्ञानामुळे त्या मनाच्या स्वाभाविक अनुभव विश्वाकडे ती पाठ फिरवीत नाही. विशेषत: मुक्ताबाईच्या अभंगाच्या पार्श्वभूमीवर जनाबाईच्या अभंगातून प्रकटणारे तिचे हे स्त्री मन विलोभनीय वाटू लागते" थोडक्यात जनाबाईची अभंगसृष्टी हे तिच्या स्त्रीमनाचे व ज्ञातिपणाचे समतोल दर्शन आहे.

ज्ञानदेव भगिनी, साक्षात्कारी संत मुक्ताई आणि नामदेव शिष्या जनाबाई या समकालीन आहेत. एवढेच नव्हे तर त्या संत सांगाती आहेत. त्यामुळे त्या दोघींच्या अभंगाची तुलना स्वाभाविकपणे केली जाते. मुक्ताईचे सारे जीवनच अलौकिक आहे. त्यांच्या अभंगाचे मूलभूत स्वरूप आध्यात्मिक आहे. त्यामुळे मुक्ताईचे स्त्रीमन शोधूनही सापडत नाही. या याउलट जनाबाईना स्वत:च व्यक्तीगत संसार - प्रपंच नसला तरी त्या संत नामदेवांच्या भल्यामोठ्या कुटुंबाचा भाग होत्या, नामदेवाचा परिवार, त्या परिवाराची सुखदु:खे त्या आपलेच मानत होत्या. त्यामुळे लौकिकदृष्ट्या जनाबाईचे जीवन मुक्ताईपेक्षा अधिक अनुभवसंपन्न होते. या अनुभव संपन्नतेमुळे मूळच्या ज्ञानेश्वर प्रणित आध्यात्मिक ज्ञानाला जनाबाईच्या स्त्रीमनाची जोड मिळाल्याने त्या अपूर्व संगमातून एक वेगळाच सहजसुंदर स्त्रीमनाचा अविष्कार जनाबाईच्या अभंगसृष्टीत दिसतो.

संत जनाबाईच्या अंभगातील भक्तीपर काव्यात, विशेषत: 'विठ्ठल माहात्म्य' 'नाम माहात्म्य, संत स्तुती' या अभंगावर संत नामदेवांच्या अभंगाची दाट छाया दिसते. तसेच नामदेवांच्या प्रभावाचा ठसा आपणास जनाबाईच्या 'कृष्णजन्म', 'बालक्रिडा', 'काला', 'थालीपाक', तीर्थावळी' या विषयावरील अनेक अभंगावर दिसते. हे सारे अभंग जनाबाईनी धारण केलेली 'नामयाची दासी' ही नाममुद्रा सार्थ ठरतात.

'जनीचे बोल स्वानंदाचे डोल' असा तिच्या अभंगाचा गौरव संतमंडळाचे मुकुटमणी संत ज्ञानदेवांनी केलेला आहे. जनाबाईची शब्दकळा हे तिच्या अभंगसंपदेचे एक प्रमुख बलस्थान आहे.

**जनाबाईच्या कवितेतील सामाजिकता -**

जनाबाई नामदेवांच्या घरी दासी म्हणून काम करीत होती. मात्र, तिने स्वत:चे स्वतंत्र व्यक्तीमत्त्व जोपासले होते.

नामदेवांच्या घरी सतत संत मंडळीची वर्दळ सुरू असायची. त्यांच्याशी जनाबाईचा संवाद हा सतत होत होता. नामदेव, ज्ञानदेव यांचा प्रभाव तिच्या व्यक्तीमत्वावर जसा होता, तसाच इतर संतांचाही होता. जनाबाई ज्या सामाजिक वातावरणात राहत होत्या ते सामाजिक वातावरण त्यांनी आपल्या कवितेत मांडले आहे. समाजाचे सुक्ष्म निरिक्षण तिच्या कवितेत व्यक्त होते. जनाबाई सामाजिक जाणिवा आपल्या कवितेत मांडते. तत्कालीन समाजात स्त्रीला मर्यादित स्वातंत्र्य कसे होते. स्त्रीला दुय्यम प्रकारची वागणूक दिली जात होती. समाजात स्त्रीला स्थान नव्हते. जनाबाई या मर्यादांना झिडकारून बंड करते: स्त्री स्वातंत्र्याचा उद्‌घोष करते..

जनाबाई तत्कालीन व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविते. हा आवाज त्या आपल्या कवितेतून उठवते. स्त्री म्हणून तिला कमजोर समजता कामा नये. तिला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व आहे. स्वतःच्या अस्तित्त्वासाठी ती कणखरपणे उभी राहु शकते. हा आत्मविश्वास जनाबाई कवितेतून मांडते.

स्त्रीमध्ये कणखरपणा हा असतो. त्याप्रमाणेच तिच्या ठिकाणी ऋजू भावाचे गुण असातात. प्रसंगी ती कठोरही होऊ शकते. जनाबाई स्त्रीच्या ठिकाणी असलेल्या बंडखोरपणाची भाषा करते. डोईवरचा पदर खांदयावर घेऊन ती वावरण्याची भाषा करते. पंढरीच्या पेठेमध्ये वीणा, टाळ घेऊन सहभागी होते. ही तिने व्यवस्थेविरुद्ध केलेली बंडखोरी होती.

जनाबाई स्त्रीने स्वतःला कमी लेखू नये असे म्हणते स्त्रीचा जन्म मिळाला म्हणून उदास होण्याचे कारण नाही असे जनाबाई त्या काळात ठामपणे म्हणते. आपण आपला स्त्री जन्म सार्थकी लावला पाहिजे. असे संत जनाबाई आत्मविश्वासपूर्वक म्हणतात.

**संदर्भ ग्रंथ –**


1. संतवाटिकेतील जाईचीवेल : संत जनाबाई - डॉ. दत्तात्रेय फलके यथोदीप, पब्लिकेशन, पुणे
2. मराठी संत कवयेत्री : प्रा. मा. के. यादव.स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
3. श्री नामदेव जनी आणि नागरी : रा. चिं. ढेरे.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# महाराष्ट्रातील समकालीन तत्त्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळे कृतीशिल तत्त्वचिंतक

**प्रा. डॉ. सुनिल शंकर भिसे**
बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग
**Corresponding Author: प्रा. डॉ. सुनिल शंकर भिसे**
**Email-** bhisesunil68@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14546741**

**सारांश:**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे हे तत्कालीन समाजसुधारक यांनी आंगिकारलेले एक व्रत होते. कर्मवीर भाऊराव पाटील हे एक थोर समाजसुधारक, शिक्षणमहर्षि म्हणून उदय पावले. त्यांनी बहुजनांच्या उद्धारासाठी आणि उन्नतीसाठी शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचवली. बहुजन समाजीतील विद्यार्थ्याने शिकावे सुज्ञ व्हावे, आपले आणि आपल्या समाजाचे भले करावे, कल्याण करावे हा त्यांचा हेतू होता. म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने बहुजन समाजातील तरूणांनी राजकारण करून राजकीय प्रतिष्ठा वाढवावी. समाजकारण करून समाजातील सर्वहारा वर्गाच्या तरूणांना शिक्षण दयावे. त्यांचे राजकारणात नोकरीत उच्च दर्जाचे स्थान असावे. त्यांना सर्वांगीण प्रगती साधता यावी यासाठी आहेरात्र कष्ट घेणारे या देशातील विद्वान धुरीण, राजकारणी यांच्या मधून तयार झालेले डॉ. ज. रा. दाभोळे हे एक तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक, मुक्त तत्त्वचिंतक म्हणून ओळखले जातात. हे आपल्या विद्यार्थ्यामध्ये रमणारे शिक्षक, तत्त्वज्ञ होते. ते रयत शिक्षण संस्थेमध्ये लेक्चरर म्हणून काम करीत होते. डॉ. ज. रा. दाभोळे यांचा जन्म 1 मे 1940 रोजी जिल्हा सातारा, पाटण तालुक्यातील तारळे या गावी झाला.

सुरवातीचे शिक्षण आणि बालपण सर्वसामान्य माणसांप्रमाणेच ते जगले. खेडेगावात फारसे राहिले नसले तरी, पुणे आणि कराड या सारख्या शहारांमधून त्यांनी खेडेगावातील जीवन अगदी जवळून पाहिले आहे. सर्वसामान्य माणूस कारागिरी करून आपले पोट भरत असतो. हे त्यांनी अनुभवले आहे. कारागिरीला समाजामध्ये महत्वाचे स्थान होते. लोक एकमेकांमध्ये आपल्या गरजा सांगून त्या कारागिरीतूनच गरजा पूर्ण करीत होते. कारागिरालाच कारागिराची गरज कळत होती. कारागिरामध्ये जिव्हाळा होता. त्यामुळे एकमेकांच्या गरजा भागत होत्या. सर्वसामान्य माणसांना कारागिरीच्या जोरावर जगता येत होते. डॉ. ज. रा. दाभोळे यांच्या बंधुचे टेलरिंगचे दुकान होते. ते स्वत: पट्टीचे टेलर होते. तथापि, गरिबी मात्र हाटत नव्हती. याचा मुलगामी परिणाम डॉ. ज. रा. दाभोळे यांच्या मनावर झाला होता. त्यांना गरिबी का वाढते? ती अस्तित्वात का आहे? या विषयी अतोनात कुतुहल होते. गरिबी नष्ट करण्यासाठी उपाय योजना करणे, गरिबीची चिकित्सा करणे हा त्यांच्या मनन, चिंतन आणि तत्त्वज्ञानाचा विषय राहिला आहे. ते कमालीचे चिकित्सक तत्त्वचिंतक होते.

**प्रस्तावना:-**

देशामध्ये सरकारे स्थापन होऊ लागली. राजकीय पुढारी आपआपल्या पक्षाला निवडून आणण्यात दंग होऊ लागले. डॉ. ज. रा. दाभोळे मात्र कोणता पक्ष गरिबी विषयी विचार मंथन करतो आहे, ते अगदी जवळून निरीक्षण करीत होते. त्याचा अभ्यास करीत होते. त्यांना अनुभवित होते. त्या काळात प्रजा समाजवादी, शेतकरी कामगार पक्ष, भारतीय कम्युनिष्ट यांचा प्रभाव वाढत होता. गांधी-आंबेडकर नंतर समाजसुधारणेचे वारे वाहू लागले होते. समाजाने कात टाकली होती. लोक शिक्षणाकडे वळू लागले होते. शिक्षणाचा प्रचार प्रसार होत होता. त्यामध्ये शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते घेईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही या आंबेडकरांच्या विधानाने अख्खा समाज जागृत झाला होता. त्याला शिक्षणाची आस लागली होती. कोणत्याही मार्गाने समाज शिक्षण घेण्यासाठी अतूर झाला होता. ज. रा. दाभोळे हे बहुजन समाजातीलच होते. ते उच्च विद्याविभूषित झाले होते. त्यांनी ज्ञानाधिष्ठित अभ्यासक्रम निवडला होता. ज्ञानाआधरित शिक्षण घेणे असा त्यांचा हेतू होता.

त्यांनी तत्त्वज्ञान हा विषय घेऊन आपले शिक्षण पूर्ण केले. तत्त्वज्ञानाने समाज परिवर्तीत होतो. विचारशील बनतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता. डॉ. ज. रा. दाभोळे यांनी तत्त्वज्ञानातील अनेक शाखांचा अभ्यास करून पुरोगामी विचाराची कास धरली. समाजभिमुख सामाजिक तत्वज्ञानाचा अंगिकार केला, ते स्वत: तत्त्वज्ञान जगले. त्याना कोणत्याही तत्त्वज्ञानाचे वावडे नव्हते. मात्र ते तत्त्वज्ञान अनुभवाच्या सहानेवर घासून-पुसून व स्वच्छ करून चिकित्सेच्या कसोटीवर उतरणारे असले पाहिजे. अशी

त्यांची भूमिका होती. “पुरोगामी परिवर्तनवादी, विज्ञाननिष्ठ, बुध्द, शिवाजी, बसवण्णा, फुले, शाहू, आंबेडकरवादी आणि स्त्रीवादी विचारांनीच जग बदलू शकते. नवा समाज निर्माण होऊ शकतो. समाजातील लहान सहान प्रश्न सुटू शकतात. समाजात होणारा अन्याय, भेदभाव संपू शकतो. असा प्रगाढ विश्वास डॉ. ज. रा. दाभोळे यांना आहे.”[१] (डॉ. ज. रा. दाभाळे गौरव ग्रंथ पृष्ठ क्र. ०८) समाजात खंबीरपणे उभे राहणे, समाजाचे अवलोकन करणे आणि समाजातील उणीवा नाहीशा करून समग्र समाज जीवन स्वच्छ होईल असा विचार करून आपले तत्त्वज्ञान मांडणे हे समाजातील थोर पुरूषच करू शकतात. डॉ. ज. रा. दाभोळे हे समाजातील उणीवांवर बोट ठेवणारे चिकित्सक तत्त्वचिंतक आहेत. “वर्ण-वर्ग-जात, स्त्री-दास्य मुक्तीसाठीचे नवे अंदोलन उभे केले पाहिजे अशी त्यांची सततची भूमिका आहे. या साठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्म विचाराचा त्यांनी खोलवर जाऊन अभ्यास केला आहे."[२] ज.रा. दाभोळे गौरव ग्रंथ पृष्ठ क्र. ०८) बुध्द आणि त्याचा धम्म हा विषय समजून घेतला पाहिजे. धम्म म्हणजे नीती माणसाने आंगिकारली पाहिजे. नीती असेल तरच समाजाजील वर्ण-वर्ग-जात व्यवस्था नष्ट होण्यास मदत होईल. माणसाला माणूस म्हणून मुक्त होता येईल. मुक्त माणूसच उपजिविकेचे साधन निर्माण करू शकतो. स्वत:ची आणि दुसऱ्याची उपजिवीका साधने धम्माने शक्य आहे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाणले होते. त्यांनी सर्वसामान्य माणसाला जागृत केले आणि शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. डॉ. बाबासाहेब आणि कर्मवीर अण्णा यांच्या कार्याचा वसा आणि वारसा पुढे घेऊन जाणारे डॉ. ज. रा. दाभोळे हे आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानांचा अंगीकार करून ते समजातील सर्वहारा घटकांपर्यत पोहचले पाहिजे हे दाखवून देतात. डॉ. ज. रा. दाभोळे यांना माणसाच्या दु:ख, दैन्य, दारिद्रय यावर उपाय शोधणारे, त्यास वाचा फोडणारे संशोधक, विचारवंत, साहित्यिक आवडतात. त्यांना ते आपलेसे करतात. त्यांच्या विचाराचा परामर्श घेऊन अभ्यास करून आपल्या विद्यार्थ्याने त्यांच्या पायावर उभे रहावे व पुढील वाटचाल करावी हे त्यांना अभिप्रेत आहे.

डॉ. ज. रा. दाभोळे यांनी विपूल लेखन केले आहे. विश्वचरित्र कोश यामध्ये ३०० च्या वर नोंदी लिहिल्या आहेत. प्रबोधन प्रकाशन ज्योती या मासिकात 'वाचा आणि विचार करा' या सदरातून शास्त्रीय समाजवादाचे दमदार प्रबोधन केले आहे. या शिवाय अनेक सभा, सम्मेलने अधिवेशने यामध्ये व्याख्याने दिली आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदा, अधिवेशने, सेमिनार यामध्ये सहभाग घेऊन दर्जेदार शोधनिबंध सादर करणे हे जणू त्यांनी आंगिकारलेले व्रतच होय. डॉ. ज. रा. दाभोळे हे महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद या वैचारिक संस्थेचे संस्थापक सदस्य राहिलेले आहेत. ते अनेक वर्षे परिषदेचे अध्यक्ष होते. डॉ. ज. रा. दाभोळे यांचा दांडगा व्यासंग पाहून अनेक विद्वान त्यांचे मित्र, स्नेही होते, ते आजही आहेत. डॉ. ज. रा. दाभोळे यांचा सर्वसामान्य माणसांशी जिव्हाळयाचा संपर्क होता. तसाच अनेक विद्वान, धुरीण, राजकारणी यांच्याशीही घनिष्ठ संबंध होता. डॉ. ज. रा. दाभोळे यांनी सततच समाजवादी विचारांची कास धरली. ते सत्य आणि वास्तव यावर नेमकेपणाने बोट ठेवणारे विचारवंत तत्तचिंतक होते.

सभोवतालचे सामाजिक वास्तव जवळून पाहत असताना त्यांची मते तयार झाली होती. प्रबोधन प्रकाशन ज्योती या मासिकात त्यांनी “आफ्रिकेतील २६ देशांपेक्षा भारतात गरिबांची संख्या अधिक : युनोच्या पाहणी अहवालाने केले जागे व्हायचे आवाहन” या शीर्षकाखाली मांडणी केली आहे. गरिबीचा प्रश्न अतिशय जटील आहे. तो सुटणे आणि सोडविणे यात जमिन-आसमानचे अंतर आहे. गरिबांनी गरिबच रहावे आणि श्रीमंताने श्रीमंतच होत जावे हीच धोरणे या देशात राबविली गेली आहेत. वाढती महागाई बेरोजगारी आणि अपुरे शिक्षण यामुळे सामान्य माणसाच्या गरिबीत दिवसेंदिवस भरच पडताना दिसून येते. डॉ. ज. रा. दाभोळे म्हणतात, “मी कोणी अर्थतज्ञ नाही. आपल्या भोवतालच्या एकूणच जीवनाचा अभ्यास करणारा एक जिज्ञासू विद्यार्थी आहे. आपल्या देशाच्या विकासाचा दर ९ ते ११ टक्यांपर्यत असेल असे जाहिरपणे बोलणारी आमची नेते मंडळी आपल्या पुढे देशाच्या विकासाचे खरे चित्र उभे करता आहेत की फसवे चित्र हा प्रश्न मला सध्या भेडसावत आहे.”[३] (प्रबोधन प्रकाशन ज्योती- ऑगस्ट-२०१० पृष्ठ क्र. ४५) समाजातील माणसांच्या जीवनात या सारख्या समस्यांनी उग्र स्वरूप धारण केले आहे. हे डॉ. ज. रा. दाभोळे यांनी दाखवून दिले आहे. माणूस जगतो कशासाठी, आणि तो जगतो का ? या प्रश्नांची उत्तरे आजही मिळालीत असे म्हणता येणार नाही. सामान्य माणसाच्या जीवनात दिसून येणाऱ्या समस्या हेच डॉ. ज. रा. दाभोळे यांच्या अभ्यासाचे विषय राहिले आहेत. डॉ. ज. रा. दाभोळे म्हणतात, “जनतेचे मूलभूत प्रश्न सुटण्याऐवजी ते दिवसेंदिवस बिकट होत चालले आहेत. दारिद्र, कुपोषण, आजार आणि अनेक टंचाईग्रस्त अवस्थेत बहुसंख्य लोकांना कसेबसे जीवन जगावे लागत आहे. गेल्या ६२ वर्षातील झालेल्या विकास कामांचे हेच फलित असेल तर सर्वसामान्य जनता त्रस्त झाल्याशिवाय राहाणार नाही.”[४] (प्रबोधन प्रकाशन ज्योती- ऑगस्ट-२१० पृष्ठ क्र. ४५) सर्व सामान्य माणूस आजही त्रस्त आहे हे खरंच आहे. माणसाच्या जीवनात सुख, समृध्दी आणि शांतता प्रस्थापित व्हायला हवी. त्याला सुखाने जगता यायला हवे. वाढती महागाई बेरोजगारी यापासून मुक्ती मिळायला हवी. मुलं, स्त्रिया यांचे संरक्षण व्हायला हवे. असे आजवर घडले आहे असे म्हणता येणार नाही. अंतर्मुख होऊन समाजाचा विचार व्हायला हवा. डॉ. ज. रा. दाभोळे यांनी तो विचार केल्याचे दिसून येते. आपल्या मांडणीतून त्यांनी दाखवून दिले आहे.

डॉ. ज. रा. दाभोळे यांनी महिलांच्या समस्येवर प्रकाश टाकला आहे. स्त्रीवादी विचार हे आज परवलीचे ठरत आहेत. प्रत्येकजण आपआपल्यापरिने स्त्रीवादी विचाराची मांडणी करताना दिसतो. तथापि, डॉ. ज. रा. दाभोळे यांनी महिलांच्या जीवनातील जीवघेण्या घटनांचे चिकित्सक विश्लेषण केल्याचे दिसून येते. महिलांचे प्रश्न प्राधान्याने मांडल्याचे दिसून येते. महिलांच्या जीवनातील संकटे, संघर्ष, हिंसा, शोषण, पिळवणूक, अन्याय, अत्याचार यावर मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला आहे. महिलांना स्वावलंबी स्वसंरक्षित होण्यासाठी प्रेरित केले आहे. त्यांच्या जीवनात परिवर्तन घडून यावे. त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी आपल्या मांडणीतून, तत्त्वज्ञानातून मार्गदर्शन केले आहे. डॉ. ज. रा. दाभोळे म्हणतात, "स्त्री स्वातंत्र्याचा उज्वल इतिहास भरताला लाभला आहे. इ.स. १८१२ मध्ये राजा राममोहन यांनी सतीच्या चालीविरूध्द लढा सुरू केला. १८४८ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुणे येथे मुलींची शाळा सुरू केली. या दोन्ही घटना सामाजिक परिवर्तनाला कारणीभूत ठरल्या."५ (प्रबोधन प्रकाशन ज्योती- डिसेंबर-२०१२ पृष्ठ क्र. ४९) दुःख, दैन्य, दारिद्रय यातून तावून-सुलाखून निघालेली स्त्री मोकळा श्वास घेते आहे, तोच ती बलात्काराच्या जाळयात सापडली आहे. लहान मुलींपासून ते वृध्द महिलांपर्यंत सर्वजण त्याचे शिकार होत आहेत. बलात्कार ही स्त्रीच्या जीवनातील भयंकर घटना आहे. डॉ. ज. रा. दाभोळे यांनी आपल्या मांडणीतून अशा घटनांचा निषेध नोंदविला आहे. त्याचा त्यांनी धिक्कार केला आहे. सडेतोडपणे मांडणी करणे घटनेचा रोखठोकपणा दाखवून देणे हे डॉ. ज. रा. दाभोळे यांचे तात्त्विक चिंतन राहिले आहे.

सत्य आणि वास्तव मांडणी करणारे डॉ. ज. रा. दाभोळे 'खापला चाप लावा' या आपल्या लेखात खाप पंचायतीच्या बेजबाबदार निर्णयाची चिकित्सा करतात. त्याचा परामर्श मी प्रस्तूत शोध निबंधात घेतला आहे. समाजात अनेक समस्या आहेत. बलात्कार ही एक समस्या संवेदनशील माणसाच्या विवेचनातून सुटणार नाही, याची जाणीव ठेवूनच डॉ. ज. रा. दाभोळे यांनी बलात्काराची घटना ही अमानुषच आहे, हेच दाखूवन दिले आहे. देशातील स्त्री सुरक्षित नाही. रुढी परंपरेनुसार घेतले जाणारे निर्णय हे या देशाला परवडणारे नाहीत, ही भूमिका डॉ. ज. रा. दाभोळे यांनी घेतली आहे. डॉ. ज. रा. दाभोळे म्हणतात, "खाप पंचायतीने लग्नाची वयोमर्यादा कमी करण्याचा जालीम उपाय सुचविला आहे. तो रोगापेक्षा इलाज भयंकर अशा स्वरूपाचा आहे."६ (प्रबोधन प्रकाशन ज्योती- डिसेंबर-२०१२ पृष्ठ क्र. ४८) समाजातील अशा अघोरी उपाय योजनेतून अज्ञानाची वाढ होताना दिसते. सवंग प्रसिध्दीसाठी घेतलेले निर्णय हानीकारक ठरतात. लोक त्याचे अनुकरण करतात आणि पुन्हा नव्याच समस्या निर्माण होतात. हे टाळावेच लागेल समाजात जागृती निर्माण करावी लागेल. भरतीय राज्य घटनेनुसार कायदे अस्तिवात येणे आवश्यक आहे. कायदयाला अनुसरून न्याय देणे हितावह ठरते. अशावेळी खाप ही जात पंचायत निर्णय देते आणि समाजासमोर आव्हान उभे करते, हे डॉ. दाभोळे यांनी चिकित्सकपणे मांडले आहे. त्यांनी समाजातील या सारख्या ज्वलंत समस्येवर विवेचन केले आहे. समाजातील संकटे ओळखून त्यावर मात करता येईल, अशा विचारांची, समजदारीची, तत्वज्ञानाची मांडणी झाली पाहिजे, हे डॉ. ज. रा. दाभोळे यांना दाखवून दयावयाचे आहे.

जुन्या रूढी, परंपरा टाकून देऊन नव्याचा, विज्ञानाचा स्वीकार केला पाहिजे, आपण एकविसाव्या शतकात जगतो आहोत, याचे भान ठेवले पाहिजे. जगात सतत पुढे राहता आले पाहिजे. याचा विचार करून डॉ. दाभोळे यांनी लिहिले आहे, "गेल्या सहा दशकात ज्या काही जुनाट परंपरा डोके वर काढत आहेत. त्यामुळे पुन्हा आपण अदिमानवाच्या काळात जात आहोत, असे वाटू लागाले आहे."७ (प्रबोधन प्रकाशन ज्योती- डिसेंबर-२०१२ पृष्ठ क्र.५६) समाजामध्ये कोणतीही गोष्ट दिशादर्शक, नवनिर्मिती करणारी ठरली पाहिजे. माणसाने सहनशील असावे, पण मर्यादिच्या बाहेर जाऊन उघडया डोळयांनी पाहून बलात्कारासारख्या घटना सहन करणे हे माणुसकीला शोभणारे नाही. त्यावर दुर्देवी निर्णय घेत बसणे, हे अती होत आहे. निर्णय न्यायालयाने घ्यायला हवा. कायदयानुसार गुन्हेगाराला शिक्षा व्हायला हवी ही भूमिका डॉ. ज. रा. दाभोळे यांची दिसून येते. कायदयाचे राज्य असताना, न्यायालये, तज्ञ, जाणकार, विद्वान असताना पारंपरिक पध्दती अवलंबली जाणे आणि ती अंमलात आणणे ही माणसाला न्याय मिळवून देणारी ठरत नाही. माणसाच्या दुःखाला वाचा फोडणारी दिसून येत नाही. गुन्हेगाराला कठोर शिक्षा होईल, असे म्हणता येणार नाही. याचा धिक्कार करावा तेवढा थोडाच आहे. जुन्या रुढी, चालीरिती नष्ट व्हायला हव्यात जुन्या परंपरा टाकून दयायला हव्यात. नव्या वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या प्रगत प्रथा निर्माण व्हायला हव्यात. प्रगतशील विचाराना बळ मिळायला हवे. नव्या विचाराच्या चळवळी उभ्या राहायला हव्यात. सुज्ञ सज्ञान, शिक्षित लोकांच्या संघटनाना बळ मिळायला हवे. तरच समाजातील अन्याय अत्याचार नाहीसे होतील. माणसाचे दुःख, दैन्य, दारिद्रय नष्ट होईल. खाप पंचायती सारख्या समूहाना चाप लावणे शक्य होईल. कायदयाचा अंमल वाढेल कायादयाचे पालन होईल. कायदा आणि सुव्यवस्था टिकून राहील. ही भूमिका घेऊन डॉ. ज. रा. दाभोळे यांनी आयुष्यभर आपल्या तत्त्वज्ञानाचा अंगिकार केला. समाजाला जागृत केले अशा थोर तत्त्वचिंतक डॉ. ज. रा. दाभोळे हे १ नोव्हेबर २०२३ रोजी कालवश झाले आणि तत्त्वचिंतकांच्या मध्ये एक पोकळी निर्माण झाली. ती भरून काढणे हे नव्या पिढी समोरील आव्हान ठरावे. तत्त्वज्ञान नव्याने मांडले जावे असा विश्वास बाळगतो आणि थांबतो.

**संदर्भ आणि टीपा:-**

१) डॉ. ज. रा. दाभोळे गौरव ग्रंथ पृष्ठ क्र. ०८

२) डॉ. ज. रा. दाभोळे गौरव ग्रंथ पृष्ठ क्र. ०८

३) प्रबोधन प्रकाशन ज्योती- ऑगस्ट-२०१० पृष्ठ क्र. ४५

४) प्रबोधन प्रकाशन ज्योती- ऑगस्ट-२०१० पृष्ठ क्र. ४५

५) प्रबोधन प्रकाशन ज्योती- डिसेंबर-२०१२ पृष्ठ क्र. ४९

६) प्रबोधन प्रकाशन ज्योती- डिसेंबर-२०१२ पृष्ठ क्र. ४८

७) प्रबोधन प्रकाशन ज्योती- डिसेंबर-२०१२ पृष्ठ क्र. ५६

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# श्रीचक्रधरस्वामींचा निति-विषयक दृष्टिकोन

**डॉ. सचिन ख. राजपूत**
सहायक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग, भुसावळ कला, विज्ञान आणि
पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ
**Corresponding Author: डॉ. सचिन ख. राजपूत**
**DOI- 10.5281/zenodo.14546770**

**सारांश:**

महानुभाव संप्रदाय हा महाराष्ट्रातील प्रमुख पाच संप्रदायांपैकी एक होय. महानुभाव संप्रदायाचा उदय हा १२ व्या शतकाच्या उत्तरार्धात झालेला आपल्याला दिसून येतो. महानुभाव संप्रदायाचे संस्थापक 'श्रीचक्रधर स्वामी' संत ज्ञानेश्वरांपूर्वी होऊन गेले. वि. भि. कोलते यांच्या मते, इतिहासात जेव्हा आपण बाराव्या तेराव्या शतकात प्रवेश करतो त्यावेळी आपणास समाजाचे चित्र वेगळयाच स्वरूपात दिसू लागते. आर्थिक दृष्टीने पिचलेला, नैतिक दृष्टीने अध:पतित झालेला, विविध व्रतवैकल्य यांच्या ओझ्याखाली दबलेला, निरनिराळ्या देवतांच्या आहारी जाऊन एका परमेश्वरभक्तीपासून दूर गेलेला इतकेच नव्हे तर जातिव्यवस्थेचे आत्यंतिक स्तोम अंगिकारून स्पृश्यास्पृश्याला जीवनाचा अविभाज्य भाग मानून अस्पृश्याच्या सावलीचाही विटाळ मानणाऱ्या वैचित्र्यपूर्ण समाजाचे दर्शन घडते. आणि याच वेळी **'स्वातंत्र्य हा मोक्ष, परतंत्र हा बंध'** असा चैतन्यमय संदेश देऊन सर्वांना आपल्या स्वअस्तित्वाची जाणीव करून देऊन परमेश्वरी मार्गाकडे लावून जीवोद्धरणाचे व्यसन स्वीकारून सबंध भूतमात्राच्या ठायी समबुद्धीने पाहताना **'तुमचेनि मुंगीए रांड न होआवी'** असा आत्यंतिक अहिंसेचा जनसामान्यानांच नव्हे तर अत्यंत हिंसकाला देखील उपदेश करून त्यांना तसे आचरविणारा दिव्य विभूतिमत्व, शांत वृत्ती, प्रसन्न चित्त, चांपेगौर कांती, आजानुबाहू, उंच कपाळ, ज्ञान आणि वैराग्याने युक्त असलेला परमेश्वरी अवतार म्हणून श्रीचक्रधररूपाने या भूमंडलावर अवतरला.[१]

**प्रस्तावना:-**

श्रीचक्रधर स्वामी अच्युतपद अथवा मोक्षप्राप्तीसाठी ज्ञान आणि प्रेम (भक्ती) हे दोन मार्ग स्वीकारतात. यापैकी ज्या जीवाने ज्ञानमार्गाचा पर्याय निवडला असेल, त्या जीवाला आपल्या मळकर्माचा नाश करण्यासाठी 'असतीपरी'चा आचार पाळावा लागतो, असे श्रीचक्रधर स्वामी सांगताना दिसतात. 'असतीपरी' म्हणजे एकप्रकारे पाळावयाचा आचारधर्म. येथे 'असती' म्हणजे असण्याची अथवा वागण्याची 'परी' म्हणजेच रीत होय. अर्थात्, वागण्याच्या विशिष्ट पद्धतीला 'असतीपरी' असे म्हणता येईल. 'असतीपरी' म्हणजे एकप्रकारे नैतिक उन्नतीच्या सदाचाराकडे घेऊन जाणारा आचारमर्ध किंवा नितीधर्म होय. त्यामुळे श्रीचक्रधर स्वामी तत्कालीन समाजाला तसेच आपल्या अनुयायांना. नैतिक उन्नतीकडे घेऊन जाणारे काही मार्ग सांगताना दिसून येतात. यासंदर्भात आपणास श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठातील असतीपरी, आचार आणि आचारमालिका प्रकरणाच्या माध्यमातून नैतिक उन्नतीकडे घेऊन जाणारे सदाचार सांगितलेले पहावयास मिळते. त्यांचा थोडक्यात विचार या लेखात येथे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**१. अहिंसा तत्त्व :**

श्रीचक्रधर स्वामी हे अहिंसा धर्माचे श्रेष्ठ प्रणेते होते. त्यांनी स्वत: अहिंसाधर्म अव्यभिचारी निष्ठेने पालन करून हिंसेचा प्रखर निषेध केलेला दिसून येतो. **"हिंसा न करावी हिंसा पाप : पापातंव नरक".**[२] (सू. आ.मा. १०५-१०६) येथे श्रीचक्रधर स्वामी हिंसक जीव हा नरकात जातो असे म्हणताना दिसतात. त्यांच्या मते, एका मनुष्यजीवाची हत्या केली तर ती करणाऱ्याला ब्रह्माडहननाचे पाप लागते एवढे हिंसेचे परिणाम भीषण असते. **"पिंडहनन केलेया ब्रह्मांडहनन केले होए".** (सू. वि. ६८) जेथे हिंसा घडते तेथे आपण राहू नये असे ते आपल्या शिष्यांना सांगत असत. **"हिंसा वर्ते तिये स्थानी महात्मेयां नैए असो नये".** (कोलते, पूर्वा. लीळा. २८२, पृ. १८४)

श्रीचक्रधर स्वामींच्या मते, मोक्षार्थी जीवाने अहिंसापालनाला अशा सर्वोच्च टिपेला नेऊन पोहचवावे की त्याने मुंगीचेसुद्धा वैर चिंतू नये. त्यांच्या हातून मुंगी रांड होऊ नये. **"मुक्तीची चाड तेणें मुंगिये वीरू न चिंतावें :"** (सू. आ. ६५), **"तुमचेनि मुगी रांड न होआवी".** (सू. आ. ६०) म्हणजे आपल्या हातून मुंगीचीही हिंसा होता कामा नये, असे श्रीचक्रधर स्वामी म्हणताना दिसून येतात.

त्याचप्रमाणे त्यांच्या मते, जीवाचे, महात्म्याचे बोलणे गोड असावेत. **"महात्मेनि प्रियवक्तेया होआवे :"** (सू. आ. १८८). ऐकणारा प्रसन्न झाला पाहिजे, अशी त्याची वाणी असावी. तसेच श्रीचक्रधर स्वामींच्या पुढील लीळेवरून त्यांची वाणी किती सुखद वाटणारी आहे, हे दिसून येते. जसे की, देइगावच्या एका ब्राह्मणाला पाच मुली होत्या. तो दिसला की लोक **"पांचरांडा आला"** असे म्हणत. एकदा तो श्रीचक्रधर स्वामींच्या दर्शनाला आला असता ते त्याला म्हणाले, **"भटो : या : तुमचिया पंचगंगा निकेनि असति ?"**[३] असे त्यांचे बोलणे सुखद वाटावे असेच आहे. कोणाच्या वर्मावर घाव घालणारे अभद्र शब्द तोंडातून काढू नये असाच उपदेश श्रीचक्रधर स्वामींना समाजाला द्यायचा आहे.

तसेच श्रीचक्रधर स्वामींच्या मते, वर्मस्पर्श शिरच्छेदापेक्षाही वाईट असते. **"वर्मस्पर्शे नरक : वर्मस्पर्शापसि वरि शिरच्छेदु चांगु :"** (सू. आ. १७३) मोक्षार्थी जीवाने गप्पागुंड होऊ नये. परमार्थसाधनेला गप्पा फार घातक असतात, त्यामुळे गप्पा नको गप्प असावे. त्याहून झोपणे अधिक चांगले असा उपदेश श्रीचक्रधर स्वामी आपल्या शिष्यांना देत असत. **"अन्यवार्तेपसि निद्रा चांग : वरि निद्रा कीजे : परि अन्यवार्ता न कीजे :"** (सू. आ. १५१) एखादा महात्मा दुसऱ्याला दुखवून त्याचे चैतन्य पोळवून आला असेल; तर श्रीचक्रधर स्वामी त्याचे तोंडसुद्धा पाहत नसे. त्यांचाच एक शिष्य पद्मनाभिदेव हा परमानुभवदेवाचा अपमान करून आला असता श्रीचक्रधर स्वामी त्याला म्हणतात की, **"बाइ हा प्राणियाचें चैतन्य पोळुनि आला असे : आता एथौनि याचे मुख न पाहीजे".** (सू. आ. २३९) श्रीचक्रधर स्वामींच्या मते, खोटे बोलणे, फसविणे हीसुद्धा एकप्रकारची हिंसाच होय. थट्टेत सुद्धा खोटे बोलू नये असे ते म्हणत. एकदा त्यांनी उपाध्ये नावाच्या एका महात्म्याला या बाबतीत चांगलेच खडसाविले होते, **"बटिका, एथ हांसतां ही लटिकें न बोलिजे हो :"** (सू. आ. १९०)

हिंसेला प्रवृत्त होणारा जीव श्रीचक्रधर स्वामींना आवडत नसे. एकदा एक पारधी एका सशाला पकडू पाहात होता. श्रीचक्रधर स्वामींनी त्याला आपल्या मांडीखाली आश्रय दिला व त्या पारध्याला म्हणाले की, **"हां गा : ए रानींवनी असति : तृण खाति : नदीवाहाळाची उदके पीती : यातें तुम्ही का गा मारा? :"**[४] अर्थात् हे ससे रानवनातील असतात, गावत खातात, नदी किनारी पाणी पितात मग तुम्ही यांना का मारतात? श्रीचक्रधर स्वामींच्या मते अहिंसेची दुसरी बाजू म्हणजे निरपेक्ष प्रेम होय. अहिंसा व निरपेक्ष प्रेम ही एकाच नाण्याची दोन अंगे होत. अहिंसेतून प्रेम, प्रेमपूर्वक सेवा जन्मास आली पाहिजे. श्रीचक्रधर स्वामींच्या जीवनात ती तशी आलेली दिसते. बाईसांच्या पायात मोडलेला काटा श्रीचक्रधर स्वामींनी स्वतः बाहेर काढून दिला. डांगरेश नावाच्या कुत्र्याला आपल्या हातचा प्रसाद पाहिजे, हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी त्याला आपल्या हाताने भात खाऊ घातला. तात्पर्य काय की, प्रत्येक जीवाने स्वतःच्या वैयक्तिक हितासाठी आणि व्यापक सामाजिक कल्याणासाठी अहिंसा धर्म पाळला पाहिजे. अहिंसा हा सर्वकाळी श्रेयस्कर असा हा धर्म आहे. हिंसा सर्वकाळी निंद्य आहे. **"चहु युगी हिसा अधर्मु".** (सू.वि.मा. ४४) असे श्रीचक्रधर सांगताना दिसून येतात.

येथे श्रीचक्रधर स्वामींनी नैतिक आचारांचा उपदेश करण्यात काही नवीन गोष्ट सांगितलेली दिसत नाही. 'अहिंसा' तर परंपरागत गीतोक्त धर्मच आहे. 'अहिंसा सत्यमक्रोधस्त्याग'[५] (भ.गी. अ. १६/२) ती दैवी संपत्तीत अंतर्भूत आहे. परंतु येथे श्रीचक्रधर स्वामींनी अहिंसेला मुख्य धर्म मानला. अशाप्रकारे श्रीचक्रधरांनी आपल्या धर्मात, पंथात अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार केलेला दिसतो. त्यांचा हा विचार आधुनिक काळात अहिंसेचे तत्त्वज्ञान स्वातंत्र्यसंघर्षासाठी स्वीकारलेल्या मा. गांधीजींची विचारसरणीही याच प्रकारची होती हे लक्षात घेण्याजोगे आहे.

**२. संन्यासाला प्राधान्य :**

'संन्यासा'लाही श्रीचक्रधर स्वामींनी आपल्या संप्रदायात प्राधान्य दिलेले दिसून येते. त्यांनी संन्याशांनी भिक्षुक वृत्तीने राहणे, नित्य अटन-विजन करणे, नामस्मरणात काळ व्यतीत करणे आवश्यक मानले होते. देवतांना सोडून निराकार परमेश्वराची साकार अवताराद्वारा मनोभावे सेवा करण्यासाठी संसाराचा त्याग करणे आवश्यक आहे असे श्रीचक्रधर स्वामींनी आपल्या शिष्यांना सांगितले. संन्यासाचा अर्थ सांगताना ते म्हणतात, **"राग : द्वेष : काम : मद : मत्सर : यांचा त्यामु याचि नावे संन्यासु की बाइ ॥"** (सू. आ. १७७) म्हणजे राग, द्वेष, काम, क्रोध, मद, मत्सर यांचा त्याग करणे म्हणजेच संन्यास होय, हे या सूत्रावरून श्रीचक्रधर स्वामीं स्पष्ट करताना दिसतात.

**३. विकारविकल्पांतून मुक्त :**

व्यक्तीच्या आणि पर्यायाने समाजाच्या उन्नयनाच्या दृष्टीने श्रीचक्रधर स्वामींनी मनुष्यजीवाने विकारांतून, विकल्पातून मुक्त व्हावे असा आदेश दिलेला दिसतो. त्यांच्या मते, जीवाने स्वभावी जीवन वर्तावे. स्वभाव म्हणजे जीवाची सहज स्थिती होय. स्वभावच्युती म्हणजे विकृती, विकारी वृत्ती. अर्थात जीव पूर्णपणे विकारमुक्त केव्हाच होऊ शकत नाही. **"जीवु विकारावेगळा केव्हळा जालाचि नाही."**[६] पण निवृत्तीमार्गी भिक्षुकाने विकारांवर पूर्ण विजय मिळविला पाहिजे, असे श्रीचक्रधर स्वामी म्हणतात. तसेच प्रापंचिकानेही जास्तीत जास्त तसेच संयमशील जीवन जगून जमेल तितका विकाराचा त्याग करावा. त्याने स्वैर वागू नये. "युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु"[७] (भ.गी. अ. ६/१७) या गीतेने प्रतिपादिलेल्या मर्यादेत त्याने रहावे. मनुष्यजीवाने विकारांपासून सावध रहावे. त्यांना प्रबळ

होऊ देऊ नये. कारण **"विकारे पुरुष धर्मापासुनि जाए :"** (सू. आ. मा. ११) विकार मनुष्य हा धर्मापसून दूर जातो म्हणून **"विकारु विखो न सेवावा :"** (सू. आ.मा. २२१) **"जेणे संबंध विकारु उपाजे तेयाचा असंबंधु कीजे"** (सू.आ. १३) विषयसेवन है विकाराचे अत्यंत मारक रूप आहे. म्हणून **"आला विखो : पाये हानावा"** (सू.आ.मा. ५८) अशी श्रीचक्रधर स्वामींची शिकवण होती. त्याचप्रमाणे विषयसेवनाने माणूस धर्मपालनात दुबळा होतो. **"पुरुषु जेतुलजेतुली विषयसेवा करी तेतुलतेतुला धर्मी निबलु जाए :"**८ अशाप्रकारे जीवाने विकल्पाला बळी पडू नये म्हणून विकारविकल्पांतून मुक्त व्हावे असे श्रीचक्रधर स्वामी सांगताना दिसून येतात.

**४. अहेतुक भुतभजन :**

हिंसेचा त्याग आणि विकारविकल्पत्याग ही धर्मपालनाची, नैतिक उन्नतीची दोन महत्वाची अंगे श्रीचक्रधर स्वामींनी सांगितलेली दिसतात. परंतु याशिवाय धर्मानुसरणाला आणखी एक विधायक महत्वाचे अंग म्हणजे अहेतुक भूतभजनाचे होय. भूतभजन म्हणजे अन्नदान. महानुभाव तत्वज्ञानात भजन म्हणजे भोजन असा अर्थ घेतलेला आहे. या संदर्भात श्रीचक्रधर स्वामी सांगतात, **"अन्नदान ते उत्तम"** (सू.वि.मा. १०६). बुहदारण्यक उपनिषदाच्या पहिल्या अध्यायाच्या दुसऱ्या श्लोकात, जो गृहस्थाश्रमी मनुष्य क्षुधिताला अन्न न देता स्वतः भोजन करतो त्याला नरकयातना भोगाव्या लागतात असे सुचविले आहे. म्हणून प्रत्येक प्रापंचिकाने आपल्या सामर्थ्याप्रमाणे जमेल तेवढे अन्नदान करावे असे उपनिषदाचेसुद्धा सांगणे आहे.

श्रीचक्रधर स्वामींच्या मते, ज्या जीवाच्या हातून पुण्यहेतूने भूतभजन घडते त्याला पुन्हा मनुष्यजन्म प्राप्त होतो. अहेतुक भूतभजन हे त्याहूनही श्रेष्ठ. श्रीचक्रधर स्वामी सांगतात, **"अहेतुक भूतभजन: ज्ञानाप्रति साधन :"** (सु. मा. १६८) आणि **"अहेतुक मायापुरभजन: प्रेमाप्रति साधन".** (सू. वि. १६९) अर्थात् अहेतुक भजनाने ज्ञान व प्रेम या दोन्ही गोष्टी प्राप्त होतात, जीवाच्या हातून अवताराच्या ठिकाणी जर भजनक्रिया घडली तर त्यासारखे भाग्य नाही. तो जीव परमेश्वराच्या प्रेमाला पात्र होतो असे श्रीचक्रधर स्वामी येथे सांगतात दिसतात.

अशाप्रकारे श्रीचक्रधर स्वामींनी नैतिक उन्नतीच्या सदाचाराकडे घेऊन जाणाऱ्या अहिंसा, सत्य, संन्यास, विकारविकल्पांतून मुक्त असलेला जीव, अहेतुक भूतभजन सारख्या आचारमर्धाचे पालन स्वत: तर केलेच पण आपल्या शिष्यांनाही करण्यास सांगितलेले दिसून येते.

**संदर्भसूची :**


1. कोलते, वि. भी. (संपा), 'श्रीचक्रधर दर्शन', शिक्षण व सेवायोजना विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८२, पृ. ७९-८०.
2. नेने, हरी नारायण (संपा), 'श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ', बाबू गोविंद सहाय प्रकाशक, नागपूर, तिसरी आवृत्ती, शके १८६४, आ. मा. १०५-१०६, पृ. २५.
3. कोलते, वि.भि., 'लीळाचरित्र', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, १९८२, उत्त. लीळा १०७, पृ. ४०५.
4. तत्रैव, पूर्वा. लीळा ४२, पृ. ४०.
5. श्रीमद् ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद, 'भगवद्गीता', जशी आहे तशी, भक्तिवेदांत बुक ट्रस्ट प्रकाशक, मुंबई, विसावे मुद्रण, २०१०, पृ. ५२५.
6. कोलते, वि. भि., 'लीळाचरित्र', पूर्वोक्त, उत्त. लीळा ५९५, पृ. ६९७.
7. श्रीमद् ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद, 'भगवद्गीता', पूर्वोक्त, पृ. २३६.
8. कोलते, वि. भि., 'लीळाचरित्र', पूर्वोक्त, उत्त. लीळा ५९५, पृ. ६९८.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# श्रीमद् भगवद्गीतेतील अर्जुनाच्या विषादयोगाचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून तात्विक अध्ययन

**प्रा. वैशाली चंद्रशेखर पाटील[1], प्रा. डॉ. राधिका पाठक[2]**
[1]विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे.
[2]मार्गदर्शक
**Corresponding Author: प्रा. वैशाली चंद्रशेखर पाटील**
**DOI- 10.5281/zenodo.14546791**

**गोषवारा –**

अर्जुनविषादयोग भगवद्गीतेतील संपूर्ण ज्ञानाचा आधार आहे. व्यवहारातील बाहययुध्द व आंतरिक युध्द यांचा समन्वय भगवद्गीतेत साधलेला आहे. अर्जुनाला युध्द कर संबोधले. तेव्हा तो संदेश आंतरिक युध्दाचा बनतो.

**"रात्रदिनी आम्हा युध्दाचा प्रसंग**
**तस्मात सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य "**

बाह्ययुध्द हा व्यवहाराचा भाग असला तरी आंतरिक युध्द नित्य लढावेच लागते.कारण हा आत्मोध्दाराचा लढा असतो. हा लढा कमजोर करणाऱ्या मोह, माया या शत्रु विरुध्द रोज असतो. अर्जुन दु:खी झाल्यावर वास्तव न स्विकारता या समस्येला तो डावलतो, उपमार्गात शोधतो. मनुष्य दु:खी झाला तर तो प्रश्नाचे वास्तव स्विकारत नाही. त्यामुळे तो आहे त्याच स्थिती राहण्याचा मार्ग स्विकारतो. विकास मार्गाविरुन तो मागे होतो. स्वत:ला योग्य सिध्द करण्यासाठी ज्ञान वापरतो पण तो अहंकाराचा आश्रय ठरतो. श्रीकृष्णाला अर्जुन शरण जातो. तेव्हा वास्तवाचा स्विकार करतो व ज्ञानाचे दार उघडते. मानवी वृत्तीचा संघर्ष येथे आहे. समस्या न स्विकारणे, ती टाळणे, मग वास्तव स्विकारले कि, ज्ञानाचे दरवाजे उघडतात. हेच मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहे. आंतरिक युध्दाचा जीवनात प्रवास अखंड असतो. या युध्दात निर्णय अधिकार, प्रयत्न अधिकार, कर्म अधिकार हे शस्त्र माणसाला विसरुन चालणार नाही.

"मानसिक दुर्बलता" मनुष्य जीवनाला आव्हान असते. भगवद्गीतेतील आंतरिक लढाई याच मानसिक दुर्बलतेविरुध्द आहे. यात मानवी वृत्ती भय विरुध्द धैर्य अशी आहे. प्रत्येक मानवाला रोज या संघर्षातून जावे लागते. जो या संघर्षात लढतो. त्याचा आत्मोउध्दार होवून तो विकास मार्गावर असतो. जो संघर्ष टाळतो विकास मार्गावरुन मागे जातो. अर्जुन जेव्हा वास्तव परिस्थिती स्वीकारतो. श्रीकृष्णाला शरण जातो स्वतःचा अहंकार विसरतो. तेव्हा त्याचे ज्ञानाचे दरवाजे उघड होतात.

**प्रस्तावना -**

भगवद्गीता जरी स्वतंत्रपणे वाचली जात असली, तरी मुलतः ती संस्कृत महाकाव्य महाभारत या ग्रंथात सापडते. भगवद्गीतेला गीतोउपनिषद ही म्हटले जाते. महाभारतात सध्याच्या कलियुगा पर्यंत घडलेल्या घटनांचे वर्णन दिलेले आहे. या युगाच्या आरंभी पाच हजार वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णांनी आपला भक्त व मित्र अर्जुन यांना भगवद्गीता सांगितली. त्यांच्यातील संवाद जो मानवी इतिहासातील सर्वात महान तत्वज्ञाना विषयक व धर्मा विषयक संवादापैकी एक अर्थपूर्ण मानसशास्त्रीय समुपदेशन संवाद आहे.

धृतराष्ट्र व पांडू हे दोघे भाऊ होते. त्यांचा कुरुवंशात जन्म झाला होता. ते भरत राजाचे वंशज होते आणि राजा भरत यांच्यामुळेच महाभारत हे या नाव पडले.

धृतराष्ट्राचे शंभर पुत्र तर पांडूचे पाच पुत्र होते. यात एक दिवशी दुर्योधनाने पांडवांना द्युत क्रीडे करिता आव्हान दिले. यात पांडव पुत्रांची फसवणूक झाल्यामुळे ते राज्य गमावून बसले व त्यांना तेरा वर्षे वनवास भोगावा लागला.

वनवासातून परतल्यावर पांडवांनी आपल्या न्याय हक्काचे राज्य परत मिळावे म्हणून दुर्योधनाला विनंती केली परंतु त्याने साफ नकार दिला.

आता पर्यंत पांडव सातत्याने सहिष्णुता दाखवीत आले होते. पण आता आपल्या न्याय हक्कासाठी लढावेच लागेल म्हणून पांडवांना कौरवांसोबत युद्ध करणे अटळ होते.

कुरुक्षेत्रातील युद्ध स्थळावर सैन्यांची निरीक्षण अर्जुन करतो .ज्यावेळी दोन्ही पक्ष युद्धाच्या पावित्र्यात उभे राहतात त्यावेळी महारथी अर्जुनाला दोन्ही पक्षातले नातेवाईक गुरु व मित्र हे युद्धाला आणि जीव द्यायला तयार असल्याचे दिसते. शोकाकुल व मोहग्रस्त झाल्याने अर्जुनाची शक्ती खचून जाते. जाते. मन गोंधळून जाते आणि तो युद्ध करण्याचा निश्चय सोडून देतो. हाच भगवद्गीतेतील पहिला अध्याय आहे विषादयोग.

यामध्ये ४७ श्लोक आहेत व यात अर्जुनाच्या मनस्थितीचे व वास्तवाचे वर्णन यात केलेले आहे. याच मनोवृत्तीचा मानसशास्त्राशी कसा संबंध आहे याचा शोध आपण घेणार आहोत.

**संशोधन पद्धती:**

सदर शोध निबंध लिहिण्यासाठी अभ्यास पध्दतीचा वापर केला आहे. भगवद्गीता, ज्ञानेश्वरी यांचे वाचन करून अर्जुनाच्या मनोवृत्तीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्देश -** भगवद्गीता या ग्रंथातील प्रथम अध्याय अर्जुन विषाद योगा मागची मनोवृत्ती जाणून घेणे.

**महत्त्वाचे शब्द :** गीतोपनिषद, अर्जुनः उवाच, विषाद, मानसः, कुरुक्षेत्र, अच्युत, योध्दुकामान, युयुत्सुम, सीदन्ति, गात्राणि, उपस्थे, उपाविशत्, चापम, संविग्न.

**विश्लेषण-**

**श्लोक -**

**धृतराष्ट्र उवाच...।**

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।**

**मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत सञ्जय ||१||**

धृतराष्ट्र म्हणाला हे संजया! कुरुक्षेत्र या पवित्र धर्मक्षेत्रावर एकत्रित आलेल्या युद्धाची इच्छा करणाऱ्या माझ्या आणि पांडूंच्या पुत्रांनी काय केले. महाभारतात वर्णिलेली घृतराष्ट्र आणि संजय यांनी केलेली चर्चा ही श्रेष्ठत्वज्ञानाचा मूलभूत आधार आहे.

युद्ध करण्याच्या निश्चयाने कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर एकत्रित आलेले कौरव व पांडव पुत्र भावा भावांमध्ये तडजोड व्हावी अशी त्यांची इच्छा नव्हती.

धृतराष्ट्र हा जन्मतः आंधळा होता व दुर्दैवाने तो अध्यात्मिक दृष्ट्या ही अंधच होता. त्याला नक्की माहित होते की आपली मुले ही आपल्या प्रमाणेच अध्यात्मिक ज्ञानाच्या बाबतीत अंध आहेत आणि जन्मापासूनच पुण्यवान असणाऱ्या पांडवा बरोबर आपल्या मुलांचा कधीच सलोखा होणार नाही अशी त्यांची खात्री होती. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर धृतराष्ट्र हे अंध होते. याचा त्यांना न्यूनगंड होता. न्यूनगंड ही भावना माणसाला आयुष्यात तडजोड करू देत नाही. न्यूनगंडावर मात करण्यासाठी आपल्यातील सकारात्मक शक्तीचा आपल्यालाच शोध घ्यायचा असतो व त्या शक्तीला विकसित करुन न्युनगंडावर मात करता आले पाहिजे. आपल्यात असणाऱ्या शक्तीचा जर शोध घेता आला. तर निश्चितच जीवनातील परिस्थिती व तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हे बदलतात.

नंतर कुरुक्षेत्रावर कुरुवंशातील वयोवृद्ध महापराक्रमी आणि सर्व योद्यां मधील अग्रणी अशा भीष्मांनी मोठ्याने सिंहगर्जनेप्रमाणे आपला शंख वाजवीला. त्यामुळे दुर्योधन आनंदी झाला. कारण ते दुर्योधन यांच्या अंतकरणातील भाव समजू शकले आणि त्यांच्याबद्दल असलेल्या स्वाभाविक प्रेमामुळे त्यांनी दुर्योधनाला उत्साहित करण्यासाठी मोठ्याने शंख वाजविला. यामध्ये भीष्मांनी दुर्योधनाला प्रेरणा देण्यासाठी शंखनाद केला. तर दुसऱ्या बाजूला श्रीकृष्ण आणि अर्जुन यांनी वाजविलेल्या शंखांचे दिव्य म्हणून वर्णन करण्यात आले आहे. या सर्व परिस्थितीत दुःख, करुना, प्रेम, भीती या भावनान सोबत प्रत्येकाचे वास्तव परिस्थिती बाबत समायोजन चालू आहे. संजयाने मोठ्या चातुर्याने धृतराष्ट्राला सांगितले की, पांडुपत्रांना फसविणे आणि आपल्या स्वतःच्या पुत्रांना राज्याच्या सिंहासनावर बसविण्याचा प्रयत्न करण्याचे धोरण चुकीचे आहे व ते मुळीच स्तुत्य नाही. पूर्व लक्षणावरून संपूर्ण कुरुवंशाचा विनाश निश्चित होता. राजा धृतराष्ट्रामुळे ही आपत्ती कोसळली होती. कारण त्याने आपल्या मुलांनी युद्ध करण्याच्या स्वीकारलेल्या धोरणाला उत्तेजन दिले होते. शंख नादाने धृतराष्ट्र हा भयभीत झाला होता.

भगवंताचा शुद्ध भक्त या नात्याने अर्जुनाला आपल्या भावंडाशी व चुलत्यांशी युद्ध करण्याची मुळीच

इच्छा नव्हती; पण दुर्योधन हट्टी असल्यामुळे आणि शांततामय वाटाघाटी करण्यास कधीच तयार नसल्यामुळे अर्जुनाला युद्धभूमीत येणे भाग पडले. धृतराष्ट्राच्या दुर्बुद्ध पुत्राला खुश करण्याच्या इच्छेने कुरुक्षेत्रावर लढण्यास आलेल्या नातलगांना पाहण्याची इच्छा अर्जुनाला निर्माण झाली.

**श्लोक**

**अर्जुन उवाच**

**सेनयोरुभयोर्मध्ये रयं स्थापय मेऽच्युत ||२१||**
**यावदेतानिरीक्षेऽहं योद्धकामानवस्थितान्।**
**कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ||२२ ॥**

अशा परिस्थितीत अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाल हे अच्युत ! कृपया माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्ये घेऊन चल म्हणजे हे युद्ध करण्याच्या इच्छेने प्रेरित झालेल्या आणि ज्यांच्या बरोबर मला या भयंकर शस्त्रास्त्र स्पर्धे मध्ये संघर्ष करायचा आहे, त्या सर्व उपस्थितांना मी पाहू शकेन.त्या ठिकाणी दोन्ही पक्षाकडील सैन्यांमध्ये आपले वाडवडील, आजे, शिक्षक, मामेभाऊ, पुत्र, नातवंडे, मित्र तसेच सासरे व हितचिंतक अर्जुनाने पाहिले. जेव्हा कुंतीपुत्र अर्जुनाने सर्व प्रकारच्या मित्रांना आणि नातेवाईकांना पाहिले तेव्हा तो करुणेने व्याकुळ झाला आणि याप्रमाणे म्हणाला.

**श्लोक**

**अर्जुन उवाच।**

**अष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ।**
**सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ॥२८ ॥**

अर्जुन जेव्हा आपापसात युद्ध करण्याच्या इच्छेने प्रेरित होऊन युद्धभूमीवर जमलेल्या आपल्या मित्रांना, नातेवाईकांना पाहिले तेव्हा तो त्यांच्याबद्दलच्या करुणेने अत्यंत व्याकुळ झाला. आपल्या सैनिकांबद्दल तर त्याला सहानुभूती वाटत होती आणि आता तर विरुद्ध पक्षाकडील सैनिकांचा अटळ मृत्यू पाहून त्याला त्यांच्याबद्दलही करुणा वाटली. याचा विचार करीत असताना त्यांच्या शरीराच्या सर्व अवयवांना कंप सुटला व तोंड कोरडे पडले. ही लक्षणे अर्जुनाच्या दुर्बलतेमुळे नव्हती तर भगवंताच्या शुद्ध भक्ताच्या ठिकाणी आढळणाऱ्या सहृदयतेमुळे होती. अर्जुनाच्या या मनोवृत्तीचा अभ्यास करताना जाणवते की तणाव हा उच्च पातळीवर आहे. तणाव हा मनात निर्माण होतो व मनाचे हेड ऑफीस हे मेंदू आहे असे विज्ञान सांगते.

मन हे मूर्त व अमुर्त पातळीवर कार्य करते. मुर्त कार्य म्हणजे जी सरळसरळ दिसतात व मोजमाप करण्यासारखी असतात अशी कामे. जसे स्नायू मधील ताकद, शरीराचा तोल सांभाळणे, स्पर्शज्ञान इ. थोडक्यात मूर्तकार्याचा समावेश मज्जा संस्थेत करण्यात येतो. आणि अमूर्त म्हणजे ज्या वर्तनाचे प्रत्यक्ष मोजमाप करता येत नाही. म्हणजेच मन व मनाच्या विविध अवस्था विचार, भावना, संवेदना, विवेक, जागृती इ. होय. इथे आपण अर्जुनाला आलेल्या ताणाचा विचार करणार आहोत. ताणात असताना जे विचार डोक्यात येतात त्याचे विशिष्ट लक्षणे आहेत. हे विचार अतिशय तीव्र असतात. आपल्याला या विचार प्रवाहात तटस्थ राहणे मुश्किल होते. पुन्हा हे विचार सततचे व सातत्यपूर्ण असतात. ते विचार मनाला पोखरणारे असतात. तणावाच्या संदर्भात विशेष करून पुरुषांना तर असे विचार भावना कुणाकडेही व्यक्त करणे जरा जड वाटतं. आपल्या भावना व्यक्त करणे म्हणजे कमीपणा किंवा कमतरता अशी समजूत असते. पण मानसशास्त्रानुसार तणावाचे विचार जवळच्या व्यक्तीसोबत शेअर केले तर त्याचा चांगला परिणाम होऊ शकतो. आपण जेव्हा सुखदुःखात सहभागी म्हणजे शेअरिंग असे म्हणतो तेव्हा भावनिक सूर आत्मपरीक्षणाचा असतो. तक्रारीमध्ये हाच सूर दोष देण्याचा असतो. म्हणजेच या प्रसंगात अर्जुनाला जेव्हा वाटते की आता आपल्याला आपल्याच नातलगांबरोबर युद्ध करावे लागेल या भावनेने व्याकुळ व तणावग्रस्त होऊन तो आपल्या भावना ह्या स्पष्टपणे कृष्णा जवळ शेअर करतो. यातून त्याच्या मानसिक तणावात शेअरिंग केल्यामुळे त्याचे विचार हे स्पष्ट होतात. विचारांमुळे अवयवांना कंप सुटला आणि मुख हे कोरडे पडले आहे. या ठिकाणी अर्जुनाला चिंता, नैराश्य आणि खंत या भावनांनी जखडले आहे. पण तो आपल्या नकारात्मक भावनांचा निचरा कृष्णाजवळ व्यक्त करून मनमोकळे करत आहे. ही गोष्ट आपल्याला आयुष्यात जमणे खूप महत्त्वाचे आहे.

**श्लोक**

**न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे !!**
**न काळे विनयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ॥ ३१ ॥**

या युद्धामध्ये माझ्या स्वतःच्याच नातलगांना ठार मारून त्यातून कोणाचे कसे कल्याण होणार आहे हे मला कळत नाही आणि हे कृष्णा त्यापासून प्राप्त होणारे विजय सुख आणि राज्य याची इच्छा देखील मी करू शकत नाही.

स्वतःच्या सुखासाठी इतरांना मारणे ही अपराधीपणाची भावना या ठिकाणी अर्जुनाला जाणवत आहे. ज्याप्रमाणे एखाद्याला भूक नसेल तर त्यांचा जेवण करण्याकडे कल नसतो. त्याप्रमाणे अर्जुन युद्ध करू इच्छित नव्हता. कारण त्याला वाटत होते की स्वतः च्या नातलगांची हत्या करून जीवना मध्ये काहीच आनंद मिळणार नाही. आता त्याने वनामध्ये जाऊन एकांत वासात वैफल्यग्रस्त जीवन जगण्याचा निर्णय घेतला होता. क्षत्रियांना इतर कोणताही व्यवसाय स्वीकारता येत नसल्याने क्षत्रिय या नात्याने त्याला स्वतःच्या अस्तित्वा करिता एका राज्याची आवश्यकता ही होतीच. तथापि अर्जुनाकडे राज्य नव्हते. आपल्या बांधवांशी युद्ध करणे आणि आपल्या पित्याद्वारे वारसाने चालत येणाऱ्या राज्यावर पुन्हा हक्क सांगून ते राज्य प्राप्त करण्याची एक मात्र संधी अर्जुनाकडे होती. पण असे करणे अर्जुनाला आवडत नव्हते. म्हणून तो स्वतःला वनात जाऊन एकांतवासात वैफल्यग्रस्त जीवन व्यतीत करण्यास योग्य समजत आहे. युद्धामुळे कुटुंबातील जेष्ठ व वंशाच नाश, कुळामध्ये अचर्माचे प्राबल्य होईल. कुळातील स्त्रिया दूषित होतील सर्व वाम मार्गाला लागतील.

या अपराधांची जाण असताना आम्ही अशा पापकृत्यांमध्ये का सहभागी व्हावे ? असे अर्जुनाला वाटते. या वैफल्यग्रस्त परिस्थितीत वळताना फार वर्षांपूर्वी म्हणजे आदिमानवाच्या काळात जेव्हा वानराचे मानवात रूपांतर होऊन फार काळ लोटला नव्हता. तेव्हा ही आव्हाने माणसाला त्याच्या अस्तित्वासाठि दृष्ट्या मारक होते. या आव्हानांचा सामना करायचा असेल तर उपलब्ध पर्याय होते एक लढण्याचा, दुसरा पळण्याचा, आणि तिसरा थिजण्याचा. उदा. पूर येत आहे तर पाण्याचा पर्याय शोधून सुरक्षित स्थळी जाणे अनुरूप होते. जंगलात असल्यावर बळ, आणि हत्यारे असतील तर श्वापदावर हल्ला करणे साजेसे होते. आणि सरपटणारे जनावर जवळून जाई पर्यंत थिजुन राहणे म्हणजे पुतळ्या समान राहणे उचित ठरणारे होते. किंवा दलदलीमध्ये रुतल्यावर मदत येईपर्यंत वाट पाहण्याचाच पर्याय उचित होता.

जशी परिस्थिती असेल तसा व्यक्ती त्याला अनुरूप असा निर्णय घेत असतो. येथे अर्जुनाने थिजण्याचा निर्णय घेतला. आपल्या भावनांचे नियमन न करू शकल्यामुळे अर्जुन अतीशय अशांत व वैफल्यग्रस्त झाला आहे.

**श्लोक**

**एवमुक्तत्वार्जुनः सञ्जये रथोपस्य उपाविशत्।**
**विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ।॥४७ ॥**

आपला शत्रूच्या युवा रचनेचे अवलोकन करताना अर्जुन रथामध्ये उभा होता. पण तो शोकाने इतका व्याकूळ झाला की आपले धनुष्यबाण बाजूला ठेवून तो पुन्हा खाली बसला. अर्जुनाने २८ व्या श्लोकात विषाद प्रकट केला. तो शेवटच्या क्षणापर्यंत त्याची दुःखाची सीमा ही वाढली आणि आत्मसमर्पण करून त्याने युद्ध न करण्याचा निर्णय घेतला.

**सारांश -**

महाभारतील अर्जुन हा कोणी सर्वसामान्य माणुस नव्हता. ज्ञानी, स्थीतप्रज्ञ होता. तो भगवान विष्णूचा अवतार आहे. एका बाजूने, अर्जुनाला देखील इंद्राचा अवतार/पुत्र मानले जाते. असा तो सर्वशक्तिमान, बलाढ्य क्षत्रीय, सर्वज्ञानी होता. पण तरी ही आपल्या न्याय हकासाठी आपल्याला आपल्याच आप्त जेष्ठ, स्वकीया बरोबर युद्ध करावे लागेल व अनेकाचा नाश करून मिळवलेला विजय हा  ही एक अपयशच आहे. आपल्या लोकांना दुःख देऊन ,आपण आनंदी होऊ शकत नाही.या विचाराने तो विषाद होऊन खिन्न होतो.

दैनंदिन आयुष्य जगताना अर्जुना बरोबर घडलेल्या प्रसंगात प्रत्येकाला स्वतःचे प्रतिबिंब दिसेल. आयुष्यात अडचण आल्यावर आपले अवसान गळाले आहे. तर कधी सारी शक्ती एकवटून त्या अडचणीला कसे बसे तोंड दिले आहे.  मनाच्या विविध वृत्ती असतात.  मनाने कधी रणांगण नाकारले, तर कधी समोरच्या अडचणीला मनानं उगीच कस्पटासमान मानले. कधी या मनानेच  राईचा पर्वत केला. तर कधी हिमालयालाही टेकडी म्हटले आहे. म्हणजे वास्तवाशी असलेला धागा ताणला गेला की त्यातून तणाव निर्माण होतो. हा तणाव वेळोवेळी व्यक्त केला गेला नाही. तर त्याचे रूपांतर मनोविकारात होऊ शकते.

**स्वतःचे मत -**

विषादयोगात अर्जुनाला वेळोवेळी जाणवलेल्या भावना, विचार त्यांनी कृष्णा समोर व्यक्त केल्या म्हणजेच त्यांच्या भावनांचे निचरा तिथे झाल्यामुळे तो खूप शांत झाला. तरी विवेकी विचार सोडला नाही. प्रत्येक जण स्वतः स्वतःचाच मित्र आहे तसा शत्रू ही आहे. तणावात येणारे विचार तीव्र असतात या विचार प्रवाहात तठस्थ राहणे अवघड असले तरी अशक्य नाही.

अर्जुनाचा विषय हा वास्तव परिस्थिती न स्वीकारल्यामुळे झाला आहे. वास्तव परिस्थिती स्वीकारली की ज्ञानाचे दरवाजे उघडे होतात. प्रथम अर्जुन वास्तव परिस्थिती स्वीकारत नाही म्हणून तो मोह माया मध्ये अडकतो यातुन विषाद निर्माण होतो.

**संदर्भ ग्रंथ -**


1. भगवद्गीता - श्री श्रीमद् एस. सी. भक्तीवेदांत स्वामी प्रभुपाद.
2. संस्थापकचार्य : आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ
3. मानसशास्त्र-
4. संपादक म. न. पलसाने
5. लेखक प्रा. र. वि. पंडित
6. प्रा. रा.र.बोरुडे,
7. प्रा. शिला गोळविलकर,
8. प्रा. शोभना अभ्यंकर,
9. प्रा. म. न. पलसाने.
10. विषादयोग- डॉ. आनंद नाडकर्णी
11. भगवद्गीता परिवर्तनाच्या व्यवस्थापनाचे तत्वज्ञान - साहेबराव शामराव जवंजाळ

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# धर्म आणि मानवा-मानवातील समानता- संत कबीर

**प्रा. नरवाडे मिलिंद केशव**
विभाग प्रमुख,तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र विभाग
नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे
**Corresponding Author: प्रा. नरवाडे मिलिंद केशव**
**DOI- 10.5281/zenodo.14546818**

**सारांश:**

भारतीय तत्त्वज्ञानातील मध्ययुगीन काळ हा एका चळवळीने समृद्ध झालेला आपल्याला दिसून येतो + हा काळ या चळवळीची सुरुवात दक्षिण भारतातील तामिळनाडू या राज्यातून झाली+ हि चळवळ प्रथम 6 व्या ते 10 व्या शतकात मुख्यतः अल्वार आणि नयनार यांच्या कवितांमध्ये दिसून येते+ नंतर त्या चळवळीने भागवत-पुराण आणि भगवद्गीता यांसारख्या पुराण साहित्याद्वारे संपूर्ण भारतामध्ये] विशेषतः उत्तर आणि पूर्व भारतात प्रसार केला+ इ +स + च्या 14व्या आणि 17व्या शतकाच्यादरम्यान हि चळवळ शिखरावर पोहोचली + हि चळवळ म्हणजे भक्ती चळवळ होय + या चळवळीचे मुख्य वैशिष्ठ्ये ईश्वराची भक्ती हे होते + भक्ती चळवळीचे तत्वज्ञान वैयक्तिक ईश्वराची भक्ती करण्यासोबतच आणि कर्मकांड प्रथा आणि जात-आधारित भेदभाव नष्ट करणे या वर आधारित होते + या चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे परमात्म्याशी तीव्र भावनिक आणि आध्यात्मिक आसक्ती आणि प्रेम आणि भक्ती हे मोक्षप्राप्तीचे प्राथमिक साधन आहे असा विश्वास +

**प्रस्तावना:**

भक्ती संतांनी जातिव्यवस्थेचा आणि सामाजिक पदानुक्रमांचा विरोध केला आणि ईश्वराच्या दृष्टीने सर्व समान आहेत असे प्रतिपादन केले + त्यांचा असा विश्वास होता की जात] लिंग किंवा जन्माची पर्वा न करता मोक्षची दारे सर्वांसाठी खुली आहे + भक्ती तत्त्वज्ञान असे मानते की कोणालाही ईश्वरावरील अखंड भक्तीने मोक्ष प्राप्त होवू शकतो + मनुष्याचे अंतिम ध्येय हे परमात्म्याशी एकरूप होणे] जन्म आणि मृत्यूच्या चक्रातून ( ¼संसार½ मुक्त होणे हे आहे असे तत्तवज्ञान भक्ती चळवळीतून संत सांगत होते +

या भक्ती चळवळीने अनेक महान संत भारताच्या भूमीला समृद्ध करण्यासाठी दिले ] त्यातीलच एक महान संत म्हणजे संत कबीर + संत कबीरांची वाणी हि त्यांच्या दोह्यातून प्रकट झालेली आपल्याला दिसून येते + संत कबीरांची वाणी + त्यातील विचार आजही विविध क्षेत्रामध्ये (सामाजिक ] राजकीय] सांस्कृतिक ] धार्मिक] उपयोगात आणले जातात +

**धर्मांची समानता आणि मानवांमध्ये समानता**

संत कबीरांच्या मते + जीवनात केवळ धर्माचे पालन करणे महत्त्वाचे नाही ] तर या जीवनात भौतिक सुखापेक्षा स्वतःला अधिक किंवा महत्त्वाचे जाणून घेणे आवश्यक आहे + आपल्यापैकी प्रत्येकजण ब्रह्माचा एक भाग आहे ] जी विश्वाची अंतिम शक्ती आहे + प्रत्येकजण अपूर्ण आहे ] अपूर्ण-पूर्ण (ब्रह्म चे ज्ञान प्राप्त करणे हे प्रत्येकाच्या जीवनाचे ध्येय असले पाहिजे + परंतु कबीरांना त्यावेळी परिस्थिती खूप चिंताजनक वाटली + प्रत्येक धर्मात जितका अंतर्गत विरोध होता तितकाच इतर धर्मात विरोध होता + संत कबीरांनी आपल्या प्रत्येक धर्मातील तीर्थयात्रा ] व्रतवैकल्य आणि मूर्तिपूजेला विरोध केला + संत कबीरांच्या काळातील एक प्रमुख समस्या ही होती की प्रत्येक धर्म आपापसात संघर्ष करत होता + हिंदू आणि मुस्लिम हे प्रमुख धर्म होते + प्रत्येक धर्माने स्वतःचा धर्म सत्याचा मार्ग मानला आणि इतर धर्मांचा द्वेष केला ] अशा स्थितीत संत कबीरांनी आपल्या संयमी वाणीतून धर्माचे खरे स्वरूप लोकांना सांगितले + संत कबीरांनी कोणत्याही प्रचलित धर्माचे किंवा पंथाचे

अनुकरण केले नाही + त्यांनी तत्कालीन हिंदु धर्मावरही टीका केली आहे ] त्यानुसार ]

पोथी पढी पढी जग मुआ पंडित भयान कोय A
ढाई आखर&प्रेम का पढे सो पंडित होय AA

याचा अर्थ असा की कितीही पोथी पुराणे वाचली तरी पंडित ज्ञान संपादन करू शकत नाही] परंतु ज्याच्या हृदयात इतरांबद्दल आणि प्राण्यांबद्दल प्रेम आहे तो पंडित होऊ शकतो + दांभिकता] दांभिकता आणि जुलूमशाहीचा निषेध करून] साधेपणाने जगणारी माणसेच हे जग घडवू शकतात- संत कबीरांनीही हिंदू धर्मातील धर्म] पंथ आणि जातिभेदावर टीका केली आहे- त्यांच्या मते]

कामी क्रोधी लालची ] इनते भक्ती न होय A
भक्ती करे कोई सुरमा ] जाती बरण कुल खोयAA

म्हणजे क्रोध] वासना] मत्सर] लोभ इत्यादी विकार असलेल्या लोकांकडून भक्ती शक्य नाही- परंतु ज्यांनी आपल्या जातीचा आणि चारित्र्याचा अहंकार नष्ट केला आहे त्यांच्याकडूनच भक्ती शक्य आहे- जातिव्यवस्थेवर विश्वास ठेवणाऱ्या समाजाला संत कबीरांनी खरा मार्ग दाखवला- संत कबीरांनी जशी हिंदू धर्मावर टीका केली आहे] तशीच त्यांनी मुस्लिम धर्मावरही टीका केली आहे- मुस्लिमांच्या बाबतीत काझी] मौलवी] दरवेज यांच्यावरही टीका झाली आहे]

कंकर-पत्थर जोरि के मस्जिद लई बनाय A
ता चढि मुल्ला बांग दे का बहरा भया खुदाय AA

म्हणजे दगड गोळा करून मशीद बांधली तरी मौलवी मशिदीवर चढून आवाज करतात] पण देव बहिरे आहे का] ज्याला मुंगीच्या पावलांचा आवाज ऐकू येतो] त्याला मोठ्याने ओरडण्याची गरज नाही]
संत कबीर यांनी मौलवींच्या पाच वेळच्या नमाज आणि हज यात्रेला विरोध केला आहे-

मुलाना तुझे करीम का कब आया फरमान A
दया भाव हिरदै नहीं] जबह करै हैवानAA

याचा अर्थ] हे मौलवी! देवाने तुम्हाला यज्ञ करण्याची आज्ञा केव्हा दिली] हे पशू! तुम्ही असहाय्य प्राण्यांना दया न करता मारता] तुम्हाला स्वर्ग आणि देव कधीच मिळणार नाही- संत कबीरांनीही हिंदू आणि मुस्लिम धर्मांच्या उधळपट्टीला विरोध केला आहे- त्यांच्या मते]

कबीर पाथर पूजे हरि मिलै] तो मी पूजूँ पहार।
घर की चाकी कोउ न पूजै] जा पीस खाए संसार।।

याचा अर्थ दगडाची पूजा केल्याने देव मिळत असेल तर मी दगडाच्या विशाल पर्वताची पूजा करतो- दगडाच्या पुतळ्यापेक्षा माझ्या घरातील हातचक्की चांगली आहे] जी सर्व जग दळून खाते- त्यामुळे हिंदू धर्मात मूर्तीपूजेला विरोध आहे] तर मुस्लिम धर्मात हज यात्रेलाही विरोध आहे-

सेप स्बूरी बाहिरा] क्या हज काबै जाइ A
जिनकी दिल स्याबति नहीं] तिनकौ कहाँ खुदाइ AA

अरे शेख! तुम्ही समाधानापासून दूर आहात] त्यामुळे हज आणि काबाला जाऊन काही उपयोग नाही- ज्याचे मन शुद्ध नाही त्याला भगवंताची प्राप्ती होत नाही- अशा प्रकारे संत कबीरांनी प्रचलित धर्मावर टीका केली आहे- पण त्याने आपल्याला सांगितले आहे की] रामामध्ये अल्लाहचा साक्षात्कार होता आणि अल्लाहमध्ये रामाचा] त्यांचा राम आणि अल्लाह कोणत्याही प्रकारचे नाव] जात] धर्म] संप्रदाय किंवा नियम मान्य करत नाहीत- सर्व धर्मांच्या समानतेचे सूत्र त्यांनी वापरले-त्यामुळे विविध धर्मांमध्ये धार्मिक ऐक्य निर्माण झाले-

**निष्कर्ष:**

द्वैताच्या धार्मिक ऐक्यामुळे मानवातील वैराची भावना नष्ट होऊन कोणीही श्रेष्ठ किंवा नीच किंवा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसतो- प्रत्येकाला देवाची भक्ती करण्याचा अधिकार आहे- कोणाच्याही अधिकारावर आणि अधिकारावर कोणीही बोजा टाकला नाही] मानवामध्ये समता आणि सामाजिक एकता निर्माण करण्यासाठी संत कबीरांनी प्रत्येक मानवाला मानवतावादाची शिकवण दिली- मानवतावादात नैतिकता खूप महत्त्वाची आहे] मानवतावाद हा माणूस म्हणून जगण्याचा आणि इतरांना माणूस म्हणून जगण्यासाठी मदत करण्याचा एक साधा मार्ग आहे- संत कबीर हे भारतातील सर्वात प्रसिद्ध गूढ संतांपैकी एक होते- त्यांची शिकवण सर्व धर्मांच्या लोकांसाठी तितकीच महत्त्वाची आहे] कारण त्यांनी भेदाच्या पलीकडे जाऊन उपदेश केला- त्यांच्या एका प्रसिद्ध दोहेत (साखी त्यांनी म्हटले आहे]

ßकबीर खडे] बाजार में] सब की चाचे खैर] ना कहू से दोस्ती] ना कहू से बैरÞ

कबीर खुल्या बाजारात उभा राहतो आणि सर्वांच्या कल्याणाची इच्छा करतो- तो कोणाचा मित्रही नाही आणि कोणाचाही शत्रू नाही] तो लोकांना हृदयाचा खरा धर्म शिकवण्यासाठी आला होता-लोकांना धर्माच्या कर्मकांडापासून दूर ठेवण्यासाठी आणि त्यांना देवत्वाशी एकात्मतेकडे नेणारा आंतरिक मार्ग दाखवण्यासाठी] त्यांनी लोकांचे मन प्राणीवरतं केले-

संत कबीर यांनी सर्व लोकांवर आणि देवाच्या सर्व सृष्टींवर सार्वभौमिक आणि कोणतीही अट न ठेवता प्रेम कसे करावे शिकवले] ते म्हणाले]

ßप्रेम प्रेम सब कोई कहे] प्रेम ना चिन्हे कोई] आठ प्रहार
भिजा रहे] प्रेम कहावई सोईÞ

(प्रेमाबद्दल सगळेच बोलतात] पण भीतीने ते समजतात का] जर ते चोवीस तास प्रेमात बुडलेले असतील तर ते होऊ शकते प्रेम असल्याचे सांगितले-

**संदर्भ साहित्य**


1. Dr. Pandey Rakesh Kumar , Sant Kabir Life and His Philosophy, January 2018, Raj Publications, ISBN-10: 9789382281146, ISBN-13: 978-9382281146, ASIN: 9382281142
2. Paul Smith, Kabir: A Daybook, 30 January 2013, Createspace Independent Pub, (30 January 2013), 4900 LA Cross Rd North Charleston, SC 29406, US, ISBN- 10: 1482081539, ISBN-13:978-1482081534
3. Jain Chanchreek, Saint Kabir: Life and Philosophy, December 2007, Shree Publishers & Distributors, December 2007, ISBN-10: 8183291619, ISBN-13:978-8183291613
4. डॉ- त्रिगुणायत गोविंद कबीर कि विचारधारा] सहयात निकेतन ] श्रद्धानंदपार्क कानपूर
5. कुंभार नागोराव ]विचारशलाका संतसाहित्यातील नैतिक विचार-
6. जाफरी सरदार ] कबीर वाणी] पहिले संस्करण १९६५] प्रकाशक-राजकमल प्रकाशन प्रा- ली- १-बी- नेताजी सुभाष मार्ग दारियागंज नई दिल्ली, ISBN ८१-७१७८-८०६-८
7. Dr Das Jagessar, The Bijak of Guru Kabir, Vol-3,Pub-Panth Shri Hajur1008 ArdhaNam Saheb, Sadguru Kabir Prakatya Dham, Lahartara, Varanasi, India,ISBN 978-0-9686313-3-1, First Edi.- 2014.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संताचा सामाजिक संदेश

**प्रा. डॉ. गणेश बालाजीराव बेळंबे**
तत्वज्ञान विभाग प्रमुख,
कै. बापुसाहेब पाटील एंकबेकर महाविद्यालय, उदगीर जि. लातूर
**Corresponding Author: प्रा. डॉ. गणेश बालाजीराव बेळंबे**
**Email:** ganeshbelambe622@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14546828**

**प्रस्तावना**

अस्तित्वाच्या किनाऱ्याला मर्म बंधाची चौकट बांधता येत नसते. सामाजिक परिस्थितीच्या विचारांच भान ठेवणारा कुठलाही माणुस आपले कर्तृत्त्व नीतिमान करण्याचा प्रयत्न करतो. मानवी इतिहासात दुर्गुणाच्या विरूद्ध सद्‌गुणाची लढाई नेहमीच चालत आलेली आहे. ही सद्‌गुणाची लढाई महाराष्ट्राच्या इतिहासात पर्यायाने देशाच्या इतिहासात संत चळवळीने निर्माण केली आहे. जाचक रूढी परंपरेमुळे, धार्मिक कर्मकांडामुळे मूलभूत हक्क हिरावून बसलेल्या बहुजन समाजाच्या मानवी हक्काचं विचारपीठ संत साहित्यातून जन्मास आले. वर्णवादी व्यवस्थेत ब्राम्हण सोडून सर्वच शूद्र आहेत, परशुरामाने पृथ्वी निक्षत्रीय केली अशा अनेक भाकड कथांमधून वर्णवर्चस्ववाद्यांनी माणुसकीचा केसाने गळा कापला होता. बंडाची ठिणगी पेटवणाऱ्या अनेक संतांचा, महापुरूषांचा खुनही झाला पण क्रांती रक्त मागत असते, त्यासाठीच हे बलीदान. भविष्यामध्ये संत चळवळीने सामाजिक समतेचे महायुद्ध घडविले. शुद्र असणाऱ्या बहुजन समाजाचा स्वातंत्र्यवादी चेहरा समोर आणण्याच्या हेतूने संत चळवळीचे योगदान जगाच्या इतिहासात जगातल्या सर्व जाती धर्मासाठी एकसंध करणारी, सर्वांना न्याय पातळीवर बंधुत्वाची शिकवण देणारी, सर्वव्यापी राष्ट्रीय अस्मितेची समतेच्या इतिहासातील सर्वात मोठी करुणेची सामाजिक चळवळ आहे.

**संत परंपरा –**

महाराष्ट्राच्या दैनंदिन जीवन व्यवहारात संत विचार आणि वारकरी सांप्रदायाचा पगडा खूप मोठा दिसून येतो. जगाच्या पाठीवर सम्नतेची मांदीयाळी वारकरी सांप्रदायात पहायला मिळते. तेथे कोणीही लहान–मोठा नसतो, प्रत्येकजण एकमेकाचा सन्मान करण्यासाठी एकमेकाला नतमस्तक होतात. नामदेव, ज्ञानदेव, तुकाराम, अन् पांडुरंगाचा टाळ मृदंगाच्या तालावर जयघोष करत मनातले सर्व क्लेशभाव विसरून जगण्याची प्रेरणा आणि उर्मी बहाल करतात. दारिद्रय, गरीबी, दुःख हे सर्व विसरून पांडुरंगाच्या भक्तीसाठी बहुजन समाजाची ही संत चळवळ खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या चार मूल्यांना खांद्यावर घेऊन नाचत असते. ज्या समाजाचे अधिकार आणि स्वातंत्र्य धोक्यात असते अशा समाजाचे त्यांच्या वेदनेतून, सोसलेल्या अन्यायातून, झालेल्या अत्याचारातून प्रतिकार करण्याची ऊर्मी ज्यावेळी एकत्रित होते त्यावेळी तिला तुम्ही–आम्ही चळवळ म्हणतो. हीच चळवळ ब्राम्हण्यवृत्तीच्या विरोधात रस्त्यावर उतरली जनमाणसाचा आवाज वेद, पुराण, स्कंद आणि धर्मपरंपरा याला केंद्रबिंदू न मानता माणूस आणि मानवी कल्याण हाच या चळवळीचा केंद्रबिंदू होता. विशेषतः संपूर्ण बहुजन समाजाच्या स्वातंत्र्यासाठी, हक्कासाठी, त्यांच्या न्यायासाठी लढणारी जगाच्या इतिहासातली अहिंसात्मक क्रांतीची अपूर्व चळवळ म्हणजे बहुजन मुक्तीची संत चळवळ होती.

**महात्मा गौतम बुध्दांचा वैचारिक वारसा –**

शोषित माणसांच्या कर्दमलेल्या चेहऱ्यावर शुद्र वृत्तीचे जीवन जगण्या पलीकडे दूसर असे कांहीच उरले नव्हते, अशा एका काळात स्वातंत्र्याची पुनर्निमिती करण्याच्या उद्देशाने माणसांणा आणि त्याच्या आस्मितेला स्वाभिमान निर्माण करून देणारी परिस्थिती उभी करण्यासाठी एका महापुरुषाने समतेचे रणसिंग फुंकले. ज्या समाजाचा विवेक हरपून गेला होता, नीतिमुल्यांच्या नावाखाली वेद व पुराणाच्या माध्यमातून इतर माणसाला गुलाम होण्याचे राजकारण शिकवावे. करुणा आणि दया जेथे शुन्य झाली होती बंधुत्वाच्या नावाखाली ब्राम्हणशाहीची मिरासदारी जिथ माजवली जात होती. ज्या ब्राम्हणशाहीने माणुसकीला काळमिा फासणारी वर्ण व्यवस्था निर्माण केली होती, दारिद्र आणि विषमतेने बरबटलेल्या समाजात न्याय मागण्याची हिंम्मत सुद्धा तीळमात्र कुणामध्ये उरली नव्हती सामाजिक सद्भावासारखे शब्द कचराकुंडीत पडून होते, ते कोणाच्या आचरणात येत नव्हते.

क्रोध, अंहकार आणि इर्षा या मस्तवाल व्यवस्थेत राजेशाहीचा अंकुश पुरोहितशाहीने काबीज केला होता. माणसाची जीवन मूल्य रस्त्यावरती फेकून देऊन त्यांची होळी करावी काय अशा एका अंधारलेल्या युगामध्ये भारताची अस्मिता आणि कवचकुंडले ज्यानी लोकउद्धारासाठी लोकशाहीच्या चार मूलभूत तत्त्वाच्या पदमार्गातून पुनर्स्थापित करण्यासाठी मानवतेच्या सुखासाठी समाजातली इर्षा, स्पर्धा, असूया, वैर, दुष्टपणा यांच्यावर आपल्या सद्‌गुणाने घाव घालून माणसाच्या मनामध्ये द्वेष आणि मत्सराचा झगमगाट नाहीसा करण्यासाठी सर्व जातीतील सर्व माणसांना आपल्या हृदयासी कवटाळून संपूर्ण जगाला, दया, क्षमा, शांती अन् करुणेची हाक दिली त्या प्रकाशात समाजातील दूरीते जळून पडली. धम्म नावाच्या विचाराने नीति विवेकाचे जागरण केले, भारतीय संस्कृतीचे व सामाजिक परिवर्तनाचे सामाजिक प्रबोधनाचे सगळे पाठ ज्या बीजातून निर्माण झाले उभ्या जगाला ज्या संतानी समतेची मांदीयाळी शिकवली सर्वाचे भले होंवो आणि कुणालाही दुःख न मिळो या साठी चार आर्यसत्याचा लखलखीत प्रकाश जगाच्या नीतिशास्त्राला प्रमाण म्हणून पायाभूत ठरला. ज्याच्या विचारा शिवाय लोकशाहीची जीवनमूल्य साकारु शकत नाहीत. मानवी समाजाच्या निर्मितीसाठी समाज धारणेच्या मार्गातून जाती, पंथ, वंश, भेद, अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांड, विषमता रुढी

परंपरा, यांना छेद देऊन आत्मिक उन्नतीचा आत्मउद्धाराचा, आत्मचैतन्याचा, आत्मप्रतिभेचा, आत्मप्रकाशित, आत्मचैतन्यवादी, आत्मविश्वासू, असा आत्मिक ज्ञानाचा आत्मउद्धार ज्या महामानवांनी मानवाच्या मुक्तीसाठी अतिम सत्याचा....

बुद्धम शरणम् गच्छामि,
धम्म शरणम् गच्छामि,
संघम शरणम् गच्छामि,

हा विश्वव्यापी विचार देऊन जगण्याचा नवीन दृ ष्टीकोन दिला आणि जगाच्या इतिहासात ज्यानी रक्तहीन क्रांतीचा समता ध्वज फडकाविला. जगातली हृदयपरिवर्तनाची पहिली लढाई ज्यानी जिंकली आणि येणाऱ्या सर्व पिढीला दीपस्तंभ बनून नैतिक मूल्याच्या उंचीवर जगतकल्याणाच्या मानवतेची आर्त हाक ज्यांनी या मातृभूमीत रुजवली ते पहिले संत तत्त्वज्ञ महात्मा गौतम बुद्ध होत.

गौतम बुद्धाच्या चार आर्य सत्य आणि अष्टांग मार्गाने मानवाला दुःख मुक्तीचा मार्ग सांगितला. माणसाच्या शरीरातील अंतरिक सहा शत्रूवर काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर यांचे दमन केल्या शिवाय चित्त शांत होणार नाही. लोक पथभ्रष्ट आहेत. त्यांच्या पथमार्गात लख्ख प्रकाश आणण्यासाठी बुद्ध विचाराची मशाल धारण करणे गरजेचे आहे. जगाच्या इतिहासात ही मशाल संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत बसवेश्वर, संत कबीर, संत तुकाराम, गाडगेबाबा यांनी अविरत तेवत ठेवली. समाजातील सर्वच दंभावर सर्वच संतानी प्रहार केला. थोडक्यात धम्मातील माणसाच्या माणूसकीचा मानवता मार्ग अधोरेखित करण्यासाठी सर्वच संतानी त्या काळातील समाज शांतीचा नवीन विचार आपल्या अभंग वाणीतून प्रकट केला. माणसाच्या जीवनातली बाधा दूर करण्यासाठी तथागतानी अनेक प्रश्न निर्माण केली आहेत.

"तथागत" म्हणतात कोणी महान सर्वज्ञ आहे? कोणी महान सृष्टीकर्ता आहे? तो न्यायी आहे, तो कृपावंत आहे. तर मग या सृष्टीत एवढा अन्याय का होतो आहे? ज्याला दृष्टी आहे, जो दुःखद क्लेशकारक स्थिती पाहू शकतो असा ब्रम्हा आपल्या रचनेला सुधारत का नाही ? त्याच्या द्वारा निर्मित संपूर्ण प्राणीमात्र सृष्टी दुःख का भोगत आहेत ? तो सर्वांना सुखी का ठेवत नाही? या सृष्टीत छल, कपट, मिथ्याकथन, अज्ञान, अत्याचार, का फोफावत आहेत? सत्यावर असत्याचा विजय का होतो आहे? सत्य आणि न्याय याला पराजित का व्हावे लागते? माझी अशी मान्यता आहे की, ब्रम्ह हा असा आहे की, ज्याने केवळ असत्याला, अन्यायाला आश्रय देण्यासाठी ही सृष्टी रचिली आहे, म्हणून तुमचा ब्रम्ह ही अन्यायी ठरतो अत्याचारी ठरतो. तथागताच्या मते ईश्वरावर श्रद्धा असणे ही बाब सर्वात भयानक आहे. ईश्वराची पूजा आणि प्रार्थना यातून पुरोहित पद उत्पन्न पावते, पुरोहित हा असा दुष्ट बुद्धीचा आहे की तो मिथ्या विश्वास, अंधश्रद्धा, निर्माण करतो. यामुळे समाज दृष्टीचा मार्ग प्रगतीशील होणार नाही. मिथ्या विश्वास, अंधश्रद्धा, हे सम्यक दृष्टीचे शत्रू आहेत आणि सम्यक दृष्टी ही आर्य अष्टांगिक मार्गाचे सर्वश्रेष्ठ तत्त्व आहे. म्हणून तथागत म्हणतात ज्या प्राण्याने प्रथम जन्म घेतला तो स्वतः विषयी विचार करू लागला की, मी ब्रम्ह आहे, मी निर्माता आहे, मीच सर्वाचा पिता आहे, तो ब्रम्ह नित्य आहे, अपरिवर्तनशील आहे, अनंत काळापर्यंत तसाच रहाणार आहे, तर मग आपण सर्व ज्याची उत्पत्ती ब्रम्हाने केली ते आम्ही सर्व अनित्य का? अपरिवर्तनशील का आहोत? अस्थिर का आहोत? अल्पजीवी का, होत? मरणधर्मी कां आहोत? जर सर्व प्राणी मात्रात सर्व शक्तीमान सर्व ईश्वर विद्यमान आहे. जो त्या प्राणीमात्राला सुखी अथवा दुःखी करु शकतो जो त्यांना पुण्य कर्म किंवा पाप कर्म करण्यासाठी त्याला प्रवृत्त करतो तर असा ईश्वर ही पापाने कलंकित होतोच. एक मनुष्य त्यांच्या आज्ञे प्रमाणे वागत नसावा अथवा ईश्वर न्यायीक शील नसावा, अथवा हा ईश्वर आंधळा तरी असावा, कारण याला माणसाच्या दुःखासी कसलेच देणे घेणे नाही. याला इश्वर कसे म्हणता येईल. गौतमबुद्धाच्या मतानुसार कर्माचा केंद्रबिंदू हा माणूस आणि ईश्वर यांचे संबध नाही तर धर्माचा केंद्रबिंदू मानवा–मानवातील संबध हा आहे. माणसाने माणसासी कसे वागावे, जेणे करून सर्वच सुखी होतील याचा उपदेश देणे हाच धर्माचा हेतू आहे.

प्रा. डॉ. गणेश बालाजीराव बेळंबे

गौतमबुद्धांनी आपल्या धम्म विचारामध्ये आणि संघामध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांना आणि स्त्रीयांना प्रवेश देऊन स्त्रीमुक्तीचा मार्ग मोकळा केला.

**ढोल, पशु, शुद्र, गवार नारी**
**सब ताडन के अधिकारी**

असे म्हणून हिनवणा–या ब्राम्हणी व्यवस्थेला लाथाडून तथागत महामानव गौतमबुद्धांनी प्रजापिता गौतमी माता यशोधरा यांचा सर्वप्रथम संघ प्रवेश केला आणि जगातल्या स्त्रीमुक्तीच्या क्रांतीचे, स्त्री–पुरुष समता विचाराचे बीज भारतीय भूमीत रुजविले. येणाऱ्या सर्व पिढीला आपल्या सामाजिक कÞतीने वटवृक्ष होऊन मार्गदर्शन केले.

**संत तुकाराम –**

गौतमबुद्धाच्या वरील तर्कावरुन मानवी कल्याणाची तळमळ हा त्यांच्या विचाराचा मूळ गाभा आहे. अगदी त्याच प्रमाणे संत तुकारामाच्या विचारात धम्मविचाराची बीजे दिसून येतात. संत तुकाराम महाराज ए. अभंगात म्हणतात.

**"माया ब्रम्ह म्हणती**
**ऐसे धर्म ठक**
**आपणा ऐसे लोक नागविले."**

तुकारामाच्या अभंगाचा मुळ अर्थ असा आहे की, माया आणि ब्रम्हाच मृगजळ दाखवणारे, वेद पुराणाचा आधार घेऊन जात व्यवस्थेत भेद पाडणारे अंतिम सत्याचा खरा शोध लावू शकत नाहीत. पण समाजातील सामान्य माणसाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन ढोंगी धर्म मार्तंड धर्माचे फसवे ठेकेदार. माया ब्रम्हाच्या नावाखाली लोकांचे शोषण करतात, त्यांना निव्वळ नागवतात. त्यामुळे स्पष्टपणे तुकारामाने या दांभिक पणावर प्रहार करताना माया, ब्रम्ह, कर्मकांड हे ठोसपणे नाकारले आहे. मानवी सदगूणाला महत्त्व दिले आहे.

**महात्मा कबीर –**

महात्मा कबीर सुद्धा आपल्या एका दोह्यात असे म्हणतात–

**"पाथर पुजे हरी मिले,**
**तो मैं पुजूं पहार ।"**

वरील दोह्या मध्ये कबीर असे सांगतात की दगड पूजून किंवा मूर्ती पूजा करून देव भेटत असेल, हरी भेटत असेल, तर मी खूप मोठा पर्वत पूजेन. मला किती मोठा देव भेटायला हवा, पण असे केल्याने देव भेटत नाही, देव दगडात नाही, देव माणसात असतो. ही बुद्ध विचाराची शिकवण कबीरांनी मोठ्या तळमळीने आपल्या विचारातून व्यक्त केली आहे. समाजाला जागं करण्याचं आणि समाज नाही उठल्यावर त्याला खडे बोल सुनावण्याचे काम

कबीरांनी केले आहे. धर्म व्यवस्थेच्या नावाखाली भरडल्या गेलेल्या पिळल्या गेलेल्या सर्व सामान्य माणसाच्या कल्याणासाठी समाजाला बंधुत्वाची शिकवण महात्मा कबीरांनी दिली आहे.

**महात्मा बसवेश्वर –**

महात्मा बसवेश्वरानी १२ व्या शतकात परिवर्तनाची क्रांती केली. अक्कमहादेवीसह अनेक स्त्रीयांना अनुभव मंटपात प्रवेश देऊन स्त्री स्वातंत्र्याचे मूल्य निर्माण केले. याच बसवेश्वरांनी 'कायक वै कैलास' काम हाच परमेश्वर असा समाजाला संदेश देऊन माणसाच्या उच–नीचतेला व ब्राम्हणी व्यवस्थेच्या षडयंत्राला चोख प्रत्युत्तर दिले. कर्म संस्काराची प्रतिष्ठा वाढवून माणसाला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असणारी मूलतत्त्वे निर्माण करण्यासाठी प्रस्थापिताच्या विरोधात त्यांनी संघर्ष केला.

बुद्धाने परिवर्तनवादी व्यवस्थेचा पाया रचला पण इ. स.पूर्व १८७ ला पुश्यमित्रशुंगाने विषमतामूलक चातुर्वर्ण्य वैदिक ब्राम्हणी व्यवस्थेला पुनर्जीवीत केले त्याचा परिणाम म्हणून असलेला बहुजन समाज हा ६००० जातीत विभागला गेला. ब्राम्हणांनी धर्मशास्त्रे, पोथी, आठरा स्कंद, वेद, मनुस्मृतीपुराण यांची भाकडपणे निर्मिती करून कुठल्याही सत्याचा आधार न घेता ६००० जातीत विभागल्या गेलेल्या सर्व जातीला गुलाम बनवले. बहुजन समाज पोरका झाला. शतकानुशतके स्वातंत्र्यापासून, लोकशाहीच्या चार मूलभूत तत्त्वापासून, आत्मसन्मानापासून, आपल्या कर्तृत्वापासून आपल्या इच्छा–आकांक्षेला मूठमाती देऊन जगत होता. मानवी हक्क आणि अधिकाराची पायमल्ली झाली होती. तब्बल १२०० वर्षानंतर या पोरक्या, अंधारलेल्या समाजामध्ये संत साहित्याच्या चळवळीने मानवतेची पुन्हा एकदा ज्योत पेटवली.

समाजकंटक आणि जुलमी व्यवस्थेच्या विरोधात मानवी हक्कासाठी आपल्या आचार विचारातून समाजाची क्रांती केली. महात्मा बसवेश्वरांनी अनुभवमंटप, वचनसाहित्य, या माध्यमातून लोकशाही पुनर्जीवीत केली. लोकांनी सत्य हा धर्म मानून कुडलसंगम देवास विवेकाचे प्रमाण मानून मिथ्या व्यवहार करु नये दंभ कधीच करु नये, सत्य बोलावे, सत्य रहावे, तृष्णेचा त्याग करावा, त्यामुळे दुःख होणार नाही. समता बीजधारण करणारा लिंगायत या नीति विचारातून समाजामध्ये पुन्हा एकदा सर्वाप्रती करुणा, दयाभाव, आपुलकी निर्माण केली. तर १२ व्या शतकात जातीभेदाचे अमंगल दूर करण्यासाठी देवाला लाथाडण्याची हिंमत महात्मा बसवेश्वरांनी संपूर्ण समाजाला निर्भयपणे करून दिली.

**काय हो देवा।**
**ब्राम्हणाचे बोलेने एक, करणे दुसरेच**
**आपला मार्ग वेगळा**
**शास्त्रांचा मार्ग वेगळा**
**कुडलसंगमदेवा ।**
**अस्पृश्या पोटी ब्राम्हण जन्म घेऊन,**
**गोमांस खाता हेच प्रमाण आहे ।।**

वरील वचनातून महात्मा बसवेश्वर म्हणतात, ब्राम्हणांनी लबाडी करून देव या कल्पनेस शोषणाचे साधन बनविले. पाप–पुण्य, स्वर्ग–नरक अशा भाकड कथा रचून समाजाला गुलाम केले. खरा देव तर प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात जाणीवेने दडला आहे. समतारुपी ज्ञानाची, लिंगाची ज्योत प्रज्वलित करून महात्मा बसवण्णानी सदाचार, मानवी मूल्यांची निर्मिती केली हे नाकारता येत नाही.

**संत नामदेव –**

वारकरी धर्माचे प्रणेते संत नामदेवांनी भारतभर पदभ्रमण केले, आपल्या अभंगातून मिथ्या धर्माचा निषेध केला, मानवी कल्याणाच्या मुक्तीसाठी वारकरी सांप्रदायाची रचना केली माणसाचे अज्ञान मिटले पाहिजे, त्याच्या शिवाय समाज सुधारणार नाही ही ठोस भूमिका नामदेवांन स्वीकारली. माणूस अज्ञानी राहिल्यामुळे दुःखात लोटला जातो, त्याला व्यवस्था गुलाम करते यामुळे माणसाचे अज्ञान दूर व्हावे यासाठी आपल्या अभंग व कीर्तनातून मानव मुक्तीच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात संत चळवळीमध्ये नामदेव अग्रभागी आहेत. संत नामदेव म्हणतात.

**नाचू कीर्तनाच्या रंगी, ज्ञानदीप लावू जगी**

कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक दंभावर प्रहार करून ज्ञानदीप उजळविण्यासाठी, माणसाच्या अज्ञानावर घाव घालण्यासाठी नामदेवांनी केलेला उपदेश बुद्ध विचारांच्या अगदी जवळचा आहे. बुद्ध मानवी दुःखाचे प्रमुख कारण अज्ञान सांगतात. जो पर्यंत अज्ञान आहे, तो पर्यंत अपरिमित दुःख भोगावेच लागतील. या दुःखातून मुक्त होण्यासाठी अज्ञान संपविले पाहिजे. त्यासाठी बुद्धानी द्वादशनिदान आणि प्रतित्यसमुत्पाद अंगीकारला आणि दुःख मुक्तीचा मार्ग स्पष्ट केला. अगदी त्याच पद्धतीने नामदेवानी सुद्धा बुद्ध विचारांची ज्योत आपल्या अभंगात निर्माण करून संपूर्ण भारतीयांना ज्ञानदिप लावण्याचा संदेश दिला, म्हणूनच संत नामदेवाच्या अभंगातील काही अभंग रचना शीख धर्माचा पवित्र ग्रंथ गुरुग्रंथसाहेब मध्ये समाविष्ट आहेत, म्हणजेच शीख संत साहित्यातील गुरुनानक ते गुरु गोविंदसिंहापर्यंत संत चळवळीचा सामाजिक संदेश तेवत राहिला.

**संत ज्ञानदेव –**

संत ज्ञानदेवांनी आपले तत्त्वज्ञान विशद करताना,

**यज्ञ याग विधी। येणे नव्हे सिध्दी।।**
**वायाची उपाधी । दंभ धर्म।।**

या तत्त्वज्ञानातून कर्मकांड, विधी ही दांभिकता आहे, यज्ञ वगैरे मुळे ईश्वर भेटत नाही. मानवी स्वातंत्र्य नाकारणा–या व्यवस्थेविरुध्द संत ज्ञानदेवांनी मानव मुक्तीचा सामाजिक लढा उभारला होता.

**सूफी संत –**

सूफी संत भारतात आल्यानंतर त्यांचा परिचय, त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या जवळपास असलेल्या भारतीय तत्त्वज्ञानाशी होतो. सूफी ईश्वराचे अस्तित्व सर्व ठिकाणी पाहत होते. 'अल्लाह हा बाहेर नसून तो मनुष्याच्या अंतःकरणात आहे,' या सिद्धांतावर त्यांचा दृढ असा विश्वास होता. माणूस आपल्या साधनेद्वारा ईश्वराजवळ पोहोचू शकतो, असेही त्यांना वाटत होते. या साधनेसाठी कोणत्याही कर्मकांडाची गरज नसते, अशी मांडणीही ते करीत होते. या सूफी संतपरंपरेतील सर्वांत क्रांतिकारी संत अबुल मुगीस अल् हुसैन बिन मन्सूर अल् इल्लाज हे होत. यांचा जन्म ८५८ चा. ६२२ रोजी याला फासावर चढविण्यात आले. याचा अपराध काय, तर याने 'अन्हलक' (मी सत्य स्वरूप आहे– अर्थात अहं ब्रह्मास्मि) असे जाहीर केले. माणसात त्याने देवत्त्वाचा आरोप केला. अथवा माणूस आपल्या साधनेद्वारे ईश्वरत्त्व प्राप्त करू शकतो, यावर त्याचा विश्वास होता. हे सर्व सनातनी इस्लामच्या विरोधात होते. हे सूफी संत ज्यावेळी भारतात आले, त्यावेळी त्यांनी येथील अद्वैतवादाचा अभ्यास केला. आणि त्यामुळेच त्यांना येथे भरपूर अनुयायी

मिळाले. त्याशिवाय कर्मकांडाचा विरोध करीत, माणूस आपल्या वैयक्तिक साधनेतून ईश्वरत्त्व प्राप्त करू शकतो, अशी मांडणी येथे फार पूर्वीपासून होत होती. त्यामुळे सूफी मतासाठी ही सुपीक अशी भूमी होती. त्यांनी मुस्लिम जाचक रुढी, पंरपरेवर, प्रवÞत्तीवर प्रहार केला व जन मानसाचे प्रबोधन केले.

**संताचा सामाजिक विचार –**

मानवी कारूण्याच्या महासागरात धर्म भोळेपणा उदंड पणे माजला होता. मानवी हृदयातील वासना विकारावर विजय मिळविणारे सद्‌गुण जेथे लोप पावले होते. अशा एका हाहाकर माजलेल्या सामाजिक परिस्थितीत मानवी मूल्यांच्या सन्मार्गाची ओजंळ स्वातंत्र्याच्या उद्‌घोषातून निर्माण करण्यासाठी नीति विचारांची तत्त्वमूल्य जगाच्या पाठीवर ऐतिहासिकदृष्ट्या केवळ संत चळवळीने निर्माण केली. जगतकल्याणाच्या आणि आत्मिक उद्धाराच्या माणसांच्या माणूसकी पर्वाला जगातल्या सगळ्या क्रांतीला संत विचाराची चळवळ मार्गदर्शक ठरली आहे. महात्मा गौतम बुद्धाच्या विचारांने संत विचारांच्या चळवळीने प्रभावित झालेला मनुष्य जगातल्या कुठल्याही कानाकोपाऱ्यात असला तरी आजच्या हिंसात्मक जगाला सावरण्यासाठी बुद्ध विचार व संताचा सामाजिक संदेश हा तरूणोपाय आहे. असा ठासून सांगतो म्हणूनच संत चोखामेळा, संत सावता माळी, संत गोराकुंभार, संत रविदास, संत जगनाडे, संत सेना, संत कान्होपात्रा, संत जनाबाई, संत नाभादास, संत कबीर, संत तुकाराम, संत निळोबा, संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी आदी संतानी मानवी हृदयाच्या गाभाऱ्यातील क्लेश दूर करून अहंकाराचा स्पर्श होणार नाही अशी प्रबोधनात्मक चळवळ उभी करून ज्ञानाचा प्रकाश घराघरामध्ये पोहचविला त्यामुळे बहुजन मुक्तीची ही संत चळवळ बहुजन समाजासाठी क्रांती स्तंभ ठरली. पुढे डॉ. आंबेडकरांनी धर्मातराची चळवळ उभी करून बौद्ध धर्म स्वीकारला. आधुनिक युगातील ही सर्वात मोठी क्रांती समजली जाते. आपल्या वैयक्तिक जीवनात डॉ. आंबेडकरांनी महात्मा गौतम बुद्ध, महात्मा कबीर, महात्मा फुले, यांना गुरू मानले होते. त्यामुळेच त्यांनी बुद्धविचाराची जाणीव सर्व समाजाला करून दिली. लाखो लोक बुद्ध विचाराने एकत्र जोडले गेले. बुद्ध विचाराच्या व संत तुकारामाच्या अभंग प्रभावातूनच संत गाडगेबाबा कीर्तनात रंगले. रंजल्या गांजल्यांची सेवा करण्याचा उपदेश त्यांनी दिला.

संत चळवळीच्या समतेची आचरणशीलता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सविंधानाद्वारे २६ जानेवारी 1950 या रोजी खऱ्या अर्थाने भारतीय लोकसत्ताक राज्याची स्थापना करून बहुजनांना गुलामगिरीच्या साखळदंडात बांधणारे सर्व मनुस्मृती ब्राम्हणी कायदे बाद ठरवून दिले त्यामुळे सर्व भारतीयांना खऱ्या अर्थाने मानवी हक्काच्या स्वातंत्र्याचा श्वास घेता आला. डॉ. आंबेडकरांनी संविधानामध्ये जैन, बौद्ध, लिंगायत, शीख, अशा अल्पसंख्यांक धर्मियांच्या कल्याणासाठी कलम 25 ते 30 (6000) जातीच्या उद्धारासाठी कलम 340, एससी साठी कलम 341, एसटी साठी 342 राज्य घटनेत निर्माण करून 95 टक्के बहुजनांना गुलामगिरीतून मुक्त केले. हा विजय बुद्धाच्या वैचारिक संघधर्माचा आणि संत साहित्यातील मानव मुक्तीच्या लढ्याचा आहे. संत चोखामेळा, गोरा कुंभार, रविदास, सेना महाराज, नरहरी सोनार, कान्होपात्रा, जनाबाई, निळोबा, साईबाबा आदि संतांनी समाजमूल्यांची चळवळ उभी करून मानवी हक्कासाठी बंडखोरपणे समाजकंटकी व्यवस्थेला हादरे देऊन समर्थपणे, निर्भयतेने न्यायाची मागणी केली. ही न्यायमागणी बुद्धानी इ.स. 6व्या शतकात मानवी उद्धारासाठी केली होती आणि ब्राम्हणी व्यवस्थेचे आपल्या तर्काने खंडण करून सामाजिक स्नेहभावासाठी ते लढले होते.

**सारांश –**

आज स्पर्धा आणि चढाओढ जगाचा आत्मा बनला आहे. तृष्णेने भरलेल्या आजच्या अधुनिक युगामध्ये संताच्या विश्वबंधुत्वाचा माणसाला विसर पडला आहे. आजच्या युवा पिढीसमोर चित्रपट, संगीत, क्रीकेट, राजकारण, हे संस्कार केंद्रे झाली आहेत. संत साहित्याचा उपदेश आज ढोंगा – साठी आणि स्वार्थासाठी वापरला जातो. म्हणून आजही आपण दहशतीच्या छायेत आहोत. मानवी हक्कासाठी झगडत आहोत. मूलभूत गरजा पूर्ण होतील का या बद्दल साशंकता आहे.

जातीवरचे राजकारण पुन्हा जाती भेदांना जन्म देत आहेत. संत रविदासाच्या म्हणण्यानुसार **मन चंगा तो कटोतीमें गंगा** अशी मानवी मूल्याची बिकट अवस्था झाली आहे. समाजातली सर्व लोक स्वतःच्या स्वार्थासाठी झगडत आहेत. अशा समाजाचे कारण विनाशाशिवाय दुसरे कांहीच असू शकत नाही. ज्या समाजाने गौतम बुद्धाला जन्म दिला, महात्मा बसवेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, महात्मा कबीर, संत गाडगेबाबा, म. फुले, छत्रपती शाहू महाराज, आंबेडकरांना जन्म दिला तोच समाज आज सामाजिक दंगली निर्माण करणाऱ्या गुन्हेगाराला जन्म देतोय.

विपरित अवस्था अस्वस्थ करणारी आहे ही अवस्था संपवण्यासाठी अशी वैचारिक आत्मशक्ती संत विचारातच आहे. याची जाणीव समाजाला नव्याने झाल्याशिवाय, आणि संताच्या वैश्वीक करुणतेची आर्तहाक मानवी कल्याणाच्या तळमळीसाठी व लोक उद्धारासाठी प्रत्येकाच्या मनात संस्काररूपी मूल्याने प्रज्वलित होणे गरजेचे आहे. त्याच वेळी मानवता धर्मासाठी समर्पित असलेल्या जगातल्या सर्व संत महापुरुषांचा सद्‌सदविवेक आपणाला कळणे गरजेचे आहे. तो जाणिवेने वÞध्दींगत होवून समाजहितासाठी कÞतीत आला पाहिजे. संत महात्मा कबीरांनी खालील दोह्यात जो सामाजिक संदेश दिला आहे, हेच आमच्यासाठी संत चळवळीचे फलित आहे.

**मोको कहां ढूँढ़े रे बन्दे**
**मैं तो तेरे पास में**
**ना तीरथ में ना मूरत में**
**ना एकान्त निवास में**
**ना मंदिर में ना मस्जिद में**
**ना काबे कैलास में**
**मैं तो तेरे पास में बन्दे**
**मैं तो तेरे पास में**
**ना मैं जप में ना मैं तप में**
**ना मैं बरत उपास में**
**ना मैं किरिया करम में रहता**
**नहीं जोग सन्यास में**
**नहीं प्राण में नहीं पिंड में**
**ना ब्रह्याण्ड आकाश में**
**ना मैं प्रकृति प्रवार गुफा में**
**नहीं स्वांसों की स्वांस में**
**खोजि होए तुरत मिल जाऊं**
**इक पल की तलाश में**
**कहत कबीर सुनो भई साधो**
**मैं तो हूं विश्वास में।।**

**संदर्भ सूची :**


1. भगवान गौतम बुध्द व त्यांचा धम्म –डॉ. बाबासाहेब आंबेडकर
2. तुकाराम दर्शन – डॉ. सदानंद मोरे
3. संत साहित्य व समाजप्रबोधन– प्राचार्य रा.तु. भगत
4. संत साहित्यांची फलश्रुती – ग.भा. सरदार
5. प्राचीन मराठी कविता – डॉ. साहेबराव खंदारे
6. बसवेश्वरी वचनसाहित्य– प्रा. करजकर, प्रा. सोलापूरे.
7. मानवमुक्तीची संत चळवळ – प्रा. डॉ. गणेश बेळंबे


**प्रा. डॉ. गणेश बालाजीराव बेळंबे**

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत तुकाराम महाराजांचे नैतिक योगदान

**श्री.पंकज रामचंद्र गावडे**
संशोधक विद्यार्थी, तत्त्वज्ञान विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
**Corresponding Author: श्री.पंकज रामचंद्र गावडे**
**DOI-10.5281/zenodo.14546869**

**प्रस्तावना**

**" तुका तुकीने तुकला । विश्वभरुनी उरला लोका ।। "**

संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे एक महान संत, कवी आणि समाजसुधारक होते. साधारण १६०८ ते १६५० या काळात त्यांनी आपले जीवन व्यतीत केले. त्यांनी त्यांच्या काळातील धार्मिक अंधश्रद्धा, जातीय विषमता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध कठोर भूमिका घेतली. त्यांच्या अभंगांमध्ये नैतिकता, मानवता आणि समाज कल्याणाचे गहन विचार आढळतात. तुकाराम महाराजांचा उपदेश त्यांच्या अभंगांद्वारे प्रस्तुत होत असून, ते आजही लोकांना प्रेरणा देतात. तुकाराम महाराजांनी आत्मज्ञान, भक्ती आणि नैतिकतेच्या आधारे समाज सुधारणेचा प्रयत्न केला. त्यांच्या रचनांमधून सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी आवश्यक असलेल्या नीतिमूल्यांचा पाठपुरावा दिसून येतो.

**तुकाराम महाराजांचे जीवनदर्शन**

**" तुकाराम तुकाराम । नाम घेता कांपे यम ।।**
**धन्य तुकोबा समर्थ । तेणे केला हा पुरुषार्थ ।। "**

संत तुकाराम यांचा जन्म पुण्याजवळील देहू गावात एका शेतकरी कुटुंबात झाला. अत्यंत साधेपणाने जीवन जगत असताना त्यांनी समाजातील दु:ख, गरीबी आणि विषमता पाहिली. त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील अनुभवांनी त्यांना आत्मज्ञानाकडे आणि नैतिकतेकडे वळवले. त्यांच्या कुटुंबावर आलेल्या संकटांनी त्यांना भौतिक जगापासून दूर नेले आणि अध्यात्मिक शोध घ्यायला प्रवृत्त केले. तुकाराम महाराजांनी भगवद्गीता आणि ज्ञानेश्वरीचा मार्ग अनुसरत भक्ती आणि नैतिकता यांचा सुंदर समन्वय साधला. ते मानवी जीवनातील सन्मान, दया आणि कर्तव्याच्या महत्त्वावर ठाम राहिले.

**तुकाराम महाराजांचे नैतिक विचार**

**सत्य आणि प्रामाणिकता**

तुकाराम महाराजांनी सत्याचा आग्रह धरला. त्यांच्या मते, सत्य हा कोणत्याही नैतिक मूल्याचा पाया आहे. त्यांनी जीवनातील प्रत्येक कृत्य सत्याच्या आधारावर असावे, असे सांगितले. ते म्हणतात:

**" सत्य आम्हां मनीं । नव्हों गाबाळाचे धनी ।।**
**ऐसें जाणा रे सकळ । भरा शुद्ध टांका मळ ।।**
**देतों तीक्ष्ण उत्तरें । पुढें व्हावयासी बरें ।।**
**तुका म्हणे बरें घडे । देशोदेशीं चाले कोडें ।। "**

**" सत्य असत्याशी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमता ।। "**

**" सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ।। "**

त्यांच्या रचनांमधून प्रामाणिकता आणि पारदर्शकतेचे महत्त्व अधोरेखित होते.

**अहिंसा आणि करुणा**

तुकाराम महाराजांनी प्रत्येक जीवावर दया करावी, ही शिकवण दिली. त्यांनी मानव आणि प्राणीमात्रांविषयी करुणेचा उपदेश केला. त्यांच्या मते, अहिंसा ही नुसती हिंसेचे टाळणे नसून ती दुसऱ्याच्या सुख–दु:खाशी एकरूप होण्याची प्रक्रिया आहे. ते म्हणतात:

**" दया तिचे नाव भूतांचे पालन । अनिक निर्दळण कंटकांचे ।। "**

**" दया क्षमा शांती । तेथे देवाची वसति ।। "**

**सामाजिक समानता आणि बंधुता**

जातीय विषमता आणि वर्णव्यवस्थेच्या प्रथांचा विरोध करताना तुकाराम महाराजांनी मानवतेच्या आधारावर समानतेचा पुरस्कार केला. त्यांच्या रचनांमध्ये "सर्वभूते समभाव" ही संकल्पना ठळकपणे दिसते. ते म्हणतात:

**" अवघी एकाचीच विण । तिथे कैसे भिन्नाभिन्न ।। "**

**" खेळ मांडीला वाळवंटी घाई । नाचती वैष्णव भाई रे ।**
**क्रोध अभिमान केला पावटणी । एका एका लागतील पायी रे।। "**

समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी त्यांनी सामाजिक बंधुतेचा उपदेश केला.

**कर्तव्यपालन आणि कर्मयोग**

तुकाराम महाराजांनी गीतेतील कर्मयोग तत्वज्ञानाचा स्वीकार करून कर्तव्यपालनावर भर दिला. त्यांनी सांगितले की भक्ती करताना सांसारिक जबाबदाऱ्या विसरू नयेत. ते म्हणतात:

**" उंच नीच काही नेणो भगवंत । तिष्ठे भाव भक्ती देखोनिया ।। "**

**" कामामध्ये काम । काही म्हणा राम राम ।।**
**जाईल भवश्रम । सुख होईल दु:खाचे ।। "**

**'' पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरीचे दास जन्म घेती ।।**
**कर्म धर्म त्यांचा झाला नारायण । त्यांचेनी पावन तिन्ही लोक ।। ''**

कर्तव्यपालन करताना नैतिकतेचे भान राखणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**परोपकाराचे महत्त्व**

तुकाराम महाराजांनी परोपकाराला जीवनाचे सर्वोच्च ध्येय मानले. दुसऱ्यांना मदत करणे, त्यांचे दुःख दूर करणे आणि सामूहिक सुखासाठी काम करणे, हीच खरी नैतिकता आहे— असे त्यांनी सांगितले. त्यांच्या अभंगांमध्ये हा विचार प्रकट होतो:

**'' जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपले ।**
**तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणवा ।।**
**मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनांचे चित्त ।**
**ज्यासि अपंगिता पाही । त्यासि धरी जो ह्रदयी ।।**
**दया करणें जें पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ।।**
**तुका म्हणे सांगू किती । त्या चि भगवंताच्या मूर्ति ।। ''**

**धर्माचा खरा अर्थ**

तुकाराम महाराजांनी धर्माला कर्मकांडांपासून वेगळे करत त्याचा आधार नैतिकता, भक्ती आणि मानवतेमध्ये शोधला. ते म्हणतात:

**'' वेदांचा तो अर्थ आम्हांशीच ठावा । इतरांनी वाहावा भार माथा ।।''**

**'' धर्माचे पालन । करणे पाखंड खंडण ।**
**हेचि आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम ।। ''**

**'' विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ।।**
**अइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ।।**
**कोणा ही जिवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ।।**
**तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ।। ''**

**'' धर्म आणि नीतीचा हा ऐकावा व्यवहार ।**
**निवडले सार असार ते।।''**

धर्म हा केवळ बाह्य आचरण नसून अंतर्मनातून आलेली शुद्ध भावना असावी, असा त्यांचा उपदेश होता.

**तुकाराम महाराजांच्या नैतिकतेचा समाजावर प्रभाव**

**वारकरी संप्रदायातील योगदान**

**'' तुका झालासे कळस ।। भजन करा सावकाश ।। ''**

वारकरी संप्रदायातील संतांनी भक्तीच्या मार्गाने समाजाच्या नैतिकतेला उजाळा दिला. तुकाराम महाराजांनी या परंपरेत महत्त्वाची भर घातली. त्यांनी नैतिकतेला भक्तीच्या आधारे समाजात रुजवले.

**सामाजिक सुधारणांमध्ये योगदान**

**'' मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास ।। कठिण वज्रास भेदूं ऐसे ।।**
**मेले जित असों निजोनियां जागे ।। जो जो जें जें मागे तें तें देऊं ।।**
**भले तरि देऊं गांडीची लंगोटी ।। नाठाळाचे काठीं देऊं माथां ।।**
**मायबापाहूनि बहू मायावंत ।। करूं घातपात शत्रूहूनि ।।**
**अमृत तें काय गोड आम्हांपुढें ।। विष तें बापुडें कडू किती ।।**
**तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड ।। ज्याचें पुरे कोड त्याचेपरि ।। ''**

तुकाराम महाराजांच्या विचारांनी तत्कालीन समाजात जातीय भेदभाव आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजात समता आणि न्यायाची चळवळ चालू राहिली.

**स्त्री सक्षमीकरण**

त्यांच्या अभंगांमधून स्त्रियांच्या सन्मानासाठी त्यांनी आवाज उठवला. स्त्रियांना समाजात समान अधिकार मिळायला हवेत, असे ते म्हणत.

**'' पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ।। ''**

**'' पराविया नारी रखुमाईसमान । हें गेलें नेमून ठायींचेंचि ।। ''**
**'' नर नारी बाळे अवघा नारायण । ऐसे माझे मन करी देवा ।। ''**

**आधुनिक काळातील महत्त्व**

आजच्या काळात वाढत चाललेल्या नैतिक आणि सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी तुकाराम महाराजांच्या विचारांची आवश्यकता आहे. जातीय भेदभाव, पर्यावरणीय समस्या आणि मूल्यशून्यता दूर करण्यासाठी त्यांच्या शिकवणीचा आधार घेता येईल.

**तुकाराम महाराजांचे नैतिक विचार: आजचा संदर्भ**

**सामाजिक न्यायासाठी प्रेरणा**

**'' उजळावया आलों वाटा ।। खरा खोटा निवाडा ।। ''**

आजच्या सामाजिक न्याय चळवळींना तुकाराम महाराजांचे विचार मार्गदर्शन करू शकतात. त्यांच्या अभंगांमधील समानतेचा संदेश आधुनिक काळात अधिक सुसंगत ठरतो.

**पर्यावरण संवर्धन**

**'' वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षी ही सुस्वरे आळविती ।। ''**

तुकाराम महाराजांनी निसर्गावर करुणा ठेवण्याचा संदेश दिला होता. त्यांचे विचार पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी दिशादर्शक ठरतात.

**व्यक्तिगत नैतिकता आणि जीवनशैली**

**'' परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।**
**व्हावया जतन । अन उपाय लाभाचे ।। ''**

आधुनिक जीवनात नैतिकतेचा अभाव जाणवतो. तुकाराम महाराजांनी दिलेल्या नैतिक विचारांमुळे व्यक्तीच्या जीवनशैलीत प्रामाणिकता, परोपकार आणि कर्तव्याची जाणीव येऊ शकते.

**राष्ट्रहित व पाईकपणा**

संत तुकाराम महाराजांनी शिवकालीन स्वराज्यावर व महाराष्ट्रावर आलेल्या मोगली सत्ते विरूध्द आवाज उठवला. देव, देश, धर्म व संस्कृती रक्षणासाठी समाजातील तरुणांना एकत्र करत त्यांना तत्कालीन समस्येची जाणीव करून दिली. त्यांच्या पाईकांच्या उपदेश पर अभंगात राष्ट्र रक्षणात पाईकांनी कोणती काळजी घ्यावी. याची सविस्तर शिकवण अभ्यासायला मिळते. ती शिकवण आजही अतिशय महत्त्वाची आहे.

**'' पाईक तो प्रजा रखोनिया कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ।। ''**

**निष्कर्ष**

संत तुकाराम महाराजांचे नैतिक योगदान हे त्यांच्याच काळापुरते मर्यादित राहिलेले नाही. त्यांच्या अभंगांमधील विचार आजच्या समाजाला मार्गदर्शन करत आहेत. सत्य, अहिंसा, समानता आणि परोपकार यासारखी तत्त्वे त्यांनी लोकांच्या मनात रुजवली.

त्यांचे विचार कालातीत असून, आधुनिक समाजातील अनेक समस्यांचे उत्तर त्यांच्यातून मिळते. तुकाराम महाराजांचे नैतिक योगदान हे भारतीय संस्कृतीसाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या शिकवणीचा पुनर्विचार आणि आचरण करणे आजच्या काळातील प्रत्येक व्यक्ती आणि समाजासाठी महत्त्वाचे आहे.

**संदर्भ सूची**


1. सार्थ श्री तुकाराम महाराज गाथा – वै.जोग महाराज सांप्रदायिक, देवडीकर पारायण प्रत, धार्मिक प्रकाशन संस्था, पुणे.
2. संत तुकाराम चरित्र – पांगरकर ल. रा., वरदा प्रकाशन, पुणे.
3. तुकारामांचे चरित्र ( पूर्वार्ध ) – रानडे रा. ड. गव्हरमेंट सेन्ट्रल प्रेस, मुंबई.
4. तुकाराम – नेमाडे भालचंद्र, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
5. पाच संतकवी – डॉ. तुळपुळे शं. गो., व्हीनस प्रकाशन, पुणे.
6. विद्रोही तुकाराम – साळुखे आ. ह., सदाशिव बगाईतदार स्मुतीमाला, पुणे.
7. साक्षात्कारी संत तुकाराम – पेंडसे श. दा., कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.
8. साक्षात्कार पथावर तुकाराम – रानडे रा. द.
9. रोखठोक तुकाराम – डॉ. पाटील यशवंतराव
10. समाज जीवनातील तुकाराम – तानाजीराव पाटील, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
11. तुकाराम दर्शन – डॉ. मोरे सदानंद
12. तुकाराम दर्शन – सरदार गं. बा. , मोर्डर्ण बुक डेपो, पुणे.
13. तुकोबारायांचे अद्वैत तत्त्वज्ञान – साखरे किसनमहाराज, साखरे प्रकाशन, आळंदी.
14. तुका झालासे कळस – डॉ. कुलकर्णी व. दा.
15. तुका झालासे कळस – डॉ. देखणे रामचंद्र
16. अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची – सरदार गं. बा.
17. तुकाराम – अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे – म. सु. पाटील
18. संत तुकारामांचा लोकसंवाद – डॉ. रामचंद्र लहवितकर, ब्रेन्टोनिक प्रकाशन, नाशिक.
19. तुकाराम व्यक्तित्त्व व कवित्त्व – सानप किशोर, तायडे मनोज.
20. संत तुकाराम महाराजांची जीवनसूत्रे – डॉ. अढाव यादव
21. संत तुकारामांचा जीवन विचार – फडकुले निर्मल कुमार, सुविधा प्रकाशन, सोलापूर.
22. महाराष्ट्र संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य – सुठनकर बा. र., लोकवाङमय गृह प्रकाशन, मुंबई.
23. मराठी संत वाङमयातील परमार्थ मार्ग भाग ०२ – रानडे रा. द., भारतीय विद्याभवन, मुंबई.
24. संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती – सरदार गं. बा., लोकवाङमय गृह प्रकाशन, मुंबई.
25. संत, लोक आणि अभिजन – ढेरे रा. चि., पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
26. द सेंट पोयेट्स ऑफ महाराष्ट्र : देअर इम्पेक्ट ऑन सोसायटी ( इंग्रजी ) – सरदार गं. बा.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# सामाजिक नैतिकता में संतों का योगदान

**प्रो. डॉ. हनुमंत जगताप**
अध्यक्ष, हिंदी विभाग एवं अनुसंधान केंद्र,
न्यू आर्टस्, कॉमर्स एंड साइंस कॉलेज, अहमदनगर
**Corresponding Author: प्रो. डॉ. हनुमंत जगताप**
**DOI- 10.5281/zenodo.14546930**

**सारांश:**

एक स्वतंत्र देश जिस प्रकार अपनी भौगोलिक सीमाओं के कारण अपनी पहचान रखता है, उसी प्रकार अपने विशिष्ट जीवन मूल्यों के कारण भी पहचाना जाता है। उस देश की भाषा, संस्कृति, जीवन के आदर्श भी एक तरह से देश की प्रगति में निश्चित ही अपना योगदान देते हैं। भारत वर्ष भी एक सबसे पुरातन संस्कृति को अपने आप में संजोकर चिरकाल से अपनी एक अलग पहचान बनाते हुए, आज भी विश्व पटल पर अपना परचम लहराते हुए दिखाई देता है। वास्तव में देखा जाए तो अनेक विदेशी आक्रमणकारियों ने यहाँ पर केवल लूटपाट ही नहीं की बल्कि अपना शासन भी चलाया, जिनमें मुख्य रूप से अंग्रेज, मुगल, हुण, मंगोल, तुर्क, पोर्तुगीज, फ्रांसीसी आदि प्रमुख है। जब कोई शासन व्यवस्था किसी देश पर राज करती है तो वह उस देश की भाषा, संस्कृती, आस्था और मान्यता पर भी प्रभाव डालती है। इस बात का थोड़ा बहुत प्रभाव भारत वर्ष पर भी पड़ा, ऐसा हम कह सकते हैं। तीन सौ - चार सौ वर्षों की गुलामी के बाद भी यदि विदेशी शासन व्यवस्था हमारी संस्कृति पर अल्पसा प्रभाव ही डाल सकी तो इसके पीछे मुख्य कारण हमारे देश के धार्मिक संतों को जाता है। भारत वर्ष की संत परंपरा बहुत प्राचीन मानी जाती है। जिनमें सिध्द्, जैन, बौध्द, नाथ और सगुण मार्गी एवं निर्गुण मार्गी संतों का बहुमूल्य योगदान है। वास्तव में देखा जाए तो इन संतों ने आध्यात्मिक चेतना के साथ-साथ सामाजिक चेतना का प्रचार और प्रसार भी किया। समाज के सभी वर्गों के लोगों के बीच भाईचारा और सौहार्द स्थापित करने में भी इन्होंने योगदान दिया। समाज के सभी वर्गों के लोगों के बीच समानता, मानवता, और भाईचारे के विकास में इनके सिद्धांतों ने महत्वपूर्ण भूमिका निभाई। वैसे भी देखा जाए तो भारतीय समाज संरचना में संतों को अनन्य सम्मान और महत्व दिया गया है। अत: संतों की भक्ति के कारण सांसारिक उत्थान का समन्वय देखने को मिलता है। संतों के उच्च आदर्शों, उच्च विचारों एवं आत्मिक पवित्रता का प्रभाव संपूर्ण समाज पर पड़ा हुआ दिखायी देता है। इसी संबंध में तुलसीदास जी कहते है।

**"संत हृदय नवनीत समाना, कहा कविन्ह पै कहै न जाना।**
**निज परिताप द्रवै नवनीता, पर दुःख ही सुसंत पुनीता।।"**

इस प्रकार स्पष्ट है भारतीय समाज में संतों को इस जगत का उद्धारकर्ता माना जाता है। वैसे भी यह अनायास देखा जा सकता है कि संतों की वाणी समाज के सर्वांगीण विकास के लिए एक प्रकार से संजीवनी का कार्य करती है। अनंतकाल से संतों की भक्ति का प्रभाव समाज के अलग- अलग पहलुओं पर पड़ा और संतों ने ही समाज में फैली कुरीतियाँ, अनैतिकता, धर्मांधता, रुढ़ी परंपरा, जातिगत भेदभाव, सांप्रदायिक कट्टरता इत्यादि अनेक प्रकार के विघटनकारी प्रभावों के प्रति खुले रूप से विद्रोह किया तथा श्रेष्ठ और आदर्श जीवन मूल्यों के महत्व पर प्रकाश डालते हुए मनुष्य को इन्हें अपनाने के लिये प्रेरित किया। इन संतों ने व्यक्ति एवं जाति को महत्व नहीं दिया बल्कि मनुष्य की नैतिक शुद्धता को अत्यधिक महत्व दिया। परिणाम स्वरूप समाज में नैतिकता का विकास होता गया। आज हम जिस सभ्य समाज की बात करते है, उसकी शुरुआत संतों की भक्ति परंपरा से ही हुई ऐसा हम बेहिचक कह सकते है। संत नामदेव, कबीर, रविदास, गुरुनानक आदि ने अपनी भक्तिमयी वाणी के आलोक में संपूर्ण समाज के लिए आदर्शों को अपनाने का संदेश दिया हैं। यही कारण है कि आधुनिक भारत वर्ष में जाति-पाती, ऊंच-नीच, और छुआ-छूत जैसे भेदभाव तक़रीबन मिट चुके है। इसमें संतों की वाणी का बड़ा योगदान है। संतों ने ही समाज में फैली मूढ धारणा को समाप्त करने के लिए अपनी काव्य रचना में एक जगह कहा है-

**"मैं कहता हैं आँखिन देखी, तू कहता कागद की लेखी ।**
**मैं कहता सुरझावन हारी तू राख्यो उरझाई रे।।"**

उपर्युक्त पंक्तियों में कबीर ने समाज में फैली सभी भ्रांतियों को मिटाने का संदेश दिया है। वास्तव में संतों की वाणी की भाव धारा में सामाजिक उत्थान की लहरें बराबर उठती रही हैं। संत वाणी से निर्मित साहित्य अनंतकाल तक रहने वाला कालजयी साहित्य है। इससे प्राप्त ज्ञान चिरंतन काल तक मानव समाज को विकास एवं सौहार्द का रास्ता दिखाने वाला है। साबरमती के संत महात्मा गांधी जी ने भी सत्य एवं अहिंसा पर आधारित जो उपदेश दिए हैं, वे भी एक प्रकार से संत परंपराओं को ही आगे बढ़ाते हैं। स्पष्ट है संतों की भक्ति का समाज पर वास्तविक प्रभाव पड़ा जिसे नकारा नहीं जा सकता। संतों ने सामाजिक एकता और नैतिकता को बहुत बढ़ाया जिससे निम्न जाती के लोगों की हीन भावना समाप्त हो गई। इसके साथ-साथ भारतीय नारी

को भी समाज में समानता का अधिकार प्राप्त हुआ। इस प्रकार बेझिझक यह कह सकते है कि भारतीय संत परंपरा के आलोक में मंगलमयी समाज की स्थापना होती रहेगी और सभी लोग समानता की मिसाल कायम करते हुए समाज और देश को प्रगति पथ पर ले जायेंगे।

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. दक्षिण भारत की संत परंपरा - डॉ राधाकृष्ण मूर्ति

2. कबीर वाणी संग्रह - हजारी प्रसाद द्विवेदी

3. तुलसी ग्रंथावली - माताप्रसाद गुप्त

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संतांचे सामाजिक योगदान

**श्री. गणेश सुभाष ढगे[1], डॉ. प्रज्ञा लामतुरे[2]**
[1]पीएच.डी.संशोधक विद्यार्थी, अण्णासाहेब मगर महाविद्यालय,
हडपसर पुणे, महाराष्ट्र, भारत.
[2]संशोधन मार्गदर्शक व मराठी विभाग प्रमुख,
कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे
**Corresponding Author: श्री. गणेश सुभाष ढगे**
**Email -** dhagesir999@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14546988**

**सारांश:**

आजपासून आठशे ते नऊशे वर्षे आपण पाठिमागे गेलो असता, ज्ञानेश्वर पूर्वकाळामध्ये मुकुंदराज व चक्रधर या महानुभव संप्रदायातील संतांचे सामाजिक कार्य महत्त्वाचे आहे. भारतीय पातळीवर नाथ संप्रदायाचे कार्य मुकुंदराज पूर्वकाळामध्ये चालू होते. तसेच गोरक्षनाथाची परंपरा, ज्ञानेश्वर व त्यांनी स्थापन केलेला वारकरी संप्रदाय यामधील अनेक संतांच्या माध्यमातून आज पर्यंत अव्यहातपणे चालू आहे. संत हे भारतीय समाजाच्या इतिहासातील अत्यंत प्रभावशाली आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी केवळ अध्यात्मिक जागृती केली नाही, तर समाज सुधारणा, समता, आणि सहिष्णुतेच्या मूल्यांचा प्रसार केला. भारतीय समाजातील संतांनी सामाजिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक सुधारणांत मोठा वाटा उचलला आहे. त्यांनी आपल्या अभंग, ओव्या, आणि भजनांद्वारे समाज प्रबोधन केले. संतांचे कार्य जातीयता, धार्मिक भेदभाव, आणि सामाजिक अन्याय नष्ट करण्यासाठी समर्पित होते. त्यांच्या निवडक अभंग आणि कार्याच्या माध्यमातून सामाजिक योगदान दिले. त्यांचे कार्य आणि विचार समाजाला नवी दिशा देणारे ठरले. हा शोधनिबंध संतांच्या सामाजिक योगदानाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करतो.

भारताला बौध्द धर्म, हिंदू धर्म, इस्लाम धर्म, जैन संप्रदाय, ख्रिस्ती धर्म, शीख धर्म, पारशी धर्म इ. धर्म व त्यांच्या तत्वज्ञानाची परंपरा लाभली आहे. शंकराचार्यच्या शिष्यांनी बौध्द धर्माचा पाडाव केला व हिंदू धर्माची स्थापना केली. त्यामुळे बौध्द धर्माच्या तत्वज्ञानाला ओहोटी लागली. असे असले तरी भारतावर नंतरच्या काळात परकीय आक्रमणे झाली. बाबराने दिल्ली जिंकली व पुढे मुस्लिम राजवट आली. दिल्लीच्या तख्तावरून हिंदूस्थानचा कारभार इस्लाम राजवटीने औरंगजेबापर्यंत चालविला पुढे भारताच्या विविध, प्रांतामध्ये इस्लाम धर्मीय राजवटी स्थापन झालेल्या आढळतात, व भारतभर इस्लामचे राज्य आल्याचे दिसते. ज्या शंकराचार्यांनी वैदिक धर्माचे पुनः रूज्जीवन केले होते असा हिंदू धर्म रामदेवराव यादवांच्या पाडावानंतर रसातळाला गेला म्हणून या धर्माला पुन्हा सावरण्याचे काम ज्ञानेश्वरांच्यापासून झाले असे म्हणता येईल.

**प्रस्तावना :**

संतांनी महाराष्ट्रातील समाज घडविला, प्रबोधन केले असे म्हणणे योग्य ठरेल. आपण ज्ञानेश्वर कालीन इ.स.१२७५ ते इ.स.१२९६ समाजव्यवस्था पाहिली असता "सारी माणसे जादूटोणे, भूत भविष्य जारण - मारणयंत्र यात रस घेत होती समाजात ज्योतिष्याविषयी प्रवीण मोहन विद्याप्रवीण अशी माणसे खूप होती. शिल्पकला, पाककला, वैद्यकशास्त्र, संगीताभ्यास करणारी मंडळीही समाजात होती. पण त्यांच्याजवळ स्वतंत्र दृष्टी नव्हती बौध्द, जैन, महानुभाव संप्रदायस्वरूपात आत्मज्ञान सांगत होते. खरे म्हणजे त्यांनी वैदिक धर्माविरूध्द बंडच पुकारले होते. या मतामतांच्या भोव-यात सर्वसामान्य माणूस भांबावत होता. अशा या समाजाला मार्ग दाखवून त्याचा उध्दार करण्यासाची जबाबदारी ज्या शास्त्री पंडितांवर होती ते मात्र माणूसकीला पारखे झाले होते. व आपल्या उदरनिर्वाहात मन होते."

अशा या शास्त्री पंडिताबद्दल संत ज्ञानेश्वरांनी दहाव्या अध्यायामध्ये लिहिले आहेच अडाणी निरक्षर धर्मभोळा व दिशाहिन झालेल्या समाजाला ज्ञानेश्वरांनी योग्य दिशा दिली. याविषयी नसिराबादकर म्हणतात, "काम, क्रोध, मोह, लोभ, यांच्या आधीन झालेली सामान्य माणसे सत्व, शांती विवेक, वैराग्य व आत्मिक समाधान या गुणांना पारखी होत आहेत हे ज्ञानदेवांनी पाहिले. अशा स्थितीत या अज्ञानी मोहवश लोकांनी मार्गदर्शन करावयाचे असेल वैदिक धर्माची ओहोटी थांबवायची असेल तर या मोळयाभाबडयांच्या धर्मभावनेला अध्यात्मविचारांची ठाम बैठक मिळवून देण्याशिवाय गत्यंतर नाही. अशी ज्ञानेश्वरांची खात्री पटली दलितोध्दाराच्या प्रेरणेने त्यांनी धर्मजागृतीचे कार्य हाती घेतले व आपला विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी 'आबालसुबोध' अशा मराठी भाषेत ज्ञानेश्वरीची रचना केली. ज्ञानदेवांचे हे सामाजिक कार्य साहित्यिक व सांस्कृतिकदृष्ट्या फार

मोलाचे आहे. म्हणून तेराव्या शतकातील महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवनाचे व साऱ्या मराठी साहित्याचे ते आद्य प्रवर्तक ठरतात.

संतांच्या कार्याचा प्रारंभ लेखक ल.रा. नसिराबादकर यांनी सांगितल्याप्रमाणे ज्ञानेश्वरांपासून होताना दिसतो. ज्ञानेश्वर पूर्व काळामध्ये महाराष्ट्रामध्ये चक्रधर स्वामींचे वैयक्तिक तत्त्वज्ञान जन माणसांमध्ये रुजले होते. कृष्ण भक्ती सगळीकडे चालू होती. अनेक भट - पंडित तसेच स्पृश्य - अस्पृश्य व स्त्रियांनी महानुभाव पंथाचा स्वीकार केला होता. पण पुढे या महानुभाव पंथाला चक्रधरोक्त उत्तरकाळामध्ये उतरती कळा लागली. त्यानंतर समाजाला योग्य दिशेला नेण्याचे काम ज्ञानदेवांनी केले असे म्हणावे लागेल. संत ज्ञानेश्वरांनी संस्कृतमधील भगवद्गीतेच्या ७०० टोकावर आधारित 'भावार्थदीपिका' हे काव्य शके १२१२ (इ.स. १२९०) ला प्राकृत मध्ये लिहून एक प्रकारे बंडच केले. अमृतानुभव, चांगदेव पासष्टी यांसारखे रसाळ ग्रंथ लिहिले. विराण्या, गौळणी व अभंगामधून अद्वैती तत्वज्ञान सांगितले. 'अवघाचि संसार सुखाचा करीन | आनंदे भरीन तिन्ही लोके |' असे त्यांनी अंभगवाणीतून लिहिले व विठ्ठलाला दैवत मानले. सगुण व निर्गुण भक्ती हा भक्तीभाव आपल्या सांप्रदायिकांमध्ये रूजविला. हरिपाठाच्या अभंगामधून हरिभक्ताला वैराग्य, ज्ञान व गीताबोधाचे ज्ञान देऊन समाजाचे वैचारिक प्रबोधन केले.

संत ज्ञानेश्वरांच्या कार्यानंतर महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर जाऊन ज्यांनी समाज घडविण्याचे काम केले ते म्हणजे संत नामदेव होय. संत नामदेव व संत ज्ञानेश्वर हे दोघे समकालीन संत होते. संत नामदेव तसे परभणी जिल्हयातील नासी बामणीचे होते. त्यांचा जन्म (शके ११९८) या साली दामा शेटी व गोणाईच्या पोटी झाला. नामदेवांचे संसारामध्ये मन रमले नाही. त्यांचे मन विठ्ठल भक्तीमध्ये रममान होत. नामदेवांनी आपल्या भोवतीचा समाज, लौकिक जीवन पाहिले असावे त्यामुळे समाजातील या अज्ञानी लोकांना अज्ञानाच्या खोल गर्तेतून बाहेर काढण्यासाठी विठ्ठल भक्तीला वाहून घेतले असावे. विठ्ठल हे दैवत भक्तीचे व लोकप्रबोधनाचे माध्यम मानलेले दिसते. पुढे संत ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या वारकरी संप्रदायाची धुरा त्यांनी पुढे समर्थपणे पेलली. अशा या नामदेवांना विसोबा खेचर गुरू लाभले व आपल्या विठ्ठल भक्तीतून वैष्णवजनांना अभंगांच्या माध्यमातून बोध करतात. नामदेवांचे आज २५०० अभंग उपलब्ध आहेत. याशिवाय संत नामदेवाचे बाळक्रीडेचे अभंग, आरत्या व भूपाळी अशी नामदेवाची रचना आढळते. नामदेवांना ८० वर्षांचे आयुष्य लाभले. अशा या नामदेवांनी वारकरी संप्रदाय वाढविण्याचे मोठे काम केले. पंजाबमध्ये सामाजिक कार्य करत नामदेव ३० वर्षे राहिले व शेवटी पंढरपूरला येऊन विठ्ठलाच्या चरणी समाधीस्थ (शके १२७२) झाले.

संत ज्ञानेश्वर-नामदेव कालीन संतामध्ये चोखामेळा एक थोर संत. मंगळवेढ्याचे राहणारे. त्यांचा जन्मकाळ मिळत नाही. चोखामेळा हे अस्पृश्य जातीतील असल्यामुळे त्यांना समाजामध्ये चांगला मान नव्हता. हे त्यांच्या व मुलांच्या कर्ममेळा व पत्नी सोयराबाई मुलगी निर्मळा मेहुणा बंका यांच्या अभंगामधून दिसून येते. ७०० वर्षापूर्वी चोखामेळयाच्या अंतःकरणामध्ये विठ्ठलाविषयी अपार भक्ती होती आपल्या देवाला डोळे भरून पाहावे यासाठी चोखामेळा मंदिर प्रवेश करतात. यावेळी बडवे त्यांच्यावर चोरीचा आळ घेतात व त्यांना मारतात यावेळी ते आपल्या परमेश्वराचा धावा करतात. "धाव घाल विठू आता चालू नको मंद" सातशे वर्षापूर्वी अशा रीतीने अस्पृश्य समाजाच्या वाटयाला आलेले प्रातिनिधीक दुःख या संताने मांडले. अस्पृष्यांना शिवल्यास विटाळ होतो. याविषयी ते म्हणतात ; "वेदांसी विटाळ, शास्त्रांशी विटाळ । पुराणे अमंगळ विटाळाची । जिवासी विटाळ, शिवासी विटाळ । काया अमंगळ विटाळाची ।। ब्राहमया विटाळ, विष्णूसी विटाळ। शंकरा विटाळ अमंगळ ।। कन्यता विटाळ, मरतां विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदि अंती |" असे विटाळांबद्दल सांगून आपल्या अस्पृश्य समाजाच्या वाटयाला आलेले दुःख अभंगातून प्रत्यक्षपणे बोलून दाखवतात. आपली तक्रार परमेश्वरापुढे मांडणारा पहिला अस्पृश्य समाजातील संत म्हणून चोखोबांचे नाव घ्यावे लागेल. चोखोबांचे सकलसंतगाथ्यामध्ये ३४९ अभंग उपलब्ध आहेत.

सर्व संतामध्ये ज्येष्ठत्वाचा मान जातो तो गोरोबा कुंभार यांच्याकडे, (इ.स.१२६७ ते इ.स.१३०९) त्यांचे वीस अभंग उपलब्ध आहेत. आपल्या व्यवसायातच परमेश्वराला पाहणारे, भक्ती करणारे संत या वारकरी संप्रदायांमध्ये दिसतात. घर-दार सोडून संन्यासी किंवा ब्रहमचारी होऊन परमेश्वर भक्ती न करता संसारामध्ये राहून आपल्या वाट्याला आलेला जातीप्रमाणे व्यवसाय करता – करता भजन व नामरूपी भक्ती या संतानी केली व समाजाला आदर्श दाखवून दिला. यांमध्ये गोरोबा कुंभार, सावता माळी (इ.स.१२५० ते १२९५) नरहरी सोनार (जन्म इ.स. सुमारे १३१३) , चोखामेळा, संत नामदेव, कान्होपात्रा इ. संतांची घेता येतील.

उदा. नरहरी सोनार यांचा अभंग-

“देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।
देहबागेसरी जाणे । अंतरात्मा जाण सोने ।”

या प्रातिनिधीक अभंगांप्रमाणेच इतर सर्व समाजातील संतांनी आपल्या व्यवसायातच परमेश्वराला पाहिले अठरा पगड जाती जमातींना आपल्या अभंगातून प्रबोधन करण्याचे सामाजिक काम या संतांनी केले आहे. स्त्री संतांमध्ये मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा इ. संत कवयित्रींचे काम मोठे आहे. मुक्ताबाईंनी ताटीचे अभंग आपल्या भावासाठी, ज्ञानेश्वरांसाठी लिहिले नसते तर ज्ञानेश्वरांनी पुढील कार्य केलेच नसते असे म्हणावे लागेल. तसेच संत जनाबाईच्या अभंगांमधून समग्र स्त्री जीवनाच्या वाटयाला आलेले दुःख हुंकार आढळतो. तर कान्होपात्राच्या

अभंगांमधून उपेक्षित अशा गणिकेचे जीवन तत्कालीन काळात कसे होते याचा प्रत्यय येतो.

ज्या संतांनी महाराष्ट्राला एक नवी दिशा व आकार दिला व ज्यांना अष्टपैलू, किंवा समन्वयकार असे संबोधले जाते ते म्हणजे संत एकनाथ होय. संत एकनाथांना लोककलावंत, लोकशिक्षक, संत तत्वज्ञ इ. बिरूदे लावली जातात. कारण त्यांनी विद्वजनांसाठी एकनाथी भागवत, चतुःश्लोकी भागवत, भावार्थ रामायण व रूक्मिणी स्वयंवर अशी रचना केली तर सामान्यजनांसाठी अभंग, गौळणी पदे भारूडे अशी रचना केली. लोकभाषेमध्ये यांचे सादरीकरण केले म्हणून नाथांना समाजाचा समन्वयकार असे म्हणावे लागते.

महाराष्ट्राला पुरोगामीत्वाकडे घेऊन जाण्याचा मान खऱ्या अर्थाने संत तुकारामांकडे जातो. लौकिक वे अलौकिक जीवन ज्यांनी जवळून पाहिले व ते अभंगांच्या रूपाने समाजाला सांगितले. ते अभंग सकलसंतगाथ्यामध्ये पहावयास मिळतात. तुकारामांचे अभंग म्हणजे आजच्या जीवनाची सुभाषिते बनली आहेत. आजच्या समाजाला मार्गदर्शन करण्याचे काम करतात. संत तुकारामांच्याच समान कालखंडांमध्ये संत रामदासांचेही लेखन व कार्य चालू होते. त्यांनी करूणाष्टके, एकवीस समासी, मनाचे श्लोक, दासबोध, भूपाळ्या, आरत्या अशी वैशिष्टयपूर्ण रचना केली. संत रामदास हे शिवाजी महाराजांचे गुरू होते असे मानले जाते. संत रामदासांचे सर्व वाङ्मय विचार समाजासाठी आजही प्रेरणादायी आहे असे म्हणावे लागेल.

**निष्कर्ष :**

संतांचे सामाजिक योगदान हे अभूतपूर्व आणि कालातीत आहे. त्यांनी जातीयता, अस्पृश्यता, आणि धार्मिक वांशिकतेवर प्रहार करून मानवतावादी दृष्टिकोन मांडला. त्यांच्या अभंगांनी समाजाला नैतिकता, समानता, आणि आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला. त्यांचे अभंग आणि कार्य केवळ अध्यात्मिक नव्हते, तर समाज सुधारासाठी प्रभावी साधन ठरले. आजही त्यांचे विचार विचार आणि अभंग समाजाला प्रेरणा देतात. त्यांच्या विचारांवर आधारित ग्रंथ आजही समाजाला मार्गदर्शन करतात.

**समारोप** :

सर्व संतांनी तत्कालीन महाराष्ट्रातील निरक्षर अशा समाजाला अध्यात्मायाच्या माध्यमातून नीती व सदाचार हे समाजात रुजवले. माणसांचे इतर माणसांबरोबर वरील संबंध सुधारण्यासाठी नैतिक विचार समाजात रुजविले. परमेश्वर व संत सज्जनावरील श्रध्दा रूजविली. डॉ. यु. म. पठाण याविषयी लिहितात. "संतांनी पारलौकिक कल्याणाचं उदिष्ट प्रतिपादिलं हे अमान्य करण्याचे काहीच कारण नाही. पण त्यांनी ऐहिक जीवन चांगल्या प्रकारे जगू नये असंच सांगितलं का? नाही उलट, हे लौकिक जीवन आपण आवश्यक जगाव, एवढंच नव्हे तर लौकिक कनातली आपली कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडावीत, असंच सर्व धर्माचे व पंथाचे संत सांगतात."

अशा रीतीने महाराष्ट्र घडविण्यामध्ये परमार्थ, नीती, सदाचार, सुसंस्कार इ. गोष्टी समाजमनामध्ये संतांनी रुजविल्या म्हणून वारकरी संप्रदाय आजही टिकून आहे व त्यांचे सामाजिक कार्यही समाजासाठी मौल्यवानच आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथसूची :-**


१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती ऑगस्ट २००६

२. संत पंत व तंत - श्री.म. माटे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, व्दितीयावृत्ती नोव्हें.२००६

३. साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध - म. सु. पाटील, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पुनर्मुद्रन जानेवारी २०२०

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, प्रा. रा. ना. घाटोळे, श्री मंगेश प्रकाशन नागपूर द्वितीय आवृत्ती १९९०

५. अभंगांचा गाथा - श्री संत तुकाराम महाराज संस्थान पुणे पुनरावृत्ती २३ नोव्हेंबर २००८

६. संत साहित्य नवचिंतन- डॉ.यू.म. पठाण, दिलीपराज प्रकाशन पुणे प्र.आ. जून २०११

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत जनाबाईंचे अध्यात्मिक व सामाजिक योगदान: एक अभ्यास

**प्रा. तनुजा येलाले[1], डॉ. सुनील साळुंके[2]**
[1]तत्त्वज्ञान विभाग,मिठीबाई महाविद्यालय, विले-पार्ले (पश्चिम),मुंबई
[2]विभागप्रमुख, तत्त्वज्ञान विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर
**Corresponding Author: प्रा. तनुजा येलाले**
**DOI- 10.5281/zenodo.14547017**

**Abstract / गोषवारा:**

संत जनाबाई या मध्ययुगीन भक्ती चळवळीतील वारकरी पंथाच्या महाराष्ट्रातील एक महत्त्वाच्या स्त्री संत होत्या. त्यांनी सामाजिकदृष्ट्या दलित, शूद्र, स्त्री या स्तरातील सर्वसामान्यांच्या जीवनावर आपल्या अभंगांतून टिप्पणी केली. सर्वसाधारणपणे भक्ती परंपरेतील सर्वच संतांची आयुष्ये ही चमत्कारपूर्ण प्रसंगांनी भरलेले आहेत. हे जरी खरे असले तरी त्यांच्या जीवनकथेमध्ये आणि त्यांच्या भक्तिरसपूर्ण साहित्यिक लेखनामध्येही सामाजिक, सांस्कृतिक जीवन आणि त्यातील विषमतेवरील भाष्य दिसून येते. त्याचा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक विचार आणि विश्लेषण करण्याची समाजशास्त्रीय आणि विद्याशाखीय पातळीवर सातत्याने गरज भासते. वारकरी संप्रदायच नव्हे तर एकूण भक्ती परंपरेमध्ये उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष हा भेदभाव नाही आणि तरीही सर्वच संतांना याचा पदोपदी अनुभव येतो. केवळ अनुभवच येत नाही तर त्याचे चटकेही बसतात. संत जनाबाईंसारखे त्यात होरपळलेही जातात. त्यामुळे सैद्धांतिक पातळीवर सर्व मानवांना समानतेने मुक्त करणारी परंपरा, चळवळी लौकिक पातळीवर माणसांची सुटका करू शकत नाही. म्हणूनच मग या सर्व अनुभवांचा पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या कालखंडांमध्ये अभ्यास करण्याची गरज निर्माण होते. संत जनाबाईंच्या अभंगांतून दिसून येणारे दलित, शूद्र आणि स्त्रियांचे जीवन, त्यावर त्यांनी केलेला विचार, त्याचे विश्लेषण आणि प्रसंगी सखा बनून साहाय्यास धावून येणाऱ्या ईश्वराच्या रूपामध्ये त्यांनी शोधलेला उपाय जो मानवी समाजातील उपायांना पर्याय म्हणून उभा राहतो. या सर्वांचा अभ्यास सदर अभ्यासाच्या माध्यमातून केला आहे.

**Keywords:** संत जनाबाई, भक्ती, सामाजिक विषमता, विद्रोह, स्त्री-मुक्ती, भक्ती चळवळीच्या

**प्रस्तावना:**

संत जनाबाई या मध्ययुगीन स्त्री-संत आपल्या लेखणीद्वारे सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातील संघर्ष, कष्ट, मान-अपमान, छोटी-छोटी सुखे, समाधानाचे क्षण, ईश्वराचे मानवी जीवनातील स्थान, त्याचे मानवी रूप, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणारा जवळचा प्रिय सखा असणे, अश्या अनेक गोष्टींचे दर्शन आपल्याला करून देतात. संत जनाबाईंच्या जीवनकथेत येणाऱ्या अनेक चमत्कारिक प्रसंगांमुळे आणि स्वतः जनाबाई पंढरपूरच्या विठ्ठलाच्या सानिध्याच्या वैयक्तिक अनुभव-अनुभूतींबद्दल बोलत-लिहीत असल्यामुळे त्या स्वप्नांच्या जगात गुंगलेल्या आहेत आणि त्या साध्या, देवभोळ्या आहेत असा समज त्यांच्याबद्दल सातत्याने पसरवला जातो. या बाबी नाकारण्याचे अजिबातच कारण नाही परंतु या समजांमुळे संत जनाबाईंचे अध्यात्मिक, सामाजिक योगदान झाकोळले जाते. त्याचा पुनर्विचार करण्याची नेहमीच गरज आहे. केवळ संत जनाबाईच नव्हे तर अश्या प्रकारे देवभोळेपणाचा समज ज्यांच्याबद्दल आहे अश्या सर्वच संतांच्या संदर्भात हा विचार करण्याची गरज आहे. सदर संशोधन निबंधात मी संत जनाबाईंच्या अध्यात्मिक क्षेत्रातील आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा पुनर्विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी संत जनाबाईंच्या गाथेतील मूळ अभंगांसोबतच त्यांच्यावर अन्य अभ्यासकांनी केलेले संशोधन, त्यातून जनाबाईंच्या योगदानाचा झालेला विचार, संत जनाबाईंबरोबरच मध्ययुगीन काळातील अन्य वा सर्वच संतांवर झालेले संशोधनही विचारात घेतले आहे. त्याचबरोबर भारतीय दलित, शूद्र, तसेच स्त्रियांच्या ऐतिहासिकदृष्ट्या विविध कालखंडांतील आणि क्षेत्रांतील योगदानाचे झालेले विश्लेषणात्मक अभ्यासही विचारात घेतले आहेत. या सर्व अभ्यासाच्या आधारे संत जनाबाईंच्या अध्यात्मिक, सामाजिक योगदानाचे विश्लेषण करण्याचा हा अभ्यास एक प्रयत्न आहे.

**भक्ती चळवळीचे भारतीय परंपरेतील स्थान:**

भारतीय परंपरा मध्ययुगीन काळात राजकीय, सामाजिक दृष्ट्या जरी झाकोळली असली तरी आध्यात्मिक दृष्ट्या मात्र भक्ती चळवळ नामक ज्ञान-भक्ती दीपोत्सव भारतभर साजरा झाला. या कालखंडात भारतीय मनाच्या

अंतरीचा दीप सकारत्मक भावाने तेवत ठेवायचे श्रेय भारताच्या कानाकोपऱ्यात झालेल्या भक्तिमय संतांना जाते. भारतीय ज्ञानपरंपरेचा आरंभ संस्कृत साहित्यातून झाला असला तरी ही ज्ञानगंगा देशभरच्या स्थानिक भाष्यांच्या पात्रांमधून मध्ययुगीन काळात भक्ती चळवळीतून निर्माण झालेल्या साहित्याच्या रूपाने वाहू लागली. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिकदृष्ट्या एका विशिष्ट श्रोतृवृंदाकरिता मर्यादित असलेले संस्कृत भाषेतील ज्ञानामृत भक्ती चळवळीने गावोगावच्या साध्या-भोळया, भाबड्या लोकांच्या आध्यात्मिक उत्कर्षासाठी सर्वसामान्य लोकांच्या बोली भाषेत त्यांच्या दारी आणले. याअर्थी भक्ती परंपरेतील झालेली साहित्य निर्मिती आणि भक्ती परंपरेच्या पालकांचा एकूणच कृती-कार्यक्रम हा 'परंपरा-विरोधी' होता.

संस्कृत साहित्याचे प्रामुख्याने दोन भाग करता येतात. एका भागातील संस्कृत साहित्य उच्च दर्जाचे तत्त्वज्ञानात्मक, सत्तामिमांसीय, अ-काल्पनिक चर्चांचा, समज-अपसमजांचा आढावा आहे तर दुसऱ्या भागामध्ये सौंदर्यास्वाद, देवी-देवतांचे स्तवन अशा कल्पनारम्य, सुमधुर वर्णनांनी ओसंडून वाहणारे आहे. रूढ अर्थाने भक्ती संप्रदायी साहित्य रुक्ष, तात्त्विक, सैद्धांतिक चर्चाही नाही आणि कपोलकल्पित, मनोरंजनात्मक साहित्यही नाही, तर मग भक्ती परंपरेतील संत साहित्य नेमके काय आहे? असा प्रश्न पडतो. याचे उत्तर काही प्रमाणात Andrew Schelling यांनी संपादित केलेल्या The Oxford Anthology of Bhakti Literature' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत (Pg XVIII) द्यायचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात,

'They speak to a relationship as tumultuous as that between two human beings',

प्रस्थापित समाजमान्य मूल्ये, व्यवस्था, रूढी-परंपंरा, सभ्यता यांचे साखळबंद तोडून टाकणारी नेमकी ग्राम्य भाषा अभिव्यक्तीसाठी वापरणाऱ्या संतांचे योगदान समाजातील परंपरेला छेदून जाणारा आणि तरीही परंपरेची पूर्ण शकले न करणारा अतिशय महत्त्वपूर्ण प्रहार आहे. भारतीय समाजामध्ये पूर्वापार अस्तित्वात असलेल्या जाती-वर्ण-लिंगभावात्मक रचनेवर प्रश्नचिन्ह लावून त्या प्रश्नाचे समाधान पुन्हा परंपरेतच दिलेल्या उपायांचे नव्याने विश्लेषण करून त्यातून मिळवण्याचा प्रयत्न भक्ती चळवळीने केला आहे. विजया रामास्वामी यांच्या 'Walked Naked: women, Society, Spirituality in South India' या पुस्तकावरील E. P. W. मध्ये लिहिलेल्या परीक्षणामध्ये कनकलता मुकुंद म्हणतात (pg 536),

'The Bhakti movement was centered around the individual and cut across caste, class and gender boundaries, it was rooted strongly in brahmanical patriarchy'.

कनकलता मुकुंद यांच्या प्रमाणेच गेल ऑम्वेट त्यांच्या 'Cultural Revolt in a Colonial Society' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आपले निरीक्षण नोंदवतात. भक्ती चळवळ ही भारतात घडलेली धार्मिक, आध्यात्मिक क्रांती होती जेंव्हा आर्थिक, राजकीय बदलाची गरज होती परंतु ते सर्वसामान्यांच्या आवाक्यातील गोष्ट नव्हती. परंतु एका अर्थी असे अनेक प्रयत्न भारतीय इतिहासात झाल्याचे आपल्याला दिसून येते. गेल ऑम्वेट म्हणतात (pg 45),

'These were the Bhakti or religious devotional movements, spread over at least fourteen centuries'.

भारतीय इतिहासात १९ व्या शतकात जे आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रबोधन झाले त्याच्या भू-मशागतीची तयारी मध्ययुगीन कालखंडात झालेल्या भक्ती परंपरेने केलेल्या आध्यात्मिक प्रबोधनामध्ये होती हे ऑम्वेट यांचे निरीक्षण नाकारण्याचे काहीही कारण दिसत नाही. वैष्णव, शैव आणि शाक्त या तीनही परंपरा भक्ती चळवळीच्या लाटेमधे सामावल्याचे दिसते. या तीनही पारंपरिक भक्ती संप्रदायांमध्ये देशाच्या विविध भागांमध्ये संत होऊन गेले. सर्वच स्त्री-पुरुष संतांनी त्यांचे जीवनानुभव भाषिक वैभवाच्या साहाय्याने अतिशय सशक्तपणे काव्यात्मक रूपामध्ये लोकसाहित्य, लोकसंगीताच्या प्रारूपामध्ये व्यक्त केले. यासाठी संतांना निर्गुण, निराकार ब्रह्मापेक्षा मानवी रूपामध्ये भक्ताला एकतत्वाच्या पातळीवर उराउरी भेटणाऱ्या सांगून, साकार देवी-देवता अधिक आपलेसे, जवळचे वाटतात. यात नवल वाटण्यासारखे काही नाही. आपल्या 'The Oxford Anthology of Bhakti Literature' या संपादित पुस्तकात Andrew Schelling म्हणतात (pg XX) की भक्ती परंपरेच्या साहित्यातून,

'A projection of personal fear, desire, expectation rather than a true assertion about the personality of the universe',

दिसते. या संदर्भात पहिले असता भारतीय भक्ती चळवळीने भारतीय अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञानाचा प्रारंभ केला. अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञानाला अपेक्षित असलेल्या प्रथम पुरुषी (first person) अनुभव व अनुभूती (lived experiences) यांच्याच अवती-भवती व पायांवर संत साहित्याची इमारत आधारलेली / बेतलेली आहे. सर्वभाषिक स्त्री-पुरुष संतांचा मुख्य भर त्यांना जीवनात आलेल्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, लिंगभावात्मक दुजाभावाची वागणुकीवर आहे. ज्यावर त्यांनी अतिशय परखड आणि सडेतोड भाष्य केले आहे. दक्षिण भारतातील खालच्या जातींमध्ये भक्ती परंपरा आणि चळवळीची सुरुवात झाली. या संदर्भात भागवतपुराणामध्ये एक संस्कृत वचनही येते ते याप्रमाणे आहे.

उत्पन्ना द्रविडे साहं वृद्धिं कर्नाटके गता
क्वचित्क्वचिन् महाराष्ट्रे गुर्जरि जीर्णतां गता।
तत्र घोराकलेर्योगात् पाखण्डैः खण्डिताङ्गका

दुर्बलाऽहं चिरं याता पुत्राभ्यां सह मण्डिताम् ।
वृन्दावनं पुनः प्राप्य नविनेव सुरूपिणी
जाताऽहं युवती सम्यक् प्रेष्ठरूपा तु साम्प्रतम् ।।
(भागवतपुराण १.४८-५०)

अर्थात भारतीय परंपरेत भक्ती या उप-परंपरेचा उगम द्रविड देशामध्ये झाला, तिथून ती कर्नाटकमध्ये पोहोचली, त्यानंतर तो प्रवाह महाराष्ट्रात आला. तेथून भक्तीचे हे लोन गुजरात देशात पोहोचले, ज्या नंतर त्याचा उत्तर भारतात प्रचार, प्रसार झाला. अशा प्रकारे भारतीय समाज जीवनात धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच स्तरांवर विचारांचे नवनवे वारे भक्ती परंपरेच्या उदयामुळे वाहू लागले. भक्ती परंपरेने विचारलेल्या प्रश्नांमुळे बदलांची एक चळवळच सुरु झाली. देशाच्या कानाकोपऱ्यांत उदयास आलेल्या स्त्री-पुरुष संतांनी ही चळवळ शतके जिवंत ठेवली.

**वारकरी संप्रदायाचे भारतीय भक्ती चळवळीतील स्थान:**

भारतीय भक्ती परंपरेचा महाराष्ट्रातील आविष्कार वारकरी संप्रदायाच्या रूपाने झाला. परंतु वारकरी हा एकमेव संप्रदाय महाराष्ट्रात उदयास आलेला नाही तर ज्यांचा उदय झाला आणि ज्यांचा प्रसार झाला अशा महानुभाव पंथ, नाथसंप्रदाय, लिंगायत समाज यांचाही मोठा प्रभाव मराठी समाज मनावर झाल्याचे आपल्याला दिसते. वारकरी संप्रदायाचे प्रगट रूप नामदेवांपासून दिसू लागते. भारतीय परंपरेत ज्या दोन शाखांचा प्रामुख्याने उल्लेख येतो त्या वैष्णव आणि शैव भक्ती संप्रदायांमध्ये सर्व संतांची एका प्रकारे विभागणी करता येते. मात्र या दोन्ही परंपरांचा सुंदर संगम आपल्याला वारकरी परंपरेत झाल्याचे दिसते. या दोन परंपरांचा मिलाफ 'वारकरी संप्रदायाचा पाया' ज्यांना मानले जाते त्या संत ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञान आणि जीवन दृष्टीमध्ये दिसतो. नाथ संप्रदायाची गुरुशिष्य परंपरा निवृत्तीनाथांच्या माध्यमातून ज्ञानेश्वर / ज्ञानदेव / ज्ञाननाथ यांच्यापर्यंत येऊन पोहोचते. संस्कृत भाषेतील अगम्य ज्ञान सर्वांना खुले नाही, त्याचा मक्ता समाजाच्या काही घटकांकडेच एकवटलेला आहे या जाणिवेतून संत नामदेवांनी ते जनसामान्यांसाठी प्रसवायला सुरुवात केलीच होती. त्याच काळात सामाजिक विषमतेचे चटके सहन करत असलेल्या प्रतिभावान कुमार ज्ञानेश्वरांना संस्कृतातील ज्ञानगंगा सर्वांपर्यंत पोहोचवणारा भगीरथ होण्याची प्रेरणा त्यांचा नाथपंथीय गुरु निवृतीनाथांकडून मिळाली तर जनसामान्यांपर्यंत या ज्ञानगंगेचे पात्र पोहोचवण्याचा मार्ग नामदेवांच्या वैष्णव परंपरेत सापडला. अशा प्रकारचा शैव-वैष्णव परंपरेचा मिलाफ गुजराती संत 'आखो' यांच्या साहीत्यातही झाल्याचे दिसते. गुजराती कवी प्रेमानंद यांनी आपल्या शिष्याला मराठी संतसाहित्यातून काव्याचे धडे घ्यायला सांगितले होते. जी. एन. त्रिपाठी त्यांच्या The Classical poets of Gujarat या पुस्तकात या संदर्भातील एक नोंद देतात. ते म्हणतात,

'To Ratneshwar he allotted philosophical poems. It is said that Ratneshwar was asked to copy Marathi poets.'

वारकरी संप्रदायाचा भारतातील अन्य भक्ती परंपरा आणि उपासना पद्धती यांच्याशी होत असलेल्या आदान - प्रदानाविषयी तसेच महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाच्या सोबतीने फळाला आलेल्या अन्य भक्ती संप्रदायांबद्दल बोलण्यासारखे खूप काही आहे. या सर्वांतून वारकरी सांप्रदायाची सर्वसमावेशक भूमिका आणि उदार दृष्टिकोनच अधोरेखित होतो.

भारतीय परंपरा आणि त्यातील वेदप्रामाणित आस्तिक व्यवस्था मुख्यतः ब्राह्मण धार्जिणी असल्याचे मानले जाते. वर्ण, जाती आणि आश्रमाधारित विषम समाजव्यवस्थेतून या परंपरेचे ब्रह्मनधार्जिणेपण अधिकच तीव्रतेने अधोरेखित होते. या व्यवस्थेमध्ये धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय या पातळयांबरोबरच अध्यात्मिक पातळीवरही भिन्न-भिन्न मानवी समूहांना विषमतेची वागणूक पूर्वापार दिली जात होती. विजया रामस्वामी त्यांच्या Rebels – Conformists? Women Saints in Medieval South India या पुस्तकात म्हणतात (pg १३८),

'Hindu Scriptures themselves provide the path of renunciation for men in the final asrama or stage prescribed – Sanyasa. This spiritual path was closed to men of lower caste as well as women.'

जो मार्ग परंपरेने नाकारला होता आणि प्राचीन काळापासून जे अवलंबलेले होते त्यामुळे शूद्र वर्ण वा जातींमध्ये जन्मणारे पुरुष तसेच सर्वच वर्ण वा जातींमध्ये जन्मणाऱ्या स्त्रिया यांना पुढचा एखादा जन्म उच्च वर्ण-जातीच्या पुरुष देहात पुन्हा मिळणे हाच एकमेव तरणोपाय होता. पुरातन काळापासून रूढ असलेल्या या विचारातील फोलपणा लक्षात आल्यामुळे असेल किंवा आध्यात्मिक उत्कर्षाची संधी सर्वच जीवांना सारख्या प्रमाणात उपलब्ध असावी या समानतेच्या विचारातून असेल पण देशहरात उदयास आलेल्या भक्ती चळवळीने शूद्र आणि महिलांची आध्यात्मिक आणि पर्यायाने धार्मिक, सामाजिक कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांची दखल घेताना विजया रामस्वामी त्यांच्या Rebels – Conformists? या पुस्तकात म्हणतात (pg १३३),

'Spirituality provided Indian women with that freedom which orthodox Hindu society denied to them'.

दक्षिण, उत्तर आणि मध्य भारतात विविध भक्ती संप्रदाय स्वतंत्रपणे तसेच परस्परांच्या साहाय्याने उदयास आल्या, प्रसार पावल्या. त्या सर्व भक्तिपरंपरांमध्ये महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने उभ्या केलेल्या भक्ती चळवळीचे वेगळेपण प्रकर्षाने दिसून येते. कनकलता मुकुंद विजया रामस्वामी यांच्या Walked Naked: women,

Society, Spirituality in South India या Economic Political weekly (EPW pg 536) मध्ये केलेल्या पुस्तक परीक्षणात म्हणतात,

'The 'Warakari Panth of Maharashtra' this movement was truly radical and cut across both caste and gender distinctions.'

वारकरी संप्रदाय भारतीय हिंदू परंपरेत आढळणाऱ्या विविध दैवतांना त्यांची उपासना करणाऱ्या विविध पंथ-उपपंथांमध्ये असणाऱ्या विसंवादी, प्रसंगवादी भूमिकांना टाळून अधिक व्यापक, सर्वसमावेशक, सर्वांना परमार्थाची समान संधी देणारी भूमिका घेतो. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेवांनी इतर सर्व तत्कालिन संतांच्या साहाय्याने ही भक्तीची पताका सर्वदूर पोहोचवली. प्रसिद्ध लेखिका तारा भवाळकर त्यांच्या 'स्त्री-मुक्तीचा आत्मस्वर: मराठी संत कवयित्रींची मुक्तिसंकल्पना आणि स्त्री-मुक्ती' या पुस्तकात वारकरी संप्रदायाचे योगदान स्पष्ट करताना म्हणतात (pg 25),

'वारकरी पंथ हा सर्वसंग्राहक, प्रतिकांबद्दल दुराग्रही नसलेला, संकुचित संप्रदायिकता नसलेला, मठ-मंदिरांत बंदिस्त नसलेला आणि शतकानुशतके घडलेल्या लोकमानसाच्या कोमेजलेल्या मुळांना चैतन्याचे पाणी देणारा ठरला.' केवळ वारकरी संप्रदायच नव्हे तर एकूण भक्ती परंपरेमध्ये उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष हा भेदभाव नाही. परंतु वारकरी संप्रदायात हे फार ठळकपणे दिसते. अठरापगड जातींचे संत या परंपरेमध्ये आहेत. भारतातील अन्य कोणत्याही भक्ती संप्रदायापेक्षा वारकरी संप्रदायात लिहित्या झालेल्या स्त्री-संताचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील जात्यावरच्या ओव्या, भावगीते, लोकगीते या अन्य लोकसाहित्यावरही या संत स्त्रियांच्या जीवन आणि त्यांच्या रचना याचा प्रभाव पडलेला आहे.

**स्त्री-संतांचे भारतीय भक्ती चळवळीतील आणि वारकरी संप्रदायातील स्थान तसेच योगदान:**

भारतामध्ये ज्ञान आणि संपत्तीचे स्रोत उच्च वर्ण आणि जातींच्या हाती एकवटलेले होते आणि अन्य वर्ण तसेच जाती ज्यांना दुय्यम दर्जा होता त्यांना हि संधी नव्हती. शूद्र पुरुष आणि स्त्रिया या उपेक्षित वर्गामध्ये प्रामुख्याने होत्या. तरीही उसाचं वर्गाच्या विशेषतः ब्राह्मण स्त्रियांना अगदी नगण्य का असेना पण काही प्रमाणात तरी ज्ञानार्जनाची, लेखन - वाचनाची आणि पर्यायाने ज्ञानाची संधी उपलब्ध होती. या स्तरातील स्त्रिया ही संधी घेत किंवा घेऊ शकत असा याचा अर्थ होत नाही परंतू किमान अशा संधीची त्यांच्यापुढे शक्यता उपलब्ध होती. महाराष्ट्रामध्ये ही संधी वारकरी संप्रदायाच्या रूपाने शूद्र पुरुष सर्व स्तरांतील स्त्रियांना खुली करून दिली. विजया रामस्वामी त्यांच्या Rebels – Conformists या पुस्तकात म्हणतात, (pg 138)

'Lower class representation in Srivaisnavism occurs in the North deccan in the Maharashtra region'.

शूद्र, स्त्रिया यांना भारतीय परंपरेमध्ये विकसित झालेले संस्कृत भाषेत ग्रंथीत झालेले ज्ञान उपलब्ध नसले तरीही लोकसाहित्याच्या मौखीक परंपरेतून आलेले ज्ञान त्यांच्या सोबत होतेच. संतसाहित्याचा विकासाच्या टप्प्यात परंपरानिष्ठ ज्ञानाची कवाडे किलकिली करण्यात काही संतांना यश मिळाले. जसे वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वरांनी उपनिषदीय ज्ञानाचे सर मानल्या गेलेल्या भागवद्गीतेवर प्राकृत मराठीत टीका-भावार्थदीपिका लिहिली. वज्रसूचीकोपनिषदातूनही किमान अध्यात्मिक क्षेत्रातील समानतेचा विचार मांडला गेला होता. मौखिक परंपरेमध्ये पुढच्या पिढीपर्यंत येणाऱ्या लोकसाहित्यातील ज्ञानाला तात्त्विक पाय देण्याचा यशस्वी प्रयत्न अनेक संतांनी केला. ज्यामुळे अनेक अध्यात्म क्षेत्रातील सैद्धांतिक विचार शूद्र-स्त्रियांपर्यंत समानतेच्या धाग्यासह पोहोचला.

भारतीय प्राचीन परंपरेमध्ये जशी प्रस्थापित ज्ञानाला त्या ज्ञानाचे प्रामाण्य स्वीकारणारी विचारधारा दिसते. साधारण हीच वैचारिक विभागणी संत परंपरेमध्येही दिसते. मुळात संपूर्ण संत परंपराच प्रस्थापित ज्ञान व्यवहारातील विसंगतीला पर्याय म्हणून उभी राहिली असली तरी त्यांचीही विभागणी परंपरेला अनुकूल, स्वीकार्य मांडणी करणारे आणि परंपरेला खुलेपणाने नाकारणारी, प्रश्न विचारणारे या दोन भागांमध्ये करता येते. यात महत्त्वाचा सहभाग परंपरेला प्रश्न विचारणाऱ्या संतांचा अधिक आहे. अर्थात यातला कोणताही गट हिंदू धर्माची पायाभूत चौकट मुळातून मोडीत काढणारा, उखडून टाकण्याइतका क्रांतिकारक नव्हता, नाही हेही आपण समजून घेतले पाहिजे. त्यामुळे काही संतांना क्रांतिकारी असे आपण म्हटले तरी ते एका विशिष्ट मर्यादेतच क्रांतिकारी होते हे समजून घेऊनच ही विभागणी लक्षात घेतली पाहिजे.

भारतीय स्त्री-संत प्रस्थापित ज्ञान प्राप्तीची कसलीही साधने हाताशी नसताना लिहित्या झाल्या, त्यांनी संतसाहित्याची निर्मिती केली आणि लोकसंग्रहाच्या मौखिक परंपरेत टिकून त्यांच्या रचना आपल्या पर्यंत पोहोचल्या हेच खरेतर क्रांतिकारक आहे. अर्थात स्त्रीसंतांच्या ज्या रचना आपल्यापर्यंत पोहोचल्या त्यातही काही रचना भक्तिरसात बुडालेल्या आहेत परंतु प्रामुख्याने अनेक स्त्री-संतांच्या रचनेत त्यांचे दैनंदिन जीवन, तत्कालीन सामाजिक व्यवस्था, त्या व्यवस्थेचा त्यांना होणार जाच, होणाऱ्या जाचामुळे त्यांनी व्यवस्थेवर केलेले प्रश्न, दिलेली प्रतिक्रिया दिसून येतात. स्त्री-संतांमध्ये क्रांतिकारक संतांची विभागणी पुन्हा दोन प्रकारच्या स्त्री-संतांमध्ये करता येईल. पहिल्या प्रकारच्या स्त्री-संतांनी त्यांच्या जीवनात केलेल्या कृतींमधून व्यवस्थेसमोर प्रश्न उभे केले. दुसऱ्या प्रकारच्या स्त्री-संतांनी त्यांच्या रचनेद्वारे व्यवस्थेसमोर प्रश्न उभे केले. पहिल्या प्रकारच्या क्रांतिकारक स्त्री-संतांमध्ये दक्षिणेतील अक्का-महादेवी आणि उत्तरेतील लल्लेश्वरी या स्त्री-संतांचा

समावेश करता येईल. ज्यांनी समाजाची प्रस्थापित चौकट नाकारली तर दुसऱ्या प्रकारच्या स्त्री-संतांमध्ये संत मीराबाई, संत जनाबाई, संत बहिणाबाई यांचा समावेश करता येईल. या सर्वच संत स्त्रियांनी ज्या समस्यांचा सामना केला त्याचा विचार A. K. Ramanujan त्यांच्या Talking to god in the mother tongue या लेखात करतात. ते म्हणतात (pg ५६)

'A respectable woman is not, for instance, allowed to live by herself or outdoors, or refuse sex to her husband – but women saints wander and travel alone, give up husband, children and family'. याचे श्रेय ते आपल्या संस्कृतीला देतात, ते म्हणतात, 'A women is not thought of as psychologically or spiritually different from a man, though she may be socially different, thanks to the culture of the time and place.'

पुरुष संत आणि स्त्री संतांसमोरील समस्यांचे स्वरूपच भिन्न आहे. जिथे पुरुष संत आहेत तिथे त्यांच्या पत्नीला आपोआप आध्यात्माची संधी मिळाली आहे आणि काही अपवाद वगळता त्यांनी ती घेतलीही आहे. परंतु स्त्री संतांच्या बाबतीत मात्र असे झालेले नाही. त्यांचे नवरे आणि अन्य कुटुंबीय त्यांच्यासोबत अध्यात्मिक प्रवासाला निघत नाहीत तर त्यांनी हा मार्ग सोडावा यासाठी आग्रही भूमिका घेतात, प्रसंगी यासाठी त्यांचा छळही करतात. विद्युत भागवत त्यांच्या Marathi literature as a source for contemporary feminism या लेखात म्हणतात त्याप्रमाणे,

'It can also be interpreted as a comment on the necessity for women bhakti saints to give up husbands and homes to achieve the freedom to devote themselves to the worship of their Lord'.

विजया रामस्वामी यांनी भारतीय स्त्री-संतांची विभागणी तीन प्रकारांमध्ये केलेली आहे. त्यांचं मते पहिल्या प्रकारामध्ये त्या स्त्री-संत येतात ज्या उच्च जाती-वर्णातील होत्या. या संत स्त्रियांना वेद, उपनिषदे, पुराणे यांचा अभ्यास करण्याचा अधिकार नव्हता परंतु घरात अध्ययन आणि ज्ञानोपासनेचे वातावरण होते त्यामुळे काही प्रमाणात का होईना ते त्यांच्यापर्यंत झिरपत होते. अक्षर-ओळख, वाचन, लेखन त्यांच्यापर्यंत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूपात पोहचत होते. दुय्यम आणि नीच जाती-वर्णातील स्त्रियांना वेद-उपनिषद यांचे ज्ञान मिळत नसले तरी त्यांच्यापर्यंत मौखिक लोकपरंपरांमधून झिरपत येणारे ज्ञान प्राप्त होत होते. या दोन्ही प्रकारांतील स्त्री-संत संसारी स्त्रिया होत्या. आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि इतर दैनंदिन कामे सांभाळून त्यांनी ज्ञान मिळवले, त्याचा आपल्या परीने अर्थ लावला. या अर्थविवरणाचा आपल्या आयुष्यातील अडचणी कमी करून ते सुकर करण्यासाठी उपयोग करून घेतला. भारतीय स्त्री-संतांमध्ये काही संत अश्याही होत्या ज्या लौकिक अर्थाने लग्न, कुटुंब या सर्वांमध्ये कधीही अडकल्या नाहीत. परंतु अलौकिक अर्थाने त्या देवाशी जोडल्या गेल्या, त्याच्या वधू बनल्या. संत जनाबाई या तिसऱ्या प्रकारच्या संत होत्या. संत जनाबाईंसारख्या मध्ययुगीन काळातील अनेक स्त्रियांची लौकिक जीवनातील कुचंबणेतून पारमार्थिक दृष्ट्या भक्ती परंपरेने मुक्तता केली. तारा भवाळकर त्यांच्या 'स्त्री-मुक्तीचा आत्मस्वर' या पुस्तकात म्हणतात (pg १५) त्याप्रमाणे,

'स्त्रियांची सर्वांगीण कुचंबणा काही अंशी कमी करण्याचे काम भक्ती आंदोलनाने केले.' संत जनाबाई यांचा विचार आपल्याला या सर्व पार्श्वभूमीवर करावा लागतो.

**संत जनाबाई: परिचय**

संत जनाबाई यांच्या नावाचे फार सुंदर विश्लेषण संत साहित्याचे अभ्यासक सचिन परब यांनी त्यांच्या 'रिंगण - संत जनाबाई' या विशेषांकात केले आहे. ते म्हणतात, 'जन म्हणजे लोक, सर्वसामान्य माणसे, जण या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप म्हणजे सर्वसामान्य बाई, जनी म्हणजे ज्ञानी, जिला जण आहे ती जनी अर्थात जिला ज्ञान आहे, जण आहे अशी सर्वसामान्य बाई.'

संत जनाबाई अश्या प्रकारे सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व करतात. संत जनाबाई यांच्या जीवनचरित्राबद्दल फारशी ठोस माहिती उपलब्ध नाही. जनाबाईंनी त्यांच्या अभंगांतून त्यांना समकालीन असलेल्या अनेक संतांबद्दल लिहिले असले तरीही स्वतःच्या पूर्वायुष्याबद्दल, कुटुंबाबद्दल फारसे काही लिहिल्याचे दिसत नाही. शिर्डी गावाजवळच्या ताहराबाद येथील रहिवाशी असलेल्या महिपतीबुवा कांबळे यांनी लिहिलेल्या 'भक्ती विजय' या ग्रंथात जनाबाईंबद्दल उल्लेख येतो. तिच त्यांच्या पार्श्वभूमीबद्दल उपलब्ध असलेली माहिती आहे. त्या माहितीनुसार जनाबाई मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील गंगाखेड या गोदावरी नदी काठच्या गावच्या होत्या. तेथील दमा आणि करुंड या जोडप्याच्या पोटी जनाबाईंच्या जन्म झाला. जनाबाई सात वर्षांच्या असताना परतपाळासाठी (सांभाळासाठी - ज्याची विविध चमत्कारिक स्पष्टीकरणे दिली जातात) म्हणून पंढरपूरमधे दामाशेटी (हे संत नामदेव यांचे वडील) यांच्याकडे पोहोचत्या केल्या गेल्या. त्या नामदेवांच्या कुटुंबामध्ये लहानाच्या मोठ्या झाल्या. आश्रित म्हणून सुरु झालेले दामाशेटींच्या घरातील त्यांचे आयुष्य त्याच पद्धतीचे कायम राहिले. दीर्घ आयुष्य जगून संत नामदेवांबरोबर त्यांनी समाधी घेतली. संत नामदेवांच्या जीवन आणि कार्यात जनाबाईंची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. नामदेवांचे आणि त्यांच्या कार्याचे महत्त्व ओळखणाऱ्या मोजक्या काही समकालीन लोकांमध्ये संत जनाबाईंचा उल्लेख येतो. परंतु स्वतः जनाबाईंचे आयुष्य अतिशय कष्टदायक होते. विद्युत भागवत त्यांच्या लेखात संत जनाबाईंच्या परिचय करून देताना म्हणतात,

'Take Janabai, she was born in to a shudra (low caste) family and functioned as a dasi, that is, as a bonded domestic servant. While the tradition

insists that the household in which she worked brought her up benevolenty as one of its own, the fact remains that Janabai always identified herself as ‘Dasi Jani’. Her poetry is full of references to the hard chores which she had to perform, which deprived her of the space necessary for a dialogue with her own emancipatory God’.

जनाबाईंनी या सर्व प्रतिकूलतेतूनही अध्यात्मिक प्रवास यशस्वीपणे केला, विद्युत भागवत म्हणतात,

‘Janabai recovered her status as a free and autonomous human being. Her poems offer us a combination of a deeply felt sorrow, a product of the fact that she was born as woman and a confident assertion that she could in real life undermine the cultural confines which denied identity to her kind’.

अनंत अडचणींचा सामना करूनही जनाबाई आध्यात्मिक उत्कर्षाच्या पातळीवर पोहोचल्या. परंतु तरीही स्त्री आणि पुरुष संतांच्या या प्रवासातील फरक अडथळयांचा पुरावा संपत नाही. जनाबाईंनी ज्या कामांचा, समस्यांचा उघड उल्लेख आपल्या अभंगांतून केला त्यांचे मोल अनेकदा अभ्यासकांनाही समजले नसल्याचे खेदाने म्हणावे लागते. काही अभ्यासक जनाबाईंच्या रचना भाबड्या, भोळ्या भक्तिभावाने भरलेल्या समजतात. यातच आपण जनाबाईंना समजून घेण्यात कमी पडतो असे म्हणावे लागेल. त्यांच्या दाहक जीवनानुभूतींचे मोल पुरुष संतांच्या सैद्धांतिक, वैचारिक चर्चा आणि लेखणीच्या तुलनेत जर आपण कमी समजत असू तर आपण पुरुष संत आणि स्त्री संतांना ज्या भिन्न समस्यांची शर्यत करावी लागली तीच आपल्या आकलनाच्या बाहेर राहिली असे म्हणावे लागते.

**संत जनाबाईंचे अध्यात्मिक योगदान:**

स्त्रियांना अध्यात्माच्या वाटेवर प्रवास सुरु करण्याचा मार्ग अधिक सुकर करण्यात जनाबाईंचे योगदान मोठे आहे. जनाबाईंच्या समकालात अनेक संत वारकरी परिवारात सक्रिय असल्याचे आपल्याला दिसते. वारकरी संप्रदायाने आणि पर्यायाने एकूणच भक्ती चळवळीने जाती, धर्म, लिंगभावात्मक भेदभाव नाकारले आहेत आणि सर्वांना देशभक्तीचा सामान अधिकार आणि हक्क दिला आहे हे जरी खरे असले तरी 'All are quale but some are more equal’ या न्यायाने जातीआधारित भेदभाव ईश्वर दरबारी होत होताच हे जनाबाईंनी ठासून, बजावले होते. संत परंपरेत काही गोष्टींना फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो. ज्यांचा विचार करता संत जनाबाई आदर्श भक्त होत्या हे दिसून येते.

**समर्पण भाव:**

भक्त हा ईश्वरचरणी पूर्णपणे समर्पित असतो. ईश्वराकडे मोठेपण देऊन स्वतःकडे न्यूनत्व घेतलेले असते. संत जनाबाईंमध्ये असाच समर्पणभाव आपल्याला दिसतो. केवळ विठ्ठलच आता आपला त्राता आहे, तोच एकमेव तरणोपाय आहे ह्याची स्पष्ट जाणीव त्यांच्या अभंगांतून झाल्याचे आपल्याला दिसते. जनाबाई म्हणतात,

'माझा नाही लोभ । तुझी करिन मी सेवा ॥ १ ॥
नाही अंगी थोरपण । मिथ्या धरिसी गुमान ॥ २ ॥ '

**गुरुचे माहात्म्य:**

संत नामदेव हे संत जनाबाईंचे अध्यात्मातील गुरु होते. त्यांच्या मनात नामदेवांबद्दल असलेले प्रेम आणि भक्तिभाव हा त्यांच्या आध्यात्मिकदृष्ट्या झालेल्या प्रगतीमधील एक महत्त्वाचा भाग आहे. जनाबाई नामदेवांपेक्षा वयाने मोठ्या होत्या परंतु रिंगण-संत जनाबाई विशेषांकातील 'जनी म्हणे' या लेखात डॉ. सदानंद मोरे म्हणतात त्याप्रमाणे,

'नामदेव मोठे झाले तेव्हा त्यांचा अधिकार पहिल्यांदा जनाईने ओळखला.'

संत नामदेवांना जनाबाई 'सद्‌गुरुराया' असे संबोधतात. संत नामदेव यांच्या शिष्या या आध्यात्मिक अर्थाने त्या स्वतःला 'नामयाची दासी जनीं' म्हणवून घेतात. ‘बाई मी लिहिणे शिकले सद्‌गुरुरायापाशी’, संत नामदेवांनी त्यांना केवळ ईश्वरभक्तीचीच दीक्षा दिली नाही तर लिहायला, वाचायला शिकवले, जनाबाई लिहित्या झाल्या यालाही नामदेवांचे त्यांचा गुरु असणे हे कारण असावे. खालच्या जातीत जन्माला आलेल्या अनाथ जनाबाईंवर संत नामदेव यांच्या घरी आश्रिताचेच आयुष्य जगावे लागले त्यामुळे लौकिक अर्थानेही त्या संत नामदेव यांच्या दासीच होत्या.

**ईश्वरावर पूर्ण विश्वास:**

एक विठ्ठलच आता सर्व पतितांना आधार आहे, तोच त्यांचा उद्धारक आहे असा भक्त म्हून जनाबाईंना पूर्ण विश्वास आहे. त्या म्हणतात,

'धन्य ते पंढरी धन्य पंढरीनाथ । तेणे हो पतित
उद्धरिले ॥ १ ॥
धन्य नामदेव धन्य पंढरीनाथ । तयाने अनाथ
उद्धरिले ॥ २ ॥

भक्त म्हणून विठ्ठल या आपल्या दैवतावर जनाबाईंना पूर्ण विश्वास आहे.

**ईश्वरावरील प्रेम:**

जनाबाईंचे विठ्ठलप्रेम हे राधेच्या कृष्णावरील प्रेमासारखे समर्पणाचे तसेच हक्काचेही होते. जश्या त्या विठ्ठलाची मनधरणी करतात तसेच त्या त्याच्याकडून हक्काने आपली कामे करवून घेतात, त्याच्याकडून आपली सेवा खुशाल करून घेतात. जनाबाईंचे हे प्रेम 'सख्यभक्ती' या प्रकारचे आहे. विठ्ठल त्यांना केवळ त्यांच्या दैनंदिन कामात मदत करत नाही तर त्या न्हायला बसल्यावर त्यांना पाणी आणून देतो, त्यांच्या केसांना लोणी माखून, मालिशही करून

देतो. त्यांच्या अभंगांमध्ये येणारे हे सर्व प्रसंग काल्पनिक आहेत आणि भौतिक जगात अश्या प्रकारे सगुण - साकार ईश्वर खरोखर भक्तांसमोर येत नाही हे तार्किकदृष्ट्या गृहीत धरले तरी भक्त आणि ईश्वराचे नाते कोणत्या प्रकारचे असावे याची जी कल्पना आणि आध्यात्मिक चौकट जनाबाई सांगतात ती आध्यात्मिकदृष्ट्या भक्ताच्या समर्पणभावाला ईश्वराच्या समानतेच्या पातळीवर नेऊन ठेवते.

**सर्व चराचरात ईश्वराचे दर्शन:**

संत जनाबाई विश्वातील सर्व जीवांमध्ये ईश्वर पाहतात. सर्वत्र ईश्वराचा वास आहे असे त्या आपल्या अभंगांतून सांगतात. त्या म्हणतात,

दळू, कंडू, खेळू l सर्व पाप, ताप जाळू ll १ ll
सर्व जीवांमध्ये पाहू l एक आम्ही होऊनि राहू ll २ll
जणी म्हणे ब्रह्म होऊ l ऐसे सर्वांघटीं पाहू ll ३ll

संत जनाबाई ईश्वराला अगदी सहजपणे हाताला धरून त्याच्या स्वर्गीय, अलौकिक, परलोकीय जगातून आपल्या भौतिक, लौकिक, स्वकीय जगात आणतात. निर्गुण निराकार ईश्वराचा नकार न करताही सगुण - साकार ईश्वराची कल्पना तितक्याच ताकदीने मांडणे हे एकूणच भक्ती परंपरेचे विशेष आहे. जनाबाईंच्या लेखनामध्ये ते सुलभपणे दिसते. ईश्वर म्हणजे आपला आत्माच या संदर्भाने 'मीच ब्रह्मन' असे एकत्त्व, विठ्ठल म्हणजे पलीकडचे काहीतरी अगम्य असे तत्त्व नसून माझ्यासारखाच, किंबहुना माझ्याइतकाच महत्त्वाचा, अर्थात मी भक्त असूनही ईश्वरापेक्षा काही कमी नाही हि समतेची आणि समानतेची भूमिका त्या मांडतात. प्रसंगी ईश्वराला रागे भरण्याचा, बोल लावण्याचा आपला हक्क आणि अधिकारही राखून ठेवतात, आणि तरीही हा विठ्ठलच माझा उद्धार करणारा आहे. अशा प्रकारे संत जनाबाईंच्या अभंगांमध्ये ईश्वर आणि भक्त यांच्या नातेसंबंधांची एक वेगळीच ओळख होते.

**संत जनाबाईंचे सामाजिक योगदान:**

संत जनाबाईंच्या अध्यात्मिक अधिकार भक्तीच्या बाजूने पाहता नाकारता येत नाही आणि त्यांच्या देवभोळ्या कल्पनांमधून तो प्रभावीपणे व्यक्त होतो हे जरी मान्य केले आणि त्यांची ईश्वराविषयीची भावना कल्पनारम्यतेने भरलेली होती हे जरी नाकारले नाही तरीही त्यांच्या लेखनातून सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यातील आणि विशेषत्त्वाने दलित स्त्रीच्या जीवनातील अडचणी, समस्या, विवंचना नोंदवून ठेवल्या आहेत हे नाकारता येत नाहीच. रिंगणच्या जनाबाईवरील विशेषांकात प्रकाशीत झालेल्या 'धगधगती ठिणगी' या लेखात प्रतिमा जोशी म्हणतात,

'जनाबाई यांनी लिहिलेला शब्द हा निव्वळ भक्तीचा आविष्कार नव्हे, तर तो तेव्हाच्या भाषेनुसार 'यातिहीन' किंवा 'वर्णहीन' असलेल्या 'नीच' जातींचा आक्रोशही आहे, हे सत्य प्रथम आपण स्वीकारायला हवं. अनाथ, पोरकी जनी नामदेवांच्या घरी आश्रित होती. तिला संतपद सहजी किंवा बहुमानानं मिळालेलं नाही. जातिव्यवस्थेच्या उतरंडीत खाली असलेल्या जातींच्या लोकांना जे जे भोग भोगावे लागतात, ते जनाबाईंनीही भोगले आणि त्याबाबत मनात उठलेलं काहूरही अस्वस्थ होत मांडलं आहे. नामदेवांच्या घरातल्या स्त्रियांसंदर्भात त्या म्हणतात,

'राजाई गोणाई| अखंडित तुझे पायी|
मज ठेवियले द्वारी| नीच म्हणोनि बाहेरी|
अखंडित तुझे पायी',

या छोट्याशा वाक्यातूनही जनाबाई त्या घरासाठी करत असलेल्या अविरत काबाडकष्टांचं दर्शन होतं.'

संत जनाबाईंच्या अभंगांतून, लेखनातून दिसून येणारी भक्ती, ईश्वरप्रेम आणि त्यातील साधेपणा, देवभोळेपणा काही काळासाठी बाजूला सारला आणि त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराचा, ईश्वरभक्तीचा बोजवारा क्षणभर बाजूला ठेवला तर त्यांच्या लेखनातून आपल्याला त्यांचे सामाजिक भान दिसून येते. अर्थात भारतीय आस्तिक परंपरा बहुतेक तिच्या बाजूने व विरोधाच्या दिशेने जाणाऱ्या सर्वच प्रयत्नांना बोथट करण्याचा प्रयत्न करत राहिली आहे. हे भक्ती चळवळीच्या बाबतीत अधिक प्रकर्षाने जाणवते, कारण भक्ती परंपरा जरी पिचलेल्या सामान्य माणसांना मोकळा श्वास द्यायचा प्रयत्न असला तरीही ती सामाजिक व्यवस्थेची चौकट मोडून टाकणारी चळवळ नाही त्यामुळे या चळवळीला आपला रंग चढवण्याचा प्रयत्न बऱ्यापैकी यशस्वी झाल्याचे दिसते. Andrew Schelling आपल्या The Oxford Anthology of Bhakti Literature या पुस्तकात म्हणतात (pg XX), 'The accounts of the lives of Bhakti poets carry layers of added on story, later accretions that take low caste or outcaste poets and 'Brahminize' them, provide them with fabulous births or a Guru who is properly orthodox and otherwise distort their heritage'.

हे आपल्याला संत जनाबाईंना समकालीन असलेल्या अनेक संतांबद्दल म्हणता येतेच. परंतु जनाबाईंच्या संदर्भात याचा काच जरा हलका झाला असे आपल्याला म्हणता येईल कारण त्यांचे गुरु संत नामदेव हेही त्या अर्थाने सामाजिक उतरंडीत फार वरच्या स्तरावर नाहीत त्यामुळे त्यांना जनाबाईंच्या दुःखाची, वेदनेची किमान कल्पना होती असे गृहीत धरायला जागा उरते. ज्या गोष्टी सामाजिक जाणिवेच्या पातळीवर प्रामुख्याने संत जनाबाईंच्या लेखनातून दिसून येतात त्यांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

**जातभान:**

आपण सामाजिक व्यवस्थेच्या उतरंडीमध्ये अगदी खालच्या थरावर आहोत. आपला आध्यात्मिक अधिकार मोठा असला तरी त्याचा फारसा फरक सामाजिक

जीवनामध्ये फारसा पडत नाही ह्याची खंत त्यांच्या अभंगांतून अनेक ठिकाणी दिसून येते.

**लिंगभान:**

स्त्रीजीवनात येणाऱ्या अनंत अडचणींची जाणीव जनाबाईंना आहे. पितृसत्ताक समाजव्यवस्थेने स्त्रियांवर लादलेल्या अनेक बंधनाचा इन्कार त्यांच्या लेखनातून दिसून येतो. लिंग आणि जात व्यवस्थेचे विश्लेषण जनाबाईंच्या लेखनात दिसते. मुख्य धारेमध्ये स्वीकार्ह्य आणि समाजमान्य असलेले वर्तन करण्याचे त्या नाकारतात त्यामुळेच काही वेळा त्यांचे लेखन विद्रोही होते. अर्थात यावर याआधीही संशोधकांनी मांडणी केलेली आहे.

**श्रमप्रतिष्ठा:**

संत जनाबाईंनी स्त्रियांना कराव्या लागणाऱ्या दैनंदिन जीवनातील जवळजवळ सगळया कामांचा आढावा आपल्या अभंगांतून घेतलेला आहे. ग्रामीण भागातील मध्ययुगीन काळातील स्त्रीजीवनाचा अंदाज त्यांच्या अभंगांतून येतो. वैचारिक, बैठे, अमूर्त काम हे उच्च दर्जाचे काम आणि शेणा - मातीशी, घामाशी नटे असलेले शरीर श्रमाचे काम दुय्यम दर्जाचे ही पारंपरिक आणि त्रासदायक जाणीव मानवी जाणीवे - नेणिवेत कायमच असल्याचे दिसते. त्यामुळे शारीरिक श्रमाला कमी दर्जाचे स्थान, त्या कामाचा मोबदला बौद्धिक कामाच्या तुलनेत खूपच कमी असल्याचे दिसते. या आर्थिक, सामाजिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर जनाबाई जेंव्हा दैनंदिन जीवनातील अगदी खालचा दर्जा असणाऱ्या शेण काढणे, गोवऱ्या लावणे, भांडी घासणे, धुणी धुणे, घर सारवणे, घरात लागणारे पाणी शेंदने, वाहून आणणे, जळणासाठी लागणारा लाकूडफाटा गोळा करणे. अश्या केवळ दुय्यम दर्जा असणाऱ्यांचा नव्हे तर ज्यांचा कसलाही आर्थिक व अन्य मोबदला स्त्रियांना मिळत नाही ती कामे वाटतात तितकी हलकी नसून प्रत्यक्ष विठ्ठलही ही सगळी कामे करतो. जर ईश्वर स्वतः ही कामे करत असेल तर ती कमी किंवा दुय्यम दर्जाची कशी असतील असा प्रश्नच जणू जनाबाई त्यांच्या अभंगांतून विचारतात.

**तकलादू नैतिकता आणि स्त्री-चारित्र्य:**

संत जनाबाई यांनी अन्य मध्ययुगीन स्त्री-संतांप्रमाणे पुरुषसत्ताकी समाजव्यवस्थेने स्त्री चारित्र्याची तिच्या लैंगिकतेशी आणि तिच्या लैंगिक जीवनाशी केलेली जोडणी नाकारली आहे. लाजलज्जा सोडून परपुरुषाशी मी संग - एक प्रकारचा लैंगिक संबंध केला अशी खुली घोषणा त्या करतात. हा एक प्रकारे अध्यात्मिक आणि सामाजिक विद्रोहाचा आविष्कार आहे. केवळ स्त्री संतच नव्हे तर पुरुष संतही मधुरा भक्तीमध्ये स्वतःकडे स्त्रीची भूमिका घेऊन हि कल्पना मांडतात परंतु स्त्रीसंत स्वतःच्या शारीरिक, लैंगिक गरजांचा स्पष्ट उल्लेख अध्यात्माच्या आधारे करतात हे आधुनिक काळामध्ये वेगळया तेजाने लखलखते. हे संत जनाबाई बरोबरच सर्वच स्त्रीसंतांचे समाजी योगदान होते असे म्हणावे लागेल.

**सारांश:**

संत जनाबाई किंवा समकालीन कोणतेही संत आधुनिक अर्थाने सामाजिक बदलाचे प्रेरक व वाहक नाहीत त्यामुळे त्यांनी सामाजिक बदलासाठी प्रत्यक्ष प्रयत्न केले असे आपल्याला म्हणता येत नाही परंतु संतांच्या कार्यातून सामाजिक परिस्थितीवर प्रकाश पडतो आणि त्यात जे बदल व्हायला हवे त्यावर त्यांनी केलेला विचार , चिंतन आणि त्यांच्या स्थळकाळाचे मर्यादेत त्यांनी केलेला विचारही आपल्याला दिसतो. ‘Recasting women’ या Kumkum Sangari यांच्या पुस्तकात म्हणतात त्याप्रमाणे,

‘The independent lifestyle of the Vaishnavite women and the expression of unashamed sensuality and eroticism in their songs on Krishna and Radha now appeared as a set of alternative mores which posed a challenge to the nineteenth century Bengali bhadalok’.

जी समस्या प्रस्थापित पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेला १९ व्या शतकातही आली ती मध्ययुगीन काळातील समाजालाही नक्कीच आली होती म्हणूनच बहुतेक संतांच्या आयुष्यात समाजाने त्यांची छळवणूक केल्याचे प्रसंग आपल्याला आढळतात. स्त्री संतांच्या आयुष्यात हे जास्त प्रखरतेने आणि प्रकर्षाने दिसते. संत जनाबाईंचे आयुष्य याला अपवाद नाही. त्यावर वेळोवेळी आक्षेप घेतला आहे आणि ताशेरेही त्यांनी आपल्या लेखनातून ओढले आहेत परंतु विशाल परंपरेच्या पोटात सगळेच गडप होते आणि त्या व्यवस्थेचे रंग-पाणी त्यावर चढवले जाते यालाही जनाबाई अपवाद ठरल्या नाहीत. त्यामुळे खरेतर त्यांच्यावर देवभोळेपणाचा आरोप होतो असेच म्हणावे लागेल. या आरोपाचे निराकरण त्यांच्या स्वतःच्या अभंगांच्या माध्यमातूनच करता येते. साधेपणाचा, भावडेपणाचा, देवभोळेपणाचा वरपांगी असलेला पडदा बाजूला सारून संत जनाबाईंच्या अभंगांचे नव्याने वाचन होण्याची गरज अभ्यासाच्या निमित्त्याने अधिक स्पष्ट आणि अधोरेखित होते.

**संदर्भसूची:**


1. भवाळकर तारा, 'स्त्री मुक्तीचा आत्मस्वर: मराठी संत कवयित्रींची मुक्तिसंकल्पना आणि स्त्री-मुक्ती', लोकवाङ्मयगृह, मुंबई २०१२
2. परब सचिन (संपादक), 'रिंगण: संत जनाबाई', रिंगण वेबसाईटवर प्रकाशित, २०१५. https://www.ringan.in/category/magazine/sant-janabai-2015/
3. सोनोपंत शं. वा. (संपादित), 'भारतातील थोर स्त्रिया', pg ३३२ – ३३४
4. Bhagwat Vidyut, ‘Marathi Literature as a source for Contemporary Feminism’, Economic Political Weekly (EPW), Vol. 30, issue 17, April 1995 pg 24-29

5. Burchett Patton, ‘Bhakti Rhetoric in the Hagiography of ‘Untouchable’ Saints: Discerning Bhakti’s Ambivalence on Caste and Brahminhood’, International Journal of Hindu Studies, Vol. 13, issue 2, August 2009
6. Kanaklata Mukund, ‘Book review: walked Naked: Women, Society, Spirituality in South India’, Economic Political Weekly (EPW), Vol. 35 – issue 7, pg 536-537
7. Mohanty Chandra & Mohanty Satya, ‘Book Review: Recasting women: Essays in Colonial History’, Economic Political Weekly (EPW), Vol. 7, pg 19-21
8. Omvedt Gail, ‘Cultural Revolt in a Colonial Society’,
9. Ramanujan A. K., ‘Talking to God in the Mother Tongue’, India International Centre Quarterly, WINTER 1992, Vol. 19, issue 4, 1992, pg 53-64
10. Ramaswamy Vijaya, ‘Women and Work in Precolonial India: A Reader’, Sage Publication, New Delhi, 2016
11. Ramaswamy Vijaya, ‘Rebels – Conformists? Women Saints in Medieval South India’, Anthorpos, NOMOS
12. Sangari Kumkum & Vaid Sudesh (ed.), ‘Recasting Women: Essays in Colonial History’, Kali for Women, 1989
13. Schelling Andrew (ed.), ‘The Oxford Anthology of Bhakti Literature’, Oxford University Press, 2011
14. Tripathi J. N., ' The Classical poets of Gujarat their influence on society and morals’, N. M. & co. Books sellers, Bombay (Mumbai), 1894

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# 21वीं सदी की लेखिकाओं के उपन्यासों में संत्रास, अकेलापन और आत्मपीड़न

**ऐश्वर्या राजन वाघमारे**
शोध-निर्देशक डॉ गंगाधर धुळप्पा बिराजदार
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
**Corresponding Author: ऐश्वर्या राजन वाघमारे**
**DOI- 10.5281/zenodo.14547048**

**सारांश:**

**शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम्।**
**न शोचन्ति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा' ।।**

अर्थात जिस स्थान पर नारी का अपमान होता है। वहां विनाश होना निश्चित है और जहां उसका सम्मान होता है वहां सदा उन्नति होती है। यथार्थ यही है कि समाज को एक पद पर ले जानेवाली नारी है। नारी की स्थितिगति को, उसके मनोभावों को, सामाजिक रीति-रिवाजों को, पारिवारिक बंधनों में खुद को बांधकर रखनेवाली नारी का परिचय 21वीं सदी की लेखिकाएं - कृष्णा सोबती, मैत्रीय पुष्पा, मृदुला गर्ग, चित्रा मुद्गल, उषा प्रियंवदा इन सभी लेखिकाओं ने अपने उपन्यासों में सूरजमुखी अंधेरे के, इदन्नमम, चित्तकोबरा, एक जमीन अपनी, शेषयात्रा में बखूबी से चित्रण किया है। उक्त उपन्यासों में नारी की संत्रास, अकेलेपन और आत्मपीड़न को इन महिला लेखिकाओं ने बड़ी सजगता से चित्रण किया है। राजी सेठ के कलम से- "वे हास्य, व्यंग, कटाक्ष, ह्यूमर, विट, आयरनी सब कुछ परखती आवश्य है लेकिन सीमा और सीमांत जानकर अन्य के प्रति शब्द हिंसा से बचकर"

यही नारी की विशेषता है जो हर रूप में दिखाई देता है। कभी वह संत्रास में जीती है तो कभी वह अकेलेपन में गहराती है और कभी वह आत्मपीड़न में छटपटाती है। फिर भी उसकी भावनाओं को वह छुपाती है। उक्त उपन्यासों में मुख्य केंद्र पात्र नारी है। उसी के केंद्र के चारों ओर पुरुष दिखाई देता हैं फिर उनके संबंधों की धारा प्रवाहित होती है। रोमांचित अनुराग की लय में नारी की मनोवृत्ति उद्वेलित होती है। हम नारी की विलक्षणता को निम्न बिंदुओं के आधार पर गहराई से विश्लेषित करेंगे

**संत्रास:**

संत्रास मतलब तीव्र वेदना, डर, भय, आतंक मन में भय की एक लहर व्याप जाना ही संत्रास है। संत्रास से छटपटाती नारी का परिचय चित्तकोबारा उपन्यास की मुख्य नारी पात्र मनु द्वारा व्यक्त होता है। मनु संत्रास की वेदना से पीड़ित है। मनु और महेश पति पत्नी है लेकिन नाम के लिए और समाज के लिए ही रिश्तों के बंधन में बंधे है। शादी के सभी कर्तव्यों का निर्वाह मनु ही निभाती है। आठ साल की शादीशुदा जिंदगी केवल मनु की वजह से ही विद्यमान है। मनु के संत्रास का वर्णन मृदुला गर्ग ने चित्तकोबरा में बेबाकी से किया है।

"कोई नहीं जानता था, शाम के झुटपुटे में जब महेश घर लौटता है, मैं सांस रोककर उसका मुख निहारा करती हूं और वही प्रश्न, जो मैंने कभी पूछा नहीं, मुझे झिंझोड़ता रहता है। क्या महेश मुझे प्यार करता है? वैसे जैसे मैं करती हूं.... अच्छा, न सही वैसे, जैसे मैं करती हूं, करता तो है? क्या बिलकुल करता ही नहीं?"

पति के अलगाव के कारण मनु की त्रासदी का परिचय होता है। इदन्नमम उपन्यास में बीमार मंदा को देखने के बहाने से गांव का कैलास मास्टर मंदा पर बलात्कार करता है।

""हमारा जी घबरा रहा है भाभी! लगता है किसी ने गड़ासे से काट दी है देह। कटे टुकड़े टीस रहे हैं! आह! दरद ही दरद..... खून ही खून!"

"रोते हुए कापते स्वर में बोली, हमारी अम्मा के पास पहोंचवा दो हमें...."

"नहीं हमें अकेली छोड़कर कहीं मत जाना भाभी!"

बलात्कार को पुरुष स्वभाव की एक अंतर्निहित प्रवृत्ति माना जाता है। इसी प्रवृत्ति का ज्वलंत चित्रण मंदा के चरित्र द्वारा मैत्रीय पुष्पा ने चित्रित किया है। चित्रा मुदगल जी का उपन्यास एक जमीन अपनी में पति-पत्नी के आपसी संबंधों में मान सम्मान, प्यार, विश्वास का न होना एक रिश्ते की कमजोरी को दिखाता है। जब कोई रिश्ते में भावनाओं की, हितों की, अवहेलना करता है तो वह जाने अंजाने में रिश्ते को नुकसान पहुंचाता है। ऐसे ही कथा का उल्लेख एक जमीन

अपनी उपन्यास में मिलता है। नारी अपनी अस्तित्व को पाना चाहती है। एक पहचान बनाना चाहती है। उसके अपने सपने होते हैं। परंतु जीवन का जीवनसाथी ही उसके इस सपने को समझ नहीं पाता है। उसे साथ देने के बजाय पीछे खींचता है तो उसी समय नारी की सबसे बड़ी हार होती है। अपनी पत्नी को प्यार, सम्मान न देकर उलटा उसे मारना पीटना ही उसका अपना पुरुषार्थ समझता है।

"यही तो तेरा असली रूप है.... इतिहास पढ़ना चाहती है.....प्रोफेसर बनना चाहती है, तू कभी नहीं बन सकेगी.... कभी नहीं..."

2) अकेलापन: अकेलापन एक भावनात्मक समस्या है जो दूसरों के साथ सार्थक संबंध न बन पाना इससे अकेलापन उत्पन्न होता है। महिला लेखिकाओं के उपन्यासों में मुख्य समस्या नारी का अकेलापन है। अकेलेपन का बोध जो जीवन में प्रेम के अभाव का परिणाम है।

सूरजमुखी अंधेरे के उपन्यास में कृष्णा सोबती जी ने रत्ती द्वारा अकेलेपन के चरित्र का चित्रण बहुत ही गहराई से चित्रित किया है। रत्ती पर बचपन में बलात्कार होता है। इस दुख की बोझ को वह बचपन से जवानी तक अपने कन्धों पर ले आती है। बलात्कार से रत्ती को शारीरिक और भावनात्मक आघात सहना पड़ता है और दुर्भाग्य से उसे वह अपराधबोध समझती है। खुद ही खुद को दोषी ठहराती है। और खुद ही खुद के विचारों में दूर चली जाती है और द्वंद में जीती है।

"हर बार कहीं पहुंच सकने की न मरनेवाली चाह और हर बार वीरान वापसी अपनी और हर बार।"

प्रेम संबंध में विरह की वेदना को इदन्नमम उपन्यास में मैत्रीय पुष्पा जी ने मंदा के द्वारा चित्रित किया है। मन्दा का अकेलेपन के साथ साथ उसके निस्वार्थ प्रेम का दर्शन भी इस उपन्यास में होता है।

“क्या मालूम था कि राधा की तरह एक दिन अकेली.... या सीता की तरह हो जाएगा वनवास.... या मीरा की तरह विरह का विष......"

जहां निस्वार्थ प्रेम की विरह वेदना को दिखाया है वही पति पत्नी के आपसी संबंध में समझौते को मृदुला गर्ग ने दृष्टिगत किया है।

मैं हमेशा जानती रही हूं..... जब उससे विवाह किया था, तब भी जानती थी.... महेश के लिए वह एक तयशुदा, सुनिश्चित विवाह से अधिक कुछ नहीं है। प्यार सिर्फ मेरी तरफ है सिर्फ मेरी।"

एक और पति पत्नी के रिश्ते का परिचय और पति पत्नी के आपसी संबंध के त्रासदी से अकेलपन में पनपती नारी का परिचय हमें उषा प्रियवंदा जी का उपन्यास शेषयात्रा में दिखाई देता है।

"अब आप बहुत देर देर तक बाहर रहने लगे हैं। मुझे अच्छा नहीं लगता।" प्रणव ने बिना झुंझलाएं कहा, "तुम्हें इससे समझौता करना पड़ेगा अनु!

3) आत्मपीडन: आत्मपीड़न मतलब अपने आपको शारीरिक या मानसीक यातना देकर काम तुष्टि का अनुभव करना है। यह स्त्री स्वभाव की विशेषता है। इन महिला लेखिकाओं ने आत्मपीडन का चित्रण बड़ी बेबाकी से दृष्टिगत किया है। सूरजमुखी अंधेरे के उपन्यास में कृष्णा सोबती जी ने रत्ती के माध्यम से उस पर हुए बलात्कार से वह खुद को ही पीड़ा देती हुए दिखाई देती है। उसकी लड़ाई किसी और से नहीं बल्कि खुद की खुद के साथ है।

" लेकिन यह पथरीली अहिल्या आड़ी खड़ी चट्टान की तरह, हर बार की टकराह से ना पिघलती है, ना टूटती है, न छोटी होती है, न बड़ी।"

चित्तकोबरा उपन्यास में मुख्य नारी पात्र मनु विवाहेत्तर संबंध को पाप नही समझती है बल्की स्वमन से स्वीकृत किया गया दो आत्माओं का मिलन मानती है। मनु रिचर्ड के प्रेम में आत्मपीडन की यातना को सहती है।

" मेरे सामने घना जंगल है.... गुत्थम गुत्था बेलों का अनंत झंखाड़....पेड़ों पर घटाटोप लदी लहरियां लतरें.... झाड़ियां और कांटे.... बेपनाह भीड़....आदमी सने रेगिस्तान में खोता है और भरे पूरे जंगल में भी.... किनकी भीड़ है यह..... इंसानों की या पौधों की... स्थितप्रज्ञ पेड़, दूसरों पर लदी लहलाती लताएं, कांटे काढ़े झाड़ियां, पैरों तले की घास से जो रोंदे जाने पर भी नहीं मरती... झुक झुककर मुड़ तुड़कर जीती चली जाती है... तो झुकू मैं भी, घास को सहलाऊं और... उसी के बीच अपने को खो दूं? इस भयंकर अकेलेपन से छुटकारा मिल जाएगा तब? यह कैसा अकेलापन है जो भीड़ के बीच से जबरन मुझे खींचकर अपनी गिरफ्त में ले लेता है और.... छोड़ता ही नहीं... मैं रास्ता ढूंढ रही हूं... कीच सनी लंबी घास में, बार-बार घुटनों तक पांव धंस जाते हैं... टहनियां तोड़ने को हाथ आगे बढ़ते हैं और पत्ते नोचकर लहूलुहान लौट आते हैं... हर पत्ते के नीचे कांटे हैं... हथेलियां बिंधकर छलनी हो गई है.... बूंद बूंद खून टपक रहा है.... हर रोमछिद्र से पसीना... लथपथ लाचार, मैं किसी कांटेदार झाड़ी पर बिछ जाऊंगी और आंखें मूंद लूंगी.....

शेषयात्रा उपन्यास में पति पत्नी के आपसी संबंध टूटने पर भी, अनु पति से बिछड़कर भी अपने पति प्रणव के लिए तड़पती हुई दिखाई देती है।

""जानना चाहते हैं कि उसके भीतर क्या हो रहा है। अनु कैसे बताएं कि वह अंदर-अंदर गल रही है, तिल तिल मर रही है, एक असाध्य बीमारी के रोगों की तरह।"

चित्रा मुद्गल जी का उपन्यास एक जमीन अपनी में अंकिता पति सुधांशु से अलग होकर भी उसके लिए तड़पती हुई दिखाई है।

""क्यों जुड़ जाती है? क्यों जीने लगती है किसी के साथ को? क्यों उसे अपना मानने समझने लगती है? वही.... वही साहसा टीसों के खंदक को कुरेद देता है, जिसे ढकते तोपते उसे बरसों लग गए और जब वह उस खंदक को तोप पाई तो लगा था कि अब वह जी भी सकती है.... जिना भी चाहती है... यह जो अपने आपको उसने पुनर्जन्म दिया है, अपने गर्भ में अपने जन्म की प्रसव पीड़ा झेली है, वह सिर्फ अंकिता है_ अंकिता छाबड़ा नहीं।

समस्त महिला लेखिकाओं ने नारी की समस्यायों को बड़ी सजगता से व्यक्त किया है। 21वीं सदी की लेखिकाओं ने स्त्री विमर्श के अंतर्गत नारी जीवन के छुए अनछुए अनेक पहलू पूरी ईमानदारी से चित्रित किए हैं।

निष्कर्ष के तौर पर हम कह सकते है कि, केंद्रित नारी के संत्रास, अकेलापन और आत्मपीडन को 21वीं सदी की लेखिकाओं ने मनौवैज्ञानिक मनोवृत्ति को सुलझाने का प्रयास किया है। प्रस्तुत उपन्यासों में सभी नारीयां समस्यायों से घिरी है। पति पत्नी के आपसी संबंध के टूटते बिखरते रिश्ते में सुख का एक अंश ढूंढने की कोशिश कर रही है। नारी के कई रूपों के साथ साथ एक और रूप का दर्शन होता है कि वह विवाहेत्तर संबंध को भगवान का वरदान कहते हुए भी नजर आती है। हमारे समाज की सबसे बड़ी समस्या बलात्कार की समस्या को नारी सदियों से पीढ़ी दर पीढ़ी भुगत रही है। इस भयावह दर्द से नारी वर्तमान समय में भी गुजर रही है। महिला लेखिकाओं ने अपने उपन्यासों के माध्यम से इस समस्या को दृष्टिगत करके समाज में नारी पर हो रहे अत्याचार को बखूबी से चित्रित किया है। नारी के जीव मे पनप रहे संत्रास हो, अकेलापन हो या आत्मपीडन हो उसका जिम्मेदार एक पुरुष ही होता है, फिर भी नारी हारती नहीं है बल्कि उनका सामना कर संघर्षमय जीवन को जीत लेती है। सारांश के तौर पर हम कह सकते है कि, 21वीं सदी की लेखिकाओं ने नारी को अपना रास्ता स्वयं खोजने एवं नारी संघर्ष में भावनाओं और मन की संवेदनाओं का अंकन एवं उथल पुथल को बड़ी कुशलता से उजागर किया है।

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. कृष्णा सोबती- सूरजमुखी अंधेरे के
2. मैत्रीय पुष्पा - इदन्नमम
3. मृदुला गर्ग - चित्तकोबरा, कठगुलाब
4. चित्रा मुद्गल - एक जमीन अपनी
5. उषा प्रियवंदा - शेषयात्रा
6. भारतीय समाज के आइने में बदलती नारी की छवि
7. समकालीन महिला लेखन


**ऐश्वर्या राजन वाघमारे**

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.5 No.43** **Nov-Dec 2024**

# संत एकनाथांचे नीतिविषयक विचार

**प्रा. डॉ. धनराज सुभाष हाडुळे**
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञानमहाविद्यालय,
अकोले, ता. अकोल, जि. अहमदनगर
**Corresponding Author: प्रा. डॉ. धनराज सुभाष हाडुळे**
**DOI- 10.5281/zenodo.14547075**

**सारांश:**

भारताच्या पुण्यभूमीत प्राचीन काळापासून अनेक संत झाले आहेत व पुढेही होत राहतील. सर्वच संतांनी सामान्य जनांना भक्तिमार्गाचा उपदेश केल्याचे दिसते. तथापि, महाराष्ट्रीयन संतांच्या विचारांचे स्वरूप काहीसे आगळे–वेगळे आहे. त्यांच्यातही संत एकनाथांचे व्यक्तिमत्त्व आणि विचार काहीशा वेगळेपणाने उठून दिसतात. संत एकनाथ हे श्रेष्ठ संत, थोर तत्त्वज्ञ अत्युच्च कोटीचे कीर्तनकार, सर्वोत्तम प्रवचनकार, आदर्श शिष्य मायमराठीचे सुपुत्र, संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक, आदर्श गृहस्थाश्रमी, प्रपंच–परमार्थ समन्वयक, श्रेष्ठ समाजसुधारक, पददलितांचे उध्दारक इत्यादी व्यक्तिगत गुणांच्या पैलूंचे ‘‘शांतीसागर‘‘ होते.

समाजातील निरनिराळे थर लक्षात घेऊन नाथांनी प्रचंड स्वरूपात वाङमय लिहिले. नाथांनी आपल्या वाङ.मयातून समाजाला उपयोगी पडेल असे सामाजिक तत्त्वज्ञान सांगितले आहे. नाथांच्या समोर आदर्श समाजाचे चित्र उभे असल्याने आदर्श समाजनिर्मितीसाठी त्यांनी नैतिक तत्त्वज्ञानाचे धडे दिले. सर्व समाज एका भागवतधर्माच्या सूत्रात ओवून भक्ती व नीतीच्या साह्याने समाजसंघटन केले. ‘भागवतधर्म‘ हा नीतिप्रधान असल्याने सर्व मानवजातीचे कल्याण हेच त्याचे एकमेव ध्येय होते. नाथांनी स्वत: ‘भागवतधर्माची‘ तत्त्वे आचरणात आणली. स्वत: नीतिप्रधान जीवन जगले आणि सर्वांना भगवदभक्तीचा आदर्श घालून दिला. त्यामुळे समाजाने नाथांची पाऊले वंदिली.

भारतीय तत्त्वज्ञानातील नीतितत्त्वाला अनुसरून नाथ जीवन जगले. नीतिशास्त्रातील प्रत्येक नियमांचे त्यांनी काटेकोर पालन केले. त्यामुळे नाथांचे संपूर्ण चरित्र नीतिमान बनले. भारतीय तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने नीती म्हणजे चांगले आचरण अथवा सदाचरण. साहजिकच चांगले आचरण कोणते? आणि ते कशामुळे चांगले ठरते, हे नीतिशास्त्र सांगते. त्यातून आचरण कशाने वाईट ठरते, हेही निष्पन्न होते. थोडक्यात नीति म्हणजे सुयोग्य आचरण अथवा कृती यावरून नीतिशास्त्राची व्याख्या अशी करता येते, ‘‘मानवी आचरणाचा चांगलेपणा अथवा वाईटपणा याचा अर्थ सांगणारे, तसेच कृतीची युक्तता अथवा अयुक्तता यांचे मानदंड ठरविणारे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र होय.‘‘कोणत्याही समाजात नीतीविषयक संकल्पना असतातच किंबहुना तशा त्या असतात म्हणूनच आदर्शात्मक नीतिशास्त्र निर्माण होय शकते. आदर्शात्मक नीतिशास्त्रात मानवी जीवनाचा आदर्श कोणता असावा यांचा अभ्यास केलेला दिसून येतो.

**प्रस्तावना:**

मानवी जीवनाचे अंतिम ध्येय कोणते? किंवा मानवी जीवनाचा आदर्श कोणता? यासाठी पुरुषार्थ विचार महत्त्वाचा आहे. भारतीय संस्कृती ही प्राचीन असून आध्यात्म (नीति) हा तिचा आत्मा आहे. खरी धार्मिकता म्हणजे आध्यात्मिकता. मानव जीवनविषयक भारतीय चिंतनाची तात्त्विक बैठक आहे, पुरुषार्थ विचार. मानवी मनाचा व जीवनाचा सखोल व सर्वांगीण विचार करून ऋषीमुनींनी चतुर्विध पुरुषार्थासंबंधी विचार करून आपले सिध्दांत मांडले आहेत. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत.

या चार पुरुषार्थांपैकी पहिला पुरुषार्थ ‘धर्म‘. पण भारतीय संस्कृतीमध्ये ‘धर्म‘ हा महत्त्वाचा पुरुषार्थ मानला आहे. सदविचार, सदभावना, सदाचार व सदगुण हे त्याचे मूलभूत घटक आहेत. त्यात अध:श्रध्देला स्थान नाही, तर विवेकावर आधारित जीवननिष्ठा महत्त्वाची आहे. ‘‘धर्मात अर्थश्च कामश्च‘‘ असे महाभारतकार म्हणतात. येथे धर्माचा पूर्णपणे नैतिक आशय अभिप्रेत आहे. नैतिक मूल्ये, तत्त्वे सदगुण हा समाजधारक व उन्तिधारक धर्माचा आशय आहे.

मानवी मूल्यांमध्ये ‘धर्म‘ पुरुषार्थाच्या खालोखाल ‘अर्थ‘ या पुरुषार्थाचा क्रमांक लागतो. ‘अर्थ‘ म्हणजे सदाचाराने वित्त किंवा जीवनावश्यक वस्तूची प्राप्ती करून घेणे व ती इतर पुरुषार्थ साध्य करण्यास उपयोगी आणणे. अर्थास प्रचलित स्वरूपाच्या दृष्टीकोणातूनही पाहिले जाते. पैशासही अर्थ म्हणतात. यांच्यापासूनच अर्थशास्त्र निर्माण झाले. तसेच धार्मिक, सामाजिक, कायदेविषयक, नैतिक कर्तव्ये बजावण्यासाठी लागणाऱ्या साधनांचाही ‘अर्थात‘ समावेश होतो. तसाच उपजीविकेसाठी लागणाऱ्या साधनांचाही ‘अर्थात‘ समावेश होतो.

तिसरा ‘काम‘ पुरुषार्थ होय. ‘काम‘ पुरुषार्थ म्हणजे मानवाच्या ठिकाणी ज्या नैसर्गिक इच्छा, आकांक्षा, वासना असतात त्या पूर्ण करणे होय. परंतु ‘काम‘ म्हणजे फक्त इच्छा किंवा वासना नव्हे, हा संकुचित अर्थ झाला. तर मानवाच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व प्रकारच्या इच्छा, आकांक्षा, वासना म्हणजे काम होय.

मानवी जीवनाचे अंतिम ध्येय ‘मोक्ष‘ पुरुषार्थ होय. मानवाने धर्म–अर्थ–काम पुरुषार्थाच्या साह्याने शेवटी मोक्ष मिळवायचा असतो. ‘मोक्ष‘ म्हणजे अंतिम साध्य, परमप्राप्तव्य मूल्य होय. निर्वासन अंत:करण म्हणजे मोक्ष, सर्व ऐहिक सुखाचा त्याग करणे म्हणजे मोक्ष. त्याचप्रमाणे उच्चतम शांती, आनंदमय स्थिती अशा निरनिराळ्या मोक्षाच्या व्याख्या अनेक जणांनी केल्या आहेत.

वरील चारही पुरुषार्थ किंवा मानवी मूल्यें प्राप्त करणे हे मानवी जीवनाचे ध्येय असते. त्याचप्रमाणे वरील चारही पुरुषार्थ भारतीय नीतिमीमांसेचे एक सूत्र आहे. त्यामुळे प्रत्येकाने ही चारही मूल्यें प्राप्त करणे उचित असते. ही चारही मूल्यें जो प्राप्त करतो तो उच्चतम पदाला पोहचतो.

एकनाथांनी आपल्या जीवनात वरील सर्व मानवी मूल्यांचे पालन केले, त्यामुळे नैतिकतेच्या दृष्टीने नाथ सतत अग्रेसर राहिले. एकनाथादी सर्वच संतांनी बहुजन समाजाच्या जीवनात डोळसपणा आणून त्यांच्या नित्य व्यवहाराला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. भक्तीइतकेच नीतिचे त्यांना महत्त्व आहे. नाथांनी सामाजिक नीतिमत्तेचा

पुरस्कार केला. सत्यनिष्ठा आणि सौजन्य, भक्ती आणि नीती, समबुध्दी आणि भूतदया यांचा प्रचार केला. या त्यांच्या कार्यामुळे कोट्यवधी स्त्री–पुरुषांच्या दु:खमय जीवनाला उजाळा मिळाला. सत्यनिष्ठा, सहिष्णुता, उदारता, नि:स्पृहता, सौजन्य इत्यादी गुणांचे धडे शिकविले. त्याचप्रमाणे जातीजातीतील भेदाभेद, व्यक्ती–व्यक्तीतीतील दुजाभाव, परस्परातील वैरभाव, मतामतातील संघर्ष नाहीसा करण्यासाठी त्यांना नीतिमत्तेचा उपयोग झाला. नाथांनी आपल्या 'भागवतात' अनेक ठिकाणी नैतिक मूल्यांचा विचार सांगितला आहे. भागवतात सत्य, अहिंसा, शुचिता, तप, आर्जव, मौन इत्यादी सदगुणांचे विस्ताराने वर्णन त्यांनी केले आहे. सत्य म्हणजे खरे बोलणे.

सत्य ते यथार्थ बोलणे। (ए. भा. १९–३७९)
सत्य अशा प्रकारचे आहे,
''सत्य जाण पां ऐसे। ज्यांचे मन वाचा असत्य दोषें।
जागृती स्वप्न सुषुप्ती वशे। स्पर्शले नसे अणुमात्र।।''
(ए. भा. १७–२३७)

सत्य असे आहे, ज्याचे मन आणि वाणी जागृतीत, स्वप्नांत किंवा सुषुप्तितही असत्य दोषाला लवमात्र स्पर्श करीत नाही. म्हणून मानवाने सत्याचे पालन करावे असे 'भागवतात' सांगितले आहे.

''निंदा आणि नरस्तवन। कदा मिथ्या न बोले वचन।
वाचा अनसूट धरणे जाण। सत्य संपूर्ण या नांव।।''

निंदा व नरस्तुती, तसेच खोटे बोलणे हे ज्याला माहित नाही, वाणीला जो अनसूट म्हणजे सोवळी राखतो, त्या साऱ्याला सत्य म्हणतात, असे नाथांचे म्हणणे आह नाथांनी दुसरा नैतिक सदगुण 'अहिंसा' हा सांगितला आहे.

''अहिंसा कायावाचामने। परपीडा त्याग करणे।''
(ए. भा. १९–३७९)

मानवाने कायावाचामने करून परपीडा किंवा हिंसा न करणे म्हणजेच 'अहिंसा' होय. नाथांनी 'शुचिता' हा एक सदगुण सांगितला आहे. शुचिता म्हणजे पवित्रता.

''मुख्य साधावया परमार्था। अवश्य पाहिजे गा 'शुचिता'।
शुचित्वावाचोनि तत्वत:। न लाभे हाता निजस्वार्थु।।''
(ए. भा. ३–३८०)

परमार्थ साध्यासाठी ''शुचिर्भूतपणा'' किंवा पवित्रपणा आवश्यक असतो. पवित्रपणाशिवाय स्वत:चा स्वार्थ हाती येत नाही. आरसा सहाणेवर घासून स्वच्छ केला म्हणजे आपलेच तोंड स्वच्छ दिसू लागते. त्याप्रमाणे चित्तशुध्दी झाली म्हणजे सहजच शुध्द आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. म्हणून आपले अंत:करण स्वच्छ असले पाहिजे. आपल्या अंत:करणात पवित्रता राहू लागली म्हणजे बाह्यकर्मामध्ये ती आपोआप दिसू लागते, आणि ही पवित्रताच परमार्थ दशेला नेऊन पोहचविते.

नाथ सांगतात, हे पावित्र्य कायमस्वरूपी अंत:करणात राहाण्यासाठी 'तपाची' आवश्यक्ता असते.

''शरीरशोषणा नाव तप। ते प्रारब्धभोगानुरूप।
हृदयी वाहणे कृपण स्वरूप। तो शुद्ध साक्षेप तपाया।।''
(ए. भा. ३–४००)

शरीरशोषणाला तप म्हणतात. पण ते प्रारब्धभोगानुरूप असते. कृष्णस्वरूपाचे हृदयात निरंतर चिंतन करणे हेच तपाचे शुध्द स्वरूप आहे. किंवा जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीन्ही स्थितींमध्ये भगवदप्राप्तीसाठी चित्त निरंतर झुरणी लावणे यालाच 'तप' म्हणतात. अशा प्रकारे एकदा आपल्या अंत:करणात परमात्मा विलीन झाल्यानंतर आपणास आर्जवाची स्थिती प्राप्त होते. नाथ आर्जव म्हणजे काय ते सांगतात,

''आतां आर्जव तें ऐंसे। सर्वा जीवां जीवन जैसे।
का तंतू जैसा निजविलासे। अविरोधु अभासे पराअंतु।।''
(ए. भा. ३–४२८)

आर्जव असे असते की, सर्व जीवांना जसे जीवन किंवा वस्त्रामध्ये जसे तंतू ऐक्यभावाने राहातात, त्याप्रमाणे विषम स्वभावाच्या जीवांनाही हा आपल्या आर्जवाने म्हणजे सरळ मृदुस्वभावाने रंजवितो. चंद्राची कोर वाकडी असते पण त्यातील अमृत काही वाकडे होत नाही, त्याचप्रमाणे वाकड्या स्वभावाचे लोक पाहूनही त्याची (परमेश्वराची) मनोवृत्ती पालटत नाही.

''यापरी जयाशी आप्तसर्व। ऐसा जो का निजस्वभाव।
तया नांव गा आर्जव। – – – ''
(ए. भा. ३–२४३३)

याप्रमाणे ज्याला सारीच आप्त, असा जो स्वभाव त्यालाच आर्जव म्हणतात. थोडक्यात आर्जव म्हणजे सर्वत्र आपणच किंवा आपलेपणाचा स्वभाव भरलेला आहे, असे दिसणे. यानंतर नाथांनी 'मौन' म्हणजे काय ते सांगितले आहे. नाथ म्हणतात,

''तेव्हा ज्याचे बोलावे अवगुण। तेथे दिसे हृदयस्थ आपण।
यालागी बोलता पै शून्य। पडे मौन गुरुवाक्ये।''
(ए. भा. ३–४१७)

कोणाचे अवगुण बोलावयास जावे तर तेथे हृदयस्थ आपणच असल्याचे दिसते. त्यामुळे कोणाचा उनेपणा बोलू लागल्यास गुरुवाक्याने मौनच पडते किंवा गुण पाहून एखाद्याचे स्तवन करावयास जावे, तर तेथेही मौनच पडते. कारण स्तव्य मीच, स्तवन करणारा मीच, आणि स्तवनही मीच. तेव्हा माझे मीच स्तवन करू लागलो तर माझाच मुर्खपणा होतो.

''एवं स्तुती निंदा वाग्वाद। करिता खुंटला संवाद।
महामौने अतिशुध्द। परमानंद साधला।''
(ए. भा. ३–४२२)

अशा प्रकारे स्तुती, निंदा किंवा वाग्वाद करण्याचे बोलणेच बंद पडते. अशा महामौनाच्या योगाने साधकांना परमानंदाची प्राप्ती होते. म्हणजेच वरील सदगुणांच्या साह्याने मानवाने परमानंदाची प्राप्ती करून घेणे म्हणजेच नीतिमत्तेने धर्माचे पालन करणे. थोडक्यात धर्म म्हणजेच नीती किंवा धर्म याचाच अर्थ नीती होय.

एकनाथांनी नीतिधर्माच्या आधाराने परमानंदाची प्राप्ती करून घेतली. ही परमानंदाची प्राप्ती करून घेताना त्यांनी नीतीला भक्तीचे अधिष्टान दिले. परमेश्वराविषयी निष्ठा, आदर, प्रेम बाळगणे हे नाथांच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ मूल्य होय. त्यामुळे त्यांनी भक्तीस चारही पुरुषार्थापेक्षा थोर मूल्य दिले आहे.

''चहू पुरुषार्थाचे माथा । भक्ती सर्वथा मज पढियंती ।''
(ए. भा. ११–६६७)

नाथांनी नीतीला भक्तीची जोड देवून धर्माच्या साह्याने आपले आचरण शुध्द सात्त्विक ठेवून यम–नियमांच्या साह्याने जीवन कृतार्थ केले. याचा उत्कृष्ट दाखला आपणास 'नाथभागवत' हा ग्रंथ देतो. 'भागवत' हा ग्रंथ मुळात भक्ती व नीतिप्रधान असल्याने त्यात त्यांनी बारा यम व बारा नियम सांगितले आहेत. परंपरेने पाच यम पाच नियम आहेत.

''अहिंसा सत्यमस्तेय मसडाददीर सखय:।
अस्तिक्यं ब्रह्मचर्येच मौनं स्थैर्य क्षमाभयम्।।''
(ए. भा. १९ श्लोक ३३)

काया–वाचा–मनाने हिंसा न करणे, यथार्थ बोलणे, शरीराने व मनानेही दुसऱ्याच्याही वस्तूचा अपहार न करणे, शबल विषयाच्या ठिकाणी स्नेह न ठेवणे, धर्ममर्यादा पाळणे, संग्रह न करणे, ईश्वराच्या ठिकाणी श्रध्दा ठेवणे मिथ्यालाप न करिता स्वाध्यायात रत असणे, स्वरूपाच्या ठिकाणी नित्य अनुसंधान, दुसऱ्याने अपकार केला तरी चित्तक्षोभ न होणे हे बारा यम सांगितले आहेत.

''शौचं जपस्तपो होम:, श्रध्दा तिथ्यं मदर्चनम्।

तीर्थाटन परार्थेहा, तुष्टिराचार्थसेवनम्''
(ए. भा. १९, श्लोक ३४)

अंतर्बाह्य शरीरशुध्दी, गुरुपदिष्ट मंत्रानुष्ठान, ईश्वराकरिता शरीर झिजवणे, अग्निद्वारा ईशसेवा करणे, स्वधर्माच्या ठिकाणी अस्तिक्यभावना, यथायोग्य सत्कार करणे, माझी पूजा करणे, तीर्थयात्रा करणे, परमपुरुषार्थाचीच इच्छा करणे, सर्वकाल आहे त्या स्थितित समाधान असणे, आणि गुरुसेवा करणे हे बारा नियम सांगितले आहेत. या यमनियमांच्या साह्याने मानवाला निजधामाची प्राप्ती होते. म्हणजेच मानवाला मोक्ष मिळतो. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय साध्य करण्याचे हे एक साधन आहे. नाथांनी स्वत:च्या जीवनात या साधनाचा वापर केला. ते स्वत: नीतिप्रधान जीवन जगले. त्यांच्या नीतिला भक्तीची जोड होती. त्यामुळे प्रपंच व परमार्थ यांची योग्य सांगड घालून सदगुणांच्या साह्याने त्यांनी धर्माचरण केले. त्यामुळे नाथांचा प्रपंच व परमार्थ सर्वांग परिपूर्ण होता. यातूनच त्यांचे भक्ती व नीतिविषयक विचार प्रगट होतात. नाथांनी आपले नीतिविषयक विचार एका अभंगात सांगितले आहेत. नाथ म्हणतात,

''नीति सांगतो ऐका एक। दास सभेचा सेवक।
मन टाळूं नका एक। कोणी एक।।धृ।।
सांडावरून जाऊ नये। लांच खाऊ नये।।
चोहट्यंत राहूं नये। कोणी एक।।१।।
अक्रित घेऊ नये। ईमान सोडू नये।
बैमान होऊ नये। कोणी एक।।२।।
सज्जनाशी विटूं नये। नीचासवें वाटू नये।
तस्कराशी पुसू नये। कोणी एक।।३।।
भक्तिमार्ग खंडू नये। कुभांड्यशी तंडू नये।
खळासंगे भांडू नये। कोणी एक।।४।।
सत्पुरुषाशी छळू नये। शिवेचा गुंडा ढाळू नये।
केला नेम टाळू नये। कोणी एक।।५।।
सदगुरुसेवा सोडू नये। कुळधर्माशी मोडू नये।
पापद्रव्य जोडू नये। कोणी एक।।६।।
संपत्ती आलीया माजू नये। अभिमानाने फुगू नये।
सभा देखुनी लाजूं नये। कोणी एक।।७।।
असत्य वाद करू नये। खोटा संग धरू नये।
मोचकाशी मैत्री करू नये। कोणी एक।।८।।
भलते भरी पडूं नये। अनाचार करू नये।
कपट मनीं धरुं नये। कोणी एक।।९।।
जन्मा आलिया स्वभावें। कांही सार्थक करावें।
ऐसें मनीं विचारावें। कोणी एक ।।१०।।
एका जनार्दनी भावें। संतचरणी लीन व्हावे।
सदा हरिनाम उच्चारावे। कोणी एक।।११।।
(ए. अभंगगाथा अ. क्र.३७९७)

अशा प्रकारे नाथांनी नीतिविषयक विचार सांगून नीती व भक्तीची सांगड घालून सामाजिक तत्त्वज्ञान समाजापुढे सादर केले. नाथांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा आशय भक्तीप्रधान आहे. एकनाथांना सर्वाभूती भगवंताची भक्ती अभिप्रेत आहे. 'भागवतधर्माचा' व भक्तियोगाचा सामाजिक आशय आजच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहे. कारण आज समाजवादाची भाषा रूढ आहे. 'भागवत' धर्म आपणास जीवनाकडे विश्वाकडे कोणत्या दृष्टीने पाहावे ते सांगतो, तिलाच ज्ञानदृष्ठीही म्हणतात. ती विश्वकल्याणाची, मांगल्याची, सत्य शिव सुंदराची दृष्टी आहे. ''सर्वे पि सुखिन: सन्तु'' हे तिचे साध्य आहे. 'भागवत' धर्म हा 'विश्वधर्मच' आहे. त्यात केवळ मानवाशीच नाही तर चराचर विश्वाशी आत्मतत्त्वाचे, ऐक्याचे नाते जोडले आहे. समता, बंधुभाव, व्यक्तित्वाची प्रतिष्ठा ही सर्व लोकशाही मूल्यें अद्वैती भक्तीमध्ये परिणत होतात, त्यामुळे एकनाथांचे भक्ती व नीतिविषयक विचार सार्वकालिक व सार्वदेशिक ठरणारे आहेत.

**प्रा. डॉ. धनराज सुभाष हाडुळे**

**संदर्भ :**

1. संत एकनाथ दर्शन (लेखसंग्रह) – हे. वि. इनामदार (संपा.)
2. संत साहित्य चिंतन – डॉ. यु. म. पठाण
3. एकनाथ वाङमय आणि कार्य – न, र, फाटक
4. एकनाथ महाराजांच्या अभंगाची गाथा – नानामहाराज साखरे
5. नाथांचा भागवतधर्म – श्री. र. कुलकर्णी
6. संत एकनाथ महाराजकृत आठ ग्रंथ – नरहरि विष्णूशास्त्री पणशीकर
7. सार्थ श्रीएकनाथी भागवत – (संपा.) रा. कृ. कामत
8. श्रीमद् भगवदगीता – (अनु,) ज. ग. करंदीकर
9. संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती – प्रा. गं. बा. सरदार
10. संत साहित्य चिंतन – डॉ. यु. म. पठाण

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानातील मानवी मूल्यांचे दर्शन

**श्री. पवन नारायण उईके[1], डॉ. उद्धव कांबळे[2]**
[1]संशोधन विद्यार्थी, तत्वज्ञान विभाग, व. ना. शा. क. स. वि. सं., नागपूर
[2]सहायक प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक, तत्वज्ञान विभाग,
व. ना. शा. क. स. वि. सं., नागपूर
**Corresponding Author: श्री. पवन नारायण उईके**
**DOI- 10.5281/zenodo.14547130**

**सारांश:**

आपली वसुंधरा हि अनेक महापुरुषांची जन्मदात्री आहे. आपल्या भारत भूमीवर अनेक थोर महात्मे व विचारवंत होऊन गेले. अनेक थोर विचारवंतांच्या विचारांचा वारसा हा आपल्याला एक राष्ट्रीय संपत्ती म्हणून लाभला. अनेकांनी आपल्या साहित्यातून, विचारातून मानवी मुल्यांची छाप आपल्या विचारात सोडलेली दिसते. त्यातीलच एक महान वैभव म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील सामाजिक न्याय, समता आणि स्वातंत्र्याच्या लढ्यातील एक प्रमुख विचारवंत, नेता आणि संविधानाचे शिल्पकार होते. त्यांनी आपल्या आयुष्याच्या अगदी प्रारंभापासून जातीयता, अस्पृश्यता आणि अत्याचार त्यांनी अगदी जवळून निरखून बघितली होती. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जातीयता, अस्पृश्यता आणि शोषणाविरुद्ध संघर्ष केला. तसेच दलित समाजाच्या उत्थानासाठी भरीव योगदान दिले.

**प्रस्तावना ;**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य हे केवळ वैचारिक लिखाण नसून, ते संपूर्ण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, शोषित पीडितांच्या हक्कासाठी आणि मानवी मूल्यांच्या प्रसारासाठी महत्वपूर्ण चळवळ होती. मग हि मानवी मुल्ये म्हणजे काय? मानवी मुल्ये म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील त्या तत्वांना आणि गुणांना उद्देशीत करते ज्यामुळे तो एक उत्तम, नैतिक आणि समाजसुसंगत जीवन जगू शकतो. या मूल्यांमध्ये सत्यता, प्रामाणिकता, न्याय, समानता, स्वातंत्र्य, करुणा, बंधुता आणी इतर सामाजिक व नैतिक मूल्यांचा समावेश होतो. हि मूल्ये व्यक्तीच्या जीवनात नीतिमत्तेचा आधार बनतात आणि समाजातील व्यक्तीमधील आंतरव्यक्तिगत संबंधाना सुधारतात. ज्यामुळे व्यक्तीच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. समाजात मानवी सहजीवनाची आणि सौहार्दाची उभारणी होते. हि मुल्ये व्यक्तीच्या आचरणाला मार्गदर्शित करतात आणि सामाजिक परस्परक्रिया सुधारणाऱ्या विचारधारांना प्रोत्साहित करतात(१). **"The Buddha and His Dhamma"** या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तथागत बुद्धाच्या शिकवणीद्वारे मानवी मुल्यांचा विचार मांडलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी एक सशक्त मार्गदर्शक आहे. त्यांनी समतेचे तत्व रुजवण्यासाठी जातीय व्यवस्थेचा कडाडून विरोध केला, तसेच अस्पृश्यता निर्मुलन आणि समान हक्कासाठी संघर्ष केला. त्यांनी मानवी 'हक्क' आणि 'स्वातंत्र्य' यासाठी केलेल्या प्रयत्नांनी सामाजिक परिवर्तनाची दिशा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानातून प्रत्येक व्यक्तीला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार, शिक्षणाचे महत्व आणि सामाजिक न्यायाची आवश्यकता यांचे बळकट दर्शन घडते.

**उद्देश :**

या शोध निबंधाचा उद्देश म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानातील मानवी मूल्यांचे विश्लेषण करणे व त्यांच्या विचारसरणीतील समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य आणि सहिष्णुता यांसारख्या मुल्यांचा आढावा घेऊन त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी मांडलेली व्यापकता आणि त्यांचा आजच्या समाजातील प्रभाव अधोरेखित करणे हा या निबंधाचा मुख्य हेतू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानातील मानवी मूल्यांचे दर्शन आपल्याला समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी नवी दृष्टी देणारे आहे. ज्याद्वारे आपण त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन एक अधिक समताधीष्ठीत आणि न्यायपूर्ण समाज निर्माण करू शकतो.

**गृहितके :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले तात्त्विक ग्रंथ हे उत्तम मानवी मूल्यांचे मार्गदर्शक आहेत.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानवी मूल्यांच्या समर्थनाचे अग्रणी पुरस्कर्ते आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि तत्त्वज्ञान :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६) हे भारताचे एक महान समाजसुधारक, विचारवंत आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि महिला यांच्या अधिकारासाठी

आयुष्यभर लढा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेशातील 'महु' येथे एक वंचित आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार समाजात झाला. बालपणापासूनच अस्पृश्यतेचा आणि भेदभावाचा अनुभव असल्यामुळे त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग धरला. त्यांनी त्यांचे शिक्षण हे अतिशय संघर्षमय परिस्थितीत पूर्ण केले. त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेज मुंबईमधून बी.ए. केले व त्यानंतर कोलंबिया विद्यापीठात अमेरिका येथे अर्थशास्त्रात एम.ए. आणि पीएच. डी. मिळवली त्यानंतर त्यांनी लंडन स्कूल इकॉनॉमिक्स मधून डी. एस.सी. पदवी मिळवली.(२)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्तम आणि जिवंत उदाहरण म्हणजे भारतीय संविधान होय. भारतीय संविधानामध्ये त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाची उत्तम प्रतीकृती आपणास बघायला मिळते. भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविके मध्ये त्यांची तात्त्विक भूमिका बघायला मिळते आणि प्रस्ताविकेतील तत्वे भारतीय संविधानाच्या संपूर्ण रचनेमध्ये प्रतिबिंबित होतात. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवी मुल्यांचा त्यांनी पुढाकार केलेला आहे. न्याय या तत्वामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय भारतीय संविधानाच्या मुख्य तत्वापैकी एक आहे. संविधानाच्या तत्वानुसार सर्व नागरिकांना समान न्याय आणि समान वागणूक मिळायला हवी हे नमूद केले आहे. स्वातंत्र्याचा अधिकारा नुसार प्रत्येक नागरिकाला विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, विश्वास आणि उपासना यांचे स्वातंत्र्य आहे. ह्या तत्त्वामुळे व्यक्तीला त्याच्या विचाराचे आणि कृतीचे स्वातंत्र्य मिळते. समतेचा अधिकार समतेच्या तत्वानुसार सर्व नागरिकांना समान अधिकार आणि समान संधी मिळायला हव्यात जात, धर्म, लिंग, वंश याबाबतीत कोणताही भेदभाव होऊ नये. तसेच बंधूतेच्या तत्वामुळे राष्ट्राच्या एकता आणि अखंडतेसह सर्व नागरिकांमध्ये एकतेची भावना निर्माण करण्यावर भर दिला जातो.(३) अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान हे भारतीय संविधानात आपल्याला बघायला मिळते. तसेच आदर्श समाज रचण्यासंबंधीचे एक संपूर्ण सेंद्रिय प्रारूप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सादर केलेले आहे. हे प्रारूप केवळ एक जातीनिहाय वा केवळ बहुजन हिताय नाही, तर ते आहे सर्वजण हिताय! समाजातील सर्वच माणसांचे हित हा समाजरचनेचा प्रस्ताव आहे. समता, स्वतंत्रता आणि बंधुता या तत्त्वावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श समाज उभा आहे.(४) हे सामाजिक तत्वज्ञान बाबासाहेब यांच्या लेखणीतून आपणास अनुभवयास मिळतो.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तत्त्वज्ञानासंबंधी काय धारणा आहे ते त्यांनी १९५४ च्या आकाशवाणी वरील भाषणात त्यांनी त्यांच्या तत्वज्ञानाची संकल्पना आणि स्वरूप सांगितले आहे. "तत्त्वज्ञान शब्दाचा अर्थ, या संदर्भात मी सामाजिक तत्त्वज्ञान असाच समजतो." 'प्रत्येक मनुष्याला जीवन विषयक तत्त्वज्ञान असणे आवश्यक आहे असे मी म्हणतो, यांचे कारण या तत्वाच्या निकषानेच आपण वाईट केले आहे याचे त्याला आकलन होते. जेव्हा आपण चुकलो आहोत असे त्याला समजेल तेव्हाच त्याला तत्त्वानुरोधाने आपली उन्नती साधण्याची जबाबदारी पटेल' '...माझे तत्वज्ञान हे कोणत्या सुखवस्तू माणसाचा ध्येयवाद आहे असे मानू नये.' '...माझे तत्वज्ञान क्रांतिकारक आहे.' आपले तत्वज्ञान क्रांतिकारक आहे त्याचे कारण ते जातीव्यवस्था आणि एकूणच श्रेणीबद्ध विषमतेला कारणीभूत ठरलेल्या त्रिगुण तत्वावर मात करणारे तत्वज्ञान आहे असे त्यांनी म्हटले आहे.(५)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानवी मुल्ये :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवी मुल्ये आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात सामाजिक समानता, मानवाधिकार आणि दिनदुबळयांच्या उत्थानासाठी अथक प्रयत्न केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेतून पुढील मानवी मुल्ये स्पष्टपणे दिसून येतात.

**समानता :**

समानता हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानातील प्रमुख मानवी मूल्य आहे. त्यांनी जातीवाद, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता यांच्या विरोधात कठोर लढा दिला. त्याकाळातील भारतीय समाजातील जाती व्यवस्थेने दलित आणि वंचित असलेल्या मागासवर्गीयांचे अनेक शतकानुशतके शोषण केले होते. म्हणून या सततच्या होणाऱ्या शोषणाला कुठे तरी आवर बसला पाहिजे म्हणून त्यांनी सामाजिक क्रांती सुरु केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीला तिच्या जाती, धर्म, लिंग किंवा आर्थिकस्थितीमुळे कमी लेखने योग्य नाही. माणसाने माणसाला समान वागणूक दिली पाहिजे. "The Annihilation of Caste" या ग्रंथात त्यांनी जाती व्यवस्थेच्या विरोधात विचार मांडले आहे आणि एक आदर्श सामाजिक व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहे. ज्या समाजव्यवस्थेत सर्वांना समान वागणूक मिळेल.

**स्वतंत्रता :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्रतेला मानवाच्या सर्वाधिक महत्वाच्या अधिकारापैकी एक मानले आहे. हे तेवढेच महत्वाचे एक मानवी मूल्य देखील आहे. त्यांच्या मते विचार, शब्द आणि श्रद्धेची स्वतंत्रता असणे आवश्यक आहे. त्यांनी धर्म, सामाजिक रीतीरिवाज आणि परंपरांपासून स्वतंत्रता मिळवून देण्याचा आग्रह धरला. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे संविधानातील "मुलभूत अधिकार" संविधानाच्या अनुच्छेद १२-३५ मध्ये यांचे सविस्तर वर्णन केले आहे. हे प्रकरण स्वतंत्रतेच्या विचाराचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांनी स्पष्ट केले कि, कोणत्याही बंदिस्थेला स्वीकारणे हे मानवी मूल्यांच्या विरोधात आहे.

**बंधुता :**

बंधुता म्हणजे सर्व लोकांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, बंधुता हि समानता आणि स्वतंत्रतेसह टिकवता येणारी आहे. त्यांनी समाजातील सर्व घटकांमध्ये परस्पर प्रेम आणि सहकार्याची

भावना निर्माण करण्यावर भर दिला. **"The Buddha and His Dhamma"** या ग्रंथात त्यांनी बौद्ध धर्माच्या माध्यमातून बंधुत्वाच्या भावनेची शिकवण दिली आहे. ज्यामध्ये स्नेह, करूणा आणि सहकार्याची भावना यांना महत्व दिले गेले आहे.

**न्याय :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी न्यायाच्या संकल्पनेवर अत्यंत जोर दिलेला आहे. सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय न्याय मिळवून देणे हे त्यांच्या जीवनाचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून शोषित, दलित आणि मागासवर्गीयांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक कायदे आणि सुधारणा सुचवल्या आहेत. "States and Minorities" या ग्रंथात त्यांनी अल्पसंख्यांकाचे अधिकार, त्यांच्या संरक्षणाची गरज आणि न्यायाची आवश्यकता याविषयी चर्चा केली आहे.

**मानवाधिकार :**

'मानवाधिकार' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेच्या केंद्रस्थानी आहे. त्यांनी सांगितले कि प्रत्येक व्यक्तीला त्याच्या माणूसपणाचा आदर त्याला मिळाला पाहिजे. माणसाला माणूस म्हणून जगता आल पाहिजे. अस्पृश्यतेच्या विरुद्धचा त्यांचा लढा हा केवळ सामाजिक नसून मानवी अधिकारांचा लढा होता. त्यांनी भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानवाधिकार मिळवून देण्यासाठी संविधानामध्ये विशेष तरतुदी केल्या आहेत हे आपल्याला बघायला मिळत.

**शिक्षण :**

शिक्षण हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानातील महत्वाचे मूल्य आहे. त्यांच्या मते शिक्षणाशिवाय परिवर्तन शक्य नाही. त्यांनी वर्षानुवर्षे शिक्षणापासून वंचित असणाऱ्या तळागळातील लोकांपर्यंत तसेच दलित आणि मागासवर्गीयापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे यासाठी शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. "Education is something which ought to be brought within the reach of everyone" म्हणजेच शिक्षण हि अशी गोष्ट आहे कि जी अद्यावत समाजाच्या आवाक्यात आली पाहिजे असे त्यांनी १९२७ सालच्या 'मुंबई प्रांतिक विधिमंडळातील कार्यवाहीत आवर्जून म्हटले आहे'.[६] शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीचे जीवनमान सुधारता येते आणि सामाजिक समानता प्रस्थापित करता येते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचे व मानवी मूल्यांचे वर्तमान काळातील महत्व :**

भारत हा अगदी प्राचीन काळापासून विविधतेने नटलेला देश आहे. येथील भौगोलिक परिस्थिती, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती हि विविधतेने नटलेली आपल्याला बघायला मिळते. परंतु येथील सर्व नागरिकांना समान न्याय मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान आजही अत्यंत महत्वाचे व सुसंगत आहे. विशेषतः वर्तमान सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीत.

आजची सामाजिक परिस्थिती बघता आजही समाजामध्ये जातीयता आणि सामाजिक विषमता अस्तित्वात आहे. वर्तमान काळातील प्रसारमाध्यमे जर आपण बघितली तर विविध ठिकाणी जातीय अत्याचार अस्पृश्यता आणि भेदभाव अजूनही काही भागांमध्ये दिसून येतो. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समानतेच्या विचारांची खूप आवश्यकता आपणास भासते. त्यांच्या विचारानुसार प्रत्येक व्यक्तीला समान वागणूक आणि संधी मिळणे आवश्यक आहे. त्यांनी मांडलेले विचार आणि संविधानातील तरतुदी आजही समाजाच्या सर्वच स्तरावर लागू करण्याची गरज आहे. तसेच आजही स्त्रियांवर होणारे अत्याचार दर दिवसाला आपण वर्तमानपत्रे व विविध माध्यमातून ऐकत असतो या होणाऱ्या अत्याचारांना देखील कुठेतरी थांबवण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या अधिकारासाठीही लढा दिला आहे. स्त्रियांचे शिक्षण, रोजगार आणि स्वातंत्र्याच्या बाबतीत त्यांनी मांडलेले विचार आजच्या काळातही महत्वाचे आहेत. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे प्रेरणादायी ठरतात.

आजच्या काळातील राजकीय अस्थिरता, भ्रष्टाचार आणि संवैधानिक संस्थावरील हल्ले किंवा अल्पसंख्यांकाचे अधिकार व हक्क, आर्थिक विषमता, गरिबीची समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतीतील असमानता, कामगारांच्या समस्या, मानवाधिकारांचे उल्लंघन आजही हे प्रश्न वर्तमान स्थितीत आपल्याला बघायला मिळतात. या सर्व समस्या बघता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञानातील मानवी मुल्ये, सामाजिक न्याय आणि आर्थिक सुधारणा आजच्या काळातही तितक्याच लागू पडतात. सामाजिक समता, राजकीय समता आणि सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या तत्त्वज्ञानावर आधारित धोरणे आणि निर्णय घेऊनच आपण एक प्रगत आणि न्यायप्रिय समाजाची निर्मिती करू शकतो.

**संदर्भ ग्रंथ सूची ;**


1. डॉ. भदंत आनंद कौसल्यायन "भगवान बुद्ध और उनका धम्मा डॉ. बाबासाहेब आंबेडकर:" , सुधीर प्रकाशन, वर्धा. २०२०
2. फडके भालचंद्र "डॉ. बाबासाहेब आंबेडकर". श्री विद्या प्रकाशन, पुणे ,१९८५
3. संकलन 'भैसरे एकनाथजी' लेख अॅड. 'गणेश वास्कर', सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर २०१२
4. डॉ. आगलावे प्रदीप , "समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर", सुगावा प्रकाशन, पुणे २०१८
5. डॉ. मनोहर यशवंत, "तत्त्वज्ञानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर", 'पद्मगंधा प्रकाशन', पुणे २०२०
6. डॉ. जाधव नरेंद्र, "बोल महामानवाचे", 'ग्रंथाली प्रकाशन' मुंबई २०१२

7. Vasant Moon “Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches Vol-1”, Dr. Ambedkar Foundation ministry of social justice and Empowerment, Gov. Of India Delhi January 2014
8. वाघमारे भारत “अग्रलेख मूकनायक”, प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर २०२३

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.5 No.43** **Nov-Dec 2024**

# संतांचे मूल्यसाक्षेपी चिंतन: एक अभ्यास

**प्रा. कृष्णात जयवंत नगरे**
तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र विभाग प्रमुख, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
**Corresponding Author: प्रा. कृष्णात जयवंत नगरे**
**Email:** krushnabhoi14@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14547161**

**सारांश:**

संत म्हटले की, त्याग, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, संसाराकडे पाठ फिरविणे, प्राणिमात्रांवर दया करणारे, उपवास, आश्रम, अशा काही बाबी आपल्या नजरेसमोर उभ्या राहतात. सर्वसाधारण माणसाला संतांचे विशिष्ट असे तत्त्वज्ञान जाणून घेण्यात रुची नसते. त्यांचे कार्य कोणते? ते कोणता उपदेश करतात? हे जाणून घेण्याचीच इच्छा असते, तसेच एखाद्या तत्त्ववेत्त्याचे तत्त्वज्ञान वाचल्यानंतर या विचारांचा उपयोग काय? असा प्रश्न पडतो. मात्र, संतांचे विचार किंवा संतसाहित्याच्या माध्यमातून तसे होत नाही. संतांचे कार्य, तसेच त्यांच्या उपदेशाचा प्रत्यक्ष व्यवहारात सतत मदत होत असल्याची जाणीव होत राहते. संत हे भारतीय तत्त्वज्ञानाचा आणि अध्यात्माचा महत्त्वाचा भाग आहे. संतांनी मानवी जीवनातील नैतिक, आध्यात्मिक, आणि सामाजिक मूल्यांची मांडणी केली आहे, जी कालातीत असून आजही तितकीच प्रासंगिक आहे. त्यांच्या विचारांतून माणुसकी, समता, प्रेम, परोपकार आणि साधेपणाचे महत्त्व अधोरेखित केले जाते.

**प्रस्तावना ;**

संत साहित्य भारतीय समाजजीवनातील महत्त्वाचा साहित्यिक आणि तात्विक दस्तऐवज आहे. हे प्रामुख्याने 14व्या ते 17व्या शतकादरम्यान विकसित झालेल्या साहित्यामध्ये संतांनी समाजातील समस्यांना आव्हान दिले आणि त्यावर उपाय सुचवले. प्रमुख संतांमध्ये संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, कबीर, तुलसीदास, सूरदास, मीराबाई, गुरु नानक हे या परंपरेतील प्रमुख संत आहेत. त्यांनी त्यांच्या काळातील सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीला आव्हान दिले. या संतांनी सामान्य लोकांच्या भाषेत जीवनाचे सत्य मांडले.

भारतीय संत परंपरा भारतीय समाज आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. संतांनी आपल्या लेखणीतून व विचारांनी सामाजिक, धार्मिक, तात्विक क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचे काम केले. सामाजिक सुधारणा, धार्मिक पुनर्जागरण आणि मानवी मूल्यांच्या स्थापनेसाठी त्यांचे विचार महत्त्वपूर्ण ठरले आहेत. भारतीय संतपरंपरा ही केवळ अध्यात्मिकतेपुरती मर्यादित नसून तीत जीवनातील नैतिक, सामाजिक आणि मानवी मूल्यांचा समावेश आहे. संतांनी त्यांच्या रचनांमधून केवळ अध्यात्मिक मार्गदर्शनच केले नाही, तर समाजातील विषमता, अन्याय, आणि अंधश्रद्धांवर तीव्र टीका केली. त्यांच्या विचारांमध्ये मानवतावादी दृष्टिकोन आणि मूल्यसाक्षेपी तत्वांचा समावेश आहे. संतांचे मूल्यसाक्षेपी चिंतन समाजाला मूल्याधारित जीवनशैलीकडे नेणारे आहे. या शोधनिबंधात संतांच्या चिंतनातील मूल्यसाक्षेपाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

संतांचे विचार आणि शिकवण समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. त्यांनी व्यक्तीच्या अंतर्मनाला शुद्ध करण्यावर, ईश्वरभक्तीच्या साधनेवर, आणि अध्यात्माच्या माध्यमातून मानवमूल्ये उन्नत करण्यावर भर दिला. त्यांची शिकवण आजही समाजाला प्रेरणा देते.संतांनी ईश्वरभक्तीला जीवनाचा आधार मानले. त्यांनी ईश्वराला कोणत्याही बंधनात न बांधता प्रेम, श्रद्धा, आणि समर्पण याच्या आधारे उपासना केली. "विठ्ठल विठ्ठल गजर" हा संत तुकारामाच्या भक्तीमय जीवनाचा मुख्य आधार होता. त्यांची शिकवण सर्वसामान्य जनतेच्या हृदयाला भिडणारी होती, संत मीराबाईनी प्रेम आणि भक्ती यांची गोडी गाण्यांमधून व्यक्त केली. तसेच संतांनी अध्यात्मिक जीवन आणि सांसारिक

जीवन यांच्यात समतोल साधण्याचा संदेश दिला. संत ज्ञानेश्वरांच्या "ज्ञानेश्वरी" मध्ये कर्मयोग आणि भक्तियोग यांचा सुंदर संगम आढळतो. संत कबीर म्हणतात “पोथी पढि पढि जग मुआ, पंडित भया न कोये, ढाई आखर प्रेम का, पढे सो पंडित होय" या विचाराने संतांनी प्रेम आणि करुणेला केंद्रस्थानी ठेवले. तसेच संतांनी ईश्वरप्राप्तीसाठी नामस्मरण आणि साधनेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या मते, नामस्मरण हे केवळ शब्दांचे उच्चारण नसून आत्मशुद्धीचा मार्ग आहे. संत तुकारामानी त्यांच्या अभंगांमधून नामस्मरणाचे महत्त्वाचे वर्णन केले. संत एकनाथ "राम नामाचा जोर" असे म्हणत त्यांनी साधनेचा सुलभ मार्ग दाखवला. संतांनी व्यक्त केले की ईश्वर सर्वांसाठी समान आहे. जाती-धर्माचे भेदभाव हे ईश्वराच्या दृष्टीने अप्रासंगिक आहेत. संत कबीर म्हणतात "हम सब में एक परमात्मा" या विचाराने ते समाजाला जोडत राहिले. संत रविदास "मन चंगा तो कठौती में गंगा" या विचारांनी अंत:करणाची शुद्धता महत्त्वाची मानली. संतांनी कठीण तत्त्वज्ञानाऐवजी सहज-सोप्या मार्गाने अध्यात्माचे रहस्य उलगडले. त्यांनी व्यक्त केले की, ज्ञान आणि भक्ती हा प्रत्येकासाठी खुला मार्ग आहे. संत नामदेवांच्या अभंगांनी भक्तीचे मर्म उलगडून दिले. संत तुकाराम म्हणतात "आम्ही जातो अमुच्या गावा, आम्हा सोयरी भाव" अशा अभंगांनी त्यांनी सुलभ अध्यात्माचा संदेश दिला. संतांचे अध्यात्मिक मूल्ये म्हणजे साध्या शब्दांत व्यक्त केलेला, पण गाढ अर्थ असलेल्या जीवनाचे मार्गदर्शक तत्त्वज्ञान आहे. त्यांची शिकवण आजही वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर मार्गदर्शक ठरते.

संत साहित्य हे केवळ अध्यात्मावरच आधारलेले नाही, तर नैतिकतेच्या मूलभूत तत्त्वांवरही उभे आहे. संतांनी समाजातील नैतिक अध:पतन दूर करून व्यक्ती आणि समाज उन्नत करण्याचे कार्य केले. त्यांनी सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, प्रामाणिकता आणि समता यांसारख्या नैतिक मूल्यांना महत्त्व दिले. संतांनी सत्य हे जीवनाचे मूलभूत तत्त्व मानले. त्यांनी व्यक्त केले की सत्य आचरण आणि विचार याशिवाय जीवनात स्थैर्य येत नाही.संत कबीर म्हणतात, "साँच बराबर तप नहीं, झूठ बराबर पाप" या वचनातून सत्याचे महत्त्व सांगितले. संत तुकारामानी "सत्य चि ठायी धर्म उभा" असे म्हणत सत्याला धर्माचे मुख्य आधार मानले. संतांनी अहिंसेला जीवनाचा मूलमंत्र मानला. ते म्हणायचे की हिंसा केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक स्तरावरही असते, आणि ती टाळली पाहिजे. संत ज्ञानेश्वर म्हणतात "हात चाले तो माळ घालावी" या वचनातून त्यांनी शांततेचा संदेश दिला. संत नामदेवानी शांतीच्या माध्यमातून समाज एकत्र ठेवण्याचे महत्त्व पटवले. संतांनी प्रेम आणि करुणेला सर्वोच्च नैतिक मूल्य मानले. त्यांच्या मते, कोणत्याही जीवाशी प्रेम करणे म्हणजे ईश्वराशी प्रेम करणे होय. संत तुकाराम म्हणतात "ऐसा हा सुंदर चंद्रमा दिसला, सर्व प्राणी सुखी व्हावे" या वचनातून त्यांनी सर्वांवर प्रेम करण्याचा संदेश दिला. संत मीराबाईनी प्रेमाला आध्यात्मिक उंचीवर नेऊन मानवी जीवनाला समृद्ध केले. संतांनी सामाजिक आणि नैतिक समतेचा आग्रह धरला. त्यांनी जातीभेद, धर्मभेद, आणि लिंगभेद यांचा विरोध केला. संतांचे नैतिक मूल्ये म्हणजे जीवन जगण्याचा आदर्श मार्ग आहेत. सत्य, प्रामाणिकता, प्रेम, आणि समता यासारख्या तत्त्वांनी व्यक्तीचे जीवन समृद्ध होते आणि समाज अधिक सुसंस्कृत होतो. संतांचे विचार आजही नैतिकतेचा मार्गदर्शक दीप म्हणून उभे आहेत.

समाजातील विषमता, अन्याय, अंधश्रद्धा, आणि जातीभेद यांचा विरोध करून संतांनी एका आदर्श समाजाचे स्वप्न उभे केले. त्यांनी समानता, सहिष्णुता, आणि न्याय यांसारख्या मूल्यांना मूर्त रूप दिले. संतांनी व्यक्त केले की सर्व मानव समान आहेत. जात, धर्म, पंथ, किंवा लिंगभेद यामुळे कोणतीही व्यक्ती कमी किंवा अधिक नाही. यावरती संत तुकाराम म्हणतात की, "आम्हा सर्व सुखीं व्हावे" या अभंगातून सर्वांना समानतेचा संदेश दिला. संतांनी जातीव्यवस्थेतील अन्यायकारक व्यवस्थेला नाकारले आणि सर्वांना समान अधिकार असल्याचे सांगितले, संत कबीरांनी "किसका हूँ मैं जात-पात से परे" या विचारांनी त्यांनी जातिव्यवस्थेचा स्पष्ट निषेध केला, संत ज्ञानेश्वरांनी सवर्णांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले. संतांनी समाजात स्त्रियांना समान दर्जा देण्याचा आग्रह धरला. त्यांनी स्त्रियांवरील अन्याय, छळ, आणि दुय्यम वागणूक यांचा विरोध केला, संत मुक्ताबाईनी महिलांच्या अधिकारांसाठी आवाज उठवला आणि महिलांना आध्यात्मिक क्षेत्रात स्थान दिले तसेच संत बहिणाबाईनी आपल्या साहित्यातून स्त्री-जीवनातील समस्या आणि त्यावर उपाय सुचवले. संतांनी व्यक्त केले की समाज टिकण्यासाठी परस्पर सहकार्य, मदत, आणि परोपकार आवश्यक आहेत. समाजातील अन्याय, अत्याचार, आणि विषमतेवर कठोरपणे टीका केली. त्यांनी आदर्श समाजाची रचना कशी असावी, याचा आदर्श निर्माण

केला. संत कबीर म्हणतात "धर्म और नीति वही, जो सबको समान माने" असे म्हणत त्यांनी धर्म आणि न्यायाला महत्त्व दिले. संतांनी श्रमाला पवित्र मानले आणि श्रम करणाऱ्यांच्या योगदानाला महत्त्व दिले.संतांनी विविध धर्मांचा आदर केला आणि धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श समाजासमोर ठेवला. संत कबीरांनी "अल्लाह-राम एक हैं" या विचारांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याचा संदेश दिला, संत ज्ञानेश्वरांनी वेदांबरोबरच सर्व धर्मग्रंथांचा आदर व्यक्त केला. संतांचे सामाजिक मूल्ये म्हणजे एका न्याय्य, समान, आणि आदर्श समाजासाठीची शाश्वत शिकवण आहे. त्यांनी मानवतेचा आदर्श प्रस्थापित करून समाजातील प्रत्येक घटकाला एकसंध करण्याचे कार्य केले. त्यांची शिकवण आजही मार्गदर्शक आहे आणि समाजाला पुढे नेण्यासाठी प्रेरणा देते.

संतांनी मानवतेला आणि समतेला त्यांच्या विचारधारेचा केंद्रबिंदू बनवले. त्यांच्या मते, मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही आणि समता हा समाजाचा पाया आहे. संतांच्या शिकवणीतून प्रेम, करुणा, परस्पर सन्मान, आणि जात-धर्मभेदाचा निषेध यांची प्रचिती येते. त्यांनी मानवमात्राला श्रेष्ठ मानले आणि समाजातील विषमता दूर करण्यासाठी अहिंसात्मक आणि आध्यात्मिक मार्गाचा अवलंब केला. संतांचे मानवता आणि समतेचे विचार हे समाजाच्या उन्नतीसाठी मार्गदर्शक आहेत. त्यांनी एका आदर्श समाजाची कल्पना साकार केली जिथे सर्व माणसे समान आहेत, प्रेम हा धर्म आहे, आणि मानवता हा सर्वोच्च आदर्श आहे. त्यांची शिकवण आजही सामाजिक आणि वैयक्तिक जीवनासाठी प्रेरणादायक आहे.

संतांनी समाजात स्त्री आणि पुरुष यांना समानतेच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्त्री-पुरुष भेदभाव, अंधश्रद्धा, आणि सामाजिक अन्याय यांचा तीव्र विरोध केला. त्यांच्या मते, सर्व मानव समान आहेत, आणि स्त्री-पुरुष दोघांनाही एकसमान हक्क, कर्तव्ये, आणि सन्मान मिळायला हवा. त्यांनी या विचारांचे प्रचार आणि प्रसार आपापल्या लेखन, अभंग, आणि सामाजिक कार्यातून केले. संतांनी व्यक्त केले की स्त्री-पुरुष दोघेही ईश्वरनिर्मित असून, त्यांच्यात कोणताही भेदभाव असू नये. संत ज्ञानेश्वर: "माउली" या संकल्पनेत त्यांनी मातृत्वाला उच्च स्थान दिले आणि स्त्रीचा सन्मान केला. संत तुकाराम: "ज्याची करणी ती मातीला लाजीरवाणी" अशा अभंगांतून त्यांनी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला विरोध केला. संतांनी समाजाच्या उन्नतीसाठी स्त्रियांना शिक्षण, विचारस्वातंत्र्य, आणि निर्णय घेण्याचा अधिकार मिळायला हवा, असे मत मांडले.

संतांचे विचार आजच्या तरुणाईसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरतात, कारण ते केवळ अध्यात्मिक दृष्टिकोन प्रदान करत नाहीत, तर व्यक्तिमत्त्व विकास, मूल्याधारित जीवन आणि समाजसेवा यावर भर देतात. त्यांची शिकवण तरुणांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी उपयुक्त ठरते. संतांनी स्वतःच्या अंतर्मनाचा शोध घेण्यावर भर दिला आहे. आजच्या तरुणांना अनेकदा जीवनाच्या उद्दिष्टांविषयी गोंधळ असतो. संत तुकारामांचे "आत्मा रामाचा विसावा" हे विचार तरुणांना आत्मविश्वास देतात आणि त्यांच्या अंतरात्म्याशी जोडण्याची प्रेरणा देतात. संतांनी आपल्या कार्यात निष्ठा, समर्पण, आणि ईमानदारीचा संदेश दिला आहे. तरुणांना या विचारांद्वारे आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळते. संत ज्ञानेश्वरांचे "कृषीवलाचा सन्मान" हे विचार तरुणांना कष्टाची महत्ता पटवून देतात. आधुनिक जगातील स्पर्धेमुळे तरुणांमध्ये ताणतणाव वाढत आहे. संतांनी साधनेचे महत्त्व पटवून दिले आहे, जे तरुणांना शांत आणि स्थिर जीवन जगण्यास मदत करते. संत रामदासांचे "शिवकार्य करणाऱ्या माणसाला स्वतःवर विजय मिळवणे महत्त्वाचे आहे" हे तत्त्व तरुणांना प्रोत्साहन देते. संतांनी शिकवले आहे की आपण स्वतःच्या विचारांवर ठाम राहावे आणि आत्मनिर्भर व्हावे. हे विचार तरुणांना आपल्या निर्णयांवर विश्वास ठेवण्यास आणि स्वतःच्या मार्गाने जाण्यास प्रवृत्त करतात.

**निष्कर्ष:**

संतांचे मूल्यसाक्षेपी चिंतन हे केवळ भूतकाळापुरते मर्यादित नाही, तर ते वर्तमान आणि भविष्यासाठीही मार्गदर्शक आहे. संत साहित्याने मांडलेली मूल्ये आणि तत्त्वे आधुनिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी उपयुक्त ठरतात. संतांचे विचार मानवी जीवनाला प्रेरणा देणारे आणि त्याला सन्मार्गावर नेणारे आहेत. संत साहित्य मानवाच्या अंत:करणाला शुद्ध करण्यासाठी, समाजात मूल्यनिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी, आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी महत्त्वाचा ठरतो. त्यांचे विचार व जीवनदृष्टी कालातीत असून ते आजच्या युगातील समस्या सोडवण्यासाठीही उपयुक्त ठरतात. संतांचे मूल्यसाक्षेपी चिंतन हे मानवजातीच्या प्रगतीसाठी आदर्श आहे. संतांचे विचार आजच्या तरुणाईसाठी दिशादर्शक आहेत. ते तरुणांना जीवनात नैतिकता, आत्मविश्वास, आणि सामाजिक

जबाबदारीची जाणीव करून देतात. त्यांच्या विचारांतून तरुणांना जीवनातील कठीण प्रसंगांचा सामना करण्यासाठी धैर्य आणि सकारात्मक दृष्टिकोन मिळतो, ज्यामुळे ते स्वतःचा विकास करताना समाजालाही योगदान देऊ शकतात.

**संदर्भ**


1. संत साहित्याचा इतिहास – नामदेव जोशी
2. संत तुकारामांचे अभंग – प्रा. रामदास पाटील
3. संत परंपरेतील मूल्ये – शां. ब. कुलकर्णी
4. संतांचे तत्त्वज्ञान - प्रा.डॉ. सुनीलदत्त गवरे

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# हिन्दी: भक्तिकालीन हिन्दी साहित्य में गुरु-शिष्य परंपरा का समाजशास्त्रीय अध्ययन

**जयवीर सिंह[1], डॉ. प्रवीण तुलशीराम तुपे[2]**

[1]शोधार्थी, स्नातकोत्तर हिन्दी विभाग एवं अनुसंधान केन्द्र, न्यू आर्ट्स,

कॉमर्स अण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर (स्वशासी)

[2]निर्देशक

**Corresponding Author: जयवीर सिंह**

**Email:** hindiguruji21@gmail.com

**DOI- 10.5281/zenodo.14547182**

**सार:**

भारतीय संस्कृति की सामाजिक संरचना में गुरु-शिष्य परंपरा की महत्वपूर्ण भूमिका रही है, गुरु अपने शिष्यों को संस्कारों से पूर्ण करते हैं और संस्कारों से ही संस्कृति की सामाजिक संरचना का निर्माण है। प्राचीन काल से लेकर आधुनिकता के वर्तमान स्पर्श तकनीकी युग की भारतीय सामाजिक संरचना में भी गुरु-शिष्य परंपरा का अमूल्य योगदान है। भारतीय गुरु-शिष्य परंपरा में गुरु अपने शिष्य को मानवीय मूल्यों के साथ शिक्षित करते हैं और शिष्य अपने कर्तव्यों का निर्वाह करते हुए समाज में मानवीय मूल्यों को स्थापित करने का कार्य करते हैं। भारतीय संस्कृति की सामाजिक संरचना में मानवीय मूल्यों का बड़ा महत्व माना गया है। इसलिए भारतीय समाज को व्यवस्थित रखने के लिए व्यक्ति में नैतिकता का होना आवश्यक है। भारतवर्ष में गुरु-शिष्य परंपरा सदियों से चली आ रही है। गुरु दीक्षा परंपरा के माध्यम से एक अज्ञानी जानवर रूपी मानव को ज्ञानी के रूप में परिवर्तित करके समाज में स्थापित करते हैं। यदि गुरु-शिष्य परंपरा के ऐतिहासिक परिवेश का अध्ययन करते हैं तो पता चलता है कि सतयुग में राजा हरिश्चंद्र, त्रेतायुग में राजा रामचंद्र, द्वापरयुग में राजा श्रीकृष्ण ने शिष्य के रूप में अपने कर्तव्यों को निर्वहन कर गुरु परंपरा को आगे बढ़ाया तो वहीं कलियुग में भक्तिकालीन समय के अनेक शिष्यों संत रैदास, संत दादू दयाल, संत कबीर साहब, गोस्वामी तुलसी साहब, मलिक मुहम्मद जायसी, गुरु नानक देव जी और संत नामदेव जी ने भी गुरु की संगति में दीक्षा ग्रहण करने के बाद गुरु की भूमिका का भी निर्वहन किया। ये सभी संत-कवि भक्तिकालीन हिंदी साहित्य में विख्यात हैं। आधुनिकता के स्पर्श तकनीकी युग में व्यक्ति पर आधुनिकता की काली छाया ने गुरु-शिष्य परंपरा को प्रभावित किया है, आधुनिक व्यक्ति अपने स्वार्थ को साधने में लगा हुआ है। जिससे व्यक्ति भारतीय संस्कृति और समाज दोनों से दूर हो रहा है। गुरु-शिष्य परंपरा से दूर होने से व्यक्ति के मानवीय मूल्यों में गिरावट आती है जो वास्तविकता के नजदीक है।

**बीज शब्द:** गुरु, शिष्य, परंपरा, संस्कृति, समाज, संस्कार, आधुनिक व्यक्ति, आधुनिकता

**शोध-आलेख:**

भारतीय समाज को व्यवस्थित रखने में गुरु-शिष्य परंपरा का महत्वपूर्ण योगदान रहा है। भारतीय समाज में फैले अज्ञानता के अंधकार को दूर करने के लिए एक सफल शिष्य की आवश्यकता होती है। गुरु एक सफल शिष्य को तैयार करने के लिए अपने महत्वपूर्ण जीवन को दीक्षा-दान के रूप में समर्पित करने की ज़िम्मेदारी निभाते हैं। शिष्य गुरु के बताए मार्ग का अनुसरण करते हुए समाज में फैली बुराइयाँ, अंधविश्वास, भेदभाव, अज्ञानता, घृणा, ईर्ष्या और द्वेष जैसी सामाजिक कुरीतियों और बुराइयों को दूर करने में अपने कर्तव्यों का निर्वहन करते हैं। गुरु से दीक्षा प्राप्त करने के तत्पश्चात शिष्य समाज में मानवता, नैतिकता और आदर्शों को स्थापित करने में अपनी अहम भूमिका निभाते हैं। गुरु के आश्रय में जब बालक पहुँचता है गुरु तब से ही बालक में शिक्षा के साथ-साथ संस्कारों के बीज पोषित करना शुरू कर देते हैं। संस्कारों के बीज शिष्य में अंकुरित होकर मानव जाति को मानवता से महकाते हैं। मानवता की महक से लोगों में प्रेम-भाव, संवेदना और सद्भाव बढ़ता है और समाज मानवीय मूल्यों से आत्मसात् होता है। शिष्य में पोषित संस्कारों के द्वारा ही एक सुंदर संस्कृति का निर्माण होता है। प्राचीन काल से गुरु अपने शिष्यों को शिक्षा के साथ-साथ संस्कारों से भी आत्मसात् कराते आए हैं और शिष्य भी संस्कारों के साथ-साथ शिक्षा ग्रहण करते रहे हैं। परंतु आधुनिकता के स्पर्श तकनीकी युग में गुरु-शिष्य परंपरा में काफ़ी बदलाव आया है। आधुनिकता ने गुरु और शिष्य के संबंधों में खटास पैदा कर संस्कारों पर प्रहार कर दोनों के बीच दूरी पैदा कर रही है। वर्तमान परिस्थितियों में गुरु और शिष्य सामाजिक मूल्यों से दूर होते जा रहे हैं जो भारतीय संस्कृति और समाज के हित के लिए उचित नहीं है। गुरु छंदाचार्य रामसाय श्रीवास 'राम' भारतीय समाज में पनप रही उदासीनता को देखते हुए कहते हैं:

"नैतिकता दिखता नहीं, बदल गया व्यवहार।
इन बातों पर भी करें, चिंतन मनन विचार॥"[1]

आज के शिष्य संस्कारों के बिना शिक्षित होना चाहते हैं तो गुरु भी शिष्यों पर संस्कार थोपना नहीं चाहते। आज शिष्य संस्कारों से दूर रहकर आर्थिक लाभ के लिए शिक्षा ग्रहण कर रहे हैं और गुरु भी शिष्य की इच्छा से सहमत होकर केवल आर्थिक शिक्षा देने में ही अपनी उपस्थिति दर्ज करा रहे हैं। आधुनिक शिष्य तकनीकी के सपनों में खोकर, यह भूल गया है कि शिक्षा और संस्कार दोनों से ही व्यक्ति का पूर्ण विकास होता है। यदि शिष्य संस्कारों को ग्रहण नहीं करेंगे तो मानवीय मूल्यों का ह्रास होगा और मानवीय मूल्यों का ह्रास भारतीय समाज में द्वेष और अराजकता पैदा करेगा। वह भूल रहे हैं कि व्यक्ति के संस्कार ही उसकी संस्कृति के निर्माण में महत्वपूर्ण भूमिका निभाते हैं। किसी व्यक्ति के संस्कारों से उस व्यक्ति की संस्कृति का निर्माण होता है और संस्कृति से समाज की स्थापित होती है जिसमें गुरु-शिष्य परंपरा का अमूल्य योगदान होता है। भारतीय समाज परंपराओं के आधार पर भिन्न हो सकते हैं, लेकिन व्यक्ति अपनी परंपराओं में ही विश्वास रखता है। भारतीय समाज की संस्कृति ही भारतीय समाज की परंपराएँ बनी हैं। इसमें किसी की दो राय नहीं है कि भारत में प्राचीन काल से ही गुरु-शिष्य परंपरा चली आ रही है। प्राचीन शास्त्र "श्री गुरु गीता" में भी गुरु महिमा का उल्लेख मिलता है:—

"यो गुरुः स शिवः प्रोक्तो यः शिवः स गुरुः स्मृतः।
विकल्पं यस्तु कुर्वीत स नरो गुरुतल्पगः।।18।।"[2]

श्री गुरु गीता में कहा गया है कि संसार में गुरु से बढ़कर कोई नहीं है। गुरु ही इस ब्रह्माण्ड के शिव है और जो शिव है वही इस जगत के गुरु है। इस संसार में शिव और गुरु में कोई अंतर नहीं है। संत कबीर साहब ने भी गुरु को भगवान से बड़ा बताया है तो फिर क्या आधुनिकता की दौड़ में व्यक्ति अपने गुरु को छोड़ कर स्वयं भारतीय समाज का हितैषी बनने की कोशिश कर रहा है जो आर्थिक लालसाओं की इच्छा में फँसता जा रहा है। आज एक प्रश्न उठने लगा है कि क्या गुरु के बिना शिष्य वह उपलब्धि प्राप्त कर सकता है जो उसे प्राप्त करनी है? इसका उत्तर होगा नहीं। आज आधुनिकता के समय में ऐसे अनेक प्रश्न खड़े हो गये हैं। आज भी व्यक्ति के लिए गुरु का बहुत महत्व है। वेद, शास्त्रों और पुराणों में भी गुरु के महत्व को समझाया गया है:—

वेद-शास्त्र-पुराणानि चेतिहसादिकानि च।
मंत्रयंत्र-विद्यादीनि मोहनोचातनादिकम्।।19॥
शैव-शक्तागमादिनी ह्यन्ये च भावो माताः।
अपभ्रंशः समग्रानां जीवानां भ्रान्त-चेतसाम्।।20
जपस्तपो व्रतं तीर्थं यज्ञो दानं तथैव च।
गुरु-तत्त्वम् अविज्ञाय सर्वं विकल्पं भवेत् प्रिये।॥21॥"[3]

भारतीय प्राचीन ग्रंथों में उल्लेख मिलता है कि गुरु के बिना कोई भी व्यक्ति ज्ञान प्राप्त नहीं कर सकता। संतों की धरती महाराष्ट्र के संत नामदेव के विषय में उल्लेख मिलता है कि वह बहुत बड़े आत्मज्ञानी थे लेकिन बिना गुरु ज्ञान के उनकी भक्ति अधूरी थी। संत ज्ञानेश्वर ने उन्हें पूर्ण भक्ति के लिए गुरु विसोबा खेचर से दीक्षा ग्रहण करने के लिए परामर्श देते हुए, "बिनु गुरु होइ न ज्ञान" का उपदेश देकर समझाया कि मनुष्य को अपने जीवन में एक गुरु की आवश्यकता अवश्य होती है। यह बात सुनकर संत नामदेव अपने ज्ञान को बिना गुरु अधूरा समझने लगे और उन्होंने गुरु की शरण में जाना ही उचित समझा। गुरु की शरण में जाने के बाद ही संत नामदेव का ज्ञान पूर्ण हुआ। संत नामदेव कहते थे कि व्यक्ति बिना गुरु के बहुत बड़ा आत्मज्ञानी तो बन सकता है लेकिन अपने जीवन में गुरु ज्ञान के बिना सफल नहीं हो सकता। इसलिए व्यक्ति को पहले ही गुरु की शरण में चले जाना चाहिए। संत नामदेव गुरु के संदर्भ में कहते हैं:—

सफल जनमु मो कउ गुर कीना।
दुख बिसारि सुख अंतरि लीना॥1॥[4]

श्री गुरु गीता में उल्लेख मिलता है कि वेद, शास्त्र, पुराण, इतिहास, आदि, मंत्र-तंत्र-यंत्र, सम्मोहन, वशीकरण, उच्चाटनादि, विद्या शैव, शाक्त, आगम और अन्य सभी मतमतांतर, जैसी सभी बातें एक व्यक्ति बिना गुरु के कैसे सीख सकता है? गुरु तत्वों की जानकारी के बिना तो सभी जीव-जन्तु अपने मार्ग से भटक सकते हैं। इसलिए व्यक्ति इन सभी चीजों को गुरु के बिना नहीं जान सकता। बिना सद्गुरु के जप, तप, व्रत, तीर्थ, यज्ञ, दान, अनुष्ठान इत्यादि का व्यक्ति के जीवन में कोई महत्व नहीं रह जाता है। गुरु के बिना तो यह सब व्यर्थ हो जाते हैं। इस श्लोक में यही समझाया गया है:—

गुरु-बुद्ध्यात्मनो नान्यत् सत्यं सत्यं वरानने।
तद् लाभार्थं प्रयत्नस्तु कर्तव्यश्च मनुष्यिभिः।॥22॥"[5]

इस दुनिया के सभी जीवों में व्यक्ति सबसे जागरूक प्राणी है जो अपने जीवन में निरंतर सीखता रहता है। व्यक्ति इस संसार में जितना भी सीखता है वह उसके लिए कम ही रहता है क्योंकि संत-गुरुओं ने ज्ञान का भंडार इतना बड़ा बनाकर रखा है कि व्यक्ति की सैकड़ों पीढ़ियाँ भी उसका पूरा अध्ययन नहीं कर सकती। गुरु के द्वारा दी जाने वाली शिक्षा में ही सत्यज्ञान होता है। इसलिए आत्मा में सद्गुरु के द्वारा दी गई बुद्धि के सिवाय अन्य कुछ भी सत्य नहीं है। इसलिए व्यक्ति को गुरु के तत्व ज्ञान के रहस्यों को जानने के लिए और आत्मज्ञान को ओर अधिक विकसित करने के लिए गुरु की शरण में रहकर प्रयत्न करना चाहिए:—

"गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुरेव परंब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।।"

भारतीय शास्त्रों में गुरु की महिमा का सुंदर उल्लेख मिलता है। पुराण-शास्त्रों में लिखा है गुरु ही ब्रह्मा है, गुरु ही विष्णु है और गुरु ही भगवान शंकर है। गुरु ही साक्षात परब्रह्म है। ऐसे प्रेरणादायी गुरु के चरणों में नतमस्तक होकर मैं प्रणाम करता हूँ। भक्तिकालीन हिन्दी साहित्य के संत-कवियों मलिक मुहम्मद जायसी, संत रैदास, गुरु नानक देव,

संत कबीर साहब, संत नामदेव, संत दादू दयाल और गोस्वामी तुलसी साहब ने भी गुरु दीक्षा ग्रहण की थी। इन सभी संत-कवियों ने गुरु महिमा का गुणगान भी बड़े जोर-शोर से किया है। इसलिए गुरु को इस जगत में सबसे उच्च स्थान दिया गया है। परंतु आधुनिक युग के व्यक्ति को समझने की आवश्यकता है जो अनावश्यक इच्छाओं को प्राप्त करने के लिए सभी रिश्तों-नातों को छोड़कर निरंतर लगा हुआ है। जबकि व्यक्ति को गुरु के बताए मार्ग का अनुसरण करने की आवश्यकता है। प्राचीन काल से लेकर भक्तिकालीन हिन्दी साहित्य के संतों के काव्य में उल्लेख मिलता है कि गुरु का युगों-युगों से महत्व रहा है। वैदिक ऋषि गुरु महर्षि वेदव्यास के अनुसार चार अलग-अलग काल हैं जिन्हें युग कहा जाता है। भारतीय शास्त्रों में चारों युगों का उल्लेख मिलता है। जबकि हिन्दू ग्रंथों में समय के चक्र को युग कहा गया है। इन चार प्रमुख युगों को सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग, और कलियुग में विभाजित किया गया है। इन चारों युगों में गुरु-शिष्य परंपरा का उल्लेख मिलता है।

**सतयुग में गुरु-शिष्य परंपरा:**

सतयुग सम्पूर्ण ब्रह्माण्ड का पहला युग कहलाया। इस युग में गुरु-शिष्य परंपरा का उल्लेख मिलता है। इस युग में प्रसिद्ध सत्यवादी एवं सूर्यवंशी राजा हरिश्चन्द्र अयोध्या के राजा हुए जो अपनी सत्यनिष्ठा, ईमानदारी और कर्मनिष्ठा के लिए अद्वितीय थे। लेकिन उन्हें भी अपने जीवन में अनेक कष्ट सहने पड़े। राजा बहुत दिनों तक पुत्रहीन रहे, उनके कोई संतान नहीं थी। वह संतान को लेकर चिंतित रहने लगे। राजा अपनी चिंता के निवारण के लिए एक दिन पुत्र प्राप्ति की इच्छा लेकर अपने कुलगुरु वशिष्ठ की शरण में गये तब गुरु के उपदेश से राजा हरिश्चन्द्र ने वरुणदेव की उपासना की, लेकिन एक शर्त रखी गई थी कि पुत्र के जन्म लेने पर उसे राजा यज्ञ में बलि दे दें। राजा के यहाँ एक पुत्र ने जन्म लिया जिसका नाम रोहिताश्व रखा। लेकिन राजा ने वरुणदेव के कई बार आग्रह करने पर भी अपनी प्रतिज्ञा पूरी नहीं की तो उन्होंने राजा को जलोदर रोग होने का शाप दे दिया था। फिर राजा शाप से मुक्ति और वरुणदेव को प्रसन्न करने के लिए गुरु वशिष्ठ की शरण में गये और सभी समस्याओं से छुटकारा पाया। वरुणदेव के शाप से मुक्ति मिलने के बाद राजा हरिश्चन्द्र को गुरु ब्रह्म ऋषि विश्वामित्र के द्वारा ली गई परीक्षा का सामना भी करना पड़ा। "धर्म ग्रंथों में वर्णित कथाओं के अनुसार, एक बार स्वर्ग लोक में सत्यवादिता पर चर्चा हो रही थी। सभी देवताओं ने महर्षि वशिष्ठ से पूछा कि इस संसार में ऐसा कौन है जो कभी झूठ नहीं बोलता। महर्षि वशिष्ठ ने देवताओं को बताया कि इस संसार में राजा हरिश्चंद्र के समान सत्यवादी कोई भी नहीं है।"[6] यह परीक्षा राजा हरिश्चन्द्र के सत्य पर अटल रहने के लिए ली गयी थी। परीक्षा में राजा खरे उतरे, इसलिए राजा हरिश्चंद्र को सत्यवादी हरिश्चंद्र कहा जाता है।

सतयुग में गुरु नारदजी और भक्त प्रह्लाद की गुरु-शिष्य परंपरा का भी शास्त्रों में उल्लेख मिलता है। गुरु और शिष्य के संबंधों के चलते ही विश्व में फैली बुराइयों और कुरीतियों पर अंकुश लग पाया है। अन्यथा विश्व में बुराइयों और कुरीतियों का ही बोला-बाला होता। हिरण्यकश्यप महर्षि कश्यप और उनकी पत्नी दिति के पुत्र थे। उन्होंने कड़ी तपस्या करके ब्रह्मा से "कभी भी मारा न जा सके" वरदान प्राप्त कर लिया था। इसलिए उसके अलावा कोई भी किसी अन्य की आराधना या उपासना करें तो उसे स्वीकार नहीं था। समाज में बुराइयाँ पनप रही थी। तब विष्णु के अवतार के रूप में हिरण्यकश्यप के यहाँ भक्त प्रह्लाद ने जन्म लिया। भक्त प्रह्लाद ने गुरु नारद जी से शिक्षा-दीक्षा ग्रहण कर विष्णु की भक्ति करने लगे तो हिरण्यकश्यप को यह स्वीकार नहीं था तो उसने अपने बेटे को ही ज़िन्दा जलाने का आदेश दे दिया था। लेकिन गुरु के आशीर्वाद से वह बच गए थे। भक्त प्रह्लाद के गुरु का भारतीय शास्त्रों में उल्लेख मिलता है। उन्होंने गुरु नारद मुनि को अपना गुरु स्वीकार किया था। "भक्त प्रह्लाद के ब्रह्मा के मानस पुत्र श्रीविष्णु के परम् भक्त नारदमुनि जी गुरु थे। नारद के अलावा दत्तात्रेय, शंड और मर्क आदि कई महान ऋषियों ने भी प्रह्लाद को शिक्षित और संस्कारवान बनाया था।"[7] तभी भक्त प्रह्लाद गुरुओं की शिक्षा और संस्कारों से आत्मसात् होकर एक महान व्यक्तित्व के धनी बने। भक्त प्रह्लाद की भक्ति से ही हिरण्यकश्यप का वध हुआ और बुराई पर अच्छाई की विजय हुई।

**त्रेता युग में गुरु-शिष्य परंपरा:**

ब्रह्माण्ड का दूसरा युग त्रेता युग हुआ। त्रेता युग में भी गुरु-शिष्य परंपराओं का उल्लेख मिलता है। इस युग में अयोध्या के रघुवंशी राजा दशरथ हुए। राजा दशरथ को जब पुत्र प्राप्ति की चिंता सताने लगी तो वह कुलगुरु वशिष्ठ के पास गये और अपनी चिंता से अवगत कराया। गुरु वशिष्ठ ने राजा दशरथ से यज्ञ करने को कहा। उसके उपरांत राजा दशरथ के महल में चार पुत्रों ने जन्म लिया। गुरु वशिष्ठ पर पुत्रों के नाम रखने से लेकर राम, भरत, लक्ष्मण और शत्रुघ्न को शिक्षित एवं संस्कारवान बनाने तक की सभी ज़िम्मेदारियाँ थी। राजा दशरथ की सभी चिन्ताओं से मुक्ति दिलाने में गुरु वशिष्ठ की महत्वपूर्ण भूमिका होती थी। श्रीराम ने भी गुरु-शिष्य परंपरा को आगे बढ़ाया। गुरु वशिष्ठ, गुरु ऋषि विश्वामित्र और गुरु ऋषि अगस्त्य ने श्रीराम को आदर्शवादी बनाने में महत्वपूर्ण भूमिका निभाई थी। प्रभु श्रीराम गुरुओं के बिना कोई भी कार्य नहीं करते थे। श्रीराम भक्त संत शिरोमणि तुलसी साहब ने भी गुरु को भगवान से श्रेष्ठ माना है। गोस्वामी तुलसी साहब अपने महाकाव्य रामचरितमानस में लिखते हैं:—

**"गुरु बिनु भवनिधि तरइ न कोई।**
**जों बिरंचि संकर सम होई।।"[8]**

इस दुनिया में भले ही कोई ब्रह्मा या भगवान शंकर के समान क्यों न हो लेकिन वह गुरु के बिना अपने जीवन की नैया पार नहीं लगा सकता अर्थात् भव सागर को कभी भी पार नहीं कर सकता है। इसलिए व्यक्ति को अपने जीवन में गुरु के महत्व को समझने की आवश्यकता है। आधुनिकता के स्पर्श तकनीकी युग में गुरु के बिना व्यक्ति जीवन की दौड़ लगा रहा है जो व्यक्ति और समाज दोनों के लिए उचित नहीं

है। जो व्यक्ति गुरु के पथ चिन्हों पर नहीं चलता वह जीवन भर ग़लत राहों में ही भटकता रहेगा।

**द्वापर युग में गुरु-शिष्य परंपरा:** द्वापर युग में कंस वध से लेकर महाभारत का युद्ध हुआ। इस युग में अनेक उतार-चढ़ाव आये। द्वापर युग में भी गुरु-शिष्य परंपरा की महत्वपूर्ण भूमिका रही है। राजा श्रीकृष्ण और बलराम दोनों के गुरु महर्षि सांदीपनि थे। गुरु महर्षि सांदीपनि ने ही श्रीकृष्ण को 64 कलाओं की शिक्षा और संस्कार दिये थे। गुरु महर्षि सांदीपनि का आश्रम महादेव की नगरी उज्जैन, मध्यप्रदेश में स्थित है। श्रीकृष्ण की शिक्षा-दीक्षा पूरी होने के उपरांत जब गुरू को गुरु दक्षिणा देने की बात आई तो गुरु ने कहा श्रीकृष्ण से कहा कि शंखासुर नाम का एक दैत्य मेरे पुत्र को उठाकर ले गया है। मुझे मेरा पुत्र लौटा दीजिए। तब गुरु दक्षिणा की परंपरा का निर्वहन करते हुए, श्रीकृष्ण ने शंखासुर का वध कर गुरु को उनका पुत्र वापस लौटा दिया था। इसलिए द्वापर युग में भी गुरु-शिष्य परंपरा का उल्लेख मिलता है। गीता में श्रीकृष्ण जी ने गुरु-शिष्य परम्परा को 'परम्पराप्राप्तम योग' बताया है। गुरु-शिष्य परम्परा का आधार सांसारिक ज्ञान से शुरू होता है, परन्तु इसका चरमोत्कर्ष आध्यात्मिक शाश्वत आनंद की प्राप्ति है, जिसे ईश्वर-प्राप्ति व मोक्ष प्राप्ति भी कहा जाता है। बड़े भाग्य से प्राप्त मानव जीवन का यही अंतिम व सर्वोच्च लक्ष्य होना चाहिए। गुरु एक मशाल होती है तो शिष्य प्रकाश होता है। इसी सन्दर्भ में श्रीकृष्ण ने गीता में अपने मित्र अर्जुन को समझाते हुए कहते हैं:—

**"सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यिा माम शुचः।।"9**

ग्रंथों में उल्लेख मिलता है कि व्यक्ति को नारायण स्वरूप गुरु की शरणगत हो जाना चाहिए। गुरु ही व्यक्ति के सभी पापों का नाश कर देंगे। व्यक्ति को अपना कर्म करते रहना चाहिए, उसे अपने कर्तव्यों का पालन अपनी नेक ईमानदारी से करना चाहिए, अपने और परायों को देखकर कभी शोक नहीं करना चाहिए। आधुनिक व्यक्ति को भी समझने की आवश्यकता है कि वह भौतिक वस्तुओं के जंजाल से बचकर अपना जीवन को सफल बनाए।

**कलियुग में गुरु-शिष्य परंपरा:**

सतयुग, त्रेतायुग और द्वापर युग की गुरु-शिष्य परंपरा के महत्व को समझने के तत्पश्चात अब हम कलियुग की गुरु-शिष्य परंपरा बात कर लेते हैं। यदि हिन्दी साहित्य का इतिहास उठाकर देखें तो अनेक साहित्यकारों ने अपने साहित्य में गुरु-शिष्य परंपरा का उल्लेख किया है। भक्तिकालीन हिन्दी साहित्य में तो संत कबीर, संत तुलसी, संत नामदेव, सूफ़ी-संत जायसी, गुरु नानक देव, संत रैदास एवं संत दादू दयाल इत्यादि ने गुरु महिमा का ख़ूब बखान किया है। गोस्वामी तुलसी साहब लिखते हैं:—

"बिनु गुर होइ न ग्यान ग्यान कि होइ बिराग बिनु।
गावहिं बेद पुरान सुख कि लहिअ हरि भगति बिनु॥"

भक्तिकालीन हिन्दी साहित्य के संत-कवियों ने गुरु महिमा का जो वर्णन किया है वह मानव जाति के साथ-साथ सभी जीव-जन्तुओं अर्थात् संपूर्ण सृष्टि के उत्थान के लिए आवश्यक है। भक्तिकालीन हिन्दी साहित्य के संत-कवियों ने गुरु को भगवान से भी बड़ा बताया है। संत कबीर साहब कहते हैं:—

"गुरु गोविंद दोउ खड़े, काकै लागै पाय।
बलिहारी गुरु आपने, गोविंद दियो बताय॥"

गुरु के योगदान को यदि देखा जाए तो गुरु इस कलियुग के आधुनिकता के स्पर्श तकनीकी युग में भी अपने कर्तव्यों का निर्वहन कर रहे हैं। लेकिन शिष्य आधुनिकता की लालसा में भटकता दिखाई दे रहा है। भक्तिकालीन हिन्दी साहित्य के संत-गुरुओं ने भारतीय समाज के लिए शिष्य की भूमिका महत्वपूर्ण बतायी है। गुरु आचार्य चाणक्य ने तो शिष्य की महिमा करते हुए एक आदर्श शिष्य के पाँच गुणों को इस प्रकार बताये हैं:—

"काकचेष्टा बको ध्यानं श्वाननिद्रा तथैव च।
अल्पहारी गृहत्यागी विद्यार्थी पञ्चलक्षणम्॥"10

भारतीय समाज की दृष्टि से गुरु और शिष्य के बीच केवल शाब्दिक ज्ञान का ही आदान-प्रदान नहीं होता है बल्कि गुरु अपने शिष्य के संरक्षक से लेकर सफल जीवन बनाने के लिए अन्य मुद्दों के रूप में भी कार्य करता है। गुरु का उद्देश्य शिष्यों को चमकते सितारों की तरह तैयार करना है। गुरु अपने शिष्यों का कभी भी अहित नहीं सोच सकते। यही विश्वास गुरु के प्रति भारतीय समाज का उसकी अगाध श्रद्धा, योगदान और समर्पण के कारण लगातार बना हुआ है। गुरु अपने शिष्यों को अज्ञानता से ज्ञान की ओर ले जाने का काम करते हैं:—

गूढविद्या जगद् माया देहश्च अज्ञान-संभवः।
विज्ञानं यत् प्रसादेन गुरु-शब्देन कथ्यते॥23॥"11

श्री गुरु गीता में लिखा है कि यह संसार गूढ़ अविद्यात्मक माया का रूप है। जिसमें व्यक्ति उलझा हुआ रहता है। आधुनिकता के स्पर्श तकनीकी युग में आधुनिक व्यक्ति अपने रिश्तों और परिवारों को भी नज़रअंदाज़ कर माया को पाने में लगा हुआ है। सब जानते हैं कि व्यक्ति का शरीर अज्ञान से उत्पन्न हुआ है। इस अज्ञानता को दूर करने के लिए सद्गुरु की आवश्यकता अवश्य पड़ेगी। जिसका विश्लेषणात्मक अध्ययन या ज्ञान जिनकी कृपा से होता है, उस ज्ञान को जानने वाले ही सद्गुरु देव कहलाते हैं:—

देहि ब्रह्म भवेद् यस्मात् त्वत्-कृपार्थं वदामि तत्।
सर्व-पाप-विशुद्धात्मा श्रीगुरुः पाद-सेवनात्॥24॥"12

भारतीय समाज में गुरु द्वारा दिखाए गए मार्ग का अनुसरण करना ही मनुष्य के लिए सत्यज्ञान है। सद्गुरु देव के चरणों की सेवा करने से मनुष्य के सभी पाप मिट जाते हैं और वह विशुद्धात्मा होकर ब्रह्मरूप हो जाता है। गुरु सदैव अपने शिष्यों के लिए निःस्वार्थ समर्पित रहते हैं। गुरु अपने शिष्यों की भलाई के सिवाय कुछ ओर नहीं सोच सकते। गुरु की शिक्षा-दीक्षा ही शिष्य को उचित मार्ग की ओर ले जाती

है। लेकिन आधुनिकता ने गुरु की संस्कारी शिक्षा को छोड़ केवल भौतिकवादी शिक्षा को स्वीकार करना शुरू कर दिया है जो भारतीय समाज या आधुनिक व्यक्ति के लिए उचित नहीं है। बिना गुरु आधुनिक व्यक्ति या समाज अपने कर्तव्य पथ से भटक जाएगा और वर्तमान परिस्थिति ऐसा ही संकेत दे रही है। गुरु एक शिष्य के लिए दिव्य शक्ति के समान होते हैं। श्री गुरु गीता में उल्लेख मिलता है:—

शोषणं पाप-पंकस्य दीपनं ज्ञान-तेजसः।
गुरोः पादोदकं सम्यक् संसारार्णव-तारकम्॥25॥"[13]

भारतीय शास्त्रों में उल्लेख मिलता है कि जो व्यक्ति श्री गुरुदेव के चरणों में विराजमान होते हैं, सदा ही उन पर गुरु की छाया बनी रहती है। ऐसे व्यक्ति के सभी पापों को गुरु की छाया समाप्त कर देती है। लेकिन आधुनिक व्यक्ति को न तो पाप से डर लगता है और न ही उसे गुरु की छाया की आवश्यकता रही है। आज व्यक्ति अनावश्यक इच्छाओं के कीचड़ में फँसता जा रहा है। जबकि गुरु ही वह शक्ति है जो व्यक्ति के पाप रूपी कीचड़ को सुखा सकती है और उसको ज्ञान-तेज से साफ करके ज्ञान की ज्योति से प्रकाशित कर सकती है। गुरु ही आधुनिक व्यक्ति और समाज की नैया पार लगाने में अपना योगदान देते हैं। गुरु ही इस संसार रूपी सागर में निश्चित तारने वाले होते हैं:—

अज्ञान—-मूल—-हरणं जन्म—-कर्म—-निवारकम्।
ज्ञान-वैराग्य-सिद्ध्यर्थं गुरु-पादोदकं पिबेत्॥26॥"[14]

गुरु ही व्यक्ति की अज्ञानता का निवारण करते हुए, अज्ञानता को जड़ से उखाड़ने वाले ज्ञानी है। व्यक्ति के अनेकानेक जन्मों के कर्मकांड तथा कुकर्मों, पापों का निवारण करने वाले भी गुरु ही होते हैं। लेकिन आधुनिक व्यक्ति गुरु को अपने से कमतर देख रहा है। ऐसा प्रतीत होता है। जबकि गुरु ज्ञान और वैराग्य को सिद्ध करने वाले, भारतीय समाज को नयी राह दिखाने वाले तेज प्रताप होते हैं। आधुनिक व्यक्तियों को सद्गुरु देव के चरणामृत का पान करने की अति आवश्यकता है। जिससे व्यक्तियों में मानवीय मूल्यों बने रहें और भारतीय समाज की निरंतर प्रगति होती रहे। गुरु महिमा गाते हुए गुरु नानक देव जी कहते हैं:—

"हे गुरुदेव, तुम सत्पुरुष हो, हो तुम ईश्वर के सखा,
हम अज्ञानी दीन-हीन, तेरी शरण में हैं आए,
करता हूँ याचना तुझसे, हम पर दया कर हे प्रभु,
ह्रदय में हमारे नाम जगा।"[15]

**निष्कर्ष:**

वैदिक ऋषि गुरु महर्षि "कृष्णद्वैपायन"[16] वेदव्यास को विश्व के प्रथम गुरु की उपाधि से विभूषित किया गया है। गुरु महर्षि वेदव्यास ने समस्त विश्व को एक शिष्य के रूप में देखा और ऐसा ज्ञान दिया जो इस जीव जगत के लिए आवश्यक था। गुरु महर्षि वेदव्यास से ही गुरु-शिष्य परंपरा की शुरुआत हुई। यही गुरु-शिष्य परंपरा आगे बढ़ती हुई सतयुग, त्रेतायुग और द्वापरयुग युगों से होती हुई कलियुग के हिन्दी भक्तिकाल और इस स्पर्श तकनीकी युग में भी निरंतर बनी हुई है। गुरु के द्वारा शिष्य को शिक्षा-दीक्षा देना एक धर्म के रूप में देखा जाता है। गुरु अपने ज्ञान से शिष्य के अज्ञान को दूर करने के लिए निःस्वार्थ अपना योगदान देते हैं। गुरु अपने शिष्य को समाज में एक सफल व्यक्ति के रूप में स्थापित करते हैं। जब शिष्य को गुरु के द्वारा जीवन के उद्धार का मार्ग मिल जाता है तब शिष्य अपने गुरु को गुरु-दक्षिणा, अपने कर्तव्यों को समाज के लिए समर्पित भेंट स्वरूप देते हैं। भारतीय पुराण-शास्त्रों और भक्तिकालीन हिन्दी साहित्य में गुरु महिमा का उल्लेख मिलता है। भक्तिकालीन हिन्दी साहित्य के संत-कवियों ने तो गुरु को भगवान से उच्च पद पर विराजमान किया है। इन संत-कवियों ने भारतीय समाज को गुरु बिना अधूरा बताया है। क्योंकि संत-कवियों की दृष्टि से गुरु को भारतीय समाज में सर्वोच्च स्थान पर देखा जाता है। लेकिन आधुनिकता ने कही न कही गुरु-शिष्य परंपरा पर अपने स्वार्थपन का प्रहार किया है। आज आधुनिकता के स्पर्श तकनीकी युग के आधुनिक व्यक्ति को गुरु-शिष्य परंपरा को नहीं भूलना चाहिए अन्यथा वह एक ऐसे माया के दलदल में फँस जाएगा जहाँ से उसका बहार निकलना बड़ा कठिन होगा। आधुनिक व्यक्ति को भक्तिकालीन हिन्दी साहित्य के संत-कवियों के बताये मार्ग पर चलने की आवश्यकता है।

**संदर्भ:**


1. राम, रामसाय श्रीवास, 2024 जून, दोहा संकलन चिंतनामृत, शुभदा प्रकाशन, मौहाडीह, जांजगीर-चाम्पा, छत्तीसगढ़, प्रथम संस्करण, पृ. 27.
2. बुड़ाकोटी, आचार्य पं. हरिशरण (संकलन एवं टीका), 2016 सितंबर, श्री गुरु गीता, प्रकाशक नारायण शक्ति पीठ सी-27, द्वितीय तल, ग्रेटर कैलाश एन्क्लेव-1, नई दिल्ली, सातवाँ संस्करण, पृ.10.
3. उपरिवत्, पृ. 10.
4. सिंह, बख्शीश, 2016, भक्त नामदेव, सस्ता साहित्य मण्डल प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण, पृ. 14,
5. बुड़ाकोटी, आचार्य पं. हरिशरण (संकलन एवं टीका), 2016 सितंबर, श्री गुरु गीता, प्रकाशक नारायण शक्ति पीठ सी-27, द्वितीय तल, ग्रेटर कैलाश एन्क्लेव-1, नई दिल्ली, सातवाँ संस्करण, पृ.10.
6. परमुवाल, नवीन, 2024 जुलाई 19, गृहलक्ष्मी: कौन थे राजा हरिश्चंद्र, ऋषि विश्वामित्र ने क्यों ली थी परीक्षा, जानें यह पौराणिक कथा,
7. https://grehlakshmi.com/hindi-lifestyle/raja-harishchandra-story
8. संपादक, 2023 मार्च 7, भक्त प्रह्लाद के बारे में 10 रोचक बातें, जो आप शायद ही जानते होंगे, वेबदुनिया हिंदी,
9. https://m-hindi.webdunia.com/holi-special/10-interesting-things-about-bhakta-prahlad-123030700023_1.html

10. शुक्ला, विनोद, 2021 जुलाई 24, Guru Purnima 2021: जीवन में गुरु का महत्व क्यों? जानिए गुरु की महिमा को लेकर क्या कहते हैं शास्त्र, धर्म डेस्क, अमर उजाला, नई दिल्ली
11. https://www.amarujala.com/amp/spirituality/festivals/happy-guru-purnima-2021-vyasa-purnima-messages-why-guru-purnima-importance
12. उपरिवत्
13. सिंह, प्राचार्य डॉ गीतेश, स्कूल प्रिंसिपल संदेश, केंद्रीय विद्यालय संगठन, पीएम श्री केन्द्रीय विद्यालय, एएफएस बोरझार,
14. https://borjhar.kvs.ac.in/hi/about-us/principal-message
15. बुड़ाकोटी, आचार्य पं. हरिशरण (संकलन एवं टीका), 2016 सितंबर, श्री गुरु गीता, प्रकाशक नारायण शक्ति पीठ सी-27, द्वितीय तल, ग्रेटर कैलाश एन्क्लेव-1, नई दिल्ली, सातवाँ संस्करण, पृ. 11.
16. उपरिवत्, पृ. 11.
17. उपरिवत्, पृ. 11.
18. उपरिवत्, पृं 11.
19. शर्मा, हरीश दत्त, 2015, सतगुरु नानक देव, प्रभात पेपरबैक-प्रभात प्रकाशन, नयी दिल्ली, पृ. 98.
20. संपादक, 2018 सितंबर 5, Teachers Day 2018: 10 पौराणिक गुरु और उनके महान शिष्य, जिन्होंने रची कई गाथाएं, धर्म डेस्क, अमर उजाला
21. https://www.amarujala.com/amp/photo-gallery/spirituality/religion/teachers-day-2018-top-10-gurus-and-saints-in-hindu-mythology

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या नैतिक तत्त्वज्ञानाचा सामाजिक पैलू

**भरत दुंदा भोईर[1], प्रा.डॉ.अमन वामन बगाडे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी. तत्त्वज्ञान विभाग,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
[2]मार्गदर्शक, विभाग प्रमुख,
तत्त्वज्ञान विभाग, न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर
**Corresponding Author: भरत दुंदा भोईर**
**DOI- 10.5281/zenodo.14547216**

**सारांश:**

संत ज्ञानदेव, ज्यांना संत ज्ञानेश्वर म्हणूनही ओळखले जाते, हे भारतीय संत परंपरेतील एक थोर तत्त्वज्ञानी, कवी आणि समाजसुधारक होते. १३व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जागृतीसाठी त्यांचे योगदान अनमोल आहे. संत ज्ञानदेवांनी आपल्या जीवन आणि साहित्याद्वारे मानवजातीला नैतिकतेचा, सत्कर्माचा आणि आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला. त्यांचे विचार केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक मर्यादांमध्ये अडकलेले नाहीतय ते एका व्यापक मानवी मूल्यसंस्थेचे दर्शन घडवतात.

त्यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी रचलेला ज्ञानेश्वरी हा ग्रंथ भगवद्गीतेवरील टीका असून, तो मराठी भाषेतील आद्य आणि सर्वात महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. ज्ञानेश्वरी केवळ धार्मिक ग्रंथ नसून तो नैतिक विचारांचा खजिना आहे. यामध्ये त्यांनी भगवद्गीतेतील कर्मयोग, भक्तियोग, आणि ज्ञानयोग यांचा समन्वय साधत जीवनातील नैतिकतेचा आदर्श मांडला आहे. कर्मयोगाच्या माध्यमातून त्यांनी निष्काम कर्माचे महत्त्व प्रतिपादित केले, तर भक्तियोगातून करुणा, दया, आणि सहिष्णुतेसारख्या सद्गुणांना प्रोत्साहन दिले.

**प्रस्तावना**

संत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून एकात्मतेचा संदेश दिला. त्या काळातील जातीयतेच्या विळख्यात सापडलेल्या समाजाला त्यांनी नैतिकतेचा मार्ग दाखवत सर्वांसाठी समानतेचा संदेश दिला. त्यांच्या शिकवणुकींमधून समत्व बुद्धी, आत्मज्ञान, आणि परोपकार यांसारख्या नैतिक मूल्यांचा प्रसार झाला. त्यांच्या विचारांनी केवळ धार्मिक जागृती केली नाही तर समाजातील नैतिक अधःपतनाला आव्हान दिले. त्यांच्या नैतिक विचारांमध्ये करुणा, अहिंसा, परोपकार, आणि समता यांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांनी 'सर्वत्र ईश्वर आहे' ही संकल्पना मांडून व्यक्ती-व्यक्तीतील भेदाभेद मिटवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की खरा धर्म हा सत्य, करुणा, आणि परोपकाराच्या माध्यमातून प्रकट होते. त्यांच्या साहित्यकृतीतून मानवजातीला हि शिकवण मिळते की नैतिकता ही जीवनाची मूलभूत गरज आहे, जी व्यक्तीला आत्मिक समाधानाकडे आणि समाजाला शांतीच्या मार्गावर घेऊन जाते.

आजच्या काळात संत ज्ञानदेवांचे नैतिक योगदान अधिक महत्त्वाचे वाटते. आधुनिक समाजात नैतिक मूल्यांची घसरण होत असताना त्यांचे विचार व्यक्ती आणि समाजाला नवी दिशा देऊ शकतात. परस्पर सहिष्णुता, सामाजिक समता, आणि नैतिक कर्तव्याचे पालन या गोष्टी त्यांनी दाखवलेल्या मार्गाने शक्य होतात.

संत ज्ञानदेवांनी आपल्या आयुष्य आणि साहित्याद्वारे दाखवलेला नैतिकतेचा मार्ग कालातीत आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यास मानवतेचे खरे स्वरूप उलगडते. त्यामुळे संत ज्ञानदेवांचे नैतिक योगदान केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून, ते प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य भाग ठरते. त्यांच्या विचारांची सखोल मीमांसा करणे म्हणजेच जीवनातील नैतिकतेचा खरा अर्थ शोधणे होय.

**" कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर । तया नमस्कार वारंवार ।।**
**न पाहे यातीकुळांचा विचार । भक्त करुणाकर ज्ञानाबाई ।।**
**" - संत एकनाथ**

संत ज्ञानदेवांच्या अखिल मानव समाज्याच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याच्या जाणिवेतूनच, संत ज्ञानदेवांच्या नंतर वारकरी संत परंपरेत मोलाचे योगदान देणारे संत एकनाथ महाराज आपल्या एका प्रसिद्ध अभंगात, संत ज्ञानदेवांच्या सर्व समावेशक कार्याबद्दल त्यांना आदराने

कृपाळू, उदार व करुणाकर असे म्हणतात व त्यांच्याविषयी आपलेपणाची भावना व्यक्त करतात.

**संत ज्ञानदेवांच्या जीवनाचा संक्षिप्त परिचय**

संत ज्ञानदेव, ज्यांना संत ज्ञानेश्वर म्हणूनही ओळखले जाते, हे 13व्या शतकातील महाराष्ट्रातील एक थोर संत, तत्त्वज्ञ, आणि कवी होते. त्यांचे जीवन समाजासाठी आध्यात्मिक, नैतिक, आणि सांस्कृतिक प्रेरणास्थान ठरले आहे. ते केवळ मराठी संत परंपरेतच नव्हे, तर भारतीय आध्यात्मिकतेच्या इतिहासातही अढळ स्थान राखून आहेत.

**1.जन्म आणि कुटुंब पृष्ठभूमी**

संत ज्ञानदेव यांचा जन्म 1275 साली पैठणजवळील आपेगाव या गावी झाला. त्यांचे वडील विठ्ठलपंत हे विद्वान ब्राह्मण होते आणि त्यांनी संन्यास स्वीकारल्यामुळे कुटुंबावर सामाजिक बहिष्कार लादण्यात आला. त्यानंतर विठ्ठलपंतांनी गृहस्थाश्रम पुन्हा स्वीकारला, परंतु समाजाने त्यांना स्वीकारले नाही. ज्ञानदेवांच्या मातोश्री रुक्मिणीबाई यांनी या कठीण परिस्थितीत कुटुंबाची जबाबदारी सांभाळली. या सामाजिक अवहेलनाने कुटुंबाला प्रचंड त्रास सहन करावा लागला, ज्यामुळे ज्ञानदेव आणि त्यांच्या भावंडांवर बालपणापासूनच कठीण परिस्थितीचा प्रभाव पडला.

**2.बालपण आणि शिक्**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही ज्ञानदेव यांचे बालपण आध्यात्मिक विचारांनी भरलेले होते. त्यांच्या वडिलांकडून त्यांना वेद-उपनिषदे यांचे शिक्षण मिळाले, तर आईने त्यांच्यात करुणा आणि सहनशीलतेसारखे नैतिक गुण बिंबवले. अत्यल्प वयातच ज्ञानदेव यांनी वेद, उपनिषदे, भगवद्गीता, आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. त्यांचा अभ्यास केवळ शास्त्रीय ग्रंथांपुरता मर्यादित नव्हता, तर त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून आध्यात्मिकता आणि नैतिकता शिकली.

**3.साधना व संतत्त्व**

ज्ञानदेवांनी अत्यंत कमी वयातच अध्यात्मिक साधनेत प्रावीण्य मिळवले. त्यांनी आपल्या भावंडांसह (निवृत्तिनाथ, सोपानदेव, आणि मुक्ताबाई) पंढरपूर आणि इतर ठिकाणी भ्रमंती केली. या प्रवासात त्यांनी समाजातील विविध स्तरांतील लोकांच्या वेदना अनुभवल्या आणि त्यावर आधारित आपल्या विचारांची मांडणी केली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी ज्ञानेश्वरी या अमरकाव्याची रचना केली, जे भगवद्गीतेवरील मराठी भाषेतील पहिला टीकाग्रंथ आहे. या ग्रंथाने त्यांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचा शिल्पकार बनवले.

**4.ज्ञानेश्वरी: एक नैतिक ग्रंथ**

ज्ञानेश्वरी हा केवळ भगवद्गीतेचा अनुवाद नव्हे, तर त्यामध्ये त्यांनी समाजाला नैतिकता, आध्यात्मिकता, आणि कर्मयोगाचा संदेश दिला. ज्ञानेश्वरांनी कर्मयोग, भक्तियोग, आणि ज्ञानयोगाचा समन्वय साधत व्यक्ती आणि समाजाला आध्यात्मिकतेच्या माध्यमातून नैतिक जीवन जगण्याचा मार्ग दाखवला.

**" साच चि बोलाचे नव्हे हे शास्त्र । पैं संसारू जिणते हे शस्त्र। आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरे इये ।। " - ज्ञाने. अ. 15 ओ. 576**

**" तैसा वाग्विलास विस्तारू । गितार्थेसी विश्वभरू । आनंदाचे आवारू । मांडू जगा ।। " - ज्ञाने. अ. 13 ओ. 1159**

आपल्या श्रीमद्भगद्गीता भाष्यात गीतेची महती वर्णन करताना संत ज्ञानदेव म्हणतात की, खरोखरच गीता हे नुसते शब्द पांडित्याचे शास्त्र नाही. तर ही गीता, संसार जिंकणारे शस्त्र आहे. फार काय सांगावे, या गीतेची ही अक्षरे, आत्म्याला प्रकट करणारे मंत्र आहेत. आणि याच गीता भाषांच्या माध्यमातून आपण आपल्या वाणीचा विलासाचा विस्तार करून सगळया जगाला आनंदाचा कोट करण्याचा आपला आत्म विश्वास पूर्ण मानस संत ज्ञानदेव आपल्या समोर अभिव्यक्त करतात. यातून आपल्याला संत ज्ञानदेवांची अवघा संसार सुखी करण्याची व तिन्ही लोक आनंदाने भरून टाकण्याची प्रबळ इच्छा पाहायला मिळते.

**5.समाज सुधारणेतील योगदान**

ज्ञानदेवांच्या काळात समाज जातीयतेच्या विळख्यात सापडला होता. त्यांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. "सर्वत्र ईश्वर आहे" हा विचार मांडून त्यांनी मानवजातीला एकात्मतेचा संदेश दिला. त्यांनी जात, धर्म, आणि सामाजिक भेदभावाच्या विरुद्ध आवाज उठवत एक सर्वसमावेशक आणि न्याय्य समाजव्यवस्थेचा आदर्श मांडला.

**6.अल्पायुषी जीवन**

संत ज्ञानदेवांचे जीवन खूपच थोड्या काळासाठी सीमित होते. केवळ 21व्या वर्षी, 1296 साली त्यांनी संजीवन समाधी घेतली. त्यांच्या अल्पायुषी जीवनातही त्यांनी केलेले कार्य आणि दिलेला संदेश अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. संत ज्ञानदेव यांचे जीवन म्हणजे करुणा, समता, आणि नैतिकतेचा उत्कृष्ट आदर्श आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या साधनेच्या माध्यमातून मानवतेसाठी मार्गदर्शक विचार मांडले. त्यांच्या आयुष्याची प्रेरणा त्यांच्या साहित्य आणि कार्यातून आजही जिवंत आहे. संत ज्ञानदेवांचे योगदान केवळ आध्यात्मिकदृष्ट्या नव्हे, तर नैतिक आणि सामाजिकदृष्ट्याही अनमोल आहे.

**नैतिकतेचा गाभाः भगवद्गीतेतील उपदेश**

संत ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या माध्यमातून भगवद्गीतेतील उपदेशांचे सहजसोप्या भाषेत विवेचन केले. या उपदेशांमधून जीवनातील नैतिकतेचा गाभा उलगडतो. स्वधर्म, कर्तव्य, समत्व बुद्धी, आणि

सद्गुणांचा अंगीकार या भगवद्गीतेतील महत्त्वाच्या तत्वज्ञानाला त्यांनी आपल्या लेखनात स्थान दिले. हे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक पातळीवर न थांबता, व्यक्तीच्या जीवनातील नैतिक अधिष्ठानाचे आधारस्तंभ बनते.

**1.स्वधर्म आणि कर्तव्य**

भगवद्गीतेतील कर्मयोगाचे तत्त्वज्ञान संत ज्ञानदेवांनी सविस्तरपणे मांडले आहे. त्यांच्या मते, स्वधर्माचे पालन म्हणजेच व्यक्तीने आपल्या जीवनातील नैतिक कर्तव्यांचे पालन करणे होय. स्वधर्म म्हणजे व्यक्तीच्या सामाजिक, पारिवारिक, आणि आध्यात्मिक भूमिकांशी निगडित असलेले नैतिक उत्तरदायित्व. ज्ञानदेवांनी गीतेतील "योगः कर्मसु कौशलम" या विचाराचा अर्थ स्पष्ट करताना सांगितले की कर्तव्याचे पालन निष्काम भावनेने करणे हेच खरे नैतिक जीवन होय. व्यक्तीने आपल्या कर्तव्यात कोणत्याही अपेक्षा न ठेवता, फळाची आसक्ती न बाळगता, कर्म करत राहावे, कारण निष्काम कर्मच आत्मिक शांती आणि नैतिक उन्नतीसाठी महत्त्वाचे आहे. त्यांनी कर्मयोगाचा उपदेश करताना असेही म्हटले की प्रत्येक व्यक्तीने आपल्या नैसर्गिक कर्तव्याचे पालन करावे, कारण परधर्माचा स्वीकार ही नैतिक पतनाची सुरुवात आहे. कर्तव्याचे पालन न करणे म्हणजे समाज आणि स्वतःच्या आत्म्याशी केलेली प्रतारणा होय.

**" तूं योगयुक्त होऊनी । फळाचा संगु टाकुनी ।**
**मग अर्जुना चित्त देउनी । करीं कर्मे ।। " - ज्ञाने. अ. 2 ओ. 267**

**" म्हणौनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञ याजन ।**
**जो करी तया बंधन । कहींच न घडे ।। " - ज्ञाने. अ. 3 ओ. 83**

या ठिकाणी संत ज्ञानदेव स्वधर्म व निष्काम कर्तव्याबद्दल सांगतात की, व्यक्तीने निष्काम कर्मयोगाने युक्त होऊन, कर्म फळाचा अभिलाष टाकून मग मन लावून विहित कर्म करावीत. स्वधर्मा चे आचरण करणे हेच नित्य यज्ञ याजन करण्यासारखे होय. जो असे स्वधर्माचरण करतो तो केव्हाच बंधनात पडत नाहीत.

**2.समत्व बुद्धी**

समत्व म्हणजेच सर्व गोष्टींमध्ये समानता बाळगणे. भगवद्गीतेत "समत्वं योग उच्यते" असे वर्णन आहे, ज्याचा अर्थ संतुलित बुद्धीच खरा योग आहे. संत ज्ञानदेवांनी या विचारावर आधारित नैतिक समता मांडली आहे. समत्व बुद्धी म्हणजेच जीवनातील सुख-दुःख, यश-अपयश, लाभ-हानी या सर्वांमध्ये समान दृष्टिकोन ठेवणे. संत ज्ञानदेवांनी हे तत्त्वज्ञान सांगताना व्यक्तीला मनःशांतीसाठी द्वेष, लोभ, आणि मोह यांपासून मुक्त होण्याचा सल्ला दिला. त्यांच्या मते, जीवनातील नैतिक स्थैर्य हे व्यक्तीच्या समत्व बुद्धीवर अवलंबून आहे. ज्ञानेश्वरीमध्ये ते स्पष्ट करतात की भौतिक इच्छांवर नियंत्रण ठेवून आत्मसंयम साधणे हे समत्व प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे. संत ज्ञानदेवांनी समत्वाच्या माध्यमातून व्यक्तीला अध्यात्मिकतेच्या उच्च पातळीवर पोहोचण्याचा मार्ग दाखवला. समत्व बुद्धी केवळ वैयक्तिक शांततेसाठीच नव्हे, तर समाजातील समतेसाठीही महत्त्वपूर्ण ठरते.

**" अर्जुना समत्व चित्ताचें । तेंचि सार जाणैं योगाचें ।**
**जेथ मन आणि बुद्धीचें । ऐक्य आथी ।। " - ज्ञाने. अ. 2 ओ. 273**

या ठिकाणी संत ज्ञानदेव समत्त्व योगाबद्दल म्हणतात की, यशापयशामध्ये चित्ताची समता हेच योगाचे वर्म आहे, असे समज. या योगात मन व बुद्धी यांचे ऐक्य असते. मनाचा संकल्प व बुध्दीचा निश्चय यात विरोध नसतो.

**3.सद्गुणांचा अंगीकार**

सद्गुण हे नैतिकतेच्या गाभ्याचे मुख्य अंग आहे. भगवद्गीतेत वर्णन केलेले करुणा, अहिंसा, दया, आणि सहिष्णुता यांसारखे सद्गुण संत ज्ञानदेवांनी आपल्या विचारांतून प्रकट केले. संत ज्ञानदेवांनी माणसाने लोभ, क्रोध, मत्सर, आणि मोह यांसारख्या दोषांना टाळून सद्गुणांचा अंगीकार करावा असा उपदेश केला आहे. त्यांच्या मते, सद्गुण हेच व्यक्तीला आत्मिक उन्नतीकडे नेणारे साधन आहे. त्यांनी सांगितले की दया, परोपकार, आणि सहनशीलता यांसारख्या सद्गुणांच्या माध्यमातून व्यक्ती नैतिक दृष्ट्या उन्नत होऊ शकते. ज्ञानेश्वरीमध्ये त्यांनी उदाहरण देत सांगितले की, दया हे धर्माचे मूळ आहे आणि क्षमा हे मनुष्याचा मोठेपणा आहे. त्यांनी व्यक्तीला परोपकार करण्याचा आणि इतरांच्या दुःखात सहभागी होण्याचा सल्ला दिला. या सद्गुणांच्या अंगीकारानेच समाजात एकात्मता, शांती, आणि समता प्रस्थापित होते.

**" ते दैवी सुखसंभवी । तेथ दैवगुणें येकोपजीवीं ।**
**जाली म्हणौनि दैवी । संपत्ति हे ।। " - ज्ञाने. अ. 16 ओ. 67**

**" ऐसा जो कामक्रोधलोभां । झाडी करूनि ठाके उभा ।**
**तो येवढिया लाभा । गोसावी होय ।। " - ज्ञाने. अ. 16 ओ. 444**

या ठिकाणी संत ज्ञानदेवांनी सद्गुणांची दैवी संपत्ती च्या रुपात मांडणी केलेली आहे. ते या सद्गुण संपत्तीच्या संदर्भात म्हणतात की, ती दैवी संपत्ती सुखाला उत्पन्न करणारी आहे व सर्व दैवी गुणांना ही एकच निर्वाहाचे साधन आहे. म्हणून हिला दैवी संपत्ती असे म्हटले आहे. तसेच जो व्यक्ती काम क्रोध लोभ यांस पार नाहीसे करून अगदी मोकळा होतो, तो व्यक्ती या दैवी सद्गुण संपत्तीच्या प्राप्तीने आपल्या जीवनात गुरुकृपा, मुक्ती, सुख, शांती व समाधान यांच्या लाभाचा मालक होतो. यातून संत ज्ञानदेवांची सद्गुणांबद्दलची सूक्ष्म विचार दृष्टी प्रत्ययाला येते.

संत ज्ञानदेवांनी भगवद्गीतेच्या उपदेशांतून नैतिकतेचा गाभा स्पष्ट केला. स्वधर्म आणि कर्तव्य यामधून नैतिक उत्तरदायित्वाचा संदेश मिळतो, तर समत्व बुद्धीने मनःशांती आणि सामाजिक समतेचे महत्त्व अधोरेखित होते. सद्‌गुणांचा अंगीकार हा वैयक्तिक आणि सामाजिक उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरतो. या तीन तत्त्वांवर आधारित संत ज्ञानदेवांचे नैतिक तत्त्वज्ञान आजही मानवजातीसाठी आदर्श आहे. त्यांच्या विचारांची शिकवण स्वीकारल्याने व्यक्ती आणि समाज दोन्हींच्या नैतिक उन्नतीसाठी मार्ग खुला होतो.

**समाजासाठी संत ज्ञानदेवांची नैतिक शिकवण**

संत ज्ञानदेव यांनी आपल्या जीवनातून आणि ग्रंथरचनांद्वारे समाजाला नैतिकतेचा मार्ग दाखवला. त्यांची शिकवण व्यक्तीच्या आत्मिक उन्नतीबरोबरच समाजाच्या नैतिक सुधारणांसाठीही महत्त्वपूर्ण ठरली आहे. समता, सेवा, आणि श्रमाची महत्ता या तत्त्वांवर आधारित त्यांची शिकवण आजच्या काळातही आदर्शवत वाटते.

**1.समता**

संत ज्ञानदेव यांनी समतेचा उपदेश करून समाजातील विषमतेला आव्हान दिले. त्यांच्या काळात समाज जात, धर्म, आणि आर्थिक विषमतेच्या विळख्यात अडकला होता. ज्ञानेश्वरीमध्ये त्यांनी "सर्वत्र ईश्वर आहे" ही संकल्पना मांडली, ज्यामुळे व्यक्तीमधील भेदभाव संपुष्टात येण्याचा संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक जीव ईश्वराचा अंश आहे, त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला दुसर्यांपेक्षा कमी लेखणे नैतिक दृष्टिकोनातून चुकीचे आहे. त्यांनी वर्णभेद, आर्थिक विषमता, आणि लिंगभेद यांना विरोध करून सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन केले. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून त्यांनी एकात्मतेची भावना जागवली. समाजातील सर्व स्तरांतील लोकांनी समानतेच्या तत्वाचा स्वीकार करूनच खर्या अर्थाने नैतिक समाज निर्माण होऊ शकतो, असे संत ज्ञानदेव मानत. त्यांची समतेची शिकवण केवळ विचारांपुरती मर्यादित नव्हतीय ती त्यांच्या वागणुकीतूनही व्यक्त झाली.

**" जैसें तंवचि वहाळ वोहळ । जंव न पवती गंगाजळ । मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप ।। " - ज्ञाने. अ. 9 ओ. 458**

**" तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया । जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ।। " - ज्ञाने. अ. 9 ओ. 460**

या ठिकाणी संत ज्ञानदेव सांगतात की, ज्याप्रमाणे, जोपर्यंत गंगेच्या पाण्याला जाऊन मिळाले नाही, तोपर्यंत नाल्या ओढ्यांच्या पाण्याला नाले, ओढे असे म्हणतात य मग ते गंगेला येऊन मिळाल्यानंतर ते केवळ गंगारुपच होऊन राहतात. त्याप्रमाणे क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अंत्यज आणि स्त्रिया ह्या जाती जेथपर्यंत भक्त माझ्याशी एकरूप झाले नाहीत, तेथ पर्यंतच वेगवेगळया असतात. संत ज्ञानदेवांनी बाह्य भेदभावापेक्षा ईश्वर भक्तीला व ईश्वराशी एकरूप होण्याचा अधिक महत्त्व दिलेले आहे. ईश्वर भक्तीत ते सर्वांना समान मानतात.

**2.सेवा**

सेवा म्हणजेच परोपकाराची भावना ही संत ज्ञानदेवांच्या नैतिक शिकवणीचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यांनी सेवा ही केवळ धार्मिक कार्य नसून नैतिक कर्तव्य मानली. ज्ञानेश्वरी मध्ये त्यांनी सेवा धर्माचे महत्त्व सांगताना उल्लेख केले आहे की, परोपकार हा खर्या धर्माचा आधार आहे. सेवा म्हणजेच इतरांच्या कल्याणासाठी केलेले कार्य, जे निःस्वार्थपणे केले जाते. त्यांच्या मते, सेवा करताना फळाची अपेक्षा ठेवू नये, कारण ही सेवा केवळ दुसर्याच्या भल्यासाठी नसून ती आत्म्याच्या शुद्धीसाठीही महत्त्वाची असते. संत ज्ञानदेवांनी गोरगरिबांची सेवा करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांनी समाजाला हे शिकवले की परोपकार आणि सेवा यामधूनच खर्या अर्थाने नैतिकता प्रकट होते. सेवा करण्यामध्ये सहानुभूती, करुणा, आणि परोपकार यांसारख्या सद्‌गुणांचा समावेश होतो, जे वैयक्तिक आणि सामाजिक जीवन सुधारण्यास उपयुक्त ठरतात.

**" जे पुढतपुढती पार्था । हे सकळ लोकसंस्था । रक्षणीय सर्वथा । म्हणऊनियां ।। " - ज्ञाने. अ. 3 ओ. 170**

**" मार्गाधारे वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें । अलौकिक नोहावें । लोकांप्रति ।। " - ज्ञाने. अ. 3 ओ. 171**

संत ज्ञानदेव लोककल्याण साधण्यासाठी सेवाभाव हे महत्त्वाचे माध्यम मानतात. सेवाभावाच्या संदर्भात ज्ञानी पुरुषांनी निष्काम कर्मयोगाची व कर्तव्याची रीत अनुसरून समाजाला मार्गदर्शन करावे अशी आपली अपेक्षा व्यक्त करतात. त्या संदर्भात ते म्हणतात की, समाज व्यवस्था टिकून ठेवणारी ज्ञानी लोकांची ही वागणुकीची रीत सर्व प्रकारे नेहमी जतन करून ठेवणे योग्य आहे. म्हणून शास्त्राने सांगितल्याप्रमाणे वागून जगास सरळ मार्गाला लावावे आणि आपण लोकबाह्य वागू नये. कारण लोक ज्ञानी लोकांचे अनुकरण करतात व त्याचा परिणाम लोक व धर्म संस्थेवर होत असतो. समाज व व्यक्तीच्या हितात व्यक्तीचे वर्तन किती परिणाम कारक असते याची जाणीव व भान संत ज्ञानदेवांच्या विचारांतून प्रकट होते. त्यातून त्यांची समाजाप्रती जागरूकता दिसून येते.

**3.श्रमाची महत्ता**

संत ज्ञानदेवांनी श्रमाला नैतिकतेच्या गाभ्यात स्थान दिले आहे. त्यांचा संदेश स्पष्ट होताः श्रम हीच साधना आहे, आणि कष्ट हेच यशाचे खरे साधन आहे. त्यांच्या मते, श्रम म्हणजे केवळ शारीरिक कार्य नव्हे, तर ते आत्मोन्नतीचे एक साधन आहे. त्यांनी कर्मयोगाच्या माध्यमातून निष्काम कर्माचा संदेश दिला. व्यक्तीने कोणत्याही प्रकारचा कामाचा संकोच न करता, निःस्वार्थ भावनेने श्रम करावा, असे त्यांनी सांगितले. वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानातही श्रमाची

महत्ता आहे. पंढरपूरला वारी करताना भाविकांचा समर्पित भाव आणि श्रम यांचा समन्वय दिसतो. संत ज्ञानदेव यांनी हा आदर्श स्थापन करत श्रमाला केवळ भौतिक नव्हे, तर आध्यात्मिक उन्नतीचे साधन मानले.

**" म्हणौनि जें जें उचित । आणि अवसरेंकरूनि प्राप्त ।**
**तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ।। " - ज्ञाने. अ. 3 ओ. 78**

**" ऐसिया या वाटा । इहींचि पेणा सुभटा ।**
**शांतीचा माजिवटा । ठाकिला जेणें ।। " - ज्ञाने. अ. 12 ओ. 143**

श्रम, निष्काम कर्मयोग व शांतीचा संबंध स्पष्ट करताना संत ज्ञानदेव म्हणतात की, व्यक्तीने जे जे करणीय व प्रसंगानुसार प्राप्त झालेले कर्म आहे, ते ते व्यक्तीने फळाशा सोडून केले पाहिजे. अशा या वाटेने व याच मुक्कामाच्या क्रमाने व्यक्ती शांतीचा मध्य गाठते.

समता, सेवा, आणि श्रमाची महत्ता या तीन तत्त्वांवर संत ज्ञानदेवांचे नैतिक तत्त्वज्ञान उभे आहे. समतेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केलाय सेवेद्वारे त्यांनी निःस्वार्थतेचा आदर्श मांडलाय आणि श्रमाची महत्ता सांगत त्यांनी कर्मयोगाचे तत्त्वज्ञान समाजासमोर ठेवले. त्यांच्या या शिकवणीने समाजाला एकात्मता, शांती, आणि प्रगतीचा मार्ग दाखवला. आजही त्यांच्या विचारांचे पालन केल्यास व्यक्ती आणि समाज नैतिकतेच्या उच्चतम पातळीवर पोहोचू शकतो.

**नैतिकतेचा आध्यात्मिक व व्यावहारिक अर्थ**

संत ज्ञानदेव यांनी नैतिकतेच्या गाभ्याला आध्यात्मिक आणि व्यावहारिक आयुष्यासोबत जोडले आहे. त्यांच्या मते, नैतिकता ही केवळ शास्त्रातील संकल्पना नसून ती प्रत्यक्ष जीवनात अमलात आणणारी कृती आहे. त्यांनी नैतिकतेचा अभ्यास करताना दोन महत्त्वाचे पैलू मांडले आहेतः आध्यात्मिक नैतिकता आणि व्यावहारिक नैतिकता.

**1.आध्यात्मिक नैतिकता**

आध्यात्मिक नैतिकता म्हणजे व्यक्तीच्या अंतरात्म्यातून उद्भवणारी नैतिकता, जी त्याच्या आत्मिक उन्नतीसाठी आवश्यक आहे. संत ज्ञानदेवांच्या मते, प्रत्येक व्यक्तीचा आत्मा हा दिव्यतेचा अंश आहे, आणि आत्मा शुद्ध आणि निष्कलंक राहण्यासाठी नैतिकतेचे पालन करणे आवश्यक आहे. आध्यात्मिक नैतिकतेचा पाया भगवद्गीतेतील योगमार्गावर आधारित आहे. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी मध्ये निष्काम कर्म, भक्ती, आणि ज्ञानाचा समन्वय करून आत्मिक शांती प्राप्त करण्याचा मार्ग सांगितला आहे. त्यांच्या मते, सत्य, अहिंसा, करुणा, आणि दया ही आत्मिक नैतिकतेची प्रमुख मूल्ये आहेत. आध्यात्मिक नैतिकतेत सद्गुणांचा अंगीकार अनिवार्य मानला जातो. लोभ, मोह, आणि अहंकार यांसारख्या दोषांवर विजय मिळवून आत्मिक उन्नती साधता येते. संत ज्ञानदेवांनी गीतेतील "समत्वं योग उच्यते" या विचाराचा अर्थ उलगडताना सांगितले की समत्व बुद्धी आत्म्याच्या शुद्धीचा मार्ग आहे. या नैतिकतेतून व्यक्तीच्या जीवनात स्थैर्य, मनःशांती, आणि आत्मिक समाधान मिळते. ती केवळ वैयक्तिक उन्नतीसाठीच नव्हे, तर समाजाच्या नैतिक अधिष्ठानासाठीही महत्त्वाची आहे.

**2.व्यावहारिक नैतिकता**

व्यावहारिक नैतिकता म्हणजे व्यक्तीच्या रोजच्या जीवनातील कृती आणि वागणुकीशी संबंधित नैतिक मूल्ये. संत ज्ञानदेवांनी ही नैतिकता समाजाच्या कल्याणासाठी महत्त्वाची मानली आहे. त्यांच्या मते, व्यावहारिक नैतिकतेचे पालन म्हणजेच इतरांशी सद्भावना, समता, आणि सहिष्णुतेने वागणे. संत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून व्यावहारिक नैतिकतेचा प्रचार केला. "सर्वत्र ईश्वर आहे" या तत्त्वज्ञानाच्या आधारे त्यांनी जात, धर्म, आणि वर्ग या भेदांवर आधारित भेदभावाला विरोध केला. त्यांनी प्रत्येक व्यक्तीला समान मानण्याचा संदेश दिला, ज्यामुळे सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकते. व्यावहारिक नैतिकतेमध्ये परोपकार, सेवा, आणि श्रम यांसारख्या मूल्यांचा समावेश आहे. त्यांनी गोरगरीब, दुर्बल, आणि उपेक्षित लोकांची सेवा करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांच्या मते, सेवा ही केवळ वैयक्तिक कर्तव्य नव्हे, तर ती समाजाच्या सुधारनेसाठी आवश्यक आहे. श्रमाच्या महत्त्वावर भर देऊन त्यांनी व्यक्तीला कर्मयोगाचा संदेश दिला. श्रम करताना त्यातून येणारे समाधान आणि समाजातील योगदान याला अधिक महत्त्व दिले. व्यावहारिक नैतिकता ही व्यक्ती आणि समाज यांच्यातील नाते दृढ करण्यासाठी महत्त्वाची ठरते. संत ज्ञानदेवांच्या नैतिक तत्त्वज्ञानात आध्यात्मिक आणि व्यावहारिक नैतिकता यांचा परस्पर पूरक संबंध आहे. आध्यात्मिक नैतिकता व्यक्तीच्या अंतरात्म्याला शुद्ध करते, तर व्यावहारिक नैतिकता समाजाच्या हितासाठी मार्गदर्शक ठरते. त्यांनी सांगितले की जीवनात या दोन्ही प्रकारच्या नैतिकतेचा समतोल राखल्याने व्यक्ती वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही पातळ्यांवर उन्नती साधू शकते. त्यांचे हे तत्त्वज्ञान आजही मानवतेसाठी प्रेरणादायी ठरते.

**ज्ञानेश्वरीतील नैतिक विचारांचे महत्त्व**

संत ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथामध्ये नैतिकतेचा व्यापक दृष्टिकोन मांडला आहे. त्यांनी भगवद्गीतेतील तत्वज्ञान मराठी भाषेत सुलभ करून लोकांच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शन केले. परमार्थ आणि परोपकार, सर्वधर्म समभाव, आणि शांती व समाधानी जीवन या त्यांच्या विचारांनी समाजासाठी आदर्श नैतिकता निर्माण केली.

**1.परमार्थ आणि परोपकार**

ज्ञानेश्वरीतील विचारांमध्ये परमार्थ म्हणजेच आध्यात्मिक उन्नती आणि परोपकार म्हणजेच इतरांच्या भल्यासाठी केलेले कार्य या दोन्हींचे महत्त्व विषद केले आहे. संत ज्ञानदेवांच्या मते, परमार्थ हा आत्मोन्नतीचा मार्ग आहे,

तर परोपकार हा सामाजिक नैतिकतेचा आधारस्तंभ आहे. परमार्थ साधण्यासाठी त्यांनी निष्काम कर्माचा उपदेश दिला. व्यक्तीने आपले कर्तव्य फळाची अपेक्षा न ठेवता, निःस्वार्थ भावनेने करावे, असे त्यांनी सांगितले. परोपकार हा खरा धर्म आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. "परोपकाराय सतां विभूतयः" या तत्त्वानुसार दुसर्याच्या कल्याणासाठी केलेला प्रयत्नच खर्या अर्थाने धर्माचे पालन होय. त्यांच्या मते, परोपकाराच्या माध्यमातून व्यक्ती स्वतःची नैतिक उन्नती साधते आणि समाजात एकात्मता निर्माण करते. ज्ञानेश्वरीत परोपकाराचा विचार केवळ वैयक्तिक मर्यादेपर्यंत मर्यादित नाहीय तो संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी आहे.

**" किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होवोनि तिहीं लोकी ।**
**भजिजो आदिपुरुषीं । अखण्डित ।। " - पसायदान**

ही ओवी संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील आहे, ज्यामध्ये त्यांनी संपूर्ण सृष्टीच्या कल्याणासाठी केलेली प्रार्थना व्यक्त केली आहे. या ओवीचा गाभा म्हणजे सर्व लोकांना सुख, समाधान, आणि शांती प्राप्त व्हावी आणि त्यांच्या जीवनात अखंड आनंद नांदावा.या ओवीत संत ज्ञानदेवांनी विश्वकल्याणासाठी प्रार्थना केली आहे. त्यांनी व्यक्त केले आहे की, प्रत्येक प्राणी सुखी आणि पूर्णतेकडे जाईल, जर तो ईश्वराशी जोडला गेला आणि आपल्या कर्मात निष्ठा बाळगली. या ओवीतील तत्त्वज्ञान आजच्या काळातील लोकांच्या भौतिक, मानसिक, आणि आध्यात्मिक गरजा पूर्ण करण्यासाठीही उपयुक्त ठरते.

**2.सर्वधर्म समभाव**

ज्ञानेश्वरीमधील सर्वधर्म समभावाचा विचार हा त्यांच्या नैतिक तत्त्वज्ञानाचा प्रमुख भाग आहे. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा सार एकच आहे, आणि तो म्हणजे मानवतेचा सन्मान करणे. संत ज्ञानदेवांनी "सर्वत्र ईश्वर आहे" हा विचार मांडून प्रत्येक जीवामध्ये ईश्वराचे दर्शन करण्याची शिकवण दिली. या तत्त्वज्ञानामुळे त्यांनी जात, धर्म, आणि वर्ग या भेदांवर आधारित विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानदेवांचा सर्वधर्म समभाव हा केवळ धार्मिक सहिष्णुतेचा उपदेश नाही, तर तो सामाजिक समतेचा मूलभूत आधार आहे. त्यांनी व्यक्तीला इतर धर्मांचा आदर करण्याची शिकवण दिली आणि समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी विचारप्रवर्तक दृष्टिकोन दिला.

**" विश्वाचे आर्त माझे मनीं प्रकाशलें । अवघेचि जालें देहब्रह्म ।। " - संत ज्ञानदेव**

या आपल्या प्रसिद्ध अभंगातून संत ज्ञानदेवांनी त्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचा आणि सर्वधर्मसमभावाचा गाभा स्पष्ट केला आहे. संपूर्ण सृष्टी एकाच ब्रह्मतत्त्वातून निर्माण झाली आहे आणि प्रत्येक व्यक्ती, प्राणी, आणि वस्तूमध्ये त्या ब्रह्माचा वास आहे. सृष्टीतील प्रत्येक घटक ब्रह्माचा भाग आहे आणि त्यामुळे सर्व धर्म, जात, वंश, आणि प्राणी एकसमान आहेत. त्यांच्या या विचारांनी सामाजिक समता आणि धार्मिक सहिष्णुतेचा एक अद्वितीय आदर्श निर्माण केला. हा संदेश आजच्या जगासाठीही प्रेरणादायक आणि मार्गदर्शक ठरतो.

**3.शांती आणि समाधानी जीवन**

ज्ञानेश्वरीतील विचारांमध्ये शांती आणि समाधानी जीवनासाठी उपयुक्त मार्गदर्शन आहे. संत ज्ञानदेवांच्या मते, खर्या समाधानासाठी व्यक्तीने आपल्या इच्छा, लोभ, आणि क्रोधावर नियंत्रण ठेवले पाहिजे. त्यांनी "समत्वं योग उच्यते" या विचाराचा आधार घेत जीवनातील सुख-दुःख, यश-अपयश, लाभ-हानी यांसारख्या परिस्थितींचा समतोल ठेवण्याचा संदेश दिला. समत्व बुद्धीमुळे मनःशांती प्राप्त होते, आणि हेच समाधानी जीवनाचे मुख्य साधन आहे. शांती आणि समाधानासाठी त्यांनी ध्यान, भक्ती, आणि निष्काम कर्मयोगाचा मार्ग दाखवला. त्यांच्या मते, जीवनात संतोष असल्यास व्यक्ती नैतिक जीवन जगते आणि समाजातही शांतता प्रस्थापित होते.

**" गुरु तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन ।**
**दर्शनीं समाधान । आथी जैसें ।। " - ज्ञाने. अ. 18 ओ. 1635**

वरील ओवी ही संत ज्ञानदेवांनी गुरूचे महत्त्व व महिमा वर्णन करताना प्रस्तुत केलेली आहे. ते म्हणतात की, जेथे गुरु तेथे ज्ञान, जेथे ज्ञान तेथे आत्मदर्शन, जेथे आत्मदर्शन तेथे समाधान असते. परमार्थ व प्रपंच यांचा समन्वय करताना गुरूचे मार्गदर्शन व्यक्तीला दोन्ही कडे सुख, समाधान व शांती प्राप्त करून देण्यास समर्थ ठरते. स्वतः संत ज्ञानदेव, त्याचे जीवन कार्य व त्यांची ग्रंथ संपदा व्यक्ती व समाजाला आपले ध्येय गाठण्याचा सतत प्रेरणा देणारे आहे.

ज्ञानेश्वरीतील नैतिक विचार परमार्थ, परोपकार, सर्वधर्म समभाव, आणि शांतीसारख्या तत्त्वांवर आधारित आहेत. त्यांनी समाजातील विषमता आणि अस्थिरतेवर उपाय सुचवले आणि व्यक्तीच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला. संत ज्ञानदेवांचे हे विचार आजही मानवी समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्या नैतिक तत्त्वज्ञानाचा स्वीकार केल्यास वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही पातळ्यांवर प्रगती साधता येऊ शकते.

**संत ज्ञानदेवांचे वारकरी संप्रदायातील योगदान**

संत ज्ञानदेव हे वारकरी संप्रदायातील एक प्रमुख संत होते. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने वारकरी संप्रदायाला एक मजबूत नैतिक, आध्यात्मिक, आणि सामाजिक अधिष्ठान दिले. भक्ती मार्गाचा प्रचार, सामाजिक एकता, आणि संत परंपरेतील योगदान या माध्यमातून त्यांनी वारकरी संप्रदायाला एक नवा आयाम दिला.

**1.भक्ती मार्गाचा प्रचार**

**" असावें एकाग्रीं स्वस्थ चित्त मनीं । उल्हासेंकरूनी स्मरण जीवी ।। " - हरिपाठ**

संत ज्ञानदेवांनी भगवद्गीतेचे सुलभ आणि व्यापक विवेचन केले, ज्यामुळे सामान्य माणसांपर्यंत भक्तीचा संदेश पोहोचला. त्यांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाद्वारे भक्ती मार्गाची महती सांगितली आणि कर्म, भक्ती, व ज्ञान यांचा समन्वय साधला. भक्ती मार्ग हा संपूर्ण मानवजातीसाठी खुला आहे, असे सांगत त्यांनी जात, वर्ग, आणि लिंगभेद नष्ट करून प्रत्येकाला ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवला. त्यांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून विठ्ठलभक्तीचा प्रचार केला, ज्यामुळे सामान्य लोकांना ईश्वराशी जोडण्यासाठी एक सोपा मार्ग मिळाला. त्यांनी सांगितले की, भक्ती ही फक्त पूजा-अर्चनेपुरती मर्यादित नसून ती निःस्वार्थ भावनेने समाजासाठी काम करण्यातून व्यक्त होऊ शकते. त्यांच्या शिकवणीमुळे भक्ती मार्गाची साधना केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नव्हे, तर सामूहिक कल्याणासाठी देखील महत्त्वाची ठरली.

**2.सामाजिक एकता**

**" जयाने घातली मुक्तिची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवाची ।। " - संत तुकाराम**

संत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून सामाजिक एकतेचा संदेश दिला. त्यांच्या काळात समाज जातीय, धार्मिक, आणि आर्थिक विषमतेने ग्रस्त होता. ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाच्या तत्त्वांमध्ये समता आणि बंधुतेची भावना रुजवली. वारीच्या प्रथेमुळे समाजातील सर्व स्तरांतील लोक एकत्र आले. जात, धर्म, आणि वर्ग यांचा विचार न करता सर्वजण एका भावनेने विठ्ठलभक्तीत तल्लीन होत. या प्रथेने समाजातील विषमता कमी करण्यासाठी आणि समानतेची भावना प्रस्थापित करण्यासाठी मदत केली. संत ज्ञानदेवांनी "सर्वत्र ईश्वर आहे" हा विचार मांडून लोकांना जातीय भेदभावाच्या पलीकडे जाऊन सर्वांना समान मानण्याचे शिक्षण दिले. त्यांनी मानवतेचा आणि बंधुभावाचा आदर्श समाजासमोर ठेवला.

**3.संत परंपरेतील योगदान**

संत ज्ञानदेवांनी वारकरी संत परंपरेला एक नवा आयाम दिला. त्यांनी भगवद्गीतेचे लोकभाषेत भाषांतर करून संत परंपरेच्या विचारांचा विस्तार केला. त्यांच्या लेखनातून आणि विचारांतून वारकरी परंपरेला तत्त्वज्ञान, भक्ती, आणि नैतिकता यांचे अधिष्ठान मिळाले. संत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायामध्ये शुद्ध भक्ती आणि समर्पणाची भावना जागवली.

**" ज्ञानराज माझा योग्यांची माउली । जेणें निगमावली प्रगट केली ।। " - संत नामदेव**

**" ज्ञानाबाई माझी अनाथाची माय । एका जनार्दनी पाय वंदितसे ।। " - संत एकनाथ**

**" तुका म्हणे नेणो युक्तीचे ते खोली । म्हणूनी ठेविली पायी डोई ।। " - संत तुकाराम**

त्यांनी संत तुकाराम, संत एकनाथ, आणि इतर संतांना प्रेरणा दिली. त्यांच्या शिकवणीमुळे संत परंपरेला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आणि ती सामान्य लोकांसाठी उपयुक्त ठरली. ज्ञानदेवांनी संत परंपरेतून केवळ आध्यात्मिक विचारच नव्हे, तर नैतिक तत्त्वज्ञानही समाजापर्यंत पोहोचवले. त्यांनी वारकरी संप्रदायाला केवळ धार्मिक चळवळ म्हणून नव्हे, तर नैतिक सुधारणांची चळवळ म्हणूनही महत्त्व दिले.

संत ज्ञानदेवांचे वारकरी संप्रदायातील योगदान हे भक्ती मार्गाचा प्रचार, सामाजिक एकता, आणि संत परंपरेतील योगदान या माध्यमातून अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांच्या विचारांनी वारकरी संप्रदायाला एक नवीन दिशा दिली, जी आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यामुळे वारकरी संप्रदाय केवळ धार्मिक चळवळ न राहता नैतिकतेचा आणि सामाजिक सुधाराचा आदर्श बनला आहे.

**आधुनिक काळातील संत ज्ञानदेवांच्या नैतिक योगदानाची उपयुक्तता**

संत ज्ञानदेवांनी त्यांच्या शिकवणीतून मानवी जीवनाच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. आधुनिक काळातही त्यांची शिकवण समाजाला दिशा दाखवते. मानवतेचा संदेश, आध्यात्मिकता व नैतिकता, आणि समाज व पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांमध्ये त्यांच्या विचारांची उपयुक्तता विशेष महत्त्वाची ठरते.

**1.मानवतेचा संदेश**

संत ज्ञानदेवांनी मांडलेला मानवतेचा संदेश आधुनिक काळात अधिक महत्त्वाचा ठरतो. जागतिकीकरण, तंत्रज्ञान, आणि भौतिक प्रगतीच्या युगात मानवी मूल्ये दुर्लक्षित होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत संत ज्ञानदेवांचा "सर्वत्र ईश्वर आहे" हा विचार व्यक्तीला प्रत्येक जीवाबद्दल आदर आणि करुणा बाळगण्याची प्रेरणा देतो. त्यांच्या शिकवणीनुसार, मानवतेचा अर्थ जात, धर्म, वंश, किंवा वर्ग यांच्या भेदभावाविना प्रत्येक व्यक्तीला सन्मान देण्यात आहे. त्यांनी "सर्व माणसे समान आहेत" हा संदेश मांडून सामाजिक समतेला प्रोत्साहन दिले. आजच्या काळात जातीय, धार्मिक, आणि सांस्कृतिक संघर्षांच्या पार्श्वभूमीवर संत ज्ञानदेवांचा संदेश समाजात एकता आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी मार्गदर्शक ठरतो.

**2.आध्यात्मिकता व नैतिकता**

आधुनिक समाजात नैतिकता आणि आध्यात्मिकतेच्या अभावामुळे वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर अनेक समस्या निर्माण होत आहेत. संत ज्ञानदेवांनी त्यांच्या ज्ञानेश्वरी आणि विचारांतून आत्मिक उन्नती आणि नैतिकतेचा संदेश दिला आहे, जो आजही महत्त्वाचा आहे. त्यांनी "निष्काम कर्म" हा विचार मांडून व्यक्तीला आपल्या कर्तव्यात निष्ठा ठेवण्याची प्रेरणा दिली.

यामुळे व्यक्तीचे मनःस्वास्थ्य सुधारते आणि जीवनात शांती निर्माण होते. आधुनिक काळातील मानसिक ताणतणाव, स्पर्धा, आणि असंतोष यावर मात करण्यासाठी संत ज्ञानदेवांचे विचार मार्गदर्शक ठरतात. नैतिकतेच्या अभावामुळे समाजात भ्रष्टाचार, स्वार्थ, आणि अनैतिक वर्तन वाढत आहे. अशा परिस्थितीत संत ज्ञानदेवांचे सत्य, अहिंसा, दया, आणि परोपकार यांसारख्या नैतिक मूल्यांचे पालन व्यक्ती आणि समाजाच्या सुधारणेसाठी आवश्यक ठरते.

**3.समाज व पर्यावरण संवर्धन**

संत ज्ञानदेवांच्या विचारांतून सामाजिक आणि पर्यावरणीय संवर्धनाचा संदेशही मिळतो. त्यांच्या मते, समाजातील प्रत्येक घटक एकमेकांशी जोडलेला आहे, आणि हे नाते टिकवण्यासाठी समता, बंधुभाव, आणि सहकार्य यांची आवश्यकता आहे. आधुनिक काळात पर्यावरणाचा र्हास ही एक गंभीर समस्या बनली आहे. संत ज्ञानदेवांनी ''सर्वत्र ईश्वर आहे'' या तत्त्वज्ञानाद्वारे निसर्ग आणि मानव यांच्यातील गाढ नाते उलगडले. त्यांच्या मते, निसर्गाचा सन्मान आणि संरक्षण करणे हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे. समाज आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी त्यांनी श्रम, सेवा, आणि निःस्वार्थतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांनुसार, समाजातील प्रत्येक घटकाने परस्पर सहाय्य करून निसर्गाचे संतुलन राखले पाहिजे. यामुळे आधुनिक काळातील पर्यावरणीय आणि सामाजिक समस्यांवर उपाय शोधता येतो.

संत ज्ञानदेवांचे नैतिक विचार आधुनिक काळातील मानवतेचा संदेश, आध्यात्मिकता व नैतिकता, आणि समाज व पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांमध्ये उपयुक्त ठरतात. त्यांच्या शिकवणीमुळे व्यक्तीच्या वैयक्तिक उन्नतीसोबतच समाजाच्या शाश्वत विकासाला गती मिळते. आजच्या काळातील नैतिक अधःपतन, सामाजिक असंतोष, आणि पर्यावरणीय संकटांवर मात करण्यासाठी संत ज्ञानदेवांचे विचार प्रभावी मार्गदर्शक आहेत.

**निष्कर्ष**

संत ज्ञानदेव हे केवळ एक संत नव्हे तर नैतिक तत्त्वज्ञानाचे महान प्रचारक होते. त्यांच्या विचारांमध्ये आध्यात्मिकता, नैतिकता, आणि सामाजिक प्रबोधन यांचा सुंदर संगम दिसतो. त्यांनी ज्ञानेश्वरी च्या माध्यमातून भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान सामान्य माणसांच्या जीवनाशी जोडले आणि नैतिक मूल्यांचा प्रसार केला. त्यांच्या शिकवणीचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाहीय तो आधुनिक काळातही तितकाच महत्त्वाचा आहे. संत ज्ञानदेवांनी नैतिकतेचा गाभा आध्यात्मिकतेतून उलगडला. त्यांनी मांडले की नैतिकता ही फक्त वैयक्तिक किंवा सामाजिक पातळीवर मर्यादित नसून ती व्यक्तीच्या आत्म्याशी जोडलेली आहे. त्यांच्या मते, सत्य, अहिंसा, दया, आणि परोपकार या नैतिक मूल्यांच्या आधारे व्यक्तीने आपले जीवन घडवावे. हीच शिकवण वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजात रुजवली गेली.

संत ज्ञानदेवांनी आपल्या विचारांतून सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांनी जात, धर्म, आणि वर्ग यांमधील भेद नष्ट करून सर्वांना एकसमान मानण्याचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांच्या वारकरी संप्रदायाने समाजातील विविध स्तरांतील लोकांना एकत्र आणले आणि त्यांच्यात बंधुतेची भावना निर्माण केली. वारीची प्रथा म्हणजे त्यांच्या विचारांचे मूर्त रूप आहे, जिथे समता, बंधुभाव, आणि ईश्वरभक्तीचे दर्शन होते. संत ज्ञानदेवांनी निसर्गाच्या सन्मानाला विशेष महत्त्व दिले. ''सर्वत्र ईश्वर आहे'' या विचाराने त्यांनी मानव आणि निसर्ग यांच्यातील नात्याला अधोरेखित केले. आजच्या काळातील पर्यावरणीय समस्यांवर मात करण्यासाठी त्यांचे विचार प्रेरणादायक आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी निसर्गाशी समरस होण्याची भावना त्यांनी त्यांच्या शिकवणीतून दिली आहे.

आजच्या युगात, जेथे ताणतणाव, नैतिक अधःपतन, आणि सामाजिक विघटन वाढत आहे, तेथे संत ज्ञानदेवांचे नैतिक विचार मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या ''निष्काम कर्मयोगा''च्या तत्त्वामुळे माणसाला स्वार्थ आणि लोभाच्या पलीकडे जाऊन निःस्वार्थपणे समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळते. त्यांच्या शिकवणींमुळे जीवनात स्थैर्य, समाधान, आणि शांती मिळू शकते. संत ज्ञानदेवांचे नैतिक योगदान त्यांच्या विचारांच्या साधेपणात आणि व्यापकतेत दडलेले आहे. त्यांनी मानवी जीवनाच्या प्रत्येक पैलूसाठी मार्गदर्शन केले आहे. वैयक्तिक उन्नतीपासून सामाजिक सुधारणा आणि पर्यावरणीय संवर्धनापर्यंत. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजाला नैतिकतेचा आणि आध्यात्मिकतेचा एक मजबूत पाया मिळाला.

आजच्या युगात, जेथे नैतिक आणि सामाजिक मूल्यांची आवश्यकता अधिक आहे, संत ज्ञानदेवांचे विचार आपल्या जीवनाचा आणि समाजाचा एक अविभाज्य भाग होऊ शकतात. त्यांच्या शिकवणींचा स्वीकार केल्यास वैयक्तिक आणि सामाजिक स्तरावर सुधारणा आणि प्रगती साधता येऊ शकते. या अर्थाने, संत ज्ञानदेवांचे नैतिक योगदान अजरामर आहे आणि ते मानवजातीसाठी सदैव प्रेरणादायी ठरेल.

**संदर्भ सूची**

1. करंदीकर (प्रा. डॉ. विनायक रामचंद्र) ज्ञानेश्वरी दर्शन (पुणे, सुविचार प्रकाशन मंडळ, 1992)
2. कुलकर्णी (दामोदर दिनकर) ज्ञानदेव व ज्ञानदेवी (पुणे, श्रीविद्या प्रकाशन, 1991)
3. कुलकर्णी (प्रा. श्री. मा.) ज्ञानेश्वरीतील शिकवण (नागपूर, उन्मेष प्रकाशन, 1959)

4. कुलकर्णी (सौ. पद्मा) ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान (बेळगाव, अॅकॅडमी ऑफ कंपरेटीव्ह फिलॉसॉफी
a. अँड रिलीजन, 1978)
5. गजेंद्रगडकर (प्रा. कृ. वे.) ज्ञानेश्वरीचे अंतरंग (पुणे, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, 1948)
6. गजेंद्रगडकर (प्रा. कृ. वे.) मराठी संत वाङ्गयातील परमार्थ मार्ग (मुंबई, भारतीय विद्याभवन,
a. 1963)
7. तळघट्टी (प्रा.डॉ.शं.रा.) श्री ज्ञानेश्वर विचार दर्शन (पुणे, सन पब्लिकेशन, 1984)
8. तावरे (सं. श्रीमती स्नेहल) ज्ञानेश्वरी व विसावे शतक (पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन, 1990)
9. तुळपुळे (ग. वि.) संतांच्या सहवासात (पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 1961)
10. दांडेकर (शंकर वामन तथा मामसाहेब) सार्थ ज्ञानेश्वरी (पुणे, आळंदी देवाची, वारकरी शिक्षण
a. संस्था, 2016)
11. दांडेकर (शंकर वामन तथा मामसाहेब) श्री ज्ञानदेवांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान (नागपूर,
a. नागपूर विद्यापीठ, 1955)
12. दांडेकर (शंकर वामन तथा मामसाहेब) ज्ञानदेव व प्लेटो (पुणे, शिक्षण प्रसारक मंडळी, 1967)
13. देशमुख (नरहर बाळकृष्ण) श्री ज्ञानेश्वर दर्शन भाग 01 व 02 (अहमदनगर, वाङःमयोपासक
a. मंडळ, 1934)
14. पाटील (प्रा. डॉ. सुशीला) ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व (नागपूर, विश्वभारती प्रकाशन, 1984)
15. पेंडसे (शं.दा.) श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान (मुंबई, केशव भिकाजी ढवळे, 1941)
16. पेंडसे (शं.दा.) महाराष्ट्राचा भागवत धर्म (पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 1969)
17. फाटक (नरहर रघुनाथ) ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी (नाशिक, धरित्री प्रकाशन, 1974)
18. भारदे (त्रिं.शि.तथा बाळासाहेब) श्री ज्ञानेश्वर नवदर्शन, जन्मसप्तशताब्दी (मुंबई, महाराष्ट्र राज्य,
a. 1975)
19. रानडे (रामचंद्र दत्तात्रय) ज्ञानेश्वर वचनामृत (पुणे, व्हीनस बुक स्टॉल, 1952)
20. सरदार (गं. बा.) ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा (पुणे, शिक्षण प्रसारक मंडळी, 1971)
21. सराफ (रामचंद्र नारायण) श्री ज्ञानेश्वरांचे आत्मदर्शन अर्थात कार्य आणि तत्त्वज्ञान (अॅकॅडमी
a. ऑफ कंपरेटीव्ह फिलॉसॉफी अँड रिलीजन, 1982)

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# मध्वाचार्य आणि ज्ञानेश्वर भक्तीपंथीय समकालीन बंध : तात्विक व सांस्कृतिक चिंतन

**वादिराज लिमये**
बीकॉम. एलएल.बी, एम.ए. इंडोलॉजी, एम.ए. तत्त्वज्ञान विभाग, पुणे
**Corresponding Author**: **वादिराज लिमये**
**Email:** vadiraj.limaye@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14547244**

**सारांश :**

महाराष्ट्रातील भक्ती मार्गाधिष्ठित संप्रदायांपैकी संत श्रीज्ञानेश्वर महाराजांचा संप्रदाय व त्यांचेच समकालीन असणारे दक्षिणेतील श्रीमध्वाचार्य यांचा संप्रदाय या दोन भक्तीपंथांच्या परस्पर तात्विक व सांस्कृतिक बंधांचे चिंतन या शोधनिबंधातून घेतले आहे.या दोन्ही संप्रदायांचे प्रस्थापक-उत्थापक हे समकालीन असणे, महाराष्ट्रातील तत्कालीन भक्तीकेंद्र व विद्याकेंद्रांशी दोन्ही सत्पुरुषांचा असलेला संबंध, दोन्ही संप्रदायांचे दैवत बह्वंशी एकच असणे, अशा प्रमुख कारणांमुळे या दोन सत्पुरूषांच्या भक्तीपंथांचे चिंतन प्रस्तुत शोधनिबंधातून केले आहे.

या निबंधात मध्वाचार्य व महाराष्ट्राचा संबंध, मध्वाचार्यांपूर्वीपासून अस्तित्वात असणारा भागवत संप्रदाय व वारकऱ्यांना अभिप्रेत भागवत संप्रदाय, दोन्हीही संप्रदाय हे स्वतःस वैष्णव संप्रदाय म्हणवत असल्याने त्या दोहोंचे स्वरूप,दोन्ही संप्रदायातील सांस्कृतिक साधने व तात्त्विकचर्चा या वर उद्धृत केलेल्या चिंतनासाठी आवश्यक अशा घटकांचा आढावा घेतला आहे. या सर्व चिंतनपूरक घटकांचा यथोचित उहापोह करून ज्ञानेश्वर व मध्वाचार्य यांच्या समकालीन भक्तीपंथांमध्ये कोणते तात्त्विक व सांस्कृतिक आदान-प्रदान झाले होते अथवा नाही या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न प्रथमच असून संक्षिप्त आहे तथापि यास आधार मानून तुलनात्मक संशोधन व अभ्यासास वाव आहे.

**प्रमुख शोधशब्द** : ज्ञानेश्वर, मध्वाचार्य, वारकरी, हरिदास, तत्त्वज्ञान व संस्कृती, महाराष्ट्रीय वैष्णव

**प्रस्तावना :**

**२.१ वैष्णव भक्तीपंथांचा उगम :**

तात्त्विक दृष्टीने पाहायचे झाल्यास वैदिक व पौराणिक वाङ्मयाचे केंद्र हे भक्ती असल्याचे आढळून येते कारण एखाद्या वस्तूचे माहात्म्य कळल्याशिवाय त्याविषयी प्रेमभावना / भक्तिभाव जागृत होत नाही हा अनुभवसिद्ध विषय आहे. त्याचवेळी भक्तीला गौण वाटून ज्ञान व कर्ममार्ग पूरक संदर्भ प्राचीन वाङ्मयात आढळतात असे अनेक पूर्वसुरींनी प्रतिपादन केल्यामुळे व ऐतिहासिकरित्या भौतिक साधनांच्या उपलब्धतेनुसार भिन्न-भिन्न मार्गांचे अस्तित्व अधोरेखित होत असल्याने अमुक एखादा पंथ कधीपासून सुरू झाला असावा या प्रश्नाचे औपचारिक उत्तर द्यावे लागते. तसे पाहता कर्म व ज्ञान मार्गास वाङ्मय निर्मितीची आवश्यकता नाही. भक्तीमार्गास मात्र आहे. ऋग्वेद हा प्राचीन वाङ्मयातील आद्यग्रंथही ठरवला गेला आहे. आता अशी तथ्ये समोर असता भक्ती पंथाचा उगम ऋग्वेदाच्या उगमापासूनच असे म्हणणे सयुक्तिक ठरते. पण ही युक्ती तात्विक स्वरूपाची आहे अभ्यासकांनी निश्चित केलेल्या विशिष्ट कालक्रमानुसारी नाही. त्याबरोबरच वेदोक्त देवता, त्यांचे लक्षण-रूप भिन्नत्व व त्यांचे पुरातत्वीय अस्तित्व यांची सांगड घालताना तात्विक भूमिका बाजूला ठेवून काळाच्या परिमित कक्षेत येऊन प्रश्नाची उत्तरे द्यावी लागतात. त्यामुळेच विष्णु या देवतेच्या भक्ती पंथाचा उगम नेमका कधी झाला याचे तात्विक उत्तर वेदनिर्मितीपासूनच असे असले तरी पुरातत्वीय संदर्भांनुसार ते इसवी सनपूर्व ५व्या ते २ऱ्या शतकापासून असे दिले जाते.

यामध्ये इसवीसनाच्या तिसऱ्या शतकाच्या आरंभी स्थित्यंतरे होऊन श्रीकृष्णाच्या रूपामध्ये पुराण निर्मितीतून उपदेशक श्रीकृष्ण ते गुराखी श्रीकृष्ण अथवा गोपाल असे रुप परिवर्तन झाल्याचे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. ह्या वैष्णव भक्तीपंथाचा विकास अभ्यासक मांडतात तो म्हणेज वासुदेव-कृष्ण, नारायण व विष्णु या भिन्न देवतांच्या

एकत्रीकरणाचा. नारायण या देवाला श्रीकृष्णाशी/वासुदेवाशी एकरूप करून त्याचे पूजन करणे, त्याची भक्ती करणे याभोवती भागवत संप्रदाय केंद्रित आहे. या भागवत पंथाचा मूळ आगम ग्रंथ अथवा पंचरात्र होय. या पंचरात्र पंथाच्या वाङ्मयाचे मूळ गुप्तकाळ व त्यापुढची शतके इथपासून सापडते. याच उपसाना पंथाला वैष्णव / भागवत असे नामाभिधान पुढच्या काळात प्राप्त झाले.

**वैष्णव भक्तीपंथांचे तात्त्विक स्वरूप:**

विष्णु हे ब्रह्म अथवा परमसत् मानणे हे वैष्णव भक्तीपंथाचे मूळ तत्त्व आहे. या मूळ तत्त्वास अनुसरणारे प्रमुख ४ वेदांती वैष्णव संप्रदाय प्रचलित झाले. १)रामानुजाचार्य २)निंबर्काचार्य ३)मध्वाचार्य ४)वल्लभाचार्य. जगत् सत्यत्व, ब्रह्माचे वाच्यत्व, ज्ञान-भक्ती-ईश्वरीकृपाप्रसाद या त्रयीला महत्व व ब्रह्माशी केवळ अभेद न होता भेदही राहतोच अशा प्रमुख तत्त्वांवर हे सर्व वैष्णव संप्रदाय आधारलेले आहेत.

वैष्णव भक्ती पंथाच्या स्वरूपाचा विचार करताना वैष्णव आगम ग्रंथांचा विचार करणे आवश्यक आहे. यातील पंचरात्र आगम हे भागवत शास्त्र म्हणून ओळखले जाते. यास एकायनवेद, मूलवेद, सात्वततंत्र अशीही नावे आहेत. वासुदेवाने स्वयं जे सांगितले ते हे भागवत-शास्त्र पंचरात्र होय असे ईश्वर संहितेमध्ये म्हटले आहे. हे पंचरात्र आगम तंत्रावर भर देणारे आहे. वासुदेव व विष्णु हे एकच होत असे प्रतिपादन या शाखेने सुरु केले. याचेच एकायन जे नाव हे ते महत्वाचे आहे. मोक्ष याचे फल असून ते सर्वांसाठी आहे असे प्रतिपादन वामन संहितेत आहे. वेदांचे अधिकारी सर्व नाहीत पण या एकायनवेदातून मोक्ष प्राप्त करण्याचा अधिकार मात्र सर्वांना आहे हेच यातून अधोरेखित होते. महाभारतातील नारायणीय भागात पंचरात्र तत्त्वे ही स्वयं नारायणांनीच नारदांना सांगितली असे म्हटले आहे.

पंचरात्र आगम उपासनेवर भर देणारे मुख्य दोनच संप्रदाय होत. एक रामानुजाचार्यांचा श्रीवैष्णव संप्रदाय व दुसरा मध्वाचार्यांचा तत्त्ववाद अथवा द्वैतसंप्रदाय. परब्रह्म नारायणाचे ज्ञान, त्याची उपासना पद्धती, त्या उपासनेतील तांत्रिक गोष्टी व विशेष कर्मकांडीय आचार, विधी-निषेध असे अनुक्रमे ज्ञान,योग,क्रिया,चर्या विभाग पंचरात्रात येतात. भगवान नारायणाची भक्ती व त्याच्या कृपाप्रसादाने मोक्ष हे वैष्णव संप्रदायाचे मुख्य तात्विक सूत्र आहे.

**२.३ १३व्या शतकातील महाराष्ट्रातील वैष्णव भक्ती चळवळ :**

१३व्या शतकात महाराष्ट्रात नाथ, शैव, महानुभाव व भागवत संप्रदायी लोक होते. महाराष्ट्रात तेराव्या शतकात यादव घराण्याचे राज्य होते, ज्यांचे केंद्र देवगिरी होते. या काळात महाराष्ट्राचा सांस्कृतिक आणि तत्त्वज्ञानिक विकास झाला. भक्ती चळवळीचे मूळ दक्षिण भारतातील वैष्णव परंपरेत सापडते. श्रीवैष्णव संप्रदायी अळवार संतांसारखे कार्य असले तरी महाराष्ट्रात भक्ती चळवळ स्वतंत्र रूपाने विकसित झाली. या चळवळीचे प्रमुख केंद्र पंढरपूर होते, जिथे विठ्ठलाची पूजा ही भक्ती आंदोलनाची आधारस्तंभ ठरली. संत ज्ञानेश्वरादि भावंडे व संत नामदेव हे या काळातील थोर वैष्णव होत. या काळात उच्चनीचत्वाची दरी चांगलीच असल्याचे संदर्भावरून आढळते. शूद्र,स्त्रिया या ज्ञानाच्या, भगवंत भक्तीच्या मुख्यप्रवाहात नव्हत्या. त्याबरोबरच शैव आणि वैष्णव गटही अस्तित्वात होतेच. ज्ञानेश्वरांचे कार्यक्षेत्र हे गोदावरी काठी. पैठण हे तत्कालीन विद्याकेंद्र म्हणून प्रसिद्ध होते. पुण्यस्तंभ अथवा पुणतांबे हे सुद्धा असेच एक विद्याकेंद्र होते. सामाजिक स्तरावर भक्ती वाङ्मयापासून दूर असलेल्या स्त्री-शूद्रांना ज्ञान देणे या कार्याबरोबरीने पंडितांच्या संशयांचाही परिहार करुन त्यांना यथार्थ ज्ञान देणे हा सुद्धा तितकाच महत्त्वचा उद्देश तत्कालीन टीकाकारांचा असावा असे संदर्भावरून लक्षात येते.

मध्वाचार्य त्यांच्या भारत भ्रमणात गोदावरी तीरी आले व तेथे त्यांची शोभन भट्ट या पंडितांशी भेट झाली. तेथे भरलेल्या पंडितांच्या सभेमध्ये ब्रह्मसूत्रादि अनेक ग्रंथांचा आशय समजावणारे प्रवचन आचार्यांनी केले व त्यातूनच शोभन भट्ट हे आचार्यांचे अनुयायी झाले. या शोभन भट्ट घराण्याचा इतिहास समजून घेणे येथे आवश्यक आहे. हे घराणे पुण्यस्तंभ-पुणतांब्याचे असून त्यांचे पंढरपूर येथे स्थलांतर झाले होते त्यावरूनच त्यांचे आडनाव पुढे पांडुरंगी असे पडले. पंढरपूर येथील पांडुरंगाचे पुजारी अथवा भक्त या अर्थानेच ते पांडुरंगी असे आडनाव या घराण्यास पडले. महाराष्ट्रातही त्याकाळी पंढरपूर हे भक्तीकेंद्र होते. वैष्णव भक्तीचा व समकालाचा विचार करता, रामानुजीय संप्रदाय व महानुभाव संप्रदाय हे दोन्ही त्याकाळी अस्तित्वात होते पण महानुभाव आणि रामानुजांमध्ये विठ्ठलभक्ती आढळत नाही मध्वाचार्यांच्या संप्रदायत मात्र ती रूढ आहे.

मध्वाचार्यांनी त्यांच्या चार शिष्यांना उपास्य दैवत म्हणून विठ्ठल प्रतिमाच दिल्या. आचार्यांनी ज्या परंपरेत संन्यासाश्रम स्वीकारला त्या अच्युतप्रज्ञांच्या परंपरेतही विठ्ठल प्रतिमा पूजन आढळते.

**२.४ श्रीमध्वाचार्यांच्या भक्तीपंथाचे स्वरूप :**

मध्वाचार्यांच्या संप्रदायास ब्रह्मसंप्रदाय असेही एक नाव आहे. हंसरुपी परमात्मा - ब्रह्मदेव - सनत्कुमारादि चार मुनि - दुर्वास - ज्ञाननिधीतीर्थ - गरुडवाहनतीर्थ - कैवल्यतीर्थ - ज्ञानीशतीर्थ - परतीर्थ - सत्यप्राज्ञतीर्थ - प्राज्ञतीर्थ - अच्युतप्रज्ञ - आनंदतीर्थ किंवा मध्वाचार्य अशी परंपरा आहे. या परंपरेचा मठ कर्नाटकातील बारकूर येथे होता ज्याचे नाव मुनिवृंद असे होते. ही शाखा पंचरात्री भागवत संप्रदायीच होती पण अद्वैत सिद्धांताच्या आश्रयात राहिली होती. त्यामुळेच मध्वाचार्यांनी संन्यासाश्रम स्वीकारल्यानंतर त्यांना अच्युतप्रज्ञांनी इष्टसिद्धी ग्रंथ शिकवण्यास आरंभ केला. तसेच मध्वाचार्यांनीही अद्वैती ग्रंथाचे संप्रदायानुसारी पाठ दिल्याचे चरित्रात उल्लेख आहेत.

मध्वाचार्यांचे सिद्धांताचे प्रचलित नाव द्वैत आहे परंतु आचार्य त्यांच्या मतास द्वैतवाद म्हटल्याचे संदर्भ कुठेही आढळत नाहीत. अद्वैतवादा विरुद्ध तो द्वैतवाद इतका व्यावहारिक अर्थ केल्यास आचार्यांचे मत साकल्याने समजत नाही व त्यामुळेच ते अद्वैती लोकांनी प्रतिपादिले द्वैती या व्याख्येत ते जाऊन बसतात पण ती वस्तुस्थिती नव्हे. मध्वाचार्यांची मूलभूत तत्त्वे पाहिली तर अप्रत्यक्षपणे संतांना मान्य असल्याचेच दिसून येईल. त्यामुळेच मध्वाचार्यांच्या सिद्धांतास पूर्णब्रह्मवाद, स्वतंत्रब्रह्मवाद, तत्त्ववाद अशी नावे अधिक समर्पक ठरतात.

**१. विष्णुसर्वोत्तम स्वतंत्र वस्तु :**

मध्वाचार्यांनी दोन तत्त्वे मानली ती म्हणजे स्वतंत्र आणि परतंत्र. द्वैताच्या रूढ व्याख्येहून भिन्न अशी ही भूमिका आहे हे लगेच लक्षात येते. द्वैतात दोन स्वतंत्र सत्ता मानून व्यवहार चालतो व अद्वैती मताचार्यांनी या दोन स्वतंत्र तत्त्वांच्या प्रतिपादनाचे खंडन करून एक तत्त्वाचे म्हणजे अद्वैताचे प्रतिपादन केले आहे. पण मध्वाचार्यांना दोन स्वतंत्र तत्त्वे मान्यच नाहीत. स्वतंत्र एकमेव ब्रह्मवस्तु आहे त्याचेच नाव विष्णु आहे. विष्णु हे केवळ लक्षणवाचक नसून गुणवाचक आहे व सर्व नामांनी तोच प्रतिपाद्य आहे म्हणून वेदांमध्ये वेगवेगळी नावे असली तरी मुख्यवृत्तीने ब्रह्मवस्तूच प्रतिपादक आहे कारण तीच स्वतंत्र व सर्वोत्तम आहे.

**२. जगतसत्यत्व :**

सर्व वेदांती वैष्णव आचार्यांप्रमाणेच मध्वाचार्यांनीही जगताचे सत्यत्व स्वीकारले आहे. त्यांनी जगातला प्रवाहाची उपमा दिली आहे. प्रवाह हा अनित्य आहे हे खरेच आहे पण त्यामुळे तो मिथ्य ठरत नाही. आता परब्रह्म वस्तु स्वतंत्र असल्याने कर्तुम्, अकर्तुम्, अन्यथा कर्तुम्, सर्वथा कर्तुम् अशी आहे व त्याला पाहिजे तसे विश्व ती निर्माण करू शकतो किंवा त्याने ठरवले तर करणारच नाही परंतु तो तसे करता नाही, स्वभिन्न, प्रकृतिपासून थोडे भिन्न व थोडेसे अभिन्न असे विश्व निर्माण करतो. हे स्वातंतत्र्य हीच खरी पारमार्थिक सत्ता आहे. अशाप्रकारे परब्रह्म वस्तू सोडून उर्वरित जग हे त्याच्या अधीन असे वर्तणारे आहे. ही अधीनता स्वाभाविक आहे औपाधिक नव्हे. कर्तृत्व-भोक्तृत्व शक्ति, देहादिव्यतिरिक्त व सच्चिदानंदात्मक असे जीवाचे स्वरूप आहे. व या स्वरूपाच्या अस्तित्व व अभिव्यक्तीसाठी तो सदैव स्वतंत्र वस्तु अधीन आहे. स्वतःचे हे शाश्वत अधीनतव विसरून उसने स्वातंत्र्य घेतल्याने जीव दुःखी होतो.

**३. भक्ती हे मोक्ष साधन :**

हे स्वाभाविक अधीनत्व कळण्यासाठीच भक्तीची आवश्यकता आहे. सर्ववस्तूंपेक्षा अनंत गुणांनी श्रेष्ठ स्वआत्मीय अशा परमेश्वराशी प्रतिबद्ध राहत त्याच्याविषयी असलेला निरंतर प्रेम प्रवाह म्हणजे भक्ती. ही भक्ती ज्ञानातून उगम पावते व ज्ञानात पुन्हा मिसळून परिपक्व होते. अशा परिपक्व भक्तीतून परमेश्वराचा कृपाप्रसाद प्राप्त होतो व त्याद्वारे मोक्ष मिळतो. ज्ञान कर्म उपासना या तीन अंगांचा विचार करता, ज्ञान हे प्रत्यक्ष आहे, कर्मामध्ये श्रौतस्मार्त दोन्ही कर्मांचा अंतर्भाव असून उपासनेमध्ये अंकन व नामसंकीर्तन अथवा भजन विशेष आहे. मध्वाचार्यांनी त्यांच्या तंत्रासारसंग्रह या ग्रंथामध्ये वैष्णव अष्टांग योगाचेही दिग्दर्शन केले आहे. स्वाध्याय, शास्त्रावमर्शन हरिपूजन व ध्यान ही काही प्रमुख साधना अंगे असल्याचे मध्वाचार्य सांगतात. ज्ञानोत्तर कर्म निष्फल नसून हरिप्रितीस व मोक्षोत्कर्षास कारण आहे. चारही मुक्ती मध्वाचार्यांनी स्वीकारलेल्या आहेत.

**२.५ श्रीज्ञानेश्वर महाराजांचा भक्तिपंथ :**

ज्ञानेश्वर महाराजांच्या आधी काही वर्षे भागवत संप्रदाय महाराष्ट्रात प्रचलित होता. ज्ञानेश्वर महाराज हे नाथसंप्रदायी होते पण त्यांचे अवतारकार्य हे विठ्ठलभक्ती-कृष्णभक्तीशी जोडलेले आहे. ज्ञानेश्वरांचे नेमके मत कोणते यावर अनेक अभ्यासांकांनी निरनिराळी मते मांडली असली तरी त्यांच्या ग्रंथांवरून ते अद्वैताकडेच झुकलेले दिसतात परंतु शंकराचार्यांच्या मायावादापेक्षा ज्ञानेश्वरांची धाटणी अनेक ठिकाणी भिन्न दिसते. ज्ञानापेक्षा कृष्ण / विठ्ठलभक्तीस दिलेले महत्व, जगताचे मिथ्यत्व प्रतिपादन न करणे व ज्ञानोत्तर भक्ती / कर्माचा स्वीकार करणे हे ज्ञानेश्वरांच्या सिद्धांताचा निर्णय करण्यासाठी विचारणीय अंश आहेत.

गोरक्षनाथांच्या नाथपंथ चिद्विलास्वादी आहे व त्यातून ते ब्रह्मपरिणामवादाच पुरस्कार करतात जो अद्वैत मतापेक्षा भिन्न आहे. शिवसूत्रांचा त्यातील पहिल्याच सूत्रात चैतन्यात्मा यातून स्वतंत्रत्व हे तत्त्व विशद केले आहे. परम शिवांचे स्वातंत्र्यच विश्वविकासास कारण आहे. ज्ञानेश्वरांनीही त्यांच्या अनुभवामृत/अमृतानुभवात शिव-शक्तीचेच वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरीतही याचे संदर्भ आहेत. शिव-शक्तीच्या परिणामवादपासून कृष्ण हेच परब्रह्म होय याचे दाखलेही ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर देतात ते अनंत, नारायण, सर्वेश्वर अशी श्रीकृष्णाला उद्देशून पर्याय पदे वापरून. ज्ञानेश्वरांचा हरिपाठ तर याचे एक महत्वपूर्ण उदाहरण आहे. बापरखुमादेवीवर विठ्ठल ही त्यांची नाममुद्रा देखील त्यांच्या वैष्णवत्वाचेच प्रतिक आहे. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीपासून भागवत धर्म अस्तित्वात होता हे ज्ञात आहे. भक्तीविषयीचे वर्णन ज्ञानेश्वरीच्या ६व्या व ७व्या अध्यायात विस्तृतरित्या आहे. ज्ञानेश्वरांच्या सर्व

अभंगावरून ते नामगुणोपासक होते हे लगेच कळून येईल. अशाप्रकारे ब्रह्मपरिणामवाद ते श्रीकृष्णाची परब्रह्म म्हणून गुणनाम उपासनारूप ज्ञानोत्तरभक्ती हे ज्ञानेश्वरांच्या भक्तीपंथाचे मूळ आहे.

**४. चर्चा :**

मध्वाचार्य व ज्ञानेश्वर या समकालीन संतांच्या वेळी असणारी तत्त्वज्ञानिक व अध्यात्मिक गोंधळाची स्थिती व त्यातून निर्माण झालेले हे दोन स्वतंत्र भक्तीपंथ यांचा तात्विक व सांस्कृतिक बंध आहे का? असल्यास कशाप्रकारे तो उलगडतो हा प्रस्तुत चर्चेचा केंद्रबिंदु आहे. नाथपंथ-भागवतधर्म, कर्नाटक-महाराष्ट्र संबंध, गीतार्थ, विठ्ठल-कृष्णभक्ती या साम्यस्थळांमुळेच मध्वाचार्य व ज्ञानेश्वर असे समकालीन भक्तीपंथ चिंतन शक्य होते.

**४.१ महाराष्ट्रीय भक्तीपंथातील हरिहर उपासनेचा व विठ्ठलभक्तीचे बीज कर्नाटकात?**

तुळुनाडु या कर्नाटकातील भागात नाथपंथ परिचित होता. चंद्रपुरीचा शिलालेख याबाबत प्रकाश टाकतो. ११व्या शतकात नाथपंथाचे अस्तित्व तुळुनाडु मध्ये होते. १२व्या-१३व्या शतकातही नाथपंथीय महंत-साधू कर्नाटकातील बारकूर, बसरूर इत्यादी भागांमध्ये अस्तित्वात होती. मध्वाचार्यांचे बारकूरशी नाते होते ते अच्युतप्रज्ञ या त्यांच्या गुरूंच्या तेथील मठामुळे. अच्युतप्रज्ञांच्या परंपरेत विठ्ठल उपासना आधीपासून होती. हे येथे सांगण्याचे कारण असे की, मूळ विठ्ठल भक्ती ही मध्वाचार्यांच्या संप्रदायातच दिसून येते. कारण तत्कालीन अद्वैती आचार्य हे कर्मविरोधी ज्ञानमार्गी होते व म्हणूनच रामानुजाचार्यांनी वैष्णव उपासना रूढ केली पण त्यांच्या संप्रदायात विठ्ठलभक्ती नाही. त्यामुळे विठ्ठलभक्ती रूजवण्याचे व टिकवण्याचे श्रेय हे मध्व संप्रदायाकडे जाते. मध्वाचार्यांआधी कर्नाटकातील भागवत धर्म हा शिव-विष्णु यांची समान पूजा करणारा होता. क्रोड येथे शंकरनारायण देवस्थान त्याचेच द्योतक समजले जाते. श्रीवादिराजतीर्थ यांनी त्यांच्या तीर्थप्रबंध ग्रंथात हरिहर रूपामागील अध्यात्मिक मर्म सांगितले आहे. हरिहरांनी एकत्रित अवतार धारण करून एका असुराचा वध केला त्याचे कारण त्याला तसा वर होता. म्हणून हरिहर एकत्र प्रकटले. या पौराणिक संदर्भावरुन एकत्रितरूपाची पूजा रूढ झाल्याचे दिसते. तारतम्य भक्ती मानणऱ्या मध्वाचार्यांच्या संप्रदायात विष्णुची हरिहर रूपात पूजा बांधण्याची पद्धत आजही आहे. कालांतराने शैव-वैष्णव यांच्यातील वादपरिहारासाठी हरिहरांचे मध्व संप्रदाय प्रणीत अध्यात्मिक मर्म बाजूला पडून ते महाराष्ट्रातील भागवतधर्मात मात्र तारतम्यविरहित झाले व हरिहर-अभेद प्रतिपादक झालेले दिसते.

**४.२ मध्वाचार्य व ज्ञानेश्वर यांच्यातील तात्विक साम्यस्थळे कोणती?**

**स्वतंत्रतत्त्व-अधीनत्व :**

दोन्ही संप्रदायांमधील महत्त्वाचा दुवा हा स्वतंत्र-अधीनत्व तत्त्वाचा आहे. मायोपाधित ईश्वर ज्ञानेश्वरांना मान्य नाही. नाथसंप्रदायी गुरूपरंपरा असल्याने शैव सिद्धांताप्रमाणे परब्रह्म वस्तूस स्वाभाविक स्वतंत्रत्व देण्यात

त्यांचा ओढा दिसतो. त्याशिवाय ज्ञानेश्वरांना अभिप्रेत चिद्विलास शक्य नाही. म्हणूनच ते एका अभंगात म्हणतात, मदनमूर्ति विश्वीं अळंकारिली । ते डोळयां असुमाय जाली । ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच ओवीत मंगलाचरणात ते ॐकार वाच्यरूप परमत्म्याची स्तुती करत आहेत व त्यास वेदप्रतिपाद्यत्व, वाच्यत्व देत आहेत इतकेच नव्हे तर विशेषणांनी सजवत आहेत. सर्वगत हरि व त्याचे अद्वैत हे सुद्धा अनेक अभंगांमधून पदोपदी वर्णिलेले आहे.

हेच मध्वाचार्यांच्या तत्त्ववादात अनेक प्रकारांनी विदित आहे. मध्वाचार्यांच्या संप्रदायबद्दल एक चुकीची समजूत अशी आहे की परब्रह्म वस्तूचे सर्वगतत्व येथे मान्य नाही परंतु हे विधान पूर्णतः तथ्यहीन आहे. मध्वाचार्यांच्या ब्रह्मसूत्रभाष्यापासून अनेक प्रकरण ग्रंथांपर्यंत हरिच्या सर्वगतत्वाचे कित्येक दाखले देता येतात. तेव्हा वारकरी संप्रदायात हरि हा सर्वगत असून माध्व

संप्रदायात नाही असे म्हणणे योग्य नाही. दुसरे मध्वाचार्यांनी अद्वैत संकल्पनेचेच खंडन केलेले नाही. परब्रह्म वस्तूमधील अद्वैताचे ज्ञान करून घेण्याकडेच त्यांचा ओढा आहे व अशा अद्वैत ज्ञानासच ते यथार्थ ज्ञान म्हणतात व याउलट विपरित ज्ञानास द्वैत म्हणतात हे लक्षात घेण्यासारखे आहे. स्वतंत्र परब्रह्माचे व जीवाचे अधीनत्व नाते कसे असते याचे मध्वाचार्यांनी दिलेले एक उदाहरण पाहू, यदधीना यस्य सत्ता तत्तदित्येव भण्यते विद्यमाने विभेदेऽपि मिथो नित्यं स्वरूपतः । ज्याच्याअधीन ज्याची सत्ता असते त्या अधीन वस्तूस ती स्वतंत्र वस्तूच म्हणून संबोधले जाते पण स्वरूपतः ते वेगळे असून नित्य एकत्र असतात. या दृष्टीने ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंग साहित्याकडे पाहिले तर भक्तीचे सामरस्य ज्ञात होईल. स्वतंत्र-अधीनत्वाचा हा बिंब-प्रतिबिंबभाव ज्ञानेश्वरांच्याच एका अभंगात दिसतो. मध्वाचार्यांच्या सिद्धांतात त्यास बिंबसाक्षात्कार म्हणतात.

**जगत् सत्यत्व-मिथ्यात्व :**

अवघाचि संसार सुखाचा करीन । असे म्हणणारे ज्ञानेश्वर महाराज जगाला मिथ्या म्हणत नाहीत हे लक्षात घेण्यासारखे आहे. आपण विश्व होइजे । हे असो एक मिचि विश्वी आहे । तैसा मज एकाचा विस्तारू ते हे जग अशा अनेकप्रकारे त्यांनी जगत मिथ्यात्व व त्याहून मायोपाधित ईश्वराचे ते कार्य म्हणून त्याकडे न पाहता ब्रह्मपरिणामातून त्याकडे पाहिले आहे. मध्वाचार्यांनी जगताला सत्यत्व दिले असले तरी ते ब्रह्माचापरिणाम म्हणून जग स्वीकारत नाहीत. ब्रह्म हे निमित्त कारण असून प्रकृती मूळ कारण होय. यादिशेने विस्ताराने चर्चा शक्य आहे तथापि अद्वैताने स्वीकारलेले पराकोटीचे मिथ्यात्व अथवा सत्याच्या तीन सत्ता या ज्ञानेश्वरांच्या साहित्यात दिसून येत नाहीत.

**विठ्ठल उपासना आणि ज्ञानोत्तर भक्ती :**

मध्वाचार्यांच्या संप्रदायत रामाची पूजा मुख्य असून विठ्ठल रूक्मिणीचा तेथे मागमूसही नाही असे विधानही वारकरी पंथातील पूर्वासुरी करतात परंतु हे सुद्ध तथ्यहीन आहे. मध्वाचार्यांच्या आधीपासून परंपरेत एक विठ्ठल विग्रह दिसून येतो तर मध्वाचार्यांनी विठ्ठलाचे अनेक विग्रह शिष्यांना दिले, तसेच शिष्यांच्या शाखोपशाखेतही अनेकांनी विठ्ठल उपासना केली जी आजही विग्रहांच्या रूपाने पहायाला मिळते. विठ्ठल हे श्रीकृष्णाचेच बालरूप असल्याची संप्रदायात मान्यता आहे. हा विठ्ठल व परब्रह्मवस्तू यात भेद नाही. भगवंताचे सर्व अवतार व सर्व रूपे ही त्यापासून वेगळी नाहीत हाच मध्वाचार्यांचा सिद्धांत आहे. भगवंत हा गुणपरिपूर्ण आहे. त्रिगुणांच्या पलिकडे असल्याने निर्गुण आहे तर अनंत ज्ञानानंदादि अप्राकृत कल्याणादि शुभ गुणांनी परिपूर्ण असल्याने सगुण आहे. ज्ञानेश्वरांच्या अभंगांमध्येही हेच तत्त्व दिसते,

सगुण-निर्गुण दोन्ही विलक्षण ब्रह्म सनातन विठ्ठल हा ।
अथवा तुज सगुण म्हणों की निर्गुण रे ।
सगुण निर्गुण एकु गोविंदुरे मध्वाचार्य व ज्ञानेश्वर
दोन्ही सत्पुरूषांनी ज्ञानोत्तर कर्म/भक्ती मानली आहे.
गाते श्रोते आणि पाहाते । चतुर विनोदि दुश्चिते ।
सोहंभावी पूर्णज्ञाते या सकळांतें विनवणी करा
विठ्ठलस्मरण ।

भागवद्गीता-तात्पर्य, महाभारत-तात्पर्य-निर्णय, विष्णु-तत्त्वविनिर्णय इत्यादी ग्रंथात मध्वाचार्यांनीही ज्ञानोत्तर कर्माचे तत्त्व प्रतिपादले आहे.

**नामसंकीर्तन व अंकन :**

मध्वाचार्य व ज्ञानेश्वर दोघांनी भगवद्गीतेवर भाष्य रचले. ज्ञानेश्वर हे भाष्य भावार्थ आहे असे त्यातच प्रतिपादन करतात तर मध्वाचार्य हे भाष्य गीतार्थच आहे म्हणतात. स्त्रीशुद्रादिकांना भगवंताच्या या गीताशास्त्राचा अधिकार आहे व त्याच्या प्रेमरूपभक्तीने त्यांना मोक्षही साध्य आहे याचे दिग्दर्शन दोघांनीही त्यांच्या ग्रंथात केले. मध्वाचार्य

ब्रह्मसूत्रभाष्यात म्हणतात, अंत्यज असला तरी तो नामज्ञानाचे अधिकारी आहेत तर स्त्रीशुद्रादिक तंत्राचेही अधिकारी होत. भगवंताच्या उपासनेचा, ज्ञानाचा व मोक्षाचा अधिकार सर्वांना आहे हेच तत्त्व यातून विदित होते. तथापि मध्वाचार्यांच्या संप्रदायाने कर्मठतेवर अधिकभर दिल्याचे दिसून येते व ज्ञानेश्वरांनी प्रस्थापित केलेल्या वारकरी संप्रदायातील जातीवर्णातीत वर्तणूकीचा अभाव दिसून येतो. तरीसुद्धा नामसंकीर्तन हे मध्यवर्ती आहे. मध्वाचार्यांच्याच परंपरेतूनच हरिदास भक्ती पंथ उगम पावला ज्यात पुरंदरदासादि दास झाले. नरहरितीर्थ, श्रीपादराज, व्यासतीर्थ इत्यादी यतींनी कन्नड प्राकृतात पदे लिहून सामान्यवर्गासाठी भगवंताच्या ज्ञानभक्तीचे द्वार उघडले. तेच कार्य अधिक विशालतेने ज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी भक्तीपंथाच्या माध्यमातून केले. भगवंताच्या नामाच्या, शुभचिन्हांच्या मुद्रा अंगावर धारण करणे हाही एक महत्त्वाचा बंध दोन्ही भक्तीपंथात आढळतो. मध्व संप्रदायात तप्तमुद्रा धारण करतात त्यामात्र वारकरी पंथात दिसत नाहीत पण अंकन भक्ती स्वीकारलेली आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

**निष्कर्ष :**

आतापर्यंत केलेली चर्चा ही मध्वाचार्य व ज्ञानेश्वर या समकालीन संतांच्या भक्ती पंथावर व त्यातील सांस्कृतिक व तात्विक बंधावर प्रकाश टाकणारी होती. दोन्ही संप्रदायतील साम्य स्थळांचे चिंतन करण्यासाठी ही एक दिशा आहे याविषयी आणखी विस्तृत संशोधन आवश्यक आहे. पण दोन वैष्णव भक्तीपंथांनी मूळ पांचरात्र भागवतात वर्णिलेला श्रीकृष्णाच्या-परब्रह्माच्या भक्तीचा व त्यातून त्याच्या प्राप्तीचा “एकायन वेद” अशाप्रकारे सर्वांसाठी विठ्ठलभक्तीच्या माध्यमातून खुला केला हेच यातून अधोरेखित होते.

**संदर्भसूची :**


1. 1.डॉ.जोशी केशव रामचंद्र. (२००४). शिवसूत्रे. सिद्धयोग प्रकाशन.
2. साखरे महाराज. (२०१३). सार्थ ज्ञानेश्वरी. यशोधन प्रकाशन.
3. जयस्वाल, स. (n.d.). वैष्णव दर्शन. कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
4. हेन, न. (१९८६). ए रिव्होल्युशन इन कृष्णिझम, द कल्ट ऑफ गोपाल. हिस्टरी ऑफ रिलीजन्स, २५(४), २९६-३१७. : https://www.jstor.org/stable/1062622
5. राव एस.के., र. (२००५). द आगम एन्सायक्लोपिडिया. श्री सत्गुरू पब्लिकेशन्स.
6. ए.वी, प. (२०१७). हिस्टरी ऑफ पांडुरंगी फॅमिली. धर्मप्रज्ञा.
7. नरहर, द. (२०२२). ज्ञानेश्वरदर्शन भाग १ व २. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
8. Dr. Paduru Gururaja Bhat. (१९७५). Studies In Tuluva History and Culture.
9. Bannanje Govindacharya. (1980). Sarvamula Grantha - Gita Prasthana. Akhila Bharata Madhva Maha Mandala.
10. Sharma, B. (1962). Philosophy of Madhvācārya. Bharatiya Vidya Bhava

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# सोनोपंत दांडेकरांचे जीवनस्पर्शी तत्त्वज्ञान

**डॉ. किरण जयदेव सावे**
प्राचार्य, सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर
**Corresponding Author: डॉ. किरण जयदेव सावे**
**Email**– asthakiran@rediffmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14546912**

**सारांश:**

वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक, श्री ज्ञानेश्वरीचे महान संशोधक आणि संपादक, संत-वाङ्.मयाचे आजन्म अभ्यासक, व्यासंगी उपासक निष्ठावान प्रचारक आणि रसाळ प्रवचनकार, पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य आणि पुणे विद्यापीठाचे संस्थापक सदस्य ह.भ.प. शंकर वामन (सोनोपंत) उर्फ मामासाहेब दांडेकर हे एक आधुनिक संत म्हणून ओळखले जातात.

सोनोपंत दांडेकर हे महाराष्ट्रातील एक थोर तत्त्वज्ञ, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि लेखक होते. त्यांनी वेदांत तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून त्याला आधुनिक काळाशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांमध्ये वैयक्तिक उन्नती, सामाजिक प्रबोधन, धर्माच्या आधुनिक रूपाचे विवेचन, आणि शिक्षणाद्वारे समाजाचे परिवर्तन करण्यावर भर होता. त्यांचे तत्त्वज्ञान व्यापक, व्यावहारिक आणि काळाच्या पुढचे होते. त्यांनी भारतीय समाजाच्या पारंपरिक जडणघडणीला नाकारत नव्या दिशेने विचार करण्याचे आवाहन केले. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाच्या गाभ्याला समजून घेण्याची त्यांची जिज्ञासा मोठी होती. परंतु, त्यांनी पारंपरिक धर्मविचार नाकारून, विज्ञाननिष्ठ आणि विवेकाधारित विचारसरणीकडे वळण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांवर वेदांत तत्त्वज्ञान, महात्मा गांधींच्या सत्याग्रह चळवळीतील नैतिक विचार, स्वामी विवेकानंदांचा कर्मयोग, आणि प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता.

**प्रस्तावना**

सोनोपंत यांनी कर्मयोगाला त्यांच्या विचारांमध्ये केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या मते, वैयक्तिक किंवा सार्वजनिक जीवनात कर्म करताना निःस्वार्थीपणा आवश्यक आहे. त्यांनी श्रीमद्भगवद्गीतेतील "निष्काम कर्मयोग" (कर्म कर, पण कर्म फलाची अपेक्षा करू नकोस) या तत्त्वाला आपल्या विचारांचा आधार बनवले. ते म्हणत, “कर्म ही केवळ उपजीविकेची गरज नाही, तर ते समाजासाठी योगदान देण्याचे एक माध्यम आहे.” कर्मयोगाच्या माध्यमातून व्यक्तीची वैयक्तिक प्रगती होऊ शकते तसेच समाजही बदलू शकतो अशी त्यांची धारणा होती.

सोनोपंत दांडेकर यांनी लोकांना धर्माचे आधुनिक रूप दाखवले. त्यांच्यासाठी धर्म हा कर्म, प्रगती, आणि मानवतेसाठी काम करण्याचा मार्ग होता. पारंपरिक धार्मिक कर्मकांडांऐवजी त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकावर आधारित धर्माची कल्पना मांडली. ते म्हणत, “धर्म म्हणजे केवळ उपासना नाही, तर तो समाजसेवेचा मार्ग आहे.” धर्म हा माणसाला एकत्र आणण्याचे साधन आहे, त्याने लोकांमध्ये भेदभाव निर्माण होऊ नये, असा त्यांचा आग्रह होता. सोनोपंत दांडेकर यांचे तत्त्वज्ञान सर्वसमावेशक आणि जीवनस्पर्शी होते. त्यांनी जातीपातीच्या भेदभावाविरोधात आवाज उठवला आणि सर्वांना समान संधी मिळावी, यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या मते, समाजातील प्रत्येक घटकाला आपला वाटा मिळाला पाहिजे, आणि समाजाने कोणालाही डावलू नये. ते म्हणत की, “मानवता हीच सर्वश्रेष्ठ आहे. आपण सर्वजण एकाच विश्वाच्या कुटुंबाचा भाग आहोत.”

स. प. महाविद्यालयाच्या प्राचार्यपदावरुन निवृत्त झाल्यावर १९५१ ते १९६३ दरम्यान त्यांनी महाराष्ट्रात गावोगावी कीर्तने प्रवचने करुन सर्वसामान्य लोकांना नीतीधर्माचा उपदेश करुन त्यांना अंधश्रध्दामुक्त असा सन्मार्गाचा रस्ता दाखविला. त्यांचे व्यक्तिमत्व असे होते की, त्यांना पाहूनच लोकांना समाधान वाटत असते. त्यांच्या कीर्तनात त्यांचे जवळून दर्शन व्हावे म्हणून अनेक लोक दोन दोन तास आधी येऊन जागा पकडून ठेवीत असत. याच काळात त्यांनी ज्ञानेश्वरी, नामदेव गाथा, भावार्थ रामायण इत्यादी संत साहित्य संशोधित करुन शुध्द स्वरुपात लोकांपुढे ठेवले. याशिवाय ज्ञानदेव आणि प्लेटो, ईश्वरवाद,

अध्यात्मवादाची मूलतत्वे, अभंग संकीर्तन-भाग १, २, ३, ज्ञानदेव चरित्र, वारकरी पंथाचा इतिहास, गीतेच्या श्लोकावर प्रवचने, जोग महाराजांचे चरित्र इ. मौलिक ग्रंथ लिहिले. तसेच अनेक ग्रंथांचे संपादन केले. 'ईश्वरवाद' या ग्रंथात त्यांनी एकेश्वरवाद, नास्तिकवाद, देवधर्माचे भवितव्य व ईश्वरदर्शन या विषयांची चर्चा केली आहे. 'अध्यात्मशास्त्राची मुलतत्वे' या ग्रंथात त्यांनी अध्यात्मशास्त्राचा उगम तसेच अध्यात्मशास्त्राचा तपशीलाने विचार करताना विज्ञान, मानसशास्त्र, गीती, इत्यादी ज्ञानशाखांशी अध्यात्मशास्त्राचा काय संबंध आहे याचीही चर्चा केली आहे. 'श्री ज्ञानदेव चरित्र' या ग्रंथात त्यांनी ज्ञानदेवांचे चरित्र आणि तत्त्वज्ञान यांच्याशी सामान्य वाचकांचा स्थूल परिचय व्हावा व ज्ञानदेवांच्या मूळ ग्रंथांकडे त्यांची प्रवृत्ति व्हावी या उद्देशाने त्यांनी ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा उहापोह केला आहे.

'गीतेच्या श्लोकांवरील प्रवचने' या ग्रंथात त्यांनी परमात्म्याचा अपरोकक्षानुभव, त्याचे सर्वव्यापी दर्शन व त्याच्याशी समरसता हि कोणत्या साधनाने प्राप्त होते हे सांगितले आहे.'वारकरी पंथांचा इतिहास' या ग्रंथात वारकरी पंथांचे ओझरते दर्शन व तत्त्वज्ञान याची चर्चा केली आहे. 'अभंग-संकीर्तन' भाग-१ हा ग्रंथ लिहिण्याचा उद्देश वारकरी हे अभंगांवर ज्या पद्धतीने निरुपण करतात, ती पद्धत अ-वारकरी जीज्ञासुंच्या समोर मांडवी असा आहे. 'अभंग-संकीर्तन' भाग-२ या कीर्तन मालेत 'प्रसाद'च्या अंकांतून प्रसिद्ध झालेले नऊ अभंग व त्यात नवीन दोन अशा अकरा अभंगांची कुसुममाला गुंफली आहे. यात भजनात अपरिचित असणाऱ्या तुकोबांच्या तत्वज्ञानावर प्रकाश टाकणारे पण सामन्यात: माहित नसणारे रसाळ अभंग दिलेले आहेत. 'अभंग संकीर्तन' भाग-३ यात श्री ज्ञानदेव, श्री नामदेव, श्री एकनाथ, श्री तुकोबा व श्री निळोबा या वारकरी संतांचे बारा अभंग आहेत.

धार्मिक ग्रंथांवर फुले वाहून पारायणे करण्यापेक्षा त्यातले नैतिक विचार आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. गंध उभे की आडवे, जपमाळ १०० की १०८ मण्यांची? या क्षुल्लक कारणावरुन नवे धर्म बनवू नका, धर्माला अध्यात्माची जोड द्या. धर्म म्हणजे आत्मधर्म. तो साधण्यासाठी भक्तिप्रधान, उदार भागवतधर्माची गरज आहे, असे विचार त्यांनी मांडले.सोनोपंतांनी कीर्तनासाठी अभंग घेताना रामदासी संप्रदायाचाही समावेश जाणीवपूर्वक करून घेतला. अनेक फडाफडांमधील द्वेषभाव काढून टाकण्यासाठी एका फडावरचे, दुसऱ्या फडावरचे कीर्तन असा भेद करून कीर्तन ऐकायला आडकाठी केली नाही. कोणत्याही देवतेच्या कोणत्याही मंदिरात कीर्तनाला (कीर्तन करण्यास व ऐकण्यास) पूर्ण मुभा दिली.

पुणे शहरातील एका श्रेष्ठ दर्जाच्या महाविद्यालयाचे प्राचार्यपद भूषविणाऱ्या या तत्त्वज्ञानाच्या आधुनिक प्राध्यापकाने महाराष्ट्रातल्या बहुजन समाजाच्या अंतःकरणात जे प्रेमादराचे स्थान मिळविले, तसे आजपर्यंतच्या कोणत्याही पाश्चात्य विद्याविभूषिताने महाराष्ट्रात मिळवलेले नाही. जुन्या परंपरा आणि नव्या कल्पना यांच्यामध्ये भावभक्तीचा जिवंत जिव्हाळा निर्माण करून त्यांची सोनोपंतांनी सोज्वळ सांगड घातली. सोनोपंतांनी जुने सोडले नाही. त्यांनी नवे पकडले नि ते जुन्यावर चढविले नि जडविले. सोनोपंतांनी आपल्या आयुष्यात अनेक महत्वपूर्ण कामे केली. १९५३ च्या आषाढी एकादशीच्या पुण्यदिनी त्यांनी जी 'सार्थ ज्ञानेश्वरी' प्रसिद्ध केली, ते त्यांच्या अनेक वर्षाच्या अभ्यासाला आणि संशोधनाला आलेले अमर फळ होय. मराठी साहित्यात राजवाड्यांच्या 'ज्ञानेश्वरी' नंतर दांडेकरांच्या 'ज्ञानेश्वरी' चे नाव घेतले जाते. 'सार्थ ज्ञानेश्वरी' ला सोनोपंतांनी १५० पृष्ठांची प्रदीर्घ, मार्मिक नि रसाळ भाषेत देऊन त्यातील अनेक गहन स्थळे सर्वसामान्य वाचकांच्या आटोक्यात आणून सोडण्यात सोनोपंतांनी कमालीचे यश मिळविले आहे. त्याखेरीज 'ज्ञानेश्वरी'तील कठीण शब्दांचा कोश शेवटी जोडून सर्वसामान्य अभ्यासकाचा मार्ग त्यांनी अत्यंत सुकर करून ठेवला आहे.

सुसंस्कार बरोबर घेऊनच त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला आणि त्या दोन्ही गोष्टींची अखंड सावलीप्रमाणे आयुष्यभर त्यांनी सोबत केली. तथापि, आपल्या ज्ञानाची व विद्वतेची लक्ष्मी प्रसन्न व्हावी म्हणून त्यांनी आराधना केली नाही. संसाराच्या मोहपाशात स्वतःला अडकवून न घेता, इतरांचे संसार सुखी कसे होतील याची त्यांनी अहर्निश चिंता बाळगली. विद्यादान, ज्ञानप्रसार व समाजसेवा हेच आपले ध्येय ठरवून त्यानुसार त्यानुसार सतत आपले कार्य चालू ठेवले. कै. विष्णुबुवा जोग व गुरुदेव रानडे यांच्या अध्यात्मिक विचारांची त्यांच्यावर छाप पडली आणि शुद्ध ज्ञान व मंगल भक्ती यांचा संगम त्यांच्या ठायी झाला. वारकरी पंथात ते सामील झाले म्हणून त्यांनी ज्ञानसाधना कधीच सोडली नाही. ज्ञान व भक्ती यांचा समन्वय साधून एक नवा आदर्श निर्माण केला. निर्मल चारित्र्य हा एक अमोल ठेवा असल्याचे ते मानीत व आपल्या शुध्द आचरणाने इतरांना प्रभावित करीत. साहजिकच शुद्ध चारित्र्यामुळे त्यांच्या विचारांना आणि आचारांना एक वेगळे तेज प्राप्त झाले.

संतांचा धर्म आणि आजच्या अणुयुगाचे मर्म यांचा समन्वय त्यांच्या विचारात, उक्तीत आणि वृत्तीत परिपूर्णपणे झालेला होता. भक्तिमार्गाला अद्ययावत शास्त्र-कल्पनांची जोड देत सोनोपंतांनी या ऐतिहासिक पंथाला खरेखुरे सामाजिक-सर्व समाजाला सर्वकालआधार ठरणारे-व्यापक, नित्य, नवे चैतन्ययुग आणि बुध्दीच्या निकषावर टिकणारे रुप देण्याची जिद्द बाळगली आणि त्यासाठी ते काया-वाचा-मने झटले व झिजले. विचाराने हे करताना आचाराने त्यांनी

कित्येकांना प्रेम-वात्सल्य दिले, मार्गदर्शन केले; किती खचती मने सावरली, अनेक कोसळते संसार उभे ठेवले. या अफाट व्यापात सोनोपंतांना आपला संसार सुचलाच नाही. खऱ्या वैष्णावाप्रमाणे त्यांनी जगाचा संसार केला. प्राध्यापक अथवा प्राचार्य म्हणून असोत, संस्थाचालक म्हणून असोत किंवा भक्तिमार्गी प्रसारक म्हणून असोत, आपली प्रत्येक भूमिका त्यांनी तन्मयतेने व नम्रतेने बजावली. त्यांचा विचार व आचार, उक्ती व कृती यात कधीही अंतर नसते, अशी त्यांची त्यांच्या सहकाऱ्यात व चाहत्यात ख्याती होती. सोनोपंत विचाराने तसेच आचारानेही तत्त्वज्ञानी राहिले.

वारकरी पंथांचे ते आधारस्तंभ होते आणि त्या समाजात ते देहभान विसरून समरसही झाले. तथापि त्या संप्रदायापुरतीच यांची ही समरसता मर्यादित नव्हती. वारकरी हेही, अखेरीस समाजाचेच एक अंग असल्याने सर्व समाजावर सोनोपंतांनी अलोट प्रेम केले. सर्व समाजाची सुखदु:खे ही आपलीच मानली. आपल्या शक्तीनुसार समाजाला वळण लावण्याचा, आपल्या आदर्श वर्तनाने समाजात चारित्र्य व शील रुजविण्याचा हसतमुखाने व भक्तिभावाने प्रयत्न केला. सर्वांभूति समता या धर्माचे आचरण केले आणि जणू काही आपले नश्वर जगातील जीवितकार्य संपले आहे या भावनेने ०९ जुलै १९६७ रोजी ते अनंतात विलीन झाले.

**संदर्भ ग्रंथ** :

1. सोनोपंत: चरित्र व कार्य: स.के. नेउरगांवकर, प्रथम आवृत्ती.
2. येणे बोधे आम्हा। असो सर्व काळ।। (सोनोपंत दांडेकरः चरित्र, कार्य, तत्त्वज्ञान),
3. यशवंत पाठक, ग्रंथाली, मुंबई
4. सार्थ ज्ञानेश्वरी: स.पा. शंकर वामन दांडेकर, चौथी आवृत्ती
5. वारकरी पंथाचा इतिहास शं. वा. दांडेकर, दुसरी आवृत्ती
6. अभंग संकीर्तन भाग 1 ते 7, शं.वा. दांडेकर, पहिली आवृत्ती
7. ईश्वरवाद: शं.वा. दांडेकर, दुसरी आवृत्ती
8. अध्यात्मशहस्त्राची मूलतत्वे, शं.वा. दांडेकर, दुसरी आवृत्ती

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# सामाजिक नैतिक जीवन में भारतीय संतों की भूमिका

**रूपाली भगवान महाले[1],डॉ. हनुमंत जगताप [2]**
[1]शोधछात्रा, न्यू आर्ट्स कमर्स एंड साइंसकॉलेज अनुसंधान केंद्र,अहिल्यानगर
[2]शोध पत्र सहायक
**Corresponding Author: रूपाली भगवान महाले**
**DOI- 10.5281/zenodo.14546978**

**सारांश:**

❖ **महाराष्ट्र**

विश्व में भारतवर्ष को साधु संतों की भूमि कहा जाता है। हमारी ऐसी मान्यता है की संपूर्ण विश्व में केवल भारतवर्ष अर्थात हिमालय से कन्याकुमारी तक और अटक से कटक तक का भूखंड ही योगभूमि कहलाता है, अन्य संपूर्ण संसार भोग भूमि के रूप में पहचाना जाता है। हमारे देश की आध्यात्मिक चेतना का आधार ही तप और योग है। ऐसा माना जाता है कि हजारों वर्षों से यहां बड़े-बड़े महान ऋषि मुनियों ने अपने योग और तप के बल पर सांसारिक सत्य को जाना और पहचाना। जिस विराट सत्य की खोज में मनुष्य जीवन से मृत्यु तक लगातार लगा रहता है, उसे हमारे देश की भूमि पर जन्मे साधु संतों और देवताओं ने बहुत पहले ही खोज और समझ लिया था। यही कारण है कि रामकृष्ण भगवान बुद्ध और अन्य महापुरुषों ने इस भूभाग के सामाजिक ताने-बाने को अपने जीवन से अत्यधिक प्रभावित किया। हजारों वर्ष बीत जाने के बाद भी उनके द्वारा स्थापित जीवन मूल्य और सामाजिक नैतिकता आज भी संपूर्ण देश के सामाजिक ढांचे में देखी जा सकती है।

**प्रस्तावना:-**

वास्तव में भारतीय परंपरा को ही भारतीय संस्कृति कहा जाता है। जिसे मनुष्य जीवन के उच्च और आदर्श नैतिक मूल्यों को संपूर्ण समाज के ताने-बाने में और जीवन शैली में संजोकर रखा है। अनेक पौराणिक और ऐतिहासिक महान पंडितों, राजाओं,योद्धाओं और समाज के वीर पुरुषों की गाथाओं को उठा कर देख लीजिए सभी में एक समान जीवन के उच्च आदर्शों को सहजता से देखा जा सकता है। इसीलिए तो भारतीय समाज का ताना-बाना पारिवारिक रिश्तों से लेकर सामाजिक रिश्तों तक चलता है, और समाज से होते हुए प्रांत और देश की राष्ट्रीयता के साथ अपने आप को बांधकर राष्ट्रभक्ति के रिश्ते में जुड़कर संपूर्ण देश को अपनी जन्मभूमि मानता है। भारतवर्ष के आदि पुरुष भगवान श्री राम ने लक्ष्मण से कहा था, " जननी जन्मभूमिस्यच स्वर्गादपि गर्यसीं "। अर्थात हम जिस देश में रहते हैं उसे देश की भूमि को मातृभूमि कहा जाता है और मातृभूमि के प्रति प्रेम स्वर्ग से भी बढ़कर माना गया है।

पौराणिक काल से चलकर ऐतिहासिक कालखंडो के विभिन्न महापुरुषों के जीवन की गाथाओं को यदि देखा जाए तो सभी में नैतिकता से भरी हुई सामाजिक चेतना स्पष्ट रूप से दिखाई देती है।

" तुलसी साथी विपत्ति के विद्या विनय विवेक।
साहस सुकृति सुसत्यव्रत राम भरोसे एक।"

संत तुलसीदास जी कहते हैं कि किसी भी विपदा से यह सात गुण आपको बचाएंगे 1.विद्या2. विनय 3.विवेक 4.साहस 5.आपके भले कर्म 6सत्य निष्ठा और 7भगवान के प्रति आपका विश्वास। संत तुलसीदास जी ने श्री रामचरितमानस तथा अन्य कई ग्रंथो की प्रचलित भाषा में रचना करके सामान्य जनों को आदर्श जीवन जीने की रीति बताइए और उनके जीवन को भक्ति रस से लाभान्वित कर दिया।

संतों का जीवन समाज के लिए ही पूरी तरह समर्पित रहता है सच्चा संत अपने जीवन में लोभ, माया, मोह, मद तथा मत्सर इन अवगुणों का त्याग कर योगी बन समाज में ज्ञान तथा मार्गदर्शन में की दिशा दर्शाने का कार्य करते हैं। इनमें संत कबीर,संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम,संत मीराबाई और रविदास तक सभी वर्गों के संतों ने समाज को आदर्श तथा नैतिक मूल्यों का प्रभाव स्थापित करने का सफल प्रयास किया है, क्योंकि आज समाज में जाति-पाति को लेकर कई सारी समस्या आ रही है उसमें

संतों की उद्बोधन बहुत लाभप्रद रहे हैं आज भी उसका परिणाम दिखता है।

संत रविदास की कुछ पंक्तियां,

"चाम का हस्ती, चाम का घोड़ा, चाम का जगत व्यवहारा।
कह रविदास सुनो रे विप्रो जो चाम से न्यारा सो
गुरु हमारा।"

उपर्युक्त पंक्तियों से स्पष्ट है कि संत रविदास ने विविध उपमानों द्वारा एक तत्व की सर्वव्यापकता सिद्ध की है। आज के आधुनिक युग में भी संतों का महत्व अन्य साधारण है स्वामी रामकृष्ण परमहंस हो या स्वामी विवेकानंद जो संपूर्ण भारत की यात्रा कर नवयुवकों के प्रतिनिधि बने और उनके लिए एक संदेश दिया,

"उठो जागो और तब तक ना रुको
जब तक अपने लक्ष्य की प्राप्ति ना कर लो "

ऐसा केवल एक संत ही किसी को अपने लक्ष्य की ओर प्रेरित करने हेतु प्रेरणा देता है, क्योंकि यह वाक्य केवल बाहरि प्रेरणा नहीं अंत: प्रेरणा को भी चेतना देते हैं।

**उपसंहार-**

समाज में नैतिकता विकास और प्रगति का श्रेय भारतीय संतो को ही है,क्योंकि आध्यात्मिक सांस्कृतिक भौतिक तथा अन्य सभी दृष्टियों से समाज का उत्थान हमारे संतो महापुरुषों के द्वारा ही हुआ है। नारी में भी शक्ति स्वरूपा देवी का रूप बतलाकर अंधविश्वास को दूर कर ज्ञान में विज्ञान की डोर को विकास की ओर ले जाने का प्रयास करते दिखाई देते हैं। साथ ही संतों के ज्ञान तथा भक्ति के संयोग से मनुष्य को सन्मार्ग पर चलने की प्रेरणा मिलती है।

**संदर्भ सूची**

1. रामचरितमानस - तुलसीदास
2. कबीर -हजारी प्रसाद द्विवेदी
3. हिंदी साहित्य का इतिहास- आचार्य रामचंद्र शुक्ल
4. राजयोग- स्वामी विवेकानंद
5. संत रविदास-एम.एस.शर्मा

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान: एक अभ्यास

**लोखंडे सुखदेव निवृत्ती[1], डॉ. एस.एस.आकाशकर[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे
[2]संशोधक मार्गदर्शक,तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे
**Corresponding Author: लोखंडे सुखदेव निवृत्ती**
**Email:** Sukhadevlokhande7@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14547031**

**प्रस्तावना:**

**‘ गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान: एक अभ्यास ‘**

प्राचीन भारतीय संस्कृती ही अनेक रूढी ,परंपरा ,चाली , रिती आणि संप्रदायांनी भरभराटीस आली या संस्कृतीच्या भरभराटीस अनेक घटक कारणीभूत आहेत . यातील नाथसंप्रदाय हा संप्रदाय म्हणून केव्हा प्रचलित झाला हे ठामपणे सांगणे खूप कठीण असे काम आहे .अशा या नाथसंप्रदायालाच शैव संप्रदाय म्हणूनही ओळखले जाते या संप्रदायाचा उगम आदिनाथ शिव यांच्या पासून झाला . पुढे यालाच नाथसंप्रदाय म्हणून ओळखले जाऊ लागले ‘ नाथ ‘ या शब्दाचा अर्थ रक्षण करणारा स्वामी आणि नाथसंप्रदाय म्हणजे रक्षण करणाऱ्या स्वामीचा संप्रदाय होय . या संप्रदायात नाथयोगी ‘ नाथ ‘ , परमेश्वर यास परमपद मानून ते प्राप्त करण्यासाठी योग्यास योगाचरण करण्यास सांगितले आहे . प्रामुख्याने या संप्रदायाची दीक्षा प्राप्त झाल्यावर योगसाधक आपल्या नावा पुढे ‘ नाथ ‘ ही उपाधी लावतात . या अनुयांचे प्रमुख ध्येय हे योगाच्या माध्यमातून सिद्धावस्था किंवा अवधूतावस्था प्राप्त करणे .याच कारणामुळे हा संप्रदाय सिद्ध संप्रदाय , अवधूत संप्रदाय या नावाने ही ओळखला जातो . त्याचबरोबर कर्णकुंडल धारण करण्यामुळे त्यास ‘ दर्शनी ‘ , गोरख पंथी , गोरखनाथी संप्रदाय , कानफाटा संप्रदाय , गुरु संप्रदाय या नावाने ही तो परिचित आहे. परंतु नाथ संप्रदाय या नावानेच तो अधिक परिचित आहे. या नाथसंप्रदायाचे आदिनाथ शिव हे मूळ प्रवर्तक म्हणून ओळखले जातात . तर त्यांचे शिष्य मच्छिंद्रनाथ हे या संप्रदायाचे पहिले मानवी गुरु होत . या संप्रदायाला नावा रुपास आणण्याचे खरे श्रेय गोरक्षनाथांना दिले जाते . या कारणामुळेच मत्स्येंद्र शिष्य गोरक्षनाथ हे मध्ययुगीनकालीन सर्व साधनामार्गात नाथसंप्रदायाचे प्रवर्तक म्हणून ओळखले जातात. त्यांनी अखिल भारतीय पातळीवर सर्व सिद्धांना संघटित करून, दहाव्या शतकापर्यंत विकृतावस्थेत गेलेल्या तांत्रिक वामचारी उपासनेला पायबंद घातला आणि शुद्ध योगमार्गाच्या पायावर एका नवीन परंपरेची प्रस्थापना केली ती करीत असताना त्यांनी सर्वप्रथम श्रीशैल पर्वतावर योगिनीच्या मेळाव्यात सापडलेल्या आपल्या गुरूचे मन वळवून त्यांना पुन्हा शुद्ध योगमार्गात आणले. हाच या नाथसंप्रदायाचा आरंभ बिंदू किंवा उगम होय.

वज्रयानी, सहजयानी, कापालिक, शाक्त , कौलमार्गी इ. मार्गातील सिद्धांना शुद्ध योगमार्गाच्या आणि शुद्ध नैतिक आचारणांच्या पायावर संघटित करून, भारतीय साधनमार्गाला नवोदित नाथसंप्रदायाच्या रूपाने नवे वळण प्राप्त करून देण्याचे कार्य गोरक्षनाथांनी हयातभर केले. त्यांचा हा संप्रदाय-प्रवर्तनाचा व प्रसाराचा काळ हा त्यांच्या एकुण जीवनाचा कालखंड मानला जातो.प्रस्तुत संशोधनातून गोरक्षनाथांच्या दैनंदिन जीवन व्यवहारातील तत्त्विक दृष्टिकोणाला समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. गोरक्षनाथांचे जीवन नाथपंथामध्ये महत्त्वपूर्ण मानले जाते, तत्त्वज्ञानामध्ये गोरक्षनाथांच्या जीवनपटाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वर वर पाहता त्यांचे जीवन अतिशय साधे आणि निरंकारी वाटत असले तरी त्यांच्या प्रत्येक व्यवहारांचा, कृतीचा तात्त्विक अन्वयार्थ लावणे तितकेच महत्त्वाचे आहे, प्रस्तुत संशोधनातून हाच प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये: (Objectives)**

**१. गोरक्षनाथांच्या तात्त्विक इतिहासाचा वेध घेणे -**

यामध्ये गोरक्षनाथांच्या तात्त्विक इतिहासाचा वेध घेताना नाथ संप्रदायातील पहिला ऐतिहासिक पुरूष मत्सेंद्रनाथ व शिष्य गोरक्षनाथ या गुरू-शिष्यांविषयी जी कमालीची गुढता आहे. त्याचा याठिकाणी वेध घेऊन गोरक्षनाथांचे जीवन कार्य समजून घेत मत्सेंद्रनांथांचा व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार या ठिकाणी केला आहे.

**२. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानांच्या विविध पैलूंची मांडणी केली आहे -** यामध्ये गोरक्षनाथांनी मांडलेले आपले तात्त्विक विचार, तसेच योग साधना विषयी मांडलेल्या विचारांचा याठिकाणी वेध घेतला आहे .

**३. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचा आधुनिक समाजावरील पडलेल्या परिणामांचा आढावा घेतला आहे -**

यामध्ये आधुनिक समाजावर कोणत्या प्रकारे गोरक्षनाथांच्या तात्त्विक विचारांचा परिणाम झाला आहे ; तसेच आधुनिक समाजात गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान आजही

संयुक्तिक व महत्त्वपूर्ण वाटत आहे. हे तत्त्वज्ञान समजण्यास व अनुभूतीस कठीण वाटत असले तरी त्यातील अनेक बारकावे आजच्या समाजरचनेला नवी दिशा देतात हे आपणास दिसून येते .

**४. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासावर गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचा कसा प्रभाव पडला याचा वेध घेतला आहे –**

याठिकाणी महाराष्ट्राच्या संस्कृतीवर गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर पडलेला दिसतो. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय,महानुभव पंथ, दत्त संप्रदाय यांसारख्या सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या पथांच्या मुळाशी नाथसंप्रदाय असल्याचा उल्लेख काही ग्रंथात दिसतो.याचे तात्त्विक विश्लेषण केले आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनात संहिता विश्लेषण पद्धतीचा व आशय विश्लेषण पद्धतीचा वापर केला आहे.गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानावर आधारीत **सिद्ध-सिद्धांत पद्धती ', ' गोरख बानी ', 'अमनस्कयोग ', ' योगबीज ', ' गोरक्षपद्धती ','अमरौघशासनम् ' 'श्रीमहार्थमंजरी '** यांसारख्या मुळ ग्रंथांचा संहिता विश्लेषणासाठी किंवा आशय विश्लेषणासाठी वापर करण्यात आला आहे. तसेच गोरक्षनाथांच्या जीवन चरित्रावर आधारीत ग्रंथांचा व संशोधन लेखांचा प्रस्तूत संशोधनासाठी उपयोग करण्यात आला आहे , त्याच बरोबर वर्णनात्मक पद्धतीचाही वापर केला आहे.

गोरक्षनाथांच्या अहमदनगर जिल्हयातील देवस्थानांचा (डोंगरगण - गोरक्षनाथ गड , मढी, सावरगाव) क्षेत्रीय अभ्यास करून स्थानिक समाज जीवनावर पडणाऱ्या सांस्कृतिक-तात्त्विक प्रभावाचे अध्ययन करताना गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान महाराष्ट्रीयन संस्कृतीला अधिक बळकटी देतांना दिसते .महाराष्ट्रातील स्थानिक भाषा व्यवहारांमध्ये या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला दिसतो. या सर्व माहितीसाठी क्षेत्रीय अभ्यास पद्धतीचा वापर केला आहे. या क्षेत्रीय अभ्यासातून डोंगरगण - गोरक्षनाथ गड, मढी, सावरगाव इत्यादी ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन गोरक्षनाथांच्या विचारांचा प्रभाव आणि महाराष्ट्राची संस्कृती समजून घेतली आहे.

**प्रकरण पहिले :प्रस्तावना**

पहिल्या प्रकरणात ' गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान : एक अभ्यास ' या विषयाची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकरणाच्या सुरुवातीला विषयाची प्रस्तावना देऊन संशोधन विषयाचे स्वरूप ,व्याप्ती व महत्त्व मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच या प्रकरणातून संशोधनाची उद्दिष्ट्ये मांडलेली आहेत. प्रकरणाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये गोरक्षनाथकालीन तात्त्विक परिस्थिती,गोरक्षनाथांच्या व्यक्तित्त्वाची जडणघडण,गोरक्षनाथांच्या समकालीन तत्त्वज्ञानाचे योगदान आणि गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या प्रकरणातून प्रामुख्याने खालील विश्लेषण मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

गोरक्षनाथ हे मध्ययुगीन भारतातील एक युगप्रवर्तक महापुरूष म्हणून ओळखले जातात. त्याचा प्रभाव भारतीय जनमाणसावर त्याचबरोबर नेपाळ, तिबेट, बांग्लादेश इत्यादी देशातील जनमाणसांवरही पडला होता. ते एक प्रभावी शक्ती म्हणून ओळखले जात होते. त्यांची संघटन शक्ती अपूर्व होती. मध्ययुगीन भारतात त्याकाळी गोरक्षानाथांइतका श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व असलेला दुसरा पुरूष कोणी आढळणार नाही. स्फटिकासारखे निष्कलंक चारित्र्य व कुशाग्र बुद्धिमत्ता यांमुळे त्यांचा प्रभाव भारतीय लोकजीवनावर पडल्याचे आपणास दिसते. त्या काळात भारतीय साधना विश्व अधःपतित झाले होते. गोरक्षनाथांनी निग्रहाने आणि कठोर सत्यनिष्ठेने भारतीय साधनेचे उत्थान घडविले . त्यांनी रूढी व कुप्रथांवर कठोर वृत्तीने आघात केले. ते स्वतः महाज्ञानी असूनही, ग्रंथ हे लक्ष्य नसून साधन आहे, याची त्यांनी सदैव जाणीव ठेवली. सत्यनिष्ठेपायी आवश्यक त्यावेळी त्यानी लोकांशी वादविवाद केला , तसेच त्यांनी वैदिक संस्कृतीतील चुकीच्या पद्धतींना विरोध दर्शविला. त्यांनी व्यर्थ लोकानुनय केला नाही, तसेच लोकप्रियतेच्या लालसेत देखील अडकले नाहीत. या ठिकाणी आपणास त्यांची सत्यनिष्ठता दिसून येते.

**१.१. गोरक्षनाथकालीन तात्त्विक परिस्थिती:**

मध्ययुगीन भारतामध्ये राजकीय, सामाजिक व अध्यात्मिक जीवनामध्ये इ.स. १० वे आणि इ.स. ११ वे शतक हे अत्यंत महत्त्वाचे मानावे लागेल कारण, त्या कालखंडात राजकीय, सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती अस्थिर होती. सामान्य जनमाणसात असुरक्षिततेची भिती निर्माण झाली होती. इस्लामी आक्रमकांनी संपूर्ण भारत व्याप्त केला होता. त्याच्याबरोबर आलेल्या सुफी संतांनी धर्म प्रचाराचे कार्य अधिक प्रभावीपणे चालवले होते. त्यामुळे भारतीय सांस्कृतिक जीवन धोक्यात आले होते. तसेच याच कालखंडाचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे तंत्र साधना हे होय. हिंदूधर्मातील शैव संप्रदायातील ही तंत्र साधना पुढे इतर संप्रदायात त्याचबरोबर बौद्ध संप्रदायात प्रवेश करून ती दुषीत झाली. तसेच योगमार्ग हा ही या तांत्रिकाच्या जाळयामध्ये सापडला त्यामुळे त्याला अवनती प्राप्त झाली. त्यांनी शरीरालाच सर्व साधनांचा आधार मानून समरसीकरणाचा आनंद अनुभवणे हे या साधनेचे ध्येय बनवले. वैदिक परंपरेतील परमार्थ साधनेला ज्या-ज्या गोष्टी निषिध्द म्हणून त्याज्य मानल्या जात, त्याच तांत्रिक साधनेत अत्यावश्यक व प्रतिष्ठित बनल्या गोरक्षनाथांनी या सर्व गोष्टींना आळा घालून योगादी वैशिष्टयांचा समन्वय दृष्टीने स्वीकार करून विषयास्तकांना आळा घालून योगप्रधान, ' शिव ' युक्त अनुभूतींना प्रमाण मानणारा बाहयाचार-विरोधक असा ' नाथसंप्रदाय ' उभा केला.

**१.२. गोरक्षनाथांच्या व्यक्तित्त्वाची जडण-घडण:**

प्रस्तुत भागामध्ये गोरक्षनाथांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणाघडणीचे विविध पैलू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक अभ्यासकांच्या मते नाथ संप्रदाय हा गुरूमार्गी संप्रदाय आहे. या संप्रदायाच्या पूर्वी सिद्ध संस्कृतीत गुरूमहिमा हा

उत्कर्षाला पोहचला होता. पुढे तो नाथसंप्रदायात ही तसाच विकसीत झाला. पुढे नाथ संप्रदायाच्या प्रभावाने संपूर्ण मध्ययुगीन साधनेत हा गुरू महिमा बहरत गेला. 'गुरूरत्र सन्मार्गदर्श नशीलः 'असा गोरक्षनाथांचा सिद्धांत आहे. थोडक्यात गोरक्षनाथांचे संपूर्ण जीवन गुरूभक्तीने व्याप्त होते. गोरक्षनाथ म्हणतात ' निगुरा न रहिबा ' म्हणजे ' गुरूहीन राहू नये ' इतकी आपल्या गुरूविषयी निष्ठा होती. अशा या महापुरूषाच्या जीवनातील अनेक अद्भुत कथा गुरूभक्तीच्या संदर्भात सांगितल्या जातात. आपल्या गुरू विषयीच्या सत्यनिष्ठेतूनच त्यांच्या व्यक्तित्वाची जडण-घडण झाली.

**१.३. गोरक्षनाथांच्या समकालीन तत्त्वज्ञानाचे योगदान:**

प्रस्तुत भागातून गोरक्षनाथ ज्या काळात होऊन गेले म्हणजेच रा. चिं . ढेरे यांच्या संदर्भानुसार अकरव्या शतकात ज्या महान व्यक्तिमतत्त्वांनी तात्त्विक योगदान दिले त्यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि गोरक्षनाथ यांच्या तत्त्वज्ञानाचा समाजावर काय परिणाम झाला याचा आढावा घेतला आहे. गोरक्षनाथांचे गुरू मत्स्येंद्रनाथ हे कौलमतानुयायी होते. कौलमत ही शाक्ततंत्राची एक शाखा आहे. कुल म्हणजे शक्ती व अकुल म्हणजे शिव . कुल आणि अकुल यांच्या समरसीकरणाचा जो मार्ग जो कौलमार्ग मत्स्येंद्रनाथाने स्वीकारलेली साधना ही योगिनी कौलमताची होती या मार्गात योगिनींचे प्राबल्य फारच मोठया प्रमाणात होते. याच योगिनींच्या भ्रम जालातून गोरक्षनाथाने आपल्या गुरूची मुक्तता केली. तसेच जालंधरनाथ आणि त्यांचा शिष्य कृष्णपाद हे दोन्ही नाथसिद्ध कपालिक होते.

त्यांची साधना कपालिक साधना म्हणून ओळखली जात. परंतु पुढे त्या गोरक्ष संप्रदायात समाविष्ट झाल्या या कपालिकांच्या मते मद्य, मांस, स्त्री सेवनातून सहज मोक्ष प्राप्ती होते असा रूढ समज होता परंतु सर्व समकालीन साधना मार्गावर गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब पडले आणि ते गोरक्ष संप्रदायात समाविष्ट झाले. एवढे गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान सत्यनिष्ठ असल्याचे आपणास दिसून येते .

**१.४. गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व:**

प्रस्तुत भागामध्ये गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. गोरक्षनाथ हे नवनाथांमधील एक नाथ त्यांच्या तत्त्वज्ञानाचा एवढा बलशाली प्रभाव तत्कालीन विविध साधनामार्गातील साधकांवर पडला होता. गोरक्षनाथांनी मध्ययुगीन धर्मसाधनेतील विविध प्रणालींना आपल्या परंपरेत समन्वित करून साधनमार्गाचा एक अत्युच्च आदर्श त्यांनी प्रस्तुत केला. योगिनींच्या जाळयात सापडलेल्या आपल्या गुरूंची सुटका अत्यंत निग्रहाने केली. ज्ञानदेवांनी यांना 'विषयविध्यंसैकवीरू' असे म्हटले ते याच अर्थी तत्कालीन साधमार्गाला प्राप्त झालेले विकृत आणि भोगासक्त स्वरूप नाहीसे करण्यासाठी त्यांनी प्रथम आपल्या विशुद्ध आणि निष्कलंक चारित्र्याचा आदर्श निर्माण केला. आपल्या अमृतमय आणि संजीवक वाणीने योगिजनांना मार्ग दाखवला. नितांत गुरूभक्ती, प्रदीर्घ, व्यासंग, हृदयस्पर्शी वाणी, दिपवून टाकणारे योगसामर्थ्य, लोक कल्याणाची तळमळ यातून सामान्यानाही मार्ग दाखवला. आज आपण समाजाकडे पाहिल्यास समाजातील भोगासक्त जीवन शैली, असुरक्षित जीवनमान, ध्येयाचे विस्मरण, भरकटलेले समाजमन इ. मार्ग दाखविण्यासाठी गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाची आज आपणाला गरज भासत आहे, असे दिसून येते.

**प्रकरण दुसरे:- गोरक्षनाथांचे सत्ताशास्त्रीय विचार**

प्रस्तुत प्रकरणामध्ये गोरक्षनाथांचे सत्ताशास्त्रीय विचारांचे विवेचन मांडले आहे. तत्त्वज्ञानामध्ये सत्ताशास्त्राला विशेष महत्त्व आहे. सत्ताशास्त्रातून अंतिम सत्याचा शोध घेतला आहे . गोरक्षनाथ यांनी त्यांच्या विचारातून अंतिम सत्याविषयी मार्ग दाखवल्याचा आपणास दिसून येत. त्यांनी मंडलेल्या पिण्डोत्पत्ति,पिण्डविचार, पिण्डसंवित्ति, पिण्डाधार इ. संकल्पनांच्या आधारे गोरक्ष नाथांच्या विचारांचा सत्ताशस्त्रीय अर्थ लावला आहे. गोरक्षनाथांचे सत्ताशास्त्रीय विचार खालील सिद्धांताद्वारे थोडक्यात मांडले आहेत.

**२.१. पिण्ड-ब्रह्माण्ड विचार:**

' ब्रह्माण्डवर्ति यत्किस्त्रियत्, तत् पिण्डे प्यस्ति सर्वथा ' जे काही ब्रह्माण्डात आहे, ते सर्व पिण्डात सूक्ष्म प्रमाणात आहे. यास अनुसरून साकार – निराकार , सगुण-निर्गुण या पलीकडे द्वैताद्वैत विलक्षण,सर्वातीत, स्वसंवेद्य अषा परमतत्त्वाची प्राप्ती करून घ्यायची असेल, तर साधकास पिण्डज्ञानाची आवश्यकता आहे. विष्वब्रह्मांडांत महाशक्ती म्हणून जी कार्यरत असते तीच शक्ति पिण्डात कुंडलिनीशक्तीच्या स्वरूपात कार्यमग्न असते. तिचा वेध या ठिकाणी घेण्यात आला आहे.

**२.२. शिव व शक्ती :**

गोरक्षनाथांच्या मते 'आदिनाथ ' म्हणजे ' शक्तियुक्त शिव ' आणि हेच अंतिम सत्य. शक्ती ही शि वाहून भिन्न नसून, ती तत्स्वरूपी स्थित आहे. तिचे अखंड क्रियाशील स्वरूप कधी सूलि , तर कधी सुक्ष्म, कधी व्यक्ती ,तर कधी अव्यक्त असते. सर्व पिण्डब्रह्माण्डाचा आधार ' शिव ' असला, तरी शिवातील ' इ ' कार म्हणजे शक्ती , तिच्याविना शिव हा केवळ ' शव ' आहे.

**२.३. कुंडलिनी योग:**

नाथ संप्रदायात कुंडलिनीयोगाला प्राधान्य दिले आहे. कुंडलिनी शक्ती पिडांत मूलाधारचक्रांत असते. या शक्तीचे जागरण साधून तिला ऊर्ध्वगामी करून सुषुम्नामार्गे नेऊन सहस्त्रारांतील ' हं ' कारस्वरूप शिवाशीं तिचे मीलन घडवणे हे कुंडलिनीयोगाचे उद्दिष्ट आहे. शिवाशी मीलन झाल्यानंतर कुंडलिनीशक्तीचे शक्तीपण विरून जाते व अमनस्कयोग साधला जातो तो कसा साधला जातो त्याचा आढावा या ठिकाणी घेतला आहे.

**२.४. सोंहम् अजपा साधन:**

अंतिम परमतत्त्वाची अनुभूती या साधने मुळे होते असे गोरक्षनाथांचे मत आहे. याच साधनेला काही लोक

अजपा मार्ग असेही म्हणतात. सो ऽ हं साधना दुसरे-तिसरे काही नसून मानवी शरीरांत श्वास आणि प्रच्छ्वास या स्वरूपात जो अखंड सो ऽ हं मंत्र चालू आहे त्याची धारणा होय. याच धारणेचे गोरक्षनाथांनी आपल्या 'योगमार्तंड' या ग्रंथांत तिचे विवेचन केले आहे याचा आढावा याठिकाणी घेण्यात आला आहे.

अशाप्रकारे प्रस्तुत प्रकरणातून , गोरक्षनाथांच्या सत्ताशास्त्रीय विचारांना अधोरेखित करण्यात आले आहे.

**प्रकरण तिसरे:- गोरक्षनाथांचे ज्ञानविषयक विचार**

प्रकरण तीन मध्ये गोरक्षनाथांच्या ज्ञानविषयक साधनेचा ऊहापोह केला आहे.या प्रकरणातून त्यांच्या संवित्ति सिद्धांत व योगयुक्त ज्ञान या विचारांवर भर दिला आहे. या विचारांविषयी थोडक्यात विवेचन पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**३.१. संवित्ति सिद्धांत:**

गोरक्षनाथांनी ज्ञानविषयक आपले विचार मांडताना ज्ञानासाठी ' संवित्ति ' हा शब्द वापरला आहे. याचा अर्थ अनुभूती येणे असा आहे. थोडक्यात स्वसंवित्ति म्हणजे आत्मानुभूति होय. स्वयंवित्ति हा शब्द ज्ञानेश्वरीतही आलेला आहे.

ज्ञानी इयेते स्वसंवित्ति ।
शैव म्हणती शक्ती ।
आम्ही परमभक्ती ।
आपुली म्हणो ।। ( ज्ञा.अ. १८ . ११३३ )

थोडक्यात ज्ञानेश्वरांनी सांगितलेली परमभक्ती म्हणजे गोरक्षनाथांची पिंडसंवित्तिच आहे. गोरक्षनाथांच्या मते पिण्डात म्हणजेच शरीरात संपूर्ण चराचर विश्वाचे अस्तित्व आहे. हे जो जाणतो त्याला खरे सम्यकदृष्टया पिण्डाचे ज्ञान झाले असे म्हणायचे तोच खरा योगी. त्याचेंच पिण्डस्थान खरे. या सर्व विचाराद्वारे गोरक्षनाथ म्हणतात की ब्रह्मांडरूप देहाच्या अभिमानाचा सारा उगम , सारे अवयव हे मनुष्याच्या भौतिक देहांतच आहेत. म्हणजे जे-जे ब्रह्माण्डात आहे ते पिण्डी याला ज्याचे ज्ञान होते तोच खरा ज्ञानी असे गोरक्षनाथ म्हणतात. यावरून अंतिम जे परमतत्त्व आहे ते आपल्या भौतिक शरीरात आहे. याचे ज्या साधकास ज्ञान होईल तो या जन्मात मुक्ती पावतो. थोडक्यात या ठिकाणी अंतिम जे ज्ञान आहे त्याचा आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे .

**३.२ योगयुक्त ज्ञान:**

गोरक्षनाथांना अंतिमतः ज्ञान तर अपेक्षित आहेच परंतु ज्ञानाच्या अगोदर योग हा शब्द वापरून त्यांनी कायासिद्धीलाही महत्त्व दिल्याचे दिसून येते. जसे वेदांमध्ये कर्मकांडाला प्राधान्य दिले आहे. तसे नाथसंप्रदायात योगाला प्राधान्य दिले आहे. परंतु गोरक्षनाथांच्या काही रचनांच्या अभ्यासावरून असे दिसून येते की योग आणि ज्ञान दोन्ही संकल्पना परस्परांवलंबी आहेत. थोडक्यात गोरक्षनाथांच्या मते जोपर्यंत शरीर शुद्ध होत नाही तोपर्यंत ज्ञानाचा उदय होत नाही. म्हणजे परमज्ञान प्राप्त होण्यासाठी शुद्ध शरीर आवश्यक आहे. यामुळेच नाथसप्रदायात गोरक्षनाथांनी ज्ञानाच्या अगोदर योग हा शब्द आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे. त्याचा याठिकाणी आढावा घेतला आहे. या स्वरूपात प्रस्तुत प्रकरणात गोरक्षनाथांच्या ज्ञान विषयक संकल्पनाचा अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण चौथे :- गोरक्षनाथांचे नीतिविषयक विचार**

गोरक्षनाथांची नीतिविषयक विचारांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या प्रकरणातून त्यांच्या नितीविषयक विचारांचा ऊहापोह केला आहे. यामध्ये प्रामुख्याने त्यांच्या वामचारी तंत्रसाधना विरोधी आंदोलन,योग साधनेत आचरणाला महत्त्व,साधकांचा आचार, स्वतः स्फटिकासारखे निष्कलंक चारित्र्य यासारख्या मुद्दयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या मुद्यांचे थोडक्यात विवेचन पुढीलप्रमाणे-

**४.१ वामचारी तंत्रसाधना विरोधी आंदोलन:**

वज्रयान, सहजयान, शाक्त , कापालिक इत्यादी तंत्रसाधने विरूद्ध गोरक्षनाथांनी आंदोलन उभे केले. तसेच त्यांनी मद्य, मांस इत्यादीच्या सेवनास बंदी घातली. तसेच योगिनीच्या मेळाव्यात अडकलेल्या आपल्या गुरूला महत प्रयासाने बाहेर काढले यातून त्याची एक प्रकारची नैतिक दृष्टी दिसून येते.

**४.२ योग साधनेत आचरणाला महत्त्व:**

गोरक्षनाथांनी योग साधनेत आचरणाला अधिक प्राधान्य दिले. योगसाधनेतील यश हे केवळ शरीरनिष्ठा नाही; त्याला शुद्ध आणि सात्त्विक मनाचे अधिष्ठान प्राप्त झाले, तरच मनाची एकाग्रता निर्माण होते. चित्तवृत्तींचा निरोध हा योग साधनेचा प्रारंभ होय अशा या साधनेला मध्ययुगात विशुद्ध योगमार्गाची पार्श्वभूमी प्राप्त करून देणाऱ्या गोरक्षनाथांनी अहिंसा, सत्य,अस्तेय, ब्रम्हचर्य, क्षमा,धृती, शौचादी, दहा यम आणि दान, तप , पूजन, सिद्धांत , श्रवण इत्यादी दहा नियम पाळण्यावर कटाक्षाने भर दिला. तसेच समाधी ही एक मानसिक अवस्था आहे, ती प्राप्त करून घेताना विषुद्धाचाराचे महत्त्व गोरक्षनाथांनी आपल्या प्रभावी व अधिकार वाणीने सांगितले यातून त्यांची नैतिकता दिसून येते.

**४.३ साधकाचा आचार:**

गोरक्षनाथांनी आपल्या हिंदी रचनांतून योग्यांच्या ' रहनी ' चा म्हणजेच आचारधर्माचा विस्तृत विचार केला आहे. कठोर ब्रह्मचर्य,वाक्संयाम,शारीरिक शौच,मानसिक शुद्धी, ज्ञाननिष्ठा, बाह्यावडंबराविषयी अनादर, मद्यमांसादी मादक द्रव्यांच्या सेवनाविषयी आत्यंतिक तिरस्कार इत्यादी गोष्टीवर आपल्या उपदेशात अधिक जोर दिला आहे. यातूनच त्यांची नैतिक दृष्टी दिसून येते.

**४.४ स्वतः स्फटिकासारखे निष्कलंक चारित्र्य:**

गोरक्षनाथ स्वतः स्फटिकासारखे निष्कलंक जीवन जगले योग्याबरोबरच जनसामान्य लोकांनाही त्यांनी तसा उपदेष दिला यामुळेच ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथात विषयविध्वंसैकवीर अशी उपमा दिली. यातूनच गोरक्षनाथांची नैतिक दृष्टि आपणास दिसून येते.अशा प्रकारे

प्रस्तुत प्रकरणातून गोरक्षनाथांच्या नितीविषयक आचरणांचा आणि विचारांचा अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण पाचवे :- गोरक्षनाथांचे भक्तिविषयक विचार**

प्रकरण पाचमधून गोरक्षनाथांच्या भक्तीविषयक विचारांना अधोरेखित करण्यात आले आहे.यातून प्रामुख्याने नाथ संप्रदायातील भक्ती आणि महाराष्ट्रातील गहिनीनाथ भक्ति या दोन भक्तीविषयक घटकांवर भर देण्यात आला आहे.तसेच श्री संत ज्ञानेश्वरांच्या तत्त्व चिंतनावर पडलेल्या नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा याचे विश्लेषण केले आहे .

**५.१ नाथ संप्रदायातील भक्ती:**

गोरक्षनाथांनी भारतभर भ्रमण करून अनाचाराचे, विषयाचे, दांभिकतेचे परमार्थाच्या नावावर चालणाऱ्या दुराचाराला आळा घातला. त्या ठिकाणी त्यांनी विशुद्ध अशा योगसाधनेचे राज्य प्रस्थापित केले. जनसामान्य लोकांच्या आत्यंतिक तळमळीतून त्यांनी तत्त्वनिरूपणासाठी लोकभाषांचा स्वीकार केला. त्यांच्या लोकोत्तर पुढे भारतीय साधनेमध्ये भक्तिप्रधान परंपरा निर्माण झाल्या. त्यामुळेच गोरक्षनाथांचा नाथसंप्रदाय हा जरी योग संप्रदाय असला तरी भक्ति-आंदोलनाची गंगोत्री ठरला. तसेच ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' या ग्रंथांतून अध्यात्मविद्येचा जो ठेवा पुढील पिढयांना दिला, तो नाथसंप्रदायाने आपणास दिलेल्या 'अद्वयानंदवैभवा'चा वारसा आहे हे पुढील शब्दात सांगितले.

तेणे योगाब्जिनिसरोवरू। विषयविध्वंसैकवीरू।
तिये पदी का सर्वेश्वरू। अभिषेकला।।
मग तेहि ते शांभव। अद्वयानंदवैभव।
संपादिले सप्रभव। श्रीगयनीनाथी।।
(ज्ञा.अ .१८ .१७५५ -५६ )

या ज्ञानेश्वरीतील अभंगावरून असे दिसते की भक्तीचे मूळ स्थान हे नाथसंप्रदाय हेच आहे. याच भक्तीच्या प्रभावाने पुढे निवृत्ती, ज्ञानेश्वर, कबीर, चक्रधर, गुरूनानक इत्यादी संताना प्रभावित केले. हीच गोरबानीं संसारातील सामान्य लोकांनाही दिव्यौशधी ठरली. यावरून असे दिसून येते की, 'नाथ संप्रदाय' जरी 'योग संप्रदाय' असला तरी भक्ति उगमस्थान हे नाथ संप्रदायातच दिसते.

**५.२ महाराष्ट्रातील गहिणीनाथ कृष्ण भक्ति:**

महाराष्ट्रामध्ये नाथसंप्रदायाची परंपरा गहिणीनाथांनी रूजविली. त्यांनी ब्रह्मगिरीवर त्र्यंबकेश्वर या ठिकाणी निवृत्तीनाथांना अनुग्रह दिला.

निवृत्ती गयनी, कृपा जपतो अनुपम जाण।
सांगितली खूण गोरक्षाने।।

या शब्दांत निवृत्तीनाथांनी गोरक्षनाथ आणि गहिनीनाथ यांविषयी आपला आदरभाव व्यक्त केला आहे. गहिनीनाथांनी महाराष्ट्रातील नाथपरंपरेस कृष्णभक्तीची जोड दिल्यामुळे त्यांना या ठिकाणी भक्तिसंप्रदाय म्हणून ओळखले जाऊ लागले. 'गोरक्षगीता' हा ग्रंथ गहिनीनाथांनी लिहिला. त्याचा भर योगापेक्षा कृष्ण भक्तीवरच अधिक दिसून येतो.

निवृत्ती गयनी कृपा केली पूर्ण। कुळ हे पावन कृष्णनामे।।

असे निवृत्तीनाथ म्हणतात. अशाप्रकारे गोरक्षनाथापासून प्राप्त झालेली ही योगसाधनेची परंपरा गहिनीनाथ आणि शिष्य निवृत्तीनाथ आणि त्यांचे शिष्य ज्ञानदेव यांच्या पर्यंत चालत आल्याचे ज्ञानेश्वरीतील सहाव्या अध्यायात म्हटले आहे. यावरून भक्तिचे मुळस्थान नाथ संप्रदायात असल्याचे दिसते.आशा प्रकारे या प्रकरणाची मांडणी करण्यात आली आहे.

**प्रकरण सहावे :- उपसंहार**

सर्व प्रकरणांचा अभ्यास केल्यानंतर सहावे प्रकरण उपसंहाराचे करण्यात आले आहे. या प्रकरणात खालील निष्कर्ष नोंदविण्यात आले आहे.

१. गोरक्षनाथांनी आंतरिक शुद्धीवर भर, अनुभूतीला प्रमाण मानणारे मुक्त चिंतन तसेच प्रखर आत्मविश्वास यावरती अधिक प्रमाणात भर दिला. या गुणामुळे एक प्रकारे गोरक्षनाथांनी उपनिषद ऋषीचा वारसा समृद्ध बनविला. यातूनच आपणास असे दिसते की गोरक्षनाथांचे विचारविश्व हे उपनिषदांच्या विशुद्ध विचारांच्या पायावर उभे राहिले आहे.
२. सांख्यदर्शनाने जसे प्रकृती-पुरूष या 25 तत्त्वाने विश्वाची निर्मिती झाल्याचे म्हटले आहे, तसेच गोरक्षनाथांनी प्रकृतिपिण्ड हे 25 गुणांनी युक्त असे भौतिक शरीर आहे. या शरीराचे आहे तेच या विश्वातत आहे. हे पिण्ड-ब्रह्मांड विचारातून सांगितले आहे. यातून भारतीय तत्त्वज्ञान आणि गोरक्षनाथांचे तत्त्वविचार यात साम्य असल्याचे आपणास दिसते.
३. गोरक्षनाथांनी संपूर्ण भारतभर भ्रमण करून तसेच नेपाळ, तिबेट, बांग्लादेशच्या ठिकाणी भ्रमण करून वामचाराला आळा घातला, तांत्रिक साधनेतून लोकांची सुटका केली, तसेच निष्कलंक चारित्र्यातून आध्यात्मिक साधनेचा प्रसार केला. त्यामुळे भारतीय समाजमनावर गोरक्षनाथांच्या तत्त्वविचारांचा अधिक प्रभाव पडल्याचे आपणास दिसून येते.
४. गोरक्षनाथांनी भारतीय साधनेचे शुद्धीकरण केले. त्यामुळे उत्तरकालीन महापुरूषांच्या जीवनकार्यात प्रेरणा निर्माण झाल्या त्यातूनच निवृत्तीनाथांपासून ते संत कबीर, संत गुरूनानक, संत दादू, वाजिद फरीद, संत मीरा इत्यादी संत पुरूष निर्माण झाले. यातूनच गोरक्षनाथांच्या तत्त्वविचारांचे महत्त्व आपणास दिसून येते.
५. आधुनिक समाजात गोरक्षनाथांचे तत्त्वज्ञान आजही संयुक्तिक व महत्वपूर्ण वाटत आहे. हे तत्त्वज्ञान समजण्यास व अनुभूतीस कठीण वाटत असले तरी त्यातील अनेक बारकावे आजच्या समाजरचनेला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करत आहे.

६. महाराष्ट्राच्या संस्कृतीवर गोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर पडलेला दिसतो. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय,महानुभव पंथ, दत्त संप्रदाय यांसारख्या सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या पथांच्या मुळाशी नाथसंप्रदाय असलेला दिसतो.

**संदर्भग्रंथ सूची:**


1. ढेरे, रा.चिं . - नाथ संप्रदायाचा इतिहास, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २१ जुलै, २०१४.
2. जोशी, मृणालिनी, -श्रीशिव गोरक्ष, स्नेहल प्रकाशन, पुणे, १२ जानेवारी, २०१४.
3. भट, म.दा.- आगरकर स.र, सिद्ध-सिद्धान्त-पद्धती, प्रोफिशन्ट पब्लिशींग हाऊस,पुणे, पुर्नमुद्रण,
4. १९ सप्टेंबर २०१२.
5. जोशी के.रा,- योगबीज, सिद्धयोग प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९५.
6. जोशी के.रा.- अमरौघशासन, सिद्धयोग प्रकाशन, पुणे, २००१.
7. जोशी के.रा.- अमनस्कयोग, सिद्धयोग प्रकाशन, पुणे, १९९८.
8. वाळिंबे मोरेश्वर,- ज्ञानकैवल्य: नाथसिद्धांची चरित्रगाथा, श्रीस्वरूपानंद सेवा मंडळ,पावस,
9. भैरव आदिनाथ,- नाथलीलामृत: तत्त्वगर्भ सिद्धकथा, मुंबई, १९७२.
10. उपाध्याय नागेंद्रनाथ, -गोरखनाथ: नाथ सम्प्रदाय के परिप्रेक्ष्यमें, विश्व विद्यालय प्रकाशन,
11. वाराणसी,२००९.
12. बॅनर्जी, अक्षयकुमार,- गोरख-दर्श न, गोरखनाथ मंदिर, गोरखपुर, २००८.
13. ओक जनार्दन, -नाथ शि रोमणी गोरक्षनाथ, कल्पना बुक डिलर्स (इंडिया) प्रा.लि..
14. उपाध्याय, नागेंद्रनाथ, -नाथ और संत साहित्य: तुलनात्मक अध्ययन, काशी हिन्दू विश्व
15. विद्यालय, वाराणसी, १९७५.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत तुकाराम महाराज यांचे सामाजिक योगदान

**प्रा. कामिनी गंगाधर रणपिसे**
मराठी विभागप्रमुख,
सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे
**Corresponding Author: प्रा. कामिनी गंगाधर रणपिसे**
**DOI- 10.5281/zenodo.14547106**

**सारांश:**

संत तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. वेदान्त तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. 'अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच' एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठांत आहेत.

भागवत धर्माचा कळस होण्याचे महद्भाग्य त्यांना लाभले. महाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने ते स्थिरावले आहेत. त्यांच्या अभंगांत परतत्त्वाचा स्पर्श आहे. मंत्रांचे पावित्र्य शब्दकळेत पाझरते. त्यांची प्रत्यक्षानुभूती त्यांच्या भावकाव्यात आहे. त्यांच्या काव्यातील गोडवा व भाषेची रसाळता अतुलनीय आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगलेखनाबरोबरच गवळणीही रचल्या आहेत.

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यात तुकारामांच्या अभंग–गाथेने अढळ स्थान मिळविले आहे. साधकदशेतील 'मनासी झालेले संवाद' व 'नाना बुद्धीचे तरंग' उत्कटपणे तुकोबांनी व्यक्त केले. संसारातील काही प्रसंग, जनात आलेले अनुभव यांबरोबरच गोपालकृष्णाच्या बालक्रीडा, विराण्या, ब्रह्मतत्वाचा साक्षात्कार यांचीही अभंगरुप वर्णने त्यांच्या गाथेत आढळतात. संसारी लोकांना केलेला नीत्युपदेश व समाजातील सोंगाढोंगावर केलेला प्रहार हेही त्यांच्या अभंगवाणीचे मोठेच विषय आहेत.

महाराष्ट्रातील समाज हा बहुसांस्कृतिक आहे. तसेच त्याची मानसिकता बहुपातळीवरची आहे. एकाच घटनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन समाजातील प्रत्येक घटकाबरोबर बदलत जाताना दिसतो. एकाच घटनेचे वेगवेगळे अर्थ काढले जातात. वेगवेगळे अन्वयार्थ लावले जातात. महाराष्ट्रातील समाजात अनेक रूढी, परंपरा आहेत. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. काळाच्या ओघात त्या रूढी-परंपरांचा मूळ आशय हरवून जातो आणि केवळ उपचार शिल्लक राहतो. पण पूर्वजांचा वारसा म्हणून त्या रूढी, परंपरा जोपासल्या जातात, व्यवहारात आणल्या जातात आणि या रूढी, परंपरांना अनिष्टतेची झालर लावली जाते. अशा अनिष्ट रूढी कधी-कशा-कुणी निर्माण केल्या हे जरी सांगणे शक्य नसले तरी त्या समाजात असतात, आहेत हे सत्य नाकारता येत नाही. कोणताही चांगला विचार जेव्हा परंपरा किंवा रूढी म्हणून पाळला जातो, तेव्हा त्याची विकृती झालेली असते. एक झेन कथा आहे. एका झेन गुरूच्या मठात एक मांजर होते. ते मठात इकडून तिकडे भटकत राही. सारखे म्याव-म्याव करत राही. त्याच्या या मुक्तसंचारामुळे मठाच्या कामात, प्रार्थनेत व्यत्यय येत असे. शेवटी गुरूंनी प्रार्थनेच्या काळात मांजर बांधून ठेवायला सुरुवात केली. कालांतराने गुरूंचे निर्वाण झाले आणि ते मांजरही मेले. त्या गुरूच्या जागी त्यांचा एक शिष्य मठाधिपती झाला. तो प्रार्थना सुरू होण्यापूर्वी मांजर शोधून आणू लागला आणि त्याला बांधून ठेवून मग प्रार्थना घेऊ लागला.

हिंदू समाजाचे असेच काहीसे आहे. अस्पृश्यता, जातिभेद, उच्चनीचतेची भावना याची समाजात कोणी पेरणी केली, हे आज आपण ठामपणे सांगू शकत नाही.

कोण्या एकाच एका व्यक्तीचे हे कर्तृत्व नाही. कारण एवढ्या मोठ्या समाजावर एकच व्यक्ती असे काही लादू शकेल असे वाटत नाही. परंतु कुठल्यातरी एका टप्पावर विकृती निर्माण होत गेली आणि ती पुढेही दृढ होत गेली हे नाकारता येत नाही. प्रस्तुत शोध निबंधातून संत तुकाराम महाराज यांच्या सामाजिक योगदान लक्षात घेऊन त्यानुसार लेखन केले आहे.

संत तुकाराम गाथा म्हणजे हिंदूची गीता आहे. महाराष्ट्राच्या पावन भूमीत गेली चारशे वर्ष मुक्तीची ज्ञानगंगा या गाथेच्या रूपाने वाहत आहे. ज्ञानोबा, तुकाराम म्हणजे महाराष्ट्राची संस्कृतिक विद्यापीठे आहेत. त्यांचे साहित्य म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचा आधारवड आहे. अभंग आणि ओवी हे तळागाळातील समाजात ठाण मांडून बसलेले आहेत. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जीवनाची बाग बहरली. ती ज्ञानोबा-तुकारामांच्या या अभंगाची भाषा सरळ आणि सोपी आहे. मुखामध्ये रुळणाऱ्या, कानामध्ये गुंज घालणारे शब्द आहेत.

**तुकाराम महाराजांचे संक्षिप्त चरित्र**

तुकाराम महाराज यांचा जन्म शके १५३० सन १६०८ या वर्षी इंद्रायणी नदी तीरावर असलेल्या देहू या गावी एका पवित्र अशा कुळात झाला. तुकारामबुवांचे आठवे पूर्वज विश्वंभरबाबा हे मोठे भगवद्भक्त असल्याने त्यांच्या वेळेपासूनच या कुळात विठ्ठलभक्ती, नामस्मरण व पंढरीची वारी यांचे माहात्य वाढलेले होते. तुकाराम बुवांच्या घरचा व्यवसाय दुकानदारीचा, वाण्याचा असून घरी थोडीफार महाजनकी अथवा सावकारकीही होती. 'याती शूद्र वैश्य केला वेवसाय,' बरें देवा कुणबी केलों,' शूद्रवंशीं जन्मलों' इत्यादी शब्दांवरून तुकारामबुवांची जात शूद्र मानण्याचे कारण नाही; ते सामान्यतः मराठा कुणबी या कुळातील असावेत.

तुकाराम महाराजांच्या वडिलांचे नाव बोल्होबा व आईचे नाव कनकाई असे असून यांचीही विठ्ठलाची उपासना चांगली मनापासून असे. यांची आषाढी कार्तिकीची वारी कधी चुकत नसे. अन्नदान, गरिबांविषयी दया, संतांचा सन्मान, विठ्ठलावर दृढ निष्ठा, भजनपूजन, सदाचार यांचे महत्त्व, या घरी विशेष प्रकारचे असे. सावकारकी, व्यापारधंदा व महाजनकी प्रथम चालत असावी.

**संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातील वेगळेपण**

धर्म रक्षावयासाठीं । करणे आटी आम्हांसी ।
वाचा बोलो वेदनीती । करू संतीं केले ते ।
न बाणता स्थिती अंगी। कर्म त्यागी लंड तो ।
तुका म्हणे अधम त्यासी । भक्ती दूषी हरीची ।।

खरा धर्म कोणता? तर सत्धर्म, स्वधर्म, स्वकर्तव्य होय. तर हरिभक्तांचा आणि हरिभक्तीचा द्वेष करणारा तो अधमच होय. खरा धर्म म्हणजे 'ऋत'धर्म. वेद-वाङ्मयाने सांगितलेला. ज्यात 'सु'नीतीचा विचार आणि आचार प्रधान आहे. तो ऋतधर्म सांगणारे तुकोबाराय करारी, कणखर, वैष्णववीर आहेत. ते न्यायनिष्ठ आहेतच, पण न्यायनिर्धारी आणि न्यायनिष्ठुरही आहेत. त्यांना न्यायाची चाड आहे आणि अन्यायाची चीड आहे. 'रामाय स्वस्ति' म्हणून पुढे लगेच 'रावणाय स्वस्ति' म्हणणारी भित्री, पळपुटी, तत्त्वशून्य भाषा आणि भावना त्यांना साफ नामंजूर आहे. हाच ऋतधर्म आहे. वैदिक धर्माचा तो वारसा आहे. तोच आपणास टिकवायचा आहे आणि वाढवायचा आहे.

श्रीतुकोबारायांची अन्य अभंगवचनेही अशीच तीव्र-तिखट आहेत. ते म्हणतात 'उजळावया आलो वाटा। खरा खोटा निवाड ।।' किंवा 'आम्हां ते कौतुक । जगां धावी नीत । करावे फजित । चुकती ते ।।' अथवा 'देवाचे पालन । करणे पाखंड खंडन ।' ते सांगतात 'विंचू देव्हाऱ्यासी आला। देवपूजा नावडे त्याला। तेथ पैजाराचे काम । व्हावे अधमासी अधम ।।' कारण श्रीतुकाराम वैष्णववीर आहेत. त्यांची भाषा तीव्र-मनस्वी आहेच. 'भक्ति तो कठीण सुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।।'ते सांगतातच 'वीर विठ्ठलाचे गाढे। कळीकाळ पायां पडे ।।' अथवा 'धर्माचे पालन । करणे पाखंड खंडन। हेचि आम्हां करणे काम ।...' किंवा वैष्णववीर कसा असतो? तर 'तीक्ष्ण उत्तरे। हातीं बाण घेऊनि फिरे ।' 'तुका म्हणे येथे। शूर तो निवडे । पडिले बापुडे । कालचक्री ।।' अथवा 'शूर मिरवे रणांगणी । मरणींच संतोष ।।' हाच तर वीराचा धर्म आहे असे तुकोबाराय सांगतात. ते म्हणतात - 'पुण्य ते पर उपकार' उलट 'पाप ते पर-पीडा' हेच आपले परंपराप्राप्त तत्त्वज्ञान आहे ना? मग आपली भूमिका सद्रक्षणाची हवी. तशीच खल-निर्दालनाची हवी. समाजामध्ये जर दुष्ट दुर्योधन मातले असतील, तर त्यांना शासन करायला नको का? समाजजीवनात म्हणजे पाखंडी, धटिंगण, मदमस्त लोक जर थैमान घालत असतील, तर त्यांना शिक्षा व्हायला नको का? तुकोबाराय म्हणतात

अणुरणीयां थोकडा । तुका आकाशाएवढा ॥१॥ गिळुनि
सांडिलें कळिवर । भव भ्रमाचा आकार
॥२॥ सांडिली त्रिपुटी। दीप उजळला घटीं ॥३॥ तुका म्हणे
आतां । उरलों उपकारापुरता ॥४॥

**शब्दार्थ व टीपा:** अणुरणीयां अणुरेणूंपेक्षाही, बोकडा सूक्ष्म, त्रिपुटी ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान इत्यादी तिहींचा समुदाय.

**अर्थ :** मी (तुकाराम) तसे पाहिले तर अणुरेणूंपेक्षाही सूक्ष्म असूनही आकाशाएवढा विस्तारलेलो आहे ।१। मी देहादी व प्रपंचादिकांचा अभिमान गिळून शरीर सोडून दिल्यासारखेच आहे. प्रपंचरूपी भ्रमाचा आकारही मी सोडलेला आहे । २। ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान अशासारख्यांची त्रिपुटी सोडून मी आत्मज्ञानाचा दीप माझ्या देहामध्ये प्रज्वलित केला आहे ।३। तुकाराम महाराज म्हणतात, मी आता केवळ दुसऱ्यांवर उपकार करण्यासाठीच उरलेलो आहे ।४।

**स्पष्टीकरण :**

या अतिशय प्रसिद्ध अशा अभंगात तुकाराम महाराजांनी आपण अणुरेणूपेक्षाही सूक्ष्म व आकाशापेक्षाही विशाल कसे आहोत, याचे श्रेष्ठ अनुभूतीवरून वर्णन केले आहे. एकच सूक्ष्म तत्त्व सर्व जगतात भरून राहिलेले आहे, याचा सुंदर आविष्कार जो 'अणोरणीयान्महतो महीयांन्' या कंठोपनिषदातील सूत्रात झालेला आहे; त्याचा अनुवाद तुकोबांनी सहजासहजी या अभंगात मार्मिकपणे केलेला आहे. अणुरेणूपेक्षाही सूक्ष्म असलेल्या तत्त्वाचाच सर्व विश्वास भरून राहिलेला आविष्कार असल्याने त्याला सोडून दुसरे काहीच नाही. याची जाणीव श्रेष्ठ साधकास नेहमीच होत असते. जळीस्थळी ईश्वरतत्त्वच पाहणे व एकाच आत्मतत्त्वाच्या धाग्याने सर्व सृष्टी गुंफिली गेली आहे, असे अनुभवास येणे, हेच ईश्वरी साक्षात्काराचे मर्म होय. तुकोबांना ही अनुभूती तीव्रतेने आलेली होती.

'आंत हरि बाहेर हरि । हरिनें घरीं कोंडिलें ॥',

'नभोमय जालें जळ । एकीं सकळ हरपलें ।',

'तुका म्हणे कल्प झाला । अस्त गेला उदयों ।',

'कांहीच मी नव्हे कोणिये गांवीचा । एकटा ठायींच्या ठायीं एक ॥',

'आमुचा स्वदेश भुवनत्रयामध्ये वास' इत्यादी वचनांतून तुकोबांच्या अनुभूतीची विशालता ध्यानात येण्यासारखी आहे.

अनुभूतीची एवढी विशालता व तीव्रता ज्यांना लाभली आहे, ते देह धारण करून जगतात तरी कशासाठी? याही प्रश्नाचे उत्तर तुकारामबुवांनी या अभंगात दिले आहे. इत लोकांच्यावर उपकार करण्यासाठी आपण आता उरलेलो आहोत, असे त्यांनी या ठिकाण स्पष्टपणे म्हटले आहे. स्वतःस साक्षात्कार झाल्यानंतर 'आपण जेऊन जेववी लोकां । संतर्पण करी तुका ॥' अशी भूमिका तुकोबांसारख्या सत्पुरुषांना घ्यावी लागते. लोकांनी सन्मार्गाव राहावे, केवळ प्रपंच व पैसापैसा न करिता ईश्वराची आठवण ठेवावी, अनाचारांत व व्यसन रमू नये, दुष्टांच्या संगतीत राहू नये, म्हणून साधुसंतांच्या एकसारख्या उपदेशाची फार मोठी आवश्यकता मराठी मनाला असते. 'संसाराच्या तापें तापलों मी देवा' या अभंगात आपल्या संसाराची वाताहत कशी झाली, याचे मोठे हृदयभेदक चित्र बुवांनी काढले आहे. त्यामुळे त्यांचे चित्त संसारात रमण्याऐवजी श्रीविठ्ठलाकडे केंद्रित झाले.

'विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥'

अशा एकत्वाच्या नात्याने तुकाराम बुवा फटकळपणे घरातून उठून जवळच असणाऱ्या भामनाथाच्या किंवा भंडाऱ्याच्या डोंगरावर जाऊन भजन, ज्ञानेश्वरी, नायभागवत, गीता यांचे वाचन, विठ्ठलचिंतन यांच्याच नादात दंग होऊन गेले. त्यांनी गावातील श्रीविठ्ठलाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. ते आता साधुसंतांच्या भजनांत व कीर्तनांत रमू लागले. आपणांस वैराग्य कसे प्राप्त झाले? असे संतांनी प्रेमाने विचारले. तेव्हा तुकोबांनी सांगितले,

यातो शूद्र वैश्य केला वेवसाय । आदि तो हा देव कुळपूज्य । नये बोलों परि पाळिलें क्चन। केलियाचा प्रश्न तुम्ही संतीं ॥ संवसारें जालों अति दुःखें दुःखी। मायबाप सेखीं क्रमिलिया ॥ दुष्काळें आटलें द्रव्यें नेला मान। स्त्री एकी अन्न अत्र करितां मेली ॥ लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें। वेवसाय देखे तुटी येतां ॥ देवाचें देऊळ होतें तें भंगलें। चित्तासी जें आलें करावें जें ।। आरंभी कीर्तन करीं एकादशी। नव्हतें अभ्यासी चित्ता आधीं ॥ कांही पाठ केलीं संतांची उत्तरें। विश्वासें आदरें करोनियां ।।

अशा प्रकारे तुकोबांच्या आयुष्यास कलाटणी मिळाली. त्यांनी कथाकीर्तनकारांच्या मागे उभे राहून कीर्तनाचा अभ्यास केला. संतांच्या पायांचे तीर्थ सेवन केले. दुसऱ्यांवर उपकार करण्याचे व्रत चालू ठेवले. प्रपंचात गोविणाऱ्या नातेवाईकांचे व बहुमताचे न ऐकता स्वतःच सत्य व असत्याचा निवाडा करावा असे त्यांनी मनाशी ठरविले. तुकारामबुवांचे मन उन्नत होत गेले. त्यांना श्रीबाबाजी चैतन्य या सत्पुरुषांचा उपदेश झाला. नामदेवांकडून कवित्वाची प्रेरणा मिळाली व तुकाराम महाराजांची अभंगवाणी तेजस्वी स्वरूपात स्रवू लागली. स्वतःस आलेले पारमार्थिक अनुभव त्यांनी अभंगांतून वर्णन केले. संत तुकाराम महाराजांनी आपले परमार्थाचे अनुभव मराठी भाषेत अभंगरूपांनी व्यक्त केले. समस्त मानवजातीला सामाजिक उपदेश करत वेदान्ताचे ज्ञान प्राकृत भाषेतून सर्वसामान्य लोकांनाही त्यांनी सांगितले. हेच त्यांच्या सामाजिक कार्याचे सर्वात मोठे लक्षण दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**


1. कानडे मु. श्री. संतांची हे भेटी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे १९९१.
2. अत्रे प्र. के. संत आणि साहित्य, गं. पां. परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, १९५४,
3. अळतेकर मा. दा. पाने व फुले भाग १, मा. दा. आळतेकर मुंबई, १९३८.
4. आजगावकर ज. र. मंडळी, मुंबई, दु. आ. महाराष्ट्र कवि चरित्र, भाग १, दामोदर सावळाराम आणि १९२१.
5. आजगावकर ज. र. मंडळी, पुणे, १९१४. महाराष्ट्र कवि चरित्र, भाग ३, दामोदर सावळाराम आणि
6. आजगावकर ज. र. महाराष्ट्र कवि चरित्र, भाग ६, ज. र. आजगावकर, मुंबई, १९२४.
7. आजगावकर ज. र. प्राचीन मराठी संतकवि, खंड २, दि. ग. नाईक, मुंबई, १९७७.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संतांचे सामाजिक योगदान:संत रोहिदास व संत चोखामेळा

**विनिता भुजंग**
संशोधक विद्यार्थिनी
संशोधन केंद्र : मॉर्डन कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे.
**Corresponding Author: विनिता भुजंग**
**DOI- 10.5281/zenodo.14547146**

**सारांश:**

महाराष्ट्र ही संतांची पवित्र भूमी आहे. आपल्या महाराष्ट्रात सामाजिक दृष्टीने संत साहित्याचे परीक्षण अनेक विचारवंतांनी केलेले आहेत. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक न.र. फाटक, वि. का. राजवाडे, गं. बा. सरदार, रा. चिं. ढेरे, वि. भि. कोलते यांच्यासारख्या अनेक व्यासंगी अभ्यासकांनी प्रस्तुत विषयाबाबत सविस्तर विवेचन केले आहे.

इ.स.बाराव्या शतकापासून संतांचे कार्य हे मुलभूत, पायाभूत आणि राजकीय चळवळीला प्रेरणा, प्रोत्साहन देणारे आहे. एवढेच नाही तर संतविचारांमुळेच समाजाचे वैचारिक प्रबोधन झाले. देव, देश, धर्म याबद्दल आस्था, आदर, प्रेम निर्माण झाले आणि त्यामळेच सामान्य माणूस सुद्धा बलिदान करायला तयार झाला.

**प्रस्तावना**

मराठी संत अभंग कीर्तनातून समता, बंधुत्व आणि सर्वधर्मसमभावाच्या शिकवणीतून गेली आठशे वर्षे आपले प्रबोधन करीत आले आहेत. आद्य कवी मुकुंदराजांनी सुरू केलेल्या या परंपरेत श्री चक्रधरस्वामींचा महानुभाव पंथ आणि त्यानंतर ज्ञानदेवांनी, नामदेवांनी त्याचा विस्तार केला. जगद्गुरू तुकोबाराय यांनी तर वारकरी संप्रदायात कळस चढविला. एकनाथ, जनाबाई, चोखामेळा, गोरा कुंभार या सर्व संतांनी पंढरीच्या विठ्ठलाच्या भक्तीने जातीभेदाच्या भिंती दूर केल्या. प्रत्येकाच्या ठिकाणी परमेश्वराचा वास आहे, ही समतेची शिकवण महाराष्ट्रातील या सर्व संतांनी दिली. या संत परंपरेत अनेक प्रवाह असूनही सर्वांची वाटचाल मात्र निखळ ईश्वरभक्ती अन् मानवकल्याणाकडे जात होती.या सर्व संत परंपरेतील संत रोहिदास व संत चोखामेळा यांच्या साहित्यातील भक्ती संप्रदाय व सामाजिक विचार यांचे समग्र दर्शन प्रस्तुत शोध निबंधातून मत मांडणी केली आहे. खरं तर सर्व संतांचे विचार सारखेच आहेत. फक्त सांगण्याची पद्धत व तीव्रता आणि व्याप्ती वेगवेगळी आहे.

संत रोहिदास आणि संत चोखामोळा यांचा सामाजिक विचार:

संत चोखामेळा यांच्याविषयी संत नामदेव आपल्या अभंगात सांगतात..

'चोखा माझा जीव चोखा माझा भाव। कुलधर्म देव चोखा माझा।।
काय त्याची भक्ति काय त्याची शक्ति। मोही आलो व्यक्ति तयासाठी।।
माझ्या चोखियाचे करिती जे ध्यान। तया कधी विघ्न पडो नदी।।
नामदेवे अस्थि आणिल्या पारखोनी। घेत चक्रपाणी पितांबर।।'
(-संत नामदेव)

संत चोखामेळा हे १४ व्या शतकातील महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध संत-कवी होते. ते महार जातीचे होते, जी त्या काळात समाजात सर्वात खालच्या स्तरावर मानली जात होती. समाजात भेदभाव आणि अस्पृश्यता असूनही, चोखामेळा भक्ती चळवळीचे एक महत्त्वाचे आवाज बनले. त्यांनी आपल्या कवितांद्वारे समाज सुधारणा आणि दलित समाजाचे सक्षमीकरण यासाठी प्रेरणा दिली.संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ. ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत, पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. गावगाड्यातील शिवाशिवीच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. दैन्य, दारिद्र्या, वैफल्य यांमुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. परंतु प्रत्यक्ष परमेश्वराने

त्यांना जवळ केले, त्यांना संतसंग लाभला. त्यांना मंदिरांत प्रवेश नव्हता. श्रीविठ्ठलाला त्यांना इतरांप्रमाणे उराउरी भेटावे असे खूप वाटत होते. परंतु ते सावळे, गोजिरे रूप महाद्वारातूनच पाहावे लागे, ही खंत त्यांच्या मनात होती. आपल्या काळामध्ये संतांनी समाजपरिवर्तन केले असे जरी म्हणता येत नसले, तरी त्यांनी प्रबोधनाचे कार्यच निश्चितपणे केले आहे, असे म्हणावे लागेल. संतांनी प्रागतिक दृष्टिकोनातून केलेले प्रबोधनाचे कार्य परिवर्तनाला पोषक, बळकटी आणणारे होते. कारण भेदभाव विरहित लोकजीवन, हक्क, संधी आणि मोबदला यातील समानता, श्रमाचा हक्क व प्रतिष्ठा, शोषण मुक्त सामुहिक उत्पादन व वितरण व्यवस्था आणि लोकांच्या प्रत्यक्ष सहभागानिशी चालणारी सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक व्यवस्था हा परिवर्तनाचा आशय असतो.

एका प्रसिद्ध अभंगात चोखामेळा लिहितात:

“वेद शास्त्रे विटाळली । पुराणे अपवित्र झाली ।
काया आत्मा मळिन झाला । प्रगट सारखाच ॥”

आपल्या कवितेद्वारे, चोखामेळांनी ब्राह्मणी धर्मग्रंथ आणि देवतांना नाकारले, बौद्ध तत्त्वज्ञानातील अनित्यतेचा विचार आणला. त्यांनी प्रदूषण आणि शुद्धतेच्या कल्पनेचा मूलगामी, वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केला, ज्यामुळे आजही फोफावत असलेल्या दलित साहित्यिक कल्पनाशक्तीचा पाया घातला गेला.संत चोखा मेळा यांनी प्रस्थापित व्यवस्थेविरोधात बंड केलं नाही. पूर्वजन्माचं पाप म्हणून आपण हीन जातीत जन्मालो, आपण अत्यंत क्षुद्र, तुमच्या दारीचा श्वान, असं म्हणत चोखोबांनी वारंवार स्वतःकडे कमीपणा घेतला. इतरांना क्षणोक्षणी जोहार घातला. त्यांनी दुष्ट वागणूक दिली तरी नम्रतेनं त्यांना मायबाप म्हटलं. त्याविरोधात कधी विद्रोह केला नाही, म्हणून चोखोबा आणि त्याची पत्नी सोयराबाई हे प्रतिकच आम्हाला नको, अशी भूमिका आंबेडकरी चळवळीनं घेतली. पण या विनम्रतेच्या राखेखाली विद्रोहाचे चटके देणारे निखारे दडले होते, याकडं विचारवंतांचंही दुर्लक्ष झालं. संत स्वतः सर्वसामान्य लोकांतून आलेले असल्यामुळे त्यांचे खरे स्वरूप सर्व सामानंचे प्रतिनीधी हेच होते. आपली लोकप्रतिनिधीची व समाजशिक्षकाची भूमिका जोपासण्यासाठी संतांनी अतिशय बारिक सारिक गोष्टीचांही सखोलपणे विचार केला होता. आपला प्रगतिक दृष्टिकोन हिरिरीने मांडण्यासाठी संतांनी लोकभाषा आणि लोकमाध्यमांचाच वापर केला.

समाजामध्ये विषमतेच्या दोषाबरोबरच उच्च नीच भेद कायम होता. या भेदनीतीमुळे सबंध समाज आतून सडल्यासारखा झाला होता. उच्चवर्णीय स्वतःला परब्रम्ह मानून ज्ञानाच्या पोकळ प्रतिष्ठेने गर्विष्ठ झाले होते. अज्ञानाचा आणि शूद्रांचा बुद्धिभेद करण्यातच त्यांना आपल्या बुद्धीचे कौतुक वाटत होते. त्यामुळे ज्यांना डोळस म्हणावे तेच आंधळ्यासारखे वागत होते. अशा वेळी प्रत्येक संताने आपल्या दृष्टिकोनातून समाजाचे निरीक्षण करून समाजप्रबोधन कार्यात यथाशक्ती आपला हातभार लावला.

**संत रोहिदासांचे सामाजिक विचार:**

मध्ययुगात बिकट आणि घोर अंधःकारमय परिस्थतीमध्ये तत्कालीन महामानव समजले जाणारे स्वामी रामानंद यांच्या मार्गाचा अवलंब करून ज्या संतांनी भारतीय समाजाला विशेषतः शूद्रांना भक्तिमार्गातील आशेचा किरण दाखवून त्यांच्यात नवचैतन्य निर्माण केले. या संतामध्ये संत रोहिदास प्रमुख होत. समानता हा रोहिदासांनी समाजास दिलेला प्रमुख विचार आहे. सर्व मनुष्यमात्र परब्रम्हाद्वारा एकच प्रकारे आणि एकाच तत्त्वाने निर्माण झाले आहेत हे पटवून देण्यासाठी ते आपल्या 'बाणीत' म्हणतात,

“रविदास एकै ब्रम्हा का, होई रहयो सगल पसार । एकै माटी सब घटस्त्रजै, एकैसभ कूं सरजन हार ' ॥

ज्या प्रमाणे कुभार एकाच मातीची अनेक निरनिराळी भांडी तयार करतो, त्याप्रमाणे ईश्वर हा एकाच तत्त्वातून अनेक प्राणिमात्रांना निर्माण करतो. या सर्व प्राणिमात्रांत एकच परमात्मा असून सर्व मानव समान आहेत. रोहिदास मानव समानते बरोबरच भक्तिबद्दल आग्रह धरणारे साधक होते. भक्तीशिवाय पूजेचा बडेजाव, कर्मकांड आणि देखावा रोहिदासांना मान्य नव्हता. जी व्यक्ती ईश्वराला सर्वस्व अर्पण करीत नही ती कर्मकांड जपजाप्य, तीर्थयात्रा या बाह्य बडेजावावरच विश्वास करते अशा साधकाला मुक्ती नसून यातनाच सहन कराव्या लागतात. अशा बाह्या अवडंबरा बद्दल रोहिदास म्हणतात,

'अन्तरगति रांचे नही, बाहर करै उजास ।
ते नर यमपुर जहिये सत्त भाषै रैदास ।।'

दिखाऊ साधनेवर रोहिदासांचा विश्वास नसल्यामुळेच ते मूर्तिपूजा, यज्ञयाग, वेदघोष या गोष्टीची उपेक्षा करतात. ईश्वर सर्वव्यापी, सर्वसाक्षी असून तो भक्तीने प्रसन्न होऊन दीनदलितांचा उद्धार करतो.

"धुआ तपन मंहि का धरा, धूप तपन ही त्याग।
'रविदास' मिली है मोक्ष धाम, सेवा ही तप आग ।।"३

रोहिदास मानवसेवेलाच प्रभूची पूजा मानत असल्यामुळे त्यांनी मानवसेवेलाच तपाची सज्ञा देऊन मानवसेवेद्वारा मोक्षप्राप्तीचा मार्ग समाजाला दाखवला. श्रमसाधनेची प्रतिष्ठा ही रोहिदासांनी समाजाला दिलेली विशिष्ट देणगी असून ते श्रमातच ईश्वाराचे रूप पाहतात. म्हणूनच ते श्रमाला ईश्वरभक्ती मानतात. श्रमसाधना ही जीवनात सुखशांतीचे अव्दितीय परंतु सरळ आणि सोपे साधन असल्याचे त्यांनी आपल्या स्वकर्तृत्वावरून दाखवून दिले. स्वकर्मालाच धर्म आणि भक्तीची जोड असली म्हणजे ते सुकर्म बनते हेच त्यांना आपल्या पुढील वाणीतून सांगायचे आहे.

'रविदास स्त्रम करि खाइहि, जौ लौं पार बसाय । नेक कमाई जउ करइ, कबहुँ न निहफल जाय ।।'

रोहिदासांच्या बोलण्यात आणि वागण्यात संगती होती हाच त्यांच्या जीवनातील मोठा आदर्श होता. इंद्रियाचा संयम अर्थात विषयभोगापासून दूर राहणारी व्यक्तीच देवपदाची अधिकारी होते.

"जो बस राखे इंद्रिया, सूख दुख समझि समान । सोड अमरित पद पाइगो, काहि 'रविदास बखान ||"

माणसाला जगात सुखी राहण्यासाठी स्वतः चे मन कपटरहित ठेवणे आवश्यक आहे. तसेच कुकर्माचे आचरण न करता दुष्ट आणि कुमार्गीयाची संगत टाळावी. आपल्या दुरावस्थेचे आणि परावलंबित्वाचे मूळ अज्ञानात असून त्यासाठी ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे. कारण, ज्ञान प्राप्त झाल्यावरच मानसिक अवस्था चांगली राहून मन प्रसन्न राहते. कोळीष्टके दूर होण्यासाठी ज्ञान हाच एकमेव मार्ग असून ज्ञानार्जन हा प्रत्येक माणसाचा हक्क आहे. ज्ञान ही स्वतःची संपत्ती आहे. असे समजून जर कोणी ज्ञानदान करण्याचे नाकारत असेल तर ते ज्ञान हिसकावून घेऊन आपण आत्मसात केले पाहिजे. त्याखेरीज कोणताही बदल होण शक्य नाही असे सर्वच संत सांगतात. आपला जन्म उच्च जातीत झाला, की नीच जातीत झाला याला महत्त्व न देता आपले आचार विचारच श्रेष्ठ प्रतीचे पाहिजेत असे रोहिदास आग्रहाने सांगतात.

'जैसा रंग कुसुंभ का, तैसा इह संसार ।
मेरे रमईए रंगु मजीठ का कहु रविदास चमार ।।'

आपले स्वकर्म निष्ठेने करण्यातच ईश्वर प्राप्ती होते. या संसाराचा रंग कुसुंग फलाप्रमाणे सारखा बदलत आहे. परंतु ईश्वरभक्तीचा पक्का रंग एकदा चढला, की तो केव्हाही बदलाणार नाही. रोहिदासांनी राजकीय आणि सामाजिक अत्याचाराने पिचून गेलेल्या तसेच दुष्ट व्यवहाराच्या जाळयात अडकेलेल्या समाजास सत्याच्या सामोरी नेले.

**समारोप:**

संत चोखामेळांचे व रोहीदासांचे जीवन आणि कविता हे भक्ती चळवळीच्या सामाजिक श्रेणी आव्हान देण्याच्या आणि सर्व प्राण्यांच्या अंतर्गत समानतेचा दावा करण्याच्या परिवर्तनशील शक्तीचे उदाहरण आहेत. प्रचंड कष्ट आणि भेदभावाला तोंड देत असतानाही, त्यांनी आपल्या काव्य प्रतिभेचा वापर आध्यात्मिक जागृती आणि सामाजिक सुधारणा करण्यासाठी केला. आपल्या अभंगांद्वारे, चोखामेळांनी दलित अनुभवाला वाचा फोडली, ब्राह्मणी कथांना प्रश्न विचारले आणि दैवी शक्तीच्या सार्वत्रिकतेवर भर दिला. त्यांचा वारसा आजही पिढ्यानपिढ्या साधक आणि कार्यकर्त्यांना प्रेरणा देत आहे, जातीय अन्यायाविरुद्धच्या सतत चालू असलेल्या लढ्यात आशा आणि लवचिकतेचा दीपस्तंभ म्हणून काम करत आहे.

**संदर्भग्रंथ:**


1. **मन चंगा संत रोहिदास (मराठी)' , आनंद गवळी - यशोदीप प्रकाशन पुणे.**
2. श्री. संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग - स. भा. कदम - शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
3. कविठकर ग. वि. कीर, धनंजय आणि इतर (संपा.) श्रीनामदेव : चरित्र, काव्य आणि कार्य, महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई, १९७७.
4. कवीश्वर ग. वा. - ज्ञानेश्वरी विरुद्ध गीता, अस्मिता प्रकाशन, पुणे, १९८८.
5. कानडे मु. श्री. मराठी शब्द समीक्षा, सन पब्लिकेशन्स्, पुणे, १९८९.
6. कानडे मु. श्री. संतांची हे भेटी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे १९९१.
7. कामत, अशोक आणि ताठे विद्याधर, (संपा.) मना सज्जना, (प्राचार्य डॉ. रा. वा. चिटणीस लेखसंग्रह) ओंकार प्रकाशन, पुणे, १९९२.
8. कारखानीस ग. श्रो. (संपा.) ढेरे रा. चिं. संत आणि समाज, श्री ज्ञानेश्वर अभ्यास मंडळ, विजापूर, १९६४.
9. कारखानीस ग. गो. श्री समर्थ रामदास विचार आणि कार्य, श्री ज्ञानेश्वर अभ्यास मंडळ, विजापूर, १९६४.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No.43 Nov-Dec 2024

# संत आणि भक्ती चळवळ

**स्वप्निल सुभाष जोशी**
संशोधक विद्यार्थी
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे.
**Corresponding Author: स्वप्निल सुभाष जोशी**
**DOI- 10.5281/zenodo.14547177**

**सारांश:**

संत साहित्य म्हणजे समानता आणि एकता यांचा अखंड संदेश देणारी एक आदर्श गाथा आहे. महाराष्ट्रात संतांनीच भागवत संप्रदायाचा पाया रचला. त्यांच्या तत्त्वप्रणालीने अनन्यनिष्ठ भक्तियोगाचा उपदेश सर्व जनतेला केला आणि तिला तात्त्विक दृष्ट्या उच्चतम पातळीवर नेले. या विचारप्रणालीने श्रीमत् भगवद्गीतेने सांगितलेल्या उदात्त गुणांची, दैवी गुणसंपदेची जोपासना शिकविली. तसेच सतत विशुद्ध लोकधर्म सांगितला. तिने सामाजिक जीवनाच्या नैतिक परिशुद्धीचाही आग्रह धरला. निम्न स्तरांवरील देव-देवतांच्या तामसी उपासनेला प्रतिबंध केला आणि उच्च, उदात्त, परमकारुणिक आणि सर्वसंग्राहक अशा 'एकदेवत्वा'ची कल्पना गौरविली. वारकरी तत्त्वसृष्टीने कर्मठपणाचे बंड मोडले, पण कर्मप्रवृत्तीचा नाश होऊ दिला नाही. तिने पढिकतेचा निषेध केला, पण डोळसपणाचा आग्रह सोडला नाही. विशुद्ध विवेक आणि सामाजिक नीती यांना वारकरी तत्त्वप्रणालीने सर्वोच्च स्थान दिले.

**प्रस्तावना:**

संत हे अमृताचे चालते बोलते समुद्र आहेत. संत ज्ञानदेव, संत तुकाराम महाराज, संत नामदेव, संत सावता माळी, समर्थ रामदास स्वामी, संत गोरा कुंभार, संत जनाबाई, संत मुक्ताबाई या सर्व संतांच्या कार्याचा, विचारांचा एक समान धागा कोणता असेल, तर त्यांनी माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याची कृती केली आणि तसे विचार प्रस्तुत केले. आपण सारी ईश्वराची लेकरे आहोत, म्हणून परस्परांचे बंधू आहोत, परस्परपूरकता आणि सामंजस्य यातून विकासाचा मार्ग चोखाळता येतो, हे या संतांनी दाखवून दिले आहे. जात, धर्म, वंश, पंथ, संप्रदाय यांच्याही पुढे जाऊन 'माणूस' धर्माची प्रस्थापना करण्याचा प्रयत्न या संतांनी केलेला आहे आणि माणूस धर्माच्या अंगीकारासाठी कृतिरूप मार्ग सांगितला आहे, हे लक्षात घेता आजच्या काळातील समस्या आणि आधुनिक संतांनी आपल्या कृतीने, विचाराने जे आदर्श उभे केले आहेत त्यांचा ताळमेळ लावला तर बरेच काही सकारात्मक हाती लागू शकते.

आणि म्हणूनच आजचा समाज व त्याला लागलेली समस्यांची कीड आणि आधुनिक संतांनी सांगितलेला विचार यांचा सविस्तर अभ्यास या निमित्ताने मांडण्याचा हा प्रयत्न आहे. या निमित्ताने समाजाची मनोभूमिका तयार करण्यात निदान दिशा मिळेल अशी अपेक्षा आहे. आज आपण समाजजीवनात जे अनुभव घेत आहोत, त्यावर समान मनोभूमिका आणि समान विचार, समान कृती हा मार्ग आहे आणि तोच संविधानाला अपेक्षित आहे. आपण लोकशाहीप्रधान देशात राहतो, संविधान हे आपल्यासाठी धर्मग्रंथापेक्षाही उच्चस्थानी आहे. तिचा योग्य प्रकारे अंगीकार करण्यासाठी ही मनोभूमिका उपयुक्त ठरणार आहे.

वारकरी तत्त्वसृष्टी ही 'अद्वय' भावाची आहे. पराभक्तीची आहे. ती साऱ्यांना 'आत्मोद्धार' शिकविते आणि 'लोकोद्धार ही शिकविते. केवल अद्वैती तत्त्वज्ञान आणि भावभिजले संकीर्तन दोन्ही तिला आवडतात. ही विचारप्रणाली भक्ती आणि नीती यांची जोडी कधीही फुटू देत नाही. या तत्त्वसृष्टीचा पाया घालणाऱ्या श्रीज्ञानदेवांनी सर्वांना शिकविले की, स्वकर्तव्यकर्माच्या सुगंधित कुसुमांनी देव- देवेश्वराची पूजा करा. अशा तऱ्हेने, वारकरी तत्त्वसृष्टीने सांगितलेली भक्ति- संकल्पना प्रवृत्तिनिष्ठ आहे. मात्र तिला 'सकामते'चे वावडे आहे. ती एकदेववादी आहे, पण तितकीच सर्वसमावेशक आहे. वारकरी विचारप्रणाली ही वत्सल भक्तीचा सदैव पुरस्कार करते. ती देव-भक्तांचे नाते हे माय-

लेकरांचे नाते मानते. हा विशुद्ध भाव, भक्तीही जोपासतो आणि सामाजिक शुचिताही राखतो. सुरुवातीपासूनच समाजातील अनिष्ट रूढींवर प्रहार केला आहे. समाजाला नवा विचार देण्याचा प्रयत्न केला. संतवचनाचा विचार केला तर अध्यात्म, वेदाभ्यास, ईश्वरभक्ती यांच्याइतकाच सामाजिक विचार त्यांच्या वचनांतून दिसून येतो. संतांनी आपल्या अभंगांतून, ओव्यांतून, काव्यातून सामाजिक समतेची ग्वाही दिली आणि तत्कालीन समाजजीवनात या ग्वाहीची प्रचिती यावी, यासाठी संतमंडळींनी प्रयत्न केले.

**संतांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य:**

मराठी संत अभंग कीर्तनातून समता, बंधुत्व आणि सर्वधर्मसमभावाच्या शिकवणीतून गेली आठशे वर्षे आपले प्रबोधन करीत आले आहेत. आद्य कवी मुकुंदराजांनी सुरू केलेल्या या परंपरेत श्री चक्रधरस्वामींचा महानुभाव पंथ आणि त्यानंतर ज्ञानदेवांनी, नामदेवांनी त्याचा विस्तार केला. जगद्गुरू तुकोबाराय यांनी तर वारकरी संप्रदायात कळस चढविला. एकनाथ, जनाबाई, चोखामेळा, गोरा कुंभार या सर्व संतांनी पंढरीच्या विठ्ठलाच्या भक्तीने जातीभेदाच्या भिंती दूर केल्या. प्रत्येकाच्या ठिकाणी परमेश्वराचा वास आहे, ही समतेची शिकवण महाराष्ट्रातील या सर्व संतांनी दिली. या संत परंपरेत अनेक प्रवाह असूनही सर्वांची वाटचाल मात्र निखळ ईश्वरभक्ती अन् मानवकल्याणाकडे जात होती.

आपण सगळे ईश्वराची लेकरे आहोत आणि या लेकरांच्या ठायी याच ईश्वराचा वास आहे. तो भक्ताच्या मदतीला धावून येतो, या ईश्वरश्रद्धेने समाज बांधला गेला. पंढरीच्या वारी यातून एकता, प्रेम आणि सर्वांना बरोबर घेऊन चालण्याची सहजता गेली अनेक वर्षे मानवतेचे दर्शन घडविते आहे. या वारकरी संप्रदायासोबत नंतर आणखी काही पंथ उदयास आले. या पंथांनी साधना, उपासना, दीक्षा या अध्यात्माच्या विविध रुपांनी भक्ती सांगण्याचा प्रयत्न केला; तरीही कर्मकांडाचे गालबोटही इथे लागलेले दिसते. या कालचक्रात आधुनिक समाजात शिक्षण आणि प्रबोधनाच्या माध्यमातून नवनवे संत निर्माण होत गेले. या संतांनी बदलत्या काळाची निकड ओळखून, परिवर्तनाची चाहूल हेरून समाजप्रबोधनाचे काम सुरूच ठेवले. ग्रामसेवेचे व्रत घेतलेले गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, पाचलेगावकर महाराज, पांडुरंगशास्त्री आठवले आणि वामनराव पै या अर्वाचीन संत समाजपुरुषांनी आपल्या कृतीतून, अभंगगीतांतून, प्रवचनांतून, समाज आणि समाजमनाच्या सफाईचे काम सक्षमपणे केले.

संत चळवळीचा आणि त्यांच्या कार्यासंबंधी न्या. रानडे यांचा दांडगा अभ्यास होता. संत चळवळीचे मार्मिक विश्लेषण करताना न्या. रानडे म्हणतात, "तेराव्या शतकात होऊन गेलेल्या ज्ञानेश्वरांपासून गेल्या शतकाच्या शेवटापर्यंत चालू असलेली धार्मिक चळवळ ही आध्यात्मिक गुणांनी मंद गतीने वाढत होती. देशाच्या बोल भाषेत या चळवळीने बरेच मोलाचे ग्रंथ लोकांना दिले. एकमेकांना तुच्छ लेखणारी जातिभेदांची तीव्रता पुष्कळशी कमी झाली. शूद्र समाजाला जवळजवळ ब्राह्मणांच्या बरोबरीने आध्यात्मिक पुण्याई व सामाजिक महती प्राप्त करून दिली. गृहस्थाश्रमातील नात्यांचे पावित्र्य वाढवून बायकांचा दर्जा उंचावला. राष्ट्राला जास्त माणुसकीने वागण्यास शिकविले. न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या द्वैतवादी मताचा पुरस्कारार्थ 'प्रार्थना समाज' कार्यप्रवृत्त केला. त्यांचा प्रार्थना समाज हा राजा राममोहन रॉय यांच्या ब्राह्मो समाजापेक्षा भिन्न आहे, असे ते म्हणत असत. ते स्वतः आस्तिकवादी होते व मानवी जीवनात श्रद्धेला अतिशय महत्त्वाचे स्थान असून समाजधारणेचा व सामाजिक सुधारणांचा तो पाया आहे, असे ते मानत असत. पण परंपरा त्याग न करता सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रही दृष्टीकोन होता.

**संत लोकजीवनाची वैशिष्ट्ये:**

ज्ञानेश्वरानंतर जनार्दन स्वामी, एकनाथ महाराज, नामदेव आणि त्यानंतर संत तुकाराम यांनी भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली. भागवत धर्माचा कळस म्हणजे संत तुकाराम,त्यांनी बहुजन समाजामध्ये पसरलेली धर्म कर्मकांडाची जळमटे आपल्या कीर्तनातून पुसून टाकली. अभंगवाणी महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये वसली. अभंगवाणीतून सत्यधर्माची शिकवण जगाला संत तुकाराम यांनी दिली. सामाजिक परिवर्तनाची वादळ सर्वत्र पसरले. या वादळाला थोपविण्यासाठी सनातनी धर्ममार्तंडांनी कल्लोळ केला, कटकारस्थाने रचली अशा अनेक संकटातून नव्हे तर अग्निदिव्यातून जात असताना अभंग सतत गर्जत राहिला. जाती-धर्माची उतरंड त्यांनी मोडून काढली. गुलामगिरीची चौकट मोडली. बहुजन समाजामध्ये स्वाभिमान निर्माण केला.

एकनाथांच्या धर्मनिष्ठेपेक्षाही त्यांचा उदारपणा, मनाची विशालता, त्यांची कल्पनाशक्ती, त्यांचा दयाळूपणा जास्त प्रेरक वाटतात. त्यांच्या या गुणविशेषांमुळे एकनाथ त्यांच्या समकालीन लोकांमधे महान ठरतात. एकनाथांच्या हातून जी काही कार्ये त्यांना वाटणाऱ्या दयेपोटी घडून आली ती सर्व आजच्या युगाच्या सुधारकांसाठी आदर्श ठरतात.

'मनाचे श्लोक' हे एका समर्थ मनातून, अंतरीच्या उमाळयाने उसळलेले आहेत.साहजिकच ते सर्वांना कणखर आणि रोकडे बोल ऐकवतात. ते 'मना सज्जना, भक्तिपंथेचि जावे।' असा भक्तिमार्गाचा संदेश देतात. साऱ्या सांसारिकांना संकटकाळात 'मना श्रेष्ठ धारिष्ट्य जीवीं धरावे।' असा वडिलकीने उपदेश करतात. त्याचप्रमाणे 'मना, चंदनाचे परि त्वां झिजावे।' अशी लोकसेवेची शिकवण देतात. तसेच 'मरावे, परि कीर्तिरूपे उरावे।' अशी आदर्श जीवनाची संकल्पनाही मांडतात. 'जगी सर्वसुखी असा कोण आहे।' असा प्रश्न पुनःपुन्हा पडलेल्या मनाला, प्रभू रामचंद्राचे पावन नामस्मरण करायला सांगतात आणि 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे।' असा धीरही देतात. तसेच 'क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे।' अशी स्पष्टोक्तीही ऐकवून ते सर्व जनांना आपापल्या कर्तव्याची पुरेपूर आठवण देतात. श्रीसमर्थांच्या 'मनाच्या श्लोकां'चे असे हे अप्रतिम सार आहे.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज आपल्या अभंगातून मनालाही सांगतात हे माझ्या मना, आपल्यातील निंद्य वासना, दुष्ट खोडी- साऱ्या साऱ्या टाकून दे. त्या विषयसुखाची व्यर्थ गोडी ठेवू नकोस. या जीवनात सर्वोच्च, हितकारक मागणे एकच आहे की 'धरी विठ्ठली प्रेम । हेच सर्व सुख ।।' दुसरे काहीही खरे नाही. श्रीतुकोबा म्हणतात- 'मना एक करी। म्हणे मी जाईन पंढरी। उभा विटेवरी। तो पाहीन सांवळा ।।' हे माझ्या मना, तू सतत वाणीने 'राम कृष्ण-हरि-गोविंद' म्हण। संतांच्या पायांचा आश्रय कर । हरिकथासंकीर्तनात उत्साहाने भाग घे. अंतरंगातील मलीनता दूर कर. अरे, 'नाचे रंगी। वाजे टाळी। होय सादर। त्या काळी ।।' असा हा मनोमंदिरासाठी अप्रतिम सोहळा आहे. आपल्या मनाचा गाभारा सदैव विठ्ठलभक्तीनेच भरलेला हवा. आपण श्रीपांडुरंगाच्या चरणी सरते झालो, तरच आपल्या जन्माचे सार्थक होईल. यासाठी श्रीविठ्ठलाचीच चरणसेवा आपण सदोदित मिळवली पाहिजे.

जें कां रंजलें गांजलें । त्यासि म्हणे जो आपुलें ॥१॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥

जे लोक या संसारतापाने त्रासलेले आहेत, गांजलेले आहेत त्यांना जो आपले म्हणून जवळ करतो, तोच खरा साधू म्हणून ओळखावा. इतकेच नव्हे तर त्याच्या ठिकाणीच देव आहे असे समजावे असे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज आपल्या अभंगातून समस्त मानवजातीला सांगतात. श्री एकनाथांचा, श्रीतुकाराम आणि श्रीरामदास यांच्याशी असणारा अनुबंध- भावबंध सांगताना प्रा. गं. बा. सरदार म्हणतात (ग्रंथ 'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', पृष्ठ १३६) वेदान्त आणि व्यवहार, एकाग्रता आणि चतुरस्रता, आत्मनिष्ठा आणि लोकसंग्रह, निःस्पृहता आणि चातुर्य- यांच्या ऐक्यावर भर देऊन, एकनाथांनी रामदासांच्या कार्याचा पाया घातला. तसेच सत्यनिष्ठा आणि सौजन्य, समबुद्धी आणि भूतदया, भक्ती आणि नीती यांचा प्रसार करून एकनाथांनी तुकारामांची पूर्वतयारी केली. हे त्यांचे प्रभावशाली कर्तृत्व पाहिले की, एकनाथ हे युगप्रवर्तक विचारवंत होते, हे लक्षात येते.

संत साहित्याचे अभ्यासक व संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे त्यांच्या 'विविधा' या ग्रंथात म्हणतात (पृष्ठे १५०, १५१) रामदास आणि तुकाराम या दोन्ही शिवकालीन संतांवर एकनाथांचा विलक्षण प्रभाव पडलेला दिसतो. स्थलकालाची सापेक्षता गृहीत धरून बोलावयाचे तर असे समीकरण मांडता येईल की, एकनाथ तुकाराम रामदास. एकनाथांच्या भागवतधर्मातील भाव-पक्षाचे प्राबल्य तुकोबांच्या जीवनात दिसते, तर कर्म- पक्षाचे प्राबल्य रामदासांच्या जीवनात दिसते.असो अशा त-हेने सतराव्या शतकातील दोन संतश्रेष्ठ म्हणजे श्री तुकाराम आणि श्रीरामदास यांचे कार्य कसे परस्पररूपक होते, हे प्राचार्य रामदास डांगे यांनीही त्यांच्या पुस्तकात सविस्तरपणे सांगितले आहे. (ग्रंथ 'शिवशाहीतील दोन संत-तुकाराम आणि रामदास') या ग्रंथात प्रारंभीच्या निवेदनात व पुढे प्रास्ताविकात ते म्हणतात-शिवशाहीतील श्रीतुकाराम आणि श्रीरामदास या दोन संतांबद्दल एकत्र विचार केला पाहिजे. श्री तुकाराम आणि श्रीरामदास यांचे कार्य एखाद्या नाण्याच्या (विरुद्ध पण परस्परपूरक) दोन बाजूंप्रमाणे आहे. त्यांच्या दोघांच्याही व्यक्तिमत्त्वांतील आणि म्हणूनच कर्तृत्वातील पृथगात्मता ही परस्परपूरक आणि समाजाला कायमच तारक ठरणारी आहेत.

श्रीसमर्थ आणि श्रीतुकाराम हे दोघेही वैष्णववीर आहेत. त्यांनी कधी संघर्षाकडे पाठ फिरवली नाही, की कधी कर्तव्यसन्मुखता सोडली नाही. श्रीतुकाराम तर ग्वाहीच देतात की, 'रात्रंदिन आम्हां । युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग । आणि मन ।।' अशा स्थितीत तुम्हाला खरी भगवद्भक्ती हवी ना? मग कृत्रिम डामडौल टाका आणि अंतरंग-श्रीमंती मिळवा, असे तुकोबाराय सांगतात, तरच आनुभविक आध्यात्मिकांचे आशीर्वाद तुम्हाला मिळतील. कारण 'करणीचे काही न मने सज्जना। यावे लागे मनां वृद्धांचिया ।।' हे खरे आहे! यासाठी आपले मन भगवद्भक्तीतच प्रयत्नपूर्वक

रममाण करायला हवे आणि मनाने 'विठ्ठल-निधान'च जोडायला हवे, असे श्रीतुकाराम सांगतात. अशा त-हेने 'मनोबोध' करताना तुकोबारायांना भगवद्भक्तीच सर्वथा प्रिय आहे, पण ते तिला कर्तव्यसन्मुखतेचे कोंदण कटाक्षपूर्वक देतात, ही विशेष गोष्ट आहे. म्हणजे श्रीसमर्थांचा आणि श्रीतुकोबांचा दोघांचाही 'मनोबोध' कसा आहे? तर तुकोबारायांनी कर्तव्यप्रवण भक्तियोग सांगितला आहे, तर रामदासस्वामींनी भक्तियुक्त कर्मयोग सांगितला आहे. परिणामी त्या सतराव्या शतकात त्या शिवकाळात भक्तियोग आणि कर्मयोग यांचा सुंदर संगम साधलेला आहे.

संत साहित्याचे अध्ययन करतांना महाराष्ट्रातील सारस्वत व भक्तीसंप्रदाय समजून घेणे उचित ठरते त्यानुसार प्रस्तुत विषयाचे महत्व अधोरेखित होते.

**संदर्भग्रंथ:**


1. कुलकर्णी गो. म. खंडन मंडन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८.
2. कुलकर्णी गो. म. पुणे, १९९२. ज्ञानेश्वरांची साहित्यदृष्टी आणि सृष्टी, मेहता पब्लिशिंग हाऊस,
3. कुलकर्णी गो. म. आणि शेव्ह्ये वि. त्र्यं. (संपा) महाराष्ट्राची सत्वधारा, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे. १९८१.
4. कामत, अशोक आणि ताठे विद्याधर, (संपा.) मना सज्जना, (प्राचार्य डॉ. रा. वा. चिटणीस लेखसंग्रह) ओंकार प्रकाशन, पुणे, १९९२.
5. कारखानीस ग. श्रो. (संपा.) ढेरे रा. चिं. संत आणि समाज, श्री ज्ञानेश्वर अभ्यास मंडळ, विजापूर, १९६४.
6. कारखानीस ग. गो. श्री समर्थ रामदास विचार आणि कार्य, श्री ज्ञानेश्वर अभ्यास मंडळ, विजापूर, १९६४.
7. काशीकर चिं. ग. आणि जोशी वे. ल. (संपा.) म. म. चित्रावशात्री षष्ट्यब्दपूर्ती अभिनंदन ग्रंथ, चित्रावशास्त्री षष्ट्यब्दपूर्ती सत्कार समिती, पुणे, १९५४.

**Chief Editor**

**P. R. Talekar**

Secretary,

Young Researcher Association, Kolhapur(M.S), India

**Editorial & Advisory Board**

| | | |
|---|---|---|
| Dr. S. D. Shinde | Dr. M. B. Potdar | Dr. P. K. Pandey |
| Dr. L. R. Rathod | Mr. V. P. Dhulap | Dr. A. G. Koppad |
| Dr. S. B. Abhang | Dr. S. P. Mali | Dr. G. B. Kalyanshetti |
| Dr. M. H. Lohgaonkar | Dr. R. D. Bodare | Dr. D. T. Bornare |